# मराठ्यांचे स्वातंत्र्यसमर



## छत्रपति राजाराम

प्रा. श. श्री. पुराणिक

# मराठ्यांचे स्वातंत्र्यसमर

(१६८१-१७०७)

उत्तरार्ध

## छत्रपति राजाराम व ताराबाई

(१६८९-१७०७)

६५

लेखक

प्रा. श. श्री. पुराणिक

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था
११११ सदाशिव पेठ, नवी शाखा,
पुणे-४११ ०३०

काळ प्रकाशन, पुणे ३०

प्रथमावृत्ति १९८२, डिसेंबर

**मूल्य ५० रुपये**

मुद्रक : प्रकाशक : शं. रा. दाते, काळ प्रकाशन, १८३५, सदाशिव पेठ, पुणे ३०.

श्री. शंकर रामचंद्र

तथा

मामाराव दाते

यांस

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था,
११३५ सदाशिव पेठ, ... वाडा,
... पुरुषोत्तम चौक, पुणे-४११ ०३०

## प्रस्तावना

गेल्या वर्षी म्हणजे दि. ११ जून १९८१ रोजी 'मराठ्यांचे स्वातंत्र्यसमर' या ग्रंथाचा 'पूर्वार्ध' प्रसिद्ध झाला. आज 'उत्तरार्ध' प्रसिद्ध होत आहे; आणि हे दोन्ही खंड मिळून हा विषय आता पूर्ण झालेला आहे हे सांगण्यास मला समाधान वाटत आहे. एवढे मोठे काम माझ्या हातून अखेर सिद्धीस गेले याबद्दल तर मला धन्यता वाटतेच. पण त्याहीपेक्षा 'उत्कट भव्य तेचि घ्यावे । मिळमिळीत अवघेचि टाकावे ।' या समर्थांच्या वचनानुसार मराठ्यांच्या इतिहासातील या उत्कट आणि भव्य पर्वाच्या सेवेत देवाच्या पूजेत सहाणेवर झिजणाऱ्या चंदनाप्रमाणे माझी विद्या आणि लेखणी झिजली, याबद्दल वाटणारी कृतार्थता व्यक्त करण्यास माझ्यापाशी शब्द नाहीत.

'संजीवनी' मंत्राच्या प्रभावाने मेलेले वीर जिवंत होत अशी कथा आहे. इतिहासातली सहानुभूति Sympathetic Imagination हाही असाच एक अमोघ आणि अद्भुत 'संजीवनी' मंत्र आहे. त्या मंत्राच्या प्रयोगाने आणि अनुष्ठानाने मराठ्यांच्या इतिहासातली ती तीनशे वर्षांपूर्वीची माणसे पुन्हा जिवंत झाली आणि माझ्याभोवती वावरू लागली; आणि त्यांनी संचार केलेली ती स्थळे आणि त्यांचा तो काळ चित्रात रेखल्यासारखा माझ्या डोळ्यांपुढे उभा राहिला. मुलाच्या व राज्याच्या चिंतेने खंगलेले आणि शेवटी निर्धाराने सर्व ऐहिक व्यापारांचा संन्यास करून श्रीचे स्मरण करीत अखेरच्या घटका मोजणारे मृत्युशय्येवरचे शिवछत्रपति, रायगडपासून फोंड्यापर्यंत वादळवाऱ्याप्रमाणे घोंघावत गेलेला वीरमणि संभाजी, जिवंतपणी चितेवर चढावे त्याप्रमाणे औरंगजेबाच्या दरबारात प्रवेश करणारी सती येसूबाई, भीमेपासून तुंगभद्रेपर्यंत आणि साताऱ्यापासून जिंजीपर्यंत झंझावाताप्रमाणे झेपावत जाणारा आणि पारध्यांनी गरुड टिपावा त्याप्रमाणे मारेकऱ्यांनी कारखळ्याच्या जंगलात अचूक 'टिपलेला' दुर्दैवी संताजी, कोल्हापूरच्या महिषासुरमर्दिनीप्रमाणेच मोगलांचे निर्दालन करणारी ती भद्रकाली ताराबाई, वार्धक्याने, व्याधींनी आणि मराठ्यांच्या हल्ल्यांनी, बाणांच्या वर्षावाने विव्हळ झालेल्या भीष्माप्रमाणे जर्जर झालेला तरीही अखेरपर्यंत झुंजणारा ताठ कण्याचा दुर्दम्य औरंगजेब, भीमेच्या खळाळणाऱ्या प्रवाहाला खेटून उभे असलेले त्याचे ते बेगमपूर, विराट् वैभवाचा तो उद्ध्वस्त अवशेष, तेथले ते गुडघा गुडघा उंच वाढलेले गवत, तो पडका निमजगा, त्या वेळच्या पाच मैल लांबीच्या तटबंदीचे आता उरलेले ते एकाकी आणि केविलवाणे खिंडार, बुऱ्हाणपूरच्या राजवाड्यातील हमामखान्याच्या छतावरचे ते संगमरवरी नक्षीकाम शाही बागेतल्या हिरवळीचा तो मखमली गालीचा, पडझड झालेल्या इमारतींनी

खचलेले ते विजापूर, आणि तेथल्या 'मुलुखमैदान' तोफेवरचा औरंगजेबाचा तो 'शिलालेख', वैराग्याच्या ऐश्वर्याने झगमगणारी खुल्दाबादची ती औरंगजेबाची कबर....हिलालींनी आणि मशालींनी उजळलेली तीन शतकांपूर्वीची इतिहासातल्या पात्रांची आणि स्थळांची ती विलक्षण मिरवणूक, समुद्राच्या लाटांप्रमाणे गंभीर घोष करीत इतकी वर्षे डोळ्यांपुढून मिरवत जात होती. ती मिरवणूक आता संपलेली आहे आणि तो कोलाहलही आता शांत झालेला आहे. समारंभासाठी गजबजलेले घर रिकामे झाले म्हणजे जसे खायला उठते तसे आता झाले आहे.

टिळकांची अशी गोष्ट सांगतात की, गणेशोत्सवात गणेशमूर्तीचे विसर्जन करून आल्यानंतर ते काही वेळ अगदी खिन्न होऊन एकटेच बसत. धर्मानंद कोसंबींनी त्यांना एकदा याबद्दल विचारले. तेव्हा ते म्हणाले- "गणपतीचे विसर्जन करून मी आलो म्हणजे मला नेहमीच असे उदास वाटते." टिळकांसारख्या ज्ञानी माणसालासुद्धा अशी उदासीनता यावी याचे कोसंबींना आश्चर्य वाटले. तेव्हा टिळकांनी त्यांना जे उत्तर दिले त्याचा आशय असा होता की, ज्ञानी माणूस हा ज्ञानी असला तरी अखेर माणूसच असतो. टिळकांची ही भावना टिळकांसारख्या ज्ञानी नसलेल्या आपणासारख्या सामान्य माणसांनासुद्धा सहज समजण्यासारखी आहे. कारण, दहा दिवस जो उत्सव आपण आनंदाने साजरा केला, तो उत्सव, ती पूजा, ती आरती आणि ती आरास आता संपली, ही भावनाच विसर्जनाच्या वेळी माणसाच्या मनाला विलक्षण व्याकूळ करणारी आहे याची साक्ष कोणीही देऊ शकेल. नऊ वर्षांपूर्वी मराठ्यांच्या स्वातंत्र्यसमराच्या मूर्तीची मी प्राणप्रतिष्ठा केली, तिचे आज विसर्जन करताना माझीही भावना हीच आहे की, विसर्जन जरी यथासांग होत असले तरी उत्सवाचा आनंद यापुढे संपलेला आहे.

गिबनने आपल्या इतिहासात स्पेनचा खलिफा अब्दुल रहिमान याची एक कथा दिलेली आहे. या अब्दुल रहिमानने पन्नास वर्षे एकछत्री राज्य केले, त्याच्या घरी ऐश्वर्य माहेराला आलेले होते, त्याचे शत्रु त्याला थरथर कापत होते. त्याचे मित्र त्याच्यावर प्रेम करीत होते. त्याची प्रजा त्याला भजत होती. त्याचा जनानखाना मोठा होता व त्याची मुले आज्ञाधारक होती. देवाने माणसाला यापेक्षा जास्त काय बरे द्यावे ? पण असा हा भाग्यशाली अब्दुल रहिमान मेला, तेव्हा त्याच्या कपाटात त्याच्या हातचा एक लेख सापडला. त्यात त्याने म्हटले होते की, "सर्व सुखे पन्नास वर्षे माझ्यापुढे हात जोडून उभी होती. अशा स्थितीत निर्भेळ आनंदाचे दिवस मला किती मिळाले हे मी एकदा मोजून पाहिले. ते पन्नास वर्षांत फक्त चौदा भरले !" ही गोष्ट देऊन गिबनने एक तळटीप जोडलेली आहे. तीत तो म्हणतो -"माझ्याबद्दल जर बोलायचे झाले- आणि फक्त माझ्याबद्दलच मला अधिकाराने बोलता येईल - तर माझ्या आयुष्यातले आनंदाचे दिवस स्पेनच्या खलिफाच्या वाट्याला आलेल्या तुटपुंज्या दिवसांपेक्षा पूर्वीही

जास्त होते आणि आताही जास्तच आहेत; आणि त्यातले बरेचसे या ग्रंथ-रचनेच्या आनंद देणाऱ्या कष्टामुळे माझ्या वाटचाला आलेले आहेत.

"My happy hours far exceeded and far exceed the scanty numbers of the Caliph of Spain; and many of them are due to the pleasing labour of the present composition."

१७६५ च्या १५ ऑक्टोबर या दिवशी सूर्यास्ताच्या सोनेरी किरणांनी झळाळलेले रोमच्या वैभवाचे छिन्नविच्छिन्न अवशेष पाहत असताना त्या शहराचा इतिहास लिहिण्याची कल्पना गिबनच्या मनात प्रथम स्फुरली आणि चोवीस वर्षे अखंड उद्योग करून १७८९ च्या जून महिन्यात, सहा खंड पूर्ण करून, त्याने ती अखेर शेवटास नेली. चांदण्याच्या चाऱ्यावर जगणाऱ्या चकोराप्रमाणे त्या कल्पनेचे स्फुरण झाले त्या क्षणापासून अंतरंगात उजळलेल्या प्रतिभेच्या अपार्थिव चांदण्याच्या नाजूक आणि प्रसन्न प्रकाशात, आज काळाच्या लीलाकैवल्याने स्मृतिशेष झालेली ती दीड हजार वर्षांपूर्वीची रोमची रम्य नगरी, ते महान् नृपति, ते सामन्तचक्र, ती विद्वज्जन परिषद, त्या चंद्रमुखी, ते मदोन्मत्त राजपुत्र, ते भाट आणि त्या कथा यांनी गजबजलेला इतिहासाचा तो अफाट आणि स्तिमित करणारा चित्रपट पाहण्यात आणि सांगण्यात गिबन इतका रंगून गेला की, पेटलेल्या कापराप्रमाणे त्याच्या जीवनाची चोवीस वर्षे पाहता पाहता कशी उडून गेली ते त्याचे त्यालाही कळले नाही. आणि जेव्हा ते देवांचे चांदणे हळूहळू ओसरले आणि हलकेच मावळले, आणि तो चित्रपट अकस्मात् संपला, तेव्हा सुरम्य स्वप्न भंगावे तशी गिबनची ती निरतिशय आनंदाची समाधि खाडकन् उतरली. तो दचकून भानावर आला आणि त्याला कमालीची हळहळ वाटली. तो प्रसंग त्याने स्वतःच वर्णन केलेला आहे की– 'त्या वेळी मध्यरात्र झालेली होती. शेवटच्या खंडाच्या शेवटच्या प्रकरणाच्या शेवटच्या ओळी मी लिहिल्या आणि लेखणी खाली ठेवली आणि बागेत थोड्या फेऱ्या मारल्या. त्या वेळी सारी सृष्टि शांत होती; आणि चंद्राची सोनेरी कोर तलावाच्या पाण्यात चमकत होती. हाती घेतलेले काम मी शेवटास नेले याबद्दल मला आनंद वाटला आणि कदाचित् माझी कीर्ति आता कायम झाली म्हणून मला समाधानही झाले. पण लौकरच या कृतार्थतेची जागा विषादाने घेतली. मला असे वाटले की आज मी माझ्या एका जुन्या आणि गोड मित्राचा कायमचा निरोप घेतलेला आहे.

'A sober melancholy was spread over my mind by the idea that I had taken an ever lasting leave of an old and agreeable companion."

मराठ्यांच्या स्वातंत्र्यसमराची आज सांगता झालेली आहे आणि ती इतिहासातली आनंदयात्रा आता संपलेली आहे. या प्रसंगी माझ्याही भावना गिबनपेक्षा

वेगळ्या आहेत असे नाही. अर्थात्, गिबन हा फारच मोठा माणूस हे खरेच आहे पण लहान काय किंवा मोठ्या काय, लेखकाची सुखदुःखे सगळीकडे सारखीच असतात. म्हणून माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी गिबनचा दृष्टान्त मी दिला इतकेच.

परंतु, ज्या अनिर्वचनीय आनंदाचा आस्वाद मी इतकी वर्षे घेतला, त्या आनंदात या ग्रंथाच्या द्वारे माझ्या वाचकांनाही मी वाटेकरी करू शकलो, या जाणिवेमुळे अंधाराला प्रकाशाचा मोहोर यावा, त्याप्रमाणे या दुःखातही सुख आहे आणि या विषादातही समाधान आहे. हे तर कलावंताचे मोठे भाग्य आहे की, त्याची कला एकाच वेळी स्वार्थी असते आणि परार्थीही असते, आत्मनिष्ठ असते आणि परनिष्ठही असते, स्वतःसाठी असते आणि दुसऱ्यांसाठीही असते. त्याला देवाने दिलेले आनंदाचे भांडार दामाजीपंताने लुटविलेल्या धान्याच्या कोठाराप्रमाणे इतरांकडून लुटविण्यासाठीच असते, स्वतःकरिता राखण्यासाठी नव्हे. 'रघुवंशा'त वर्णन केलेल्या रघुराजाप्रमाणे कलावंताचाही 'आदानं हि विसर्गाय' असा आनंदाचा 'सर्वस्व-दक्षिण' यज्ञ असतो. कारण आनंद घ्यावा आणि आनंद द्यावा हेच कलेचे अंतिम कार्य आहे. एका थोर कलाकोविदाच्या यथार्थ नावाचा पुनरुच्चार करावयाचा झाला तर असे म्हणता येईल की, सर्व कलांचा चरम उद्देश 'आनन्दवर्धन' हाच आहे. इतिहासाची कलाही त्याला अपवाद नाही. म्हणून मला लाभलेल्या आनंदाचा शतांश जरी या ग्रंथांच्या द्वारे माझ्या वाचकांपर्यंत मी पोचवू शकलो, तरी मी स्वतःस धन्य समजेन.

हा 'उत्तरार्ध' मी श्री. शंकर रामचंद्र तथा मामाराव दाते यांस अर्पण करीत आहे. मामांची देशभक्ति आणि स्वार्थत्याग, त्यांचे चारित्र्य आणि विद्येची अभिरुचि, त्यांची मराठ्यांच्या इतिहासाची आस्था आणि त्यांनी या ग्रंथासाठी प्रारंभापासून अखेरपर्यंत घेतलेले कष्ट या सर्व गुणसंपदेचा गौरव या समर्पणात मला अभिप्रेत आहे. मामांच्या या गौरवात या ग्रंथासाठी परिश्रम केलेल्या त्यांच्या मुद्रणसंस्थेच्या कार्यकर्त्यांचाही गौरव अर्थात् समाविष्ट आहेच. मामांचा हा गुण-गौरव सर्वस्वी पक्षनिरपेक्ष आहे, हे मुद्दाम सांगितले पाहिजे असे नाही.

कारण असे की, हिंदुमहासभा, काँग्रेस, समाजवादी, कम्युनिस्ट इत्यादि विविध पक्ष महाराष्ट्रात असले, तरी महाराष्ट्राच्या इतिहासाचा अभिमान, निदान त्याच्याबद्दल आत्मीयता हा या सर्वच पक्षांचा समान गुणविशेष आहे. त्या इतिहासाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन आणि मूल्यमापन याबद्दल त्यांचा एकमेकांशी मतभेद होणे हे अगदी शक्य आहे. पण या मतभेदामुळे महाराष्ट्राच्या इतिहासाबद्दलची त्यांची जी आत्मीयता आहे, त्या आत्मीयतेला आणि एकात्मतेला पक्षांच्या विविधतेमुळे बाध येत नाही. उदाहरणार्थ, काकासाहेब गाडगीळ यांच्या सोमनाथावरील 'एक हजार वर्षांनंतर' या सुंदर लेखातील पुढील अवतरण पाहिले

म्हणजे हिंदुत्वाचा अभिमान आणि मराठ्यांच्या ऐतिहासिक परंपरेचा उज्ज्वल वारसा इतक्या वर्षांनंतरही आजच्या मराठी माणसांच्या मनापर्यंत कसा येऊन पोचतो याची उत्तम कल्पना येईल–"आता मूर्ति दिसेल म्हणून पुढच्या गाभाऱ्यात आलो व तेथील दृश्य पाहताच मन व शरीर बधिर झाल्यासारखे झाले. शिखर मोडून टाकल्यामुळे वर मोकळे होते. वर निळे आकाश हेच छत्र होते. मूर्तीच्या जागेत खड्डा होता, मूर्ति नव्हती! तोच समोरील भिंतीवर मोठ्या अक्षरात 'महाराष्ट्र' हा शब्द लिहिलेला पाहिला. त्याची जादू ज्याची मातृभाषा मराठी आहे तोच जाणू शकतो. अटकेपार हिंदवी स्वराज्य नेणाऱ्यांचा मी वंशज, हे भग्न मंदिर, हे मूर्तिहीन देवालय कसे पाहू? कसे साहू? अंगावर रोमांच उभे राहिले."

त्याचप्रमाणे काकासाहेब पंजाबचे राज्यपाल असताना त्यांच्याच प्रेरणेने १९६१ साली पानिपतच्या दोनशेव्या पुण्यतिथीनिमित्त चंडीगड विद्यापीठाने 'Marathas and Panipat' हा संस्मरणीय स्मारक ग्रंथ प्रसिद्ध केला, हे सांगण्यासारखे आहे. तसेच 'अष्टग्रहीतील नववा' या त्यांच्या पुस्तकातले 'पुन्हा एकदा पानिपत' व 'शीखांच्या दृष्टिकोनातून पानिपत' हे लेख त्यांच्या मराठी इतिहासाबद्दलच्या अभिरुचीची साक्ष देणारे आहेत. साहित्य अकादमीने प्रसिद्ध केलेल्या 'राजवाडे लेखसंग्रहा'ला आणि सुंठणकरांच्या 'राघोभरारी'ला तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिलेल्या प्रस्तावना मराठ्यांच्या इतिहासाकडे मूलगामी आणि चिकित्सक दृष्टीने पाहणाऱ्या त्यांच्या बुद्धिवादी प्रतिभेची उत्तम उदाहरणे म्हणता येतील. यशवंतराव चव्हाण हे संरक्षणमंत्री असताना पानिपतच्या मैदानावरून एकदा त्यांची मोटार जात होती, तेव्हा त्यांनी मोटार थांबविली. ते खाली उतरले आणि दोनशे वर्षांपूर्वी मराठी वीरांच्या रक्ताने भिजलेल्या पानिपतच्या रणभूमीवरच्या त्या पवित्र मातीचा टिळा त्यांनी आपल्या मस्तकी लाविला ही एकच गोष्ट, मराठी माणूस कोठेही असला तरी त्याच्या पूर्वजांचा इतिहास त्याच्या मनात किती खोल भिनलेला आहे याची साक्ष देण्यास पुरेशी आहे आणि काकासाहेब गाडगीळ, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि यशवंतराव चव्हाण हे तिघेही कॉंग्रेस पक्षाचे धुरंधर कार्यकर्ते आहेत, हे प्रसिद्धच आहे. 'भुताटकीचा मांडव' या रमणीय प्रवास वर्णनात मांडवगडाखाली लढणाऱ्या रणशूर बाजीराव पेशव्याचे ओजस्वी शब्दचित्र रेखाटणारे आणि 'तुंग हिमालय तुमचा अमुचा, केवळ माझा सह्यकडा' हे महाराष्ट्र-भक्तीने ओथंबलेले रसभरित 'स्तोत्र' लिहिणारे वसंत बापट हे समाजवादी आहेत. मराठी संतांच्या कार्याची मार्क्सवादी मीमांसा करणारे बा. र. सुंठणकर, आणि लालजी पेंडसे आणि 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' या राजवाड्यांच्या प्रक्षोभक प्रबंधाला लिहिलेल्या विवेचक प्रस्तावनेत राजवाड्यांचे व मराठी इतिहासाचे सम्यक् मूल्यमापन करणारे श्रीपाद अमृत डांगे हे कम्युनिस्ट आहेत. "महाराष्ट्र हा भारताचा खड्गहस्त आहे" असे महाराष्ट्राच्या इतिहासाचे

तात्पर्य सांगणारे आणि 'शिवछत्रपतींचा जयजयकार' करणारे सावरकर आणि 'मराठा' या नावानेच मुळी आपले वृत्तपत्र चालविणारे आचार्य अत्रे यांच्याबद्दल तर लिहिण्याचे कारणच नाही. त्याचप्रमाणे 'धृष्णेश्वर", 'कृष्णेची संस्मरणे', 'दक्षिण गंगा गोदावरी, 'पंढरी', 'महाराष्ट्राची दिल्ली' अशी सुंदर संस्मरणे लिहिणारे भरतभूमीचे चिरयात्री काकासाहेब कालेलकर हे गांधीवादी आहेत. इतकेच नव्हे तर यांपैकी कोणत्याही पक्षाची बांधिलकी न पत्करलेले सर्वतन्त्रस्वतंत्र डॉ. आंबेडकर यांनाहा महाराष्ट्राच्या इतिहासाचा अतिशय अभिमान होता. या संदर्भात डॉ. ना. भा. खरे यांची आठवण उद्बोधक वाटण्यासारखी आहे.

"या भेटीत आमचे दोघांचे महाराष्ट्राचे प्रचलित राजकारण, महाराष्ट्रातील ब्राह्मण आणि अस्पृश्य सोडून इतर बहुजन समाज यांचे गुणावगुण आणि शारीरिक गुलामगिरी व मानसिक गुलामगिरी यांपैकी अधिक वाईट काय, इत्यादि विषयांबद्दल खूप दिलखुलास बोलणे होत असे. डॉ. आंबेडकरांशी झालेल्या संभाषणात मला हे दिसून आले की, त्यांना महाराष्ट्राचा आणि त्याच्या उज्ज्वल पराक्रमी इतिहासाचा फार अभिमान आहे."

मराठ्यांच्या इतिहासाचा अभिमान ही वस्तुस्थिति पक्षनिरपेक्ष आहे असा याचा अर्थ आहे. तो इतिहास ही साऱ्याच मराठी माणसांच्या वाट्याला आलेली वडिलोपार्जित धनदौलत आहे. शेजवलकरांनी एके ठिकाणी म्हटले आहे ते फार खरे आहे की, "मराठ्यांचा इतिहास हा सगळ्या मराठ्यांचा पैतृक वारसा आहे. यदुनाथ सरकार म्हणतात त्याप्रमाणे मराठे या एकाच गोष्टीमुळे सर्व हिंदुस्थानात इतर प्रांतांपेक्षा श्रेष्ठ आहेत. ती दौलत उधळून टाकण्याचा कोणत्याही मराठ्यांला अधिकार नाही." म्हणूनच मराठी माणसे निरनिराळ्या पक्षांत विखुरलेली असली तरी अखेर ती मराठीच माणसे असतात; कारण याच माणसांच्या पूर्वजांनी मराठ्यांचा इतिहास घडविलेला आहे. म्हणून पूर्वजांच्या इतिहासाने जोपासलेली मराठ्यांची अस्मिता कितीही नाही म्हटले तरी त्यांच्या मनावर प्रभुत्व गाजवीतच असते. म्हणूनच ज्याप्रमाणे इतिहासात पक्ष असले तरी इतिहासकाराला पक्ष नसतो, सारे पक्ष त्याला सारखेच असतात, त्याच न्यायाने साऱ्या पक्षांना इतिहासकार हा सारखा असावा अशी अपेक्षा जर केली तर ते योग्यच होईल. विद्येची उपासना करणारे इतिहास हे झाले तरी एक ब्रह्मकर्मच आहे, आणि वैदिक ब्रह्मकर्माबद्दल जे विधान केलेले आहे, ते इतिहासाच्याही ब्रह्मकर्माबद्दल जसेच्या तसे वापरता येण्यासारखे आहे की, 'सर्वेषामविरोधेन ब्रह्मकर्म समारभे!' (सर्वांच्या अविरोधाने मी आता ब्रह्मकर्माला प्रारंभ करतो.)

या संदर्भात टिळकांची एक आठवण सांगण्यासारखी आहे. प्रसिद्ध इतिहासकार पारसनीस यांचा व टिळकांचा घनिष्ठ संबंध होता. टिळकांच्या आग्रहावरून पारसनिसांनी झाशीच्या राणीचे चरित्र लिहिले व टिळकांनी त्याचे परीक्षण

करणारा अग्रलेखही 'केसरी'त लिहिला. पारसनिसांची इतिहासात गति पाहून न्यायमूर्ति रानडयांनी त्यांना आपणाला 'पेशवे दप्तरा'च्या कामात मदत करण्याची विनंती केली. तेव्हा पारसनिसांनी टिळकांचा सल्ला विचारला. टिळक हे राष्ट्रीय पक्षाचे अध्वर्यु आणि रानडे हे नेमस्तपक्षाचे अग्रणी. त्या दोन पक्षांत त्या काळात विस्तव जात नसे. पण तो पक्षभेद मनातही न आणता टिळकांनी मोकळया मनाने पारसनिसांना सांगितले की – "रानडयांना मराठयांच्या इतिहासाची फार आवड आहे, पण कामामुळे त्यांना फुरसत होत नाही, तरी तुम्ही त्यांना अवश्य मदत करावी." त्याप्रमाणे पारसनीस हे आपले परमस्नेही कादंबरीकार हरिभाऊ आपटे यांच्या 'आनंदाश्रमा'त राहू लागले व रानडयांकडे जाऊ लागले. हरिभाऊ हे नेमस्त पक्षाचे पुरस्कर्ते होते. पुढे एकदा असे झाले की पारसनिसांची व टिळकांची रस्त्यात गाठ पडली. नमस्कार चमत्कार झाले आणि टिळकांबरोबर असलेल्या राष्ट्रीय पक्षाच्या एका गृहस्थाने पारसनिसांना टोमणा मारला की, "काय आनंदाश्रमात राहू लागल्यापासून प्रतिपक्षाला मिळालात वाटते?" पण या प्रश्नाचे उत्तर देण्याचे पारसनिसांना कारणच पडले नाही. प्रत्युत्पन्नमति टिळकांनी परस्पर त्या गृहस्थाला उत्तर दिले की– "अहो, इतिहासास पक्ष नाही. सत्य हाच त्याचा पक्ष!"

टिळकांच्या या उद्गारावर भाष्य करण्याची जरूर आहेच काय?

हिंदुस्थानचा इतिहास लिहावा असा टिळकांचा मनोदय होता. बाबासाहेब खापर्डे यांच्याशी बोलताना ते एकदा म्हणाले–" मी (हिंदुस्थानचा इतिहास) लिहिणार आहे. त्याचे सुमारे चौदा खंड होतील." त्याचप्रमाणे शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिण्याचा त्यांचा संकल्प होता. मंडालेच्या तुरुंगात लिहावयाच्या संकल्पित ग्रंथांच्या यादीत 'Life of Shivaji' या ग्रंथाचे नाव आहे. हा 'हिंदुस्थानचा इतिहास' व 'शिव–चरित्र' टिळकांच्या हातून लिहिले गेले नाही हे उघडच आहे. त्यांच्या अनेक संकल्पाप्रमाणे हेही संकल्प अखेर अपुरेच राहिले.

पण त्यांनी ते ग्रंथ लिहिले असते तर कोणत्या पद्धतीने लिहिले असते, याबद्दल त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या ग्रंथावरून अनुमान करण्यास जागा आहे. त्यांचा 'गीता–रहस्य' हा ग्रंथ शुद्ध शास्त्रीय पद्धतीने सत्यान्वेषण करणारा ग्रंथ आहे. 'गीता–रहस्या'च्या प्रस्तावनेत त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे की– "सर्व टीका आणि भाष्ये बाजूला ठेवून नुसत्या गीतेचीच आम्ही स्वतंत्र विचारपूर्वक अनेक पारायणे केली तेव्हा टीकाकारांच्या छापेतून सुटका होऊन मूळ गीता निवृत्तिपर नसून कर्मयोगपर आहे–असा बोध झाला. आमचा काही विशिष्ट संप्रदाय असून तत्सिद्धयर्थ आम्ही गीतेचा एक प्रकारचा विशिष्ट अर्थ करतो अशी कित्येकांची समजूत होण्याचा संभव आहे. यासाठी येथे येवढे सांगितले पाहिजे की, गीता रहस्य हा ग्रंथ कोणत्याही विशिष्ट व्यक्तीस किंवा संप्रदायास

उद्देशून लिहिलेला नाही. आमच्या बुद्धीप्रमाणे गीतेच्या संस्कृत श्लोकांचा जो सरळ अर्थ होतो तो आम्ही दिला आहे. असा सरळ अर्थ केल्याने त्यात जर काही सांप्रदायिकपणा येईल तर तो गीतेचा आहे, आमचा नव्हे."

'Orion' या ग्रंथात टिळकांनी वेदांचा काल–निर्णय केलेला आहे. आता वेदांचा काल–निर्णय करायचा म्हणजे कालाने बद्ध असलेल्या मनुष्यांनी निर्माण केलेले 'पौरुषेय वाङमय' म्हणूनच वेदांकडे, पाहणे भाग होते. टिळकांची ही दृष्टि, 'अस्य वा महतो भूतस्य निःश्वसितमेतद् यद् ऋग्वेदः।' अशा प्रकारे वेदांना अपौरुषेय वाङ्मय मानणाऱ्या बहुसंख्य लोकांना रुचणे शक्यच नव्हते. इतकेच नव्हे, तर प्रो. जिनसीवाल्यांसारखे वेदांना अपौरुषेय वाङ्मय मानणारे टिळकांचे परममित्र सुद्धा त्यांच्या या वृत्तीमुळे त्यांच्यावर फार रुष्ट झाले. पण त्याला टिळकांचा इलाज काहीच नव्हता. लौकिक दृष्टयाच पाहावयाचे झाले, तर 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु' हे हिंदुधर्मांचे एक स्वरूपलक्षण मानण्याइतकी पूज्यबुद्धि वेदांबद्दल त्यांना होती. परंतु लौकिक दृष्टि निराळी व शास्त्रीय दृष्टि निराळी. कारण त्या शास्त्रीय चिकित्सेत वेदांचा काल–निर्णय करताना त्यांचे अपौरुषयत्व ढळेल या भीतीला थारा देता कामा नये असे त्यांचे मत होते. कारण सर्व शास्त्रीय संशोधनाचे उद्दिष्ट केवळ सत्यशोधन हेच आहे असा त्यांचा आग्रह होता.

Fears like these are out of place in a historical and scientific inquiry, the sole object of which is to search for and to find out the truth.

अशा प्रकारे ओरायन आणि 'गीतारहस्य' या ग्रंथावरून अनुमान करता येते की, मराठ्यांच्या इतिहासावर टिळकांनी जर काही लिहिले असते तर तेही अशाच प्रकारे पूर्वग्रहांना रजा देऊन, वस्तुनिष्ठ दृष्टीने, सत्यशोधन करण्याच्या उद्देशानेच लिहिले असते.

पण सुदैवाची गोष्ट आहे की या बाबतीत टिळकांनी अनुमान प्रमाणावर भिस्त ठेवण्याची आपणास जरूरीच ठेवली नाही. मराठ्यांच्या इतिहासावर त्यांचे लेख थोडेच आहेत पण जे आहेत ते वैशिष्टयपूर्ण आहेत. शिवछत्रपतीवरील त्यांच्या दोन लेखांत—विशेषतः 'थोर पुरुषांची चरित्रे' या लेखात शिवाजी-महाराजांच्या विभूतिमत्वाची त्यांनी "यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा। तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ॥" या गीता वचनाधारे अतिशय शास्त्रीय मीमांसा केलेली आहे व शिवाजीवर असलेल्या 'ईश्वरी कृपे'ची कल्पना बुद्धि-वादाच्या कसोटीला लावून पाहिलेली आहे. त्याहीपेक्षा विशेष म्हणजे त्यांच्या 'श्रीशिवाजी महाराजांची जन्मतिथि' हा लेख होय. या लेखात ज्योतिर्गणि-ताच्या साहाय्याने शिवजन्मतिथीचा निर्णय करणाऱ्या टिळकांच्या संशोधकबुद्धीचा

प्रकर्ष प्रत्ययाला येतो, हे तर झालेच. पण यातला खरा मुद्दा पुढेच आहे. या लेखानंतर पंधरा वर्षांनी टिळकांना 'जेधे शकावली' उपलब्ध झाली. त्यात शिवजन्मतिथि टिळकांनी ठरविलेल्या तिथीच्या अगदी विरुद्ध दाखविली होती. टिळकांनी निर्णय केलेली तिथि होती वैशाख शु ॥ १ गुरुवार शके १५४९ (६ एप्रिल १६२७) आणि 'जेधे शकावली'तली तिथि होती– फाल्गुन व॥ ३ शके १५५१ शुक्रवार (१९ फेब्रुवारी १६३०)

पण सत्यसंशोधनाचे व्रत घेतलेल्या टिळकांनी आपल्या तिथीबद्दल कसलाही आग्रह न धरता इतकेच म्हटले की– "ही बाब खरोखर चमत्कारिक आहे. सुमारे सोळा वर्षांपूर्वी छत्रपतींची जन्मतिथि शके १५४९ वैशाख शु॥ १ असल्याबद्दल मी ठरविले होते. प्रसिद्ध व अप्रसिद्ध बखरींत या जन्मतिथीबद्दल अत्यंत विसंगतता आहे. सबब या बाबीचा जितका जास्त खल होईल तितका पाहिजेच आहे."

बुद्धीचे फल कोणत्याही गोष्टीचा आग्रह किंवा अभिनिवेश न धरणे हे सांगितलेले आहे– 'बुद्धेः फलमनाग्रहः।' टिळकांचे वरील उद्गार, हे त्या वचनाचा वस्तुपाठ म्हणण्यास हरकत नाही.

टिळकांचे उदाहरण आपण व्यक्ति म्हणून घेतलेले नाही. तर वस्तुनिष्ठ दृष्टीचे उपलक्षण म्हणून घेतलेले आहे. टिळकांच्या या उदाहरणातून कोणता बोध निष्पन्न होतो बरे? हाच की, ज्याप्रमाणे देवाच्या दर्शनाला जाताना आपण पादत्राणे मंदिराच्या बाहेर काढून ठेवतो त्याप्रमाणे इतिहास देवतेच्या दर्शनाला जाताना आपल्या पूर्वग्रहांची पादत्राणे बाहेर काढून ठेवली तरच ती देवता जिचे एक स्वरूप आहे, त्या सरस्वतीचा वर प्रसाद होण्याची आशा आहे. नाही तर नाही. इतिहासातले हेच 'आर्य सत्य' गिबनने ऐतिहासिक दृष्टीचे विवेचन करताना निराळ्या शब्दांत सांगितले आहे की–

The historical temper which obeys utmost Evangelical maxim of forgetting friends, country, religion, of giving merit its due place and embracing truth wherever it is to be found.

(एव्हँजेलिकल धर्मपंथाची जी धर्माज्ञा तीच जवळ जवळ ऐतिहासिक दृष्टिचीही आहे.– की मित्र, देश, धर्म हे विसरावे, गुणांचा योग्य गौरव करणे आणि सत्य जेथे जेथे असेल तेथे तेथे त्याचा स्वीकार करण.)

'यथा नद्यः स्यन्दमाना समुद्रेऽस्तं गच्छन्ति नामरूपे विहाय।
एवं विद्वान्नामरूपाद्विमुक्तः परात्परं पुरुषमुपैति दिव्यम् ॥'

असे जे उपनिषदात म्हटले आहे त्याचा अर्थ असा की, आपले नामरूप सोडून नद्या ज्याप्रमाणे समुद्रात विलीन होतात त्याप्रमाणे नामरूपापासून विमुक्त झालेला ज्ञानी पुरुष परात्पर पुरुषात विलीन होतो. उपनिषदातले हे वर्णन

शब्दब्रह्माचे स्वरूप असलेल्या इतिहासाची उपासना करणाऱ्या इतिहासकारकालाही तितकेच लागू करता येण्यासारखे आहे. जेव्हा आपले वैयक्तिक व्यक्तिमत्त्व इतिहासकार इतिहासात विलीन करतो तेव्हाच इतिहासकार म्हणून तो अमर होऊ शकतो. उदाहरणार्थ, मराठ्यांच्या इतिहासाचा विचार करताना प्रारंभापासून अखेरपर्यंत जर कोणत्या एका विचाराचा धागा अखंड आढळत असेल तर तो 'हिंदवी स्वराज्या'चा आणि 'हिंदुधर्मरक्षणा'चा होय. आजच्या अर्थाने 'हिंदुत्ववाद' किंवा 'राष्ट्रवाद' मराठ्यांना माहीत होता असे अर्थातच म्हणणे कठीण आहे, पण म्हणून त्यांच्या मनात 'हिंदवी स्वराज्या'च्या किंवा 'हिंदुधर्मरक्षणा'च्या कल्पनाच नव्हत्या असेही म्हणता येणार नाही. आता एखादा इतिहासकार मराठ्यांच्या या विचारांशी व प्रेरणांशी सहमत असेल किंवा नसेल, पण मराठ्यांचे हे विचार व ह्या प्रेरणा जास्तीत जास्त प्रामाणिकपणाने व्यक्त करणे हे इतिहासकार म्हणून त्याचे कर्तव्य आहे. इतिहासातल्या व्यक्तींवर आपल्या विचारांचा आरोप इतिहासकाराने करणे जितके अन्यायाचे आहे, तितकेच इतिहासातल्या व्यक्तींच्या विचारांचा आरोप इतिहासकारावर करणेही अन्यायाचे आहे. म्हणूनच तादात्म्याप्रमाणेच तटस्थताही इतिहासाला आवश्यक आहे. इतिहासातली वस्तुनिष्ठ दृष्टि ती हीच होय, की जेव्हा व्यक्ति म्हणून त्याचे अस्तित्व संपते आणि केवळ इतिहासकार म्हणूनच, तो शिल्लक राहतो. इतक्या निर्लेप आणि निरंजन वृत्तीने इतिहास लिहिणे, तसे पाहिले तर दुर्घटच आहे. पण प्रयत्नांची दिशा तरी तशी असावी असे वाटते. गिबनला ही वस्तुनिष्ठ दृष्टि बऱ्याच प्रमाणात साध्य झाली होती असे वाटते. गिबन हा मोठा विद्वान् होता किंवा मोठा कलावंत होता म्हणून तो मोठा इतिहासकार झाला असे नाही. ते तर तो होताच. पण त्याहीपेक्षा विशेष म्हणजे आपणापेक्षा आपला इतिहास त्याने सदैव मोठा मानला. इतिहासाच्या ऐरावतापुढे आपली शामभट्टाची तट्टाणी दामटण्याचा केविलवाणा उपद्व्याप त्याने केला नाही. त्यामळे व्यक्ति म्हणून गिबन संपला असला तरी इतिहासकार म्हणून अद्याप अमरच आहे. गिबनच्या अमरत्वाचे रहस्य हे असे आहे. या संदर्भात जे. कॉटर मॉरिसनने व्यक्त केलेले विचार नेहमीच मार्गदर्शक होण्यासारखे आहेत—

If the decline and fall has no superior in historical literature it is not solely the consequence of Gibbon's profound learning, wide survey and masterly grasp of his subject. With wise descretion he subordinated himself to his task.

'युद्धस्य कथा रम्या ।' असे प्रसिद्ध वचन आहे. इतिहास ही बऱ्याच प्रमाणात युद्धाचीच कथा असते, आणि त्यामुळेच तो रम्य असतो. पण त्याच्या बरेच पुढे जाऊन युद्धशास्त्राच्या दृष्टीने युद्धाची आणि युद्धपद्धतीची चिकित्सा करण्याचा एक प्रकार आहे. मराठीत या पद्धतीच्या इतिहासाचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे

कॅ. मोडक यांचे 'प्रतापगडचे युद्ध' हे पुस्तक होय. या 'उत्तरार्धा'त 'मराठ्यांची युद्धनीति' म्हणून जे प्रकरण आहे, ते अशाच प्रकारचे आहे. अर्थात् मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाचे युद्धशास्त्राच्या दृष्टीने विवेचन करण्याची कल्पना माझी नसून येथे स्थायिक झालेले निवृत्त मेजर जनरल श्री. अ. वि. नातू यांची आहे, हे कटाक्षाने सांगणे आवश्यक आहे. त्यांनी 'पूर्वार्धा'तली ही उणीव माझ्या नजरेस आणून दिली इतकेच नव्हे, तर ते न्यून पुरते करण्यासाठी आपल्या जवळची El Amien ' ' The Matter of Honour, ' Panzer Division ' इत्यादि दुर्मिळ पुस्तकेही पुरविली. त्या सर्वच पुस्तकांचा जितक्या तपशिलाने परामर्श घ्यायला हवा होता, तितका स्थलमर्यादेमुळे मला घेता आला नाही हे खरे आहे; पण म्हणून श्री. नातूंच्या कल्पनेचे आणि मदतीचे मूल्य कमी होत नाही. इतकेच नव्हे, तर 'मराठ्यांची युद्धनीति' या प्रकरणामुळे ह्या 'उत्तरार्धा'चे ऐतिहासिक मूल्य काही वाढले असेल, तर त्याचे श्रेय सर्वस्वी श्री. नातूंचे आहे, हे मान्य करण्यास मला मोठा आनंद वाटतो.

ह्या प्रकरणासाठी मी प्रामुख्याने 'महाराष्ट्र-धर्म'– (भा. वि. भट), 'राजपूत संस्कृति'– (ह. वा. देशपांडे), 'प्राचीन अर्वाचीन युद्धपद्धति' (मा. कृ. शिंदे), 'चक्रवर्ति नेपोलियन' (वि. ल. भावे) या पुस्तकांचा उपयोग केलेला आहे. त्याचप्रमाणे राजारामाच्या अखेरच्या प्रकरणात राजारामाने प्रतापगडच्या भवानीला केलेल्या नवसाचा निर्देश आलेला आहे. तो मला 'द. वा. पोतदार स्मारक ग्रंथा'तील शां. वि. आवळसकर यांच्या 'प्रतापगडची भवानी' या लेखात मिळाला. त्याचप्रमाणे कविवर्य कुसुमाग्रज यांच्या 'अहि–नकुल' या कवितेची 'पूर्वार्धा'त दोन व या 'उत्तरार्धा'त तीन अशी एकंदर पाच कडवी मी वापरली आहेत, तसेच 'पूर्वार्धा'साठी वापरलेले सर्व ग्रंथ या 'उत्तरार्धा'साठीही वापरलेले आहेत; कारण भाग दोन असले तरी ग्रंथ एकच आहे.

या सर्व ग्रंथकारांचा मी शतशः ऋणी आहे, हे सांगणे नकोच.

पण, ग्रंथ जरी असले, तरी ते उपलब्ध नसले तर ते असूनही नसल्यासारखेच असतात. म्हणून ज्या संस्थांनी आणि व्यक्तींनी मला हे ग्रंथ उपलब्ध करून दिले, त्यांचे आभार मानणे हे क्रमप्राप्त कर्तव्य आहे. त्या संदर्भात चाळीसगाव येथील 'कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,' 'आनंदीबाई बंकट हायस्कूल' आणि 'नारायण बंकट नगर वाचनालय' या संस्थांच्या पदाधिकाऱ्यांचे आणि सेवक वर्गाचे मी मनःपूर्वक आभार मानतो. तसेच 'पोतदार स्मारक ग्रंथा'चा संदर्भ मला शिवशाहीर श्री. बाबासाहेब पुरंदरे यांनी सांगितला. त्याबद्दल त्यांचा मी अत्यंत आभारी आहे. तो ग्रंथ मला धुळ्याचे एस्. एस्. व्हीं. पी. कॉलेजातील संस्कृतचे प्राध्यापक डॉ. चं. र. देशपांडे यांनी उपलब्ध करून दिला त्याबद्दल मी त्यांचा फार ऋणी आहे. वास्तविक प्रा. देशपांडे यांचा व माझा स्नेहसंबंध इतका

जुना आहे की केवळ शब्दांनी मानले म्हणून त्यांचे मित्रऋण फिटणारे नाही याची मला उत्तम जाणीव आहे. पण 'प्राप्तानृण्या याति बुद्धिः प्रसादम्' या न्यायाने ऋणनिर्देश केला म्हणजे मनाला समाधान वाटते, म्हणून शब्दांनी ते व्यक्त करायचे इतकेच. काही ऋणे कधीही फिटणारी नसतात आणि तोच त्यांचा गौरव असतो. त्या ऋणांपैकीच हे 'मित्रऋण' म्हणावयाचे, त्याचप्रमाणे पूर्वार्धातला येसूबाईचा तुलनेने असलेला अनुल्लेख माझ्या नजरेस आणून दिल्याबद्दल नासिकचे श्री. बिपिन पुराणिक व शिरूरचे प्रा. सु. ह. जोशी यांचाही मी फार आभारी आहे.

या ग्रंथातील दोन ऐतिहासिक उल्लेखांबद्दल खुलासा करणे जरूर आहे. पहिला उल्लेख ग्रंथाच्या शीर्षकाबद्दल. या ग्रंथात अनेक ठिकाणी, राजारामाने शाहूचा विश्वस्त म्हणून कारभार केला, स्वतः राजपद धारण केले नाही, अशी विधाने आहेत आणि ग्रंथाचे शीर्षक तर 'छत्रपति राजाराम' असे आहे, हे कसे ? तर या शंकेचा परिहार असा आहे की, राजारामानें 'तुम्ही राजचिन्हे धारण करून पूर्ववत् व्यवहार करावेत' या येसूबाईच्या सूचनेला अनुसरून 'छत्रपतिपद' धारण केले हे खरे, पण ते केवळ राज्य चालविण्याचा उपचार म्हणून; राज्यलोभाच्या वासनेने नव्हे. कारण छत्रपति म्हणून शंकराजी नारायणाला काढलेल्या आज्ञापत्रातही तो स्वतःला शाहूचा विश्वस्त म्हणूनच मानताना दिसतो. 'राज्य-उपभोग म्हणजे राजसंन्यास' हे गडकऱ्यांचे वचन राजारामाला उत्तम शोभून दिसते. पण राजसंन्यास जरी असला तरी उपचारार्थ कां होईना त्याने राजपद स्वीकारले होते म्हणून त्याला 'छत्रपति' असेच संबोधणे योग्य आहे. राजवाड्यांच्या पंधराव्या खंडात राजारामाने 'छत्रपति' या नावाने काढलेली अनेक आज्ञापत्रे छापलेली आहेत, ती या दृष्टीने पाहण्यासारखी आहेत. उदाहरणार्थ–

(१) "१६१६ चैत्र शु. ॥ ३ स्वस्ति श्री राज्याभिषेक शके २० भाव संवत्सरे चैत्र शुध तृतीया रविवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपति यांणी समस्त राज्यकार्य धुधरंर विश्वासनिधि राजमान्य राजश्री रामचंद्रपंत अमात्य हुकमतपन्हा यांसि आज्ञा केली ऐसी जे–"

(२) "स्वस्ति श्री राजशके २३ धातुनाम संवत्सरे श्रावण शुध चतुर्दशी रविवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजाराम छत्रपति यांणी समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि रा. रा. शंकराजीपंडित सचिव मदालसमहाम यांसी आज्ञा केली ऐसी जे–" इत्यादि.

दुसरा ऐतिहासिक उल्लेख म्हणजे संताजी घोरपड्याच्या स्मारकाबद्दलचा होय. त्या संदर्भात या ग्रंथात विधान केले आहे की, संताजीचा शिरच्छेद झाला त्या ठिकाणी कोणतेही स्मारक नाही. गेल्या तीनशे वर्षांचा इतिहास या दृष्टीने हे विधान चूक आहे असे नाही. परंतु, सातारा जिल्हा परिषदेने संताजीचे स्मारक

करण्याचा निर्णय अलीकडे घेतलेला आहे. त्या संदर्भात माझे विधान केवळ ऐतिहासिक दृष्टीनेच वाचावे अशी विनंती आहे. ते स्मारक जेव्हा होईल, तेव्हा अर्थातच माझी विधाने इतिहासजमा होतील. त्यात मला आनंदच आहे. नव्या इतिहासाने जुन्या इतिहासातली उपेक्षा इतिहासजमा करून टाकावी, यापेक्षा मराठी माणसाला आनंद देणारी दुसरी गोष्ट कोणती आहे? सातारा जिल्हा परिषदेच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल अभिनंदन करावे तेवढे थोडेच होय.

ग्रंथ ही ग्रंथकाराची अपत्ये असतात असे म्हणतात ते खरे आहे, कारण, प्रपंचातल्या 'त्या' अपत्यांप्रमाणे लेखकाच्या प्रपंचातील 'ही' अपत्येसुद्धा हरवतात, बुडतात, आगीत सापडतात, जिवावरच्या संकटांत पडतात, प्रसंगी अजिबात 'दगावतात' सुद्धा. भास कवीला आपली सारी नाटके अग्नीत टाकावी लागली, आणि अनेक मुलांपैकी एक मुलगा तेवढा जगूनवाजून हाती लागावा, त्याप्रमाणे त्याच्या विपुल नाटयसंततीपैकी, 'स्वप्नवासवदत्तम्' हे एकच नाटक त्या अग्नि-दिव्यांतून त्याचे नाव सांगायला जगात राहिले. विषादाच्या भरात गुणाढयाने आपल्या 'बृहत्कथे'च्या सात लक्ष ग्रंथापैकी सहा लक्ष ग्रंथ अग्निनारायणाला समर्पण केला व फक्त एक लक्ष ग्रंथ शिल्लक राहिला. बाणभट्टाची 'कादंबरी' 'अर्धवटच'च राहिली, ती त्याचा मुलगा भूषणभट्ट याने पुरी केली व 'अव्यंग' केली, आणि कुलभूषण होऊन आपले नाव सार्थ केले. 'काळ'कर्ते शिवरामपंत परांजपे यांना आपले 'काळातले निवडक निबंध' जाळून टाकावे लागले. सावरकरांचा 'शिखांचा इतिहास' ब्रिटिश हेरांच्या हाती लागला तो गेलाच, पुन्हा काही त्याला आपल्या जन्मदात्याचे दर्शन झाले नाही. कार्लाईलच्या 'फ्रेंच राज्यक्रांती'च्या पूर्वार्धाचे हस्तलिखित त्याचा परम मित्र मिल याच्या मोलकरणीने कचऱ्या-बरोबर जाळून टाकला. फडके यांच्या 'अंजली' या कादंबरीचे हस्तलिखित प्रवा-सात चोरीला गेले, शोध केला तेव्हा त्याची पाने रेल्वेमार्गाच्या कडेला वाऱ्यावर फडफडताना आढळली.

ही अशी उदाहरणे पाहिली म्हणजे असे वाटते की, लेखक ग्रंथ लिहितो आणि आणि वाचक तो वाचतो. पण, लेखकाच्या हातातून वाचकाच्या हातापर्यंत त्या ग्रंथांचा जो 'प्रवास' होतो, त्यात किती 'पण' आणि 'परंतु' असतात यांची कल्पना 'जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे!' इतरांस ती येणे दुर्घट आहे. मुलगा लहान असतो, तो बापाच्या डोक्याइतका उंच होतो आणि त्यालाच युक्तीच्या चार गोष्टी सांगू लागतो. त्या वेळी या अवस्थेला येईपर्यंत किती जिवावरच्या संकटातून ते पोरटे बचावले याची कल्पना पोराला नसली तरी बापाला चांगली असते, तसेच हे म्हणावयाचे.

या ग्रंथाच्या बाबतीतही असाच काहीसा प्रकार झाला. तो सांगण्यासारखा आहे.

गिरजोजी यादवाने राजारामाच्या जवाहिराची 'उंच उंच गाठोडी' बांधून आपल्या बरोबर घेतली होती असे या ग्रंथात वर्णन आहे. या ग्रंथाच्या हस्तलिखिताचीही अशीच उंच उंच चार गाठोडी बांधून पुण्याला येताना आम्ही आमच्याबरोबर घेतली होती. आमची गाडी पुण्याला रात्री एक वाजता आली. 'नाना भाऊंचे पुणे, तेथे काय उणे' या पुणे वर्णनाप्रमाणे पुण्याच्या स्टेशनावर इतर गोष्टींप्रमाणे गर्दीला अर्थात् उणे नव्हतेच. आधीच उल्हास होता आणि त्याला पुन्हा तो खरोखर फाल्गुन मासच होता. मग काय विचारायचे आहे ! डब्याच्या दारात चढणारे प्रवासी आणि उतरणारे उतारू यांची एकच धुमश्चक्री माजली. अशा स्थितीत 'तुम्ही आधी उतरून घ्या, गाठोडी आम्ही देतो' असे सहप्रवाशांनी सांगितले आणि दुसरा पर्यायही काही नव्हताच. त्यामुळे 'आत्मानं सततं रक्षेत्' या मनुवचनाचा आदर करून आम्ही तेवढे गाडीतून कसे बसे उतरलो. गाठोडी गाडीतच राहिली. आमच्या सहप्रवाशांनी ती आमच्यापर्यंत पोचविण्याची पराकाष्ठा केली, पण त्यांचे हात काही आमच्यापर्यंत पोचेनात. गाठोडी आता खरे म्हणजे गेल्यातच जमा होती.

अशा परिस्थितीत एक व्यक्ति तीरासारखी त्या गर्दीत घुसली आणि वाघिणीच्या जबडयातून एखाद्या वीरमातेने आपली मुले ओढून काढावीत, त्याप्रमाणे धडकावर धडका देणाऱ्या गर्दीच्या त्या महापुरातून तिने शर्थीने ती गाठोडी एकामागून एक दरदरा ओढीत आणिली आणि फलाटावर आदळली. ती गाठोडी म्हणजे हा ग्रंथ होय. ती व्यक्ति जर त्या वेळी तेथे नसती तर प्रसिद्ध होण्यापूर्वीच या ग्रंथाची इतिश्री झाली असती.

वाईट वाटते ते इतकेच की इतक्या लोकांचा मी नामोल्लेखपूर्वक ऋणनिर्देश केला व ते योग्यही होते. पण 'माझे असतेपण लोपो। नामरूप हारपो।' अशी जगावेगळी महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या या 'अनामिक' व्यक्तीच्या बाबतीत मला तसे करता येत नाही. पण एवढे म्हटल्यावाचून मात्र राहवत नाही की, या ग्रंथाचे 'पूर्वार्ध' आणि उत्तरार्ध' हे दोन्ही खंड त्या व्यक्तीच्या निरुपम धैर्याचे आणि स्वार्थत्यागाचे मूर्तिमंत स्मारक आहे. कर्माच्या रूपाने कर्ता राहतो तो असा.

त्या 'अनामिके'चे अनंत आभार !

जोशी बिल्डिंग, हनुमानवाडी
चाळिसगाव

(स्वाक्षरी)

# अनुक्रमणिका

## छत्रपति राजाराम

## ताराबाई

□ □

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था
[illegible]
[illegible]

(उत्तरार्ध)

# छत्रपति राजाराम

(१६८९-१७०७)

‘रण काय भयानक, लोळे आग जळांत
आदळती वळती आवळती त्वेषांत !
जणुं जिंकायासी गगनाचे स्वामित्व,
आषाढ-घनांशी झुंजे वादळवात !

–कुसुमाग्रज
(अहि–नकुल)

# छत्रपति राजाराम

## (९ फेब्रुवारी १६८९ ते २ मार्च १७००)

## (१)

### किल्ले रायगड

११ मार्च १६८९ रोजी औरंगजेबाने संभाजीचा वध केला आणि त्यानंतर अवघ्या चौदा दिवसांत त्याच्या आज्ञेने २५ मार्च रोजी इतिकदखानाने रायगडला वेढा घातला. संभाजीच्या वधाने स्तंभित झालेल्या मराठ्यांना त्याने दुःख करण्याइतकी सुद्धा उसंत मिळू दिली नाही. लोखंड तापले आहे तोंवरच त्यावर घाव घालावेत या न्यायाने राजा मारल्याबरोबर राजधानी सर करण्याची त्याने त्वरा केली. त्याचे हे वर्तन आजवरच्या शत्रूची पाळेमूळे उखडून काढण्याच्या त्याच्या नीतीला धरूनच होते. त्याने सिकंदर आदिलशहाबरोबर त्याची राजधानी विजापूर काबीज केली आणि आदिलशाही समाप्त केली. अबुल हसन कुतुबशहाला त्याने कैद केले. त्याबरोबर गोवळकोंडा आणि कुतुबशाही यांचा त्याने घास घेतला. त्याच न्यायाने संभाजी मारल्यानंतर त्याची राजधानी रायगड घेणे आणि मराठशाही समाप्त करणे ही अगदी क्रमप्राप्त गोष्ट होती. शत्रूच्या बाबतीत दया आणि दाक्षिण्य ही औरंगजेबाच्या राजनीतीत बसतच नव्हती. कर्जाप्रमाणे, अग्नीप्रमाणे शत्रूचाही अवशेष शिल्लक राहिला तर तो पुनःपुन्हा वाढतो, म्हणून या त्रयीचा शेष म्हणून शिल्लक राहू देऊ नये, त्याचा समूळ निःपात करावा हे त्याचे निःसंदिग्ध धोरण होते. 'ऋणशेषश्चाग्निशेषः शत्रुशेषस्तथैवच। पुनः पुनः प्रवर्धन्ते तस्माच्छेषं न रक्षयेत् ॥'

औरंगजेबाने रायगडला वेढा घालण्यास ही वेळ मोठ्या चातुर्याने निवडली होती यात शंका नाही. कारण, संभाजीनंतर कर्ता असा पुरुष राजकुटुंबात नाव घेण्यासारखा कोणीच नव्हता. त्यातल्या त्यात वयाने मोठी म्हणजे संभाजीची बायको येसूबाई हीच होती. पण मोठी म्हणजे किती म्हणावयाची ? तिचे वय फक्त अठ्ठावीस वर्षांचे होते. औरंगजेबाची मोठी मुलगी झेबुन्निसासुद्धा तिच्यापेक्षा तेवीस वर्षांनी मोठी होती. पण वयाच्या मानाने येसूबाईपाशी शहाणपण विशेष होते. शिवाजी महाराजांची ती आवडती सून होती आणि संभाजी एरवी कितीही बेहोष असला तरी तिची अवज्ञा करण्याचे त्याच्या स्वप्नातही कधी आले नाही. तिच्याच मुळे खंडो बल्लाळ व निळो बल्लाळ यांचे संभाजीच्या संतापापासून रक्षण झाले. बाळाजी आवजीला संशयाच्या भरात संभाजीने हत्तीच्या पायी दिले, तेव्हा तिने त्याची अगदी कडक शब्दांत कानउघाडणी केली; ती त्याने मुकाट्याने ऐकून

घतली. त्याचा शिक्का तिच्याच ताब्यात असे व ती स्वतःही त्याच्या गैरहजेरीत कारभार करी. 'सखी राज्ञीर्जयति' असा तिचा शिक्का होता. जगात ज्याचा कुणावरही विश्वास नव्हता, त्या संभाजीने तिच्यावर एवढा भरंवसा ठेवावा, यापेक्षा तिच्या शहाणपणाचा पुरावा आणखी कोणता हवा ?

जसे शहाणपण तसेच धैर्यही. गेली आठ वर्षे ती महाराष्ट्राची महाराणी होती. पण औरंगजेबाचे चौफेर आक्रमण आणि संभाजीविरुद्ध वारंवार होणारे कट यांमुळे धास्ती आणि अशाश्वती यांचे दाट सावट तिच्या जीवितावर पडले होते. सुरुंग पेरलेल्या रस्त्यावरून अंधाऱ्या व वादळी रात्री चालणाऱ्या एकाकी पथिकाप्रमाणे वरून वीज कोसळते की पायाखाली सुरुंग फुटतो ही चिंता अहोरात्र तिचे काळीज कुरतडत होती. आणि गेल्या महिन्या दोन महिन्यांत तर केवळ कडेलोट झाला होता गेल्या वर्षीच्या कार्तिकात शिर्क्यांचे बंड मोडण्यासाठी संभाजी रायगडाहून बाहेर पडला, ती त्याची अखेरची भेट होती. त्यानंतर तिच्या कानावर आली ती संगमेश्वरला झालेल्या प्रलयाची आणि शेख निजामाने झडप घालून संभाजीला धरून नेल्याचीच बातमी. त्या वेळी तिला केवढे दुःख झाले असेल याची केवळ कल्पनाच केली पाहिजे. औरंगजेबासारख्या निर्घृण दावेदाराच्या तावडीत सापडलेला संभाजी आता परत जिवंत दृष्टीस पडणे शक्य नाही, आपण आजच विधवा झालो या विचाराने तिच्या काळजाचे पाणी झाले. पण तिने धैर्याने मन आवरले आणि पुढील व्यवस्था ताबडतोब केली. रायगडावर या वेळी येसाजी कंक मुख्य अधिकारी होता आणि चांगोजी काटकर किल्लेदार होता. त्यांच्याकरवी तिने नुकत्याच झालेल्या राजद्रोहाच्या कटात संभाजीने तुरुंगात टाकलेल्या प्रल्हाद निराजी व मानाजी मोरे यांना मोकळे केले. राजाराम पूर्वीप्रमाणे अजूनही नजरकैदेतच होता. त्याला तिने मुक्त केले. तीनच दिवसानंतर त्याचे मंचकारोहण केले म्हणजे राजारामाला छत्रपतीचे सर्वाधिकार प्राप्त झाले. पण राजारामाने स्वतः छत्रपतिपद धारण केले नाही. संभाजीचा मुलगा शाहू हाच राज्याचा खरा वारस; आपण कारभार पाहणारे त्याचे केवळ प्रतिनिधि ही त्याची दृढ भावना होती.

संभाजीला पकडल्यापासून केवळ आठ दिवसांत रायगडावर ही शांततामय राज्यक्रांति घडून आली. याचे कारण येसूबाईचा शहाणपणा आणि निःस्वार्थीपणा होय. राजारामाला बंधमुक्त करण्याऐवजी त्याला आहे तसाच ठेवणे व आपल्या अल्पवयी मुलाच्या नांवाने सत्ता काबीज करणे तिला सहज शक्य होते. पण तो विचारही तिच्या मनात आला नाही, हाच तिचा मोठेपणा. त्याचप्रमाणे एकदा मंचकारोहण झाल्यावर सारी सत्ता गिळंकृत करणे व विधवा भावजय व अज्ञान पुतण्या यांची वाट लावणं सहज शक्य असता राजारामालाही ते करावेसे सुद्धा वाटले नाही हाही तेवढाच त्याच्या मनाचा मोठेपणा म्हणावा लागेल. येसूबाई काय किंवा राजाराम काय, राजसत्ता चालत आली असताही तिचा अव्हेर करण्या-

इतका निर्लोभीपणा दोघांच्याही ठिकाणी होता हे या प्रसंगानेच सिद्ध झाले; म्हणूनच ते खरे धीर म्हणावयाचे. "विकारहेतौ सति विक्रियन्ते येषां न चेतांसि त एव धीरा." –मोहाच्या प्रसंगी ज्यांची चित्ते चळत नाहीत तेच खरे धीर म्हणावयाचे असे कवीने म्हटले आहे ते खरे आहे.

पण कितीही शहाणी झाली तरी येसूबाई ही बाईमाणूस होती आणि कितीही उमदा असला तरी राजाराम हा सर्वस्वी अनभिज्ञ होता. आज त्याचे वय केवळ एकोणीस वर्षांचे होते. त्याची प्रकृति अशक्त व नाजूक होती. गेली दहा वर्षे रायगडाच्या पलीकडे त्याने जग पाहिले नव्हते. त्याने कधी छापा घातला नव्हता की लढाई केली नव्हती. आणि रायगडला भिडलेल्या इतिकदखानाच्या रूपाने लांडगा तर उंबरठ्यावर जिभल्या चाटीत उभा होता. येसूबाईसह राजाराम वगैरेंनी रायगडावर राहावे तर सगळे एकदम एकाच ठिकाणी पकडले जातील, सर्वांनीच रायगड सोडून दुसरीकडे जावे तर मोगल फौजा त्यांचाच पाठलाग करतील, एकट्या येसूबाईला व तिच्या अजाण मुलाला रायगडावर ठेवून जावे तर ज्यांना सांभाळावयाची त्याची जबाबदारी, त्यांनाच संकटात सोडून पळ काढल्याबद्दल साऱ्या जगात नामुष्की होईल ही भीति होती. कोणताही पर्याय पाहिला तरी तो सारखाच अडचणीचा होता. अशा बिकट वेळी येसूबाईने जी मसलत सांगितली ती पाहिली म्हणजे, "स्त्रियो हि नाम खल्वेता निसर्गादेव पण्डिताः स्त्रिया या निसर्गतःच पंडित असतात असे म्हणतात, त्याची प्रचिती आल्याशिवाय राहत नाही.

ती बोलली–"मुलाचे वय लहान. राज्य तरी गेलेच. त्या अर्थी तुम्ही सर्वही पराक्रमी मनसबदार यांनी राजारामसाहेब यांस घेऊन बाहेर पडावे. मुलास बाहेर जाऊन राहणे यास जवळ जागा रायगडाहून बाकी ऐशी दुसरी नाहीच. त्या अर्थी मुलास व आम्हांस येथील बंदोबस्त करून येथे ठेवावे. तुम्ही सर्वांनी राजारामसाहेबांसहवर्तमान बाहेर पडून फौज जमा करून, प्रांताचा बंदोबस्त राखिला असता सर्व मसलत, वोढ तिकडे आधी पडेल. येथे काही गिल्ला पडणार नाही. तथापि थोडी बहूत मसलत पडली असताही हा किल्ला बेलाग, मजबूद, वर्ष सहा महिने टिकाव पडेल. तो तुमचा सर्वांचा जमाव एखादे ठायी पोक्त जाला म्हणजे आम्हांस काढून न्यावे. किंवा शत्रूचे प्राबल्य विशेष, त्या अर्थी चंदी चंदावर प्रांती दम खाऊन पुन्हा मसलत बळावून राज्यसाधनही करणे पडेल तरी करावे. परंतु ये समयी सर्व कुटुंब निघोन एकदाच सर्वांनी शत्रूस हस्तगत व्हावे ऐसे होईल. यास्तव राजारामसाहेब व त्यांचा कबिला ऐसे काढून निघोन जावे; सर्वांनी एके ठायी मोहास पडून राहिल्यास सारी मसलत येथेच पडून सर्वांनी सापडावे ऐसे घडेल."

येसूबाईंची ही मसलत सर्वांस मान्य झाली. निघण्यापूर्वी येसूबाई व शिवाजी यांच्या समक्ष राजारामाने मुत्सद्दी व सरदार यांच्याकडून निष्ठेची शपथ

घवविली व त्यास सांगितले की, "राज्याचे अधिकारी शिवाजीराजे पूर्वीचे तेच हे ऐसे लक्ष ठेवून, आम्ही कारभारी, आमचे आज्ञेत राहून पूर्वीहून विशेष ज्याची जशी शक्ति त्याहून अधिक पराक्रम करून औरंगजेब शत्रु यास जिंकून राज्य रक्षावे." येसूबाईच्या चरणांवर मस्तक ठेवून त्याने तिचा निरोप घेतला. तिने त्याच्या मस्तकावर हात ठेवून आशीर्वाद दिला की, "यशस्वी व्हावे. गेले राज्य मिळवावे, श्रमी होऊ नये." राजारामाने डोळे पुसले व छोटया शिवाजीला पोटाशी धरून म्हटले—"पुन्हा भेट होईल तो सुदिन." तो सुदिन त्या तिघांच्याही बाबतीत उगवला नाही. पण या गोष्टीची त्यांच्यापैकी कोणालाच कल्पना नव्हती, ही केवढया समाधानाची गोष्ट म्हणावयाची !

त्या दिवशी ५ एप्रिल १६८९ ही तारीख होती. रायगडला वेढा पडून नुकतेच कोठे अकरा दिवस झाले होते. वेढ्याची सुरवातच असल्यामुळे वेढा ढिला होता हे तर खरेच पण रायगडचा विस्तार व रचनाच अशी होती की नाकेबंदी शक्य असली तरी संपूर्ण गडाला वेढा घालणे केव्हाही अशक्य होते. पावसाळ्यात तर रायगडच्या खोऱ्यात पाऊस व वारा यांचे असे थैमान चालते की माणसाला उभे राहणे कठीण जाते, मग वेढ्याची गोष्ट दूरच त्यामुळे राजाराम अगदी सहज रीतीने रायगडाहून बाहेर पडला. त्याच्याबरोबर या वेळी त्याच्या दोन बायका ताराबाई व राजसबाई होत्या. राजारामाबरोबर रामचंद्र नीळकंठ, शंकरजी मल्हार, धनाजी जाधव, संताजी घोरपडे व खंडेराव दाभाडे हे मुत्सद्दी व सरदार रायगडाहून निसटले.

रायगडाहून राजाराम प्रतापगडावर आला. तेथे त्याचा मुक्काम जून महिन्यापर्यंत होता. पण तेथेही त्याच्या पाठोपाठ इतिकदखानाने फतहजंगखानाच्या हाताखाली सैन्य रवाना केले. त्यामुळे प्रतापगडही त्याला ऐन पावसाळ्यात सोडावा लागला. प्रतापगडावरून सातारा परळी मार्गाने तो पन्हाळ्यावर दाखल झाला. पण पन्हाळा तरी सुरक्षित कोठे होता? राजाराम पन्हाळ्यावर असल्याचे कळताच औरंगजेबाने शेख निजाम व रुहुल्लाखान यांना पन्हाळ्यावर रवाना केले.

परिस्थिति दिवसेदिवस कठीण होऊ लागली. रायगड सोडताना पहिली कल्पना अशी होती की राजारामाने आपला कबिला विशाळगडावर ठेवावा आणि स्वत: किल्लोकिल्ली फिरते राहून प्रांताचा बंदोबस्त राखावा पण ती कल्पना केवळ कल्पनाच राहिली. कारण औरंगजेबाच्या सर्वंकष आक्रमणामुळे हिंडायला किल्ले तरी कोठे राहिले होते? जानेवारीपासून ऑगस्टपर्यंत महाराष्ट्रातील बहुतेक सर्व महत्त्वाचे किल्ले मोगलांनी घेतले होते. कोकणात त्रिंबक, माहुली, मलंगगड, प्रबळगड, माणिकगड, दुगड, कल्याण आणि घाटमाथ्यावर सिंहगड, राजगड, तोरणा, प्रतापगड, रोहिडा, साल्हेर इत्यादि प्रमुख किल्ले मराठ्यांच्या ताब्यातून गेले होते. घाटावर सुपे, बारामती, म्हसवड, खटाव, बूध, पाचगाव, कोल्हापूर, मसूर, शिरूर, चाकण, शिरवळ, वाई, पुणे, कऱ्हाड इत्यादि ठिकाणी

मोगलांची लष्करी ठाणी वसली होती. पन्हाळा भागात रुहुल्लाखानाचे सैन्य, राजगड भागात फिरोजजंगाचे सैन्य, चाकण भागात शहाजादा आझमचे सैन्य, असे महाराष्ट्रात सगळीकडे मोगल सैन्य पसरले होते आणि खुद्द औरंगजेब कोरेगाव तुळापूरला ठाण देऊन बसला होता. काही तुरळक अपवाद सोडता स्वराज्यातला वतनदार वर्ग खुषीने म्हणा की सक्तीने म्हणा आपली वतने राखण्यासाठी मोगलांशी सहकार्य करीत होता.

याचा अर्थ असा नव्हे की मराठे सर्वस्वी नामोहरम झाले होते. राजाराम पन्हाळ्यावर असतानाच रायगडच्या वेढ्यास पायबंद बसावा अशा इच्छेने आणि "मराठे आहेत असे खाशांस कळवून येतो" अशा ईर्षेने संताजी घोरपड्याने पावसाळ्याच्या दिवसांत मध्यरात्री तुळापुरावर खुद्द औरंगजेबाच्या छावणीवर दोन हजार लोकांनिशी छापा घातला; आणि औरंगजेबाच्या डेऱ्याचे सोन्याचे कळस कापून आणले. तसाच सिंहगडावरून रायगडकडे तो उतरला आणि इतिकदखानाच्या फौजेवर छापा घालून त्याचे पाच हत्ती घेतले आणि तडक पन्हाळ्यावर राजारामापुढे ते सोन्याचे कळस आणि ते हत्ती उभे केले. तेव्हा राजारामाची मर्जी बहुत प्रसन्न झाली आणि त्याने संताजीस 'ममलकत् मदार' असा किताब दिला. पण मोगलांच्या आक्रमणाचा झपाटाच इतका जबर होता व त्यांचे सामर्थ्यच इतके अफाट होते की, सध्या तरी त्याला आवर घालणे केवळ अशक्य वाटत होते. तेव्हा पूर्वी ठरल्याप्रमाणे राजारामाने पन्हाळा सोडून महाराष्ट्राच्या बाहेर जिंजीस जावे असे निश्चित केले. पन्हाळ्याला मोगलांचा वेढा जलदीने पडू लागला होताच. तेंव्हा नवरात्र संपल्यावर विजयादशमीच्या मुहूर्तावर २६ सप्टेंबर १६८९ रोजी राजारामाने पन्हाळा सोडला.

पन्हाळ्याहून कर्नाटकाकडे जाण्याचा बेत राजारामाने आपणाकडून अगदी गुप्त ठेवला होता. पण पन्हाळ्याला राजाराम येण्यापूर्वी तो प्रतापगडाला असतानाच या बेताची कुणकूण औरंगजेबाला लागलेली होती. औरंगजेबाचा बेळगावचा फौजदार रणमस्तखान पन्नी ऊर्फ बहादुरखान हा बेळगावला राहून गोवा-सावंतवाडीच्या घाटाखालील प्रदेशावर लक्ष ठेवीत असे. त्याला १२ मे १६८९ रोजी गोव्याच्या व्हाइसरॉयने पत्र लिहिले. त्यात म्हटले आहे- "आपले पत्र मिळाले. आपली ख्यालीखुशाली कळून व आपण आमच्या शेजारी आल्याचे पाहून आनंद झाला. आपल्या पत्रात आपण बातमी दिली आहे की राजाराम रायरीच्या किल्ल्यातून जावळीच्या किल्ल्यात गेला आहे. पण त्याला आपण जावळीच्या किल्ल्यात गेलो असल्याची हूल उठवून कर्नाटकात जावयाचे आहे. बादशाहाने आपणाला आज्ञा केली आहे की राजाराम जर आमच्या राज्यातून निघाला तर त्याला पकडण्याची आमच्याकडे मागणी करावी. आमच्या राज्याशी

असलेली बादशाहाची मैत्री लक्षात घेऊन व राजारामाची शिक्षा त्याला टळू नये म्हणून मी आवश्यक ते पहारे सगळीकडे बसवीत आहे." राजाराम या वेळी प्रतापगडावर होता.

पन्हाळ्याहून २६ सप्टेंबरला राजाराम निघाला, त्यापूर्वी तेवीस दिवस म्हणजे ३ सप्टेंबर रोजी गोव्याच्या व्हाइसरॉयने बहादुरखानाला कळविले की, "आपण विनंती केली आहे की राजारामाला कर्नाटकात एक खजिना मिळावयाचा आहे व तो तिकडे निसटण्याचा बेत करीत आहे. तरी त्याच्यावर समुद्रावर तशीच खुष्कीच्या मार्गावरही पाळत ठेवावी. याच विषयासंबंधाने आपण मला आणखी एक पत्र लिहिले होते व त्याप्रमाणे मी दोन्हीही मार्गावर पहारे बसविले होते. आता हे पत्र मिळाल्यावर पहारे दुप्पट करीत आहे. म्हणजे तो आमच्या बाजूने आला तर त्याला अटक करता येईल." राजाराम गोव्याच्या मार्गाने कर्नाटकात गेला नाही हा भाग निराळा. पण पन्हाळ्याहून तो निघण्यापूर्वीच गुप्त असलेला त्याचा कर्नाटकाकडे जाण्याचा बेत, प्रयाणापूर्वी चौघडे वाजवावेत, त्याप्रमाणे जगजाहीर झाला होता, हे विशेष आहे! मग ही औरंगजेबाच्या हेरांची चतुराई होती की राजारामाच्या फितुरांची कारवाई होती हे सांगणे कठीण आहे. अशा स्थितीत रुहुल्लाखानाच्या तावडीतून पन्हाळ्याहून राजाराम निसटला हेच मोठे नवल म्हणावयाचे!

राजाराम कर्नाटकाकडे निघाल्याची बातमी समजल्यावर औरंगजेबाने विजापूरचा सुभेदार अब्दुल्लाखान बाऱ्हा यास राजारामाचा पाठलाग करून कैद करण्याची तातडीची आज्ञा केली. अब्दुल्लाखान या वेळी विजापूर प्रांतातील दोन किल्ले जिंकण्याच्या कामात गुंतला होता. त्याने ते काम बाजूला ठेवले. राजाराम बिदनूरच्या राणीच्या मुलुखात दाखल झाल्याची त्याला बातमी लागली. त्याने आपला मोठा मुलगा हसनअली याला बिदनूरच्या दिशेने पाठविले व तो स्वतः पाठोपाठ निघाला. तीन दिवस व तीन रात्र त्याने न थांबता दौड केली. आणि सुभानगड व जिरा या किल्ल्यांच्या नजीक, बिदनूरच्या हद्दीत, तुंगभद्रेच्या काठावर त्याने राजारामाला गाठले. नदीच्या पात्रात एक बेट होते. तेथे राजाराम व त्याचे साथीदार यांनी आश्रय घेतला होता. अब्दुल्लाखान हा रात्रीच्या वेळी त्यांच्यावर तुटून पडला. राजारामाचे अनेक लोक मारले गेले व अनेकजण कैद झाले. पण जो मारलाही गेला नाही व पकडलाही गेला नाही असा फक्त राजाराम होता. त्या धामधूमीत राजारामाने आपली शस्त्रे, वस्त्रे, पागोटे, पादत्राणे ही सगळी टाकून दिली व तो अशा प्रकारे निघून गेला की कोणालाही त्याचा पत्ता लागला नाही. बिचाऱ्या अब्दुल्लाखानाचे नशीब वाईट होते हेच खरे. त्याने शंभर माणसे पकडली व ती विजापूरच्या किल्ले अर्कमध्ये डांबून ठेवली. पण तेथूनही बहिरजी घोरपडे वगैरे वीस इसम पळून गेले. तेव्हा उरलेल्या ऐंशी इसमांना

बादशाहाच्या आज्ञेने त्याच्याकडे पाठविण्यात आले. तेथे त्यांचा वध करण्यात आला. या वेळी राजाराम निसटला याचे कारण बिदनूरच्या राणीने त्याला आश्रय दिला व नंतर त्याला सुरक्षितपणे जाऊ दिले असा संशय सर्वत्र पसरला होता. कसेही असो तुंगभद्रेच्या तीरावर सय्यद अब्दुल्लाखानाच्या तावडीतून राजाराम या वेळी निसटला होता.

संभाजीच्या पदरी असलेला केशवभट्ट पुरोहित संगमेश्वरकर हा पन्हाळ्यापासून राजारामाबरोबर या प्रवासात होता. त्याने राजारामाच्या या प्रवासाचा वृत्तान्त आपल्या 'राजारामचरितम्' या ग्रंथात दिला आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणे पन्हाळ्यावर राजारामाने नवरात्राचा महोत्सव केला व विजयादशमीनंतर मोगलांनी पन्हाळ्याला वेढा घातलेला पाहून जिंजीच्या यात्रेचे प्रस्थान ठेवले. त्याच्याबरोबर मानसिंह मोरे, निळो मोरेश्वर, बहिरो मोरेश्वर, कृष्णाजी अनंत, प्रल्हाद निराजी, खंडो बल्लाळ, बाजी कदम, खंडोजी कदम इत्यादि सरदार व मुत्सद्दी होते. ते घोड्यावर बसून प्रवास करीत होते. प्रवासाच्या दुसऱ्या दिवशी ते कृष्णेच्या तीरावर आले. तेथे सर्वांनी स्नाने केली व ते पुढे चालू लागले. एवढ्यात त्यांचा सुगावा लागून मोगलांनी त्यांचा पाठलाग सुरू केला; आणि वर्धेच्या किनारी त्यांना गाठले. त्या वेळी बहिरजी घोरपडे व त्याचा भाऊ मालोजी घोरपडे यांनी त्यांच्याशी निकराचे युद्ध केले. पण ते थकले. त्यांचे घोडेही थकले. ते थोडे व मोगल फार तेव्हा राजारामाला मोठी चिंता निर्माण झाली. तेव्हा त्या प्रदेशात शिवाजी महाराजांपासून वागत असलेले रूपसिंह भोसले व संताजी जगताप हे त्याच्या साहाय्याला धावले. संताजी जगतापला राजारामाने शत्रूच्या तोंडावर ठेवले आणि रूपसिंह भोसल्याला घेऊन तो गावे, गवळीवाडे, गड व खोरी झपाट्याने पार करीत पुढे चालला. पण शत्रूने तुंगभद्रेच्या तीरावर त्यांना गाठलेच. रूपसिंह त्याच्याशी झगडत असता नाजूक राजारामाला आपल्या खांद्यावर घेऊन बहिरजी शत्रूच्या त्या गर्दीतून पार गेला. तुंगभद्रेच्या तीरावर त्या स्वामिभक्त बहिरजीने दाईचे, मित्राचे, सेवकाचे, नातेवाइकाचे असे सर्व प्रकारचे काम करून राजारामाचे श्रम हरण केले. आणि प्रवास करीत त्याला मराठ्यांच्या ताब्यातील अमूर नावाच्या गावी नेऊन पोचविले. तेथला अंमलदार बाजीराव काकडे याने राजारामाची सर्व व्यवस्था केली व वेलोर येथे त्याला पोचविले. तेथून पन्नास मैलांवर असलेल्या जिंजीस राजाराम सुखरूप पोचला. तुंगभद्रेच्या तीरावर ताटातूट झालेले त्याचे अनुचर कोणी कापडीचे, कोणी भिकाऱ्याचे, कोणी बैराग्याचे व कोणी व्यापाऱ्याचे वेष घेऊन त्याच्या मागोमाग जिंजीस येऊन पोचले.

२ नोव्हेंबर १६८९ रोजी राजाराम जिंजीस पोचला. प्रवासाच्या अखेरच्या टप्प्यात त्याने व त्याच्या सहकाऱ्यांनी यात्रेकरूंचे वेष धारण केले होते. पांडे-

चेरीचा फ्रेंच अधिकारी मार्टिन याने आपल्या रोजनिशीत लिहिले आहे की- "नोव्हेंबर १६८९. राजाराम योग्याचा वेष घेऊन चार ब्राह्मण सरदारांसह वेलोर येथे दाखल झाला. वेलोरचे ठाणे जिंजीच्या हुकमतीत आहे. वाटेने त्याचे फार हाल झाले. सहाशे मैलांचा सर्व प्रवास हा राजाने पायीच केला. मोगलांनी ओळखू नये म्हणून त्यांनी वेष पालटले होते. वेलोरच्या अधिकाऱ्यांनी त्यास ओळखून ठाण्यात घेतले."

'अरक्षितं तिष्ठति दैवरक्षितम्' या वचनाची प्रतीति आणून देणारे मराठ्यांच्या इतिहासात जे काही प्रसंग आहेत त्यांत राजारामाच्या या जिंजीच्या प्रवासाची अवश्य गणना केली पाहिजे. रायगड ते जिंजी हा जवळ जवळ आठशे मैलांचा प्रवास होता. प्रवास करणारा राजाराम हा प्रकृतीने सुकुमार होता. प्रवासाचे कष्ट यापूर्वी त्याने कधी अनुभवले नव्हते. तो कर्नाटकात जाणार ही वार्ता तो निघण्यापूर्वीच चार महिने औरंगजेबाला समजली होती. त्यामुळे आधीच हुशार असलेला तो अधिकच हुशार होऊन बसला होता. त्याने ठिकठिकाणच्या ठाणेदारांना राजारामाचा पाठलाग करण्याचे हुकूम सोडले होते. त्यामुळे जीव घेऊन पळणाऱ्या हरणाच्या मागे शिकारी कुत्रे त्वेषाने तुटून पडावे त्याप्रमाणे पावलो पावली मोगल सैनिक राजारामास अडवीत होते. त्यात पुन्हा पावसाळ्याच्या अखेरीस निघाल्यामुळे रस्ते चिखलाने निसरडे झाले होते आणि नद्या दुथडी भरून वहात होत्या. अशा या नैसर्गिक व मानवी अडथळ्यांतून राजाराम रायगडातून सुद्धा बाहेर पडणे दुर्घट होते. मग जिंजीची काय कथा? पण तो रायगडाहून निसटला. प्रतापगडाहून निसटला. पन्हाळ्याहूनसुद्धा निसटला. त्याने वर्धा ओलांडली व तुंगभद्रा पार केली आणि अंगावर ओरखडासुद्धा न उठता तो 'अक्षतमारिष्ट' जिंजीस पोचला, त्याअर्थी त्याचे दैव खरोखर बलवत्तर म्हटले पाहिजे.

पण पुरुष प्रयत्नावाचून दैव झाले तरी प्रसन्न होत नसते. राजारामाला जीवाला जीव देणारे सहकारी लाभले. वर्धेच्या तीरावर बहिरजी घोरपड्याने तळहातावर शिर घेऊन मोगलांशी संग्राम केला. संताजी जगतापाने त्यांना अडवून धरले व राजारामास निसटण्यास वाव मिळवून दिला. तुंगभद्रेच्या तीरावर रूपसिंह भोसल्याने त्यांच्याशी सामना दिला. बहिरजी घोरपड्यान तर मित्राप्रमाणे, दासाप्रमाणे, दाईप्रमाणे, राजारामाची सेवा केली. मार्टिन म्हणतो "प्रल्हाद निराजीनेच शत्रूचे निवारण करून राजारामास सांभाळून सुखरूपपणे आणले. जणू काय हा प्रत्यक्ष बापच असा त्याचा मान राजाराम ठेवतो" असे निष्ठावंत होते म्हणून राजारामाचा निभाव लागला हे उघड आहे. एवढेच नाही तर तुंगभद्रेच्या काठावर, वर्धेच्या किनाऱ्यावर पावलोपावली मोगलांशी लढताना जे धारातीर्थी पतन पावले, जे विजापूरच्या कैदेत पडले, ज्यांचा पुढे औरंगजेबाने शिरच्छेद केला

त्या अज्ञात स्वामिभक्तांची नावे इतिहासाला माहीत नाहीत. पण म्हणून त्यांनी सांडलेले रक्त व्यर्थ गेले असे कसे म्हणता येईल? त्यांनी आपल्या प्राणांची बाजी लावली व धोंघावणाऱ्या वादळात हातांच्या ओंजळीत पणतीची ज्योत सांभाळावी त्याप्रमाणे राजारामाला सांभाळले. राजाराम जिंजीस पोचला हा औरंगजेबाचा पराजय होता व मराठ्यांचा जय होता. पण त्यामागे राजारामाचे सुदैव आणि त्यांच्या सेवकांचे समर्पण होते हे विसरता येणार नाही.

इतकेच नव्हे तर राजाराम जिंजीस गेल्यावर सुद्धा त्याची पैशाच्या विवंचनेतून सुटका झाली तीसुध्दा एका स्वामिभक्तामुळेच. हा स्वामिभक्त म्हणजे गिरजोजी यादव हा होय. शिवाजी महाराजांपासून हा गिरजोजी व त्याचा भाऊ अर्जोजी छत्रपतींची सेवा करीत होता. राजाराम प्रतापगडी असताना त्याने या गिरजोजीस आपली बायको जानकीबाई व युवराज शिवाजी यास आणावयास रायगडास पाठविले. रायगडचा किल्लेदार चांगोजी काटकर याने ते मानले नाही. तेव्हा राजारामाच्या वाटखर्चासाठी म्हणून सोनेनाणे गिरजोजीने मागून घेतले. मोगलांनी वेढलेल्या प्रदेशातून शर्थीने ती वस्तभाव पन्हाळ्याला राजारामाकडे पोचविली. पुढे राजाराम कर्नाटकाकडे निघाला तेव्हा ते जवाहीर घेऊन गिरजोजीही त्याच्या बरोबर निघाला. मार्गात संकटे आली. ताटातूट झाली. पण राजाराम जिंजीस पोचल्यानंतर मोठ्या साहसाने ते द्रव्य जसेच्या तसे गिरजोजीने त्यांच्यापुढे ठेवले. तेव्हा दुष्काळाने करपलेल्या पिकांवर पावसाच्या धारा बरसाव्यात तसा पैशाच्या काळज्यांना गांजलेल्या राजारामाला परम आल्हाद झाला. गिरजोजी वर्णन करतो,

"त्याउपरी पनालियास गनिमाचा वेढा आला. याकरिता राजेश्री स्वामी कर्नाटकात जावयाच्या उद्देशे तेथून स्वार जाहाले. ते समयीं उंच उंच जवाहिरांच्या गाठोड्या बांधोन आम्हा जवळी व वरकड हुजरियाजवळी दिल्या आणि राजेश्री स्वामीसमागमे जात असतां राजेश्री हंबीर राऊ व राजेश्री मानसिंग मोरे माघारे निघोन आले. पुढे राजेश्री बहिरजी घोरपडे येऊन भेटले. त्यास समागमे घेऊन राजेश्री स्वामी मार्गीचे बहुत श्रमे करून सिवमोध्यास गेले. तेथे राजेश्री रूपाजी भोसले व सकल लस्कर टाकून जरोर येकाकी राजेश्री स्वामीस करनाटकात जावे लागले. तेव्हा आम्हा जवळील जवाहिरांच्या गाठोड्या होत्या त्या राजेश्री खंड प्रभु चिटनवीस यापासी देऊन आम्हास समागमे घेतले. गोठाबाहेरी गेलियावरी समुदाये बहुत देखोन आम्हांसही माघे राहावयाची आज्ञा केली. याकरिता आम्ही फिरोन गोठांत येऊन ज्या जवळी ज्या गाठोडिया होत्या त्या त्या आपलाल्या आपल्याजवळी घेतल्या. रूपाजी भोसले व वरकड सारे लस्कर गनिमाच्या हातास लागले. त्या संकटामध्ये नाना प्रकारीचे श्रम साहास करून युक्तीने तितके जवाहीर जतन करून परम प्रयासे नरगुंदास आलो. तेथे

आपणांस वेथा जाहाली. त्यामुळे येक महिना तेथे राहावे लागले. तेव्हा ज्यापासी ज्या गाठोडचा होत्या त्या त्यांणी आम्हाजवळी टाकून देऊन सारे निघोन गेले. ते सारे जवाहीर आम्ही व दमाजी सरखवास यांणी जतन करून मार्गाचे परम संकटे चंदीस घेऊन गेलो. राजश्री स्वामीचे दर्शन जाहाले. जवाहिराच्या गाठोडचा पुढे ठेविल्या. गाठोडियावरी सिके किले पनाळियावरी केले होते ते रुजू केले. राजश्री स्वामी संपूर्ण जवाहीर पाहून परम संतोसी जाहले आणि आम्हा उभयतास पांच पांच हजार चक्रे बक्षीस, पांच पांच सेर रुप्याची ताटे, व दोन दोन रुप्याच्या वाटचा व पाणी प्यावयाची एक एक रुप्याची घडी, येक येक तरवार, येक येक कटार, येक येक ढाल व पांच पांच नग वस्त्रे द्यावया आणिली."

त्या कठीण काळात बिदनूरच्या राणीने राजारामास आश्रय दिला. तिने त्याला आपल्या राज्यात सुरक्षित ठेवले, त्याच्या मागावर मोगल आले, त्यांना मारून काढले आणि नंतर त्याला संधि पाहून जिंजीकडे मार्गस्थ करून दिले. बिदनूर सारख्या चिमुकल्या राज्याची मालकीण असलेल्या राणीसारख्या बाईमाणसाने औरंगजेबासारख्या खविसाचा संताप ओढवून घेण्याचे पुरुषांनाही लाजविणारे धाष्टर्य दाखवावे आणि आपल्या प्राणावर व आपल्या राज्यावर उदार होण्यास तयार व्हावे असा तिचा व राजारामाचा कोणता बरे ऋणानुबंध होता ? ऋणानुबंध होता पण तो जुना होता. पन्नास वर्षांपूर्वी विजापूरचा सरदार असताना रणदुल्लाखानासह शहाजी, विजयनगरचे स्वतंत्र झालेले पाळेगार विजापूरच्या वतीने जिकण्याच्या कामगिरीवर कर्नाटकात उतरला होता. त्या वेळी रणदुल्लाखानाने बिदनूरचे राज्य जिंकून जवळ जवळ खालसा केले होते. पण शक्य तितका हिंदु संस्थानिक, विजापूरचा ताबेदार म्हणून का होईना पण राखावा या उदार बुद्धीने शहाजीने ते राज्य बिदनूरचा राजा वीरभद्रनायक यास परत दिले. त्या वीरभद्रनायकाच्या वंशातील सोमेश्वरनायकाची बायको चेन्नव्वा ही राजारामाच्या वेळेस आपल्या अल्पवयी मुलांच्या नावे राज्य चालवीत होती. आपल्या घराण्यावर शहाजीने केलेला उपकार तिने या वेळी आठवला व ज्याप्रमाणे पूर्वी शहाजीने तिच्या पूर्वजांना वाचविले त्याप्रमाणेच तिने आता शहाजीच्या वंशजाला वाचविले. जीवनात आणि विशेषत: राजकारणात केलेले उपकार विसरणारेच फार असतात. पण न विसरणारेही थोडेसे असतात. अशा हाताच्या बोटांवर मोजता येण्यासारख्या थोडचा विरळापैकीच बिदनूरची राणी एक होती.

बिदनूरच्या भूमीत पन्नास वर्षांपूर्वी शहाजीने अक्रोडाचा वृक्ष लावला. त्याच्या फळांचा आस्वाद घेण्याचा योग तिसऱ्या पिढीत त्याच्या नातवाला लाभला.

□ □

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था

# (२)

२६ सप्टेंबर १६८९ रोजी राजारामाने पन्हाळा सोडला. त्यानंतर पुरता दीड महिनाही गेला नाही तो रायगड पडला. ३ नोव्हेंबर १६०९ रोजी येसूबाईने सल्ला करून रायगड मोंगलास दिला. हे अघटित घडले. 'हा किल्ला बेलाग, मजबूद, वर्ष सहा महिने टिकाव पडेल.' असे येसूबाईने राजारामास मसलत सांगताना सांगितले होते. पण लढाई न होताच गड मोगलांच्या स्वाधीन करावा लागला. गोष्ट मोठ्या दुःखाची होती. पण इलाज नव्हता. परिस्थितीच तशी आली होती.

इतिकदखानाने मार्च महिन्यात रायगडास वेढा घातला. मराठ्यांनी त्याचा प्रतिकार केला नाही असे मुळीच नाही. ज्या दिवशी इतिकदखान महाडास पोचला त्याच दिवसापासून मोगल व मराठे यांच्या चकमकींना प्रारंभ झाला. इतिकदखान म्हणतो—'आज रायरीपासून सहा कोसावर असलेल्या महाड येथे मी पोचलो. प्रथम आमच्या लष्कराने येथील गावे आणि ठाणी लुटली. शत्रु किल्ल्याच्या पायथ्याशी होते, त्याच्यावरही आम्ही हल्ले केले. किल्ल्याच्या पायथ्याशी असलेली ठाणीही आम्ही सोडली नाहीत. येथे रतनगडचा किल्ला आहे. या किल्ल्याच्या पायथ्याशी असलेली ठाणी पण उद्ध्वस्त केली. येथील शेते आणि फळबागाही आम्ही नष्ट केल्या. गांगोलीच्या मुक्कामी शत्रूने आमच्यावर रात्री हल्ला केला. त्यांनी आमच्यावर बाण फेकले आणि गोळ्यांचा वर्षाव केला, पण आमचे शूर सैनिक सावध होते. त्यांनी शत्रूंचा प्रतिकार करून त्यांना परतवून लावले. आजही महाडच्या वाटेवर असलेल्या सोनगडच्या डोंगरावर शत्रु जमले होते आणि त्यांनी आमच्यावर तोफांचा आणि बंदुकींचा मारा केला. आमचे सैन्य डोंगरावर चढले. आमच्या सैनिकांनी शत्रूंना मार देत किल्ल्याच्या दरवाजापर्यंत रेटले.

गडाला वेढा घालणाऱ्या मोगलांची रसद मारण्याचाही मराठ्यांनी प्रयत्न करून पाहिला, पण त्यात त्यांना म्हणावे तसे यश आले नाही. जुल्फिकारखान याने किल्ल्यापासून काही अंतरावर बुजुर्गवाडीचा दर्गा आहे तेथे आपली छावणी कायम केली. तो अद्याप छावणीत पोहोचला नव्हता. इतक्यात साताऱ्याच्या दिशेने हंबीरराव (दुसरा) त्याच्यावर चालून आला. मोगलांची रसद तोडणे हा त्याचा उद्देश होता. जुल्फिकारखान व हंबीरराव यांचे निकराचे युद्ध झाले. मराठ्यांची जवळ जवळ १५०० माणसे ठार झाली. मोगलांचे सुमारे ९०० सैनिक ठार झाले.

मराठे टिकाव धरू शकले नाहीत. ते पळून गेले. रसद तोडण्यासाठी तुकड्या नेमल्या होत्या त्याही निघून गेल्या.

इतिकदखानाच्या छावणीवर छापे घालण्याचाही मराठ्यांनी प्रयत्न केला. तुळापूर मुक्कामी औरंगजेबाच्या तंबूचे सोन्याचे कळस कापून घेऊन संताजी घोरपडे याने तसाच इतिकदखानाच्या छावणीवर हल्ला केला. त्याचे पाच हत्ती हिरावून घेतले. आणि पारघाट चढून वाई सातार्‍याहून पन्हाळ्यास येऊन राजारामापुढे ती आपली विजयचिन्हे सादर केली. पण मोगल सैन्य अफाट आणि त्याला लागेल तो मदत औरंगजेब रवाना करीत होता. इतिकदखानाने लिहिले की "मला बंदुकची, बेलदार, सुतार, जंगले तोडणारे, जमिनी खणणारे, मशालजी इत्यादि लागतील. येथे जास्त काम पायदळ शिपायांचेच आहे. ते आमच्यापाशी विशेष नाहीत. कर्नाटकी बेलदार आणि इतर युद्धसाधने यांची आवश्यकता आहे. चार पाच हजार माणसे लवकर पाठवावीत. त्यापैकी एक हजार तरी पायदळ बंदुकची हवेत. दारू आणि लहान आणि मोठे गोळे लवकर पाठवावेत. जंगले तोडणारेही लवकर पाठवावेत. माझ्यापाशी किती थोडे सैन्य आहे हे आपल्याला माहीतच आहे. म्हणून अधिक सैन्य पाठवावे." हे सर्व औरंगजेबाने पाठविले हे सांगणे नकोच. बिचार्‍या मराठ्यांनी कुमक मागावयाची कुणाकडे आणि त्यांना देणार कोण? पन्हाळा याचमुळे हातातून गेला. पन्हाळ्याचा किल्लेदार पिराजी घाटगे याने शर्तमर्दीने पन्हाळा व पावनगड दोन्ही किल्ले लढविले. खाली मोर्चेबंदीचे मनुष्यांची डोचकी कापून आणून त्यांचा धबधबा रचून त्याजवर तोफ ठेवून लढाई करावी हे शौर्य पाहून मोगलही थक्क झाले. पण किल्लेदाराचा पुस्त पुन्हा होईना. रामचंद्रपंत अमात्यास त्याने सांगून पाठविले. "पल्ला आपला पोचत नाही. आमची तर लढाईची शर्थ जाली. पुढे आमचा परिणाम काय?" यावर पंतानं कळविले की "हरतर्‍हा करून आपला जीव वाचवावा. किल्ला दिल्यास चिंता नाही. वाजत बरसात जाहल्यानंतर पुन्हा किल्ला घेण्यात येईल" औरंगजेबाने सुद्धा त्याची स्तुति करून कळविले की "तुमचे लढाईची शर्थ जाहली निमकहलाल आहात. तुमच्या धन्याचा तुम्हांस पुस्त पुन्हा होत नाही. त्याअर्थी तुम्ही दोन्ही किल्ले सरकारात द्यावे. मागाल ते बक्षीस देतो." यावर किल्लेदाराने पन्हाळा व पावनगड हे दोन्ही किल्ले औरंगजेबास दिले. त्याला औरंगजेबाने कागलची जहागीर देऊन "तो बहूत मर्द मनुष्य म्हणून आपणाजवळ ठेवून घेतला. या पिराजीराव घाटग्याला शिवाजी महाराजांनी पुरंदरचे वतन देऊन आदिलशाहीतून आपणाकडे वीस वर्षांपूर्वी आणले होते. आज तोही मोगलांकडे गेला. व किल्लाही मोगलांकडे गेला. मराठ्यांकडे शूर माणसांची कमतरता नव्हती. पण सर्वच गोष्टींची वाण असल्यावर नुसते शौर्य तरी किती पुरे पडणार ?

रायगडच्या दुर्गम परिसराने आणि निसर्गाने मराठ्यांची काही काळ मदत केली. रायगडचे कडे इतके ताशीव आणि उंच की सरळ गडाला भिडणे शक्यच नव्हते. इतिकदखानाने उत्तरेकडून व दक्षिणेकडून वेढा घातला असला तरी उत्तरेकडे भिंत इतकी उंच होती व तळाशी जंगल इतके दाट होते, की प्रत्यक्ष, गडापासून लांब असलेल्या निजामपूर, वाघेरी, पाणे या गावाभोवताली त्याच्या सैन्याचा तळ पडला होता. त्याची मुख्य फौज दक्षिण घेऱ्याकडील वाघोली व वाळसुरे या गावालगत होती. कारण तिकडेही झाडी दाट असली तरी उत्तर तटाइतकी दुर्गम नव्हती. संपूर्ण गडाला वेढा घालणे शक्यच नव्हते. फक्त महत्त्वाची नाकी मात्र ताब्यात ठेवणे शक्य होते. ही उन्हाळ्यातली गोष्ट. पाऊस काळ आला आणि आषाढापासून भाद्रपदापर्यंत सगळा गड धुक्याने वेढून गेला. वेड्यासारखा पाऊस कोसळू लागला. पूर्वेकडून काळ व पश्चिमेकडून गांधारी या नद्या आणि त्यांना येऊन मिळणारे ओढे–नाले दुथडी भरून वाहू लागले. वारा तर इतक्या सोसाट्याचा वाहू लागला की सैनिकांना नुसते उभे राहणे देखील मुष्किल झाले. इतिकदखानाची जिद्द जबर खरी, पण पंचमहाभूतांच्या तांडव नृत्यापुढे तो तरी काय करणार ?

पण पाऊस काळ संपला आणि इतिकदखानाने वेढ्याचे पाश आवळले. आता परिस्थिति फारच कठीण झाली. " संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग. गडकोट हेंच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे सैन्याचे बल, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपली वसतिस्थले, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार, किंबहुना गडकोट म्हणजे आपले प्राणसंरक्षण " असे गडकोट भराभर पडू लागले. सिंहगड, पुरंदर, प्रतापगड, तोरणा, रोहिडा, लोहगड, त्रिंबक, प्रबळगड, माहुली असे मोठमोठे किल्ले मोगलांनी सर केले. मैदानी भागात वुध, पांचगाव, खटाव, कोल्हापूर, मसूर, शिरवळ, पुणे, सुपे, बारामती, कऱ्हाड, वाई, चाकण, शिरूर, इंदापूर इत्यादि ठिकाणी त्याची लष्करी ठाणी बसली,. स्वराज्यातील मोक्याच्या जागी त्याचे नामांकित सेनापती ठाण देऊन बसले. कोकणात मातबरखान, पन्हाळ्यास शेख निजाम, चाकणला शहाजादा आझम, राजगडला फिरोजजंग, रायगडला इतिकदखान, त्याच्या मदतीला जंजिऱ्याचा सीदी आणि या सर्वांच्यावर खुद्द औरंगजेब कोरेगावला, असे मोगल स्वराज्यात सर्वत्र पसरले होते. ज्यांच्यावर राज्य राखण्याची जबाबदारी ते वतनदार मोगलांशी सहकार्य करून आपली वतने राखण्याची धडपड करीत होते. उत्रोळीचे खोपडे, म्हसवडचे माने, मसूरचे जगदाळे, सुप्याचे देशपांडे, धनकवडीचे कुलकर्णी, – सर्वांची कैफियत एकच. " लष्करात कोरेगावास गेलो. पातशाहास जाळीयापासी जाऊन तीन वेळा मुजरा केला. आपणास सिरपाव दिल्हे." स्वेच्छेने नसले तर आपला दावेदार, वतनदार

मोगलास मिळून आपला सर्वनाश करील या धास्तीमुळे सक्तीने अनेक वतनदारांना मोगलांशी सहकार्य करावे लागले. कारीचे जेधे हे स्वराज्याचे कदीम सेवक. त्याचे प्रतिस्पर्धी खोपडे यांनी रोहिड्याचा किल्ला घेऊन देण्याचे मोगलांपाशी कबूल केले. नाइलाजाने जेध्यांनाही या वेढ्यात सामील व्हावे लागले. " आपला मुद्दई बाळाजी नाईक (खोपडे) जवळ आहे. नसते तुफान करील याजकरिता त्याबाबत आपणास गडाखाले चौकीस बसावे लागले. रायगड व वरकड किल्लेकोट गनिमासी सामील होऊन फिसाती केल्या. त्याबरोबर आपणासही चारी दिवस वर्तावे ऐसे जाहले. " फितुरीचे लोण खुद्द रायगडापर्यंत येऊन पोचले. बिरवाडीचा देशमुख, संभाजी नरसोजी गायकवाड याचा बाप नरसोजी गायकवाड रायगडावर होता. त्याने इतिकदखान गनीम रायगडास येऊन बिलगला असता त्यास भेटून गडावरील हाव पालत सांगितली. घर फिरले म्हणजे घराचे वासे फिरतात ते असे.

अशा स्थितीत येसूबाईला एकच आशा होती की, पन्हाळ्याहून बाहेर पडलेला राजाराम जिंजीस पोचून ही पडती बाजू काही सावरील. पण कार्तिकात बातमी आली की तुंगभद्रेच्या तीरावर विजापूरचा फौजदार सय्यद अब्दुल्ला याने राजारामाचा लवाजमा पकडला असून खुद्द राजाराम त्यात आहे. इतकेच नव्हे, तर राजारामाला आणण्यासाठी औरंगजेबाने हमीनुद्दीन खानाची रवानगीही केली आहे. ही बातमी ऐकल्यावर येसूबाईच्या आशेचा अखेरचा तंतूही तुटला. पन्हाळाही पडला. बाहेरून कोठूनही कुमक यणे शक्य दिसेना. अशा स्थितीत आणखी किल्ला भांडवणे म्हणजे हेकटपणाने आपल्याच लोकांचा नाश करणे आहे या विचाराने तिने इतिकदखानाशी राजकारण लावले. आपल्या जिवास व अब्रूस धक्का लागू देणार नाही असे त्याच्याकडून आश्वासन घेतले व मार्गशीर्ष मासी सल्ला करून किल्ला त्याच्या ताब्यात दिला. शिवाजीस तिने खानाच्या मांडीवर बसविले व बोलली, ' याचे वडील, चुलते ते सर्व सोडून गेले व सर्वांविशी वडील तुम्ही आहा.' त्यावर कुराण उचलून खान म्हणाला, " येविशी याउपरि तुम्ही खतरा न करणे. याचे जिवास व अबरूस कदापि धक्का लागू देणार नाही."

अशा प्रकारे आठ महिने चाललेला रायगडचा वेढा समाप्त झाला–तो केवळ इतिकदखानाच्या चिकाटीमुळे नव्हे तर यसूबाईच्या समयज्ञतेमुळे. तिने राजीखुषीने नव्हे, पण अक्कल हुशारीने गड मोगलांच्या ताब्यात दिला. असे करिताना तिला दुःख झाले नसेल असे थोडेच आहे? पण भावनांच्या आहारी न जाता प्रसंगावर नजर देऊन तिने माघार पत्करली. " हटनिग्रही न पडावे । विवेकी पुरुषे ।" हे आचारसूत्र असलेल्या तिच्या प्रतापी सासऱ्याने सुद्धा प्रसंग पाहून जयसिंगापुढे माघार घेतली होती. " प्रत्येक ठिकाणी घोडा दौडविणे शक्य होईलच असे नाही. काही ठिकाणी ढाली टाकून देणेच इष्ट ठरते." असे त्यांचेच शब्द होते.

त्याच शहाणपणाचा वारसा येसूबाईकडे आला होता. या निर्वाणीच्या प्रसंगी तिने पतकरलेली शरणागति हे त्या शहाणपणाचेच प्रत्यंतर होय. येसूबाई ही शिवाजी महाराजांची आवडती सून होती असे म्हणतात, ते यावरून खरे वाटू लागते.

रायगडचा पाडाव फितुरीने झाला नाही. लोकांत परंपरेने समजूत चालत आली आहे की रायगडचा किल्लेदार सूर्याजी पिसाळ हा वाईच्या देशमुखीच्या लोभाने इतिकदखानास फितूर झाला आणि त्याने रायगडाचे दरवाजे खानास उघडून देऊन येसूबाई आणि शिवाजी यांस त्याच्या हाती दिले. सूर्याजीचे हे 'कर्तृत्व' इतके प्रसिद्ध आहे की हरामखोर माणसाला 'सूर्याजी पिसाळ' हे नांव देण्याची या महाराष्ट्र देशात वहिवाट पडली आहे. इतिहासात या समजुतीस आधार नाही. इतिहासाचे सत्य एवढेच आहे की सूर्याजीस वाईची देशमुखी हवी होती; व रायगडच्या पाडावात त्याने महत्त्वाची कामगिरी बजावली. पण इतिहास असेही सांगतो की तो रायगडचा किल्लेदार तर नव्हताच, पण रायगडावरचा साधा शिपाई सुद्धा नव्हता. इतिकदखानाची रायगडला रवानगी होण्यापूर्वीच तो मोगलांकडे गेला होता. रायगडला त्याने जी कामगिरी केली त्याबद्दल तिरस्कार तर राहोच पण फारसे वैषम्य सुद्धा खुद्द राजारामालाही वाटले नाही. इतकेच नव्हे, तर राजारामाने आपली अनौरस मुलगी सूर्याजीचा मुलगा पदमसिंग याला देऊन, सूर्याजीस वाईच्या निम्म्या देशमुखीची सनद सुद्धा आपणाकडून करून दिली. औरंगजेबाकडून ती सनद सूर्याजीने पूर्वीच मिळविली होती. इतिहासाची माहिती त्याच्याबद्दल ही अशी आहे. तो रायगडचा किल्लेदार होता व तो फितूर झाला ही केवळ कल्पना आहे. इतिहासातले सत्य आणि जनमानसांतील कल्पना यांचे चमत्कारिक मिश्रण होऊन सूर्याजीची आजची डागाळलेली प्रतिमा तयार झाली आहे. तो फितूर नव्हता तसा देशभक्तही नव्हता. तो मोगलांशी एकनिष्ठ नव्हता व तो मराठ्यांशीही एकनिष्ठ नव्हता. तो फक्त स्वतःच्या स्वार्थाशी निष्ठा बाळगणारा व वतनासाठी कशाचाही विधिनिषेध न बाळगणारा पराकाष्ठेचा स्वार्थी मनुष्य होता, इतकेच.

तो रायगडचा किल्लेदार नव्हता तर वाईजवळच्या ओझर्डेचा पाटील होता. वाईच्या मुख्य देशमुखीशी त्याचा अर्थाअर्थी काही संबंध नव्हता. त्याच्या वाटणीला देशमुखीच्या हक्काचे अर्धे गाव होते. हा सूर्याजी संभाजीच्या कारकीर्दीत सरकारी देण्याचा तगादा मागे लागला आणि देणे द्यावयास पैसा तर नाही म्हणून पळून मोगलांकडे इतिकदखानाकडे जाऊन राहिला. वाईची देशमुखी दत्ताजी केशवजी नाईक पिसाळ याची होती. १६८८ सालाच्या सुमारास ज्याहारखान घोरीने वाई प्रांत जिंकला व दत्ताजीची देशमुखी स्वतःच बळकावली. त्याने औरंगजेबास कळविले की परगणा वाईच्या देशमुखीवर कोणी नाही. आपणांस ती मिळावी. औरंगजेबाने त्यास देशमुखीच्या सनदा दिल्या. तेव्हा दत्ताजी व त्याची आई

पिलाबाई तुळापुरास बादशाहाकडे फिर्याद घेऊन गेली. पण दरबारात पैसा आणि वशिला यांच्याशिवाय काम होत नव्हते. तेथे त्या वेळी सूर्याजी होता. त्याची दत्ताजीने भेट घेतली. सूर्याजीने "वतनाची खबर ऐकोन वतनाकरिता गळा कफणी घालोन दरबारास गेलेती. झुलपुकारखान बहादूर याची भेटी घेऊन आपले वतनाची कुल हकीकत जाहीर करून त्यास वशिला करून···वतनाचे बाबे अर्जी पोचविली." औरंगजेबाचे छावणीत असता वाईच्या देशमुखीची दत्ताजी पिसाळाची तक्रार सूर्याजीने बादशाहापर्यंत पोचविली. त्यावर इतिकदखानाबरोबर सूर्याजीचीही रवानगी रायगडच्या कामगिरीवर बादशाहाने केली.

रायगडच्या कामगिरीवर सूर्याजी आला तो मोगलांतर्फे आला. त्यामुळे तो फितूर होण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. ही गोष्ट येथे आवर्जून लक्षात ठेवली पाहिजे. गड घेण्यात इतर मोगल सैनिकाप्रमाणे सूर्याजीनेही मेहनत केली. त्याने मावळचांची सरदारी केली. गडास मोर्चे लावले. पण त्याची मोठी कामगिरी म्हणजे तो 'दरापती'त पडला. म्हणजे येसूबाई आणि इतिकदखान यांच्या वाटाघाटोत त्याने येसूबाईची खात्री पटविण्यासाठी खानातर्फे मध्यस्थ म्हणून काम केले. दोघांचाही विश्वास असेल तोच मध्यस्थ. खानाचा सूर्याजीवर विश्वास होताच. पण येसूबाईच्याही दृष्टीने जातीचा मराठा पूर्वी स्वराज्यात असलेला ओझडर्याचा अंमलदार म्हणून त्यातल्या त्यात सूर्याजी हाच मोगलांकडे विश्वास वाटण्यासारखा इसम होता. आता तो मोगलांकडे गेला ही वाईट गोष्ट होती पण तसे गेले नव्हते कोण? माने होते, जेधे होते, निंबाळकर होते, घाटगे होते, नव्हते कोण हेच शोधावे लागले असते. सूर्याजीची मध्यस्थाची भूमिका मोठी स्पृहणीय होती असे नाही. पण असेही काम कुणाला तरी करावे लागतेच त्याबद्दल सूर्याजीला दोष देण्यात काही अर्थ नव्हता. रायगडच्या पाडावात सूर्याजीने जी कामगिरी केली ती ही. इतिकदखान त्याच्यावर अतिशय प्रसन्न जाला "तेथें रायगडचे मसलतेमुळे मनसबा करून मावळीयाची सरदारी केली. गडास मोर्चे लावले व दरामतीत पडून खानास गड हस्तगत करून दिला. या गोष्टीकरिता खान मशारनिल्हेची कृपा त्यावरी विशेष जाली."

रायगडची मसलत फत्ते करून सूर्याजी तुळापूरला आला तो वाईच्या देशमुखीचे प्रकरण घेऊन दत्ताची पिसाळ बसलेलाच होता. सूर्याजी आता मोठा वजनदार माणूस झाला होता. त्याने इतिकदखानास सांगून न्याहारखानाची बदली करविली; आणि वाईची देशमुखी सोडविली. पण या कामात असदखान दिवाणापासून ते भालदार चोपदारापर्यंत सर्वांना यथास्थित पैसा चारावा लागला. तो दत्ताजीपाशीं नव्हता. तेव्हा चौरोत्रा पंचोत्रा व्याजाने सावकारांपासून सूर्याजीने एक लाख बावीस हजार सातशे रुपये कर्ज काढले. त्या कर्जाच्या मोबदल्यात दत्ताजी पिसाळाने आपले निम्मे वतन सूर्याजीला करार करून दिले.

पण सूर्याजी एवढयावर थांबला नाही. त्याने दत्ताजीला फसविले. त्याच्या जुन्या सनदा मागून घेतल्या. रुद्रो चिमणाजी कानगो याचेकडून अल्ली आदिलशहाची मोहर असलेले कोरे सनदांचे कागद खरेदी केले. त्यांच्यावर दत्ताजीचा दत्तक बाप केशवजी नाईक पिसाळ व आपला बाप फिरंगोजी पिसाळ यांची नावे लिहिली व याच खऱ्या सनदा म्हणून बादशाही कचेरीत रुजू केल्या. उद्देश काय, तर निम्या देशमुखीवर आपला वडिलोपार्जित हक्क शाबीत व्हावा. दत्ताजीला ही लबाडी कळली पण त्याला काही करता येईना कारण मराठ्यांनी वाईचे ठाणे मारले व त्याला कैद केले. अखेर त्यांचा कौल घेऊन तो देशमुखीचा कारभार पाहू लागला.

दरम्यान इतिकदखानाबरोबर सूर्याजीची रवानगी जिंजीकडे झाली. जिंजीच्या वाटेवर असताना औरंगजेबाने त्याला वाईची देशमुखी दिल्याचे फर्मान पाठविले. "वर्तमान व भावी मुत्सद्दी परगणे वाई सुभे विजापूर यांनी जाणावे की झुल्फिकारखान यांनी विनंती केली की सूर्या वलद फिरंगियाने इस्लामगड (रायगड) घेण्यात तरतूद केली आणि पूर्वीपासून देशमुखीच्या चाकरीवर आहे. नाहरखान याने लटकेच जाहीर केले की देशमुखीचे काम मिळाल्यास परगणा आबाद करितो आणि सनद मिळविली. सूर्यास उमेद आहे की पूर्वीप्रमाणे आता व्हावे आणि हुजूरची सनद मिळावी आणि महाल मजकूर सध्या वैराण असल्याने तो आबाद होईतो पेशकश आदा करण्याची तकलीफ होऊ नये. हा अर्ज समजला. हुकूम मंजूर होऊन पूर्वीप्रमाणे दफ्तरखान्याकडे गेला. आणि नाहरखानाची देशमुखी तगीर होऊन पूर्वीप्रमाणे सूर्याकडे मुकरर झाली. (चिठीचे पाठीवर तपशील इस्लामगड (रायगड) घेण्यात खालाजाद याचबरोबर चाकरी केली.) तेव्हा प्रस्तुतची देशमुखी सूर्याकडे मुकरर समजून तिची कर्तव्ये व हक्क व जाबता व वहिवाट याप्रमाणे त्याच्याकडे आहेत असे समजावे. त्याचे कर्तव्य असे की त्याने रयतेस राजी ठेवून ज्यात सरकारची किफायत, रयतेचे समाधान, शेतीची भरभराट व आबादानी असेल ते करावे. मुकरर झालेल्या रुस्तुमापेक्षा एक दाम जास्त घेऊ नये व जुलुमास आरंभ होऊ देऊ नये."

अशा प्रकारे सूर्याजी बादशहाच्या कृपेने वाईच्या देशमुखीवर आरूढ झाला. पण त्याच्या दुर्दैवाने आता परिस्थिति बदलली होती. जी वाईची देशमुखी औरंगजेबाने कृपावंत होऊन त्याला बहाल केली होती ती आता राजाराम छत्रपतीच्या अख्त्यारात येत होती; कारण मराठ्यांनी वाई परगणा नुकताच जिंकला होता. बादशाही सनदांचा तेथे काहीच उपयोग नव्हता. पण सूर्याजी असा वस्ताद की जिंजीला पोचल्यावर त्याने झुल्फिकारखानाला सोडले आणि थेट राजारामाशी संधान बांधले. राजारामाने त्याच्या बादशाही सनदा पाहून त्याला निम्मे वतन करून दिले आणि दत्ताजी पिसाळ जेव्हा छत्रपतीचा हुकूम न मानता सारेच वतन

...२

खाऊ लागला तेव्हा राजारामाने त्याचे सगळेच वतन जप्त केले. सूर्याजीने राजारामावर इतके वर्चस्व मिळविले की राजाराम दत्ताजी पिसाळाला पाठविलेल्या आज्ञापत्रात म्हणतो त्याप्रमाणे "परगणे मजकूरचे देशमुखीचे वतन तुम्हांपासून न्याहारखानाने घेतले. त्याउपरी सूर्याराऊ पिसाळ याणी त्यासी शर्तीनसी वाद सांगोन सोडविले व मोगलाईमध्ये मबलग पैके खर्च करून दिवाणात सेरणी देऊन फर्मान करून घेतले. अलीकडे स्वामीच्या पायापासीही येकनिष्ठा धरून संनिध येऊन सेवा करीत आहेत. त्यास तुम्ही आज्ञा मान्य केली नाही. सारेच वतन मूठमर्दीने खाता. सूर्याराऊ पिसाळ यासी कथला क ीता. यावरून तुम्हांसी वतनासी समंध नाही ऐसे जाणून या सूर्याराऊ पिसाळ यासच सारे देशमुखीचे वतन करार करून दिले आहे." औरंगजेबाची आणि राजारामाची मर्जी संपादन करणाऱ्या सूर्याजीपाशी स्वार्थसाधनाचे म्हणा की मनुष्यस्वभावाचे म्हणा की वारा येईल तशी पाठ देण्याच्या तंत्राचे म्हणा, अलौकिक ज्ञान असले पाहिजे यात शंका नाही.

आपल्या वतनाच्या दाव्याला बळकटी यावी म्हणून सूर्याजीने आणखी एक 'क्रांतिकारक' पाऊल उचलले. राजारामाची नाटकशाळा सगुणाबाई हिच्यापासून झालेली अनौरस मुलगी, राजा कर्णाची बहीण होती. ती त्याने आपला औरस मुलगा पदमसिंग याला करून घेतली. खानदानी मराठ्याने आपल्या औरस मुलाला अनौरस मुलगी – मग ती प्रत्यक्ष छत्रपतीची का असेना करून घेणे हे केवळ कल्पनातीत होते. पण असे करिताना सामाजिक सुधारणा करण्याचा कसलाही अभिनिवेश सूर्याजीपाशी नव्हता. तेवढी त्या बिचाऱ्याची ऐपतच नव्हती. केवळ आपले वतन राखण्यासाठी छत्रपतीचा तो व्याही होऊ पाहात होता. मग त्यात खानदान बुडाले तरी बेहेत्तर. या संबंधामुळेच राजारामानें सूर्याजीचा अभिमान धरला असे दत्ताजी पिसाळ स्पष्ट म्हणतो. " त्या उपरी राजश्री कैलासवासी स्वामीसी शरीर संबंध करावा असे ठरून राजश्री राजा कर्ण याची बहीण आपल्या पुत्रास द्यावी ऐसा निश्चय करून मागणी घातली. ते गोष्टीवरून राजश्री कैलासवासी स्वामींनी त्याचा अभिमान धरून आपले निम्मे वतन काढून सूर्याजी पिसाळ यास दिले." यावरून एक गोष्ट आपोआपच सिद्ध होते. सूर्याजीने रायगडाला फितुरी करून येसूबाईचा व शिवाजीचा घात केला नाही. नाही तर राजारामाने त्याच्या मुलाला आपली मुलगी कधी तरी दिली असती काय ?

राजारामाच्या कारकिर्दीत दत्ताजीचे काही एक चालले नाही कारण छत्रपतीचा व्याही झालेला सूर्याजी शेर होऊन बसला होता; व वाईचे निम्मे वतन साखसुरत खात होता. पण ताराबाईच्या कारकिर्दीत पारडे फिरले. दत्ताजीची फिर्याद ऐकून तिने सूर्याजीचे वतन रद्द केले व दत्ताजीस दिले. मग सूर्याजीचा मूळ स्वभाव प्रकट झाला. तो मोगलांकडे परत गेला. त्याने त्यांना चंदनवंदन व

नांदगिरी हे किल्ले घेऊन दिले. त्याने वाईला इस्माइलखान मखा फौजदार आणिला पांडवगड घेऊन देण्याचे आश्वासन दिले पण वाईची देशमुखी मिळण्याची अट घातली. इस्माइलखानाने दत्ताजीला तुरुंगात घातले व सूर्याजीला हवे तसे वाटणीपत्र त्याच्याकडून लिहून घेतले, तेव्हाच त्याला सोडले. पण दत्ताजी वाईहून निघाला तो थेट विशाळगडला औरंगजेब वेढा घालून बसला होता त्याच्याकडे गेला. तेव्हा औरंगजेबाने दत्ताजीचे म्हणणे प्रमाण मानून इस्माइलखान मखाची वाईहून बदली केली. सूर्याजी सपशेल खोटा ठरला. तेव्हा औरंगजेबाला प्रसन्न करण्याचा हुकुमी उपाय म्हणजे सूर्याजी मुसलमान सुद्धा झाला! पण औरंगजेबाची न्यायबुद्धि इतकी प्रखर की मुसलमान होऊनही सूर्याजीला त्याने वतन दिले नाही. –"मग सूर्याजी मागती लष्करात गेला. परंतु यत्न न चाले. शेवटी मुसलमान जाला तरी पातशाहापावेतो झुटासारिखे जाहीर झाले. साहास केलियाचे सार्थक न जाले." आपल्या धर्मान्तराची सूर्याजीला काडीचीही खंत वाटली नाही. उलट धनाजी जाधवास लिहिलेल्या का पत्रात तो बढाई मारतो– मी काही जाधव यादव नव्हे. तुम्ही कऱ्हाडची देशमुखी दहा हजार रुपयांची घेतली. ऐसा आपण नव्हे. आपण आहे तो दत्ताजी नाईकाचा तुरा आहे. तुरुक हांडीस देशमुखी पडली होती. त्यास दरबार खर्च लाखोलाख रुपये खर्च करून एक जातीच्या दोन जाती पाहोन देशमुखी सोडविली."

औरंगजेबाने नकार देऊनही सूर्याजी स्वस्थ बसला नाही. त्याने दत्ताजीला उपद्रव देणे चालूच केले. शाहूच्या कारकिर्दीत हा झगडा पुढे चालूच राहिला. एकदा तर थोरातांच्या साहाय्याने सूर्याजीने दत्ताजीचा वाडा जाळून टाकला. दोघेही आपल्या फिर्यादी घेऊन शाहूकडे जात राहिले. त्यात शाहूने एकदा दत्ताजीला सारे वतन दिले, नंतर ते खालसा करून सूर्याजीला दिले. नंतर कुणालाच न देता अनामत म्हणजे सरकारजमा करून टाकले. तेव्हा मात्र दोघेही वादीप्रतिवादी ताळ्यावर आले; आणि शाहूने प्रत्येकाला देशमुखीचे निम्मे वतन दिले ते मुकाट्याने खाऊ लागले. वीस वर्षांनंतर अखेर या प्रकरणाचा निकाल लागला. दत्ताजी पिसाळ म्हणतो– "शेवटी महाराज राजश्री शाहू छत्रपति साहेबास देशमुखी दिली. तुम्ही आम्ही वतनास तुटलो. महाराज साहेबांचे मुतालिक येऊन वतनावरी बैसोन वतन खाऊ लागले. वतन गेले ऐसे जाहले. मग तुम्ही आम्ही बैसोन विचार केला, जे तुम्ही (आम्ही) एक होऊन वतन सोडून निम्मे निम्मे खावे. हा कागद इमान करून तुम्हांस लिहून दिला आहे. या उपरी तुम्हासी बेइमानी करणार नाही." रायगडच्या पाडावानंतर सूर्याजी चौसष्ट वर्षे हयात होता. १७५३ सालच्या एका महजरावर दत्ताजी केशवजीच्या बरोबर परगणे वाईचा देशमुख म्हणून सूर्याजीची स्वाक्षरी आहे.

सूर्याजी हा अशा प्रकारचा माणूस होता. वतन हे त्याचे सर्वस्व होते. त्यापुढे त्याला कुळाची, शीलाची, धर्माची कशाचीही चाड नव्हती. त्याला हिंदु व मुसलमान, राजाराम व औरंगजेब सारे सारखे होते. तो मराठ्यांच्याही पक्षाचा नव्हता व मोगलांच्याही पक्षाचा नव्हता. वतन हाच त्याचा पक्ष व स्वार्थ हाच त्याचा परमेश्वर होता. पण वतनासाठी जीव टाकणारे मराठे त्या वेळी कितीतरी होते. त्यातलाच एक सूर्याजी. तो देशभक्त नव्हता व धर्मनिष्ठ नव्हता हे त्याचे चरित्रच बोलते आहे. पण यापुढे जाऊन तो रायगडचा किल्लेदार होता, तो फितूर झाला, त्याने येसूबाईचा, शिवाजीचा व मराठ्यांचा घात केला, असे आरोप त्याच्यावर केले जातात. ते इतिहासाला कसे धरून नाहीत हे येथपर्यंत दिलेल्या सूर्याजीच्या वृत्तांतावरून लक्षात येईलच. देशद्रोहाचेही विपरीत वैभव असते. ते वैभव पेलावे एवढा बकूब सूर्याजीचा नाही. रायगडचा किल्लेदार चांगोजी काटकर होता. हवालदार येसाजी कंक होता. सूर्याजी हा इतिकदखानातर्फे येसूबाईशी बोलणी करणारा फक्त मध्यस्थ होता. रायगड येसूबाईने मोगलांना दिला तो सारासार विचार करून. कुणाच्या फितुरीमुळे नव्हे. सूर्याजीच्या तर नव्हेच नव्हे.

ते कसेही असो. अखेर रायगडला इतिकदखानाचे पाय लागले. गरुडाच्या घरट्यावर शेवटी गिधाडांनी झडप घातली. रायगड ही शिवछत्रपतींची तख्ताची जागा आणि मराठ्यांच्या प्रतिष्ठेचा सर्वोच्च मानबिंदु. त्याचे दुर्गमपण ध्यानी घेऊनच महाराजांनी त्याला राजधानीचा मान दिला होता. " गड बहुत चखोट-कडे तासिल्याप्रमाणे. दीड गाव उंच. पर्जन्य काळी कडियावर गवत उगवत नाही. दौलताबादही पृथ्वीवर चखोटगड खरा, पण तो उंचीने थोडका. दशगुणी रायगड उंच. महाराज रायगडावर बहुत संतुष्ट झाले व बोलिले, " तख्तास जागा हाच गड करावा." गडाचे मूळचे दुर्लंघ्यपण, त्यावर परोपरीची झाडी मुद्दाम लावून आणि जंगल वाढवून, महाराजांनी अधिकच दुर्लंघ्य केले होते. कारण, " गडाची राखण म्हणजे कळारण्याची झाडी. ते झाडी प्रयत्ने वाढवावी. त्यामध्यें एक काठीही तोडों न द्यावी. बलकुबलीत त्या झाडीमध्यें हशम बंदुके घालावया कारणाजोगें असों द्यावें. महाद्वाराव्यतिरिक्त रायगडाला मुद्दाम वाघ दरवाजा करवून घेतला, कारण आणीबाणीच्या प्रसंगी एकच दरवाजा गडास असणे बहुत दोषाचें आहे. दौलताबाद एवढा दुर्लंघ्य पण दरवाजा एक; तो खिलजीने काबीज केल्यावर रामदेवराव यादवाला शरण येण्याविना गत्यंतर राहिले नाही म्हणून. "किल्ल्यास एक दरवाजा थोर अयब आहे. याकरिता गड पाहून एक दोन तीन दरवाजे तशाच चोरदिंडचा करून ठेवाव्यात." वाघ दरवाजा खाली सरळ ताशीव कडा आठशें फूट तुटलेला आहे. इतका सरळ की " वरून बुरकुलीभर तेल ओता आणि खाली

ओंजळ धरून भरून घ्या. " या कड्याच्या माथ्यावर असलेल्या वाघ दरवाजातून तर पाळण्यात बसून राजाराम खाली उतरला होता व इतिकदखानाच्या वेढ्यातून निसटला होता. जग पालथे घातलेले शहाणे इंग्रज जेव्हा जेव्हा गडावर आले तेव्हा तेव्हा त्यांनी त्याची मुक्तकंठाने स्तुतीच केली. " किल्ला इतका अभेद्य बनविला आहे की अन्नाचा पुरवठा भरपूर असल्यास अल्प शिबंदीच्या साह्याने तो सर्व जगाविरुद्ध लढू शकेल. पाण्यासाठी मोठे तलाव असून ते पावसाळ्यात भरल्यावर पाणी वर्षभर पुरून उरेल. " " टेकडी बहुत उंच आहे. वर प्रवेश होणे कठीण आहे. गडावर लहानमोठ्या जवळ जवळ तीनशे इमारती उभ्या आहेत." " रायगड हा हिंदुस्थानातला जिब्राल्टर आहे ! " तो हिंदुस्थानचा जिब्राल्टर आणि शिवछत्रपतींची तख्ताची जागा आज दैवाच्या केवळ विपरीत गतीने इतिकदखानाच्या तावडीत सापडली होती.

वस्तुतः रायगडची सर्वात मोठी लूट म्हणजे रायगड हीच होती. पण याशिवाय इतिकदखानाला केवढीतरी लूट रायगडावर मिळाली. शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकाच्या वेळेस मुद्दाम तयार करवून घेतलेले सिंहासन तेथे होते. महाराजांच्या रत्नशाळेचे अधिकारी यांनी चार महिने खपून ते तयार केले होते. त्या सिंहासनाला बत्तीस मण सोने लागले होते, त्यावर बत्तीस चित्रे होती, आणि त्यास तेजस्वी रत्ने जडविली होती. राज्याभिषेकाच्या वेळी आलेला इंग्रज वकील हेन्री ऑक्झेंडेन याने त्याचे वर्णन केले होते की, " सिंहासनाच्या दोन्ही बाजूंना सुवर्णांकित भाल्याच्या टोकावर अनेक अधिकारनिदर्शक व राजसत्तेची द्योतक चिन्हे मी पाहिली. उजव्या हाताला दोन मोठी, मोठ्या दातांच्या मत्स्यांची सुवर्णाची शिरे होती. डाव्या हातास अनेक अश्वपुच्छे व एका मूल्यवान् भाल्याच्या टोकावर सोन्याच्या तराजूंची पारडी न्यायचिन्ह म्हणून तळपत होती. राज्याभिषेकाच्या वेळेस या सिंहासनाला उजवी घालून, त्याला पाय न लावता, उजवा गुडघा त्यावर टेकून व पूर्वाभिमुख होऊन महाराज त्यावर आरूढ झाले होते. ते सिंहासन इतिकदखानाने घणाचे घाव घालून फोडले.

प्रतापगडावर अफझुलखानाचा पाडाव करून महाराजांनी जिंकून आणिलेली त्यांची तलवार होती. त्याचप्रमाणे महाराजांची भवानी तलवारही होती. कुडाळच्या स्वारीत गोवलेकर सावंताकडून हा दुधारी तलवार महाराजांनी तीनशे होनांस घेतली. या तलवारीच्या घावाखाली औरंगजेबाच्या मामाची बोटे त्यांनी तोडली होती, हीच तलवार गोवास्वारीच्या वेळेस मनूचीला दाखवून संभाजी गर्वाने म्हणाला होता. " माझ्याविरुद्ध बंड करणाऱ्या अधिकाऱ्यांची मुंडकी मी याच तलवारीने उडविली होती." त्या दोन्ही तलवारी इतिकदखानाने ताब्यात घेतल्या हे सांगणे नकोच.

रायगडावर शिवाजी महाराजांनी नाना प्रकारच्या संपत्तीचा संग्रह मोठ्या आस्थेने केलेला होता. ती संपत्ति खरोखर 'अगण्य' होती. कापड-चोपड, धान्य-धुन्य यांचा हिशेब एक वेळ बाजूला ठेवला तरी इतर संपत्ति थक्क करणारी होती. नऊ कोट रुपयांची सोन्याची नाणी, एक्कावन्न हजार तोळे सोने, दोनशे तोळे माणके, एक हजार तोळे मोत्ये, पांचशे तोळे हिरे, तीस हजार तलवारी, चाळीस हजार धनुष्ये, अठरा लक्ष बाण, अशी विविध तऱ्हेची अलोट संपत्ति रायगडावर होती. संभाजीची कारकीर्द धामधुमीतच गेली हे खरे, पण अजूनही रायगड हे संपत्तीचे भांडार होते. ही सारी संपत्ति इतिकदखानाला मिळाली. खानाचे लष्कर लुटीने अक्षरशः कुबेर झाले.

सोन्यारुप्याच्या लुटीनंतर माणसे. रायगडावर इतिकदखानाने माणसेही मोठ्या तोलाची कैद केली. शिवाजी महाराजांची बायको सकवारबाई ही रायगडावर होती, ती गायकवाडाकडची असून बत्तीस वर्षांपूर्वी महाराजांशी तिचे लग्न झाले होते.महाराजांची हयात असलेली राणी एवढीच होती. त्यानंतर येसूबाई व युवराज शिवाजी ही राजकुटुंबातली महत्त्वाचीं माणसे होती. राजारामाची बायको जानकीबाई, तिचे दोघे भाऊ जगजीवन व खंडेराव हेही रायगडावर होते. नेसरीच्या लढाईत धारातीर्थी पतन पावलेले महाराजांचे सेनापति प्रतापराव गुजर यांची ही मुले होती. राजाराम रायगडावरून निसटला तेव्हा त्याच्याबरोबर त्याच्या दोन बायका ताराबाई व राजसबाई होत्या. प्रतापगडाला तो असताना जानकीबाई व शिवाजी यास आणण्यासाठी म्हणून मुद्दाम त्याने गिरजोजी यादवाला रवाना केले. पण रायगडचा किल्लेदार चांगोजी काटकर याने त्याला दाद दिली नाही. जानकीबाई रायगडावरच राहिली. संभाजीच्या नाटकशाळेचे मुलगे मदनसिंग व माधवसिंग यांचीही गणना राजकुटुंबातच होत होती. ही सर्व मंडळी खानाने कैद केली हे सांगणे नकोच. याशिवाय जोत्याजी केसरकर, मोरोपंत सबनीस, गदाधर प्रल्हाद प्रतिनिधि, विठ्ठल विश्वनाथ घैसास वगैरे कारकून शागीर्द पेशाची हजार पांचशे माणसेही कैद करण्यात आली. २३ नोव्हेंबर रोजी इतिकदखानाने हे सर्व कैदी औरंगजेबापुढे तुळापूर येथे हजर केले.

औरंगजेबाचे वर्णन करताना मनूचीने म्हटले आहे की आपल्या मालकाशी फितूर होऊन जे त्याला मिळत, त्या फितुरांना त्याच्या पूर्वजासकट आज ना उद्या देहांतशासन देण्याचा त्याचा शिरस्ता असे. मग ते आजे असोत की पणजे असोत की बाप असोत की चुलते असोत. का की एका धन्याशी हरामखोरी करून त्याने जसा त्याचा गळा आज कापला, तसा आपला उद्या कापू नये. पण या फितुरांचे जे वंशज असतील, मग ते मुले असोत की नातू असोत, त्यांना मात्र आपल्या पदरी आश्रय देऊन तो मोठ्या ममतेने सांभाळ करी व त्यांच्या गुणाप्रमाणे त्यांचे

ऊर्जितही करी. जी फितुरांबद्दल त्याची वागण्याची रीत होती, तीच शत्रूंबद्दलही काही अपवाद वजा करता होती. कविकलशाला त्याने हाल हाल करून ठार मारले पण त्याच्या मुलाला आपल्या आश्रयाखाली घेतले. रायगडला वेढा घालण्यापूर्वी त्याच्याकडून व महादजी नाईक निंबाळकर याच्याकडून रायगडचा मेणाचा नमुना औरंगजेबाने करवून घेतला. संभाजीचा मुलगा शिवाजी हा या वेळी सात वर्षांचा होता. औरंगजेबाने त्याला सात हजारी आणि सात हजार स्वारांचा मन्सबदार केले. त्याला 'राजा' हा किताब, खिलतीची वस्त्रे, रत्नजडित खंजीर, आरसी, घोडा, हत्ती, ध्वज, नगारे, नौबतीचा मान देण्यात आला. मुलगा लहान म्हणून त्याचा सर्व कारभार येसूबाईच्या स्वाधीन करण्यात आला, इतकेच नव्हे, तर औरंगजेबाने तिला स्वतंत्र शिक्का करून दिला." येसूबाई वालिदा इ. शाहूराजा इहिदे." येसूबाई, सकवारबाई इत्यादि राजस्त्रियांना औरंगजेबाने पराकाष्ठेच्या अदबीने वागविले. संभाजीच्या दासीपुत्रांना मन्सबी दिल्या. त्या सर्वांचे तंबू आपल्या निवासस्थानाच्या आवारात देण्यात यावे अशी आज्ञा केली. वझीर आसदखान याच्या तळाजवळच येसूबाईच्या तळाचा बाजार बसविण्यात आला. या सर्व मंडळींना वार्षिक वेतने बांधून दिली.

कथा अशी आहे की, भेट झाल्यावर शिवाजीला औरंगजेबाने त्याचे नांव विचारले. ते 'शिवाजी' आहे असे कळल्यावर तो थट्टेने म्हणाला, तुझा आजा शिवाजी हा चोर होता. पण तू साव आहेस! तेव्हापासून त्या नावाचा अपभ्रंश होऊन 'शाहू' या नावाने संभाजीचा मुलगा शिवाजी ओळखला जाऊ लागला. कथा असली तरी त्यात सत्याचा अंश आहेच. साव असलेल्या, निष्पाप असलेल्या या मुलाला चांगुलपणा दाखवून वैराची धार बोथट करण्याचा व आपणांस अनुकूल करण्याचा शहाणा स्वार्थ औरंगजेबाच्या या औदार्यात नसेल असे कसे म्हणावे? पण तरीही आपल्या हाडवैऱ्याच्या मुलाबाळांना औदार्य दाखविण्याची संस्कृति औरंगजेबापाशी होती हे नाकारता येत नाही. "लेकरा, तुला दगा करावयाचा बेत होता. औरंगजेबाचा आपला दावा" असे शिवाजी महाराज संभाजीला म्हणाले ते खरेच होते. असे असता ह्या सर्वांचा सर्वनाश करणे शक्य असता औरंगजेबाने ते केले नाही, व "याचे अबरूस व जिवास कदापि धक्का लागू देणार नाही." असे कुराण उचलून इतिकदखानाने येसूबाईला वचन दिले होते ते तंतोतंत पाळले ही गोष्ट औरंगजेबास अत्यंत भूषणास्पद आहे यांत शंका नाही.

इतिकदखान हा रायगड फत्ते करणारा बहाद्दर वीर. यापूर्वी संभाजीच्या कारकिर्दीत गाजीउद्दीन फिरोजजंग याने रायगडवर चालून जाण्याचा प्रयत्न केला होता. फिरोजजंग हा काही सामान्य योद्धा नव्हे. पण रायगडपर्यंत तो जाऊ शकला नाही. कविकलशाने त्याला गांगोलीहूनच परतवून लावले. तो मरा-

चांची राजधानी असलेला रायगड इतिकदखानाने सर केला. इतकेच नव्हे तर त्याने संभाजीची बायको व मुलगा बंदिवान म्हणून बादशहापुढे हाजीर केले. त्या इतिकदखानाचे कौतुक किती करावे ? औरंगजेबाने त्याला झुल्फिकारखान बहादुर' असा किताब दिला. त्याला तीन हजारी मन्सबदार केले. खिलतीची वस्त्रे, घोडा, धनुष्यबाण आणि रोख तीस हजार रुपये देऊन त्याचा गौरव केला. रायगडाच्या पाडावाने औरंगजेबाला धन्य धन्य वाटले.

पण एखादे सुंदर शरीर कर्करोगाने पोखरले जात असावे त्याप्रमाणे या धन्यतेलाही एक विफलता पोखरत होती. राजाराम निसटून जिंजीस सुखरूप पोचला होता. ज्याच्या गाफीलपणामुळे किंवा बेइमानीपणामुळे राजाराम निसटल त्या सर्वांवर औरंगजेब अतिशय संतापला होता.

राजाराम रायगडावरून निसटला. रायगडच्या जवळ असलेल्या प्रतापगडाहूनही तो पसार झाला. तेव्हा रायगडला वेढा घालून बसलेल्या इतिकदखानाला औरंगजेबाने कडक शब्दांत ठपका दिला. त्यावर इतिकदखानाने अक्षरशः गयावया करून लिहिले– "मी सर्व प्रकारे अपराधी आहे. केवळ स्वामीनिष्ठेच्या भावनेने मी क्षणाचीही विश्रांति न घेता रात्रंदिवस काम करीत आहे. बादशहांनी मला दोष दिला हे माझे दुर्दैव होय. मी जावळीला गेलो नाही. मी प्रतापगडाला वेढा घातला नाही. मी या कामासाठी फक्त फतेहजंगखानाला पाठविले म्हणून हा ठपका आहे. मी असे कां केले याची कारणे सांगतो. तो लबाड शत्रु (राजाराम) हा रायरीहून निघाला. तो एका ठिकाणी असा टिकून राहीना. तो डोंगराळ भागांतून आणि रानावनांतून भटकत निघून गेला. तो पुन्हा परत इकडे येईल अशी बातमी आली होती. न जाणो तो पुन्हा रायरीकडे आणि आम्ही जिंकून घेतलेल्या मुलखाकडे यावयाचा. जाणकारांनी सल्ला दिला की राजारामाच्या पाठलागावर निघण्याच्या ऐवजी आपण या ठिकाणीच तळ देऊन राहाणे हे बरे. आता त्याचा पाठलाग होतो आहे. मी स्वतः त्याच्या मागे जाण्याचा प्रयत्न करीन. पण जावळीचा भाग किती डोंगराळ आहे आणि वाट किती अवघड आहे हे स्पष्टच आहे. खरे पाहिले तर न्याहारखान हा तेथून जवळच आहे. पारघाटावरून कोकणात उतरण्याची त्याने तयारी केली. पण अद्यापपर्यंत त्याला तसे करणे जमले नाही.... शत्रु (राजाराम) हा घाबरलेला आहे. तो एका ठिकाणी असा स्वतःला कोंडून घेत नाही. तो या किल्ल्यांतून त्या किल्ल्यात आणि या प्रदेशांतून त्या प्रदेशात असा भटकत असतो. तो प्रतापगडातही टिकून राहिला नाही. तेथून तो वरघाटावरील वासोटा या किल्ल्याकडे निघून गेला. त्याला आम्ही रायरीच्या किल्ल्यातून बाहेर काढला आहे. त्याचे सरदार आणि त्याची प्रजा यांना त्याच्यापासून आम्ही वेगळे केले आहे. आम्ही त्याच्या सैन्यांत फूट पाडली आहे. तो (राजाराम) आता वाचू शकेल असे वाटत नाही."

इतिकदखानाच्या या पत्राने औरंगजेबाचे कितपत समाधान झाले हे कळण्यास मार्ग नाही. पण राजाराम पन्हाळ्याहून निसटला, इतकेच नव्हे तर मुद्दाम त्याच्या पाठलागावर रवाना केलेल्या सय्यद अब्दुल्लाखानाच्या तावडीतून तो सुटला आणि हे सर्व राजाराम कर्नाटकात जाणार या वार्तेचे चौघडे चार महिने सगळीकडे झडत असताना! उघडच आहे की औरंगजेबाची सय्यद अब्दुल्लावर गैरमर्जी झाली. त्याने त्याची विजापूरच्या सुभेदारीवरून बदली केली. त्याचा मुलगा वजीहुद्दीन हा विजापूरचा किल्लेदार होता. फौजदारखान हा विजापूरचा कोतवाल होता. त्या दोघांच्या मनसबी औरंगजेबाने कमी केल्या. इतकेच नव्हे तर वड्याचे तेल वांग्यावर काढावे या न्यायाने अब्दुल्लाखानाने तुंगभद्रेच्या तीरावर पकडलेल्या राजारामाच्या ऐंशी साथीदारांना औरंगजेबाने ठार मारले.

बिदनूरची राणी चेन्नम्मा हिने राजारामाला आपल्या राज्यात लपवून ठेविले. औरंगजेबाने मागणी केली की, 'राजाराम हा तुमच्याजवळ आला आहे असे कळते. तरी तुम्ही त्याला तावडतोब अब्दुल्लाखानाच्या सोबतीने आमच्याकडे रवाना करावे.' पण राणीने कळविले की, 'राजाराम येथे आलेला नाही. सय्यद अब्दुल्लाखानाने रूपाजी भोसले व इतर मराठे यांना कैद केले आहे. त्या माणसांत राजाराम असावा.' राणी असे उत्तर देऊनच थांबली नाही. राजारामाला तिने आपली माणसे बरोबर देऊन बोरेनेदेहळ्ळी, अदुवळ्ळी, कलास, खाण्डच आणि वसुधारा या मार्गाने जिंजीस सुखरूप पोचविले. राणीच्या या कपटनीतीमुळे औरंगजेबाच्या ओठाशी नेलेला यशाचा पेला ठोकरला गेला. कारण, राजारामाला बंदोबस्ताने आणण्यासाठी त्याने हमीनुद्दीनखानाची रवानगी सुद्धा केली होती. राणीचे राज्य उद्ध्वस्त करण्यासाठी त्याने जाननिसारखान व शहाजादा आझम यांस रवाना केले.

पण हे सर्व उपाय 'बैल गेला आणि झोपा केला' या न्यायाने पक्षी पिंजऱ्यांतून उडाल्यानंतर आदळआपट करण्यासारखे होते. राजाराम जिंजीस सुखरूप होता. रायगडाप्रमाणे जिंजी आणि संभाजीप्रमाणे राजाराम हाती आल्याशिवाय औरंगजेबाच्या जिवाला स्वस्थता कोठून? रायगडाहून येऊन झुल्फिकारखानाला आठवडा होतो न होतो तोंच ३० नोव्हेंबर १६८९ रोजी औरंगजेबाने त्यास जिंजीवर रवाना केले. मार्गात इस्माइलखान मखा, याचप्पा नायक इत्यादि राजारामाला मिळालेले पूर्वीचे गोवळकोंड्याचे सरदार खानावर चालून आले. त्यांना मागे रेटीत रेटीत अखेर झुल्फिकारखान जिंजीस पोचला, तेव्हा १६९० सालचा सप्टेंबर महिना उजाडला होता. म्हणजे तुळापूरहून निघाल्यापासून दहा महिन्यांनी झुल्फिकारखानाने जिंजीस वेढा घातला.

□ □

# ( ३ )

आपल्या अखेरच्या दिवसांत औरंगजेब नेहमी एका कवीच्या ओळी म्हणत असे. "एका क्षणात, एका दमात, निमिषमात्रात जगाची उलथापालथ होते." त्या ओळींची प्रचिती यावी अशाच घटना गेल्या दहा महिन्यांत महाराष्ट्रात घडल्या. वस्तुतः दहा महिन्यांचा काल म्हणजे राष्ट्राच्या जीवनात एका क्षणाइतका किंवा एका निमिषाइतकाच म्हणावा लागेल. पण त्या अल्पावधीत महाराष्ट्रात खरोखर इकडचे जग तिकडे होऊन गेले.

संभाजीच्या मृत्यूपासून पुढचे आठ महिने राजकीय कुंडलीत महाराष्ट्राचे ग्रह पराकाष्ठेचे नीचीचे होते. त्यांचा एक छत्रपति औरंगजेबाने हालहाल करून ठार मारला होता. दुसरा महाराष्ट्राच्या बाहेर जिंजीकडे निर्वासित होऊन पळून गेला होता. त्याची राजधानी मोगलांनी सर केली होती. त्याची राजमाता व युवराज औरंगजेबाने आपल्या 'जाळीत' ठेवले होते. तोरणा, राजगड, पुरंदर, प्रतापगड सिंहगड, पन्हाळा, त्रिंबक असे नामांकित किल्ले मोगलांनी जिंकले होते. त्यांचे; वतनदार मोगलांना फितूर झाले होते. रामचंद्रपंत अमात्याने म्हटल्याप्रमाणे "त्या समयी इकडे गलिमाची धामधूम बहूत होऊन कुल देशदुर्ग हस्तगत केली होती ती गेली. राज्यामध्ये काही अर्थ उरला नाही. कुल मराठे यांनी इमान खत्ता करून गलिमाकडे गेले."

पण नोव्हेंबर १६८९ मध्ये जेव्हा आपत्तींची पराकाष्ठा झाली, राजधानी गेली, राजमाता गेली, राजपुत्र गेला तेव्हापासूनच या भीषण परिस्थितीला कलाटणी मिळाली. जिंजीस जाताना महाराष्ट्रातील व्यवस्था राजारामाने रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण, धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे या चौघांकडे सोपविली होती. शंकराजी नारायणाच्या शब्दांत "स्वामीच्या पुण्यप्रतापेकरून देशदुर्ग काबीज होतील तेथपर्यंत स्वामींनी राज्यभार आमच्या स्वाधीन केलाच आहे. सांप्रत स्वामींनी आम्हांस सुरनिशीचा कार्यभाग सांगितला. रायगडापासून कोकणपट्टी स्वाधीन केली. रामचंद्रपंतास मुज्मूचा कारभार सांगून त्यांच्या स्वाधीन कऱ्हाडापासून पलीकडे वरघाट गोकर्णपावेतोंची कामगिरी केली. लष्कर दुतर्फा वाटून दिले. धनाजी जाधव यांनी आम्हाकडे असावे, संताजी घोरपडे यांनी रामचंद्रपंताकडे असावे ऐसा तह केला. या चौघांत रामचंद्रपंत हा वयाने व अनुभवाने ज्येष्ठ होता; त्याला राजारामाने 'हुकुमत पन्हा' हा किताब देऊन

अधिकारानेही श्रेष्ठ केले. ते जे हुकूम करतील ते छत्रपतींनी (ही) मोडू नयेत असे केले." म्हणून सर्व सूत्रधार रामचंद्रपंत अमात्य हाच होता. त्याने यापुढील धोरण ठरविले ते ही की "पोख्तीच्या जमावे स्वारी शिकारी करून जे गड गनिमाने घेतले ते फिरावून हस्तगत करणे. गनिमाची ठाणी जाग जागा असतील ते कुल मारून काढणे" रामचंद्रपंतांचे हे धोरण कल्पनातीत यशस्वी झाले. जे मराठे सहा महिन्यांपूर्वी हताश आणि दिङमूढ झाले होते ते मोगलांवर प्रत्याघात करू लागले. औरंगजेबाने या मराठी राष्ट्राच्या वृक्षावर कुऱ्हाडीचे घावामागून घाव घेतले. त्याला वाटले की हा वृक्ष जमीनदोस्त झाला. पण " की तोडिला तरू फुटे आणखी भराने" या न्यायाने जेवढे घाव घालावे तेवढा हा अमृत वृक्ष बहरतच राहिला. औरंगजेबाचा पूर्वज जहांगीर याने अलाहाबादचा अक्षयवट असाच एकदा जमीनदोस्त केला होता. पण कुऱ्हाडीच्या घावांना व दिल्लीश्वराच्या आज्ञेला न जुमानता तो अक्षयवट पुन्हा तरारून फुलला मराठ्यांचे राष्ट्र हा एक अक्षयवट आहे ते मरत नाही व ते मोडत नाही अशी कटु प्रचिती केवळ या दहा महिन्यात औरंगजेबाला आली.

मराठ्यांच्या या तेजस्वी प्रतिकारपर्वाला रायगड पडला त्याच नोव्हेंबरात सुरुवात झाली. कोल्हापूर व पन्हाळ्याला शेख निजाम ऊर्फ मुकर्बखान वेढा घालून बसला होता. त्याच्यावर संताजी घोरपडे व धनाजी जाधव चालून गेले. एक प्रहर व चार घटिकापर्यंत लढाई फार निकराची झाली. मराठ्यांचे सातशे व मोगलांचे चारशे सैनिक ठार झाले. खुद्द शेख निजाम व त्याचा मुलगा खाने आलम यांना भाल्याच्या व तलवारीच्या जबर जखमा झाल्या. त्यांचे घोडे, हत्ती, द्रव्य मराठ्यांनी हिरावून घेतले. मराठे हटेनात तेव्हा कसाबसा जीव वाचवून शेख निजाम कोल्हापूरला पळून गेला. औरंगजेबाला जेव्हा हे वृत्त समजले तेव्हा शेख निजाम व त्याचा मुलगा यांच्या जखमा बऱ्या करण्यासाठी मुद्दाम सेबास्टियन नावाचा फिरंगी डॉक्टर त्याने पाठविला. या शेख निजामाने संभाजीला संगमेश्वरावर छापा घालून पकडले; त्याचा मुलगा इखलासखान याने संभाजीला केस धरून ओढीत शेख निजामाच्या हत्तीपाशी आणले. या कामगिरीबद्दल औरंगजेबाने बापाला 'खानजमान फत्तेइजंग' व मुलाला 'खानेआलम' असा किताब दिला. त्या संग्रमात संताजीचा बाप मालोजी घोरपडे धारातीर्थी पतन पावला. त्याचा सूड संताजीने अशा प्रकारे उगविला.

संगमेश्वरी संभाजीवर छापा घालून पकडल्यानंतर मोगलांनी तेथे लष्करी ठाणे स्थापिले होते. संभाजी उतरत असे तो सरदेसायांचा "वाडा जाळला व गावातील देवळे फोडिली. देव बाटविले. याप्रमाणे महार्णव जाले." संताजीने संभाजीला

हाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था पुणे
(डे.व्ह ट्रा. सोसायटी: पुणे)
१३३ सदाशिव पेठ, पुणे-३०.



पकडणाऱ्या शेख निजामीचा समाचार घेतला त्याचवेळी शंकराजी नारायणान संगमेश्वरावर हल्ला करून तेथील मोगली ठाणे मारून काढले. संगमेश्वराच्या जवळ सात कोसांवर असलेल्या शृंगारपूर येथे लुटालूट करणाऱ्या चोरट्यांचा बंदोबस्त केला. तेथून सोळा मैलांवर ईशान्येस असलेला गुणवंतगड त्याने मोगलांपासून सर केला. नंतर पाटणच्या पश्चिमेस असलेला सुंदरगड, साताऱ्याच्या दक्षिणेस पंचवीस मैलांवर असलेला दंतपाटण त्याने काबीज केले व वसंतगडास तो गेला.

१६८७ च्या ऑक्टोबरात मोगलांनी वाईचे ठाणे जिंकले. प्रतापगडही त्यांनी काबीज केला होता. या वेळी रामचंद्रपंत अमात्य, संताजी घोरपडे, धनाजी जाधव व शंकराजी नारायण यांनी प्रतापगड काबीज तर केलाच पण वाईचे ठाणेही परत जिंकून घेतले. वाईला या वेळी खिदमततलबखान हा ठाणेदार होता. लढाई निकराची झाली. मोगलांनी लढाई शर्थीची केली पण शेवटी जय मराठ्यांचा झाला आणि ते खिदमततलबखान यास कैद करून घेऊन गेले. या प्रसंगाचे रामचंद्रपंताने वर्णन केले. "आम्ही स्वारी करून वाईस आलो. वाईचा कोट रगडून घेतला. प्रतापगड आदि करून किल्ले हस्तगत केले."

बिदनूरच्या राणीने राजारामास आश्रय दिला. याबद्दल औरंगजेबाचा तिच्यावर मोठा राग होता. तिच्या पारिपत्यासाठी औरंगजेबाने जाननिसारखान व त्याचा भाऊ तुहव्वरखान यांची रवानगी केली. बिदनूरचे राज्य उद्ध्वस्त करण्यासाठी भलीमोठी फौज घेऊन तो रवाना झाला. याच सुमारास कर्नाटकाच्या सरहद्दीवर संताजीने त्यास गाठले. निकराची मारामारी झाली. मोगल आणि मराठे यांच्याकडचे अनेक लोक ठार झाले. पण अखेर मोगलांचा सपशेल पराजय झाला. सगळी फौज, तोफखाना, सामग्री गारद झाली. जाननिसारखान हा जखमी झाला. पण कसाबसा तो जिवानिशी निसटला. त्याचा भाऊ तुहव्वरखान याने तर रणांगणावर पडलेल्या आणि मातीने बरबटलेल्या लोकांत स्वतःला नेऊन घातले म्हणून तो बचावला. जाननिसारखानाच्या पराजयाने मोगलांची बिदनूरच्या राणीवरची मोहीम अयशस्वी झाली. तिच्याकडून दंड म्हणून थोडीशी रक्कम घेतली आणि हे प्रकरण मिटवले. मोगलांच्या या पराजयाने औरंगजेबाला पराकाष्ठेचे दुःख झाले. पण त्याने ते बाहेर दाखविले नाही. जाननिसारखानाच्या फटफजितीची वार्ता ऐकून दरबारात तो इतकेच म्हणाला, "माणसाच्या हातात काही नाही. सर्व परमेश्वराकडून घडते."

औरंगजेबाचे हे बोलणे तत्त्ववेत्याला शोभावे असेच होते. आणि खरोखरच बिचाऱ्याला तत्त्वज्ञानाची या वेळी फारच जरूर होती. कारण, त्याच्या तत्त्व-

ज्ञानाची कसोटी लागावी असेच प्रसंग एकापाठोपाठ एक घडत होते. जाननिसार-खानाच्या फजितीच्या बातम्या हवेत विरल्या न विरल्या तोच औरंगजेबाला शर्जाखानाच्या विटंबनेला तोंड द्यावे लागले. हा शर्जाखान विजापूरचा सरदार, स्वतःला या युगाचा रुस्तुम म्हणजें वाघ म्हणवीत असे. तो सिंहासारखा शूर अशी त्याची सर्वत्र प्रसिद्धि होती. याच शर्जाखानाने वाईच्या लढाईत हंबीरराव मोहित्याला तोफेच्या गोळ्याने ठार केले होते. सध्या तो साताऱ्याचा किल्ला जिंकण्यासाठी साताऱ्याजवळ आला होता. त्याला संताजी घोरपडे, धनाजी जाधव इत्यादींनी गाठले आणि प्रचंड सैन्यानिशी त्याच्यावर चाल केली.

रुस्तुमखानाने आपला मुलगा गालिबखान याच्याबरोबर पाच हजार सैन्य आणि पाच हत्ती देऊन त्याला सैन्याच्या आघाडीवर ठेविले. पण लढाईच्या सुरुवातीला मराठ्यांच्या बर्कदाजांनी बंदुकीचा मारा केल्यावर ते हत्ती मागे वळले व आपल्याच सैन्यातील लोकांना चिरडू लागले. तेव्हा रुस्तुमखान पुढे धावला. एवढ्यात मराठ्यांच्या सैन्यातील गजदलाने चाल केली. त्या हत्तींना पाहून मोगल स्वारांचे घोडे घाबरून उधळले; व काही केल्या ते मैदानावर टिकेनात. पण रुस्तुमखान लढत राहिला व त्याने आघाडीच्या मराठ्यांना मागे हटविले. एवढ्यात मराठ्यांनी मोगलांना हुलकावणी देण्यासाठी पळ काढला. मोगल त्यांचा पाठलाग करण्यात गुंतले असता मराठ्यांच्या दुसऱ्या तुकडीने त्यांच्यावर हल्ला केला व त्यांचे झेंडे हिरावून घेतले. त्यांचे आघाडीला असलेले बर्कदाज मोगलांच्या पिछाडीवर तुटून पडले व त्यांनी मोगलांची छावणी लुट-ण्यास सुरुवात केली. मोगल घाबरून पळू लागले. तेव्हा रुस्तुमखानाने चिडून आपला हत्ती मराठ्यांवर घातला. पण मराठ्यांच्या गोळीबारामुळे त्याच्या अंगावरच्या कपड्यांनी पेट घेतला. त्याला बाणाच्या व बंदुकीच्या गोळ्यांच्या जखमा लागल्या व बेशुद्धावस्थेत तो हत्तीवरून खाली जमिनीवर पडला. त्याला मराठा सरदार बाजी मोरे याने उचलून मराठ्यांच्या सैन्यात नेले. त्याचा मुलगा गालिबखान यालाही बाणांच्या व भाल्यांच्या जखमा लागल्या व तो बेशुद्ध होऊन जमिनीवर कोसळला.

रुस्तुमखानाच्या सैन्यात असा गोंधळ उडाला असता सातारच्या किल्ल्यातून पाच हजार स्वार व पाच हजार पायदळ घेऊन हंबीररावाने मोगलांवर हल्ला चढविला. या युद्धात मराठ्यांनी रुस्तुमखानाची आई, बायको व मुलगी यांना कैद केले. त्याच्या दोन बायका व दोन मुले यांनी जुने कपडे अंगावर घालून "आपण रुस्तुमखानाच्या दासी आहोत" असे छावणीत घुसलेल्या मराठ्यांना सांगून आपली सुटका करून घेतली. आणि संधि पाहून, रानावनातून लपतछपत

प्रवास करीत ती औरंगजेबाच्या छावणीत पोचली. औरंगजेबाला ही बातमी कळल्यावर त्याने आपला चोपदार मीर हसन यास पालखी आणि चार घोडे बरोबर देऊन त्या मंडळींना आणण्यास रवाना केले व रुस्तुमखानाला कळविले की, "तुझ्या दोन बायका व दोन मुले ही छावणीत पोचली आहेत. त्यांची व्यवस्था करण्यात येत आहे. तुझी सुटका करण्यासाठी फौजा तैनात करण्यात आल्या आहेत."

पण रुस्तुमखान या वेळी सांगोल्याला आला होता. त्याने बादशहाला निरोप पाठविला की, "मी मराठ्यांना एक लाख होन देण्याचे कबूल केले आहे. याशिवाय माझी आई व मोठा मुलगा त्यांना मराठ्यांच्या पाशी ओलीस ठेवले आहे. या अटींवर माझी सुटका करण्यात आली असून सध्या मी सांगोल्याला आलो आहे. छावणीत येण्याची परवानगी असावी."

पण बादशहाने त्याला छावणीत येण्याची परवानगी दिली नाही. त्याने त्याला कळविले की, "सध्या तुम्ही आहात तेथेच राहा." याचा अर्थ काय, ते बादशहालाच माहीत !

बिचारा रुस्तुमखान मराठ्यांच्या कैदेत सोळा दिवसपर्यंत होता. सुटून आला तर बादशहाने त्याला 'ना स्वीकार ना धिक्कार' या न्यायाने येऊही दिले नाही व घालवूनही दिले नाही. 'न ययौ न तस्थौ'– (गेलाही नाही व थांबलाही नाही) अशी त्रिशंकूसारखी त्याची दुर्दशा झाली.

सबंध सातारा जिल्ह्यात रुस्तुमखानाच्या पराजयाचे परिणाम फार दूरगामी झाले. "गनिमाची ठाणी जागजागा असतील ते कुल मारून काढणे." असा चढाईचा कार्यक्रम रामचंद्रपंत अमात्याने दिलेला होता. त्याची कसून अंमलबजावणी मराठ्यांनी चालू केली. वाईचे ठाणे काबीज करून मराठ्यांनी तेथील ठाणेदार खिदमततलबखान दस्त केलाच होता; पण रुस्तुमखानाच्या पराजयाची बातमी ऐकून खटावचा ठाणेदार हिलालखान हा तर ठाणे टाकून पळूनच गेला. बुधचा फौजदार खुदाबंदखान व पाच गावचा सर फौजदार महंमद अमीनखान यांनीही ठाणी सोडून पळ काढला. बादशाही अधिकारी रणमस्तखान हा नंतर खटावला आला. त्याने सरदारांच्या बहुत विनवण्या केल्या पण ठाणे म्हणून कोणी कबूल करीना. तो मसूरास गेल्याबरोबर मराठ्यांनी लुटालूट व जाळपोळ केली. त्यांनी मसूरालाही वेढा घातला. मसूरचा ठाणेदार रात्रीच्या अंधारात पळून गेला. ठाणेदार पळतात हे पाहून औरंगजेबाने तातडीने शहाजहानचा वजीर सादुल्लाखान याचा मुलगा लुत्फुल्लाखान यास खटावला पाठविले. ६ जुलै १६९० रोजी तो खटावला पोचला.

ज्या दिवशी लुत्फुल्लाखान खटावला पोचला त्याच दिवशी पहाटे संताजी घोरपड्याने त्याच्यावर दहाबारा हजार स्वार व अगणित पायदल यांच्यानिशी हल्ला चढविला. मोगल फौजेने अजून तळ देऊन मोर्चे कायम केलेही नव्हते. रात्रीचा शेवटचा प्रहर होता. पाऊस सारखा पडत होता. मोगल गाफील होते. संताजीने ही संधि साधली व त्यांच्यावर तो तुटून पडला. लुत्फुल्लाखानाचा मुलगा महमद खलील याने आपल्या चौकीचे बंदुकची व शागीर्दपेशा यांना गोळा केले व मराठ्यांना तोंड दिले. तोपर्यंत इतर सरदार व खुद्द लुत्फुल्लाखान तयार झाला. लढाई निकराला येऊ लागली. लुत्फुल्लाखान लिहितो-"तो गर्विष्ठ संताजी आपल्या सैन्यासहित आमच्यावर घसरला. त्या वेळी हाणामारी व वीरांच्या आरोळ्या यांमुळें कल्पांताचा भास झाला. आमचे वीर शौर्याने लढत होते. त्यांनी शत्रुसैनिकांपैकी अनेकांचा संहार केला. पण त्याची तमा न बाळगता मराठे पुन्हा पुन्हा चालून येत." हे युद्ध एक प्रहरापर्यंत मुसळधार पावसात निकराने चालले होते. त्यानंतर मराठे खटावच्या वायव्येस आठ मैलांवर असलेल्या वर्धनगडास निघून गेले.

खटावच्या जवळ असलेल्या भागात पसरलेल्या मराठ्यांचा मोड करण्यासाठी लुत्फुल्लाखान निघाला. तो म्हसवडच्या पूर्वेस बारा मैलांवर असलेल्या पिलीव गावाहून रवाना झाला. तेव्हा आठ हजार स्वार व अगणित पायदल यासह संताजी व धनाजी यांनी त्याच्या सैन्याला चहूकडून कोंडले. लुत्फुल्लाखानाच्या शब्दांत "युद्ध निकराला येऊ लागले. बंदुका आणि बाण यांच्या वर्षावामुळे प्रलयकाळाचा भास झाला. शत्रूचे सैन्य आमच्या सैन्याच्या ज्या बाजूने चाल करून येई तिकडे आमचे सैनिक निकराने प्रतिकार करून त्याला मागे हटवीत. अशा रीतीने ही लढाई संध्याकाळपर्यंत चालली होती. [शेवटी संताजी व धनाजी हे पाच हजार निवडक स्वारानिशी आमच्या सैन्यावर चालून आले......त्यांच्या सैन्याचा पराजय झाला.

लुत्फुल्लाखानाचे हे म्हणणे वस्तुस्थितीचे अज्ञान दर्शविते. एखादया लढाईत मराठ्यांचा जय किंवा पराजय होण्याचा हा प्रश्न नव्हता. मराठ्यांच्या या वारंवार होणाऱ्या चढाईचे उद्दिष्टच मुळी मोगलांच्या मनात धास्ती निर्माण करणे हे होते. आणि ते साध्य करण्यात ते यशस्वी होत होते. संभाजीच्या वधानंतर 'निर्वीरमुर्वीतलम्' अशी महाराष्ट्रभूमीची स्थिति झाल्यामुळे मोगल माजले होते. आता संताजीप्रभृतींच्या प्रतापामुळे त्यांच्या पायाखालची भूमि हादरू लागली. 'करि डळमळ भूमंडळ' अशी त्यांची स्थिति होऊन ते बावरले होते. मराठ्यांना हवे होते ते हेच.

संभाजीच्या वधापर्यंत उत्तर आणि दक्षिण कोकणात मोगलांनी बरेच आक्रमण केले होते. उत्तर कोकणात मातबरखानाने कल्याण, माहुली, प्रबळगड कर्नाळा, मुकुटगड, मलंगगड, चंदेरी, माणिकगड, संकिया व दुगड इत्यादि किल्ले जिंकून घेतले होते. मराठ्यांकडे फक्त खांदेरी, कुलाबा, व पद्मगड असे काही थोडे किल्ले, राहिले होते. दक्षिण कोकणात फोंडा, कुडाळ आणि डिचोली ही स्थळे मोगलांनी काबीज केली होती. पण ही परिस्थिति लवकरच पालटली. राजमाचीच्या किल्ल्यात मराठ्यांनी आपले लष्करी केंद्र उभारले व तेथून ते मोगलांनी घेतलेल्या किल्ल्यांवर हल्ले करू लागले. दक्षिण कोकणात पूर्वी संभाजीच्या विरुद्ध उठलेले मणेरी, साखळी, डिचोली, फोंडे, चंद्रवाडी येथील देसाई मराठ्यांना मिळाले आणि त्यांनी फोंड्याचा मोगल किल्लेदार सरबाजखान आणि कुडाळचा अधिकारी अब्दुलरजाबखान यांना पळवून लावले. विशेष म्हणजे पोर्तुगीजांनी मोगलांना मदत करण्याची बतावणी केली तरी आंतून ते मराठ्यांना अनुकूल होते. मोगलांच्या डोळ्यांवर येणार नाही इतपत सावधगिरीने ते त्यांना मदत करीत. मराठे सरदारांच्या कबिल्यांना ते एकीकडे आश्रय देत व दुसरीकडे अब्दुलरजाबखानाच्या बायकामुलांनाही आश्रय देत. पोर्तुगीजांची दुटप्पी वागणूक मातबरखानाच्या लक्षात आली आणि त्याने वसईवर हल्ला करून तेथे लूटमार केली पण गोव्याचा गव्हर्नर असा वस्ताद की त्याने औरंगजेबाकडे वकिली करून मातबरखान याने लगेच लढाई बंद करावी, इतकेच नव्हे तर पोर्तुगीजांना दोन लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी अशी आज्ञा मिळविली. आणि हेच गोव्याचे पोर्तुगीज मोगलांच्या आधाराने संभाजीच्या कारकिर्दीत मराठ्यांवर तुटून पडत होते; राजकारणातला शत्रुमित्रभाव किती चंचल असतो याचे एवढे बोलके उदाहरण मिळणे कठीण !

पण एवढेच नाही. व्यक्तीप्रमाणे राष्ट्रेही अनुभवानेच शहाणी होतात असे वाटते. पोर्तुगीजांना प्रथम मोगल हे मराठ्यांच्या तापातून सोडविणारे देवदूत वाटले., पण अनुभवाने त्यांना मराठेच बरे वाटू लागले. पण या घटकेला मोगल व मराठे या दोन तुल्यबळ शत्रूंच्या टकरीत कोणत्याही एका बाजूला उघडपणे मिळून आपला कपाळमोक्ष करून घेण्याइतकी ऐपत त्यांच्यापाशी नसल्यामुळे कोणालाच दुखविणे त्यांना परवडण्यासारखे नव्हते. पोर्तुगीजांच्या या प्रवृत्तीचे स्पष्ट प्रतिबिंब गोव्याच्या गव्हर्नरने पोर्तुगालच्या राजाला लिहिलेल्या पत्रात पडले आहे – तो म्हणतो – "इकडे कोकणात मोगल बादशहाची पकड ढिली झाल्याने व त्याने दिल्लीहून मागविलेली कुमक न आल्याने तिथल्या देसायांनी बादशहाची सत्ता झुगारून देऊन राजारामाशी संधान बांधले आहे. तसे पाहिले तर राजारामानेच त्यांना बादशहाविरुद्ध चिथावणी दिली आहे. ते मोगलांवर उलटले याचे कारण हे की ते राजारामाच्या जातीचे आहेत हे तर झालेच; परंतु मुसलमानांच्या

अरेरावीची व उर्मटपणाची त्यांना चीड आली आहे. मुसलमानांनी हिंदु स्त्रिया व हिंदु मंदिरे भ्रष्ट केल्याने हे देसाई त्यांच्याविरुद्ध उठल्यास नवल नाही....एके बाजूने आम्ही बादशहाच्या प्रजाजनांना बाहेर जाण्यास वाट देत आहोत तर दुसऱ्या बाजूने राजारामाशीही धूर्तपणाने वागत आहोत. बादशहाचे अधिकारी व राजाराम या दोघांचाही आम्ही विश्वास संपादन केला आहे. दोघेही आम्हांला मानतात व आम्ही त्यांचे मित्र आहोत असे समजतात....आमच्या राज्याला मुसलमानांपेक्षा हिंदु शेजारीच बरे असे आम्हांला वाटते. मुसलमानांवर कधीच विश्वास ठेवू नये. कारण त्यांना वचनाची किंमत नसते. ते उर्मट आणि भांडखोर असतात. तथापि असे जरी असले तरी दोघांशीही आमचे तटस्थतेचे संबंध आहेत असे आम्ही भासवितो." कोकणात मोगलांना मराठ्यांपुढे हार खावी लागत होती ती केवळ मराठ्यांच्या लष्करी पराक्रमामुळे नव्हे, तर मोगलांच्या नैतिक अधःपातामुळे. पोर्तुगीज गव्हर्नरच्या पत्रावरून उघडच होते की ज्या सामान्य नीतितत्त्वाची मोगलांनी कोकण जिंकल्यावर पायमल्ली केली, तिची फळे त्यांना 'याची देहीं याची डोळा' भोगावी लागली. मराठ्यांनी तर त्यांना हरविलेच पण पोर्तुगीजांचा विश्वासही त्यांनी गमाविला.

महाराष्ट्राची भूमि खडकाळ आहेच. तो दगडाचा देश आहे. येथे पावलो पावली ठेचा लागतात आणि पायात काटे घुसतात. हे अगदी साधे भौगोलिक सत्य आहे. पण ते औरंगजेबाच्या गळी काही अद्याप उतरत नव्हते. ते त्याला समजावून द्यावे आणि महाराष्ट्रातल्या वाटा खडकाळ व काटेरी आहेत, शेफारलेल्या आक्रमकांसाठी तर फारच काटेरी व खडकाळ आहेत यासाठी मराठ्यांनी भीमेच्या उत्तरेकडील औरंगाबाद भागात आक्रमणे सुरू केली. कारण, उत्तरेकडून औरंगजेबाकडे येणारी रसद, सैन्य व खजिना याचे औरंगाबाद हे मोठे केंद्र होते. औरंगाबाद–विजापूर ही वाट सुरक्षित ठेवण्यासाठी औरंगजेबाने मुद्दाम दतियाचा राजा राव दल्पत बुंदेला याची नेमणूक केली होती. या सगळ्या राजमार्गावर हजारोंच्या संख्येने मराठे पसरले होते व ते मनसोक्त लुटालूट करीत असत. उत्तरेतून आलेल्या बेदरबख्ताला सोलापूरला घेऊन येत असता राव दल्पतला ज्या मराठ्यांशी झगडावे लागले त्यांची संख्या बारा हजार होती. दुसऱ्या वेळी तुराणच्या वकिलाला औरंगाबादेस पोचवून तो परत येत असता लखम् सावंत नावाच्या मराठ्यांशी त्याचा झगडा झाला. त्या वेळी त्याच्यापाशी तीन हजार लोक होते. मराठ्यांच्या या वाटमारीमुळे रस्ते अगदी असुरक्षित होऊन गेले. त्यांचे पारिपत्य करणे जवळ जवळ अशक्यच होते. औरंगजेबाने त्याचा पाठलाग

करण्यासाठी बक्षी बहरामंदखान, बहादुरखान पन्नी, सय्यद अब्दुलाखान बाऱ्हा असे उमदे अमीर नेमले पण तेही नाउमेद झाले.

खरोखर, ही धास्तीची व असुरक्षिततेची भावना मोगली फौजेत बळावत जावी हेच मराठ्यांच्या या वेळच्या युद्धनीतीचे सूत्र होते. "औरंगजेब पातशहासारखा शत्रु, ज्याची लाखो फौज व खजिना बेमुबलग, छकड्यास छकडे द्रव्याचे भरोन कोटिशा ज्याचे बरोबर चालत आहेत आणि आपले सैन्य तर थोडे यास्तव मनुष्य राखून, जाया होऊ न देता, मसलतीने त्यांच्या सभोवते हिंडोन, फिरोन, त्यांस लांडगेतोड करावी. रयतेची मात्र वैरण राखून रानांतील वैरण जाळून टाकावी, रसद चालू देऊ नये, आपल्या फौजेत मणाची धारण, त्यांच्या लष्करांत शेराची धारण, अशा तऱ्हेने करीत मराठी फौज किती आहे हा अदमास ध्यानात येऊ देऊ नये, त्यांचे फौजेस चैन पडू देऊ नये..... मोगलांचे घोडे पाण्यावर आले असता पाणी न पीत, त्यास मोगली लोकांनी म्हणावे, जे पाण्यामध्ये धनाजी व संताजी दिसतो कीं काय? रात्री दिवसा कोणीकडून येतील, काय करतील असे केले. मोगलाई फौजेंत आठही प्रहर भय बाळगीत. पादशहासही बहूत आश्चर्य जाहले की, "मराठी फौज ही बळावत आहे. अकस्मात् यावे, बक मच्छ उचलून नेतो तसा घाला घालावा, शिपाईगिरीची शर्त करावी, प्रसंग पडल्यास माघारे पळून जावे. खाण्यापिण्याची दरकार बाळगीत नाहीत. पाऊस, ऊन, थंडी व अंधारी काही न पाहता घोड्यावरच हरबरे व भाकरी, चटणी, कांदे खाऊन धावतात. त्यांस कसे जिंकावे? एक्या मुलकात फौज आली म्हणोन त्यांजवर फौजेची रवानगी करावी तर दुसरीकडे जाऊन ठाणी घेतात, मुलूख मारितात. हे आदमी नव्हत, भूतखाना आहे!" अशा प्रकारे औरंगजेबाची अगदी त्रेधा उडाली. संभाजीला ठार मारून, मोहोळावर दगड मारावा त्याप्रमाणे त्याने मराठ्यांना मुद्दाम ढोसून डिवचले होते. तेव्हा, जर ह्या खवळलेल्या मराठ्यांचे थवेच्या थवे पिसाळलेल्या गांधीलमाशांप्रमाणे त्याच्यावर त्वेषाने तुटून पडून, कडकडून डसू लागले, व त्यामुळे तो विव्हळू लागला तर त्यात नवल ते काय?

औरंगजेबाची परिस्थिति अशी बिकट झाली असताना रामचंद्रपंत अमात्याने पराकाष्ठेच्या चातुर्याने मराठ्यांच्या वतनासक्तीला आवाहन करून ती आणखीच बिकट केली. मराठ्यांना देशमुख, कुलकर्णी, देशपांडा या वतनाचे प्रेम मोठे. ती वतने राखण्यासाठी अनेकजण मोगलांना मिळाले आणि वतनाचे आमिष दाखवून अनेक मराठ्यांना औरंगजेबाने फोडले. पण जे निष्ठापूर्वक परत स्वराज्यात येऊन कामगिरी करून दाखवितील, त्यांना त्यांची जुनी वतने कायम करण्याचे व नवी वतने देण्याचे रामचंद्रपंताने आश्वासन दिले व कपटपटु औरंगजेबाची भेदनीति त्याच्यावरच उलटविली. वस्तुतः वतन देणे किंवा जमीन तोडून देणे

या गोष्टीला शिवाजी महाराजांचा सक्त विरोध होता. त्या बाबतीत त्यांनी प्रत्यक्ष आपले व्याही, संभाजीचे सासरे पिलाजीराव शिर्के यांचीही दाभोळच्या वतनाच्या बाबतीत भीड बाळगली नव्हती. शिवाजीमहाराजांच्या सहवासात राहिलेल्या व त्यांच्या 'राजनीती'ला अक्षरस्वरूप देणाऱ्या रामचंद्रपंताला या गोष्टीची कल्पना नव्हती असे कसे म्हणता येईल? त्यानेच 'राजनीती'त म्हटल्याप्रमाणे – " राज्यातील वतनदार, देशमुख, देश कुलकर्णी, पाटील आदी करून यांस वतनदार म्हणावे ही प्राकृत परिभाषा मात्र आहे. ते स्वल्पच परंतु स्वतंत्र देशनायकच आहेत. हे लोक म्हणजे राज्याचे दायादच आहेत.... परचक्र आले म्हणजे वतनाच्या आशेने अगोदर सलूख करितात, स्वतः भेटतात, तिकडील भेद इकडे, इकडील भेद तिकडे करून राज्यांत शत्रूचा प्रवेश करितात; मग तेच राज्याचे अपायभूत होऊन दुःसाध्य होऊन जातात. याकरिता या लोकांचे संरक्षण परम युक्तिजन्य आहे."..."आधी वतनदार हा एक विश्वास ततोपि प्रामाणिक म्हणजे सोने आणि सुगंध–" वतनदार हे काय प्रकरण आहे हे रामचंद्रपंत सध्या स्वतः डोळयांनी पाहातच होता. तीच गोष्ट जमीन तोडून देण्याबद्दल. शिवाजीमहाराज साधूसंतांचे अपवाद सोडून जमीन म्हणून तोडून देत नसत. रोख रक्कम देत; अश्वगज, वस्त्रभूषणे देत. कारण– "जो राजा होत्साता राज्याचा शत्रु असेल त्याने भूमीवर उदार व्हावे. राजास भूपति असे भूमीकरिता म्हणावे; ते भूमीच गेल्यावर राज्य कशाचे करणार? पति कोणाचा होणार? याकरिता जो राजा राज्य करणार, राज्य वाढविणार, नीतिवंत म्हणोन कीर्ति संपादणार, त्याने सर्वार्थी मोह न पावता यवोदर प्रमाण भूमि तेही इनाम देऊ नये."

परंतु तत्त्व कितीही उदात्त असले तरी परिस्थितीच अशी आली होती की तत्त्वाला मुरड घालण्याशिवाय इलाज नव्हता. राजारामाने वतन दिले नाही तर औरंगजेब वतन देण्यासाठी बसलाच होता. समाजात कडव्या राष्ट्रनिष्ठांपेक्षा स्वार्थसाधूंचीच संख्या तेव्हाही जास्तच होती, स्वराज्य तर जीवन-मरणाच्या रेषेवर उभे होते. तेव्हा रामचंद्रपंताने आज्ञापत्र काढले की – " जो कोणी वतनदार एकनिष्ठा धरून येईल, गडकोट हस्तगत करून देईल, या राज्याचे ठायी दृढनिष्ठा धरील आणि स्वामीकार्य करून देईल, त्यास इसाफती व वतनभाग चालिला असेल तेणेप्रमाणे दुमाला करून लिहोन पाठविणे. सनद सादर होईल तेणेप्रमाणे मजुरा असे."

जादूची कांडी फिरावी तसा रामचंद्रपंतांच्या या आवाहनाचा परिणाम झाला. कारण त्याने मराठयांच्या काळजालाच हात घातला होता. मोगलांनी घतलेले गडकोट फिरावून हस्तगत करावे ही पंतांची मोठी महत्त्वाकांक्षा. त्याप्रमाणे वतनदार

मंडळी भराभर किल्ले घेऊन दाखवू लागली. जेध्यांच्या प्रयत्नाने किल्ले विचित्र-गड ऊर्फ रोहिडा हस्तगत झाला तेव्हा जेधे यांनी लिहिले – "आपण वतनदार लोक. एकनिष्ठ सेवा करून दाखवावी म्हणून किल्ले विचित्रगड गनिमापासून घेतला व देशही सोडविला. पुढेही जमाव करून गडकोट व देश गनिमापासून घेतो. परंतु स्वामींनी कृपाळू होऊन पेशजी आपला हक्क चालत होता, तेणेप्रमाणे देखील इसाफतीचे गाव चालविले पाहिजेत." कानदखोऱ्याचा कान्होजी झुंजारराव देशमुख याने प्रचंडगड ऊर्फ तोरणा मोगलांपासून घेतला. त्याला लिहिताना शंकराजी नारायण म्हणतो – "आपण प्रचंडगडीचे त्राबें खटपट करून गड हस्तगत करून दिल्हा. सांप्रत गनीम गडावरी आला होता. ते समयीही कस्त करावयाची ते केली म्हणून कित्येक तपसिले लिहिलें. त्यावरून मुजरा जाला, कष्ट मेहनत केलिया गोमटेच होईल." पुरंदर हस्तगत करण्याबद्दल तेथील कोळी व बेरड प्रयत्न करीत होते त्यांना राजारामाने आश्वासन दिले की, "तुम्हांस पुरंदरगड घ्यावयाचे काम सांगितले आहे. त्यास तुम्ही विनंती केली साहेबांच्या हुकुमाप्रमाणे गड घेऊन देतच आहोत परंतु किल्ल्याचा घेरा आहे तो उकरून खावयास साहेबांनी मेहेरबान होऊन दिल्हा तरी खाईन. त्याजवरून कौल दिल्हा असे तुम्ही पुरंदरगड घेऊन देणे." रायगड ही मराठ्यांची राजधानी. ती मोगलांपासून परत घेण्याचा हुरूप त्यांच्यात या वेळी आला होता. राजारामाने रायगड घेऱ्यातल्या मावळ्यांना व जांबुळकर, दरेकर इत्यादींना आज्ञा केली की "पूर्वी कैलासवासी स्वामींचे वेळेस तुम्ही लोकीं कष्ट मेहनत करून थोर थोर कामे करून दिली आहेत. सांप्रत स्वामींनी आबाजी सोनदेव यांस पाठविले आहे. रायगड हस्तगत करून द्यावयाची आज्ञा त्यांस केली आहे. हे जाऊन राजकारण जें करावयाचें तसें करतील. तरी तुम्ही कुल लोक अनुकूल होऊन रायगडची हवी करणें. सक्ती करून हे स्थळ हस्तगत करून फत्तेचें वर्तमान स्वामीस लिहिणे. म्हणजे स्वामी तुमचें विशेष ऊर्जित करितील." रायगड फत्ते झाल्याचे वर्तमान स्वामींस लिहिण्याचा योग चाळीस वर्षांनंतर आला. पण अवघ्या तीन वर्षांपूर्वी सर्वत्र पडझड झाली असताना राज्याचा मामला थाटण्याची ही जिद्द केवढी म्हणावी !

मराठ्यांच्या युद्धनीतीत विनोदाचा भाग बराच आहे. लढाई असो की छावणीवर छापा असो की किल्ला घेणे असो, शत्रूची कत्तल करण्यापेक्षा त्याची फजिती करण्यात त्यांना विशेष मौज वाटते. औरंगजेबाच्या हातावर तुरी देऊन शिवाजी महाराज आग्र्याहून निसटले. संताजी घोरपड्याने औरंगजेबाच्या तंबूचे कळस कापून आणले. रुस्तुमखानासारख्या सिंहाला सोळा दिवस त्याने कोठडीत ठेवले. हे सर्व प्रकार या मराठ्यांच्या विनोदाच्या अहिंसक शस्त्राने शत्रूला मारण्याच्या प्रवृत्तीची उदाहरणे आहेत. कारण प्रतिष्ठा गेलेला शत्रु हा दात काढलेल्या नागा-

प्रमाणे जिवंत असून मेलेलाच असतो. त्यांनी राजगड घतला तो प्रसंग म्हणजे मराठ्यांच्या विनोदबुद्धीचे उत्कृष्ट उदाहरण म्हणावे लागेल.

संभाजीच्या वधानंतर मोगलांनी राजगड काबीज केला. शिवाजीमहाराजांची ही पहिली राजधानी. औरंगजेबाने अब्दुल खैरखान याची राजगडचा किल्लेदार म्हणून नेमणूक केली. पण महाराजांची ताब्यात आलेली राजधानी पेलण्याइतका या इसमाचा वकूब नव्हता. मराठे राजगडाभोवती जमले व त्यांनी अब्दुलखैर-खानाला किल्ला खाली करून देण्यास सांगितले. औरंगजेबाचा प्रख्यात सरदार फिरोजजंग याची छावणी जवळच होती. पण अब्दुलखैरखानाला काही धीर निघाला नाही. त्याने आपले व बायकामुलांचे जीवदान मागितले. मराठ्यांनी अर्थात् ते दिलेच. रात्रीच्या वेळी तो किल्ल्याबाहेर आला. काही बायका दोनतीन डोल्यातून होत्या, काही पायी चालत होत्या. त्यांच्याबरोबर जडजवाहीर व कपडेलत्ते यांच्या संदुका व पेटारे होते. मराठे चहूकडे होतेच. त्यांनी वाटेत अब्दुलखैरखानाला घेरले. त्याला पूर्णपणे लुबाडले. त्याची व त्याच्या कुटुंबियांची खूप फजिती केली. अशा स्थितीत तो मध्यरात्रीच्या सुमारास फिरोजजंगाच्या छावणीत पोचला. व मराठ्यांनी आपले हसू केल्याबद्दल अक्षरशः ओक्साबाक्सी रडू लागला. आपल्या नादानपणाचा त्याला पश्चात्ताप झाला. त्याचा पैसाही गेला व अब्रूही गेली. औरंगजेबाला हे कळताच त्याने त्याला बडतर्फ करून जबरदस्तीने मक्केच्या यात्रेला पाठविले.

जुनी वतने कायम करण्याचे आणि कामगिरी बजावल्यास नवी वतने देण्याचे रामचंद्रपंताने आश्वासन दिल्यामुळे मोगलांकडे गेलेले नागोजी माने, अमृतराव निंबाळकर, नेमाजी शिंदे, माणकोजी पांढरे, हणमंतराव निंबाळकर, मकाजी धारगे वगैरे अनेक पराक्रमी सरदार स्वराज्यात परत आले. हे सारे मराठेच होते, पण संभाजीच्या वधानंतर औरंगजेबाच्या सर्वंकष प्रभावामुळे आपली वतने राखण्यासाठी ते त्याच्याकडे गेले होते. पण संताजी-धनाजीच्या प्रतापामुळे औरंगजेबाच्या अजिंक्यत्वाचा बुडबुडा फुटला, त्यांना विश्वास आला व परत ते राजारामाकडे आले. हे सगळे जण केवळ राष्ट्रनिष्ठेमुळे परतले असे समजणे म्हणजे भोळेपणा म्हणावा लागेल. पण केव्हाही झाले तरी निर्भेळ राष्ट्रभक्त थोडेच असतात. जेथे रायगड घेऊन देण्यासाठी वाईची देशमुखी औरंगजेबाकडे मागणारा सूर्याजी पिसाळ त्या देशमुखीचे फर्मान मिळाल्यानंतरही वाई मराठ्यांनी घेतली हे पाहून मोगलांकडून तडक राजारामाकडे धाव घेतो तेथे बाकीच्यांची स्वराज्य-निष्ठा काय वानावी ? निदान स्वार्थ साधायला तरी औरंगजेबापेक्षा राजाराम बरा ही भावना जागी करून रामचंद्रपंताने औरंगजेबाचे सैन्य फोडले ही त्याची मोठीच राजनीति म्हटली पाहिजे.

गेली वर्ष दोन वर्षे महाराष्ट्रात औरंगजेबाचा प्रस्थापित झालेला धाक आणि दरारा मुळापासून साफ उखडला गेला होता. लोकांची हिंमत कमालीची वाढली होती. ह्या आत्मप्रतीतीचा आविष्कार सर्जेराव जेध्याला राजारामाने लिहिलेल्या पत्रात झालेला आहे.... "हे महाराष्ट्र राज्य आहे. तुम्ही या राज्याची पोट तिडीक धरिता तरी ते प्रांती जितकी राजकारणे आहेत त्यांची चाळणा करून आपण जमाव करून सावध राहून स्वामिकार्य दृष्टीस पडेल ते मनास आणून हस्तगत करून ठेवणे. हुजूर लेहून पाठविणे. तेणेप्रमाणे हुजूरुन विल्हे केली जाईल... तुम्ही आपली खातरनिशा राकोन स्वामींच्या पायाशी एकनिष्ठता करून स्वामिकार्य साध्य होय ते गोष्ट करणे. गनिमाचा हिसाब काय आहे? तुम्ही लोक जेव्हा मनावरी धरिता, तेव्हा गनीम तो काय आहे? गनिमाला तुम्ही लोकी केला आहे. ते तुम्हीच लोक या राज्याची पोटतिडीक धरिता, तेव्हा औरंगजेबाचा हिसाब धरीत नाही. ऐसे बरे समजोन लिहिल्याप्रमाणे वर्तणूक करणे. औरंगजेबाने महाराष्ट्र लोक आहेती त्यांस मुसलमान करावे ऐसे केले आहे. त्याप्रमाणे मुसलमान केले रा।। नेतोजी व साबाजी घाटगे व जानोजी राजे व कित्येक ब्राह्मणही या प्रांतीचे बाटविले. तिकडून तमाम मराठे लोक होते ते आपल्या जमावानिशी आम्हांकडे येताती. हल्ली राजश्री हणमंतराव निंबाळकर व सटवाजी निंबाळकर व माने व सरदार आले आहेती. दुसरेही कित्येक येताती. ऐसे गनिमांचे लष्कर आटोन हुजूर जमाव होत आहे. ईश्वर करितो तरी फत्तेच आहे. लिहिल्याप्रमाणे हिंमती धरणे." पत्र राजारामाचे असले तरी लिहिणारा खंडो बल्लाळ आहे. त्याने संभाजीबरोबर पोर्तुगीज आणि मोगल यांच्याशी झालेला स्वातंत्र्याचा संग्राम पाहिला होता. त्याची ही अक्षरे "हे तो प्रचितिचे बोलणे" अशा तोलाची आहेत.

खरोखरच, मराठे औरंगजेबाचा 'हिसाब' धरीत नव्हते. "गनीमसा तुम्ही लोकी केला आहे!" खंडो बल्लाळाचे हे शब्द किती यथार्थ आहेत! वेदान्तातील रज्जूसर्प न्यायाने ज्या औरंगजेबाबद्दल 'महानयं भुजङ्गः' असा भ्रम मराठ्यांना झाला होता तो विषारी भुजंग नसून दोरीचे वेटोळे आहे असा आता साक्षात्कार झाला आणि "अथास्य तत्त्वेषु कृतेऽवभासे समुन्मिमीले व चिराय चक्षुः।" या कवि भारवीच्या उक्तीप्रमाणे तत्त्वप्रकाशाने त्यांचे डोळे उघडले. आणि या आत्मप्रतीतीने जागृत झालेले "तुम्हीच लोक जेव्हा या राज्याची पोटतिडीक धरिता तेव्हा गनिमाचा हिसाब धरीत नाही." कारण "हे राज्य महाराष्ट्र राज्य आहे." आणि हे युद्ध छत्रपतीचे नाही की सेनापतीचे नाही तर अवघ्या लोकांचे लोक-युद्ध आहे. सिंहासनावर तख्तनशीन झालेला छत्रपति, शेतात शेती करणारा शेतकरी, मासे धरणारा कोळी, आणि मडकी घडविणारा कुंभार हे सारेच या

स्वातंत्र्याच्या समरभूमीवरील सैनिक आहेत. प्रत्येक घर हा बालेकिल्ला आहे आणि प्रत्येक अवजार हे हत्यार आहे. या भावनेमुळे या संघर्षाची व्याप्ति महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पसरली व शेतकऱ्याचा विळा कणसे कापण्याप्रमाणे माणसेही कापू शकतो. व कातोड्याची कुऱ्हाड 'झाडांप्रमाणे मोगलांचीही खांडोळी उडवू शकते' ही नवीच प्रचिती मराठ्यांना आली. या प्रत्ययाने अजिंक्य झालेल्या जनतेचे स्वातंत्र्य हरण करण्यासाठी लंकेचा रावण जरी पैजेचा विडा उचलून आला असता तरी त्याची मात्रा चालली नसती. मग बिचाऱ्या औरंगजेबाची काय कथा !

एवढेच नव्हे आपल्या महाराष्ट्रभूमीचे परकीय आक्रमणापासून रक्षण करणे एवढेच मर्यादित ध्येय मराठ्यांपुढे नव्हते. मोगलांकडून मराठ्यांकडे आलेल्या नागोजी मान्याने आपणाबरोबर हणमंतराव घोरपडे वजारतमाब यालाही फोडून आणले होते. तो व त्याचा नातलग कृष्णाजी यांस सरंजाम ठरवून देताना राजारामाने जो करार केला तो फारच बोधप्रद आहे. "महाराष्ट्र धर्म पूर्ण रक्षावा हा तुमचा संकल्प स्वामींनी जाणून उभयतास जातीस व फौज खर्चास सहा लक्ष होनाची नेमणूक चालविण्याचा निश्चय करून दिधला असे. त्यापैकी (१) रायगड प्रांत (२) विजापूर (३) भागानगर व (४) औरंगाबाद हे चार काबीज केल्यावर दर कामगिरीस पाऊण लाखप्रमाणे एकंदर तीन लाख आणि बाकीचे तीन लाख प्रत्यक्ष दिल्ली घेतल्यावर द्यावयाचे असा निश्चय केला आहे. एकनिष्ठपणे सेवा करावी. स्वामी तुमचे बहुत प्रकारे चालवतील." आपल्या महाराष्ट्राचे रक्षण करून औरंगजेबाने बळकाविलेली दिल्ली घेऊन तेथील चकत्यांच्या पातशाहीची इतिश्री करून पुरातन हिंदुपत पातशाही तेथे स्थापन करावयाची असे हे भव्य स्वप्न होते. जिंजीच्या वनवासात झुल्फिकारखानाने वेढा घातला असताना सुद्धा राजारामाचे डोळे याच उज्ज्वल व विराट स्वप्नावर खिळले होते. आणि हे सर्व प्रत्यक्ष दिल्लीपति औरंगजेब महाराष्ट्रात ठाण देऊन बसला असताना!

"वह्नि तो चेतवावा रे चेतवीतांची चेततो"—रायगड पडल्यानंतर मराठ्यांच्या अस्मितेवर आलेले कश्मल अग्नीवरची राख फुंकून टाकावी त्याप्रमाणे झडून गेले होते आणि तो ज्योतिष्मान् अधिकच प्रदीप्त होऊन धडधडू लागला होता. आणि हे स्थित्यंतर संभाजीच्या मृत्यूनंतर अवघ्या वर्ष दोन वर्षांत झाले होते.

औरंगजेबाला हे मराठ्यांचे मनसुबे कळले असते तर काय बरे वाटले असते ?

□ □

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था
१११ सदाशिव पेठ, पुणे

काही वाटले नसते.

औरंगजेबाबद्दल एकाने म्हटले आहे की तो इतका गंभीर असे की त्याच्यासमोर थट्टा करण्याची कुणाची बिशाद नव्हती. औरंगजेब शूर होता, मुत्सद्दी होता, धर्मज्ञ होता, उद्योगी होता, निर्व्यसनी होता याबद्दल हवे तेवढे पुरावे आहेत. पण तो विनोदी होता याबद्दल पुरावा देणे कठीण जाईल. अकबर आणि बिरबल यांच्या विनोदी चातुर्यकथांसारखी एकही कथा औरंगजेबाबद्दल ऐकिवात नाही. यावरून असे वाटते की 'टवाळा आवडे विनोद' या न्यायाने औरंगजेबाने संगीताबरोबर विनोदालाही आपल्या राज्यातून हद्दपार केले असावे. पण तसे नसते व औरंगजेबाला बेताची का होईना विनोदबुद्धि असती तर मराठ्यांच्या या दिल्ली जिंकण्याच्या व हिंदुपदपादशाहीच्या वल्गना ऐकून त्याला खरोखर हसू आले असते. ही गोष्ट खरी आहे की शिवाजीने काही काळ त्याच्या जिवाला बराच घोर लावला होता. हेही खरे आहे की शिवाजीने राज्याभिषेक करून घेतलेला ऐकून त्याला अनिवार दुःख झाले होते. दोन दिवस त्याने अन्नउदक घेतले नाही. "दोन्ही हात भुईस घासून आपले देवाचे नाव घऊन परम खेद केला व बोलिले की खुदाने मुसलमानाची पातशाही दूर करून तक्त बुडवून मराठियास तक्त दिले. आता हद्द जाली!" हेही खरेच होते की संभाजी आटपता दिसेना तेव्हा संतापाने औरंगजेबाने आपल्या डोक्यावरची टोपी जमिनीवर आपटली व संभाजीचा पाडाव केल्याशिवाय ती घालणार नाही अशी घोर प्रतिज्ञा केली. पण त्याचे आता काय? औरंगजेबाच्या सर्व प्रतिज्ञा श्रावणमासातल्या कहाणीप्रमाणे 'सुफळ संपूर्ण झाल्या.' शिवाजी तर मेलाच काफर नरकास गेला! "काफर जहन्नम अस्त!" त्यांचा बदफैली मुलगा संभाजी याचे डोळे काढून औरंगजेबाने त्याचा शिरच्छेद केला. शिवाजीची राजधानी रायगड त्याचा प्रतापी सेनापती इतिकदखान याने सर केली. ज्या तख्तावर शिवाजी बसल्याबद्दल औरंगजेबाला दुःखाचे पर्वत झाले होते. ते तख्त इतिकदखानाने घणाचे घाव घालून फोडून टाकले. संभाजीची बायका पोरे सुद्धा धरून आणली. आता एक राजाराम जिंजीला पळाला एवढे बारीकसे शल्य राहिले खरे; पण इतिकदखानाच्या पराक्रमाने औरंगजेबाला एवढा विश्वास आला होता की जिंजी आणि जिंजीत लपलेला राजाराम या दोघांनाही पिंजऱ्यासकट उंदीर पकडावा त्याप्रमाणे तो पकडल्याशिवाय राहणार नाही. म्हणूनच इतिकदखानाच्या आजाला असलेली झुल्फिकारखान ही पदवी तर त्याने त्याला दिलीच पण अधिक 'बहादूर' अशी सार्थ किताबत पण बहाल केली. संभाजी मोगलांकडे पळून आला होता. तेव्हा

त्याला औरंगजेबाने माहीमरातबची चिन्हे व मनसब दिली होती. रायगडावरून झुल्फिकारखान ती माहीमरातब घेऊन आला होता ती माहीमरातबची चिन्हे आणि ध्वज औरंगजेबाने झुल्फिकारखानाला बहाल केली व त्याला जिंजीवर रवाना केले. १६९० च्या सप्टेंबरात झुल्फिकारखान जिंजीस पोचला व त्याने किल्ल्यास वेढा घातला. त्याच्यापाशी बारा पंधरा हजार उत्कृष्ट स्वार व बारा–पंधरा हजार रजपूत बरकंदाज लुटारू पेंढाऱ्यांची एक उत्तम पलटण एवढे सैन्य होते.

झुल्फिकारखानाने जिंजीला वेढा घातला असे म्हणणे 'परिहासविजल्पित' म्हणजे निव्वळ थट्टेने बोलण्यासारखे होते. कारण 'परमार्थाने' जिंजीला वेढा घालणे ही अशक्य कोटीतील गोष्ट होती. जिंजीचा किल्ला हा दक्षिण हिंदुस्थानातील अत्यंत प्राचीन व मजबूत किल्ल्यांपैकी एक आहे. प्राचीन चोल-राजांच्या भरभराटीच्या वेळी हा किल्ला बांधण्यात आला. त्याचे स्वामित्व विजयनगरच्या राजांकडे, व त्यानंतर विजापूरकरांकडे होते. त्यांच्याकडून आपल्या दक्षिण दिग्विजयात शिवाजीमहाराजांनी हा किल्ला भेदनीतीचा प्रयोग करून घेतला. जिंजीचा किल्ला हा निसर्गतःच इतका दुर्गम आहे कीं अर्काट जिल्हयातला जणू रायगडच. राजगिरी, कृष्णगिरी व चांद्रायणदुर्ग या तीन टेकड्यांच्या माथ्यावर तो बांधलेला असून तीनही टेकडया तटबंदीच्या साखळीने जखडल्या आहेत. ही तटबंदी सात मैल लांब आहे. तटाची भिंत तीस फूट जाड आहे. नैर्ऋत्य दिशेकडून या किल्ल्याला जाण्यासाठी एक सोपी वाट होती. पण तेथे एकामध्ये एक असे तीन उंच तट बांधून ती कायमची बंद करून टाकली होती. उत्तरेस एक अत्यंत लांबरुंद खंदक होता. फक्त किल्ल्यात जाण्यायेण्याकरिता या खंदकावर घालता–काढता येण्यासारखा एक लाकडाचा पूल होता. बाकीचे सर्व मार्ग बंद केले होते. किल्ल्यावर पाणी भरपूर होते, जिवंत झरे होते, तळी होती. असा हा किल्ला ताब्यात आल्यानंतर महाराजांना अत्यंत आनन्द वाटला. त्याला अधिक बळकटी आणण्यासाठी, अशा कामात निष्णात असलेल्या इंग्रजांचे साह्य त्यांनी मागितले, पण आपण व्यापारी असल्याची सबब सांगून त्यांनी ते नाकारले. तेव्हा महाराजांनी स्वतःच्याच बुद्धीने काही तट पाडून व काही बांधून अशी दुरुस्ती केली की इंग्रजांनीही त्यांची तारीफ केली की, "आपला उद्देश सिद्धीस नेण्याकरिता निसर्गतःच दुर्गम असलेल्या जिंजी किल्ल्याची पुन्हा त्याने डागडुजी केली. पहिले तट पाडून व नवे तट व बुरूज असे कौशल्याने बांधले की ते काम हिंदी लोकांचे नसून युरोपियनांचेच असावे असे वाटते." अशा या आधीच दुर्गम असलेल्या आणि त्यांत शिवाजीमहाराजांनी अधिकच अभेद्य केलेल्या किल्ल्याला वेढा घालण्याचा 'प्रसंग' झुल्फिकारखानावर येऊन ठेपला होता.

'प्रसंग' म्हणावयाचा खराच. कारण झुल्फिकारखानापाशी बारा पंधरा हजार फौज असली तरी ती पुरेशी नव्हती. त्यात पुन्हा राजारामाने नागोजी माने, त्याचा मेव्हणा अमृतराव निंबाळकर, नेमाजी शिंदे, माणकोजी पांढरे वगैरे खानाकडचे मराठे सरदार फोडून आपणांकडे आणले. हे लोक म्हणजे मोठ्या देशभक्तीने राजारामाकडे आले अशातला काही एक भाग नव्हता. काही देश-भक्ति, काही जातीचा उमाळा, पण बराचसा वतनाबद्दलचा स्वार्थ अशा अनेक शबल प्रवृत्ति त्यांच्या वागण्यामागे होत्या. राजारामाने त्यांना जी वतनपत्रे बहाल केली होती त्यातच एकीकडे त्याची महाराष्ट्र राज्याची भक्तीही वर्णन केली होती व दुसरीकडे त्यांना वतन बहाल केल्याचेही सांगितले होते. या पत्रातील उदात्त आणि अनुदात्त भावनांचा चमत्कारिक संकरच या लोकांच्या प्रवृत्तीवर प्रकाश टाकण्यास समर्थ आहे. उदाहरणार्थ, नागोजी माने म्हसवडकर यास राजा-रामाने दिलेले अभयपत्र पाहा– "तुम्ही पूर्वी तांब्राकडे होतात. ऐसीयासि स्वामीचे राज्य म्हणजे देवताभूमि. या राज्यास तांब्राचा उपद्रव न व्हावा, महा-राष्ट्र धर्म राहावा, स्वामीच्या राज्याची अभिवृद्धि व्हावी या उद्देशे स्वामीच्या पायाशी एकनिष्ठता धरून, कर्नाटकात चंदीचे मुक्कामी स्वामीपाशी आलेत. येऊन विनंती केली कीं आपणांस सरदेशमुखीचे वतन करून दिले पाहिजे. ऐसी-यासी तुम्हो स्वामी सेवेवरी एकचित्ते वर्तत आहोत. तुम्हांवर स्वामी कृपाळ होऊन नूतन सरदेशमुखीचे वतन सदरहू बारा महालांचे करून दिले असे." जसा नागोजी माने तसाच सूर्याजी पिसाळ. याने रायगड मध्यस्थी करून मोगलास हस्तगत करून दिला व वाईच्या देशमुखीचे फर्मान औरंगजेबाकडून मिळविले. जिंजीच्या वाटेवर झुल्फिकारखानाबरोबर तो असताना ते बादशाही फर्मान त्याच्या हाती पडले. पण तोपर्यंत वाई मराठ्यांनी जिंकलेली पाहताच सूर्याजी पिसाळाने तडक झुल्फिकारखानाकडे पाठ फिरविली व राजारामाशी संधान बांधले की, "आपण वाईचा देशमुख आहे, आपणापाशी पातशाही सनद आहे. त्याप्रमाणे महाराज आपली सनद देतील तरी आपण येतो, कितेक कार्यप्रयोजन करून देतो." राजारामाने तशी सनद करून तर दिलीच, पण वर "अलीकडे स्वामीचे पायापासीही येकनिष्ठा धरून संनिध येऊन सेवा करीत आहेत–" अशी सूर्याजीची भलावण केली. अर्थात् यांची 'स्वामीच्या पायाशी येकनिष्ठा' काय किंमतीची होती हे पुढे जसे प्रसंगाने निदर्शनास आले तसे स्वामीही जाणूनच होते. पण मोगलांची माणसे फोडणे हे माणसे मारण्याइतकेच राजनीतीचे महत्त्वाचे कलम आहे हीही गोष्ट ते जाणून होते. म्हणूनच त्यांनी मोठ्या समाधानाने सर्जेराव जेध्याला लिहिले की, "तिकडून तमाम मराठे लोक होते ते आपले जमावानसी आम्हांकडे येताती. यैसे गनिमाचे लष्कर आटोन हुजूर जमाव होत आहे

ईश्वर करितो तरी फत्तेच आहे–" राजारामाप्रमाणे झुलिफकारखानही या भेदनीतीचे महत्त्व जाणून होता. त्याने राजारामास मिळालेला कुतुबशाहीतील पूर्वीचा सरदार इस्माइलखान मखा याला फोडून आपणांकडे आणले. याच इस्माइलखानाने गुर्रमकोंडयाजवळ झुलिफकारखानाला अडविले होते. झुलिफकारखानाने त्याला खान ही पदवी व पांच हजारी मन्सब औरंगजेबाकडून देवविली. त्याच्या भावांनाही मन्सबी देवविल्या. पण राजारामाच्या तुलनेने झुलिफकारखानाला माणसे फोडण्यात यश आले नाही. राजारामाच्या म्हणण्याप्रमाणे खरोखरच गनिमाचे लष्कर आटू लागले. आधीच तळयात पाणी थोडे, त्यात कडाक्याचा उन्हाळा पडून ते कोरडे ठणठणीत पडण्याची वेळ यावी तसे झुलिफकारखानाचे झाले.

त्यात मराठयांचे हल्ले व रसदेची टंचाई यान झुलिफकारखान अगदी कावून गेला. जिंजीच्या मैदानात मराठयांची फौज ठाण मांडून बसली होती. किल्ल्यातून त्यांचे रोज चोरटे हल्ले होतच होते. मोगलस्वारांना छावणीच्या बाहेर चोवीस मैल आपल्या घोडयांना चरण्यासाठी घेऊन जावे लागे. ही चरणारी जनावरे व मोगलांकडचे सामान मराठे लुटून नेत. दररोज चकमकी झडू लागल्या. खानाने जिंजीवर डागलेल्या व किल्ल्यांतील लोकांनी खानावर डागलेल्या तोफांचे आवाज पाँडेचरी येथे मोजता येऊ लागले. खानाने लढण्यात कसूर केली नाही पण खायला नसल्यामुळे तो टेकीस आला. त्याने कांचीचा फौजदार अलीमर्दानखान याला बोलावून आपली छावणी मजबूत केली व तंजावर व त्रिचनापल्ली येथील जमीनदारांकडूनही खंडण्या वसूल केल्या. पण पल्ला पोचेना. तेव्हा औरंगजेबाने सय्यद लष्करखान यास त्याने हुजूरातून खजिना व आसदखानाकडून रसद घेऊन झुलिफकारखानास पोचवावी असा हुकूम केला. त्यावर झुलिफकारखानाने काही दिवस रेटले. पण पुढे इलाज चालेना. औरंगजेबाकडे हरकाऱ्यांनी लिहून पाठविले की, "झुलिफकारखान हा किल्ल्याला वेढा घालून होता. त्या वेळी हलकट गनिमांनी झुलिफकारखानावर हल्ले करून त्याच्या फौजेवर एकच गर्दी केली. झुलिफकारखानाच्या सैन्याला रसद पोचेनाशी झाली. कुमक मिळाल्यास हे अवघड काम सोपे होईल." ही बातमी मिळाली म्हणून तर औरंगजेबाने खजिना व रसद सय्यद लष्करखानाबरोबर झुलिफकारखानाकडे रवाना केली. पण त्यानंतर बातमी आली ती औरंगजेबाच्या मनात झुलिफकारखानाच्या कर्तृत्वाबद्दल जो भ्रमाचा भोपळा फुगत चालला होता, त्याला काहीशी टाचणी लावण्यासारखी होती. "झुलिफकारखानाच्या लष्करात धान्याची महर्घता झाली. सैन्याचा निर्धार टिकणे शक्य झाले नाही. त्यामुळे झुलिफकारखानाने जिंजीच्या समोरील मोर्चे सोडून देऊन बारा कोस माघार घेतली आहे." तेव्हा औरंगजेबाने आपला वजीर आसद-

खान व मुलगा कामबख्श यांना तावडतोब जिंजीला जाण्याची आज्ञा केली. आसदखान या वेळी कडाप्पा प्रांतात आंध्रात होता; व कामबख्श वाकीणखेडयाला वेढा घालून बसला होता.

या वेळी एक मोठा मजेदार प्रसंग घडला. आसदखान हा झुल्फिकार-खानाचा बाप. वेळी अवेळी आपले पुत्र वात्सल्य प्रकट करण्याची आसदखानाला मोठी खोड होती. पण या वेळी बादशहाचे पत्र येऊनही तो जो कडाप्याला ठिय्या देऊन बसला होता, तो काही हलेना. चेंगटपणाने तेथेच रेंगाळत राहिला. तेव्हा औरंगजेबाने संतापून त्याला दुसरे पत्र लिहिले. पत्र सांगत असताना तो पत्र लेखकाला म्हणाला "आपले आपल्या मुलावर अत्यंत प्रेम आहे असे आसदखान म्हणत असतो. या वेळी झुल्फिकारखान विलक्षण पेचात सापडला आहे, आणि आसदखान हा त्याच्या मदतीला धावून जाण्यात आळस आणि विलंब करीत आहे. जणू काही त्याला म्हणावयाचे आहे.

" मलिकुलमौतमन न महस्ती अम्
मन चके पीरजाले मिहनती अम्"

'बा म्हत्यो, मी कोणी मोठा मनुष्य नाही. कष्टाने पीडित असलेला मी एक वृद्ध मनुष्य आहे.' ही कविता म्हणून दाखवून औरंगजेब म्हणाला, 'टेंभा मिरविणे वेगळे आणि म्हटल्याप्रमाणे काम करून दाखविणे वेगळे" आणि औरंगजेबाला आसदखानाच्या आणखी एका बढाईची आठवण झाली. आपण तुर्क आहोत या गोष्टीची आसदखानाला फार घमेंड होती. आपल्या मित्रमंडळीत तो एकदा म्हणाला होता, "बादशहानी मला अद्याप कामगिरी सांगितली नाही. माझी एखाद्या मोहिमेवर नेमणूक तर होऊ द्या आणि मग बघा हा तुर्क काय करून दाखवितो ते." आसदखानाचे हे शब्द त्या मित्रांपैकीच एका उद्योगी आणि बातमीदार मित्राने इमाने इतबारे खावंदांच्या कानी पोचते केले. आता मोहिमे-वर नेमणूक झाली व हा जाण्याची टाळाटाळ करतो आहे व तरी स्वतःला 'तुर्क' म्हणवितो आहे. अशा स्थितीत त्याला चिमटा काढण्याची संधि औरंगजेबा-सारखा चतुर मनुष्य थोडीच सोडणार? त्याने बादशाही ग्रंथालयाच्या व्यवस्थापकाला बोलावून विचारले – तुर्की तमाम शुद (तुर्कांची मर्दुमकी संपली) ही काय म्हण आहे बरे ?'

तो एका कवितेच्या ओळीचा अर्धा तुकडा होता. ग्रंथालयाचा व्यवस्थापक कबिलखान याने ती संपूर्ण ओळ म्हणून दाखविली.

'दीगर बखुद मनाज़ के तुर्की तमाम शुद' यापुढे स्वतः वर गर्व करू नकोस तुझी तुर्की (मर्दुमकी) सगळी संपली.

औरंगजेबाने आसदखानाला फर्मान पाठविले त्यात ही ओळ मुद्दाम घालण्यात आली. 'दीगर बखुद मनाज़ के तुर्की तमाम शुद!'

पत्र लेखनात औरंगजेब मोठा दर्दी. त्याच्या लिहिण्याचा परिणाम झाला. आसदखान काही कमी शहाणा नव्हता. औरंगजेबासारख्या धन्याची वजिरी त्याने सांभाळली यापेक्षा त्याच्या शहाणपणाचा कोणता पुरावा पाहिजे? त्याला कविता उत्तम समजलीच. पण कविता आपल्याला पाठविण्यामागचा ओरंगजेबाचा उद्देश त्याहूनही उत्तम समजला. त्याने तावडतोब कडाप्याहून मुक्काम हलविला; व कामबख्शासह जिंजीकडे प्रयाण केले. जिंजीपासून साठ मैलांवर सुदम येथे त्यांनी मुक्काम केला व दतियाचा राव दलपत बुंदेला याच्याबरोबर खजिना व रसद देऊन झुल्फिकारखानाकडे त्याला रवाना केले.

तो मार्ग अतिशय दुर्गम होता. वाटेत घनदाट अरण्य होते. पूर्वी त्यातून जाण्यास वाट नव्हती पण मोगल लष्कराच्या जाण्यायेण्यामुळे वाट तयार झाली होती. पण त्यावरून घोडेस्वार मोठ्या मुष्किलीने जाऊ शकत. हत्ती आणि सामानाचे उंट यांना तर अतिशय त्रास होत असे. वाटेने दोन्ही बाजूंनी प्रचंड वृक्ष असून कांटेरी जंगलांची तर गणतीच नव्हती. वाट सोडून कोणी डावीकडे किंवा उजवीकडे जाऊ म्हणेल तर ते अशक्य होते. सुदमपासून कांचीपर्यंतची ही चाळीस कोसांची वाट म्हणजे एक अखंड जंगल होते.

ती वाट मोठ्या शर्थीने पार करून राव दलपत कांचीस आला. कांचीचा फौजदार अलीमर्दानखान याच्यासह तो जिंजीस पोचला. औरंगजेबाचे पत्र घेऊन मतलबखान येत होता. त्याच्या स्वागतासाठी झुल्फिकारखान पुढे आलाच होता. त्याची व राव दलपतची गाठ पडली. उपासमारीने बेजार झालेल्या मोगलांना राव दलपतचे आगमन म्हणजे ग्रीष्माने तडकलेल्या धरणीवर बरसलेल्या पावसाच्या धारांप्रमाणे वाटले. मागाहून कामबख्श व आसदखानही आले. मोगलांनी आता नव्या दमाने जिंजीला वेढा घातला. नवीन मोर्चे बसविण्यासाठी मोगलांनी मातीची असंख्य पोती तयार केली. कृष्णगिरीहून सिंधवरमच्या डोंगराकडे जाण्याच्या वाटेवर कामबख्श व आसदखान यांनी आपल्या छावण्या दिल्या. झुल्फिकारखानाची छावणी तेथून दीड कोसावर होती. तिघांच्याही छावण्याभोवती भिंती बांधण्यात आल्या. जिंजीच्या किल्ल्यामागें कर्नाटक गडाच्या वाटेवर इस्माइलखान मखा व इतर सरदार यांची ठाणी बसविण्यात आली. सैतानदरीच्या दिशेने किल्ल्याला एक लहानसा दरवाजा होता. तेथून लागूनच असलेल्या वेतावळमच्या जंगलातून किल्ल्यात रसद पोचत असे. म्हणून त्या बाजूला कामबख्शाच्या सैन्यातील काकरखान या सरदाराची नेमणूक करण्यात आली.

जिंजीभोवती मोगलांचे प्रचंड सैन्य गोळा झाले. पण मराठ्यांचा हुरूप कायम होता. ते रोज रात्री कामबख्शाच्या छावणीत घुसून जळते बाण फेकीत. तेव्हा झुल्फिकारखानाने स्वत:च्या सैन्यातील सरदारांना कामबख्शाच्या छावणीभोवती तैनात केले. त्या वेळेपासून मराठ्यांचे कामबख्शाच्या छावणीवरील हल्ले थांबले... पण एके दिवशी रात्री पांचसहा हजार मराठ्यांनी किल्ल्याच्या बाहेर पडून सरळ मोगल सैन्यावर हल्ला केला. तो राव दलपत व झुल्फिकारखान यांनी परतवला. पण मराठ्यांच्या हल्ल्याचा धोका कायम होताच. म्हणून कामबख्श व आसदखान यांच्या छावण्या सिंधवरमच्या टेकडीवरून हलवून झुल्फिकारखानाच्या छावणा-पाशी नेण्यात आल्या.

मोगल आणि मराठे यांच्या चकमकी सारख्या चालू होत्या. मराठे मोगलांच्या मोर्चावर हल्ले करीत व ते उद्ध्वस्त करून टाकीत. झुल्फिकारखान एकदा छावणीच्या बाहेर गेला. त्याने तीन हजार स्वार बरोबर घेतले व मुलखात लुटालूट चालू केली. पुष्कळसे जनावरांचे कळप पकडून आणले व त्यांची विक्री करण्यास आरंभ केला. झुल्फिकारखान बाहेर गेलेला पाहताच मराठ्यांनी मोग-लांच्या छावणीवर हल्ला चढवून घोडे, दारूसामान अशी पुष्कळ सामग्री पकडून घेतली. मोगलांकडून किल्ल्यावर व किल्ल्यांतून मोगलांवर तोफांचा भडिमार चालूच होता. पाँडिचरीचा गव्हर्नर मार्टिन लिहितो, "पुलिकत पावेतों हा प्रलय उठला आहे. सर्वस्वाचा विध्वंस होत आहे. मराठ्यांची रसद बंद करावी म्हणून जिंजीच्या दक्षिण बाजूने मोगलांनी किल्ल्यावर जोराचा मारा चालविला. त्या बाजूला निवडक फौजांचा तांडाही वसविला. पण राजारामाशी झुल्फिकारखानाचे सूत असल्यामुळे रात्रीच्या वेळी किल्ल्यात खुशाल सामान जाते!" अशी नोंद पाँडेचरीचा फ्रेंच गव्हर्नर मार्टिन याने करून ठेवली आहे! तो पुढे म्हणतो— "मराठ्यांना किल्ल्याच्या पश्चिम बाजूने खडकांतून व जंगलांतून रसद भरपूर मिळण्याची सोय असल्याने वेढ्यांचा परिणाम घडत नाही. मोगलांनी वारंवार हल्ले चढविले. एका बुरुजात खिंडार पडले. त्यातून प्रवेश करून मोगलांनी जम बसविला. परंतु तो सफल झाला नाही. त्यांचे पुष्कळ लोक जाया होऊन त्यांस माघार घ्यावी लागली." सप्टेंबरात मराठ्यांनी मोगलांवर दोनदा हल्ला चढवून यश मिळविले. एक तीन हजारी उमराव ठार मारला. त्याचे पाच हजार बैल सामग्री लादलेले होते. त्यातील तीन हजार मराठ्यांनी पळविले. हा पावसाळ्याचा काळ होता. भयंकर पाऊस पडू लागला. मोगलांना टेकड्यांवरून ये-जा करावी लागे. लष्करात धान्य फार महाग झाले. रात्रंदिवस मोर्चात काळ कंठावा लागे त्यामुळे त्यांचे कमालीचे हाल झाले. 'पावसाळ्यामुळे भोवतालचा सर्व प्रदेश पाण्याखाली बुडल्याप्रमाणे वाटे. जणू काय एक प्रचंड तलावच पसरला आहे!

अशातच मोगल छावणीजवळचा एक तलाव फुटला व त्यात माणसे, जनावरे, तंबू, धान्य सामग्री पुष्कळ गमावली. पण आकाशातला पाऊस व समोरचे मराठे यांना नेटाने तोंड देत मोगल फौजा अखेर ऑक्टोबरात जिंजीच्या तटापर्यंत भिडल्या.

मराठे अजूनही मोगलांना शौर्याने तोंड देतच होते पण केवळ शौर्याने हा प्रश्न सुटण्यासारखा नव्हता. त्याला महाराष्ट्रातून कुमक यायला पाहिजे होती आणि ती तर पत्रांवर पत्रे पाठवूनही येता येत नव्हती. तेव्हा राजारामाने मुधोजी नाईक निंबाळकर याला निकरावर येऊन लिहिले—

" उपरि कर्नाटक प्रांत गनिमांनी सख्ती बहूत धरून भोवताली स्थळे घेतली. सांप्रत बेटवलही पालेगाराचे भेदेंकरून गनिमाने हस्तगत केले. स्वामीचे लोक झाडीत होते ते एकाएकी गनीम पैसाला देखोन निघोन आले. या उपरि आणि अगर उदिया इतकियात चंदीचे तटाजवळ येऊन कोटास बिलगोन येलगारच करणार हावभरी बहूत जाला असे. ऐशास येथे हिंदुराऊ घोरपडे ममलकतमदार समशेरबहाद्दूर हे आदिकरून स्वामीसंनिध आहेती. यानी निदान जाणोनु साफ करावयाची नियत धरून राहिले आहेत हे गनिमास नतिजा पावावयाचा तैसा पाववितील. गुमान धरीत नाहीत. परंतु गनिमास मारून घालवावे, फौज बुडवावी या गोष्टीस देशीची फौज आली पाहिजे. त्यास फौज घेऊन येणे म्हणून राजश्री संताजी घोरपडे सेनापती व राजश्री धनाजी जाधवराऊ सरलष्कर यांस व तुम्हांस पत्रे उदंड पाठविली. परंतु अद्याप फौज घेउनु येता दिसेनासे जाले आहे. येथे तो निदान प्राप्त आहे. तरी येका महिन्यात फौजेनसी येता तरी राज्य राहाते. स्वामी समाधान पावताती. तुम्हा लोकांस येश येते. जरी फौजेस यावया विलंब लागतो तरी महिन्याउपरी उबार नाही. राज्य बुडते. मग तुम्ही स्वामीचे सेवक असोन कोण प्रयोजनाचे ? स्वामी आपले राज्यरक्षण करावयाचे तसे करतील, परंतु तुम्हा लोकांचे बरे होणार नाही. हा निर्वाह जाणोन जरी स्वामी समाधान पावावे, आपले बरे करून घ्यावे असे असेल तरी आपल्या जमावानसी राजश्री धनाजीराऊ जाधवराऊ सरलष्कर उमदेउलमुल्क याजबराबरी स्वार होउनु येणे. विलंब न करणे...."

राजारामाच्या या पत्राप्रमाणे डिसेंबर १६९२ च्या सुमारास धनाजी जाधव आठ हजार स्वारानिशी जिंजीस येऊन दाखल झाला. धनाजी येतो हे कळताच मोगलांनी विचार केला की मराठ्यांची फौज अधिक आहे. मोगलांची ठाणी किल्ल्याभोवती पसरली होती. कोणत्याही ठाण्यात शत्रूशी मुकाबला करू शकेल इतकी फौज नव्हती. म्हणून मराठ्यांची फौज येऊन पोचण्यापूर्वीच ठाणेदारांनी आपापली ठाणी काढून घ्यावी व मुख्य मोगल फौजेला येऊन मिळावे असे हुकूम पाठविण्यात आले. त्याप्रमाणे जिंजीच्या उत्तरेस दोन मैलांवर सिंधवरमच्या

ठाण्यावर असलेला सय्यद लष्करखान आणि सैतानदरीच्या बाजूस पश्चिम दरवाजाच्या ठाण्यावर असलेला काकरखान रातोरात झुल्फिकारखानाच्या मुख्य छावणीत येऊन दाखल झाले. इस्माइलखान मखा याचे ठाणे दूर, जिंजीच्या किल्ल्यामागे कर्नाटकगडाच्या वाटेवर होते, त्याला लष्करात वेळेवर दाखल होता आले नाही. त्याच्या सैन्यातील लोक सामानसुमान हलविण्यात गुंतल्यामुळे पांगले होते. एवढ्यात त्याला धनाजी जाधव चालून येत असल्याची बातमी लागली. त्याने आपले पांगलेले सैन्य एकत्र केले व तो मुख्य तळाची वाट चालू लागला.

तोंच धनाजीने त्याला अडविले. त्याच वेळी किल्ल्यातील मराठे बाहेर पडले. दोन्ही सैन्ये त्याच्यावर तुटून पडली. इस्माइलखान लढत झगडत कसाबसा सैतानदरीपर्यंत पोचला. एवढ्यात अंधार पडला. पुढे जाणे जमेना. त्याच्या सैन्यातले काही लोक मोगल छावणीकडे निघाले. पण मराठ्यांनी त्यांना वाटेतच कैद करून घेतले. खुद्द इस्माइलखान लढत असता जखमा लागून आपल्या हत्तीवरून खाली पडला. मराठ्यांनी त्याला धरले व जिंजीच्या किल्ल्यात नेले. मराठ्यांकडे त्या वेळी याचप्पा नायक नावाचा सरदार होता. त्याची व इस्माइलखानाची फार जुनी ओळख होती. तो व इस्माइलखान दोघेही आता विलीन झालेल्या कुतुबशाहीचे सरदार होते. राजारामाला सामील होऊन यांनीच गुर्रमकोंड्यावर झुल्फिकारखानाला अडविले होते. पूर्वीचा ऋणानुबंध स्मरून याचप्पा नायकाने इस्माइलखानाच्या जखमावर औषधोपचार करविले व तो बरा झाल्यावर त्याची सुटका करवून त्याला झुल्फिकारखानाकडे परत पाठविले.

इस्माइलखानाचा पाडाव केल्यामुळे जिंजीचा पश्चिम दरवाजा मराठ्यांना मोकळा झाला. या दरवाजापुढेच इस्माइलखानाचे ठाणे होते. तो तेथून कोणतीही रसद मराठ्यांना जाऊ देत नसे. पण त्याचा पाडाव झाल्यावर मराठ्यांचा किल्ल्यात निर्विघ्न प्रवेश झाला व पुष्कळशी लूट त्यांनी आत पोचविली. दोन हत्ती, पाचशे घोडे, पुष्कळसे सामान व कैदी मराठ्यांनी मोगलांचे पकडून घेतले. इस्माइलखानावर हल्ला झाल्याची बातमी आल्यावर झुल्फिकारखानाने राव दल्पतला त्याच्या कुमकेस जाण्यास सांगितले. राव दल्पतने कळविले "मी त्याच्या रक्षणास जाईन. मी येथे मोर्च्यावर आहे. मोर्च्याच्या संरक्षणासाठी कोणाला तरी पाठवा." पण तेवढ्यात इस्माइलखानाला कैद झाल्याची बातमी येऊन थडकली. झुल्फिकारखान काहीही करू शकला नाही. धनाजीने आणलेली नवीन फौज दोन तीन दिवस किल्ल्यात राहिली. नंतर त्यांनी एकदम मोगलांवर हल्ला केला. मोगलांच्या चौदा पितळी, तोफा, दोन हत्ती आणि सगळा दारूगोळा मराठ्यांनी काबीज केला. आणि ही सारी लूट किल्ल्यात नेली.

धनाजीने असा प्रलय उडवून दिला असता मोगलांच्या छावणीतील कामबख्श, आसदखान व झुल्फिकारखान या उच्चपदस्थांत निराळीच धुमश्चक्री चाललेली होती. कामबख्शाला औरंगजेबाने झुल्फिकारखानाला मदत करण्यासाठी म्हणून मुद्दाम जिंजीला पाठविले, पण त्याने निराळाच प्रकार आरंभिला. कामबख्शाचे मुख्य भांडवल म्हणजे त्याचा बाप बादशहा होता हे होय आणि ते मोठेच भांडवल होते. आधी तो चढेल वृत्तीचा होताच. त्यात खुशामतखोरांनी त्याला आणखी हरभऱ्याच्या झाडावर चढवून ठेविले होते. कडाप्याहून जिंजीपर्यंतचा प्रवास कामबख्शाने घोड्यावर केला. कामबख्श तरणाबांड माणूस. त्याला घोड्या-वरच्या स्वारीचे काय होय? पण त्याच्याबरोबर घोडदौड करीत असताना बुढ्ढ्या आसदखानाच्या मात्र कमरेचा काटा ढिला झाला. बरे शिष्टाचारामुळे आसदखान नकारही देऊ शकला नाही. पण मनातल्या मनात तो कामबख्शावर फार नाराज झाला. जिंजीला आल्यावर आसदखान व झुल्फिकारखान आणि कामबख्श यांच्यातील थंडे युद्ध वाढतच गेले. कारण एकमेकांच्या चहाड्या सांगून कलागती लावणाऱ्या हितचिंतकांचा दुष्काळ जिंजीलाही नव्हताच. तशात मराठ्यांच्या फौजा येत आहेत असे ऐकून आपल्या शहाण्या कारभाऱ्यांच्या सल्ल्यान कामबख्शाने ठरविले की मराठ्यांशी सल्ला करावा, आणि आसदखान व झुल्फिकारखान यांना कैद करून आपली बाजू बळकट करावी. कामबख्शाच्या या निर्णयाला आणखी एक कारण होते की मराठ्यांच्या धामधुमीमुळे औरंगजेबाची छावणी व जिंजी येथील दळणवळण साफ तुटले होते. रसद, टपाल, बातम्या काही एक येत नसे. त्यामुळे सगळ्या छावणीत बातमी पसरली की औरंगजेब मेला. चांगली चांगली माणसे या बातमीने भांबावून गेली. राव दल्पत एवढा अनुभवी, पण ज्या दिवशी त्याने औरंगजेबाच्या मृत्यूची बातमी ऐकली त्या दिवसापासून त्याने शस्त्र धारण करणे सोडून दिले होते. तो बोलला "देव न करो. पण बादशहाच्या मृत्यूची बातमी खरी ठरली तर मी सरदारी व नोकरी सोडून देईन व एकांतवास पतकरीन." राव दल्पतच्या मानाने कामबख्श म्हणजे कालचे पोर होते. बादशहाचा मृत्यू म्हणजे राज्यक्रांतीचा प्रारंभच होता. तेव्हा मराठ्यांशी सलोखा ठेवणे व आसदखान व झुल्फिकारखान यांना कैद करून आपली बाजू भक्कम करणे हे मार्ग त्याच्या दृष्टीने योग्यच होते. त्याचा व राजारामाचा गुप्त पत्रव्यवहार सुरू झाला. 'दुष्ट शत्रूंना' (मराठ्यांना) या गोष्टीमुळे चांगलेच उत्तेजन मिळाले. त्यांनी शहाजाद्याला गोड गोड पत्रे लिहून भडकविण्यास सुरुवात केली कामबख्शाने आपले सैन्य तयार ठेवले व जनान्यासाठी स्वाऱ्या वगैरेची व्यवस्था केली.

पण आसदखान व झुल्फिकारखान हे बापलेक काही कमी वस्ताद नव्हते. ते कामबख्शाच्या बारशाला जेवले होते. कामबख्श आपल्याकडून खूप गुप्तपणे मराठ्यांशी वाटाघाटी करीत होता. पण त्या सर्वांची बित्तंबातमी झुल्फिकार-

...४

खानाला लागत असे. कारण त्याचेही हेर किल्ल्यांत होते. त्यांच्यावर दर दिवसाला तो एक हजार रुपये खर्च करीत असे. आसदखानाला कामबख्शाचा बेत समजल्यावर त्याने त्याच्याकडे निरोप पाठवून विचारले की "रात्रीच्या वेळी स्वाऱ्या वगैरे तयार करण्याचे कारण काय?" कामबख्शाने थाप मारली, "हेरांनी बातमी आणली आहे की मराठे रात्रीच्या वेळी छावणीवर हल्ला करणार आहेत." आसदखानाने कळविले की " ही बातमी खोटी आहे. चौक्या पहाऱ्यांवर माणसे आहेत. तुम्ही स्वाऱ्या तयार करणे अयोग्य आहे." कामबख्शाला समजले की आसदखान सावध आहे. त्याने आपला बेत पुढे ढकलला.

ही रात्रीची वेळ होती, आसदखानाने झुलफिकारखानाला सर्व बातमी कळविली. झुलफिकारखान मोर्चात होता. त्याला ताबडतोब छावणीवर येता येईना. ती सारी रात्र त्याने चिंतेत जागून काढली. सकाळ उजाडली. मोर्चे सोडून निघून जाण्याचे ठरविले. पण तोफा हलविता येईनात. तेव्हा तोफात सपाटून दारू आणि गोळे घालून त्या उडविण्यात आल्या त्यामुळे त्या फुटल्या आणि त्या वाहून नेण्याचा प्रश्न कायमचा सुटला. मोगलांनी मोर्चे सोडलेले पाहताच मराठे किल्ल्यावरून खाली उतरले व त्यांनी सगळे मोर्चे उद्ध्वस्त करून टाकले.

पण त्या गोष्टी झुलफिकारखानाच्या खिजगणतीत नव्हत्या. कामबख्शाने त्याच्या जिवाला घोर लावला होता. तो व त्याचा बाप आसदखान हत्तीवर स्वार होऊन तडक कामबख्शाच्या तंबूत गेले. तंबूच्या कनाती त्यांनी फाडून टाकल्या. कामबख्श घाबरला व महालात घुसून जनाना देवडीच्या दरवाजाने तो बाहेर पडला. पण तो काही पावले गेला नसेल तोंच जलालखानाच्या बंदुकच्यांनी त्याचे दोन्ही हात धरले व पायांत जोडा नाही अशा स्थितीत ते त्याला आसदखानापुढे आणू लागले. तेवढ्यात राव दलपतने त्याला आपल्या हत्तीवर तडफेने घेतले. चोहोकडे एकच गोंधळ माजला होता. राव दलपतने कामबख्शाला आसदखानापुढे आणले. आसदखान म्हणाला, 'तुम्ही ऐकलेल्या (औरंगजेबाच्या मृत्यूच्या) बातम्या खोट्या आहेत बादशहा सुखरूप आहे. तुम्ही हे काय करून बसलात? यात तुमची फजिती झाली. माझे केस पांढरे झाले आहेत. या वयात तुम्ही माझी पण फजिती केलीत!"

आसदखानाने आपल्याजवळच कामबख्शाचा तंबू दिला. त्याच्या भोजनाची व्यवस्था त्याने स्वत: करविली व स्वत: त्याच्या समोर भोजनाची ताटे मांडली. त्याने सर्व शिष्टाचार सांभाळले, पण कामबख्शाला कडक निर्बंधात ठेवले. अशा प्रकारे मोगल छावणीत काही काळ धमाल उडवून दिलेल्या या 'लोक-नाट्या'वर पडदा पडला. वस्तुत: कामबख्श, आसदखान व झुल्फिकारखान या तिघांनी संगनमताने राजारामाला पकडावे ही औरंगजेबाची रास्त अपेक्षा होती. ती राहिली बाजूलाच आणि हे तिघेच एकमेकांना पकडायचा खेळ खळू लागले! त्यात आसदखान व झुल्फिकारखान हे जास्त शहाणे म्हणून घोड्याप्रमाणे उधळलेल्या

कामबख्शाला त्यांनी अखेर ठाणबंद केले. औरंगजब मराठ्यांना 'चोर' म्हणत असे पण चोर साखसुरत सुटले आणि त्यांच्या पाठलागावर धावणारे मोगल 'पोलीस'च एकमेकांना चोर म्हणून पकडू लागले. झुल्फिकारखानाची ही केविलवाणी परिस्थिति पाहून एखाद्याला हसावे की रडावे हे कळले नसते. खरी 'ट्रॅजि-कॉमेडी!'

घरात वाभाडे काढणारी बायको आणि बाहेर वसुलीसाठी घेराव घालणारे देणेकरी या दोन्ही आघाड्यांवर एकाच वेळी धडपडणाऱ्या दुर्दैवी इसमाप्रमाणे छावणीत कामबख्श आणि छावणीच्या बाहेर धनाजी या दोघांना तोंड देता देता बिचाऱ्या झुल्फिकारखानाच्या तोंडाला अगदी फेस आला. त्या अरिष्टातून सावरून कोठे दम घेतो न घेतो तोंच धनाजीच्या मागोमाग संताजी आला म्हणून बोंब उठली आणि मोगलांची घाबरगुंडी उडाली. आणि मोगलांची घाबरगुंडी उडावी अशीच संताजीची आजपर्यंतची कीर्ति होती. औरंगजेबाच्या नामांकित सेनापतींची संताजीने आजपर्यंत बोल बोल म्हणता चटणी उडविली होती. कर्नाटकाच्या सरहद्दीवर जाननिसारखानाला त्याच्या सैन्यासह त्याने दस्त केले होते. बेसावध संभाजीवर छापा घालून त्याला पकडण्याची बहादुरी गाजवणाऱ्या मुकर्रबखानाला त्याने पळता भुई थोडी करून सोडली होती. सिंहासारख्या पराक्रमी असलेल्या सर्जाखानाला बैलोबाला दावणीला बांधून ठेवावे त्याप्रमाणे आपल्या कैदेत डांबून ठेवले होते. हेचसे काय, पण हे सारे खान आणि बहादुर ज्याच्यापुढे रुमालाने हात बांधून थरथरा कापत उभे असत, त्या सर्वांचा बाप असलेल्या कर्दनकाळ औरंगजेबाच्या शाही तंबूवर सरळ छापा घालून त्याच्या तंबूचे सोन्याचे कळस उपटून नेले होते. खरे म्हणजे या वेळी औरंगजेबाचे डोकेच तुटायचे. पण पूर्वी शिवाजीमहाराजांच्या वेळी ज्याप्रमाणे त्याचे मामासाहेब शाहिस्तेखान यांचे मस्तक तुटावयाऐवजी बोटे तुटली, त्याप्रमाणे या वेळी औरंगजेबाच्या मस्तकाऐवजी त्याच्या तंबूच्या कळसावर निभावले. या गोष्टी जुन्या झाल्या म्हणून की काय, या वेळी येता येता संताजीने जिंजी अलीकडे कांचीचा फौजदार अलीमर्दानखान याचा साफ फन्ना उडविला होता.

अलीमर्दानखान ऊर्फ हुसेनीबेग हैद्राबादी हा सहा हजारी मन्सबदार होता. मोगलांकडे येणारी रसद व युद्धसामग्री पोचविण्याच्या कामावर त्याची नेमणूक झाली होती. तो पुष्कळशी रसद आणीत असता त्याची पाळत राखून संताजीने एकदम त्याच्यावर छापा घातला. संताजीपाशी फौज बेताची होती. पण समग्र क्षेत्राची रचना लक्षात घेऊन त्याने मोगलांस कोठे कसे अडविता येईल याचे बरोबर डावपेच आखले. मोगल आटोक्यात आले अशी खात्री होताच त्याने हूल दाखविण्यासाठी सैन्याचा एक भाग मागे फिरविला व दोनतीन हजार स्वारांनिशी स्वतः अलीमर्दानखानावर चालून गेला. संताजीपाशी थोडेच लोक आहेत अशा कल्पनेने खान त्याच्यावर चालून आला. संताजीने पळ काढल्याचा देखावा केला

व खानास विकट जागी आणले. तेवढ्यात संताजीच्या पहिल्या तुकडीने येऊन खानास वेढा घातला. कित्येक तास निकराची लढाई चालली. अलीमर्दानखान घाबरला आणि कांचीकडे पळत सुटला. त्याचे मातबर सरदारही त्याच्याबरोबर पळू लागले. पण संताजीनें त्या सर्वांना कैद केले व जिंजीच्या किल्ल्यात नेले. त्या सर्वांकडून भरभक्कम दंड वसूल केला व मगच त्यांना सोडले. एकट्या अलीमर्दानखानाला दोन लाख रुपये ओकावे लागले. मग बाकीच्यांची काय कथा? याशिवाय हत्ती, घोडे, धान्य, रसद, सामान गमवावे लागले ते निराळेच. सैन्य येण्यापूर्वीच त्याच्या दुंदुभीने कानठळ्या बसाव्यात, त्याप्रमाणे संताजी येण्यापूर्वीच अलीमर्दानखानाच्या फजितीची वार्ता मोगलांच्या कानावर येऊन थडकली आणि त्यांची धाबी दणाणली.

अखेर संताजी आला आणि जिंजीच्या मैदानात मोगल आणि मराठे यांची धुमश्चक्रीची युद्धे सुरू झाली. पण मराठ्यांशी लढायला मोगलांपाशी फौज फार थोडी होती. होती ती अनेक ठिकाणी पांगलेली होती. काही छावणीच्या रक्षणासाठी, काही कामबख्शावर पहाऱ्यासाठी, काही आसदखानाच्या तैनातीत होती. याउलट जिंजीत असलेली फौज आणि संताजी-धनाजीबरोबर नवी आलेली फौज मिळून मराठ्यांची एकूण फौज कमीत कमी तीस हजार तरी होती. फ्रेंच गव्हर्नर मार्टिन याने मोगल व मराठा फौजेबद्दल आपल्या दैनंदिनीत मार्मिक अभिप्राय लिहून ठेविला आहे– "मराठ्यांची खडी फौज एकंदर दीड लक्ष असावी. भाले–तरवारी ही त्यांची हल्ला करण्याची हत्यारे, ढाल हे बचावाचे साधन. काहींच्या जवळ धनुष्यबाण आहेत पण ते अगदी थोडे. या बाबतीत मोगलांची सरशी मराठ्यांवर सहज आहे. मोगलांचा बंदुकीचा नेम मराठ्यांहून सरस असून त्यांचे धनुष्यबाणही जास्त मारक आहेत. मोगलांचा लढाऊ बाणा मराठ्यांना वरचढ वाटतो. तीनचार हजार मराठे स्वारांपुढे एक हजार मोगल कधी हटणार नाहीत. गुप्त छापे घालण्यात मात्र मराठे चांगले पटाईत आहेत. त्यामुळे त्यांना यश मिळते. तहानभूक सोसण्यात ते मोगलांना भारी. त्यांचे सामान हलके, खाणे थोडे पुरते."

मोगल जिंजीला वेढा घालण्यास आले होते. पण किल्ल्यातील मराठे व किल्ल्याबाहेरील मराठे यांच्या कात्रीत ते सापडले आणि तेच वेढ्यात सापडल्यासारखे झाले. धान्य, रसद, सर्पण, वैरण कोठूनही त्यांना मिळेना. मराठ्यांनी सगळ्या वाटा बंद करून टाकल्या. त्यामुळे मराठ्यांबरोबर उपासमारीचा आणखी एक शत्रु मोगलांपुढें उभा ठाकला. आणि त्याच्यापुढे मात्र त्यांनी हात टेकले. तीन वेळा झुल्फिकारखानाने लोकांच्या घरावरील गवत काढून आपल्या जनावरांना घातले, पण ते किती दिवस पुरणार? गवत घराच्या छपरांवर उगवत नाही, ते जमिनीवर उगवते हे साधे सृष्टिज्ञान झुल्फिकारखानासारख्या

समंजस माणसाला होते. म्हणून त्याने चोवीस मैलांवर असलेल्या वांदीवाश येथून रसद आणण्यासाठी तिकडे ससैन्य कूच केले.

वांदीवाश येथे वंजाऱ्यांपाशी बरेच धान्य साठविलेले होते. झुल्फिकारखान रात्री तेथे पोचला. पण रात्रीच्या अंधारात भुकेने वखवखलेल्या खानाच्या तुराणी शिपायांनी वंजाऱ्यांच्या अंगावर हात टाकला व धान्य लांबविण्यास सुरुवात केली. त्या लुटीतून शिल्लक राहिलेले धान्य घेऊन खान सकाळी जिंजीकडे परत फिरला. सोबतीला मराठे होतेच. त्यांनी चोहोंकडून निकराचे हल्ले चढविले व गोळ्यांचा असा पाऊस पाडला की मोगल सैनिक व त्यांच्याबरोबर असलेले वंजारी हवालदील झाले. मोगल सरदारांवर नेम धरून ते दुष्ट मराठे गोळ्या झाडू लागले. झुल्फिकारखान व राव दलपत यांच्या हत्तींना अनेक गोळ्या लागल्या. पण भीमसेन म्हणतो त्याप्रमाणे "खराखुरा वाचविणारा भगवान आहे." नाही तर मोगलांपाशी होते काय? त्यांचा दारूगोळा संपला होता. त्यांचे बरकंदाज नुसते चित्रासारखे उभे होते. त्यांचे हत्ती, घोडे, उंट व बैल चिखलात अडकले होते. शेवटी मोठ्या कष्टाने झुल्फिकारखान जिंजीस परत पोचला.

झुल्फिकारखान जिंजीहून वांदीवाशला गेला आणि वांदीवाशहून जिंजीला परत आला इतकेच. पण त्याच्या परिस्थितीत काही एक फरक पडला नाही. वांदीवाशहून आणलेली चिमूटभर रसद त्याच्या भुकेकंगाल सैनिकांनी केव्हाच खाऊन फस्त केली. पुढे काय? आता वेळ अशी आली की किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या मराठ्यांच्या तळावर मोगल सैन्यातले गरीबगुरीब व सामान्य माणसे जात व पैसे देऊन धान्य विकत घेत. मराठ्यांच्या तळावर धान्याची चंगळ होती. ते मोगलांना धान्य देत पण ते तेथेच शिजवून खाल्ले पाहिजे, कोणीही बरोबर नेता कामा नये आणि कोणासही दोन मापापेक्षा जास्त धान्य मिळता कामा नये या गोष्टीकडे डोळ्यात तेल घालून पाहात. कोणी दोन मापांपेक्षा धान्य जास्त नेताना दिसला की त्याला ते तेथल्या तेथे मारून टाकीत व त्याचे धान्य काढून घेत. अशा अटी पत्करून व वर स्वतःचे पैसे देऊन मराठ्यांकडन अन्न खायचे व त्याने आलेल्या तकव्याच्या जोरावर त्यांच्याशीच लढायचे अशी लाजिरवाणी वेळ मोगलांवर आली. याशिवाय रात्रंदिवस मराठे त्यांच्या छावणीभोवती पसरून धामधूम करीत ती निराळीच. "अशा स्थितीत एका दीनदयाळ परमेश्वराशिवाय मोगलांना कोणी त्राता राहिला नाही." मोगलांचे सारे उपाय हरले. अखेर मराठ्यांशी वाटाघाटी करून जिंजीसमोरून तात्पुरती माघार घेण्याचे ठरले. झुल्फिकारखान व आसदखान यांनी त्यासाठी राजारामाकडे आपले वकील पाठविले.

मराठ्यांशी चोरून मारून संधान ठेवतो म्हणून कामबख्शाला झुल्फिकारखानाने कैद केले हे ठीकच झाले. पण त्याच कारणासाठी कामबख्शाने झुल्फिकारखानाला कैद केले असते तर तेही तितकेच बरोबर ठरले असते. कारण झुल्फिकारखानही

काही कमी नव्हता. त्याचेही तेच उद्योग चालू होते. सबंध छावणीभर, झुल्फिकारखानाचे राजारामाशी आतून संधान आहे, हे उघडे गुपित होते. ही गोष्ट पाँडेचेरीचा फ्रेंच गव्हर्नर मार्टिन याच्यापर्यंत पोचली होती. तो म्हणतो-" झुल्फिकारखान मराठ्यांना अनुकूल असल्याची दाट बोलवा ऐकू येते. त्याचे वकील खुशाल राजारामाकडे जात येत असतात. उभयतांच्या वाटाघाटी चालतात. त्या वाटाघाटी गुप्त व काही राजरोस घडत आहेत."...पुढे तो म्हणतो, की, "झुल्फिकारखान व राजाराम यांचे अंतःसूत्र बनले आहे म्हणून जिंजी किल्ला काबीज करण्याची खानाची इच्छा नाही."

झुल्फिकारखान असा वागत होता. त्याच्यामागे धोरण होते व हिशेब होता॰ एकतर औरंगजेब ज्याप्रमाणे हेकटपणाने मराठ्यांची पाळेमुळे दक्षिणेतून उखडून काढण्यासाठी जीव तोडून धडपडत होता, तशी झुल्फिकारखानाची मुळातच प्रवृत्ति नव्हती. त्याच्या काळच्या आणि त्याच्या धन्याच्या मानाने तो खरोखरच मवाळ व समतोल वृत्तीचा मनुष्य होता. दुसरे असे की स्वतः औरंगजेबाला आपण जवळ जवळ अमर आहोत असे वाटत असले तरी त्याच्या सरदारांना तसे वाटत नव्हते. त्याला सध्या पंचाहत्तरावे वर्ष चालू होते व वयाच्या मानाने त्याच्या सर्व शक्ति शाबूत असल्या तरी त्याचे मरण फार दूर नव्हते ही गोष्ट उघड होती. अशा स्थितीत औरंगजेबाच्या मृत्यूनंतर दक्षिणेतच स्वतंत्र सोय पाहण्याचा विचार झुल्फिकारखानाच्या मनात घोळत असणे अगदी साहजिक होते आणि त्या दृष्टीने दक्षिणेतल्या सर्वांत बलिष्ठ अशा मराठ्यांना दुखविणे त्याला स्वार्थाच्या दृष्टीनेही परवडणारे नव्हते. तिसरे असे की संस्कृत इसापनीति जी 'पंचतंत्र' तिच्यात म्हटल्याप्रमाणे "राजाला आपली जरुरी नाही असे सेवकाने कधीही करू नये." "निष्प्रयोजनो स्वामी न कर्तव्यः" हे तत्त्व त्याला चांगले माहीत होते. चिटणिसाने म्हटल्याप्रमाणे "पादशहा बेनवा होऊन खानास लिहीत अद्याप मराठी मोडत नाही. जलद पारपत्य करून राजाराम हस्तगत करावा." यावरून झुल्फिकारखान याने विचार केला जे, "पादशहा बेनवा जाले; शत्रू यांस कोणी नाही. राहताना दक्षिणेतच मराठी मात्र राहिली आहे; हे राखोन करणे ते करावे. म्हणोन महाराजाकडेस संधान केले की, आमच्या गळां तुम्ही पडू नये. तुमच्या गळां आम्ही पडत नाही. फौज फौजेची गाठ पडली असता बेशक लढाई करावी. मोड होईल त्याचा पाठलाग करू नये. आणि तुम्हांकडील फौजेने आम्हांशी लांडगेतोड करीत असावे." अशा प्रकारे मोहीम किंवा वेढा लांबविणे ही मोगल सेनापतींची ऐतिहासिक परंपरा होती. जहांगीरच्या कारकिर्दीत खानेखानान ह्याने दक्षिणेवर मोहीम केली पण दख्खनच्या सैन्याचा सेनापति सुहेल खाजासरा याच्याशी त्याचे अंतःस्थ सूत होते. "ते दिवसा परस्परांशी युद्धे करीत आणि रात्री एकमेकांच्या बैठकी भरवीत." शिवाजीमहाराजांवर औरंगजेबाने शायिस्ते-

खानाला पाठविले. पण बादशहाच्या मामाचीही वृत्ति तीच होती. एकदा त्याच्या हाताखालचा अधिकारी नामदारखान याने शायिस्ताखानाला म्हटले-"आमची मोगल सैन्यं टेकीला यावी इतके सैन्य काही शिवाजीपाशी खास नाही. माझ्या-बरोबर भक्कम फौज द्या मी शिवाजीला पकडून आणतो." नामदारखानाच्या या अल्लड उत्साहाला मामासाहेबांनी फार शहाणपणाचे उत्तर दिले. ते बोलले-"मी शिवाजीवरील मोहीम संपविली तर एक कंधारची मोहीम सोडून बादशहाला दुसरे काम राहणार नाही. कंधारच्या मोहिमेवर जाण्याची तुमची तयारी असेल तर शिवाजीची मोहीम संपविण्यास हरकत नाही. ती मोहीम थोड्याच अवधीत निकालात निघू शकेल आणि कंधारच्या मोहिमेचा विचार नसेल तर हे सर्व सैन्य काढून टाकावे लागेल. ही आपत्ति आपण आपल्यावर काय म्हणून ओढवून घ्यावी? परमेश्वराच्या लेकरांचे भले व्हावे हाच ना आपला हेतु? मग बढतीची आशा धरून काम रेंगाळत ठेवावे हे बरे याच पद्धतीने काम करण्याचा प्रयत्न करावा." शायिस्ते-खानाच्या या 'दूरदर्शी' परंपरेत मुरलेलाच झुल्फिकारखान होता. त्यामुळे तिसरे वर्ष आले तरी जिंजीचा वेढा चालूच होता. औरंगजेबाकडून झुल्फिकारखानाला वारंवार ताकिदी व ठपके येत. एकदा तर त्याने दात ओठ खाऊन लिहिले-"जिंजीचा किल्ला काबीज न कराल तर तुमच्या तंबूचे तणावे कापून तुम्हांला उघड्या मैदानावर बसवू." पण झुल्फिकारखानाला या धमक्यांचे काय होय! त्याने मराठ्यांशी बाहेरून लढाई व आंतून वाटाघाटी करण्याचा दुटप्पी कार्यक्रम दुप्पट उत्साहानें चालू ठेवला.

पण या वाटाघाटींना राजारामाकडचे अनेक सरदार जसे प्रतिकूल होते तसेच मोगलांकडचेही होते. मराठ्यांपैकी संताजी घोरपड्यासारख्या अनेकांना वाटले की मोगल फौज तावडीत सापडली आहे तर बिलकुल दयामाया न दाखविता ती नेस्तनाबूद करावी. उलटपक्षी मराठ्यांकडून दयेची भीक मागून माघार घेणे हे मोगलांकडच्या दलपत बुंदेल्यासारख्या अनेकांना नामुष्कीचे वाटले. तो म्हणाला, "जिंजी सोडून जाणे हे योग्य होणार नाही. यात फजिती आणि नामुष्की याशिवाय दुसरे काही हाती लागणार नाही. काही दिवसांकरिता खर्चाला हवे असतील तर माझ्यापाशी तीस-चाळीस हजार रुपयांचे सोने चांदी आहे. मी देतो. शिपायांचे पगार आणि तोफखाना यावर खर्च करा. परमेश्वराच्या कृपेची आशा करीत अजून काही दिवस येथेच जिंजीला काढा. परमेश्वर काय घडवून आणतो ते पहा."

पण परमेश्वर काय घडवून आणतो हे पाहायला मोगल तयार नव्हते. त्यांना दलपत बुवांचे भाकड प्रवचन मंजूर झाले नाही. तोफखान्याचे लोक एके दिवशी एक झाले व आपल्या सामानसुमानासकट ते छावणीच्या बाहेर चालते झाले. तेथून त्यांनी निरोप पाठविला की भुकेने आमचे प्राण कंठाशी आले आहेत. आम्ही वांदीवाशला निघून जात आहोत. हे खरे होते. भाकरीपुढे तत्त्वनिष्ठेला विचारतो

कोण ? तोफखान्यावर सर्व युद्धाची मदार. तो तोफखाना हलला हे पाहिल्यावर बाकीचे लोकही निघाले. झुलफिकारखानाने राजारामाला एक लाख रुपये खंडणी भरली व विनाविरोध परत जाऊ देण्याची परवानगी मिळविली. जिंजीचा वेढा उठवून निघून जाण्याचे ठरले. त्या दिवशी २३ जानेवारी १६९३ ही तारीख होती.

बरे झाले औरंगजेब या वेळी दूर भीमातीरी गलगल्याला होता. नाहीतर मोगल फौजेचा हा फजितवाडा पाहून बिचारा संतापाने अक्षरशः पागल झाला असता. ती दुपारची वेळ होती. आसदखान व झुलफिकारखान हे कामबख्शाला बरोबर घेऊन निघाले उपासमारीमुळे लष्करातील घोडे, उंट, इत्यादि ओझे वाहणारी जनावरे बरीच नष्ट झाली होती. जी थोडीशी शिल्लक राहिली होती त्यांच्यावर जरुरीपुरते सामान लादले होते. बाकी सामान जाळून टाकले होते. पण कितीतरी सामान व सरदारांचे सरंजाम जागच्या जागी पडून राहिले होते. जिकडे तिकडे एकच गोंधळ माजला होता. लोक भेदरलेले व बावरलेले होते. कोणाची कोणाला खबर नव्हती. जो तो आपल्यापुरते पाहत होता. तडजोड होत आहे या गोष्टीचा वास मराठ्यांना लागला होता. ते सकाळपासूनच मोगलांच्या तळावर जमा झाले. त्यांचे सामानसुमान, चीजवस्त, सरंजाम हे त्यांनी हेरून ठेवले. वर ते शहाजोगपणाने मोगलांना म्हणू लागले "येथे तुम्ही काही सामान टाकून जात असला तरी ते आम्ही पोचवू."

मोगल सैन्य छावणीतून बाहेर पडले. सुमारे एक हजार मराठे त्यांच्या मागे मागे येऊ लागले. त्यांनी मोगलांचे बाजार बुणगे व सामानसुमान मनसोक्त लुटले त्यांच्या पिछाडीचे दोन तीन हजार लोक मराठ्यांनी पकडले. अशा प्रकारे पडत-झडत चोवीस मैलांवर असलेल्या वांदीवाशला मोगल सैन्य तीन दिवसांनी कसे-बसे पोचले. तेथे त्यांना खायला मिळाले आणि मग त्यांच्या जिवात जीव आला. अलीमर्दानखानाच्या पाडावाची बातमी औरंगजेबाला कळल्यावर त्याने कासीम-खान नावाच्या सरदाराला मुबलक रसदेसह रवाना केले. त्यांच्यावर संताजी कांचीजवळ तुटुन पडला. तेव्हा कासीमखान कांचीच्या मंदिरात बचावासाठी लपून बसला. एवढ्यात झुलफिकारखानाने येऊन त्याला सर्व सामानासह सोडवून वांदीवाशला नेले. आता वांदीवाशला कासीमखानाने धान्य भरपूर आणले होते व मराठ्यांचा उपद्रवही थांबला होता. तेव्हा खाणेपिणे व चैन करणे एवढाच स्तुत्य उद्योग मोगल फौजेला राहिला. त्यातच बादशहा सुखरूप असल्याची आनंद-वार्ता आली. मग काय विचारता ! शहाजादा कामबख्श याच्या परवानगीने बादशहाच्या सलामतीबद्दल चौघडे व शहाजणे, नौबती व नगारे वाजविण्यात येऊन आनंदोत्सव करण्यात आला. एकूण सगळाच आनंद होता.

वांदीवाशला आल्यावर झुलफिकारखान मराठ्यांच्या कचाट्यातून सुटला खरे, पण परत गेल्यावर कामबख्श औरंगजेबाला आपल्या काय कागाळ्या सांगेल या

काळजीचा भुंगा त्याचे मन अहोरात्र पोखरू लागला. कामबख्शाने वाह्यातपणाने मराठ्यांशी संधान बांधण्याचा उपद्व्याप केला म्हणून त्याने त्याला कैद केले हे कितीही योग्य असले तरी ते सिंहासनाच्या पायरीला पाय लावण्यासारखे होते. कामबख्श कसाही असला तरी त्याचा बाप बादशहा होता. म्हणून कामबख्शाच्या अंगावर हात टाकणे म्हणजे नागाच्या मस्तकावरच्या रत्नाशी लगट करण्यासारखे होते. "पराभिमर्शो न तवास्ति कः करं प्रसारयेत्पन्नगरत्नसूचये ।" त्यात औरंगजेबाचे वागणेही असे होते की काय होते आणि होत नाही याची धास्तीच वाटावी. जिंजीचा वृत्तान्त समजल्यावर औरंगजेबाने आसदखान व कामबख्श यांना दरबारात यावे म्हणून हुकूम पाठविला. पण झुल्फिकारखान व त्याचे सरदार यांनी यापुढे काय करावे व कोठे राहावे याबद्दल काही एक आज्ञा केली नाही. हा नाराजी दाखविण्याचाच एक खानदानी प्रकार होता. कामबख्शाचा गोट जिंजी येथे नष्ट झाला होता. लहान मोठ्या तोफाही नष्ट झाल्या होत्या. त्याची भरपाई आसदखानाने करावी अशी औरंगजेबाने आज्ञा केली व किंमत वसूल होईपर्यंत आसदखानाच्या जहागिरीपैकी दोन महाल जप्त करण्यात आले. कामबख्श व आसदखान बादशहाकडे निघाले. ते सगरजवळ आले असता बादशहाने आज्ञा केली की फक्त कामबख्शाने आपल्यापाशी यावे. आसदखानाने सगर येथेच थांबावे. या सर्व गूढ वागण्यामुळे कृतांतासारख्या या भयंकर बादशहाच्या मनात आहे तरी काय, हेच झुल्फिकारखान व आसदखान यांना कळेना. त्यांची अगदी पाचावर धारण बसली.

परंतु औरंगजेब दयाळू होता कीं नाही हा जरी वादाचा प्रश्न असला तरी तो शहाणा होता यात शंका नाही. आपला मुलगा कसा आहे व आपला वजीर कसा आहे हे तो खूप समजून होता. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे आसदखान व झुल्फिकारखान यांची गाऱ्हाणी कामबख्शाने खूप तिखटमीठ लावून सांगितली. औरंगजेबाने ते सर्व ऐकून घेतले. पण तो काही बोलला नाही. औरंगजेबाची मुले त्याच्या शत्रूंशी संधान बांधीत ही त्याच्या आयुष्याची मोठी शोकांतिका होती. अकबर संभाजीला मिळाला. मुअज्जम गोवळकोंड्याच्या वेढ्यात कुतुबशहाशी गुप्त वाटाघाटी करण्यात दंग होता. इजा, बिजा व तिजा या न्यायाने आता हा कामबख्श राजारामाशीच सूत जुळवून बसला होता. त्याच्या हाडवैऱ्यांपेक्षा त्याची पोटची मुलेच त्याचा केसाने गळा कापीत होती; व त्याच्या बेतांना सुरुंग लावीत होती. आपल्या जीविताची ही विफलता ध्यानात येऊन औरंगजेबाचे अंतःकरण किती पिळवटून निघाले असेल बरे!

पण सगळे समजूनही तो गप्प बसला. कामबख्शाला त्याने शिक्षा केली नाही. अकबराची त्याने अक्षरशः पारध केली. मुअज्जमला सात वर्षांची नजर कैद सुनावली; त्याला केस कापू दिले नाहीत, नखे काढू दिली नाहीत चांगले कपडे

घालू दिले नाहीत, मिष्टान्न खाऊ दिले नाही. पण कामबख्शापुढे त्याचा सगळा करडेपणा मावळला. कारण कामबख्श हा त्याचा लाडका मुलगा होता; आणि कामबख्शाची आई उदेपुरी बेगम ही त्याची आवडती बेगम होती. हिराबाईनंतर उदेपुरी हीच औरंगजेबाची हृदयेश्वरी म्हणता येईल, इतके त्याचे तिच्यावर प्रेम होते. तो स्वतः जन्मात दारूच्या थेंबाला शिवला नाही आणि ती उदेपुरी मात्र त्याच्या डोळ्यांदेखत दारूने तर्र झालेली असे. सगळ्या राज्यात दारूबंदीचा अट्टाहास करणारा बिचारा औरंगजेब, त्या उदेपुरीच्या बाबतीत मात्र डोळ्यांवर कातडे ओढून घेऊन स्वस्थ बसत असे. अशा उदेपुरीचा कामबख्श मुलगा. तो सगळे उपद्व्याप करून सहीसलामत सुटला यात नवल नाही.

आता राहिला आसदखान. त्याला कामबख्शानंतर औरंगजेबाने सगरहून बोलावले. आसदखान दरबारात आला, तेव्हा भीतीने त्याच्या पोटात कबुतरे फडफडत होती.

खवाशांचा दारोगा मुल्तफखान त्या वेळी औरंगजेबाजवळ उभा होता आसदखान औरंगजेबाजवळ येताच, मुल्तफखानाने औरंगजेबाला ऐकू जाईल अशा बेताने कवितेची एक ओळ म्हटली– ‘ दर अफू लज्जतीस्त के दर इंतिकाम नीस्त ’। (क्षमा करण्यात जी लज्जत आहे ती सूड घेण्यात नाही.)

ती ओळ ऐकून औरंगजेब म्हणाला– “ अगदी वेळेवर ही ओळ म्हटली. ”

आणि त्याने आसदखानाकडे कृपाकटाक्ष टाकला आणि त्याचे जमिनीवर टेकलेले मस्तक आपल्या हाताने उचलून त्याला अभय दिले.

पण जिंजी प्रकरणातील झुलिफकारखानाच्या कचखाऊ धोरणामुळे व नामुष्कीच्या पीछेहाटीमुळे औरंगजेब फार नाराज झाला. त्याने तोफखान्याचा अधिकारी सफशिकनखान याचा नायब मुहंमद मुनीम याला विचारले, “ जुम्लतुलमुल्क आसदखान व झुलिफकारखान बहादूर हे जिंजीच्यासमोर तोफा टाकून निघून आले, त्यांची किंमत काय असेल ? ” त्याने अर्ज केला की, “ चार लाख पन्नास हजार रुपये. ” बादशहांनी आज्ञा केली की, यापैकी तीन लाख रुपये आसदखानाकडून व दीड लाख रुपये झुलिफकारखानाकडून वसूल करण्यात यावेत.

□ □

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था
१९९६ सदाशिव पेठ, नवी शाखा,
कुमठा पुरुषोत्तम चौक, पुणे-४११ ०३०



जिंजीला मोगलांचा असा फजितवाडा झाला. महाराष्ट्रातही याहून काही निराळी परिस्थिति नव्हती. वस्तुतः संभाजीच्या मृत्यूनंतर राजाराम जिंजीस गेल्यावर मराठे आणि मोगल यांच्यातील संघर्षाचे क्षेत्र उत्तरेस महाराष्ट्रात रायगडापासून दक्षिणेत तामिळनाडूत जिंजीपर्यंत पसरले होते. हे लक्षात घेऊन दोन्ही आघाडयांवर नजर ठेवता यावी म्हणून औरंगजेबाने आपला मुक्काम महाराष्ट्र व तामिळनाडू यांच्या दरम्यान असलेल्या कृष्णाकाठच्या गलगलीला ठेवला होता. या ठिकाणी त्याची छावणी तीन वर्षे म्हणजे १६९२ पासून १६९५ पर्यंत होती. येथे राहून तो केवळ मोगल मराठा युद्धातले डावपेचच नव्हे तर काश्मीरपासून मद्रासपर्यंत व बंगालपासून सिंधपर्यंत पसरलेल्या विराट मोगल साम्राज्याचा व्याप डोळयांत तेल घालून सांभाळत होता. त्याचा साक्षेप, त्याची दक्षता व त्यांची निरलसता पाहिली म्हणजे कौतुक वाटल्याशिवाय राहत नाहीं. त्याच्या दरबारचे अखबार हजारोंनी प्रसिद्ध झाले आहेत. त्यांत त्याच्या या चौरस व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब पडलेले आहे.

गलगली हे ठिकाण विजापूरपासून चौतीस मैलांवर आहे. या ठिकाणी औरंगजेबाची जी छावणी पडलेली होती, तिचे वर्णन 'प्रचंड' या एकाच शब्दाने करिता येईल. त्या छावणीचा घेर तीस मैलांचा होता. खुद्द औरंगजेब व त्याचे शहाजादे यांच्या तळाचा घेर तीन मैलांचा होता. तळाभोवती भिंती आणि खंदक पसरले होते. छावणीत साठ हजार घोडेस्वार व एक लाख पायदळ होते. सामानाची ने-आण करण्यासाठी पन्नास हजार उंट आणि तीन हजार हत्ती होते. याशिवाय नोकरचाकर, बायकामाणसे, कामगार निराळेच. सगळया छावणीत मिळून कमीत कमी पाच लाख माणसे होती. प्रत्येक अमीराचा स्वतःचा बाजार होता. आणि त्यात प्रत्येक प्रकारची वस्तु मिळत होती. असे बाजार छावणीत एकंदर अडीचशे होते. छावणीतील हत्तींची संख्या प्रचंड होती त्याप्रमाणे त्यांना पोसण्याचा खर्चही तसाच होता. प्रत्येक हत्तीला खाण्याला कमीत कमी सत्तर शेर धान्य लागे. शिवाय ऊस, हिरवी पाने ही वेगळीच. ही हत्तीची कथा, मग माणसांचे काय बोलायाचे आहे ? साहजिकच जेव्हा मराठयांच्या धामधुमीमुळे वंजाऱ्यांची लूटमार होई व धान्य येईनासे होई तेव्हा छावणीत हाहाकार उडे. उदाहरणार्थ, "बादशहांना कळविण्यात आले की छावणीत अन्नधान्यांचा तुटवडा असून धान्य महाग झाले आहे. गहू व चणे रुपयाला सात आठ शेराच्या भावाने विकले जात आहेत." बादशहानी जुम्लतुलमुल्क आसदखान यास म्हटले, "बाजारचा अधिकारी शरीफखान

याला विचारा की महागाईचे कारण काय? लक्ष ठेवता कीं नाही?" जुल्मुतुल्मुल्कांनी चौकशी करून कळविले की "शरीफखानाचे म्हणणे आहे की वंजारी लोक डोंगराळ भागातून धान्य आणतात. वाटेत बंडखोरांचे स्वार वाटमारी करून त्यांना लूटतात. म्हणून छावणीत महागाई आहे. वाटेत ठाणी बसवून कुमक पोचविली तर वंजारी लोक सुरक्षितपणे धान्य आणू शकतील व धान्य स्वस्त होईल.' बादशहा म्हणाले "कुठे कुठे ठाणी बसवणे आवश्यक आहे हे चौकशी करून कळवा.' अनेक वेळा खानाजादखान, हमीदुद्दीनखान यांच्यासारख्या मातबर सरदारांना कही म्हणजे घासदाणा, लाकूडफाटा आणण्याची कामगिरी करावी लागे. उदाहरणार्थ, खानाजादखान हा कही आणण्यास गेला होता. तो येऊन भेटला. बादशहा म्हणाले "शाबास खूप कही आणली. तुमच्या कामगिरीचा मजुरा झाला." कित्येक वेळा धान्याची टंचाई एवढी होई की बादशहा धान्य पाठवण्याबद्दल सुभेदारांना सणसणीत तंबी देई. नळदुर्ग किल्ल्याचा किल्लेदार यादगार हुसेन याला असेच आज्ञापत्र औरंगजेबाने लिहिले आहे. त्यावरून वाटते की उपास पडू लागले म्हणजे पोरेबाळे ज्याप्रमाणे घरातल्या कर्त्या माणसाला सळो की पळो करून सोडतात त्याप्रमाणे मराठ्यांनी रसद बंद केली की छावणीतले आबालवृद्ध औरंगजेबाला खाऊ का गिळू करीत असावेत. खरा लाखांचा पोशिंदा! आपल्या ताकीद पत्रात औरंगजेब म्हणतो, "तुम्हाला सक्त आज्ञा केली जाते की नळदुर्ग आणि तुम्ही फौजदार आहात त्या प्रदेशांतून तुम्ही बादशाही छावणीमध्ये धान्य पाठवावे यात तिळमात्रही कसूर करू नये. धान्य पाठविले नाहीत तर तुम्हांला बडतर्फ करण्यात येईल अगर तुमची मनसब कमी करण्यात येईल."

औरंगजेबाचे सैन्य मोठे होते. एकंदर तीन लाख घोडेस्वार व चार लाख पायदळ होते. पण या वेळी ते निरनिराळ्या ठिकाणी विभागले होते. खुद्द त्याच्या छावणीत एक लाख पायदळ व साठ हजार स्वार होते. साठ हजार सैन्य जिंजीला गुंतलेले होते. बेदरबख्ताच्या हाताखाली बारा हजार सैन्य पन्हाळगडाला वेढा घालून होते. आणखी एका छावणीत सात हजार स्वार व दहा हजार पायदळ होते. जसे सैन्य, तसाच तोफखाना. भारी तोफा साठ ते सत्तर होत्या. तीनशे लहान तोफा उंटावर ठेवून वापरण्यात येत. तोफखान्याची व्यवस्था युरोपियन खिरस्त्यांकडे होती. आणि प्रत्येक गोलंदाजाला दरमहा दोनशे रुपये पगार होता. तोफखान्याचे संरक्षण औरंगजेबाच्या छावणीला मोठेच होते. विजापूरजवळ बद्री नावाच्या खेड्यात त्याची छावणी पडली असताना निरनिराळ्या ठिकाणी विभागले गेल्यामुळे आधीच त्याचे सैन्य कमी झाले होते. त्यात पटकीच्या साथीची भर पडून पुष्कळ माणसे, घोडे, उंट व हत्ती मेले होते. ती संधि पाहून मोठे घोडदळ व पायदळ घेऊन मराठ्यांनी त्याच्या छावणीवर हल्ला केला. पण तोफखान्याचे

संरक्षण छावणीला असल्यामुळे समोरासमोर हल्ला करण्याची मराठ्यांना छाती झाली नाही.

पटकी आणि प्लेग या साथीच्या रोगांचा उपद्रव छावणीत बहुधा नेहमी चालू असे. विजापुरास असताना एक लाख माणसे मेली. त्यात खुद्द औरंगजेबाची बायको औरंगाबादी महल होती. त्याचा आवडता सेनापती फिरोजजंग त्या साथीत आंधळा झाला. हा दैवी प्रकोप टाळण्यासाठी सामुदायिक प्रार्थनेचे फर्मान औरंगजेब आपल्या छावणीत कित्येक वेळा काढी. "छावणीतील नायब कोतवाल ख्वाजा मुहंमद सादिक याने तमाम लष्करात पुढीलप्रमाणे दवंडी द्यावी. उद्या गुरुवारी हिंदु व मुसलमान यांनी प्रार्थनागृहात जमावे व प्लेगची साथ नाहीशी व्हावी म्हणून प्रार्थना करावी."

कोरेगावला छावणी असताना औरंगजेब चाकणचा किल्ला पाहण्यासाठी गेला होता. तो त्याच दिवशी परत आला. पण अनेक वेळा तो दिवसच्या दिवस प्रवासात असे. खरोखर, या मराठादेशात मराठ्यांनंतर या मराठमोळ्या महाराष्ट्राचा कानाकोपरा पायाखाली घातला असेल तर तो अखंड प्रवासी असलेल्या बिचाऱ्या औरंगजेबानेच! १८ डिसेंबर १६८९ रोजी त्याने कोरेगाव सोडले व प्रवास करीत तो ११ जानेवारी १६९० रोजी विजापुरास आला. पंधरा दिवसांनंतर तो तेथून निघाला व प्रवास करीत कृष्णेच्या दक्षिणेस असलेल्या गलगलीस आला. तेथे तो २१ मे १६९० पासून मार्च १६९१ पर्यंत होता. तेथून तो विजापुरास गेला. विजापुराहून मे १६९२ मध्ये तो गलगलीस आला. या वेळी मात्र तो तीन वर्षे गलगलीलाच राहिला.

प्रवासात असला म्हणजे औरंगजेब सामान्यतः हत्तीवर स्वारी करी. पण रस्ता धुळीचा असला तर पालखीतून प्रवास करी. कधी पालखीसारख्या उघड्या आसनातून – तख्तेरवामधून तो प्रवास करी. क्वचित् प्रसंगी घोडाही वापरी. पण फार क्वचित्. कदाचित् पुढे पुढे वयोमानामुळे घोड्यावरची स्वारी त्याला झेपेनाशी होई, पण त्याची जिद्द कायम होती. बेगमपुरी येथे छावणी असताना शुक्रवारच्या नमाजासाठी सोलापूरच्या जुम्मामशिदीत तो जात असे. "आज बादशहा कामानीहून निघाले. ते अर्धाकोस घोड्यावरून स्वार होऊन गेले. नंतर तख्तेरवांवर बसून त्यांनी चार कोसांचा प्रवास केला. नंतर ते सोलापूरला मुक्कामाला आले."

औरंगजेबाचे हे ठीक होते. पण छावणीचे काय? दरवर्षी न चुकता गांव बदलणाऱ्या नोकराप्रमाणे किंवा भटक्या जमातीप्रमाणे या गावाहून त्या गावाला ज्या वेळी औरंगजेब चारदोन वर्षांनी छावणी हलवी तेव्हा छावणी हलविणे हाच मोठा उद्योग होऊन बसे. मामुली माणूस जरी घर मोडून निघाला तरी त्याला

बैलगाड्या व खटारे सामानासाठी लागतात. मग जेव्हा बादशहा सलामतच आपले बिऱ्हाडबाजले उचलून दुसऱ्या गावाला रवाना होत असतील तेव्हा तो व्याप केवढा होत असेल ! प्रथम त्याचे तंबू आणि गोट जमविण्यासाठी सामान पाठवीत. ते सामान वाहण्यासाठी एकशेवीस हत्ती, चौदाशे उंट आणि चारशे गाड्या लागत. नुसती त्याची निरनिराळी आसनेच न्यायला आठ हत्ती लागत. असा हा सामान्य माणूस आणि बादशहा यांच्यात फरक आहे.

अशा या अफाट छावणीत राहून आपल्या अफाट राज्याचा कारभार औरंगजेब सकाळपासून संध्याकाळपर्यंत न चुकता पाहत असे. त्याच्या दरबारचे अखबार हे खरोखर त्याच्या मनोव्यापारांचेच अखबार म्हणावे लागतील.

राजकारण हा औरंगजेबाचा जीवनातला मुख्य उद्योग होता. ते त्याच्या पाचवीलाच पुजलेले होते. राजकीय हालचालीच्या व डावपेचांच्या बातम्या या अखबारात आहेत यात नवल नाही. उदाहरणार्थ, रात्री बादशहानी बहरामदखानाला चार हजार स्वार बरोबर देऊन विजापूरकडे गस्त घालण्यास पाठविले. राणी बिदनूरच्या जमीनदाराकडून खंडणी घेण्यास जाण्यासाठी खानाजादखान यास तयार राहण्यास सांगण्यात आले. हुमीदुद्दीनखानाला बरोबर अडीच हजार स्वार देऊन मराठ्यांच्या पारिपत्यासाठी मिरजेकडे पाठविण्यात आले. "बादशहाना कळविण्यात आले की गनिमांनी खटावला वेढा घातला असून तेथील ठाणेदार रामचंद्र हा त्यांचेशी युद्ध करीत आहे. आज्ञा झाली की ही बातमी हमीदुद्दीनखानाला कळविण्यात यावी. त्याने तातडीने रवाना व्हावे." बादशहा बक्षीउलमुल्क मुखलिसखान याला म्हणाले की "अहमदाबाद, अजमीर, अकबराबाद, शहाजहानाबाद, लाहोर व अलाहाबाद या सुभ्यांत किती सैन्य आहे ते मला कळविण्यात यावे." "पन्हाळ्याचा किल्ला मराठे देत असतील तर उत्तम, नाहीतर पुन्हा मोर्चेबंदी करून पन्हाळ्याला वेढा द्या अशा अर्थाचा हुकूम शहाजादा मुइजुद्दीन याच्याकडे पाठविण्यात आला." "हिंमतखान बहादुर याजकडे एक हजार स्वार पाठवून देण्याची बादशहांनी आज्ञा केली." वऱ्हाडचा सुभेदार नवाजिशखान याला आज्ञा करण्यात आली "संताजी तुमच्या प्रांतात येत आहे. त्याचा मोड करा. तुमच्या प्रांतातील फौजदारांना कुमकेसाठी बोलावून घ्या." "बादशहांनी आज्ञा केली की शहाजादा मुहंमद बेदरबख्त यांनी पंचवीस हजार स्वार घेऊन पन्हाळगडाला वेढा घालण्यासाठी जावे."

औरंगजेबाचे राजकारण हे त्याच्या धर्मकारणाचे अविभाज्य अंग होते. इतकेच नव्हे तर धर्मकारण हे साध्य आणि राजकारण हे साधन अशीच त्याची भूमिका होती. हिंदुत्वाचा समूळ उच्छेद आणि इस्लामचा उत्कर्ष एवढे एकच ध्येय त्याने आयुष्यात डोळ्यांपुढे ठेविले होते आणि केवळ धर्मसंस्थापनेसाठीच स्वभावत: अप्रिय असलेले राज्यकारभाराचे ओझे त्याने स्वत:हून कर्तव्य म्हणून पत्करले होते. असा त्याचा स्वत:चाच दावा होता. आग्र्यावर चालून जाताना आणि दाराचा

बीमोड करून राज्य ताब्यात घेताना त्याने शहाजहानला जे समर्थन दिले ते अखेरपर्यंत कायम होते. "आपल्या (शहाजहानच्या) आजारपणात दाराने सर्व सत्ता बळकाविली; व हिंदुत्वाचा उत्कर्ष करण्यासाठी व इस्लामचा नाश करण्यासाठी त्याने कंबर कसली. देव न करो पण जर त्या काफराचे मनोगत सिद्धीस गेले असते व जगात पाखंडमताचा अंधार पसरला असता व इस्लाम निष्प्रभ झाला असता तर ईश्वरापुढे अखेरच्या दिवशी जाब देणे आपणास जड गेले असते. बंड म्हणून नव्हे तर दाराने जी सत्ता बळकावली होती, जो मूर्तिपूजेचा उदो उदो चालविला होता व इस्लामपासून जी फारकत घेतली होती, तिला केवळ पायबंद घालण्यासाठी म्हणून मी आग्र्यावर चालून आलो...हा बिकट राज्यभार केवळ नाइलाज म्हणून मला पत्करावा लागला की राज्यात इस्लामचे पुनरुज्जीवन करावे व लोकांना विनाशापासून वाचविता यावे जेणेकरून अखेरच्या दिवशी ईश्वरापुढे मला जाब देता येईल." आपल्या या जीवननिष्ठेशी औरंगजेब अखेरपर्यंत प्रामाणिक राहिला. वस्तुतः गेल्या तीस वर्षांत उत्तरेतले हिंदु, राजपूत, बुंदेले आणि दक्षिणेतले मराठे यांच्याशी औरंगजेबाचे या धोरणामुळे एवढे संघर्ष चालले होते की एखाद्याला असे धोरण इतक्या विरोधातून पुढे रेटणे कितपत शहाणपणाचे आहे असा विचारच पडला असता. पण औरंगजेब या बाबतीत बिलकुल बेदरकार होता. खडी भरडत जाणाऱ्या घडघडणाऱ्या रुळाला रस्त्यावर उडणाऱ्या खडीची जेवढी मुरवत असते तेवढीच औरंगजेबाला असल्या विरोधाची होती. हिंदुस्थानच्या समरभूमीवर हिंदु व इस्लामी संस्कृतीचे जे धर्मयुद्ध चालले आहे त्यात हिंदु संस्कृतीला नेस्तनाबूत करून इस्लामी संस्कृतीच टिकली पाहिजे हा त्याचा आग्रह होता आणि मोगल-मराठा युद्धासारख्या मोठ्या प्रकरणापासून एखाद्या अगदी खेड्यातल्या क्षुल्लक प्रकरणापर्यंत त्याचा सगळा कारभार या एकाच उद्देशाने चालत असे.

हिंदूंना मुसलमान करणे, बादशहाने त्यांना बक्षीस देणे किंवा खिलत देणे हे प्रकार सर्रास चालू होते व ते 'राजमान्य' होते. अखबारात याची कितीतरी उदाहरणे आहेत. 'बनवार हिंदु आणि लोखराज हिंदु हे मुसलमान झाले. त्यांना खिलतीची वस्त्रे देण्यात आली.' 'सुरतसिंग हा मुसलमान झाला. त्याला खिलतीची वस्त्रे देण्यात आली.' छत्रसिंग हा मुसलमान झाला. त्यालाही खिलतीची वस्त्रे देण्यात आली. 'हरनारायण व मतलाजी हे मुसलमान झाले, त्यांना बादशहाने वस्त्रे दिली.' 'मानशहा मुसलमान झाला. त्याला वस्त्रे देण्यात आली.' "किशनसेनचा मुलगा मनसाराम हा मुसलमान झाला. त्याला वीस होन देण्यात येऊन शेख हिदायतुल्ला हे नाव देण्यात आले." "हीरू हिंदूचा मुसलमान झाला. त्याला खिलताची वस्त्रे देण्यात आली." "गुजरात प्रांतातील जमीनदार गजसिंग

रामसिंगाचा मुलगा हा अब्दुल्हैच्या मार्फतीने मुसलमान झाला. बादशहानी स्वतः कलमा पढवून त्याला मुसलमान केले. त्याला मानाची वस्त्रे देण्यात आली.''

हिंदूचा मुसलमान झाला की त्याच्याकडे बघण्याची औरंगजेबाची दृष्टि बदले. सोलापूरचा किल्लेदार व फौजदार मेहंदीखान याने पुढीलप्रमाणे अर्ज पाठविला. "एका माणसाने एका बंदूकच्याच्या बायकोला पळविली. नवऱ्याने तक्रार गुदरली. त्या माणसाने वाटेत एका माणसाला मारले. खानाने सर्वांना पकडून आणले.'' बादशहाने आज्ञा केली की, "ती बाई मुसलमान झाली आहे. तिला, तिच्या नवऱ्याला व तिला पळवून नेणाऱ्या इसमाला काजीकडे नेण्यात यावे.'' देवगड व चांदा या राज्याच्या वारसाचे उदाहरण असेच विलक्षण आहे. पवनारचा फौजदार सदुद्दीन मुहंमदखान याने लिहिले की, "मी व चांद्याचा राजा किशनसिंग यांनी देवगडचा जमीनदार दीनदार याला काढून लावले. राजा किशनसिंग याचा दुसरा मुलगा कालसिंग हा तरुण व होतकरू आहे. तो म्हणतो की, देवगडची जमीनदारी आपल्याला मिळाली तर मी चांदा व देवगड या जमीनदाऱ्यांबद्दल बारा लाख रुपये पेशकश म्हणून देईन. याशिवाय दीनदारकडे पेशकशची काही बाकी निघत असेल तर तीही देईन. राजा किशनसिंगाचा हा दुसरा मुलगा आपल्या आईसहित मुसलमान होण्यास तयार आहे. आणि प्रत्येक महिन्यास एक लाख रुपये सरकारी खजिन्यात भरण्यास तयार आहे.'' बादशहा बक्षीउलमुल्काला म्हणाले– " सद्रुद्दिनखानाला लिहा की कालसिंग व त्याची आई यांना चांद्याहून तुमच्याकडे बोलावून घ्या आणि त्यांना मुसलमान करा. नंतर हुजुरात लिहा. त्यानंतर इस्लामगड ऊर्फ देवगडची जमीनदारी व राजा ही पदवी व फर्मानही पाठविण्यात येईल.''

तो काळ कठीण होता. ठायी ठायी मोगल आणि मराठे यांचे निकराचे संग्राम होत होते. औरंगजेबाच्या सैन्यात हजारो हिंदु होते. तरीसुद्धा आपल्या धार्मिक धोरणाला मुरड घालण्याचा पुसटसाही विचार अगदी क्षुल्लक बाबतीतसुद्धा त्याच्या मनात आला नाही. अजमेरच्या बातम्यावरून समजले की, जलंबरा या खेड्यात विजयसिह वगैरे हिंदु आले असून ते तेथे मूर्तिपूजा करू लागले आहेत. बादशहानी हुकूम दिला की " तेथील अधिकाऱ्यास देऊळ उद्ध्वस्त करण्यासाठी लिहिण्यात यावे.'' कळविण्यात आले की मौजे बार्शी येथे काफरांचे मुख्य हे मूर्तिपूजा करतात. बादशहांनी जुम्लतुलमुल्क आसदखान यास सांगितले की, " इज्जतखानला आज्ञापत्र पाठवून कळवा की तेथील देऊळ पाडून टाकण्यात यावे.'' हिंदूंच्या होळीचा सण साजरा करणे औरंगजेबाला मंजूर नव्हते. " पन्हाळगडाखाली शहाजादा मुइजुद्दीन याची फौज होती. तेथील बातम्यावरून कळले की राजा भीम व चांद्याचा राजा किसनसिग यांच्या सैन्यात होळीचा सण खेळण्यात येत होता. मुहतसिब ( नीति-

मत्तेवर देखरेख ठेवणारा अधिकारी) ने पुष्कळ मना केले. पण लोकांनी ते ऐकले नाही. ते मारामारीस तयार झाले. बादशहांनी आज्ञा केली की राजा भीम व राजा किसनसिंग यांना कळविण्यात यावे की यापुढे असे करण्यात येऊ नये." होळी-प्रमाणेच रक्षाबंधनावरही औरंगजेबाचा कटाक्ष होता. श्रावणात रेशमाच्या राख्या विकण्यास बेळगावचा सुभेदार यादगार हुसेन याने मनाई केली, त्याला औरंग-जेबाने पाठिंबा दिला– "बातमीपत्रावरून पुढील गोष्टी कळल्या. हिंदूंच्या श्रावण महिन्याच्या सणात रेशमाच्या राख्या विकण्यात येतात. रेशमाच्या विक्रीस बाद-शहांनी बंदी केली आहे. सबब तुम्ही, वा कियानिगार व काजी यांनी मिळून ठरविले की रेशमी राख्या विकणाऱ्यास मनाई करावी. पण तुमच्या सैन्यातील एका हजारी शिपायाला हे आवडले नाही. त्याने ब्राह्मणाकडून राख्या विकत घेतल्या आणि लोकांत वाटल्या. किल्ल्यात आणि गावात हिंदु हे श्रावणाचा सण साजरा करतात. रेशमी राख्यांच्या विक्रीस मनाई करण्यात आली हे बादशहांना योग्यच वाटले. बादशहांनी मनाई केलेल्या वस्तूंची विक्री होऊ देऊ नये." अरबी किंवा इराकी घोड्यावर बसण्यास हिंदूंना औरंगजेबाने मनाई केली होती. "यारअलीबेगने विनंती केली की, मुलतान येथे एक हिंदु मनुष्य इराकी घोड्यावर बसून जात होता. हिंदूंना इराकी व अरबी घोड्यावर बसण्याची मनाई असल्यामुळे मुलतानचा कोतवाल मुहंमद अमीन याने घोडा, जीन, लगाम ही त्या माणसाकडून घेऊन सरकारात पाठविली. बादशहांनी ती पाहून सरकारात ठेवून देण्याची आज्ञा दिली." पुढे औरंगजेबाने तो घोडा तरबियतखानाला बक्षीस म्हणून देऊन टाकला. औरंग-जेबाची हिंदूंबद्दलची ही वृत्ति अगदी जगजाहीर होती. ती काही त्याने चोरून ठेवली नव्हती. तरीही त्याच्या सैन्यामध्ये दतियाचा राव दलपतसारखे हिंदु सैनिक हजारो होते. जिंजीला असताना औरंगजेब मेल्याची बातमी जेव्हा उठली तेव्हा राव दलपत म्हणाला – " देव न करो, बादशहाच्या मृत्यूची बातमी खरी ठरली तर मी सरदारी आणि नोकरी सोडून देईन आणि एकांतवास पत्करीन." बादशहा सुखरूप आहेत अशी आनंदाची बातमी येताच राव दलपतने बादशहाच्या नावा-वर खूप दानधर्म केला. अशाही हिंदूंच्या डोक्यावर मिरी वाटून आपली धर्मभावना उघडपणे दामटणाऱ्या औरंगजेबाचे कौतुक करावे की अशाही औरंगजेबाच्या पायातळी आपले जीव आंथरणाऱ्या राव दलपतसारख्या हिंदूंच्या स्वामिनिष्ठेचे पोवाडे गावेत हा प्रश्न मोठा कठीण आहे.

धार्मिक दुराग्रहाने अंध झाली नसेल तेव्हा औरंगजेबाची दृष्टि न्यायदानाच्या बाबतीत चांगले काम देई. प्रजापालन हा राजाचा मुख्य धर्म आणि प्रजेवर जुलूम होऊ नये या बाबतीत औरंगजेबाची दक्षता वाखाणण्यासारखी होती – " विजापुरी कर्नाटकाचा फौजदार कासिमखान याजकडील बातमीपत्रावरून कळले कोमेल-गिरी देशमुख हा बलगडचा किल्लेदार छत्रसाल याच्याशी संगनमत करून रयते-

कडून घरामागे दोन रुपये वसूल करीत आहे. त्यामुळे रयत फरार झाली आहे. बादशहांनी आज्ञा केली, "तेथील दिवाणाला लिहा की यापुढे रयतेकडून एक दमडा घेऊ नका. त्यांच्यावर जुलूम करू नका." वऱ्हाडच्या गुप्त बातम्यांवरून कळले की तेथील सुभेदार अलीमर्दानखान याने ठिकठिकाणी ठाणेदार नेमले आहेत. हे ठाणेदार रयतेवर जुलूम करीत आहेत. रयत तक्रार करीत आहे. पण अलीमर्दानखान तिकडे लक्ष देत नाही. यावर बादशहाने आज्ञा केली की "बहरामंद खानाने चौकशी करून वस्तुस्थिति काय आहे याचे वृत्त सादर करावे." कर्नाटक किंवा वऱ्हाड यासारख्या दूरच्या प्रांताप्रमाणे जवळच्या गोष्टींकडे औरंगजेबाचे सारखेच लक्ष असे – व्यापाऱ्यांनी दावा केला की शहाजादा बेदरबख्त याच्या शिकारीच्या वेळी आमच्याकडून माल घेतला जातो पण पैसे दिले जात नाहीत. बादशहांनी हिशेब तपासून चुकता करण्याची आज्ञा केली." छावणीतील फळ विक्यांनी तक्रार केली की, आमच्याकडून दोन्ही बाजारांचे दोन अधिकारी गजन फर व शरीफखान हे वेगवेगळे कर वसूल करतात. एकाच वस्तूसाठी दुप्पट कर द्यावा लागतो. मनाईचा हुकूम देण्यात आला. सामान्य माणसालाही न्याय देण्यात औरंगजेब दक्ष असे. मुहंमद हुसेन सौदागर याने दावा लावला की मुअज्जम खान याने तीन घोडे माझ्याकडून घेतले. दोन हजार रुपये किंमतीपैकी फक्त एक हजार दिले. बाकीचे देत नाही. आज्ञा झाली की, यारअलीबेग याने ती रक्कम द्यायला लावावी.

हिंदुत्वाची पायमल्ली आणि इस्लामचा उत्कर्ष हे धोरण औरंगजबाने जाणून-बुजून स्वीकारले होते. त्यामुळे न्याय देताना त्याच्या हातून झुकते माप सामान्यतः इस्लामलाच मिळे, पण याला त्याचा नाइलाज होता. पण याचा अर्थ असा नव्हे की धर्मभेदाच्या पलीकडे जाणारी निर्भेळ न्यायदृष्टि त्याच्यापाशी मुळातच नव्हती. कित्येक वेळी स्वतःच घालून घेतलेल्या त्याच्या न्यायप्रतिभेच्या पायांतली बंधने गळून पडत आणि औरंगजेबाच्या निर्मल न्यायबुद्धीचा प्रसन्न आविष्कार घडे. वाईचा देशमुख दत्ताजी केशवजी नाईक पिसाळ याची वाईची देशमुखी न्याहारखान घोरी याने अधिकाराच्या जोरावर बळकाविली. पण दत्ताजीने औरंगजेबाकडे तक्रार नेल्यावर न्याहारखानाची त्याने वाईहून बदली केली. पुढे सूर्याजी पिसाळ व दत्ताजी पिसाळ यांचा देशमुखीचा तंटा विकोपाला गेला. औरंगजेबाला प्रसन्न करण्याचा हुकुमी उपाय म्हणून सूर्याजी मुसलमानसुद्धा झाला. पण औरंगजेबाची न्यायबुद्धि या वेळी भलतीच जागृत झाली होती. त्याने सूर्याजीला देशमुखी दिली नाही. "शेवटी मुसलमान जाला तरी पातशाहापावेतो झूटासारिखे जाहीर जाले. साहास केलियाचे सार्थक न जाले." कागलचा जमीन-दार पिराजी घाटगे याने शरीफखानाच्या मार्फतीने विनंती केली की, कोल्हापूरचा ठाणेदार अन्वरखान याने माझ्या कागलच्या जमीनदारीवर व ठाण्यावर हल्ला

केला. त्याने मालमत्ता, गुरेढोरे लुटली. अशा रीतीने जवळजवळ एक लाख रुपयांच्या चीजवस्ता त्याने ताब्यात घेतल्या आहेत. बादशहानी आज्ञा केली होती की लुत्फुल्लाखान याने चौकशी करावी. त्याने चौकशी केली नाही. आता त्याची दरबारात नेमणूक झाली आहे. बादशहाने आज्ञा केली, की "एक गुर्जबर्दार (दंडधारी) नेमा. त्याने जाऊन अन्वरखानाने ताब्यात घेतलेली सगळी मालमत्ता पिराजीला द्यावी. तसेच कागलचे ठाणे पिराजीच्या माणसांच्या हवाली करावे." हिंदूंप्रमाणे डचांसारख्या परदेशी माणसांच्या बाबतीतही हीच न्यायदृष्टि होती. "हरकाऱ्यांच्या तोंडून पुढील बातमी कळली. आदिलखानी कोकणचा फौजदार सरबाजखान याने चार डच व्यापाऱ्यांची सुमारे एक लाख रुपयांची मालमत्ता लुटली. बादशहा म्हणाले, "या माणसाने यापूर्वीही अशीच दंडेली केली होती. हा बंडखोरीचा उद्देश बाळगून आहे असे दिसते. हा गनिमांच्या (मराठ्यांच्या) लोकांशी मिळालेला दिसतो." बादशहा यारअलीबेगला म्हणाले, "तुम्ही त्याला आज्ञापत्र पाठवून हुजुरात बोलावून घ्या. त्याचा मुलगा पथकासहित तेथे नायब म्हणून राहील."

एके काळी शत्रुत्व केलेल्या माणसाच्या गुणांची कदर करण्याचे सौजन्य औरंगजेबाच्या ठिकाणी खचित होते. शत्रूला दिलदारीने वागविणे हा गुण अकबराचा आणि जहांगिराचा, औरंगजेबाचा नव्हे, अशी सामान्य समजूत आहे व ती फारशी चूक नाही. पण प्रसंग पडला व त्याच्या मर्जीस आले तर तोही तो गुण प्रकट करू शके. अब्दुलहसन हा गोवळकोंड्यात राज्य करीत असता शेख मुहमद अमीन हा गोवळकोंड्यात किल्लेदार होता. तो भेटण्यास आला. तो अतिशय वृद्ध आणि अशक्त होता. दोन माणसांनी त्याला चादरीत गुंडाळून आणले. बादशहा म्हणाले की, "याला विचारा की तुझे वय काय ?" तो म्हणाला, 'पंचाण्णव वर्षे.' त्याने विनंती केली की, "मला पूर्वी पांच हजार रुपये उत्पन्नाचे गांव होते तेथे आता काही उत्पन्न होत नाही. किल्ल्यात माझे एक दुमजली घर आहे त्याची दुरुस्ती माझ्याकडून होत नाही. ते सरकारने घ्यावे." बादशहांनी आज्ञा केली की, "याला दुसरे गाव द्या आणि घराची किंमत द्या." बादशहा बक्षीउलमुल्क बहरामंदखान याला म्हणाले, "मी शहाजादा असताना गोवळकोंड्यावर स्वारी केली होती. त्या वेळी मी याला निरोप पाठविला होता की, "तू किल्ला माझ्या हवाली कर, मी तुझ्यावर खूप कृपा करीन." याने सांगितले की, किल्ला आपल्या ताब्यात येईल पण माझा जगात निमकहराम म्हणून दुर्लौकिक होईल. मी तुमच्या म्हणण्याप्रमाणे करू शकत नाही. बादशहांनी त्याला एक हजार आश्रफी व एक हजार रुपये दिले.

अशी उदाहरणे पाहिली म्हणजे औरंगजेबाच्या निर्व्याज न्यायप्रियतेची प्रतीति आल्याशिवाय राहत नाही. म्हणूनच, त्याच्या हयातीतच त्याच्याविषयी बेताचेच

प्रेम असलेल्या इंग्रज व्यापाऱ्यांसारख्या परक्या लोकांनी सुद्धा त्याच्या निर्भेळ न्यायप्रियतेची मुक्त कंठाने प्रशंसा केलेली आहे. " The great Mogul is the main ocean of justice. He generally determines with exact justice and equity; for there is no pleading of peerage or privilege before the Emperor but the meanest man is as soon heard by Aurangzeb as the chief Omrah." "मोगल बादशहा हा न्यायाचा केवळ महासागर आहे. सामान्यतः तो अगदी बिनचूक व काटेतोल न्याय देतो. त्याच्यापुढे सरदारीचा वशिला चालत नाही. मोठा उमराव असो की सामान्य माणूस असो, औरंगजेब त्याची फिर्याद ताबडतोब ऐकून घेतो."

न्यायदानाचे काम औरंगजेबाचे पराकाष्ठेचे आवडते होते आणि न्यायकचेरीची प्रतिष्ठा सांभाळण्यात तो फार दक्ष असे. बादशहा काल मीरतुजुक (दरबारची व्यवस्था पाहणारा) तरबियतखान याला म्हणाले, " न्याय कचेरीत आरडाओरडा फार होतो. भास्करराव हरकारा वगैरेंना कचेरीत येऊ देऊ नका." न्यायकचेरी-तील दंड वसूल करणारा दारोगा अब्दुलकादर हा दरबारात इकडून तिकडे फिरत होता. बादशहानी आज्ञा केली की "असे फिरणे बंद करा. यापुढे न्यायकचेरीत व दिवाण यातून कोणी असे आमच्यासमोर इकडे तिकडे फिरता कामा नये. प्रत्येकाने आपापल्या जागी उभे राहिले पाहिजे." काजी महंमद हुसेन याला बऱ्हाणपूरचा काजी म्हणून नेमण्यात आले. खिलतीची वस्त्रे अंगावर घालून तो दरबारात आला. त्याला पाहून बादशहा म्हणाले, " याची खिलतीची वस्त्रे काढून घेऊन काजीच्या जागेवर दुसऱ्याची नेमणूक करा."

उभ्या जन्मात औरंगजेबाने दारूची चव घेतली नाही पण त्याची प्रजा पक्की दारुडी होती आणि तिला सक्तीने सुधारण्याचा खटाटोप औरंगजेब जन्मभर करीतच होता. शासकीय पातळीवर दारूबंदीचा पहिला प्रयोग बहुधा औरंग-जेबानेच केला असावा. तो अर्थातच फसला, कारण एखादया ध्येयवादाचा कितीही आटापिटा केला तरी केवळ तो दारूला शिवत नाही म्हणून जगातली दारू काही नाहीशी होत नाही. पण प्रयोग फसला तरी औरंगजेब प्रामाणिक होता व राज-कारणाच्या जंजाळातून वेळ काढून तो झिंगलेल्या प्रजेला ताळ्यावर आणण्याची धडपड करी. "शहाजहानाबाद (दिल्ली) च्या बातम्यांवरून समजले की फते-उल्ला याने स्वतःच्या घरात दारूची भट्टी घातली असून तो रात्रंदिवस धिंगाणा घालीत असतो. त्याची मन्सब कमी करण्याची आज्ञा देण्यात आली." अकबराबाद (आग्रा) सुभ्यातील ईरज येथून आलेल्या बातम्यांवरून कळले की ओरछा येथे पिण्याची दारू अतिशय तयार होते आणि तिची बाजारात विक्री होते. हुकूम झाला की "ओरछाचा राजा अवधूतसिंग याच्या वकिलाकडून आपण दारू वगैरे निषिद्ध वस्तु तयार करू देणार नाही अशा अर्थाचे मुचलके घ्या." शेख नुरुलहक

मुहतसिब (नीतिमत्तेवर देखरेख ठेवणारा) याने अर्ज केला की मुख्तारखानाचे कारभारी बालीराम लछराम याच्या घरात मदिरापान व जुगार ही चालली होती. सरकारी नोकरांनी त्याला मना केली. तो हमरीतुमरीवर आला. त्याला दीडशेची मनसब आहे. हुकूम झाला की त्याची मनसब पन्नासने कमी करण्यात यावी व त्याला दरबारात येण्याची मनाई करण्यात यावी.

अनेक वेळा औरंगजेबाच्या दृष्टीचा बारकावा थक्क करण्यासारखा वाटे. खानदेशातल्या आंब्याबद्दल त्याला खास आकर्षण असे. आज्ञा झाली की "गाजी-उद्दीनखान बहादूरला लिहिण्यात यावे की चोपडयाकडच्या फौजदारांना आंब्याच्या झाडांची निगा ठेवण्यास ताकीद द्यावी." एरंडोलच्या एका बागेतील आंब्याचे एक विशिष्ट झाड ध्यानात ठेवण्याइतकी त्याची स्मरणशक्ति धड होती. मुहंमद शरीफने पुढीलप्रमाणे विनंती केली– "माझा एक वाडा बऱ्हाणपुरात आहे. मी तो बऱ्हाणपुरच्या तोफखान्याचा दारोगा सुलतान इब्राहिम याला राहण्यासाठी दिला. आता तो रिकामा कर म्हटले तर म्हणत आहे की, "तू कोण आहेस. वाडा माझा आहे." "चौकशी करून वाडा परत द्यायला लावावा" अशी आज्ञा झाली. यानंतर बादशहा मुहंमद शरीफला म्हणाले– 'थाळनेर, सरकार (जिल्हा) मध्ये एरंडोल येथे मरहूम मीर अहमदखान यांनी बाग लावली होती. त्या बागेत आंब्याचे एक झाड होते. त्याला अदकेला म्हणत. शहाजहान बादशहांनी त्या आंब्याचे नाव बादशहा पसंद असे ठेवले होते. त्या झाडाचे आंबे तुम्ही आमच्याकडे कां पाठवीत नाही?' त्याने चौकशी करून सांगितले की, "माझे काका मीर अहमदखान हे वारल्यावर त्यांच्या मुलांची मीर अब्दुल्ला व अबुल्हसन यांची स्थिति खालावली. त्यांना मन्सब राहिली नाही. इतरांनी बागेचा ताबा घेतला असून ती बाग आमची आहे असे ते म्हणत आहेत." बादशहानी मीर अब्दुला याला अडीचशेची व अबुल्हसनला दोनशेची मन्सब नव्याने दिली. बादशहा म्हणाले, "बुऱ्हाणपुरचा सुभेदार मरहमतखान याला लिहून ती बाग आणि आंब्याचे झाड याची चौकशी करून वृत्तान्त पाठविण्यास सांगा."

युद्धाच्या हालचालीच्या प्रसंगी नकाशाचा उपयोग औरंगजेब मुबलक प्रमाणावर करी. पन्हाळगडच्या वेढयाचे वेळी मुख्तारखान याला पन्हाळयाचा नकाशा काढून आणण्यासाठी मुद्दाम पाठविण्यात आले होते. तो आल्यावर त्याने आणलेला नकाशा पुढे ठेवून औरंगजेबाने पन्हाळयासंबंधी बारीकसारीक माहिती त्याच्याकडून मिळविली. जिंजीचा वेढा चालू असता तो जिंजीच्या नकाशाचा अभ्यास करी. अधोनीच्या किल्ल्याच्या आसपास कासीमखान व संताजी यांच्या चकमकी झाल्या. तेव्हा आज्ञेप्रमाणे वाकियानिगार भोलानाथ याने अधोनीच्या किल्ल्याचा नकाशा बादशहाला दाखविला. पन्हाळयाहून बेदरबख्ताला संताजीच्या पाठलागासाठी औरंगजेबाने बसवापट्टणला रवाना केले तेव्हा वाकियानिगार भोलानाथ

याला बादशहानी म्हटले, " पन्हाळगडाहून बसवापट्टणपर्यंत किती कोस अंतर आहे व किती मजला होतात, तपास काढून कळवा," आज्ञेप्रमाणे भोलानाथ याने बसवापट्टणचा नकाशा बादशहांना दाखविला. नकाशा पाहून बादशहाने विचारले, 'शहाजादा मुहंमद बेदरबख्त हा कोठे आहे?' कळविण्यात आले की तो बंकापूरहून तीन मार्च रोजी संताजीच्या पारिपत्यासाठी रवाना झाला आहे. बादशहांनी विचारले. 'बंकापुरापासून तुंगभद्रा किती दूर आहे?' कळविण्यात आले की, 'अठरा कोस आणि तेथून बसवापट्टण दहा कोस आहे.'

पैशाच्या बाबतीत औरंगजेबाचा हाच बारकावा असे. जात्या तो काटकसरी होता. पैशाच्या बाबतीत महाचिकट. हातातून पैसा सुटता सुटत नसे.

लढाईत मराठ्यांनी तोफा, बंदुका वगैरे पळविल्या व पैशांचे नुकसान झाले म्हणजे औरंगजेबाच्या जिवाचा अगदी तिळपापड होई. अशा प्रसंगी ज्यांच्या तोफा पळविल्या असतील त्या सरदारांकडून त्यांची किंमत वसूल करण्याचा त्याचा नेहमीचा शिरस्ता होता. जिंजीच्या वेढ्यात कामबख्शाचा गोट मराठ्यांनी लुटून साफ केला. त्याची किंमत त्याने आसदखानाकडून वसूल केली. किंमत येईपर्यंत आसदखानाचे दोन महाल त्याने जप्त केले. पन्हाळ्याच्या वेढ्यात सफशिकनखानाच्या तोफा, बंदुका, रेहकले वगैरे मराठे घेऊन गेले. त्यांची किंमत सफशिकनखानाकडून वसूल करण्यात यावी अशी औरंगजेबाने आज्ञा केली. कोकणातील कोथळागड ऊर्फ मिफ्ताहुल्फुतूह मोगलांना मावळ्यांचा पायदळ सरदार गोविंदराव याच्या फितुरीने सर झाला. त्या गोविंदरावाने अर्ज केला की "मिफ्ताहुल्फुतूह घेतल्याबाबत मी व माझे पायदळ मनसबीची आशा धरून होतो. आता प्रतिमास तीन तीन रुपये देत जावे. तसेच "मन्सब देऊन ऊर्जित कराल व चाकरीची जागा द्याल अशी आशा करितो" 'आहे त्यात संतुष्ट राहावे' असा हुकूम झाला.

मातबरखान हा औरंगजेबाचा कोकणातला कर्तबगार सुभेदार होता. त्याने अनेक वेळा पदरचे पैसे खर्च करून मराठ्यांचे पन्नास किल्ले घेतले. औरंगजेब त्याच्यावर खूष होता. त्याने त्याला कोकणची सुभेदारी दिली. पण औरंगजेबाची खुषी किंवा सहानुभूति सक्रिय अशी कधीच नसे. कनवटीचा पैसा जायचा प्रसंग आला म्हणजे औरंगजेब कावरा बावरा होत असे व एकदम हात आखडून घेई. औरंगजेबाचे हुकूम उठवण्याच्या स्तुत्य उद्योगात मातबरखानाला बेसुमार कर्ज झाले व औरंगजेबाकडे पैशासाठी विनंतीअर्ज पाठविण्याचा त्याने धडाका लावला. "मी कर्जबाजारी झालो आहे मला लाखो रुपयांचे कर्ज झाले आहे. बादशहांनी रक्कम पाठवावी." पण औरंगजेब असा कवडीचुंबक, की रडकुंडीस आलेल्या मातबरखानाला त्याने कधीही मागितलेल्या रकमेच्या एकचतुर्थांशपेक्षा जास्त

रक्कम पाठविली नाही. मातबरखान नांवाचाच मातबर होता. खरा पैशाने मातबर औरंगजेबच म्हणायचा.

जे बाहेर तेच घरात खर्चावर तीच 'काकदृष्टि.' शहाजादा कामबख्श याने एकदा पाणी पिण्याची नक्षीदार पात्रे पांच हजार रुपयांना विकत घेतली. सगळ्या जन्मात औरंगजेबाने चांदीचे किंवा सोन्याचे भांडे वापरले नाही. पाच हजार रुपये अक्षरशः पाण्यात गेलेले पाहून कामबख्शाला खाऊ की गिळू असे त्याला झाले. "शहाजादा कामबख्श याच्या देवडीवरचा नाजर ख्वाजाइज्जत याने एक पाणी पिण्याचे पात्र, त्याच्यावरचे झाकण एक तबक व एक किश्ती अशी पाच पात्रे बिलोरी नक्षीकाम केलेली घेऊन ती कामबख्शच्या महाली पाठविली. शहाजाद्याला ती आवडली. त्यांनी ती पात्रे घेऊन आबदारखान्यात (जलपात्रे ठेवण्याची जागा) पाठविली. आबदारखान्याचा दारोगा मुहंमद कबीर याने ती पात्रे बादशहास दाखविली व म्हटले की "ही पात्रे पांच हजार रुपयांना विकत घेतली आहेत." बादशहा नाजरवर रागावले. त्यांनी त्याची मन्सब पन्नासनी कमी केली. बादशहानी आज्ञा केली. की "सौदागर व कारागीर यांना कैद करा. यापुढे अशी पात्रे आणता कामा नयेत."

त्याच्या काळात अफू, गांजा, भांग, दारू अशी व्यसने सर्रास बोकाळली होती. पण त्यांचा स्पर्शही त्याला झाला नव्हता. क्वचित प्रसंगी तो कॉफी पीत असे. एकदा मोठा मजेदार प्रसंग घडला. सियादतखान हा बादशहास भेटण्यास गेला त्या वेळी बादशहा कॉफी पीत होते. त्यांनी सियादतखानाला विचारले 'तुम्ही कॉफी पिता ना? ते 'हो' म्हणाले. यानंतर बादशहानें सियादतखानांना निरोप देताना कॉफी बरोबर दिली आणि खोजासराला म्हटले की, यांना कॉफी पाजून परत ये. त्याप्रमाणे करण्यात आले. खोजासरा म्हणाला, मला सियादतखान यांनी या कामगिरीबद्दल दोनशे रुपये दिले. ते खोजासराला स्वतःपाशी ठेवण्याची परवानगी देण्यात आली. म्हणजे मौज पहा कामगिरी कोणती, तर कॉफी पाजण्याची, कॉफी केवढ्याची तर दोन रुपयांची आणि कॉफी पाजणाऱ्या नोकराला इनाम केवढ्याचे तर दोनशे रुपयांचे! बादशाही मेहेरबानी ही अशीच महागात पडत असते म्हणायची.

असो. याप्रमाणे कृष्णेच्या काठावरच्या गलगलीसारख्या एका उपेक्षित खेड्यात बसून ज्या व्यापक आणि सावध बुद्धीने औरंगजेब, मुलतानपासून म्हैसूरपर्यंत आणि ढाक्यापासून अहमदाबादपर्यंत पसरलेल्या आपल्या अवाढव्य साम्राज्याचा कारभार करीत होता, तिला तोड सापडणे खरोखर कठीण जाईल. त्याच्या उद्योगाला खळ नव्हता, त्याच्या शरीराला विश्रांति नव्हती, त्याच्या जागरूकतेला सीमा नव्हती.

आणि हे कष्टांचे डोंगर अहोरात्र उपसणारा हा माणूस या वेळी तरुण नव्हता. त्याच्या वयाची पंचाहत्तर वर्षे या वेळी उलटून गेली होती, ही गोष्ट ध्यानात घेतली तर औरंगजबाबद्दलचा आदर अधिकच वाढल्याशिवाय राहत नाही. प्रसिद्ध इटालियन प्रवासी गॅमिली कारेरी याने १६९५ च्या मार्च महिन्यात गलगलीला यऊन औरंगजेबाची भेट घेतली होती. आपल्या प्रवासवृत्तात त्याने या प्रसंगाची हकीकत देताना औरंगजेबाचे जे रमणीय शब्दचित्र रेखाटले आहे, ते वाचताना औरंगजेब साक्षात् आपल्या डोळ्यांपुढे उभा असल्याचा भास होतो. औरंगजेब या वेळी सत्त्याहत्तर वर्षांचा होता. कारेरी म्हणतो—

"बादशहा उंची आसनावर सोनेरी लोडांना टेकून बसला होता. तंबूत उंची आणि मूल्यवान् कपड्यांची जाजमे अंथरली होती. मी जवळ जाऊन बादशहाला मोगल पद्धतीचा कुर्निसात केला. दुभाष्याच्या द्वारे त्याने माझी चौकशी केली. बादशहाला परदेशासंबंधी बरीच माहिती दिसली. हंगेरीत तुर्क आणि युरोपीय या राष्ट्रांत युद्ध चालली होती. त्यासंबंधी बादशहाने मला अनेक प्रश्न विचारले. मी कोण, युरोपमधील कोणत्या राष्ट्राचा, किती दिवसांपासून प्रवासावर आहे, या देशात येण्याचा हेतु काय याबद्दल मला त्याने विचारले. यानंतर बादशहाने मला रजा दिली. थोड्याच वेळाने तो बाहेर दरबारात आला.

बादशहाच्या हातात काठी असून तिच्यावर टेकून तो चालत असे. त्याचा पोशाख अगदी साधा आणि शुभ्र होता. डोक्याला पांढरे पागोटे होते. त्याच्याभोवती सोन्याची जाळी होती. पागोट्यात एक मोठा पाचू आणि चार लहान रत्ने लावली होती. त्याच्या कमरेला एक रेशमी शेला होता. कमरेला डाव्या बाजूस एक कट्यार लटकत होती. त्याच्या पायांत मोगल पद्धतीचे चढाव होते. औरंगजेब बादशहा हा शरीराने किरकोळ आणि मध्यम उंचीचा होता. त्याचे नाक त्याच्या शरीराच्या मानाने काहीसे मोठे होते. वयोमानाप्रमाणे त्याचे शरीर वाकले होते. त्याचा वर्ण गव्हाळी असून त्याच्या चेहऱ्यावर त्याची गोल दाढी उठून दिसत असे. तो आपल्या आसनावर बसल्यावर खिदमदगारांनी त्याची ढालतलवार त्याच्या हाती दिली. ती त्याने आपल्या डाव्या बाजूस ठेवली.

त्यानंतर फिर्यादीचे अर्ज पाहण्याचे काम सुरू झाले. अर्जदारांना जवळ येण्याची बादशहाने हाताने खूण केली. ते जवळ आल्यानंतर बादशहाचे दोन चिटणीस त्याचा अर्ज घेत आणि त्यातील मजकूर बादशहाला सांगून अर्ज त्याच्या हातात देत. बादशहा आपल्या हाताने अर्जावर हुकूम लिही; आणि या वयात त्याला चष्मा लागत नसे. मला हे पाहून फार कौतुक वाटले. त्याच्या प्रसन्न चेहऱ्यावरील स्मित हास्यावरून त्याला हे काम फारच आवडत असावे असे दिसले."

पण कौतुक कितीहि वाटले तरी हे मान्य करणे भाग आहे की, रायगडपासून जिंजीपर्यंत वाऱ्याप्रमाणे भिरभिरणाऱ्या मराठ्यांना पायबंद घालण्यास औरंगजेब

असमर्थ ठरला. त्याने कर्नाटकात गलगलीला मुक्काम केला तो या उद्देशाने की एकाच वेळेला तेथून महाराष्ट्रातील व तामिळनाडूतील आघाडचावर नजर ठेवता यावी; तामीळनाडूतील मोगल सेनापतीना मदत करता यावी; महाराष्ट्रातून जिंजीकडे जाणाऱ्या मराठी फौजांना अटकाव करता यावा आणि महाराष्ट्रात मराठचांना डोके वर काढू देऊ नये. त्याचे उद्देश त्याच्या दृष्टीने योग्यच होते, पण त्यातला एकही उद्देश साध्य झाला नाही. औरंगजेब विजापूरपासून अवघ्या चौतीस मैलांवर गलगलीला होता पण त्याच्या डोळचांदेखत महाराष्ट्रातून निघालेल्या संताजी धनाजीच्या वीस वीस हजारांच्या जंगी फौजा विजापूर, गुलबर्गा, रायपूर, अधोनी कडाप्पा, तिरुपतीमार्गे थेट जिंजीला जाऊन पोचत. औरंगजेबाने कितीही कडक हुकूम सोडले तरी कामबख्श, मतलबखान, कासीमखान इत्यादि त्याचे सरदार त्या फौजांना अडवू शकत नसत. उलट औरंगजेब गलगलीला आणि त्याचा नामांकित सेनापति झुल्फिकारखान जिंजीला असे महाराष्ट्राबाहेर गेल्यामुळे महाराष्ट्रात मराठचांना मोकळ रान सापडले. १६९२ च्या जूनमध्ये जिंजीला ज्या वेळी शहाजादा कामबख्श व आसदखान यांचे भांडण ऐन रंगात आले होते आणि मराठे त्यांना झोडपून काढीत होते, त्याच वेळी महाराष्ट्रात मराठचांनी छापा घालून पन्हाळा हस्तगत केला. रामचंद्रपंत अमात्याने प्रथम पाच रुपये होन पगार देऊन कारकून म्हणून ठेवलेला आणि नंतर मुतालिक म्हणून नेमलेला किन्हईचा परशुराम त्रिंबक याने हा लष्करी पराक्रम केला. त्याने एका रात्री छापा घालून पन्हाळगडचा किल्ला काबीज केला. मराठे कोणाला चाहूल लागू न देता गुपचुप शिडचा लावून तट चढले. किल्लेदाराला खबर लागली तेव्हा वेळ निघून गेली होती. त्याने खूप धडपड केली, पण व्यर्थ. तो जखमी होऊन मराठचांच्या तावडीत सापडला. संभाजीच्या मृत्यूनंतर, राजाराम निघून गेल्यानंतर १६८९ मध्ये पिराजी घाटग्याशी लढून व नंतर त्याला नोकरीत घेऊन औरंगजेबाने मोठचा कष्टाने हा किल्ला जिंकून घेतला होता; तो आता गमावला. पन्हाळा गेल्याचे ऐकून औरंगजेब अत्यंत कष्टी झाला. त्याने बहरामंदखानाला म्हटले, "पन्हाळा गेला नाही. विजापूरच जणू गेले. आता ही हानि कशी दूर करता येईल याची तजवीज करा."

त्याप्रमाणे तजवीज करण्यात आली. पहिल्या प्रथम औरंगजेबाने आपला बख्शी बहरामंदखान यालाच पन्हाळचावर पाठविण्याचे ठरविले. त्याप्रमाणे सैन्याच्या तयारीचा हुकूम काढण्यात आला आणि बहरामंदखानाचा पेशखाना म्हणजे आघाडीचे तंबूसुद्धा बाहेर काढण्यात आले. पण नंतर विचार बदलून औरंगजेबाने आपला नातू शहाजादा मुअज्जमचा मुलगा मुईजुद्दिन याला पाठविण्याचे ठरविले. त्याच्याबरोबर त्याचा पालक म्हणून शहाजहानचा वजीर सादुल्लाखान याचा मुलगा लत्फुल्लाखान यालाही रवाना केले. तोफांचा मुख्य अधिकारी सफशिकनखान

याची मुईजुद्दीनच्या हाताखाली नेमणूक केली. पन्हाळगडच्या समोर मोर्चे आणि भुयारे व किल्ल्यापर्यंत नेणारे सुरक्षित व झाकलेले मार्ग तयार करण्यासाठी उस्मान करावल यालाही पाठविण्यात आले. अशा जय्यत तयारीने मुईजुद्दीन पन्हाळचाला गेला आणि त्याने गडाला वेढा घातला. मोगलांनी मोर्चे उभे केले आणि मराठ्यांना मिळणारी रसद तोडण्याचा प्रयत्न केला. थोड्याच दिवसांत मोगल मराठ्यांना नामोहरम करीत असल्याच्या विजयवार्ता औरंगजेबाच्या कानावर आदळू लागल्या. लुत्फुल्लाखानाने बादशहाचा चिटणीस फाजदुलखान याला म्हणजेच बादशहाला पत्र लिहिले. त्यात मराठ्यांचा मोड केल्याची, आणि मोगलांना सोडून नुकताच मराठ्यांना मिळालेला बारामतीचा ठाणेदार हणमंतराव निंबाळकर ठार मारल्याची बातमी होती.

"विनंती की रबिउस्सानी महिन्याच्या नऊ तारखेस शुक्रवारी रात्र संपण्या-पूर्वीच्या वेळी ही हकीकत घडली. हणमंतराव (निंबाळकर) हा आपल्याशी बंड करून निघालेला मराठा सरदार आपल्याबरोबर स्वार आणि कर्नाटकी पायदळ असे सैन्य आणि रसद नेणारे असे दहा हजार सैन्य घेऊन देवगडच्या घाटाच्या मार्गाने आला. तो पन्हाळगडच्या प्रवेशद्वाराच्या बाजूने आला. तिकडील मोर्चावर इतमाजी हा सरदार होता. तो आपला जुना सरदार आहे. त्या मोर्चाच्या आघाडीला व पिछाडीला मोगलांची पथके हुशारीने उभी होती. हणमंतराव याच्या येण्याची बातमी लागताच ही पथके युद्धास सज्ज झाली. रात्रीच्या अंधारात युद्धास तोंड लागले. उभय पक्षांकडून बाणांचा व बंदुकीच्या गोळ्यांचा वर्षाव होऊ लागला. युद्ध निकराचे होऊ लागले. याच वेळी योगायोगाने हणमंतराव याच्या डोक्याला गोळी लागून तो गतप्राण झाला. यामुळे मराठ्यांचा धीर खचला. त्यांच्या सैन्यातील गोंधळ आमच्या सैनिकांच्या लक्षात आला. आमच्या सैनिकांनी मशाली पेटविल्या आणि ते मोर्चातून बाहेर पडले. त्यांनी शत्रूंवर बंदुकी इत्यादींचा मारा करून कित्येकांना ठार मारले व जखमी केले. यानंतर त्यांनी मराठ्यांची सगळी रसद हस्तगत केली. अशा प्रकारे बादशाही सैन्याचा विजय झाला आणि बंडखोर हणमंतराव नरकास गेला. बादशहाशी बेइमान झाल्याचे त्याला भले प्रायश्चित्त मिळाले."

ऑक्टोबर १६९३ मध्ये रामचंद्रपंत अमात्य, धनाजी जाधव, शंकराजी नारायण सचिव हे पन्हाळचाला मदत करण्यासाठी चालून आले. पण बादशाही सैन्यापुढे त्यांना पळ काढावा लागला. या लढाईतच परशुराम त्रिंबक हा बंदुकीच्या गोळीने ठार झाला आणि किल्ल्यावरचे लोक धान्याच्या टंचाईने मेटाकुटीला येऊन अपराधाची क्षमा मागत आहेत अशी आनंदवार्ता मुईजुद्दीनने औरंगजेबाला आपल्या पत्रात कळविली.

"विनंती की, पन्हाळगड जिंकून घेण्याच्या कामावर आपण माझी नेमणूक केली. त्याप्रमाणे मी वेढ्याचे काम चालवीत आहे. अलीकडे किल्ल्यातील लोकां

पाशी धान्य आणि इतर सामग्री यांचा साठा कमी होऊन या टंचाईमुळे किल्ल्यातील लोक मेटाकुटीस आले. त्यांनी पुन्हा आमच्याकडे निरोप पाठवून आपल्या अपराधांची क्षमा मागितली. त्यांनी आपल्याला जाऊ देण्यात यावे म्हणून विनंती केली. आपली मर्जी नव्हती म्हणून त्यांच्या मागण्या मान्य केल्या नाहीत.

" या सुमारास रामचंद्र (अमात्य) व परशुराम (प्रतिनिधि) हे चालून आले. त्यांच्याबरोबर ऐंशी हजार स्वार आणि असंख्य पायदळ असे सैन्य होते. किल्ल्यात रसद पोचवावी आणि आतील लोकांना मदत करावी असा त्यांचा हेतु होता. त्यांच्याबरोबर तोफा, रेहकले, बाण, जंबूरक, जेजले व इतर शस्त्रास्त्रे होती. ते मोठ्या धाडसाने चालून आले. ही बातमी ऐकताच मी आपल्या सैन्याची रचना केली.

" सरमस्तखान, अफजलखान, शेरअंदाजखान, मीरमहंमदखान आणि इतर मोगल यांना मी करावलीवर ठेवले. तोफखान्याचा दारोगा सफशिकनखान याच्याकडे तोफखाना सज्ज ठेवण्याचे काम देण्यात आले. आघाडीच्या पथकावर मरहमतखान याला ठेवण्यात आले. हरावलीवर लुत्फखान हा जबरदस्त सैन्यासहित उभा राहिला. चांद्याचा राजा किशनसिंग याला त्याच्या सैन्यासहित आणि काही मोगल सरदारासहित उजव्या फळीवर नेमण्यात आले. राजा छत्रसाल आणि काही हरवाणी सरदार डाव्या फळीला होते. मी, माझा मुलगा अईजुद्दीन, खास चौकीचे अधिकारी, हसनखान व अब्दुलकादरखान वगैरे सरदार हे मध्यभागी होते. अशा प्रकारे रचना झाल्यानंतर आमचे सैन्य आपल्या जागेवरून हलून शत्रुसैन्याच्या समोर आले. प्रथम उभय सैन्यांतून बाण आणि बंदुका यांचा मारा होऊ लागला. हळुहळु युद्ध निकराला येऊ लागले. मोठमोठ्या तोफा चालू झाल्या. आमच्या सैन्याने मोठे शौर्य गाजविले. परशुराम हा शत्रुसैन्याचा पुढारी होता. तो रामचंद्र (अमात्य) याच्या बरोबरीचा होता. योगायोगाने एक गोळी त्याच्या डोक्यात लागली. तो मरण पावला. शत्रूचा धीर खचला हे पाहून आमचे स्वार पुढे चाल करून गेले. बराच वेळ हाणामारी चालली होती. शेवटी शत्रूला टिकाव धरणे अशक्य होऊन त्याने पळ काढला."

पण लुत्फुल्लाखान काय किंवा मुइजुद्दीन काय यांच्या भाकडकथांनी हुरळून जाण्याइतका काही औरंगजेब भाबडा नव्हता. मोहिमांवर पाठविलेले आपले सरदार 'एक हात लाकूड तर दहा हात ढलपी' अशा थाटाचे लंबेचवडे आणि खोटेनाटे वृत्तान्त आपणाला सादर करितात, तो त्यांचा नेहमीचा शिरस्ताच आहे हे त्याला अनुभवाने चांगले माहीत झाले होते. त्याचमुळे आपल्या सरदारांच्या प्रामाणिकपणावर त्याचा फारसा विश्वास नव्हता व त्याच्या वृत्तान्तांना तो फारशी किंमतही देत नसे. तो संशयी होता हे खरे; पण त्याच्या सरदारांचे वर्तन पाहिले म्हणजे त्याच्या संशयीपणाची गणना दोषांपेक्षा गुणांतच करावी लागेल असे वाटते.

त्यामुळ मुइजुद्दीनचे पत्र आले ते औरंगजेबाच्या अपेक्षेप्रमाणेच आले. त्याचे स्वतःचे इरकारे होते व हेर होते. ते निराळीच बातमी सांगत होते. उदाहरणार्थ, ज्या हणमंतराव निंबाळकरांचे टाळके फोडले म्हणून लुत्फुल्लाखान बढाई मारीत होता, तो मेला नव्हता. उलट आणखी तेरा वर्षे मोगलांना छळण्याइतका धडधाकट राहिला होता. त्याचप्रमाणे वेळोवेळी मराठ्यांची रसद मारली म्हणून मोगल फुशारक्या मारीत होते. खरी गोष्ट अशी होती की अनेक वेळा मराठेच मोगलांची हवेलंडी उडवून देत होते. २५ एप्रिल १६९३ रोजी औरंगजेबाच्या हरकाऱ्यांनी त्याला पुढील बातमी दिली – "मराठे हे धान्याच्या गोण्या लादलेले सहा हजार बैल घेऊन पन्हाळगडात रसद पोचविण्याच्या उद्देशाने किल्ल्यापासून सात कोसांवर आले. शहाजादा मुइजुद्दीन याने अब्रादुल्लाहचा मुलगा आणि सैन्याचा बक्षी मुहंमद अस्करी आणि आपला दूधभाऊ अली मुराद कोका याला सैन्य देऊन मराठ्यांच्या विरुद्ध पाठविले. लढाई झाली. बादशहाच्या कृपेने मराठ्यांचा मोड झाला. मोठा जय मिळाला. ओझ्याचे बैल पकडण्यात आले. या सुमारास मराठ्यांच्या सैन्याची तीन हजारांची तुकडी महादेवाच्या डोंगरातून चालून आली पुन्हा लढाई झाली. मुहंमद अस्करी, अलीमुराद आणि इतर अधिकारी पराजय पावून पळून गेले. मराठ्यांनी मोगलांची सुमारे पांचशे माणसे ठार मारली आणि ते धान्याची रसद सोडवून घेऊन गेले. बादशहा बक्षी मुखलिसखान याला म्हणाले "त्या अधिकाऱ्यांच्या मन्सबी काय होत्या ते कळवा."

२१ ऑक्टोबर रोजी झालेल्या लढाईबद्दल मुइजुद्दीनने औरंगजेबाला कळविले होते की मराठ्यांचा मोड होऊन ते पळून गेले व त्यांचा पुढारी परशुराम (त्र्यंबक) ठार झाला. वस्तुतः तसे काही झाले नव्हते. तो जिवंत होता इतकेच नव्हे तर औरंगजेबालाही पुरून उरला. मराठ्यांनी किल्ल्यात रसद पोचविली आणि किल्ल्यातील शिबंदीला घेऊन त्यांनी मोगलांच्या मोर्च्यांवर हल्ले केले. अनेक माणसे मारली. सफशिकनखानाच्या मोर्च्यातून काही तोफा आणि रेहकले किल्ल्यात पळविले. औरंगजेबाला जेव्हा हे समजले तेव्हा त्याने आज्ञा केली की, "सफशिकनखानाच्या ज्या तोफा, बंदुका, रेहकले मराठ्यांनी नेल्या त्यांची किंमत सफशिकनखानाकडून वसूल करण्यात यावी."

औरंगजेब पन्हाळ्यापासून दूर गलगलीला असला तरी अतिशय दक्ष होता यात शंका नाही. २१ ऑक्टोबरपासून पन्हाळ्यापुढे मोगल व मराठे यांच्या चकमकी चालू होत्या. २७ ऑक्टोबरला औरंगजेबाने पन्हाळ्याच्या मदतीला गेलेल्या मराठ्यांच्या विरुद्ध एक गाझीउद्दीन फिरोजजंग याच्या हाताखाली व दुसरे खानाजादखानाच्या हाताखाली अशी दोन सैन्ये तातडीने रवाना केली. ५ नोव्हेंबर रोजी कऱ्हाडजवळ धनाजी जाधवाशी फिरोजजंगाचे युद्ध झाले. त्याने बादशहाला कळविले की, "आज्ञेप्रमाणे मी पन्हाळगडाकडे रवाना झालो. मी फलटणला

पोचलो. तेथे धनाजी जाधव सैन्य घेऊन आला. मी चिनकिलीजखान व रुस्तुमखान यांना त्याजविरुद्ध पाठविले. कऱ्हाडजवळ युद्ध झाले. गनिमाची अनेक माणसे ठार झाली. त्यांचा पराजय झाला. तीस कैदी, सोळाशे घोडे, घोड्या, भाले हाती लागले ते हुजुरात पाठविले आहेत." फिरोजजंगाच्या पराक्रमाबद्दल प्रश्नच नाही. इतकेच की "बैल गेला आणि झोपा केला" या म्हणीप्रमाणे तो पराक्रम वेळ निघून गेल्यावर केला होता. मराठ्यांचे काम झाले होते. त्यांनी पन्हाळ्यात रसद पोचविली होती आणि वेढा घालणाऱ्या मोगलांचे कंबरडे मोडले होते. त्यानंतर झालेल्या त्यांच्या एखाद्या चिल्लर पराभवाला तसा अर्थ काहीच नव्हता. पन्हाळ्याच्या वेढ्यात तसा आता काही जीव राहिलेला नव्हता.

आणि औरंगजेबाच्याही हे प्रत्ययाला आले. ऑक्टोबरच्या संग्रामानंतर त्याने लगोलग ७ मार्च १६९३ रोजी खानजमान फत्तेजंग, त्याची मुले व ओरछाचा राजा अवधूतसिंह यांचो सहा हजार स्वारांसह मुइजुद्दीनकडे पन्हाळ्याला रवानगी केली. आणि "पन्हाळगडचा किल्ला मराठे देत असतील तर उत्तम, नाहीतर पुन्हा मोर्चेबंदी करून पन्हाळ्याला वेढा द्या." असा हुकूम मुइजुद्दीनला पाठविला. पण आजाची जिद्द नातवात नव्हती. मराठ्यांनी त्याला इतके सळो की पळो करून सोडले होते की बादशहाच्या आज्ञेची वाट न पाहता तो तडक पन्हाळ्याहून मागे बादशाही छावणीकडे परत फिरला. तो तर फिरलाच, पण त्याच्याबरोबर लुत्फुल्लाखान आणि मंडळी, पन्हाळा सोडू नका असे औरंगजेबाने बजावले असतानाही परत फिरली. पन्हाळ्याच्या अलीकडे सात कोसांवर वळकापूर येथे ही मंडळी आल्याचे कळल्यावर औरंगजेबाने महंमद नसीरला शहाजाद्याकडे पाठविले आणि निरोप केला की, "शहाजाद्यांनी तेथूनच पन्हाळ्याकडे जावे. मराठे पन्हाळा देत असतील तर बरे, नसल्यास पन्हाळ्याला पुन्हा वेढा घालावा." पण शहाजादा कसला खमंग तो पुढेच चालला. त्याच्याबरोबरची कोडगी मंडळीही पुढे चालली. इलाजच काही नव्हता. मराठे किल्ल्यात येऊ देईनात आणि बादशहा छावणीत येऊ देईना. चार दिवस त्यांची ही चाल पाहून बादशहाने सांगून पाठविले की मुइजुद्दीन याने सफशिकनखान व चांद्याचा जमीनदार किशनसिंग इत्यादींना बरोबर घेऊन हुजुरात यावे. लुत्फुल्लाखान याने सैन्य घेऊन पन्हाळगडला वेढा घालण्यासाठी पुन्हा तिकडे जावे. पण लुत्फुल्लाखान जाईना. अखेर त्याच्या कोडगेपणापुढे बादशहाने हात टेकले व त्याला हुकूम केला की त्याने अकलूजकडे जावे. तो आनंदाने गेला. कारण तो तेथूनच आला होता. तरी आणखी काही अट्टल कोडगे मुइजुद्दीन बरोबर येतच होते. २७ मार्च रोजी मुइजुद्दीन बादशाही छावणीजवळ आला. "बादशहांना कळविण्यात आले की, शहाजादा मुइजुद्दीन येत आहे. हुकूम नसताना त्याच्याबरोबर नेकनिहादखान वगैरे येत आहेत. हुकूम झाला की, त्यांना परत तातडीने पन्हाळ्याकडे पाठविण्यात

यावे." २९ मार्च १६९४ रोजी मुइजुद्दीन औरंगजेबाला भेटला आणि पन्हाळगडच्या वेढ्याचे पहिले पर्व समाप्त झाले.

औरंगजेबाची जिद्द मोठी. त्याने आपला दुसरा नातू शहाजादा आझमचा मुलगा बेदरबख्त याच्या हाताखाली पंचवीस हजार स्वार देऊन त्याला ५ एप्रिल १६९४ रोजी पन्हाळ्याला पाठविले. बेदरबख्त तडफदार खरा, पण त्यालाही यश आले नाही. मोगल सैन्यात मत्सर आणि भांडणे फार. उदाहरणार्थ, २० जुलै १६९४ ची ही बातमी पहा– हरकाऱ्याच्या तोंडून पुढील हकीकत कळली. खानजमान फतेहजंग याने ररगुंद घेण्यासाठी त्या किल्ल्यावर हल्ला चढविला. पण बादशाही सरदारांपैकी कोणीही त्याच्या मदतीला गेले नाही. यामुळे खिन्न होऊन मोर्चे टाकून तो छावणीत परत आला. हे कळल्यावर शहाजादा बेदरबख्त याने मोर्चे सांभाळण्यासाठी शमशेरखान आदि सरदारांना पाठविले. पुढे बेदरबख्ताला उत्तर कर्नाटकात काम दिल्यामुळे पन्हाळ्याचा वेढा बारगळला तो बारळलाच.

पन्हाळ्याचे महत्त्व औरंगजेबाला अतिशय वाटत होते. ऑक्टोबर १६९३ मध्ये जेव्हा त्याने रामचंद्रपंत अमात्य, धनाजी जाधव आणि शंकराजी नारायण यांच्याबरोबर मुइजुद्दीनच्या चाललेल्या चकमकींची हकीकत ऐकली, तेव्हा काही काळ गलगलीहून आपण स्वतःच पन्हाळ्याला जावे असा त्याच्या मनात विचार आला. १४ नोव्हेंबर १६९३ रोजी करावलखान यास त्याने पन्हाळगडाकडे पाठविले. 'त्याने बादशाही तळापासून पन्हाळगडाचे अंतर मोजावे आणि बादशहाच्या छावणीसाठी गडावरून गोळे पोचणार नाहीत अशी जागा पाहून यावी असे त्याला सांगण्यात आले. त्याला हजार रुपये देण्यात आले. दुसऱ्या दिवशी फाजिलखान मीरसामान यास बादशहाने आज्ञा केली की, हत्ती व ओझी वाहून नेणारे उंट ठिकठिकाणांहून बोलावून घ्या. आतिशखान फौजदार याला आपल्याबरोबर वाहतुकीची जनावरे व इतर सामान आणावयास लिहा. एवढी निकड खानाजादखान व गाजीउद्दीन फिरोजजंग यांना मुइजुद्दीनच्या मदतीला पाठविल्यावरसुद्धा त्याला वाटली. त्याने स्वतः जाण्याचा विचार नंतर रद्द केला ही गोष्ट निराळी. पण त्याच्या एकंदर धडपडीवरून पन्हाळगड हा केवढा 'अश्रफो'चा किल्ला त्याला वाटत होता हे मनावर चांगले ठसते. 'पन्हाळगड गेला नाही. बिजापूरच जणू गेले.' हे त्याचे उद्गार म्हणजे अतिशयोक्ति नव्हती, त्याच्या नुकसानीचे व वेदनेचे ते यथावत् रूपदर्शन होते.

पन्हाळा गेल्याचे औरंगजेबाचे दुःख ताजे असतानाच त्याच्यावर आणखी एक आघात झाला. मराठ्यांनी सिंहगड घेतला. मोगलांनी १६८६ च्या सुमारास सिंहगड काबीज केला होता आणि त्याच्यावर पहाराही अगदी कडक ठेवला होता. रात्रभर गस्तीवर गस्त असे. कारण एकतर जागा मोठी महत्त्वाची होती. आणि दुसरे म्हणजे पूर्वी तटाला माळा लावून तानाजीने जसा किल्ला सर केला,

तसा प्रयत्न मराठे करण्याची शक्यता होती. पण मोगलांच्या या खबरदारीचा काही उपयोग झाला नाही. किल्लाच जेथे मराठ्यांकडे जाऊ म्हणत होता, तेथे मोगल काय करणार? शंकराजी नारायण सचिव याने विठोजी कारके आणि नावजी बलकवडे यांस सिंहगडावर छापा घालण्यास पाठविले. त्यांनी १ जुलैच्या उत्तररात्री, तटाला शिड्या लावून छापा घातला आणि अगदी तानाजी मालुसरे याच्या पद्धतीप्रमाणे सिंहगड सर केला. इतिहासाची पुनरावृत्ति होते ती अशी या पराक्रमाबद्दल नावजी बलकवडे यास पौन मावळातील सावरगाव हा इनाम देण्यात आला.

काकाजी नारायण देशाधिकारी प्रांत मावळ, तालुके लोहगड यास लिहिलेल्या पत्रात, या प्रकरणाचा सूत्रधार शंकराजी नारायण याने स्वतः या प्रसंगाचे रसभरित वर्णन केले आहे; ते वाचण्यासारखे आहे– "सिंहगड, लोहगड, पुरंदर किल्ले मोठ्या आश्रफीचे. ते गनिमाकडे आहेत. त्यामुळे रायगडास काम पाहोन मदंती होते. याकरिता वरघाटाच्या किल्ल्यामध्ये प्रस्तुत एक स्थळ हस्तगत करावे म्हणजे रायगडची कित्येक भातेने मदत राहोन पुढे राहिली स्थळे हस्तगत होतील. याकरिता किल्ले सिंहगड गनिमांपासून हस्तगत करावयाचा विचार करून छ १ शव्वाली रा। त्र्यंबकपंत मुतालिक दि॥ सुरनिशी यांनी किल्ले कोरी गडाहून स्वारी करून राजमाचीस मुक्काम केला. स्थळमुदतेचे हवीस (मोक्याचे पाहणीस) मशारनिल्हे विठोजी कारके पदाती पंचसहस्रो यास पाठविले. त्यांनी किल्ल्यास जाऊन हवी करून आले. ऐशियास किल्ला हस्तगत करणे त्यास पथकधारकरी हशमच्या (पायदळ) सरदारामध्ये नेमितां मशारनिल्हे नावजी बलकवडे पदाती पंचसहस्री यांनी मर्दुमकीच्या जोमे धार कबूल केली. त्यास हवी धारकरी यानी मनास आणिले पाहिजे यायाबद्दल नावजी बलकवडे यास व विठोजी कारके यास रवाना केले. उभयता जाऊन विठोजी कारके यांनी जे जागा हवी केली होती ते पाहून उभयता राजमाचीस आले. त्याउपरि जमावामध्ये निवड करिता नावजी बलकवडे यांनी विनंती केली की– स्वामीने आपणास धार नेमिली ती आपण कबूल केली परंतु सिंहगड म्हणजे मोठ्या आश्रिफीचा आहे. गनीम बहूत जोरावर, हमेशा खबरदार आहे. साले गुदस्ता स्वामीने किल्ला हस्तगत करावयासी स्वारी रवाना केली होती. ते समयी जमाव जाऊन आदी करून सिड्या तटास लाविल्या. गनिमाची खबरदारी देखोन धारकरी यांनी कच खावोन आले. कामास धक्का बसला. त्याउपरि अलीकडे तो बहुतच खबरदारी गनिमांनी करून नाजूक जागांची बेहबूदी (मजबुती) बहूत भीतेने करून खबरदार आहे. बलंद (उंच) जागे आदीकरून पाहारे चौकस बसवून चारी प्रहर रात्री गस्तीवरी गस्ती चालताती. किल्लेदार तरवारीचा जोम धरून जमावानिसी गतवर्षापेक्षा राहात आहे. किल्ले यास दगा द्यावा ऐसा जागा खबरदारीकरितां राहिला नाही. हल्ली हवी

(मोक्याची जागा) पाहिली आहे. त्या जागा पाहारेयाची बौही आहे. कस्तेने जोरावारीने दगा द्यावा लागतो. पूर्वी राजश्री कैलासवासी स्वामींचे वेळेस किल्ला गनिमाकडे असता किल्ला हस्तगत करावयाचा प्रयत्न केला. तान्हाजी मालुसरे यासारखा सरदार धारेस नेमला होता. त्यांनी शर्थ करून किल्ला हस्तगत केला. तान्हाजी मालुसरे यासारखे माणूस खर्च होऊन गेले. आपण जिवावरी निदान करून धार कबूल केली आहे. किल्ला हस्तगत झाल्यास मौजे सावरगाव तालुके पौनमावळ हा गाव आपणास इनाम दिला पाहिजे म्हणोन विनंती केली. त्यास सिंहगड आश्रफाचा जागा. त्यासारिखे या स्थळी गनिमाची जोरावरी आहे. नावजी बलकवडे यांनी धार कबूल केली. याबाबत गाव इनाम द्यावयाचा तह केला. त्याउपरि छ १ जिल्कादी (२५ जून १६९३) राजमाचीहून जमावानिसी स्वारी करून कोकणातून घाटमाथा चढून मजल दर मजल गडानजीक रानामध्ये दबा धरिला. छ ६ जिल्कादी (३० जून) धारकरी यांची निवड करून किल्ला कबज करावयासी कूच केले. ते किल्ले मजकुराच्या कड्याखाली जाऊन धारकरी माले लावून चढविले. नावजी बलकवडे प्रथम धारेस नेमिले होते. त्यांनी त्याचे जातीने प्रथम धारेस लागून मालेने चढले, तटासंनिध जमावानिसी गेले. त्या-उपरी....रात्री गनिमाची खबरदारी गस्तीवरी गस्ती होती. शिड्या लावावया अवकाश फावला नाही. अरुणोदयीस विठोजी कारके यांनी तटासी पाहारिया-जवळी सिडी लावली. नावजीने मन वाढून शर्तीने सिड्यावरी चढौन पहारा चोपून छ ७ रोजी (१ जुलै १६९३) किल्ला हस्तगत केला."

जिंजीस जाताना राजारामाने शंकराजी नारायणास सुरनिशीचा कार्यभाग सांगून रायगडापासून संपूर्ण कोकणपट्टी स्वाधीन केली. त्या प्रदेशातून मोगलांना उठविण्याची व किल्ले काबीज करण्याची कामगिरी तो अतिशय उत्तम प्रकारे पार पाडीत होता. आजपर्यंत त्याने रोहिडा, तोरणा, राजगड, प्रतापगड, सिंहगड हे नामांकित किल्ले मोगलांकडून परत घेतले होते. तोरणा या वेळी पुन्हा एकदा गाजीउद्दीन फिरोजजंग याने घेतला. त्याचप्रमाणे पुण्याच्या पश्चिमेस मुळशीजवळ असलेला कोरीगड ऊर्फ कुवारीगड शंकराजी नारायणाचा प्रतिस्पर्धी जुन्नरचा फौजदार अलीबेग याने घेतला. त्याने रायाजी बहूलकराच्या हस्ते किल्ल्यात भेद केला व किल्लेदार सोनजी त्र्यंबक याला फितूर करवून किल्ला काबीज केला. पण शंकराजी नारायणाने वर्ष सहा महिन्यांतच तोरणा व कोरीगड दोन्ही परत घेतले. त्याने बेग्याला काढून दिले व मुख्य फितुरी जो रायाजी बहूलकर त्याला मार देऊन राजगडी अटकेत ठेविले. त्याचप्रमाणे कोकणातला सिद्धगड मोगलांनी घेतला असता, शंकराजी नारायणाचा विश्वासू हस्तगत गुणाजी सावंत याने छापा घालून तो किल्ला परत मिळविला. मिळून काय की महाराष्ट्रातील किल्ले मोगलांना नीट सांभाळता येईनात.

किल्ल्यांची कथा अशी झाली. कोकणातही मोगलांच्या अमलाला साफ ओहोटी लागली. पूर्वी शहाआलमच्या कोकणच्या स्वारीपर्यंत मोगलांना मिळून असलेले पोर्तुगीज आता मराठ्यांना मिळाले होते. इतकेच की ते उघडपणे मोगलांच्या विरुद्ध जात नव्हते. पण आतून ते मराठ्यांना सर्व प्रकारचे साहाय्य करीत. याचे कारण उघड होते की "पोर्तुगीजांस खात्री होती की कोकणामध्ये मराठ्यांची सत्ता पुन्हा येईल व मुसलमानांच्या पेक्षा त्यांस हिंदूंचे राज्य आपल्या राज्याच्या शेजारी असणे हितावह वाटत असे." मातबरखान हा मोगलांचा कोकणातला अधिकारी पोर्तुगीजांच्या या पंचमस्तंभी कारवायांच्या कहाण्या औरंगजेबाला लिहून लिहून कंटाळला, पण उपयोग झाला नाही. "दुसऱ्या वर्षी पोर्तुगीजांनी राजारामाच्या अधिकाऱ्यांच्या कबिल्यांना आश्रय दिला. मराठ्यांनी आमच्या वैकुंठगड किल्ल्यावर हल्ला केला. त्यात पोर्तुगीजांनी त्यांना मदत केली. तिसऱ्या वर्षी त्यांनी आमच्याकडून अचानक कर्नाळ्याचा किल्ला घेतला. राजारामाच्या किल्ल्यांना ते सारखी कुमक आणि रसद यांचा पुरवठा करीत होते. मराठ्यांनी पट्ट्याचा (विश्रामगड) किल्ला घेतला. त्यामुळे पोर्तुगीजांना आणखी बळ आले आहे. त्यांचा साष्टीचा अधिकारी ट्रिस्टान डिमेलो याने राजारामाचा एक अधिकारी श्यामजी मोरदेव याला खांदेरीहून बोलाविले. श्यामजी आणि त्याचे दीड हजार पायदळ यांना त्याने ठाण्यामध्ये आश्रय दिला. मराठे माहुलीचा किल्ला आणि भिवंडीचे ठाणे यांवर हल्ला करतील तेव्हा त्यांच्याशी सहकार्य करण्याची पोर्तुगीजांनी तयारी दाखविली आहे!" भिवंडी—कल्याण म्हणजे तर मातबरखानाची राजधानीच. तेव्हा अखेर न राहवून मातबरखानाने स्वयंस्फूर्तीने पोर्तुगीजांच्या वसई प्रांतावर स्वारी केली व बरीच लूटमार केली. या त्याच्या फाजील उत्साहाचे बक्षीस त्याला इतकेच मिळाले की पोर्तुगीज गव्हर्नरने जेव्हा तक्रार केली तेव्हा औरंगजेबाने मातबरखानाला लढाई बंद करावी आणि पोर्तुगीजांना दोन लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी असे फर्मावले. बिचारा मातबरखान! आपलेच दात आणि आपलेच ओठ म्हणून मनगटे चावीत स्वस्थ बसला. दक्षिण कोकणातही हीच परिस्थिति होती. फोंड्याचा मोगल अधिकारी इख्लासखान याने मणेरी आणि साखळी येथील बंडखोर देसायांविरुद्ध पोर्तुगीजांची मदत मागितली. त्यांनी मदत करण्याची बतावणी केली आणि देसायांना आतून फूस दिली.

कुलाबा जिल्ह्यात सीदी आणि मातबरखान हे मोगलांचे प्रबळ अमलदार होते. पण १६८९ पासूनच कान्होजी आंगरे व भिवजी गुजर यांनी या भागात आरमारी हालचाली सुरू केल्या. त्यांनी शेख महंमद ऊर्फ मामतखान आणि सीदी यांच्याशी लढाया करून त्यांस पराभूत केले. त्यांचा तह झाला. त्या अन्वये प्रांतात दुतर्फा अंमल सुरू झाला, म्हणजे ताबा मोगलांचा असला तरी या प्रांताच्या उत्प-

त्याचा भाग मराठ्यांना मिळालाच पाहिजे. तो ते वसूल करू लागले. इतकेच नव्हे तर कोकणचा बादशहा बनलेल्या मातबरखानाला सुद्धा नाक मुठीत धरून आपल्या उत्पन्नाचा एक तृतीयांश भाग मराठ्यांना देण्याचे कबूल करावे लागले. खरोखरच, या प्रलयकाळात पश्चिम किनारा राखला गेला तो केवळ कान्होजी आंग्र्याच्या बहादुरीमुळे होय.

देशावर काय, कोकणात काय, वऱ्हाडात काय, सगळीकडे हीच परिस्थिति होती. ५ एप्रिल १६९३ ची बातमी पहा– "हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की उत्तरेकडून काफिला येत होता. तो कामठीला पोचला तसा मराठ्यांनी त्याच्यावर हल्ला चढविला. त्यांनी काफिला पूर्णपणे लुटला आणि ते मालमत्ता घेऊन गेले." क्वचित् प्रसंगी औरंगजेबाला आनंदाची बातमी ऐकायला मिळे. "१५ मार्च १६९४– हमीदुद्दीनखान हा मराठ्यांच्या विरुद्ध वऱ्हाड प्रांताकडे गेला होता. तो आपल्या सहकाऱ्यांसह बादशहाच्या सेवेत हजर झाला. बादशहा म्हणाले, "आफरीन बाद, आफरीन बाद, (धन्य धन्य) गनीमरा खूब तंबी नमूदा" (गनिमांना चांगले खडे चारलेत.) पण 'आफरीन बाद आफरीन बाद' असे धन्योद्गार काढण्याचे भाग्य बादशहाला मिळवून देणारे सेवक फार थोडे होते. पन्हाळ्याच्या गाफील किल्लेदारासारखे 'हाय हाय' म्हणायला लावणारेच फार.

हमीदुद्दीनखान बराच पराक्रमी दिसतो. ९ सप्टेंबर १६९५ रोजी चंदनवदन नजीक त्याने संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांचा पराजय केला. या लढाईत धनाजी जाधवाचा मुलगा मारला गेला. "हमीदुद्दीनखानाच्या फौजेतील बातम्यांवरून कळले की संताजी व धनाजी हे आपले सैन्य घेऊन (महादेवाच्या) डोंगराच्या अलीकडे दोन कोसांवर चालून आले होते. हे कळल्यावर हमीदुद्दीनखान याने फतेउल्लाखान व नाहरखान यांना तिकडे पाठविले. फतेउल्लाखान तिकडे पोहोचला. युद्ध झाले. बादशहाच्या भाग्याने शत्रूपैकी अनेक लोक मारले गेले. शत्रूचा पराजय झाला. दोनशे घोड्या, तलवारी वगैरे लूट सापडली. यानंतर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेली वाडी जाळून टाकण्यात आली." बादशहा म्हणाले, "सेवेचा मजुरा झाला." हमीदुद्दीनखानाला बक्षीस म्हणून एक तलवार पाठवावी अशी आज्ञा झाली.

पण मघाशी म्हटले तेच खरे. हमीदुद्दीनखानासारखे यशस्वी थोडे होते. बाकी जेथे जेथे म्हणून मोगल आणि मराठे यांच्या चकमकी चालू होत्या तेथे तेथे बहुधा हमखास फजिती मोगलांची होई आणि औरंगजेबावर कष्टी होण्याची वेळ येई.

या काळात त्याच्या मनःस्वास्थ्याला सर्वात जबरदस्त सुरुंग कोणी लावला असेल तर तो म्हणजे संताजी घोरपडे याने होय. १६८९ च्या फेब्रुवारी महिन्यात संभाजीवर झालेल्या प्रळयातून संताजी सुटला हा नियतीचा एक चमत्कार

म्हणावा लागेल. तेव्हापासून त्याने औरंगजेबाला सळो का पळो करून सोडले होते. त्याच वर्षी ऑगस्टमध्ये पावसाळ्या रात्री त्याच्या कोरेगावच्या छावणीवर छापा घालून जेव्हा त्याच्या तंबूचे सोनेरी कळस संताजीने हिरावून घेतले, तेव्हा औरंगजेबाला प्रथम संताजी हे काय प्रकरण आहे याचा उमज पडला. त्यानंतर त्याचे धाडस आणि उच्छाद उत्तरोत्तर वाढतच चालला. मदोन्मत्त हत्तीच्या शुंडादंडाच्या आघाताने महावृक्ष उन्मळून पडावेत, त्याप्रमाणे मी मी म्हणणारे मोगलांचे धुरंधर सेनानायक संताजीच्या तडाख्यापुढे भुईसपाट होऊ लागले. सातारच्या उघड्या मैदानात लढाई करून त्याने शर्जाखानाला जिंकले. कर्नाटकच्या सरहद्दीवर जाननिसारखान व तुहव्वरखान यांचा पाडाव करून बिदनूरच्या राणीचे राज्य धुळीला मिळविण्याच्या औरंगजेबाच्या महत्त्वाकांक्षेला मूठमाती दिली. त्याने खटावला लुत्फुल्लाखानाला मुसळधार पावसात गाठून बंदुकीच्या गोळ्यांचा त्याच्यावर पाऊस पाडला. त्याने झुल्फिकारखानाला जिंजीला झोडपले. त्याने अलीमर्दानखानाला कैदेत ठेवले व त्याच्या खंडणीचे एक लाख होन गोळा करण्यासाठी त्याच्या माणसांना भीक मागत फिरायला लावले. २५ एप्रिल १६९३–अलीमर्दानखान याच्या नोकरांनी पुढीलप्रमाणे बादशहाकडे अर्ज केला. "अलीमर्दानखान याला मराठ्यांनी पकडून कैदेत टाकले आहे. एक लाख होन खंडणी भरल्याशिवाय मराठे अलीमर्दानखानाला सोडीत नाहीत. अलीमर्दानखानाची माणसे हैद्राबादेत आली आहेत. खानाचे हत्ती वगैरे जिन्नस विकून खंडणीची भरपाई करण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. पण हैद्राबादचे अधिकारी, वरील जिन्नस विकण्यास मनाई करीत आहेत. बादशहांनी आज्ञा केली की "हैद्राबादचा सुभेदार जानसिपारखान याला लिहा की त्या लोकांना जिन्नस विकू द्या. हरकत करू नका." मोगलांच्या गजबजलेल्या छावण्या संताजीच्या घोडदौडीखाली सापडल्या म्हणजे खडीचा भुगा करणाऱ्या यंत्राखाली सापडलेल्या रस्त्याप्रमाणे 'साफ' आणि 'सपाट' होऊन जात असत.

अशा या अक्षरशः सैतानाप्रमाणे अनावर झालेल्या माणसाला काबूत आणणारा उमराव शोधताना औरंगजेबाला भारी प्रयास पडले. मोगल मराठ्यांचे युद्ध सुरू होऊन आता एक तप होऊन गेले होते. तो स्वतः म्हातारा झाला होता. त्याचे कसलेले सेनापती एकामागून एक परत न येण्याच्या मार्गाने चालले होते. दिलेरखान पूर्वीच मेला होता. हसन अलीखान विजापूरच्या वेढ्यात मेला. रणमस्तखान वाकिणखेड्याच्या वेढ्यात मारला गेला. बक्षी रुहुल्लाखान गेला. अखेर औरंगजेबाने आपला दूधभाऊ बहादुरखान ऊर्फ खानजहान याचा मुलगा हिंमतखान हा अलाहाबादेला सुभेदार होता त्याला दक्षिणेत बोलावून त्याची संताजीच्या विरुद्ध योजना केली. हिंमतखान हा नामांकित शिपाईगडी होता. तेव्हा औरंगजेबाची निवड योग्यच होती असे म्हटले पाहिजे.

त्या आधी खानजहानने आपल्या ढिल्या आणि आशाळभूत स्वभावाप्रमाणे मराठ्यांशी एकवार समझोता करण्याचा प्रयत्न करून पाहिला. त्याने ओरंगजेबाला म्हटले– "आपण मराठ्यांवर कृपा करावी. त्यांचे वकील येऊन अभय मागत आहेत. आपली ताबेदारी पत्करावी अशी त्यांची इच्छा आहे." पण खानजहान ढिला असला तरी औरंगजेब पक्का होता. तो म्हणाला–"तुम्ही आपल्या शिक्क्यांनिशी कौल देऊन (मराठे सरदारांना) बोलवावे." खानजहानने संताजी घोरपडे, धनाजी जाधव आणि इतर मराठे सरदार यांना बोलावून आणण्यासाठी आपला मुलगा हिंमतखान यास पाठविले. मराठे सरदार बादशहापाशी येण्यास राजी झाले नाहीत. उलट ते युद्धास प्रवृत्त झाले. हिंमतखानाने आपल्या बापास लिहून कळविले की, मराठे सरदारांनी साफ नकार दिला. ते आपल्या वाटेने परत गेले आणि आता मुलुखात उच्छाद मांडण्यात गुंतले आहेत. हिंमतखान निराश होऊन परत आला.

सामोपचाराची मात्रा लटकी पडल्यावर युद्धाशिवाय पर्याय राहिला नाही. तेव्हा हिंमतखानाने संताजीच्या पारिपत्यासाठी कमर कसली. पण आज इथे तर उद्या तिथे अशी विजेप्रमाणे घोडदौड करणाऱ्या संताजीला एका ठिकाणी गाठणे व त्याचा पाडाव करणे हे जवळ जवळ अशक्य होते. महिन्या दोन महिन्यांत कर्नाटकात विक्रमहळ्ळी, मांडवगाव, मळखेड, कालकुर्ती, हैदराबाद या बाजूने साताऱ्याकडे महादेवाच्या डोंगरापर्यंत संताजीने हिंमतखानाला आपणामागे असे धावायला लावले की त्याच्या घोड्याच्याच काय, पण त्याच्या स्वतःच्याही तोंडाला फेस आला असेल. मराठ्यांची घोडदौड हे काय प्रकरण आहे व त्यांच्या मागे धावताना कमरेचे काटे कसे ढिले होतात याचा अनुभव घेत घेत तर हिंमतखानाचा बाप म्हातारा झाला होता. आता तो अनुभव त्याच्या चिरंजिवांना आला. हिंमतखानाला नुसतेच फिरविणे यापेक्षा या निमित्ताने मोगलांच्या फौजा जितक्या पांगविता येतील तितक्या पांगवाव्यात म्हणजे त्यांना कोणत्याही एकाच ठिकाणी बळ बांधता येणार नाही असा यामागे संताजीचा उद्देश होता. तो पूर्णपणे साध्य झाला. 'Divided we fall' हे राजकारणाप्रमाणे लष्करी हालचालीबाबतही खरेच म्हटले पाहिजे.

पण हिंमतखान आपल्या परीने प्रामाणिक होता. त्याने मांडवगांव, मळखेड, कालकुर्ती, विक्रमहळ्ळी इत्यादि ठिकाणी संताजीला गाठून लढाया दिल्या व त्याचा पराजय केला. विक्रमहळ्ळीच्या लढाईबद्दल औरंगजेबानेही त्याचे कौतुक केले. "१९ नोव्हेंबर १६९३ – हिंमतखान बहादुर हमीदुद्दीखान व रब्बजाखान याजकडून पुढीलप्रमाणे अर्ज आला. विक्रमहळ्ळीजवळ संताजीबरोबर युद्ध झाले. गोकुळ, अजन्त वगैरे बरड आणि संताजीबरोबरची तीनशे माणसे ठार झाली. तीनशे घोडी, निशाण, नगारे वगैरे आमच्या हाती आले. आमची अनेक माणसे ठार

किंवा जखमी झाली. मराठ्यांचा आम्ही पाठलाग केला. अर्ज वाचून बादशहा म्हणाले, "मीठ खाल्ल्याचे सार्थक झाले. शाबास" हिंमतखानाने संताजीला चितापूरजवळ अलूरच्या गढीत कोंडले आणि किल्ल्याला वेढा घातला. इतकेच नव्हे तर संताजीला आम्ही बाहेर पळू देणार नाही अशा अर्थाने मुचलके तिकडील जमीनदारांकडून घेतले. पण संताजी निसटला व त्याचा पाठलाग करीत हिंमतखानाने ६ मार्च १६९४ रोजी कालकुर्ती–भरम येथे आंध्र प्रदेशात त्याला गाठले. "मराठे चालून आले. युद्ध झाले. मराठ्यांचा आम्ही पराजय केला" पण संताजी मारला गेल्याशिवाय मराठ्यांच्या पराजयाला काही अर्थ नव्हता. त्यांचा पराजय करणे म्हणजे हरळी खुडण्यासारखे निष्फळ काम होते. ती हरळी जशी एका ठिकाणी खुडली तर दुसरीकडे फोफावते, त्याप्रमाणे मराठ्यांचा एका ठिकाणी पराजय केला तर दुसऱ्या दहा ठिकाणी ते डोके वर काढीत. कालकुर्तीहून संताजी पुढे आणि हिंमतखान मागे असे निघाले. महिनाभर आपणामागे हिंमतखानाला घुमवून संताजी आपल्या बालेकिल्ल्यात म्हणजे महादेवाच्या डोंगरांत घुसला येथे मात्र हिंमतखानाचा नाइलाज झाला. त्याने औरंगजेबाला लिहिले, "संताजी हा महादेवाच्या डोंगरात आहे, माझ्यापाशी सैन्य थोडे आहे. मला अधिक सैन्याची कुमक आली तर मी महादेवाच्या डोंगरात जाऊन मराठ्यांचा मोड करीन." हे म्हणणे सिंहाच्या गुहेत जाऊन त्याची आयाळ पकडण्यासारखे होते. हिंमतखान खराच 'हिंमत' खान होता. औरंगजेबाने आज्ञा केली की, मराठ्यांची वाट आडवा. ते डोंगरांतून बाहेर पडले की त्यांचा मोड करा. तेव्हा संताजीची वाट अडविण्यापलीकडे हिंमतखानाला पर्याय राहिला नाही.

तो त्याची वाट अडवू शकला नाही. हिंमतखानाच्या कल्पनेच्या उड्डाणापलीकडे संताजीची झेप होती. १६९५ च्या नोव्हेंबरात संताजी थेट कर्नाटकात उतरला आणि जिंजीकडे जाऊ लागला. त्याच्या पूर्वीच धनाजी जाधव हा वेलोरला झुल्फिकारखानाने घातलेला वेढा मारून काढण्यासाठी तिकडे रवाना झाला होता. या बातम्या औरंगजेबाला कळल्या तेव्हा त्याच्या पोटात धस्स झाले. तो ज्या कर्माला भीत होता तेच त्याच्यापुढे दत्त म्हणून उभे राहिले. कारण, काय वाटेल ते झाले तरी संताजीला जिंजीकडे जाऊ देता कामा नये असा त्याचा अट्टहास होता. त्याने ताबडतोब विजापूर कर्नाटकाचा फौजदार कासीमखान याला संताजीची वाट अडविण्याचा तातडीचा हुकूम केला. इतकेच नव्हे, तर आपल्या छावणीतून पंचवीस हजाराचे निवडक सैन्य व तोफखाना खानाजादखान, सफशिकनखान, असालतखान, महमद मुरादखान, मीर्झा हसन यांच्या हाताखाली पाठवून कळविले की, या सैन्याशी एक होऊन तुम्ही संताजीचा धुव्वा उडवावा. कासीमखानाचा मुक्काम या वेळी अधोनीला होता. तेथे हे सर्व सैन्य एकत्र आले. संताजी जाण्याची वाट तेथून सहा कोसावर होती.

कासीमखान हुशार खरा पण त्याला तारतम्य बेताचेच असावे असे वाटते. त्याने असा विचार केला की, कधी नव्हे ते बादशाही छावणीतले सरकारी पाहुणे आपल्या घरी पायधूळ झाडीत आहेत, तेव्हा त्यांना जंगी मेजवानी द्यावी आणि अतिथि–सत्काराचे पुण्य पदरी घेऊन धन्य व्हावे. या विचारात तसे वावगे काहीच नव्हते. एवढेच की तो विचार थोडा अकाली होता. लढाई संपल्यानंतर दुष्ट संताजीचे मुंडके पुढे ठेवून कासीमखानाने मेजवानी दिली असती तर ते बरे झाले असते इतकेच. त्याऐवजी त्याने आधीच मेजवानीचा संकल्प सोडला. आपली गाठ कोणत्या इसमाशी पडली आहे याची त्याला कल्पना आली नाही. त्याला आपल्या सामर्थ्याचा फाजील गर्व झाला कीं त्याला आतिथ्याची उबळ आवरली नाही, काही कळत नाही. पण तो असा वागला खरा. अधोनीच्या किल्ल्यांतून त्याने मेजवानीसाठी कोरे करकरीत कर्नाटकी तंबू, चांदीसोन्याची भांडी, तांब्याची आणि चिनीमातीची पात्रे इत्यादि सामान बाहेर काढले व आपल्या व इतर सरदारांच्या पुढील मुक्कामासाठी पाठविण्याच्या लवाजम्याबरोबर म्हणजे पेशखान्याबरोबर दोन कोस पुढे पाठविले.

संताजी पाळतीवर होताच. त्याला पेशखाना रवाना झाल्याची खबर लागल्याबरोबर त्याने आपल्या सैन्याच्या तीन तुकड्या केल्या. एक तुकडी पेशखाना लटण्यासाठी, दुसरी चालून येणाऱ्या मोगलांचा समाचार घेण्यासाठी व तिसरी राखीव. पहाटेच्या अंधारात पेशखाना वाट चालत होता. त्याच्यावर मराठ्यांनी हल्ला केला. अनेकांची कत्तल उडवली व तो साफ लुटून फस्त केला.

कासीमखानाला ही बातमी लागल्यावर तो स्वतः लढण्यासाठी पेशखान्याच्या दिशेने चालून गेला तो एक कोस गेला असेल इतक्यात केवळ त्याचीच वाट पहात असलेली मराठ्यांची तुकडी त्याच्यावर चालून आली. कासीमखान व मराठे यांच्यात लढाईला तोंड लागले.

ही धुमश्चक्री चालू असताना खानाजादखान, मुरादखान, सफशिकनखान इत्यादि कासीमखानाची पाहुणे मंडळी पहाटेच्या साखरझोपेत–आणि बहुधा दुपारी मिळणाऱ्या मेजवानीवर ताव मारण्याच्या गोड स्वप्नात–दंग होऊन गेली होती. त्यांना एकाएकी ही बातमी कळल्यावर थोबाडीत मारावी किंवा कोणीतरी गार पाण्याचे मडके तोंडावर ओतावे त्याप्रमाणे ते सारे खडबडून जागे झाले व तडक कासीमखानाच्या मदतीला धावले. त्या गडबडीत छावणी, बाजारबुणगे आणि सामान असल्या मामुली गोष्टीकडे पाहायला थांबणार कोण?

संताजीला पाहिजे होते ते हेच. त्याची तिसरी राखीव तुकडी केवळ मोगलांच्या छावणीचा परामर्श घेण्यासाठीच ठेवली होती. त्या तुकडीने आता मोगलांच्या छावणीवर हल्ला केला. सगळी मालमत्ता लुटली, सोने नाणे धुऊन घेतले आणि नंतर छावणीला आग लावून दिली.

कासीमखान व खानाजादखान मराठ्यांशी जीव खाऊन लढत होते. . त्याशिवाय इलाजच नव्हता. कारण मराठ्यांच्या सैन्यात असंख्य घोडेस्वार होते आणि तितकेच पायदळ सैन्यात बंदुकची होते. घनघोर युद्ध झाले. अनेक ठार किंवा जखमी झाले. "पण मराठे एक पाऊलही मागे हटले नाहीत. त्यांचा निश्चय थोडासुद्धा डळमळला नाही."

लढाई ऐन निकराला आली असताना, आपली छावणी गारद झाली ही बातमी कासीमखान व खानाजादखान यांना समजली. कदाचित् ही बातमी त्यांच्यापर्यंत पोचविण्याची व्यवस्था संताजीने मुद्दाम केली असणे अगदी शक्य आहे. कारण शत्रूचा अवसानघात करणे हाही युद्धाचाच एक डावपेच आहे. त्याच्या अपेक्षेप्रमाणे परिणाम झाला. कासीमखान व खानाजादखान गोंधळले. त्यांनी घाईघाईने आपसांत सल्लामसलत केली आणि जवळच असलेल्या दोड्डेरीच्या किल्ल्यापाशी जाण्याचा निर्णय घेतला.

मागे दोड्डेरीचा किल्ला व पुढे तलाव होता. तेथपर्यंत एक कोसाचे अंतर होते. ते मराठ्यांशी लढत झगडत मोगलांना चालून जावे लागले. किल्ल्यात मोगलांचीच शिबंदी होती. पण ते कासीमखान व खानाजादखान यांच्या सैन्याला आत येऊ देईनात. त्यांनी किल्ल्याचे दरवाजे लावून घेतले. शेवटी निरुपायाने मोगलांनी तलावाच्या काठीच आपला तळ दिला. समोर चहूबाजूंनी त्यांना घेरून मराठे उभे होतेच. कासीमखान, खानाजादखान इत्यादि मंडळींपाशी खाण्याचे काही सामान होते. ते त्यांनी आपापसांत वाटून घेतले. त्याची मेजवानी अशा प्रकारे साजरी झाली. बाकीच्या सामान्य सैनिकांनी थंडा फराळ केला व तलावाचे थंडगार पाणी पोटभर प्याले. ही जर माणसांची कथा, तर हत्तीघोड्यांसारख्या मुक्या प्राण्यांना विचारतो कोण ?

रात्र पडली. दिवसभर दगदग फार झाली होती. तेव्हा साहजिकच झोपेने मोगलांचे डोळे मिटू लागले. पण मराठे त्यांना झोपूही देईनात. त्यांनी त्यांना चहूकडून कोंडले. तेव्हा दात ओठ खात मोगल लढायला उभे राहिले. पण मराठे लढेनातही. ते फक्त समोर येऊन त्यांचा कोंडमारा करीत. जेवण नाही, झोप नाही अशा अवस्थेत एक नव्हे, दोन नव्हे, तीन दिवस व तीन रात्री मराठ्यांनी मोगलांना घोड्यावर बसवून ठेवले. चौथा दिवस उजाडला तो मागच्या दिवसांना बरे म्हणवील असा निघाला. त्या दिवशी संताजीच्या सैन्याच्या दहापट असे पायदळ सैन्य मराठ्यांना येऊन मिळाले. चित्रदुर्गच्या ब्रह्माप्पा नायकाचे हे सैन्य होते. हे कर्तृत्व कासीमखानाचे होय. जे त्याने पूर्वी पेरले होते ते आता उगवत होते. आपल्या फौजदारीच्या अंमलात त्याने ब्रह्माप्पा नायकाला अतिशय छळले होते. त्या ब्रह्माप्पाला कासीमखान आता चांगला सापळ्यात सापडलेला पाहून सूड घेण्याची पर्वणी लाभली. तो ती थोडीच सोडणार ?

त्या दिवशी पुन्हा युद्धाला सुरुवात झाली. लढायला मोगलांजवळ होते काय ? त्यांचा बहुतेक दारूगोळा गारद होऊन गेला होता. उरलेला आधीच्या लढाईत खर्च होऊन गेला होता. मराठ्यांच्या सैन्यांतून गोळ्यांचा नुसता पाऊस पडत होता व मोगल सैन्य हताश होऊन आक्रोश करीत वेड्यासारखे इकडे तिकडे धावत होते. किती मेले याची गणती नाही. मराठ्यांच्या कोंडमाऱ्यातून त्यांना बाहेर पडण्यालाही वाट मिळेना. शेवटी अनेकजण दोड्डेरीच्या गढीत शिरले.

पण दोड्डेरीच्या गढी म्हणजे काही नंदनवन नव्हते किंवा तेथे कल्पवृक्षाचे बगीचे नव्हते. कासीमखानाने मराठ्यांच्या तावडीतून दोड्डेरीच्या गढीत शिरणे म्हणजे सर्वांग भाजलेल्या माणसाने पेटल्या कपड्यानिशी अथांग समुद्रात उडी घेण्यासारखे होते. मरण दोन्हीकडे चुकत नव्हते. बाहेर मराठ्यांच्या तलवारीखाली मरायचे नाही तर आत उपासमारीने मरायचे. आणि तसेच झाले. मराठ्यांनी गढीला वेढा घातला होता. किल्ल्यात जे काही धान्य शिल्लक होते त्यातून पहिल्या दिवशी लष्करास ज्वारी आणि बाजरी यांच्या भाकरी वाटण्यात आल्या. घराच्या छपरावरचे जुने नवे गवत जनावरांना देण्यात आले.

पण भूक रोज लागते. त्याला काय करणार ? दुसरा दिवस उजाडला. आता माणसांना भाकरी नव्हती आणि जनावरांना चारा नव्हता. उपासमार सुरू झाली. पण कासीमखानाचे नशीब शिकंदर म्हटले पाहिजे. गढीत दाखल झाल्यापासून तिसऱ्या दिवशी तो मरण पावला. कोणी म्हणतात तो पराजयाच्या मनस्तापाने मेला. कोणी म्हणतात त्याला अफू न मिळाल्याने मेला. काही का असेना, एका फटक्यात तो मराठ्यांच्या तावडीतून आणि उपासमारीच्या तडाख्यातून पसार झाला एवढे मात्र खरे.

कासीमखान मेल्याने मोगलांची बाजू खचली. उपासमार चालूच होती. कित्येक लोक उपासमारीने मेले. "मोगल लष्करातले घोडे एक दुसऱ्याच्या शेपट्या गवताप्रमाणे खाऊ लागले." या सुमारास मराठ्यांनी किल्ल्याचा एक बुरूज मुळापासून उखडून काढला. तेव्हा खानाजादखानाने मराठ्यांपाशी तहाची याचना केली. खालील अटींवर तह ठरला. कासीमखानाची सर्व संपत्ति, हत्तीघोडे, नगदी सोनेनाणे संताजीला देण्यात यावे. याशिवाय संताजीला तीस लाख रुपये मिळावेत. कासीमखानाचा विश्वासू सेवक आणि खासगीचा कारभारी बालकिशन याचा मुलगा याने ओलीस राहावे.

त्याप्रमाणे अंमलबजावणी झाली. किल्ल्यात दाखल झाल्यापासून तेराव्या दिवशी मोगल लष्कर किल्ल्याबाहेर पडले. त्या वेळी मराठा सैनिकांनी मोगल सैनिकांना एकीकडून भाकरी आणि एकीकडून पाणी या जिनसा पुरविल्या. संताजीने त्यांना अभय दिले होते. किल्ल्याबाहेर दोन रात्री ते मुक्काम करून होते. तिसऱ्या दिवशी खानाजादखान हा आपल्या सहकाऱ्यांसह औरंगजेबाकडे जाण्यास

निघाला. त्या वेळी त्याचे रक्षण करण्यासाठी संताजीने मराठ्यांचे पथक त्याच्या बरोबर दिले.

पण खानाजादखानाला औरंगजेबाने आपणासमोर येऊसुद्धा दिले नाही. या कसलेल्या सरदारांना कासीमखानाकडे पाठविताना त्याला फार आशा होती की हे सगळे मिळून संताजीचा नायनाट करतील. पण बादशाहाच्या भरंवशाच्या म्हशीला टोणगा झाला. संताजीचा नायनाट तर दूरच राहिला, उलट हेच शेंदाड शिपाई, कातडी बचावून परत रडगाणे गात येतात याची त्याला अत्यंत चीड आली. त्यांची खापरासारखी थोबाडे पाहणे नको म्हणून त्याने त्यांच्या परस्पर लांब लांब बदल्या केल्या. खानाजादखान यास बीदरच्या सुभेदारीवर, असालतखान यास रणथंबोरच्या किल्लेदारीवर आणि महंमद मुरादखान यास दोहद आणि गोध्रा येथील फौजदारीवर बदलण्यात आले.

आता औरंगजेबाची सर्व भिस्त हिंमतखानावर होती. गेली दोन तीन वर्षे त्याने संताजीशी बरा मुकाबला केला होता. तो बसवापट्टणपाशी आला पण औरंगजेबाने त्याच्या कुमकेसाठी रवाना केलेले रुस्तुमदिलखान व हमीदुद्दीनखान हे बादशाही सरदार व पथके येऊन न पोचल्यामुळे व त्याच्यापाशी सैन्यही थोडे असल्यामुळे तो पुढे सरकू शकेना. बसवापट्टणच्या गढीमध्ये त्याने मुक्काम केला व बादशहाला लिहिले, "संताजी हा मोठे सैन्य घेऊन बसवापट्टणवर चालून आला आहे. माझ्या पाशी सैन्य फार थोडे आहे. अद्याप बादशाही सरदारांची कुमक आली नाही. जी परिस्थिति आहे ती कळवीत आहे. मी प्रयत्नाची पराकाष्ठा करीन." बादशहांनी आज्ञा केली की "हमीदुद्दीनखान व रुस्तुमदिलखान यांना लिहा की तुम्ही अद्याप हिंमतखान बहादुरच्या साहाय्यार्थ गेला नाहीत. तुम्ही तातडीने जावे." बादशहाने २५ जानेवारी १६९६ रोजो ही आज्ञा केली व त्याप्रमाणे ते दोघे १ फेब्रुवारी रोजी अथ्रोनीहून बसवापट्टणकडे रवानाही झाले. पण त्यांच्या साहाय्याचा हिंमतखानाला आता उपयोग नव्हता. २० जानेवारी १६९६ रोजी बसवापट्टणला संताजीने हिंमतखानाला लढाईत गोळी झाडून ठार मारले.

औरंगजेबाच्या हरकाऱ्यांनी २८ जानेवारी रोजी प्रथम त्रोटक बातमी त्याला दिली. सहा दिवसांनी लढाईचा सविस्तर वृत्तान्त औरंगजेबाला समजला. "३ फेब्रुवारी १६९६. हिंमतखान बहादुरच्या फौजेतून काल बातमी कळली ती अशी : संताजी हा दहा हजार स्वार व बारा हजार पायदळ सैनिक घेऊन हिंमतखान बहादुरावर चालून आला. संताजीचे कर्नाटकी प्यादे एका डोंगरावर जमलेले आढळले. हिंमतखानबहादुर हा स्वतःचे सैन्य घेऊन त्यांच्यावर चालून गेला. जवळ जवळ पांचशे प्यादे ठार झाले. यानंतर संताजीचा समाचार घेण्यासाठी तो हत्तीवर बसून निघाला. तो संताजी व त्याचे सैन्य याजवर तुटून पडला. या सुमारास हिंमतखानबहादुराच्या कपाळाला बंदुकीची गोळी लागली,

जखमी अवस्थेत तो आपल्या मोर्च्यात दाखल झाला. बादशाही सैन्यातील अलीबाकी वगैरे जमादारांनी शत्रूंशी युद्ध चालू ठेवले. यातच अलीबाकीला बाण व तलवार यांच्या जखमा होऊन तो खाली कोसळला. गनिमांचे सैनिक त्याला घेऊन गले. त्याच्या मुलाने लढा चालू ठेवला. संताजीला बाणांच्या दोन जखमा झाल्या. मोगलांचे सैन्य मोर्च्यात परतले. २० जानेवारी १६९६ च्या मध्यरात्री हिंमतखानबहादुर मरण पावला. हिंमतखान बहादुराचे जवळ जवळ तीनशे सैनिक परागंदा झाले व वाट फुटेल तिकडे पळाले.

त्या दिवशी हिंमतखानाचा बाप खानाजहान औरंगजेबाकडे येऊन म्हणाला " हिंमदखानबहादुर आपल्या सेवेत मरण पावला. माझी हीच इच्छा आहे की आपल्या सेवेत मीही कामी यावे."

हिंमतखानाच्या मृत्यूने औरंगजेबाला अतिशय दुःख झाले. पण त्याचे दुःख हे बादशहाचे दुःख होते. खानजहानचे दुःख हे बापाचे दुःख होते. औरंगजेब ते समजू शकत होता. पुत्राच्या मृत्यूने विव्हळ झालेल्या आणि स्वतः मरणाच्या दाराशी उभ्या असलेल्या खानजहानशी तो पराकाष्ठेच्या हळुवारपणाने वागला. औरंगजेब फातेहा (मृतासाठी प्रार्थना) पढून म्हणाला की खान बहादुर हा शहीद (धर्मकार्यार्थ हुतात्मा) झाला. असे म्हणून त्याने खानजहानला आपल्या देशी जाण्यास निरोप दिला. त्यानें खानजहानला स्वतः आपल्या हाताने खारदाळ देऊन म्हटले "कितीतरी दिवसांपासून मी पानाच्या ऐवजी खारदाळ वापरीत आहे." शहाजादा कामबख्शाला तो म्हणाला "खानजहानबहादुरच्या समाचारासाठी त्याच्या डेऱ्यावर जा" त्याप्रमाणें शहाजादा त्याच्या डेऱ्यावर जाऊन आला, औरंगजेबाने आपल्या मुदपाकखान्याचा मुख्य नेमतखान याला म्हटले येथून भोजनाचे ताट तुम्ही व मुलतफखान असे दोघे खानजहानच्या डेऱ्यावर घेऊन जा व त्यांना जेवू घालून परत या. औरंगजेबाची मुलगी जीनतुन्निसाबेगम हिने खानजहानकडे खिलतीची मातमी (शोक निदर्शक वस्त्रें) पाठविली. औरंगजेबाने हिंमतखानाचा मुलगा सय्यद महंमद हुसेन याला दोड्डेरीच्या वेढयात फजीत पावलेल्या महंमद मुरादखानाच्या ऐवजी मीरतुनुफ (शिष्टाचारपालनाचा दरबारातील अधिकारी) नेमले. हिंमतखानाकडे अठरा लाख रुपये सरकारी देणें निघत होते. औरंगजेबाने ती सगळी रक्कम माफ केली. त्याचप्रमाणे कासीमखानाच्या जहागिरी त्याच्या घराण्याकडे बहाल ठेवाव्यात अशी आज्ञा केली. आपल्या सेवेत ज्यांनी प्राण अर्पण केले त्यांचे चीज करण्यात औरंगजेबाने कसलीही कसूर केली नाही.

आता पुढे काय हा औरंगजेबापुढे प्रश्न होता. हमीदुद्दीनखान १ फेब्रुवारीला बसवापट्टणकडे रवाना झाला होता. त्याच्यावर मार्च महिन्यात बसवापट्टणच्या वेढयात गुंतलेला असतानाच संताजी स्वतःच चालून आला. बसवापट्टणपासून आठ कोसांवर त्यांची गाठ पडली. त्यात संताजीचा पराजय झाला; आणि तो

चित्रदुर्गाकडे निघून गेला. औरंगजेबाने बेदरखानाला पन्हाळगडाहून काढून कर्नाटकात संताजीच्या पारिपत्यावर नेमले होते. तो या वेळी बसवापट्टणच्या मार्गावर संताजीच्या पाठलागावर होता. हमीदुद्दीनखानाने संताजीवर मिळविलेल्या विजयाने औरंगजेब अतिशय संतुष्ट झाला. तो सियादतखानाला म्हणाला, "संताजीशी झालेल्या युद्धाविषयीचे पत्र हमीदुद्दीनखानाने लिहिले आहे. त्याच्या प्रती शहाजादा आज्जम व शहाजादा बेदरबख्त यांजकडे पाठवा. तसेच झुल्फिकारखानबहादूर व खानाजादखान यांना लिहून कळवा की सैनिक अशा दृढनिश्चयाने लढत असतात." औरंगजेबाच्या बोलण्यात खोच होती. बेदरबख्त संताजीच्या बाबतीत अद्याप नवशिका आणि होतकरू होता, झुल्फिकारखान हा गेली सात वर्षे जिंजीच्या वेढ्याचे दळण दळत बसला होता. खानाजादखान हा भेकडपणाने दोडेरीहून पळून आला होता. हमीदुद्दीनखानाच्या पराक्रमाचे वर्णन वाचून आपल्या चेंगट आणि भेकड सरदारांच्या डोळ्यांत अंजन पडावे असा बादशहाचा उदात्त हेतु होता. त्याने संताजीवर जय मिळविल्याबद्दल हमीदुद्दीनखान याजकडे फर्मान, खिलतीची वस्त्रे, शिरपेच पाठविली व त्याला हमीदुद्दीनखान बहादूर ही पदवी बहाल केली

वस्तुत: 'बहादुर' पदवी देण्याइतके किंवा त्या लढाईच्या वृत्तान्ताच्या प्रती काढून वाटीत सुटण्याइतके हमीदुद्दीनखानाच्या या विजयात काहीही नव्हते, इतका तो चिल्लर स्वरूपाचा विजय होता. औरंगजेबाला तर घसा खरडून स्तुतिस्तोत्रे गाण्यासारखे त्यात काही एक नव्हते. असले पराजय संताजीच्या खिजगणतीत नव्हते; आणि मुलुखमैदान तोफेवर नखांनी ओरखडा काढला असता, त्याचा जितका ठसा त्या तोफेवर राहील तितकाच परिणाम असल्या पराजयाचा त्याच्या पराक्रमावर राहात असे. औरंगजेबासारख्या मराठ्यांवर मोहिमा करता करता केस पांढरे झालेल्या शहाण्या माणसाला हे कळत नव्हते असे कसे म्हणावे? पण त्याची स्थितीच मुळी अशी झाली होती, की मोगल अंमलदार आणि तो संताजीवर विजय मिळवितो ही गोष्टच विरोधाभासासारखी वाटावी. रुस्तुमखानापासून हिंमतखानापर्यंत औरंगजेबाने जेवढे म्हणून सरदार संताजीवर रवाना केले, ते सारे त्याने पचविले व पुढच्यांची वाट बघत बसला. जो सरदार पाठवावा तो मरावा तरी, नाही तर मार खाऊन परत तरी यावा. म्हणजे ही शिवाजीचीच दुसरी आवृत्ति झाली. शिवाजीप्रमाणेच संताजी हाही औरंगजेबाला हृद्रोग होऊन बसला. त्या हृद्रोगापासून बादशहाला वाचवील असा एकही मायेचा पूत बादशाही सरदारांत निघेना.

खाफीखान म्हणतो ते खरे आहे– "ज्याला ज्याला म्हणून संताजीशी लढण्याचा आणि मुकाबला करण्याचा प्रसंग आला– त्याच्या नशिबी खालील तीनपैकी एक परिणाम ठेवलेला– एक तर तो मारला जाई किंवा जखमी होऊन संताजीच्या कैदेत सापडे; किंवा त्याचा पराजय होई आणि त्याचे सैन्य आणि बाजारबुणगे

गारद होई. आपण जिवानिशी निसटलो हाच आपला पुनर्जन्म झाला असे त्याला वाटे.

यावर उपाय कुणालाच सुचेना. युद्ध करण्यासाठी म्हणून जिकडे तिकडे तो नालायक आणि हलकट कुत्रा (संताजी) तयार होऊन जाई, तिकडे त्याचा मुकाबला करण्यास बादशहाच्या प्रतिष्ठित सरदारांपैकी एकही तयार होत नसे. जगात धडकी भरवून सोडणारी फौज घेऊन तो कोठेही पोचला की नरव्याघ्राप्रमाणे असलेल्या अनुभवी योद्धयांची हृदये कंपायमान होत."

बसवापट्टणच्या लढाईनंतर १६९६ च्या मार्च महिन्यात संताजी राजारामाच्या भेटीसाठी जिंजीला गेला. संताजी हा मराठ्यांचा सेनापति होता. गेली सात वर्षे सगळीकडे मराठे मोगलांची लांडगेतोड करीत होते, ही एकच गोष्ट, ही सेनापतिपदाची अवजड धुरा संताजीने केवढ्या पराक्रमाने, केवढ्या सामर्थ्याने आणि केवढ्या दिमाखाने पेलली होती, याची साक्ष देण्यास पुरेशी आहे. नेताजी पालकर, प्रतापराव गुजर, हंबीरराव मोहिते या धुरंधरांच्या मालिकेत सर्वथैव शोभणारा तो सेनापति होता. गेली सात वर्षे अखंड चाललेल्या पराक्रमावर या वर्षी, कासीमखान आणि हिंमतखान या औरंगजेबाच्या कसलेल्या सरदारांना त्यांच्या सहकाऱ्यांसह जमीनदोस्त करून त्याने कळस चढविला होता. अशा या मोगलांचा कर्दनकाळ आणि मराठ्यांचा तारणहार असलेल्या गुणी सेनापतीचे कौतुक राजारामाने किती केले असेल हे काय सांगावयास पाहिजे ?

पण सत्य हे कादंबरीपेक्षाही विलक्षण असते असे म्हणतात, ते खरे आहे.

राजारामाने संताजीला बडतर्फ केले. त्याची सेना काढून घेतली. त्याचे सेनापतिपद काढून घेतले. कवच आणि कुंडले काढून घेतलेल्या महारथी कर्णाप्रमाणे सेना आणि सेनापतिपद गेल्यानंतर हा महावीर संताजी असहाय झाला. तो परागंदा होऊन रानोमाळ भटकू लागला.

राजारामाने फतवा काढला की, संताजी घोरपडे यांनी स्वामीच्या पायाशी हरामखोरी केली. याकरिता त्यास सेनापतिपणाचा कार्यभाग होता, तो दूर करून फौज हुजूर आणविली.

नियतीची लीला खरोखर अगाध आहे हेच खरे !

□ □

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था
[illegible]
[illegible]



परंतु नियति ही मानवी स्वभावाचेच दुसरे नाव आहे. जेव्हा एखाद्या वीर पुरुषाची किंवा महापुरुषाची शोकांतिका होते तेव्हा त्याच्या बाहेर असलेली कोणती एखादी शक्ति त्याची शोकांतिका घडवून आणते असे नाही; तर त्याच्या स्वभावात असलेल्या प्रवृत्तींना आलेले ते फळ असते. त्याच्या कर्मांचा तो विपाक असतो. या अर्थानेच इंग्रजीत Character is Destiny असे म्हटले जाते आणि "आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः।" (जो तो स्वतःच स्वतःचा बंधु किंवा शत्रु असतो.) या गीतावाक्यातही हेच तत्त्व सांगितलेले आहे.

पराकाष्ठेची उग्र आणि दुर्दम्य प्रकृति हा संताजीच्या चारित्र्याचा आत्मा होता. या एका प्रकृतीतूनच त्याचे सर्व गुण आणि दोष निर्माण झाले. हिनेच त्याला वैभवाच्या शिखरावर नेले आणि त्याला धुळीला मिळविणारीही हीच होती. संताजीचे अतुलनीय शौर्य हा या प्रवृत्तीचाच डोळे दिपविणारा आविष्कार होता. ज्याला प्रत्यक्ष औरंगजेबावर हल्ला करण्याची भीति वाटली नाही तो त्याच्या मुकर्रबखान, जाननिसारखान, अली महंमदखान, असीमखान, हिंमतखान असल्या सरदारांना काय भीक घालतो? संभाजीच्या निर्घृण वधानंतर मराठे दिङ्मूढ झाले होते. त्यांची राजधानी, त्यांची महाराणी, त्यांचा युवराज मोगलांनी दस्त केली होती. त्याचे दुर्गम गड मोगलांनी भराभर सर केले होते, त्यांचा छत्रपति निर्वासिताप्रमाणे वैराग्याचे सोंग घेऊन लपत छपत जिंजीकडे चालला होता. देशमुख आणि देशपांडे मोगलांकडे जाऊन आपली वतने राखू पहात होते. अवघा महाराष्ट्र मोगलांच्या घोड्यांच्या टापांखाली जात्यात सापडलेल्या दाण्याप्रमाणे भरडून निघत होता. सगळीकडे माजलेल्या मोगलाईत महाराष्ट्रधर्माचे नाव सांगणारी शिवछत्रपतीची मराठशाही ही इतिहासजमा होऊ पहात होती. अशा या कठीण काळात संताजीच्या पराक्रमांमुळे महाराष्ट्रात आत्मविश्वास निर्माण झाला. मोगली फौजांवर विजयांवर विजय मिळवून त्याने मराठ्यांना पटवून दिले की मोगल म्हणजे काही अजिंक्य नाहीत आणि विजयाने धुंद झालेल्या औरंगजेबालाही त्यानें चिमटा काढून कळवून दिले की मराठे अजून आहेत, ते मोडलेले नाहीत.

संताजीच्या या कामगिरीचे राजारामाने मुक्तकंठाने कौतुक केले. त्याच्या आज्ञेवरून हुकुमतपन्हा रामचंद्रपंत अमात्य याने त्याचा गौरव करणारे जे पत्र लिहिलेले आहे, त्यात त्याच्या कर्तृत्वाचे समर्पक मूल्यमापन केलेले आहे–

" राजश्री छत्रपति स्वामी कर्नाटकात जाते समयी तुम्हास या प्रांतात ठेवून गेले. त्यासमयी इकडे गनिमाची धामधूम बहुत होऊन कुळ देशदुर्ग हस्तगत केली होती ती गेली. राज्यामध्ये काही अर्थ उरला नाही. कुळ मराठे याणी इनाम खत्ता करून गनिमाकडे गेले. परंतु तुम्ही इनाम खत्ता न करिता राजश्रीच्या पायांशी बहूतच एकनिष्ठा धरून जमाव करून शेखनिजाम व सर्जाखान व रणमस्तखान व जाननिसारखान असे उमदे वजीर बुडविले. जागोजाग गनिमास कोट घालून नेस्तनाबूद केले व देश सोडविला. राज्य संरक्षणाच्या कामास असाधारण श्रम केले. औरंगजेबास दहशत लाविली. पुढेही कित्येक स्वामी कार्याच्या ठायी हिम्मत धरिता. याकरिता तुम्हावरी राजश्री स्वामी संतोष होऊन मामले मिरज कर्याती २२ बेवीस एथील देशमुख होते, ते नेस्तनाबूद झाले. त्यांच्या वंशी कोणी नाही. त्यांचे मुतालिक होते, ते बळावून देशमुखी वतन खात होते. तेही दुर्बुद्धी धरून गनिमाशी मिळून फिसालत केली, एकनिष्ठा धरून इकडे येऊन भेटले नाहीत. म्हणून त्यासी देशमुखी दूर करून तुम्हास अजरामरामत देशमुखी मामले मजकूरची अवलाद अफलाद वतन करून दिली असे...."

संताजीला सेनापतिपद मिळाले ते त्याच्या पराक्रमामुळे होय हे उघडच आहे. वस्तुतः संताजीच्या ऐवजी धनाजी जाधवाला हे पद द्यावे असे राजारामाच्या मनात होते. कारण पराक्रम हा सेनापति होण्याला अगदी आवश्यक गुण असला तरी त्याबरोबरच इतरही गुण सेनापति होण्याला पराक्रमाइतकेच जरूर असावे लागतात. सेनापति हा छत्रपतींशी व त्याच्या अधिकाऱ्याशी निष्ठावान् असावा लागतो; व त्याच्या हाताखालच्या सैनिकांची मनें कशी जिंकावीत आणि संभाळावीत ही कला त्याला माहीत असावी लागते. तो नुसताच कडक असून चालत नाही, तो कनवाळूही असावा लागतो. नेपोलियन किंवा पहिला बाजीराव हे या दृष्टीने आदर्श सेनापति म्हणावे लागतील. तारापूरच्या वेढ्यात गोळी लागून ठार झालेल्या बाजी भीमराव रेठरेकराच्या आईला पत्र लिहिताना बाजीरावाने 'मीच तुमचा बाजीराव' असे तिचे समाधान केले आहे. या त्याच्या 'राखावी बहुतांची अंत:करणे' अशा जीवी जीव घालणाऱ्या प्रेमळपणामुळेच बाजीरावाचे सैनिक त्याच्या पायातळी जीव आंथरीत; जरी "शिलेदारांच्या पाया पडता पडतां कपाळ छिनत चालले." असे म्हणण्याइतका कर्जबाजारा असला, त्याला पगार वेळेवर देता येत नसला तरी बाजीरावाच्या पाठीशी लाख शिलेदार तळहातावर शिर घेऊन तयार असे. या बाबतीत संताजी स्वभावतःच असमर्थ होता असे म्हणणे भाग आहे. तो जात्याच कठोर काळजाचा होता. त्यामुळे जितके फायदे तितकेच तोटे झाले. संताजीचे यश हे त्याच्या पराक्रमाइतकेच त्याच्या फौजेतील कडक शिस्तीवर अवलंबून होते. निरनिराळ्या तुकड्यांच्या हालचाली बिनचूक वेळेवर आणि दिलेल्या हुकुमात कानामात्रेइतकाही बदल न करिता

अमलात आणणे ही त्याची फौजेकडून पहिली अपेक्षा असे. म्हणजे एखाद्या गणिताच्या सगळ्या पायऱ्या बरोबर मांडल्या म्हणजे उत्तर बिनचूक यावे, त्याप्रमाणे डावपेचांची हुकुमाप्रमाणे कारवाई झाली की आपोआप यशाची निष्पत्ति होत असे. अर्थातच कोणी स्वतंत्र बुद्धि चालवून हुकुमाची अवज्ञा केली तर संताजी त्याला कठोर शासन करीत असे. किरकोळ गुन्ह्याबद्दल सुद्धा हत्तीच्या पायी देणे ही संताजीची ठरलेली शिक्षा होती. त्याचप्रमाणे फौजेची इतर निगराणीही तशीच कडक असे. फौजेत बायकामुले नेण्यास सक्त बंदी असे. लढाईतील लुटीचा झाडा सगळा द्यावा लागे. सुतळीचा तोडा लपविण्याची कोणाची छाती नसे. संताजी स्वार्थी नव्हता. तो निःपक्षपाती पण बहुधा त्यामुळेच कठोर होता. ही सारी शिवाजीमहाराजांची शिस्त होती. त्याचे स्वतःचे तारुण्य महाराजांच्याच नजरेखाली विकास पावले होते. कर्नाटकाच्या स्वारीत महाराजांनी मुद्दाम त्याला बरोबर घेतले होते. ती शिवाजीमहाराजांची शिस्त आपल्या फौजेला लावण्याचा त्याचा आग्रह होता. शिस्त वावगी नव्हती. पण काळ बदलला होता. त्यांच्या घोड्याप्रमाणे मराठेही आता चौखूर उधळले होते. त्यांना लगाम लावणारा स्वार त्यांना कसा आवडणार? त्यामुळे संताजीचे सैनिक त्याच्यावर सामान्यतः नाराज असत. बायको नाही, पोरे नाहीत, लूट नाही, मजा नाही, नुसती लढाई आणि मारामारी– आणि जरा काही चुकले की सेनापतिसाहेबांचे डोळे सदा वटारलेले; आणि टाळके चेंदायला हत्ती उभा........संताजीच्या फौजेत काम करणे म्हणजे ती एक शिक्षा होती.

संताजीच्या उलट धनाजीचा प्रकार होता. संताजीच्या फौजेत शिस्तीच्या धनुष्याची दोरी नेहमी ताणलेली असे तर धनाजीच्या फौजेत ती नेहमी ढिली सोडलेली असे. त्याचा त्याच्या हाताखालच्या लोकांवर कसलाही दाब नसे. स्वभावतःच तो सौम्य प्रकृतीचा व दिलदार होता. त्यामुळे त्याचे सैनिक त्याच्यावर नेहमी खूष असत. पण म्हणून संताजीपेक्षा धनाजी शौर्यात उणा होता असे मुळीच नाही. मोगलांचे घोडे पाणी पिईनासे झाले तर "तुला पाण्यात धनाजी दिसतो काय?" असे ते घोड्यांना विचारीत या आख्यायिकेवरूनच धनाजीच्या पराक्रमाची कल्पना येऊ शकेल. संताजीने औरंगजेबाच्या तंबूचे कळस कापून आणले व मुकर्रबखानाला झोडपला तर धनाजीनेही फलटणच्या मैदानात चार वेळा रणमस्तखानाला खडे चारले. संताजीने अलीमर्दानखानाला कैद केले तर धनाजीनेही इस्माइलखान मखाला चतुर्भुज केले, संताजीने कासीमखानाला मारले तर धनाजीनेही पन्हाळ्यापुढे मोगलांना हैराण केले. चंदनवंदनच्या लढाईत तर धनाजीचा प्रत्यक्ष मुलगासुद्धा धारातीर्थी पतन पावला शौर्याच्या बाबतीप्रमाणे कुल व प्रतिष्ठा या बाबतीतही धनाजी संताजीस तोडीस तोड होता. संताजी घोरपड्याप्रमाणे धनाजी जाधवाचेही घराणे उदेपूरच्या एकाच शिसोदिया वंशापासून उगम पावले होते. उग्रसेन शिसो-

दियाचा वडील पुत्र कर्णसिंह हा घोरपड्यांचा पूर्वज. कर्णसिंहापासून नववा पुरुष बाजी घोरपडे ज्याला शिवाजी महाराजांनी मारले त्या बाजी घोरपड्याचा चुलत भाऊ मालोजी घोरपडे. त्याचा मुलगा संताजी घोरपडे ही जर संताजीची कुळकथा, तर धनाजी तर शिसोदिया वंशांतल्या उग्रसेनाचा धाकटा पुत्र शुभकृष्ण याच्यापासून क्रमाने दहावा असलेल्या शिवाजीमहाराजांचा प्रत्यक्ष नातेवाईक होता. जिजाबाईचा भाचा संताजी याचे संगोपन, लखूजी जाधवाच्या व संताजीचा बाप अचलोजी याच्या मृत्यूनंतर जिजाबाईने केले. ह्या संताजीचा मुलगा शंभुसिंह व शंभुसिंहाचा मुलगा धनाजी. संताजीने जशी शिवाजी महाराजांबरोबर कर्नाटकात कामगिरी बजावली होती, त्याप्रमाणे उंबराणी व कोप्पळ येथील लढायांत त्या वेळी धनाजीने शौर्य गाजविले होते. तात्पर्य, कुल, प्रतिष्ठा, पूर्वानुभव, पराक्रम या बाबतीत काहीही उणे नसताना संताजीला मात्र सेनापतिपद मिळावे व आपली मात्र 'जयसिंगराव' या किताबावर बोळवण व्हावी, या गोष्टीचे धनाजीला वैषम्य वाटले असेल तर ते मनुष्य स्वभावाला धरून आहे असेच म्हटले पाहिजे.

इतका तपशिलाने विचार करण्याचे राजारामाला अर्थातच कारण नव्हते. कारण धनाजीप्रमाणे तो संताजीकडे वैयक्तिक स्पर्धेच्या दृष्टीने पाहात नव्हता. तो स्वामी आणि छत्रपति, तेव्हा त्याची पाहण्याची दृष्टि मुख्यतः स्वामिसेवक संबंधाचीच असणे स्वाभाविक होते. त्या दृष्टीने संताजी हा पराक्रमी असला तरी बेकैदी व स्वच्छंदी प्रवृत्तीचा माणूस आहे, तो कुणाचे ऐकणारा, किंवा कुणाच्या ताब्यात राहणारा नव्हे, मराठी राज्याशी त्याचे वडिलोपार्जित इमान असले तरी सामान्यतः मराठ्यांत असलेली फुटीर प्रवृत्ति त्याच्यात वाढीस लागली आहे, हा त्याचा दोष राजारामाच्या डोळ्यांत जास्त खुपला असणे शक्य आहे. परमेश्वर ज्याप्रमाणे स्वतः केलेल्या नियमांनी बांधला जात नाही, त्याप्रमाणे स्वतःच्या फौजेला शिस्तीत बांधू इच्छिणारा संताजी स्वतः मात्र त्या शिस्तीत बांधला जाऊ इच्छीत नव्हता. त्यामुळे संताजीला सेनापतिपद देण्याची राजारामाची स्वतःची इच्छा नव्हती. पण राजारामाला रामचंद्रपंत अमात्याबद्दल निरतिशय आदर आणि पंताने आपला शब्द संताजीच्या बाजूने टाकला. म्हणून राजारामाचा नाइलाज झाला, व संताजीस सेनापतिपदाची प्राप्ति झाली.

संताजी, त्याचे भाऊ बहिर्जी व मालोजी व त्यांचे साहाय्यक विठोजी चव्हाण यांनी औरंगजेबावर छापा घालून त्याच्या तंबूचे सोन्याचे कळस कापून आणले, व तसेच रायगडाखाली वेढा घालून बसलेल्या झुल्फिकारखान्याच्या सैन्यातले पांच हत्ती आणून राजारामापुढे उभे केले. तेव्हा संतुष्ट होऊन राजारामाने तिघा घोरपडे बंधूंस अनुक्रमे ममल्कत् मदार, हिंदुराव व अमीरउलउमराव व विठोजी चव्हाणास हिंमतबहाद्दर असे किताब दिले. तेव्हा रामचंद्रपंताने राजारामास सक्त विनंती केली की, "संताजीचा पराक्रम अति पराकाष्ठेचा. किताबत दिली हे यास

योग्य नव्हे. आपले फौजेंत सेनापति नाही. पूर्वी हंसाजी हंबीरराव मोहिते होते. हे वारले. सांप्रत त्यांचे कोणी नाही. सबब घोरपडे यांस सेनापतीची वस्त्रे द्यावी. मर्दुमी बहूत केली. बादशहाचे डेऱ्याचे कळसच आणून झुल्फिकारखान याचे पांच हत्ती आणले. त्यापेक्षा याची मर्दुमी कोठवर वर्णावी ? यास्तव स्वामींनी कृपा करून पदाधिकार द्यावा. तेव्हा राजाराम म्हणाला, "आमचे मनात धनसिंगराव जाधवराव यांस हे पद द्यावे असे होते. परंतु तुमची मर्जी यांस देण्याची तरी देतो.' अशी ही संताजीच्या सेनापतिपदाची कथा आहे. त्या बाबतीत राजाराम नाराज होता. धनाजी तर होताच होता. संतुष्ट होता तो फक्त रामचंद्रपंत अमात्य होय. पंताचा व संताजीचा ऋणानुबंध फारच होता.

पण, फार दिवस गेले नाहीत तोंच ज्या रामचंद्रपंताने आपले वजन संताजीच्या बाजूने खर्च करून त्याला सेनापतिपद मिळवून दिले, त्या पंतालाच संताजीने आपल्या एककल्ली स्वभावामुळे तोंडघशी पाडले. औरंगजेबाने पन्हाळ्याला वेढा घातला. पन्हाळ्याचा किल्लेदार पिराजी घाटगे याने शर्थीने किल्ला लढविला. पण कोठूनही मदत येईना. त्याने पंताला विनंती केली. पंताने संताजी हा फौजबंद सरदार, त्याला पन्हाळ्याची कुमक करण्याबद्दल सांगून पाठविले. पण संताजीचे पिराजी घाटग्याशी खासगी वैर होते म्हणून की दुसरे काही कारण होते म्हणून म्हणा, संताजी पिराजीच्या मदतीस गेला नाही. अखेर पन्हाळ्यासारखा नामांकित किल्ला मोगलांना द्यावा लागला. राज्याचे हित व हुकुमाची तामिली यांच्यावर स्वतःची इच्छा आणि खाजगी रागद्वेष यांना कडी करू देणारे संताजीचे या प्रसंगीचे वर्तन पाहून त्याच्यावर लोभ करणारा रामचंद्रपंत चांगलाच चमत्कारला. तो हुकुमतपन्हा होता, म्हणजे त्याने काढलेले हुकूम छत्रपतीनेसुद्धा मोडू नयेत असा अधिकार राजारामाने त्याला दिला होता. त्याचा अधिकार जर सेनापती-सारखा जबाबदार माणूस धुडकावू लागला तर त्याने कारभार कसा करावा ? त्याने या बाबतीत राजारामाकडे तक्रार केली तेव्हा आम्ही सांगत होतो तेव्हा ऐकले नाही, आता परस्परच पंताला अद्दल घडली असा राजारामाला वाटले असणे अगदी शक्य आहे. त्याने संताजीला सेनापतिपदावरून दूर केले व महादजी नाईक पानसंबळ याला सेनापति केले.

तेव्हा संताजी रामचंद्रपंताच्या भेटीसाठी विशाळगडी आला. महिना पंधरा दिवस राहिला. पण पंताने त्याची भेटसुद्धा घेतली नाही. त्याने त्याला सांगून पाठविले, " तुम्ही आमचे भेटीस येऊ नये. जाधवराव यास सेनापतिपद देत असता आम्ही तुम्हांस पद देवविले, त्याचे तुम्ही उत्तीर्ण झाला ! महाराजांकडे हुजूर जावे." तेव्हा संताजी जिंजीला राजारामाकडे गेला. पुढे १६९१ मध्ये पानसंबळच्या मृत्यूनंतर संताजीला पुन्हा सेनापतिपद मिळाले, पण बहुधा इतउत्तर पंताचे व संताजीचे संबंध पूर्वीइतके निर्व्याज राहिले नाहीत. पंताचा ओढा धनाजी

कडे जास्त वाढू लागला; त्या मानाने संताजीबद्दल त्याचा स्नेह पातळ होऊ लागला. १६९५ च्या सुमारास संताजीने पंतास एक पत्र लिहिले आहे. त्यात अशा प्रकारचा स्पष्ट आरोप पंतावर त्याने केलेला आहे.

"स्वामींनी (पंताने) राजश्री संताजी बरगे व बाजी सिंदे यांजबरोबरी कित्येक बुद्धिवाद सांगोन पाठविला की आपली भेटी घेतली नाही; परस्पर निघोन गेलेत म्हणोन शब्द लाविला. ऐसीयासी स्वामीची आपली क्रिया ऐसी नाही जे स्वामीसी द्वैतभाव धरावा. आम्ही त्या प्रांती असता दहाविसांचे साक्षे-निसी ऐकले की संताजी घोरपडियांस त्या प्रांते ठेवून रा॥ धनाजी जाधवरायास पाठवून देणे, म्हणून पत्रे राजश्रीस लिहिली त्यावरून द्वैत पदार्थ दिसोन आला. स्वामीचे आज्ञेव्यतिरिक्त आम्ही काहीच नव्हतो. विश्वासाची जाती म्हणावी तरी स्वामीचे आमची शपथ तुलसी बेलाचे श्रीवरील आहेत. स्वामीचे मांडीवरी आम्ही उसे ठेवून निजावे, आमचे मांडीवरी स्वामींनी उसे ठेवावे. शरीर मात्र भिन्न, आत्मा एक ऐसे असता हे गोष्ट द्वैताची होऊन आली. म्हणवूनच वीतरागें येणे जाले. गतवर्षीपासून श्रमाची जाती म्हणावी ते कागदी लिहिता पुरवत नाही. बरे, जे गोष्टी जाहली ती जाहली. या उपरी तरी राज्यात डोहणा न होय तो पदार्थ केला पाहिजे. द्वैतभाव दिसोन आला होता म्हणवून येणे जाहले होते. त्यात राजश्री सेखोजी बरगे व बाजी शिंदे यांजपासी स्वमुखे सांगितले की, आपण काही संताजीस ठेऊन घेऊन धनाजी जाधवरायास पाठविणे ऐसे लिहिले नाही....त्या-वरून द्वैताची गोष्ट होती ती स्वामींचेच वचनावरून दूर केली. आम्ही लोकांचे बोले द्वैत धरिले होते ते आम्हांपासून अंतर पडले. आणखी स्वामींनी एक शब्द लाविला की, राजश्री स्वामींची भेटी जाली. ते समई बहुमान जाहला तेव्हा आमचा मान काढला नाही. ऐसीयास आम्ही ऐसे सेवक न हो जे स्वामींचे स्मरण न करिता आपला बहुमान घेऊ....स्वामी वडील जे यश येते ते स्वामीचेच पुण्ये.... पूर्वीपासून आमचा अंगाकार स्वामींनी केला. आणि बंधु म्हणविले. तोच सिद्धी पावला पाहिजे. स्वामी व्यतिरिक्त आम्ही काही नाही. जैसी पूर्वी आज्ञेप्रमाणे वर्तणूक केली तैसेच करू."

या पत्रावरून रामचंद्रपंताच्या मनात संताजी आपणांकडे दुर्लक्ष करीत आहे आणि संताजीच्या मनात रामचंद्रपंत आपल्या विरुद्ध धनाजीचा पाठपुरावा करीत आहे असा विकल्प कसा निर्माण झाला होता यावर चांगला प्रकाश पडतो. "राजारामाचा मुख्य कारभारी रामचंद्र पंडित याचे आणि धनाजीचे विशेष संघ-टन होते" असे भीमसेनानेही म्हटले आहे. संताजीचे असे पत्र वाचले म्हणजे वाईट वाटते. पंताचा व त्याचा स्नेह फार होता. या पत्रातच पंत संताजीला आपला बंधू म्हणवीत असे असे संताजी म्हणतो; पण तो पंतही त्याच्यापासून दुरावला होता. धनाजीचे व त्याचे संबंध काय असतील हे न सांगताही समजण्यासारखे

आहे. धनाजीची अलौकिक लोकप्रियता संताजीच्या वाटयाला आली नव्हती. त्यामुळे साहजिकच तो धनाजीचा हेवा करीत असे. राजारामाचे मत त्याच्याविषयी सुरुवातीपासूनच प्रतिकूल होते व वेळोवेळी त्याच्या व संताजीच्या कटकटी होत असल्यामुळे असला डोईजड सेनापति असण्यापेक्षा नसलेला परवडला असे राजारामाला वाटणे अगदी शक्य होते. तात्पर्य, राजाराम, रामचंद्रपंत, धनाजी या त्याच्या वेळच्या प्रमुख राजकारणी व्यक्तींपासून आपल्या एकांड्या वृत्तीमुळे संताजी दिवसेदिवस अगदी एकाकी पडत चालला होता. समर्थांनी म्हटल्याप्रमाणे, "आपण येकायेकी येकला। सृष्टीत भांडत चालला। बहुतांमध्ये येकल्याला यश कैंचे॥" अशी संताजीची स्थिति होऊन बसली होती.

संताजी सेनापति असला तरी अखेर तो राजारामाचा नोकर होता आणि मालक कितीही मृदु स्वभावाचा असला तरी स्वभावतःच परतंत्र असलेल्या आपल्या नोकराने स्वतंत्र बुद्धि चालवलेली त्याला परवडण्यासारखी नसते; मग त्या नोकराचे कर्तृत्व आभाळाएवढे का असेना. परिणाम चांगला असो की वाईट असो, नाइलाज म्हणून म्हणा की राजकीय डावपेचाचा एक भाग म्हणून म्हणा, राजारामाने आपल्या सहकाऱ्यांशी विचार करूनच मोगलांकडे असलेल्या व गेलेल्या मराठे सरदारांना आपणाकडे फोडून आणण्यासाठी त्यांना वतने आणि वृत्ति देण्याचा निर्णय घेतला होता. या लोकांचा "स्वामींचे राज्य म्हणजे देवताभूमि, या राज्यास ताम्राचा उपद्रव न व्हावा, महाराष्ट्रधर्म रहावा." हा बकवा किती पोकळ होता हे राजारामाला किंवा पंताला कळत नव्हते असे थोडेच आहे? किंवा वतने व जहागिरी यांची खैरात करिताना "यवोदर प्रमाण भूमि तेही इनाम देऊ नये. हे (वतनदार) लोक म्हणजे राज्याचे दायादच आहेत" अशी राजनीति लिहिणाऱ्या पंताला, आपण शिवाजी महाराजांच्या तत्त्वाला तिलांजलि देत आहोत हे समजले नसेल असे कसे म्हणता येईल? परंतु राज्य राखायचे तर आपद्धर्म म्हणून हा पर्याय पतकरण्याशिवाय इलाज नाही असा सिद्धान्त त्यांनी मनाशी बांधला आणि नागोजी माने, अमृतराव निंबाळकर, बहिरजी पांढरे, सुधोजी निंबाळकर, हणमंतराव घोरपडे असे औरंगजेबाचे तालेवार सरदार फोडून आपणांकडे आणले. त्यांना आणताना त्यांची आर्जवे करावी लागली ती आणखी निराळीच.

पण संताजी हा तत्त्वनिष्ठ होता. "आमच्या राज्यात नवी वृत्ति करून द्यावी असा दंडक नाही" असे एक वाक्य त्याच्या पत्रात आहे. हे वाक्य शिवाजीमहाराजांच्या राजनीतीत नेहमी आढळते. त्यावरून उघडच आहे की लष्कराप्रमाणे राजकारणातही शिवाजीमहाराजांच्या शिस्तीचा कडवा पुरस्कार करणाऱ्या संताजीला छत्रपतींचा हा निर्णय बिलकूल मान्य झाला नाही. त्यामुळे, आणि वतनाच्या लालचीने मोगलांकडून मराठ्यांकडे सुकाणू वळविलेल्या नव्या पाहुण्यांची

निष्ठा काय किमतीची आहे या जाणीवेनेही कदाचित् असेल, संताजीचे वर्तन या सरदारांशी असावे तितके अगत्याचे नसे. त्यामुळे कित्येक वेळी राजारामाची मोठी पंचाईत होऊन बसे.

उदाहरणार्थ, नागोजी माने व त्यांचा मुलगा सुभानजी माने जेव्हा औरंगजेबाकडून फुटून राजारामाकडे आले तेव्हा त्याला मोठाच आनंद वाटला; कारण माने हे मोठ्या इतमामाचे सरदार होते. त्यांची मर्जी हरतऱ्हा करून रक्षण केली पाहिजे, कारण त्याच्यापासून राजारामाच्या फार अपेक्षा होत्या. "ऐसियास हे थोरा करणियाचे कार्यकर्ते. यांना स्वतंत्र कार्यभाग सांगितलियाने बहूत थोर कार्य करून देतील. मामला थाटितील. ऐसे जाणोन सरकार नांदेड व औरंगाबाद तहद वऱ्हाडपावेतो नामजाद सुभा सांगोन पाठविले आहेती." नागोजीला त्याने नूतन वतन बारा महालाच्या सरदेशमुखीचे करून दिले. त्याचा मुलगा सुभानजी माने याचीही तीच गोष्ट.

असे असता सुभानजी मान्याची व संताजीची काही कटकट होऊन संताजीने त्याला निरोपाची पाने पाठविली आणि मर्जीस येईल तिकडे जा म्हणून सांगितले. हे कळल्यावर राजाराम साहजिकच संतापला आणि त्याने संताजीला लिहिले—

" राजश्री नागोजी माने हे पूर्वी मोगलाईतून स्वामीसंनिध जमावानिसी आले त्या उपरि यांणी कित्येक स्वामीकार्यानिमित्त श्रम करून साहाय्य केले. सांप्रतही स्वामीस संकट पदार्थ प्राप्त जाला आहे. यामध्ये एकनिष्ठेने सेवा करीत आहेत व स्वामींनी याचा भरंवसा धरला आहे. यैशास याचे पुत्र राजश्री सुभानजी माने त्या प्रांती जमावानसी आहेत. त्यास तुम्ही कित्येक उपेक्षेच्या गोष्टी बोलोन पाने पाठवून देऊन मनास येईल तिकडे जाणे म्हणोन सांगोन पाठविले. त्याजवरून स्वामीस आश्चर्य वाटले की, तुम्ही शहाणे लोक, राज्याचे हित जाणता व करिता असे असता यैशा लोकांस पाने पाठवून द्यावी आणि मनास येईल तिकडे जा म्हणावे हे उचित नव्हे व ते जमावही जैसा तैसा धरीत नाहीत, पोख्तच धरितात. एव्हढ्या जमावास तऱ्हा द्यावी हे काय गोष्ट? यावरी यैसे न करणे राजश्री सुभानजी माने याचे समाधान बहुता प्रकारे करून आणशफत जे द्यावयाची ते देऊन फौज समागमे त्यास जमावानसी घेऊन येणे. सर्वथा एकंदर दिलगीर होऊ न देणें."

संताजीस एवढ्याच कानपिचक्या देऊन राजाराम राहिला नाही. त्याने रामचंद्रपंतासही या प्रकरणाची हकीकत कळवून म्हटले, "तरी हे गोष्टी सेनापतीने अनुचित केली. यैशास त्याचे समाधानाविषयी सेनापतीसही लिहिले आहे. तरी तुम्ही त्याचे समाधान बहूत प्रकारे करून राजश्री संताजी घोरपडे यांचे व सुभानजी माने यांचे सख्य करून देऊन जमावानिसी सेनापतीसमागमे स्वामीचे साहेतीस येणे ते गोष्ट करणे. येविशी अंतर पडो न देणे जाणिजे."

१६९२ च्या डिसेंबरात जिंजीला वेढा घालून बसलेल्या झुल्फिकारखानाला धनाजी आणि संताजी यांनी इतके बेदम झोडपले की अखेर खानाने राजारामापाशी तहाची याचना केली. त्याने राजारामास एक लाख रुपये भरून बिनविरोध परत जाऊ देण्याची परवानगी मिळविली. या तहास संताजीचा फार विरोध होता. त्याचे म्हणणे होते की, " मोगलांची फौज गारद झाली आहे. ही गारद करून टाकावी. बादशहाकडून दुसरी फौज नेमून येईपर्यंत आपले पाय येथे भक्कम रोवले जातील. आपला अधिकार दृढ होईल. " पण राजारामाला हा अतिरेक पसंत पडला नाही. त्याने खानाशी सल्ला केला. बोलवा अशी होती की या तहाच्या प्रकरणात प्रल्हाद निराजीने बरेच पैसे खाल्ले होते. हा प्रकार संताजीला समजला, तेव्हा तो राजारामावर अत्यंत संतापला— त्याचे म्हणणे होते, आपणांस विचारल्याशिवाय फक्त एका प्रधानाच्या सल्ल्याने परभारे यांनी युद्धतहकुबीचा करार कां करावा? आम्ही युद्धे लढतो तर आम्हास एका शब्दानें तरी विचारावे की नाही ? कामबख्श हातात सापडला त्यास त्यांनी कबजात ठेवून देश मागावा की नाही? प्रधानांनी लाच खाऊन आपले खिसे भरावे आणि आम्ही मात्र लढून मरावे ?"

मार्टिन म्हणतो की, " राजारामाने संताजीची समजूत घातली. त्याने त्याला सांगितले की झुल्फिकारखानाचा व माझा गुप्त करार झाला आहे की बादशहा आता फार दिवस वाचत नाही. त्याचे पश्चात् गोवळकोंड्याचा प्रदेश झुल्फिकारखानाने घ्यावा व विजापूरचा राजारामानें घ्यावा. पण संताजीची समजूत पटली नाही. " संताजी घोरपडे राजारामासी बिघाड करून देशास गेले. त्यावरी धनाजीस नामजाद केले, " (एप्रिल–मे १६९३). म्हणजे त्याच वेळी संताजीचा व राजारामाचा खटका उडाला व संताजीच्या ऐवजी धनाजीला सेनापति करण्याचा विचार राजारामाने बोलून दाखविला. संताजी संतापून महाराष्ट्रात परत आला त्या वर्षीच्या ऑक्टोबरात पन्हाळ्याला झालेल्या लढाईत धनाजी जाधव, रामचंद्रपंत अमात्य व शंकराजी नारायण यांनी काम केले व वेढा उठविला. संताजीने त्या बाबतीत कोणतीही उत्सुकता दर्शविली नाही.

यावरून संताजी हा प्रमादाचा केवळ मूर्तिमंत पुतळा होता असे समजू नये. सैनिकांनी तळहातावर शिर घेऊन लढावे आणि स्वार्थासाठी किंवा राजकारणासाठी प्रधानांनी तह करून त्याचे पाय ओढावे व त्यांना तोंडघशी पाडावे ही त्याची तक्रार सामान्यतः खरी नाही असे म्हणता येईल काय? नागोजी माने आणि मंडळी ज्या रीतीने पुढे मोगलांकडे परत गेली त्यावरून संताजीने त्याच्याविषयी मनात बाळगलेली उपेक्षाबुद्धि बरोबर नव्हती असे म्हणता येईल काय? शिवाजीमहाराजांचे वतन न देण्याचे तत्त्व सलामत राखण्याचा त्याचा आग्रह चूकच म्हणायचा काय ? त्या पुण्यश्लोकाच्या पावलावर पाऊल ठेवून स्वभावतः

बेकैद असलेल्या मराठी फौजेला करडी शिस्त लावण्याचा त्याचा अट्टाहास हे वेडच समजले पाहिजे काय? तत्त्व या दृष्टीने पाहिले तर संताजीचे काहीच चुकले नव्हते. त्याची चूक एवढीच झाली की सेनापति असलो तरी आपण छत्रपतीचे नोकर आहोत ही गोष्ट तो विसरला. नोकराला स्वतंत्र मते नसतात. त्याला मुंगी होऊन साखर खाता येईल पण हत्ती होऊन लाकडे फोडता येणार नाहीत. संताजीला हत्ती होऊन लाकडे फोडावयाची होती. ती राजारामाच्या दरबारी त्याला कोण फोडू देणार? उलट त्याच्यासारखी तत्त्वनिष्ठ व्यक्ति म्हणजे त्या तडजोडीच्या हंगामात डोकेदुखी न ठरली तरच नवल.

अखेर १६९४ च्या कार्तिकात शंकराजी नारायण सचिवाने संताजीची समजूत घातली. संताजीचे आता खुद्द छत्रपतींशीच बिनसले होते. तेव्हा सचिवाने त्याला स्वामीशी मर्यादेने वागण्याची इशारत दिली. "शंकराजीपंतांनी संताजीसी बोली केली की फौजेनसी जाऊन साहेबकाम करावे. स्वामीजवळ मुद्दे घालू नयेत. मर्यादेने राहोन जिंजीचा वेढा उठवावा. बेमानी करू नये ऐसी बोली करून शपथ घेतली. "बरोबर येसाजी मल्हार मुतालिक दिले. हणमंतराव निंबाळकर, सरलष्कर व सरदार मिळोन पंचवीस हजार स्वार दिले. यानंतर १६९५ च्या नोव्हेंबरमध्ये कासीमखान व १६९६ च्या जानेवारीत हिंमतखान यांना दस्त करून संताजी छत्रपतीच्या दर्शनासाठी जिंजीस गेला.

या वेळी धनाजीही राजारामाजवळ होता. धनाजीचा राजारामाने गौरव केला, पण एवढा अपूर्व विजय मिळूनही संताजीचा सन्मान केला नाही हे संताजीला सहन झाले नाही. दोघांची परत बोलाचाली झाली. या वेळी राजारामाला संताजी फारच डोईजड भासू लागला. भीमसेन म्हणातो की "धनाजीने राजारामाला भासविले की, संताजीचा जोर खूपच वाढला आहे. तो स्वतंत्र होण्याच्या विचारात आहे. तो कुशल शिपाईगडी आहे.त्याला ठार मारले पाहिजे." अर्थात संताजीला ठार मारण्याचा अतिरेकी विचार राजारामाने केला असेल हे त्याच्या नेहमीच्या सौम्य स्वभावाशी विसंगत वाटते. संताजी बंडखोर आहे, त्याला पकडून शिक्षा केली पाहिजे असा मात्र त्याचा निश्चय झाला असावा. कारण त्याची बंडखोरी राजारामाला स्वतःलाच उघड दिसत होती. ती त्याला बोटाने दाखवून देण्यासाठी धनाजीच्या मार्गदर्शनाची काही जरुरी नव्हती. सुरतकर इंग्रजांनी तर १८ जुलै १६९६ च्या पत्रात आपण ऐकलेली बातमी म्हणून लिहिले आहे की संताजी घोरपडे याने राजारामाला छापा घालून पकडले. झुल्फिकारखानाने आपल्या स्वाधीन राजारामाला करण्याबद्दल फार मोठे बक्षीस संताजीला देऊ केले. व औरंगजेबानेही बारा हजाराची मनसब देऊ केली पण अखेर संताजीने राजारामाची मुक्तता केली." साकी मुस्तैदखानानेही हीच हकीकत निराळ्या प्रकाराने दिली आहे. संताजी जिंजीकडे निघाला त्या वेळी धनाजी जाधव हा राजारामाला जिंजीकडे घेऊन

चालला होता. धनाजी आणि संताजी यांचे जुने वैर होते. त्याने धनाजीशी लढून त्याचा पराजय केला. नंतर संताजीने राजारामाला धरले, धनाजी पळून गेला. दुसऱ्या दिवशी संताजी आपले हात बांधून राजारामापाशी हजर झाला व म्हणाला "मी तुमचा सेवक आहे तुम्ही धनाजीला माझ्या बरोबरीचा दर्जा देऊ इच्छीत होता आणि त्याच्या मदतीने जिंजीस दाखल होऊ इच्छीत होता म्हणून मला असे उद्धटपणे वागणे भाग पडले. आपण आता जी आज्ञा कराल त्याप्रमाणे मी वागेन." असे म्हणून त्याने राजारामाला मुक्त केले. व त्याला जिंजीत पोचविले. या लिहिण्यात काही खरे व काही खोटे यांचे बेमालूम मिश्रण आहे. संताजी व धनाजी यांचे वैर होते. त्यांची लढाई झाली या गोष्टी खऱ्या आहेत. राजारामाला संताजीने पकडले ही गोष्ट काल्पनिक आहे. छत्रपतीशी कितीही वर्दळीवर आला तरी त्याला पकडण्याइतक्या मर्यादेला जाणारा संताजी नव्हे. "श्रीराजारामचरणी तत्पर संताजी घोरपडे निरंतर" अशी त्याची मुद्रा आहे ही गोष्ट विसरून कसे चालेल ?

पण शब्दार्थाने जरी नाही तरी तात्पर्यार्थाने या गोष्टी फारशा चूक नसाव्यात असे वाटते. म्हणजे नाकापेक्षा मोती जड अशा अनावर संताजीच्या पारिपत्याची राजारामाला निकड वाटू लागली आणि त्याने ती कामगिरी धनाजी जाधवाला सांगितली. जिंजीच्या दक्षिणेस वृद्धाचल आणि वृद्धाचलाच्या वायव्येस अकरा मैलांवर, मणिमुक्ता आणि मयूरा या नद्यांच्या काठी, आयेवारकुटी येथे जून १६९६ मध्ये धनाजीने संताजीवर हल्ला केला. या लढाईत अमृतराव निंबाळकर धनाजीच्या बाजूने लढत होता.

संताजीवरील हा प्रसंग फार कठीण होता. कारण ही केवळ संताजी आणि धनाजी यांच्यामधली लढाई नव्हती. त्यात छत्रपति सामील झाले होते म्हणजे समस्त मराठमंडळाच्या दृष्टीने आजपर्यंत सेनापति असलेला संताजी बंडखोर व गुन्हेगार ठरला होता. या लढाईला राजारामाचे प्रोत्साहन होते यात शंका नाही. कारण त्यात शौर्य गाजविणाऱ्या हणमंतराव घोरपड्याला राजाराम लिहितो– "ऐसीयासी स्वामीच्या पायासी एकनिष्ठता धरून कर्नाटक प्रांतात स्वामीसंनिध आलो. त्यावरी आयेवारकुटी मुक्कामी संताजी घोरपडे व राजश्री धनाजी जाधवराव या उभयतांमध्ये झुंज जाले. या समयी आपण कष्ट मेहनत बहूत केली. ते स्वामींस विदित आहे. स्वामींनी कृपाळू होऊन आपणांस इनाम गाव –विनंति केली. त्यावरून मनात आणिता तुम्ही देशीहून कर्नाटक प्रांतास स्वामीच्या पायाशी एकनिष्ठता धरून स्वामीसनिध आलेत. त्यावरी आयेवारकुटी याचे भांडणी अमृतराव निंबाळकर येही उडी टाकली. त्याबरोबर तुम्ही शरीक होऊन ते प्रसंगी उडी टाकून शूरत्वाची सीमा केली. एकनिष्ठ सेवक तुमचे चालविणे स्वामीस अगत्य." या आयेवारकुटीच्या लढाईत अमृतराव निंबाळकरांबरोबर हणमंतराव

घोरपड्याने उडी टाकून शूरत्वाची सीमा केली. म्हणून राजाराम त्याला एकनिष्ठ सेवक म्हणतो व त्याचे चालविणे ही आपली जबाबदारी मानतो. याचा अर्थ उघड आहे. त्याचप्रमाणे या राजारामाच्या पत्रात धनाजीच्या नावापूर्वी राजश्री हे उपपद व नंतर 'राव' हा बहुमानार्थी शब्द आहे. पण संताजीच्या नावापूर्वी किंवा नंतर कसलेही उपपद नाही, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. बोलून-चालून गुन्हेगार. त्याचा निर्देश करताना सन्मानदर्शक उपाधींची जरूरच काय?

पण संताजीने याही प्रसंगाला धैर्याने तोंड दिले. त्याने धनाजीचा पराजय केला. धनाजीने पळ काढला. अमृतराव निंबाळकर हा धनाजीच्या आघाडीला लढत होता तो मारला गेला. काही जणांच्या मते संताजीने त्याला हत्तीच्या पायी दिले. संताजीचा जय झाला.

दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीत पुण्याच्याजवळ हडपसरला शिंदे आणि होळकर यांच्यात झालेल्या लढाईप्रमाणे, जिची आठवण झाली की आजही खेदाने मान खाली घालावीशी वाटते, अशी मराठ्यांच्या इतिहासातली ही आयेवार-कुटीची लढाई आहे. या लढाईला कारणे काय जाली, व कोण बरोबर व कोण चूक होते हे सर्व प्रश्न अप्रस्तुत आहेत. मुद्द्याची गोष्ट ही आहे की, मराठी राज्याचा घास घेण्यासाठी औरंगजेबासारखा नक्र जबडा वासून बसला असता, मराठ्यांना आपली घरातली भांडणं मिटविण्यास शस्त्राशिवाय दुसरे साधन सापडू नये, आणि ज्या संताजी आणि धनाजी यांचे अप्रतिम शौर्य प्रतिपक्षाला भस्मसात् करण्यास उपयोगी पडावयाचे, त्याच शौर्याचा प्रयोग उलट्या म्हटलेल्या मंत्राप्रमाणेच त्यांच्यावरच एकमेकांकडून होण्याची वेळ यावी. आयेवार कुटीच्या लढाईचे परिणाम फार दूरगामी झाले. धनाजीसुद्धा संताजीला आवरू शकत नाही या अनुभवामुळे राजारामाची चिंता वाढली हे तर झालेच. पण त्यापेक्षाही या लढाईत अमृतराव निंबाळकर मारला गेल्यामुळे राजाराम जास्त दुखावला गेला. कारण अमृतराव हा राजारामाचा प्रत्यक्ष नातेवाईक होता. राजारामाची पहिली बायको जी जानकीबाई, तिची मुलगी सोयराबाई व तिचा नवरा बजाजी निंबाळकर. हा बजाजी निंबाळकर दुसरा. हा पहिल्या बजाजी निंबाळकराचा नातू होता. या पहिल्या बजाजीला शिवाजी महाराजांनी शुद्ध करून परत हिंदुधर्मात घेतले होते व त्याचा मुलगा महादजी याला आपली मुलगी सखूबाई ही देऊन पतितपरावर्तनाचा सक्रिय पुरस्कार केला होता. त्या बजाजीचा नातू हा दुसरा बजाजी होय. वर सांगितल्याप्रमाणें राजारामाने याला आपली मुलगी सोयराबाई देऊन जावई करून घेतले होते. अमृतराव निंबाळकर हा या बजाजीचा चुलतभाऊ होता, म्हणजे नात्याने तो राजारामाच्या जावयाचा प्रत्यक्ष चुलतभाऊ लागत होता. यावरून संताजीचा अपराध राजारामाला किती घोर वाटला असेल याची साहजिकच कल्पना येईल. पाण्यापेक्षा रक्त नेहमीच घट्ट असते. त्यामुळे छत्रपतींच्या प्रत्यक्ष आप्तावर

ज्ञात टाकणारा संताजी राजारामाला हरामखोर वाटला तर त्यात नवल काय? त्याच्या मनातली संताजीबद्दलची उरली सुरली सहानुभूति नष्ट होऊन गेली व त्याने आज्ञापत्र काढले की, "संताजी घोरपडे याणी स्वामीच्या पायासी हरामखोरी केली याकरिता त्यास सेनापतीपदाचा कार्यभाग होता तो दूर करून फौज हुजूर आणवली." अमृतराव हा नागोजी माने याचाही मेव्हणा होता. म्हणजे अमृतरावाला ठार मारण्याच्या एका कृत्याने संताजीने छत्रपति व माने या दोघा मातबरांचे वैर संपादन केले.

पण संताजी अद्याप फौजबंद होता. त्याच्यापाशी पंचवीस हजार फौज होती. छत्रपतीचे व त्याचे बिनसले होते. त्यामुळे मराठशाही त्याला अंतरल्यासारखीच झाली होती. या वेळी तो औरंगजेबाकडे गेला असता तर त्याने बाहू उभारून त्याचे स्वागत केले असते. मान्यांसारखे अनेक मराठे सरदार तसे गेलेही होते पण तो विचारही संताजीच्या मनात आला नाही. त्याला हरामखोर म्हणतानाही त्याच्या जमेची ही बाजू लक्षात ठेवली पाहिजे. बहुधा छत्रपति व मोगल यांपैकी कोणाचीच ताबेदारी न पतकरता स्वतंत्र मामला थाटण्याचा विचार त्याच्या मनात घोळत असणे शक्य आहे. नोव्हेंबर १६९६ मध्ये कडाप्पा येथे झुल्फिकारखानासाठी औरंगजेबाने पाठविलेला भला मोठा खजिना आल्याची त्याला बातमी लागली. त्यावर धाड घालण्यासाठी तो चालूनही आला. पण झुल्फिकारखान वेळीच येऊन पोचल्यामुळे त्याचा मनसुबा फसला. तेव्हा बेत बदलून तो विजापूरकडे वळला.

विजापूर येथे या वेळी औरंगजेबाचा सरदार गाजीउद्दीन फिरोजजंग हा वाकिण खेड्याच्या बेरडांवर नजर ठेवण्यासाठी तळ देऊन होता. त्याला औरंगजेबाने पत्र पाठविले की, "मराठे सरदारांच्या आपापसांतील भांडणावरून असे दिसते की दुष्ट संताजी लवकरच आपल्या कर्माची शिक्षा पावेल. तर तुम्ही त्याचा पाठलाग करून त्या दुष्टाचा नाश करण्याचा प्रयत्न करा म्हणजे त्याचे श्रेय तुम्हांस मिळून तुमचे नाव काळाच्या पानावर नोंदले जाईल व शत्रु एकत्र येऊ शकणार नाही."

अवशीच्या अंधारात भूत दिसावे त्याप्रमाणे औरंगजेबाचे हे पत्र वाचून फिरोजजंगाचा चेहरा पांढरा फटक पडला. तो काही भेकड नव्हता. औरंगजेबासारख्या दुराराध्य माणसाला खूष करण्यासारखे शौर्य त्याने आजपर्यंत राजपुतान्यात, रामसेजला, रायगडाला दाखविले होते. गोवळकोंडा आणि विजापूर येथेही त्याने चांगली कामगिरी बजावली होती. विजापूरला प्लेगच्या साथीत तो आंधळा झाला पण तेवढे एक व्यंग सोडले तर त्याचे शौर्य पूर्वीसारखेच होते. त्याला औरंगजेबाने दिलेले 'खान, फिरोजजंग, गाजीउद्दीन' हे किताबच त्याच्या शौर्याचे निदर्शक होते. पण संताजी हा पंचवीस हजार फौजेनिशी विजापूरपासून आठनऊ कोसांवर आला आहे ही बातमी ऐकून त्याच्या तोंडचे पाणी पळाले. कारण, खाफीखानाने म्हटल्याप्रमाणे भले भले नामांकित वीर संताजीचे नांव ऐकताच घाबरून जात.

त्यांचे अवसान गळून जाई. ' औरंगजेबाने जरी त्याला मधाचे बोट लावले होते की; ' तुमचे नांव काळाच्या पानावर नोंदले जाईल ' तरी, फिरोजजंग त्या बाबतीत फारसा उत्सुक नव्हता. संताजीचा पाठलाग करावा ही बादशहाची आज्ञा ठीक होती पण त्या ऐवजी संताजीनेच आपला पाठलाग केला तर काय करणार ? हे म्हणजे ढाण्या वाघाचा पाठलाग करण्यासारखे होते. त्याच्या पायांत साखळदंड अडकविण्याचा स्तुत्य उद्योगात आपलेच नरडे त्याने फोडले नाही म्हणजे मिळविली.

पण हे उघड बोलण्याची सोय नव्हती. त्याने बाहेर पुकारा केला की आपण संताजीवर चालून जात आहोत. पुढील मजल नीट करून आपला गोट तिकडे हलविण्यासाठी त्याने एका अधिकाऱ्याची नेमणूक केली आणि स्वतः मात्र आडवाटेने विजापूरचा रस्ता धरला. जीव मुठीत धरून तो जात असता त्याच्या हेरांनी विलक्षण आनंदाची बातमी आणली. विजापूरजवळ संताजी व धनाजी यांची परत लढाई झाली. धनाजीने संताजीची सगळी फौज आतून फोडली होती. त्याचे अनेक सरदार धनाजीला मिळाले होते विजापूरजवळ आल्यानंतर धनाजीच्या इशाऱ्याप्रमाणे हणमंतराव निंबाळकर नावाच्या सरदाराने संताजीवर हल्ला केला. या वेळी संताजीचा सपशेल पराजय झाला. त्याची फौज मोडली. त्याचे सामान, बाजारबुणगे सारे लुटले गेले. त्याचे बरेच सैनिक हणमंतरावाला येऊन मिळाले. उरलेले मारले गेले. संताजी असहाय झाला आणि डोंगराळ भागात असलेल्या आपल्या घराकडे निघाला.

फिरोजजंगाचा आपल्या कानावर विश्वास बसेना इतकी ही घटना अघटित होती. आजपर्यंत कोणाही मोगल सेनापतीला कल्पनेत सुद्धा अशक्य असा हा पराक्रम होता. पण बातमी ही मोगलांच्या सुदैवाने व मराठ्यांच्या दुर्दैवाने खरी होती. आपल्या समरधुरंधर सेनापतीची सेना धुळीला मिळवून त्याला पळवून लावण्याचे श्रेय मराठ्यांशिवाय दुसरे कोणी घेतील हे कसे शक्य होते ? मराठे होतेच तसे पराक्रमी. आजपर्यंत त्यांनी औरंगजेबाला हात दाखविला होता. आता आपल्या सेनापतीला हात दाखविला. आणि आजपर्यंतच्या पराक्रमावर कळस चढविला.

बातमी खरी आहे याची पक्की खातरजमा करून घेतली आणि मग मात्र फिरोजजंग संताजीला मुळीच घाबरला नाही. तोही बोलून चालून शूरच होता. त्याचा मेव्हणा लुत्फुल्लाखान हा सातारा खटाव प्रांताचा माहीतगार होता. त्याला त्याने आपणाबरोबर घेतले व तो संताजीच्या पाठलागावर निघाला.

संताजी पुढे आणि हणमंतराव निंबाळकर मागे असे पळत पळत सातारा जिल्ह्यातल्या दहीगावाजवळ आले. तेथे हणमंतरावाने संताजीच्या फौजेवर पुन्हा

हल्ला करून त्याची उरली सुरली फौज मोडून काढली. त्याच्यापाशी अवघे दहा-बारा राऊत राहिले. त्यांच्यासह तो कारखळचाच्या जंगलात शिरला.

कारखळचाचे जंगल अतिशय घनदाट आहे. तेथे उंच वृक्षांची आणि निबिड वेलींची एकच गर्दी उसळलेली आहे. त्या जंगलातील जमिनीला वर्षानुवर्षे सूर्य-किरणाचा स्पर्श झालेला नाही. संताजीला असे वाटले की आपण वर्षभर जरी या जंगलात राहिलो तरी कोणास समजणार नाही. तो त्या जंगलात शिरला.

पण वेळ आली म्हणजे सावज आपण होऊन मरणाची वाट चालू लागते असे म्हणतात ते काही खोटे नाही. ' तादृशी जायते बुद्धिर्व्यवसायोऽपि तादृशः । सहायास्तादृशाश्चैव, यादृशी भवितव्यता ।।' –तशी बुद्धी होते तसा निश्चय होतो, सहायक तसेच मिळतात, ज्याप्रमाणे पुढे होणार असते. ' बिचाऱ्या संताजीला खूप वाटले की कारखळचाच्या जंगलात आपण सुरक्षित आहोत म्हणून पण त्याला हे माहीत होते काय की हा प्रांत नागोजी माने याच्या हद्दीतला होता? नागोजी या जंगलात नेहमी शिकारीला येत असे. त्यामुळे त्याच्या व त्याच्या माणसांना या जंगलातल्या पाऊलवाटा व चोरवाटा अगदी पायाखालच्या होऊन बसल्या होत्या. नागोजीला संताजीबद्दल ममत्व वाटण्याचे काय कारण होते? सत्तेवर असताना संताजी त्याला कस्पटासमान लेखीत असे; त्याचा मुलगा सुभानजी याला त्याने बेमुर्वतखोरपणाने निरोपाची पाने देऊन मर्जीस येईल तिकडे जाणे म्हणून घालवून दिले होते; एवढ्याने भागले नाही म्हणून की काय, त्याचा मेव्हणा अमृतराव निंबाळकर याला त्याने हत्तीच्या पायी देऊन ठार मारले होते. आपला, आपल्या मुलाचा, आपल्या मेव्हण्याचा मानभंग करणाऱ्या संताजीचा सूड घ्यायचा नागोजीने निश्चय केला तर ते केवळ साहजिकच होते. त्यात मनुष्य-स्वभावाला सोडून काही नव्हते. त्याच्या या प्रतिशोध घेण्याच्या कार्यात त्याची बायको व अमृतरावाची बहीण राधाबाई हिने संपूर्ण सहकार्य दिले हे सांगणे नकोच. तिने सदबा गेटी नांवाचा एक हुशार गृहस्थ हाताशी धरला व त्याच्या करवी काही मांग संताजीच्या मागावर लावून दिले.

या कौटुंबिक सूडाच्या विचाराप्रमाणेच नागोजी मान्याच्या मनात या वेळी एक खोल बादशाही राजकारण घोळत होते. सात वर्षांपूर्वी तो औरंगजेबाकडून राजारामाकडे आला, की ' स्वामीचे राज्य म्हणज देवताभूमी, या राज्यास ताम्राचा उपद्रव न व्हावा; महाराष्ट्र धर्म रहावा, स्वामींच्या राज्याची अभिवृद्धि व्हावी ' पण गेल्या सात वर्षांत 'महाराष्ट्र धर्म राखण्याचा व स्वामींच्या राज्याची वृद्धी करण्याचा' नागोजीचा उत्साह बराच उतरला होता. तसे पाहिले तर शिवछत्रपतींनी स्थापन केलेल्या मराठशाहीशी तसा त्याचा विशेष संबंध नव्हता. तो व त्याचा बाप मूळचे विजापूरच्या आदिलशाहीचे ताबेदार होते. त्याचा बाप रताजी नरसिंगराव माने म्हणजे विजापूर दरबारात मोठेच प्रस्थ होते. जयसिंग व

हाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था
(इ.व्ह ट्रा. सोसायटी)
१३१ सदाशिव पेठ, पुणे-३०.



दिलेरखान यांनी विजापूरवर स्वारी केली तेव्हा या रताजीने एवढा पराक्रम केला की आदिलशाहीने त्याच्यावर किताबांची खैरात केली. त्याचा मुलगा नागोजी हा बापासारखाच शूर, बापाच्या हयातीतच सरदारी करू लागला. पुढे विजापूरकरांशी बेबनाव झाल्यावर तो औरंगजेबाकडे व तिकडून मराठ्यांकडे आला. पण त्याचा आणि त्याच्या बापाचा उत्कर्ष मोगलाची इमाने—इतबारे चाकरी बजावून झालेला होता.

ते पूर्वसंस्कार आता जागे झाले व नागोजीला मराठशाहीतून परत बादशाही छावणीत दाखल होण्याची इच्छा झाली. परंतु मधल्या सात वर्षांच्या काळात तो मराठ्यांकडे गेला होता. तो इतिहास धुवून काढल्याशिवाय औरंगजेबासारखा खाष्ट आणि चोखंदळ इसम त्याला आपल्या छावणीत कसा बरे समाविष्ट करून घेईल ? आणि केलेल्या पापाचे परिमार्जन करण्यास व औरंगजेबाला संतुष्ट करण्यास, मराठ्यांच्या दिग्विजयी सेनापतीचा नायनाट करण्याची कामगिरी बजावण्यापेक्षा दुसरा नामी उपाय शोधूनही सापडणारा नव्हता. यात राजकारणही होते व कौटुंबिक सुडाचे समाधानही होते. नागोजीने असा विचार केला आणि पूर्वी खटावचा ठाणेदार असलेल्या व आता तिकडेच संताजीच्या पाठलागावर आलेल्या लुत्फुल्लाखानाशी संधान बांधून संताजीचा शोध सुरू केला. म्हणजे एका संताजीची पारध करण्यासाठी आता लुत्फुल्लाखानाचे लोक, धनाजीचे लोक, राधाबाईचे लोक, व नागोजीचे लोक ते कारखळ्याचे जंगल कापसाप्रमाणे पिंजून काढू लागले.

बरेच दिवस गेले पण संताजीचा काही पत्ता लागेना. अखेर सदबा शेटीने धूर्तपणाने अंदाज बांधला की संताजी कोठेही दडलेला असला तरी आंघोळीसाठी पाण्यावर येईलच. त्याप्रमाणे त्याने जंगलातल्या सगळ्या नद्यानाल्यावर गुप्त पहारा ठेविला. त्याचा तर्क खरा ठरला. एके दिवशी थकला भागलेला संताजी खरोखरच एका ओढ्यावर स्नानासाठी आला. त्याने आपले चिलखत, ढाल, तरवार काठावर काढून ठेवली. तो निःशंक मनाने स्नान करू लागला. एवढ्यात झाडाआड दडलेल्या नागोजीच्या माणसांनी त्याच्यावर हल्ला केला आणि त्याचा शिरच्छेद केला. तो १६९७ चा जून महिना होता आणि तिथि आषाढ शुद्ध प्रतिपदा होती.

ज्याने गेली आठ वर्षे औरंगजेबाला ‘ दे माय धरणी ठाय ’ करून सोडले होते, त्या या प्रतापी सेनापतीचा अंत अशा प्रकारे एका अज्ञात जंगलात, अज्ञात मारेकऱ्यांकडून असहाय, बेसावध व निःशस्त्र अवस्थेत झाला. काळ विपरीत आला आणि मेरूला मुंग्यांनी गिळले. त्या कठीण समयी कोणीही संताजीच्या कामी आले नाही. लाखांची फौज बाळगणारा तो तालेवार खावंद, पण बंदुकीच्या बाराने पाखरे पांगावीत तशी माणसे पळाली. संताजीच्या शवाला अग्नि दिला तो नारो

(डे.व्हडूरा ... पुणे)
११३३ सदाशिव पेठ

महादेव जोशी याने होय. संताजीने या ब्राह्मणाच्या मुलाला आपला मुलगा मानले होते; आणि संताजीने केवळ विनोदाने त्याची परीक्षा पाहण्यासाठी म्हणून आपल्या पानात जेवायला सांगताच, तात्काळ 'इयं सा जातिः परित्यक्ता' म्हणणाऱ्या अश्वत्थाम्याप्रमाणे जानव्याला हात घालणारा हा नारो महादेव खरोखरच पुत्र धर्मास जागला. संताजीच्या दुःखद अवसानानंतर यानेच मोडू पहाणारा त्याचा कुटुंबकबिला सावरून धरला. इचलकरंजी संस्थानच्या या मूळ पुरुषाने संताजीला मरेपर्यंत सोबत देऊन राजद्वारात व स्मशानात जो बरोबर असतो, तोच बांधव होय हे वचन खरोखरच सार्थ केले. 'राजद्वारे, स्मशाने च यस्तिष्ठति स बान्धवः।'

संताजीचा शिरच्छेद झाला. पण त्याचे दुर्दैव अजूनही संपले नव्हते. नागोजी माने याने ते संताजीचे मस्तक आपल्या घोड्याच्या तोबऱ्यात अडकविले व ते औरंगजेबाला सादर करण्यासाठी तो निघाला. पण त्या खडकाळ प्रदेशात तो तोबरा खाली कोठेतरी पडला. लुत्फुल्लाखानाचे व फिरोजंगाचे लोक त्या प्रदेशात संताजीच्या मागावर हिंडत होतेच. त्यांच्या नजरेला तो तोबरा पडला. त्यांनी तो फिरोजजंगाकडे आणला. त्यांनी संताजीचे मस्तक ओळखले व हर्षातिशयाने ते परस्परांचे अभिनंदन करू लागले. त्यांनी ते मस्तक ख्वाजाबाबा तुराणी नावाच्या सरदाराबरोबर औरंगजेबाकडे पाठविले.

आपल्या शामियान्याचे सोनेरी कळस उपटणाऱ्या व आपल्या वीराचा कर्दनकाळ ठरलेल्या मराठ्यांच्या सेनापतीचे ते मस्तक पाहून औरंगजेबाच्या मनात कोणते विचार आले असतील बरे? आपल्या सुदैवाबद्दल त्याला हर्ष वाटला असेल? की आपल्या भेदनीतीचा विजय वाटला असेल? की दोघांचे भांडण आणि तिसऱ्याचा लाभ अशा मराठ्यांच्या आत्मघातकी वृत्तीबद्दल कीव वाटली असेल? कुणास माहीत. तो जिवंत असताना त्याचे विचार कोणाला कळले नाहीत तर तो मेल्यानंतर कोणाला कळणार? त्याने छावणीत नगारे नौबती वाजविण्याची आज्ञा केली- ईश्वराचे आभार मानले. ख्वाजाबाबाला 'खुशखबरखान' ही पदवी दिली. फिरोजजंगाची प्रशंसा करून त्याला बक्षिसे दिली आणि संताजीचे डोके छावणीतून व प्रमुख शहरांतून मिरवण्यात यावे अशी आज्ञा केली.

संताजी मृत्यु पावला. बादशहाचे काम झाले. धनाजीचे काम झाले. कारण तो सेनापति झाला. नागोजी मान्याचेही काम झाले. बादशहाने त्याचे सर्व अपराध माफ केले. त्याचा सरदार लुत्फुल्लाखान याने त्याला लिहिले– "तुम्ही निश्चये करून, आमचे दौलतीचा आश्रय करून हुजूर येऊन रुजू जाहला व दुस्मानासही दूर केला. संता याचा पळावयाचा रस्ता तुम्ही बंद केला. त्यास पळून जाऊ दिले नाही. येणेकरून तुम्ही सरकारची नोकरी एकनिष्ठेने बहुत चांगली बजावली. तुमचे अपराध क्षमा होऊन पातशहांची मेहेरबानी व इनायत होऊन येईल." (९ जुलै १६९७)

त्याप्रमाणे १३ फेब्रुवारी १६९८ रोजी औरंगजेबाने नागोजी मान्याला फर्मान पाठविले. त्यातील भाषा पाहण्यासारखी आहे. "सध्या तबियतखानाने दरबारास अर्ज पाठविला की, तुला सुदैवाने तुझ्या कसुरीविषयी पश्चात्ताप होत आहे. आणि तू बादशाही ताबेदारी पतकरून प्राणपणाची सेवा करू इच्छीत आहेस. म्हणून बादशाही कृपेने तुझ्या अपराधांवर क्षमेचे पांघरूण घालण्यात येत आहे. आणि मूल्यवान् ऐश्वर्य देत आहे. केलेल्या कृपेबद्दल धन्यवाद देऊन उंबरठ्यास सलाम करण्यास धावून यावे म्हणजे कृपा होऊन उत्तम मनसबीच्या योगे डोके वर काढले जाईल."

अशा प्रकारे संताजीच्या जीविताची भीषण शोकांतिका झाली. या शोकांतिकेला जबाबदार कोण ?

शोकांतिकेचा शेवट नायकाच्या मृत्युमध्ये होतो असा संकेत आहे. पण मृत्यु म्हणजे शोकांतिका नव्हे. संताजी मरण पावला ही शोकांतिका नव्हे. कारण संताजी हा काही अमर नव्हता. ज्या रीतीने तो मेला, त्यात त्याची शोकांतिका आहे. हंबीरराव मोहित्याप्रमाणे समरांगणात तोफेचा गोळा लागून तो धारातीर्थी पतन पावला असता तर त्याच्या त्या वीरमरणाने त्याच्या वीरजीवनावर कळस चढला असता. तानाजीप्रमाणे सिंहगडासारखा दुर्गराज घेताना तो मारला गेला असता तर त्याचे पोवाडे गायिले गेले असते. बाजीप्रभूप्रमाणे त्याने पावनखिंड लढविताना जिवाची कुर्बानी केली असती तर त्याची समाधी बांधली गेली असती. फार काय, संभाजीप्रमाणे बंदीवान् होऊन त्याने औरंगजेबापुढे हौतात्म्य पतकरले असते तर त्याच्या मरणानेही मेलेल्या राष्ट्राला जिवंत केले असते. त्याऐवजी एका उपेक्षित जंगलात भाडोत्री मारेकऱ्यांकडून त्याच्या जीविताची इतिश्री व्हावी ही त्याची खरी शोकांतिका आहे. त्याचा मान झाला नाही, त्याचे पोवाडे झाले नाहीत, त्याच्यासाठी कुणी अश्रूही ढाळले नाहीत. 'Unwept, Unhonoured, Unsung !'

बीजामध्ये वृक्ष सूक्ष्म रूपाने असतो व वृक्षाचा विराट् विस्तार हा त्या बीजाचाच आविष्कार होय. त्याप्रमाणे संताजीच्या उग्र व उद्दाम स्वभावामध्ये त्याच्या जीविताची शोकांतिका बीजरूपाने होतीच. आणि पुढील सर्व दुर्दैवी घटना या त्या बीजाच्या आविष्काराप्रमाणे होत्या. त्याचा हा स्वभाव हीच त्याची नियति होती. त्या दृष्टीने त्याच्या जीविताची शोकांतिका हा त्याच्या स्वभावाचा आणि कर्माचा परिपाक आहे. त्याला तोच जबाबदार आहे. त्याने जे पेरले तेच उगवले.

पण सारी जबाबदारी संताजीवर लोटून देऊन मोकळे होण्याइतका हा प्रश्न सोपा नाही. त्याच्या जीवनाची शोकांतिका व्हायला राजारामाचे दुर्बल नेतृत्व काहीच जबाबदार नव्हते काय? शिवाजी महाराज त्या वेळी छत्रपति असते तर संताजीच्या जीविताची अशी परवड झाली असती काय ? संताजीची तत्त्वनिष्ठा व

शिस्तीचा आग्रह चूकच म्हणावा लागेल काय ? त्याचप्रमाणे उलट बाजूने असेही म्हणता येईल की सरदार डोईजड होऊ लागला तर छत्रपतीने तरी काय करावे ? आपणावर चालून आलेल्या अमृतराव निंबाळकराला संताजीने समरांगणावर ठार मारले यात त्याचे काय चुकले? आणि मेव्हण्याच्या वधाचा सूड नागोजीने घेतला तर त्यात त्याची चूक काय होती ? संताजी खूप पराक्रमी असेल पण याचा अर्थ असा होतो काय की इतरांनी त्याचा प्रतापाच्या चौखूर उधळणाऱ्या अबलख घोड्याच्या टापाखाली किड्या मुंगीप्रमाणे चिरडून मेलेच पाहिजे ?

या प्रश्नांची उत्तरे आपणाला कधीही मिळणार नाहीत. कारण त्या प्रश्नांची उत्तरे देणाऱ्या व्यक्ति कालौघांत कधीच लुप्त झाल्या आहेत. पण प्रत्येकाची बाजू काही प्रमाणात खरी आहे व संताजीच्या मृत्यूबद्दल कोणाही एका व्यक्तीला जबाबदार धरण्यात अर्थ नाही. हे खरे असले तरी एवढा मोठा वीरांचा मुकुटमणि, त्याच्याच जातीच्या व त्याच्याच धर्माच्या एका मराठ्याकडून अशा रीतीने मारला जावा ही मनस्वी खेदाची गोष्ट आहे, हे नाकारता येत नाही.

कारखळच्याच्या जंगलांत ज्या ठिकाणी संताजीचा शिरच्छेद झाला, तेथे कसलेही स्मारक नाही. तेथे चिरा नाही, तेथे पणती नाही, तेथे समाधि नाही, तेथे वृंदावन नाही, तेथे छत्री नाही, तेथे काही नाही.

पण त्याच्या धर्माच्या मराठ्यांनी संताजीचे स्मारक केले नसले, तरी मुसलमानांनी ते केलेले आहे. दगडाविटांची स्मारके काळाच्या आघातांनी ढासळतात पण शब्दांनी बांधलेली वाङ्मयातील स्मारके काळावर मात करून 'अभंग' राहतात. औरंगजेबाचा इतिहासकार खाफीखान याने आपल्या उत्कृष्ट ग्रंथांत संताजीच्या शौर्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. अर्थात् खाफीखान हा कडवा मुसलमान आणि मराठ्यांचा कट्टर शत्रु असल्यामुळे शिवीशिवाय संताजीचे नाव त्याच्या लेखणीतून बाहेर पडू नये हे स्वाभाविकच होय. पण जातीचा तो इतिहासकारच खरा. हा आपला, हा परका या आपपरभावाच्या पलीकडे जाऊन शत्रूचेही गुण तटस्थपणे निवेदन करणारी त्याची वाणी ही अभिजात इतिहासकाराची केवळ भूतार्थकथन करण्याच्या प्रतिज्ञेने बांधलेली सरस्वती आहे. 'भूतार्थकथने यस्य स्थेयस्येव सरस्वती !'

औरंगजेबाला दहशत लावणे हे संताजीचे जीवितकार्य होय. त्याबद्दल लिहिताना खाफीखान म्हणतो:—

"मराठे सरदारांत प्रमुख म्हणजे धनाजी जाधव व संताजी घोरपडे हे होते. त्यांच्यापाशी पंधरा वीस हजारांच्या जंगी फौजा होत्या. या दोघा सरदारांमुळे बादशाही सेनापतींवर कमालीचे आणि भयंकर आघात झाले. यात तो नालायक संताजी प्रमुख होता. समृद्ध शहरांवर हल्ला करून त्यांचा नाश करणं आणि नामांकित सेनापतींच्यावर तुटून पडणे यांत त्याची खूपच प्रसिद्धि झाली.....यावर

उपाय कुणालाच सुचेना. युद्ध करण्यासाठी जिकडे तिकडे म्हणून तो नालायक आणि हलकट कुत्रा तयार होऊन जाई, तिकडे त्याचा मुकाबला करण्यास बादशहाच्या प्रतिष्ठित सरदारांपैकी एकही तयार होत नसे. जगात धडकी भरवून सोडणारी फौज घेऊन तो कोठेही पोहोचला की नरव्याघ्राप्रमाणे अनुभवी योद्ध्यांची हृदये कंपायमान होत.''

□ □

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था
१११६ सदाशिव पेठ, नवी शाखा,
कुमठा बुरुडी चौक, पुणे-४११ ०३०.

## (७)

विष हे जाणून खा की नेणून खा ते प्राण घेतल्याशिवाय रहात नाही असे म्हणतात. त्या वचनाची प्रतीति संताजीच्या वधामुळ राजारामाला आल्याशिवाय राहिली नाही. संताजीचा खून करण्यास राजारामाचे उत्तेजन होते असे वाटत नाही. त्याचे पारिपत्य जरूर व्हावे इतकीच त्याची इच्छा होती. त्याचप्रमाणे धनाजी जाधव जरी त्याचा द्वेष करीत असला, तरी मारेकऱ्याकडून त्याचा खून करविण्याइतपत खालच्या पातळीवर जाणारा तो असेल असे वाटत नाही. पण असे असले तरी संताजीचे पंख छाटून त्याला असहाय करण्यास धनाजीप्रमाणे राजारामही जबाबदार होता, हे कसे नाकारता येईल ? त्यामुळे त्याच्या खुनाची प्रत्यक्ष नसेल पण अप्रत्यक्ष जबाबदारी राजारामावर पडतच होती. आणि या कर्मांची दारुण फळे राजारामाला लवकरच भोगावी लागली. तत्त्वज्ञानामध्ये कर्मविपाकाचा कायदा वादग्रस्त असेल कदाचित्, पण इतिहासामध्ये तरी पूर्वजांच्या कर्मांची फळे वंशजांना तर भोगावी लागतातच. पण व्यक्तीलाही आपल्या कर्मांची फळे भोगल्यावाचून पर्याय राहात नाही असे वाटते. संताजीसारख्या महावीराचा वध हे एक अघोर कर्म होते. संताजीने स्वामीच्या पायाशी हरामखोरी केली, त्या राजद्रोहाच्या रोगावर राजारामाने योजलेली ती एक जालीम मात्रा होती काय ? असेलही कदाचित् पण या बाबतीत रोगापेक्षा औषधच घातक ठरले. संताजीच्या मृत्यूने राजारामापुढील कोणती समस्या सुटली ते त्या बिचाऱ्यालाच माहीत. त्याचा तत्काळ परिणाम इतकाच झाला की, त्याच्या मृत्यूनंतर अवघ्या सहा महिन्यांत राजारामाला जिंजी सोडावी लागली.

'अखिलं हि हिनस्ति भूधरं तरुशाखान्तर्निघर्षजोऽनलः।' असे भारवीने म्हटले आहे. त्याचा अर्थ असा की झाडाच्या फांद्यावर फांद्या घासून जो वणवा भडकतो, त्याने सगळा पर्वतसुद्धा भस्मसात् होऊ शकतो; त्याप्रमाणे प्रजेमध्ये अंतर्गत संघर्ष पेटला म्हणजे तो राजाला नष्ट केल्याशिवाय राहात नाही. संताजी आणि धनाजी यांच्यातील यादवीमुळे मराठ्यांची अशा प्रकारे मोडकळीला आलेली अवस्था औरंगजेबाच्या नजरेतून कशी सुटणे शक्य होते ? शत्रूची अडचण तीच आपली संधि या न्यायाने मराठे अडचणीत सापडतील तेवढे त्याच्या पथ्यावरच पडणार होते. त्यात संताजीच्या मृत्यूने त्याच्या मार्गातील अडथळा ईश्वरानेच दूर केला असे वाटून त्यास मोठा संतोष झाला. त्याने झुल्फिकारखानास जिंजीस पुन्हा वेढा घालण्याचा हुकूम केला. त्याप्रमाणे १६९७ च्या नोव्हेंबरात खानाने जिंजीला मोर्चे लावले.

...८

या वेळी राजारामाची स्थिति अत्यंत बिकट झाली होती. त्याच्याजवळ फारसे सैन्य नव्हतेच आणि महाराष्ट्रातून जिंजीच्या मदतीला सैन्य येणे आता केवळ अशक्य झाले होते. चार वर्षांपूर्वी कामबख्श, आसदखान व झुल्फिकारखान यांनी जिंजीला वेढा घातला होता. त्या वेळी महाराष्ट्रातून धनाजी जाधव व संताजी घोरपडे हे वीस वीस हजारांच्या जंगी फौजेनिशी विजेप्रमाणे मोगलांवर तुटून पडले होते. त्यांनी इस्माइलखान मखा आणि अलीमर्दानखान यांच्यासारखे मोगलांचे नामांकित सरदार दस्त केले होते. आणि वेढा घालणाऱ्या फौजेची अशी लांडगेतोड केली होती की एक लाखाची खंडणी भरून झुल्फिकारखानाला युद्ध तहकुबीची मोठ्या मिनतवारीने याचना करावी लागली होती. ते धनाजी व संताजी आज कोठे होते? आपापसांत भांडण करून धनाजी महाराष्ट्रात पळाला होता आणि बिचाऱ्या संताजीची तर स्वकीयांच्या कारवाईनेच परलोकात रवानगी झाली होती. संताजीचा काटा काढणे एक वेळ सोपे होते पण मोगलांच्या धडाडणाऱ्या तोफांच्या तोंडावर ठासून उभा राहणारा त्याच्याच तोडीचा वीरमणि' आणणे तितके सोपे नव्हते. म्हणून मग जिंजी लढवायची कुणाच्या बळावर असा प्रश्न राजारामाला पडला तर त्यात नवल नव्हते.

एवढेच नव्हे. राजारामाचे सामर्थ्य केवळ महाराष्ट्रातून येणाऱ्या मराठी सैन्यावर अवलंबून नव्हते. जिंजीच्या आसपास असलेले तंजावर व त्रिचनापल्ली येथील राजे आणि कर्नाटकातले छोटे मोठे पाळेगार यांचे राजारामाला आजपर्यंत मोठे साहाय्य होत होते. हे सारे हिंदु होते आणि राजाराम जिंजीला आला त्या वेळी हिंदुधर्माचे रक्षण करण्याच्या ईर्षेने ते त्याला मिळाले होते. उदाहरणार्थ मार्टिनने आपल्या रोजनिशीत म्हटल्याप्रमाणे "बादशहाच्या हुकुमाने मुसलमान लोक हिंदूंची मंदिरे पाडू लागले असे पाहून लक्ष्मीनायकाने बादशहाची नोकरी सोडून तो जिंजीच्या अमलाखाली दाखल झाला. त्याने प्रांतांत सर्वत्र आदेश दिला की आपली जात व आपला धर्म यांचे संरक्षण करण्यासाठी बादशहाशी लढण्यास सिद्ध व्हा. त्याने तीन हजार स्वार व सहा हजार पायदळ घेऊन जिंजीस प्रयाण केले. त्याचे राजारामाशी संगनमत झाले आपण दोघ एकधर्मी, समान शत्रूशी लढले पाहिजे. लक्ष्मीनायकाचा लष्करी संच मराठी फौजेस मिळाला." (मार्च १६९०) "एका तंजावरकराने मात्र राजारामास फौज, सामान, पैसा पुरविला. (सप्टेंबर १६९०) तंजावरकराने मोठी रक्कम राजारामाकडे पाठविली. त्यामुळे जिंजीचा बचाव राजाराम करीत आहे." (डिसेंबर १६९१)

राजारामाच्या जिंजीच्या प्रवासाचा वृत्तान्त देणारे 'राजारामचरितम्' म्हणून जे काव्य केशवपंडिताने लिहिले आहे त्यातही या गोष्टीचा उल्लेख आहे. कर्नाटकातील राजे एक होऊन त्यांनी महाराजांना विविध प्रकारचे नजरनजराण व धन दिले आणि म्लेंच्छराजाच्या संमर्दनास योग्य अशा सेनेला द्रव्य आणि मानमरा-

तबाने संतुष्ट करून त्याच्याकडे पाठविले. आपल्या मित्र-राजांच्या सैन्याने संपन्न झालेला प्रतापी राजाराम लढाई देण्यास येत आहे असे ऐकून तो (म्लेंच्छ राजा) मनात दीन झाला. ("कर्नाटविषयैर्भूपैरेकीभूय महीपतेः । उपायनानि दत्तानि धनानि विविधानि च ।। सेना बहुविधाः स्वीया दानमानप्रतोषिताः । प्रेषितास्तस्य सेवायै म्लेंच्छसंमर्दनक्षमाः ।। स्वमित्रबलसंपन्नो राजारामः प्रतापवान् । युद्धायागच्छतीत्येतत् श्रुत्वा दीनमना भवत्।।") त्याचप्रमाणे राजारामाने सर्जेराव जेधे याला २२ मार्च १६९० रोजी जी राजाज्ञा पाठविली आहे त्यात या गोष्टीचा सहर्ष निर्देश तर केलाच आहे. इतकेच नव्हे तर तो पुढे असेही म्हणतो की "तिकडून तमाम बाटगे लोक होते ते आपले जमावानसी आम्हांकडे येताती. ........ यैसे गनिमाचे लष्कर आटोन हुजूर जमाव होत आहे." कर्नाटकातील घडामोडीबद्दल तो म्हणतो "या प्रांतीचे लष्कर तरी राजश्री छत्रपती स्वामी स्वारी करून कर्नाटक प्रांती गेलियावरी तिकडे जमाव लष्कर चालीस हजार व हशम एक लाख पंचवीस हजार जमाव जाला आहे. दुसरेही जमाव आणखी होतच आहेत. प्रतिकूल पुंडपाळेगार तमाम येऊन भेटले आहेती. जमेती पोख्त जाली आहे." तात्पर्य, धर्माभिमान म्हणा की औरंगजेबाचा विरोध म्हणा की वैयक्तिक स्वार्थ म्हणा, राजाराम जिंजीस आल्यापासून हे लोक अनुकूल झाल्यामुळे त्याचे बळ बरेच वाढले होते. तंजावर व त्रिचनापल्ली येथील राजे, कर्नाटकातले पाळेगार पूर्वीच्या कुतुबशाहीतील इस्माइलखान मखा व याचप्पा नायक यांच्यासारखे सरदार, इतकेच नव्हे तर नागोजी मान्यासारखे मोगलांचे सरदार हे सर्व त्याच्या मदतनिसांत मोडत होते.

पण लवकरच मराठ्यांच्या बळाला ओहोटी लागली. त्याची कारणे अनेक होती. भेदनीतीच्या राजकारणात मराठे तेवढे उस्ताद होते आणि झुल्फिकारखान बाळ होता असे काही नव्हते. मराठ्यांनी हणमंतराव घोरपडे, नागोजी माने, नेमाजी शिंदे असे मोगलांचे सरदार फोडले. त्याप्रमाणे झुल्फिकारखानानेही इस्माइलखान मखाला फोडून आपणाकडे आणले. त्याने त्याला पाच हजारांची मन्सब व खान ही पदवी बादशहाकडून देवविली. यापेक्षांही राजारामाने झुल्फिकारखानाला तो सैन्यासह गारद होण्याच्या बेतात असता युद्ध तहकुबी करून त्याच्याशी जो संधि केला त्यामुळे राजारामाच्याच मित्रसंघावर फारच विपरीत परिणाम झाले. हा संधि करताना राजारामानेही चांगुलपणा राखण्याचा दूरवरचा राजकीय हिशेब मनाशी केला असेलच. पण अनेकांना अनेक कारणांमुळे हे राजकारण पसंत पडले नाही. संताजी घोरपडे तर राजारामावर रागावलाच, पण याचप्पा नायक व संताजीचा भाऊ बहिरजी घोरपडे राजारामापासून फुटून निघाले. इतकेच नव्हे तर राजारामाशी त्यांची लढाईही झाली. हा याचप्पा नायक, कुतुबशाहीचा सरदार, राजारामाला मिळाला होता. त्याला झुल्फिकारखानाने आपणाकडे वळविले.

मराठ्यांनी झुल्फिकारखानाशी जो तह केला, त्यामुळे सर्वांत मोठी पंचाईत औरंगजेबाविरुद्ध त्यांना येऊन मिळालेल्या कर्नाटकातल्या पाळेगारांची व त्रिचनापल्ली व तंजावरच्या राजांची झाली. 'वाराङ्गनेव नृपनीतिरनेकरूपा' या वचनाप्रमाणे आज शत्रु असलेल्या झुल्फिकारखानाशी मराठ्यांनी तह केला त्यामुळे त्यांच्या जोरावर मोगलांसारख्या समर्थाशी वैर पतकरलेल्या या छोट्या सत्ताधीशांना मात्र तोंडघशी पडल्यासारखे झाले. मराठ्यांवरचा त्यांचा विश्वास उडाला व मोगलांशी वैर पतकरल्याचा त्यांना पस्तावा झाला. लक्ष्मीनायकासारखे पाळेगार तर या तहानंतर जिंजी सोडून ताबडतोब चालते झाले. ज्या या तहामुळे स्वजन दुरावले आणि शत्रूला जीवदान मिळाले, त्याने मराठ्यांचा कोणता फायदा झाला हा एक प्रश्नच आहे.

या तहाने खरा फायदा झाला तो झुल्फिकारखानाचा होय. मार खाल्ल्यामुळे जिंजीकडे फिरकण्याची त्याला सोय राहिली नव्हती. त्यामुळे या काळात अंतर्मुख होऊन आपल्या चुकांची चिकित्सा करण्याची त्याला भरपूर संधि मिळाली आणि त्या संधीचा त्याने चांगला उपयोग करून घेतला. त्याच्या लक्षात आले की, मराठ्यांना मदत करणाऱ्या जिंजीच्या आसपासच्या छोट्या सत्ताधीशांना आधी काबूत न आणता जिंजी घेण्याचा आपण उद्योग केला ही मोठी चूक झाली. म्हणून त्याने प्रथम लहान लहान पाळेगारांना नरम करण्याचा उद्योग हाती घेऊन तो सिद्धीस नेला. पांडेचेरीच्या उत्तरेस १८ मैलांवर असलेला पेरुमुक्कलचा किल्ला त्याने घेतला; पालमकोटा घेतला, त्रिचनापल्लीच्या राजाला शरण आणले, वेलोरला वेढा घातला आणि तंजावरच्या शहाजीला मोगलांचा ताबेदार बनविले. इतकेच नव्हे तर ज्या या शहाजीने वेळोवेळी राजारामाला मदत केली होती त्याच्याकडून राजारामाविरुद्ध लढण्यासाठी एक हजार स्वार व चार हजार पायदळ पुरविण्याची अट मान्य करून घेतली. शहाजीने झुल्फिकारखानाला लिहून दिलेली शरणागति मोठी वाचण्यासारखी आहे.

"महान् थोर व बलवान् नबाब झुल्फिकारखान यांनी तंजावर घेण्याचा विचार केला असल्यामुळे मी तंजावरचा जमीनदार शहाजी असा करार करतो की, पूर्वीप्रमाणे मी आपले वर्तन न ठेविता ते सुधारीन, व इतःपर राजारामाशी कसलाही संबंध ठेवणार नाही व त्यास साहय करणार नाही. महावैभवशाली व परम बलाढ्य जी बादशाही सत्ता तिजपुढे विनम्र होऊन इमानेइतबारे सेवाचाकरी करीन. तसे करण्यात माझे कल्याण आहे. हे जाणून मी आपला आज्ञाधारक व मांडलिक आहे असे मान्य करतो व आपणांस दरसाल ३० लक्ष रुपये खंडणी देण्याचे कबूल करितो. त्याचप्रमाणे मी सांप्रत नक्त व जवाहीर व हत्ती मिळून २० लाख रुपयांचा ऐवज आपल्या हवाली करितो व बाकी दहा लक्ष रुपये राहतील त्याची फेड पुढील वर्षी करण्याची हमी घेतो. जिंजीवर स्वारी करण्यासाठी मी एक हजार

स्वार व चार हजार पायदळ देण्याचे कबूल केले होते. त्याऐवजी मी पालम-कोटा, सितोनर व तंग्र हे तीन किल्ले व त्या सभोवतालचा प्रांत देतो आणि राजारामाकडून घेतलेल्या कलमानरगुडी शिमुलती इत्यादि जागा मी नबाबाला खंडणी दाखल देण्याचे मान्य करितो. बादशाही तख्ताचा मी चाकर झालो आहे. त्या अर्थी माझ्या नावे बादशाही फर्मान येऊन मला 'राजा' ही पदवी व तंजावरची जमीनदारी देण्यात येईल अशी आशा आहे."

'आज्ञापत्रा'त रामचंद्रपंत अमात्याने राजनीति सांगितली आहे की, "कोणी एक स्थळ अथवा देश परनिग्रह प्राप्त झाला असता उपराळीयाचे बले निर्वाह करितों तो उपराळा आधी तोडावा, त्याउपरी त्याचा यत्न करावा, अशी नीती आहे." ती राजनीति या वेळी झुलफिकारखानाने वापरली आणि तंजावरकरासारखे जेवढे म्हणून राजारामाचे सहायक होते, ते 'दळवटून फन्ना केले;' व राजा-रामाचा उपराळा साफ तोडला. हिंदु सत्ताधीशांना निर्मूल करण्याचे झुलफिकार-खानाचे हे धोरण औरंगजेबाला मान्य होते. जिंजी घेण्याचाच तो एक भाग होता. त्यामुळें जिंजी घेण्यास दिरंगाई होत असली तरी औरंगजेबाने त्याला बडतर्फ केले नाही. त्यामुळे परत जेव्हा झुलफिकारखानाने जिंजीस वेढा घातला, तेव्हा राजारामाचे बळ फार घटले होते. धनाजी व संताजी यांची अंतर्गत यादवी, संताजीचा मृत्यु आणि बाहेरच्या मदतनिसांचा झुल्फिकारखानाने केलेला बीमोड यांमुळे तो फार असहाय झालेला होता. याउलट १६९३ च्या जानेवारीत मराठ्यांपुढे गयावया करीत कसाबसा निसटलेला झुल्फिकारखान वळी होऊन आता परतला होता.

आणखी एका कारणामुळे राजारामाची परिस्थिति नाजूक होऊन बसली होती. पन्हाळ्याहून जिंजीस राजाराम मोठ्या संकटाने लपतछपत एकटाच आला. त्याच्या बायका ताराबाई व राजसबाई या विशाळगडावर रामचंद्रपंत अमात्याच्या संरक्षणाखाली होत्या. थोरली जानकीबाई मोगलांनी रायगडला येसू-बाईबरोबर पकडून नेली असल्यामुळे तिचा प्रश्न एका अर्थी सुटलाच होता. पण जिंजीला राजाराम फार काळ एकटा राहू शकला नाही, मार्टिन म्हणतो—"प्रल्हाद निराजीने राजारामास खुशाली चैनीची चटक लाविली. पहिल्याच तीन महिन्यांत त्याने तीन चार बायकांशी विवाह जमविले. हिंदूंना कोणताही समारंभ म्हटला की त्यात नर्तक तर अवश्यच पाहिजेत. प्रल्हादपंताने या नर्तकांचे तांडे राजारामास आणून दिले. मग त्याच्या उपभोगास सीमा काय? सगुणाबाई ही यांच्यापैकीच राजारामाची 'वरकड' राणी होय. ती अत्यंत सुन्दर होती. तिच्यापासून राजारामाला कर्ण हा मुलगा व आणखी एक मुलगी झाली. बाईची देशमुखी मिळविण्यासाठी सूर्याजी पिसाळाने आपला मुलगा पदमसिंग

याला राजा कर्णाची बहीण म्हणून जी मुलगी करून घेतली ती हीच होय. याखेरीज १६९१ च्या सुमारास ताराबाई व राजसबाई यांना राजारामानें जिंजीस आणविले. जिंजीस तो राजचिन्हे धारण करून कारभार करू लागल्यावर येसूबाईने औरंगजेबाच्या छावणीतून त्याला निरोप पाठविला की, "आपला आमचा संकेत आहे तो परस्पर मनोमन आहे. आम्हास येथून हरतऱ्हा नेऊन नंतर आपले कुटुंबास व आम्हांस एकदाच चंजीस घेऊन जावे, तेव्हा एके ठिकाणी व्हावे असा मनात संकेत करून विशाळगडी त्रिवर्ग कुटुंब बायका ठेविल्या. त्यास आपण या चंदी प्रांती, बाया या प्रांतीं असे राहणे हे चांगले नव्हे, आपल्यास पुत्र जाहाला याचा आम्हांस आनंद वाटला; परंतु आपली व त्यांची भेट नाही हे बरे नव्हे. यास्तव आपण राजचिन्हादिक बाळगून पूर्वीचे चालीप्रमाणे सर्व व्यवहार करीत त्र आहा, त्याप्रमाणे करून, बाया विशालगडी ठविल्या आहेत त्या घेऊन जाव्या. यास अनमान करू नये."

भावजयीच्या निरोपाप्रमाणे ताराबाई वगैरेंना आणविण्याचे राजारामाने ठरविले. पण विशाळगड ते जिंजी हा मार्ग मोगलांच्या धामधुमीमुळे केवळ संकटमय होऊन गेला होता. तेव्हा असे ठरले की, जलमार्गाने राण्यांना आणावे. राजापूर येथे खंडोजी बल्लाळ याचे मामा लिंगो शंकर व विसाजी शंकर हे सावकारी करून होते, त्यांची तारवेही होती. त्यांच्याकडें हुजरे व कारकून पत्र देऊन रवाना केले. त्यांनी रामचंद्रपंत अमात्याकडे कळविले. पंताने विसाजी शंकर विश्वासू म्हणून त्याच्या बरोबर ताराबाई, राजसबाई व अंबिकाबाई यांची घाटाखाली रवानगी करून दिली. पुढे यशवंतगडचे बंदरातून जहाजात बसून सर्व मंडळी निघाली. बरोबर लिंगो शंकर होता. जलमार्गाने होनावर येथे उतरून तेथून सर्वजण पायवाटेने १६९१ च्या मार्चमध्ये जिंजीस सुखरूप पोचले.

त्या कठीण काळात हे साहस केवळ अघटित म्हटले पाहिजे. या स्वामीसेवेबद्दल राजारामाने लिंगो शंकर व दामाजी अनंत यांना वृत्तिपत्र करून दिले, त्यात या कामगिरीचे समर्पक वर्णन केले आहे. "स्वामी कर्नाटक प्रांती आलियावर राणीवास दुसरा वाडा यांची रवानगी रामचंद्रपंतांच्या पत्रावरून तुम्ही केली. तांब्राची ठाणी प्रांतांत बसली असता कोठें उमज पडो नेदिता युक्तीने संकटप्रसंगामध्ये आपले जहाज व लोक देऊन समुद्रातून येकेरीच्या राज्यातून होनावरास पाठविलेत; ती स्वामीसंन्निध सुखरूप पावली. तुम्ही एकनिष्ठता धरून राणीवासांची सेवा बहुत प्रकारे केली हे वर्तमान रामभट पटवर्धन व गणोजी झेंडे राणीवासाकडे होते त्यांनी विदित केले त्यावरून इनाम तुम्हांस नख्त करून दिले असे."

जिंजी येथील वास्तव्यात ताराबाईला शिवाजी हा मुलगा १६९६ च्या जूनमध्ये झाला आणि राजसबाईला सोयराबाई ही मुलगी १६९२ च्या जानेवारीमध्ये झाली. राजाराम कुटुंब कबिला करून आनंदात राहू लागला. हे ठीक होते. पण

झुल्फिकारखानाच्या वेढ्याचे संकट दत्त म्हणून पुढे उभे राहिल्यावर या कुटुंब कबिल्याचीच मोठी चिंता निर्माण झाली; Children sweeten labours but they make misfortunes more bitter (मुलांमुळे श्रम गोड वाटतात पण संकटे जास्तच कडू होतात) असे बेकन म्हणतो ते काही खोटे नाही.

अशा बिकट परिस्थितीत राजारामाचे हे भाग्य म्हटले पाहिजे की, जिंजीला वेढा घालण्यास झुल्फिकारखानासारखा बोटचेपा आणि भुसभुशीत माणूस मिळाला. याचा अर्थ असा नव्हे की तो भ्याड किंवा बेइमान किंवा लोभी होता. जात्या तो सौम्य प्रकृतीचा मनुष्य होता. औरंगजेबाप्रमाणे करडा, टोकाला जाणारा किंवा इरेला पडणारा नव्हता. या बाबतीत त्याचे राजारामाशीच अधिक साम्य होते. म्हणूनच त्याने रायगड घेताना येसूबाईला प्राणाचे व अब्रूचे रक्षण करण्याचे जे वचन दिले ते मोठ्या इमानाने पाळले. खानाच्या या माणुसकीमागे राजकारणही बरेच होते. औरंगजेब हा आता थोड्या दिवसांचाच सोबती आहे, त्याच्यामागे त्याच्या मुलांत शिरस्त्याप्रमाणे वारसाहक्कासाठी लढाया होणार, त्यात शहाजाद्यांची नेहमीप्रमाणे मुंडकी उडणार, त्या क्रांतिकाळात मराठ्यांचे आपणाला साहाय्य असावे अशा लांबच्या हिशेबाने त्याने जिंजीचे राजकारण चालविले होते.आजपर्यंत महाराष्ट्रात त्याची बरीच वर्षे गेली होती. त्यामुळे येथील भूप्रदेश, हवापाणी, माणसे यांची त्याला खडान्‌खडा माहिती झाली होती. पुढेमागे औरंगजेबाच्या मृत्यूनंतर दक्षिणेतच स्थायिक होण्याचा त्याचा विचार चालला होता. मार्टिन तर म्हणतो की, 'औरंगजेबाच्या मृत्यूनंतर गोवळकोंड्याचे राज्य आपण व विजापूरचे राज्य राजाराम यांनी वाटून घ्यावयाचे असा त्याचा गुप्त करार राजारामाशी झाला होता." अशा स्थितीत दक्षिण देशचे जमीनदार जे मराठे, त्यांना मरायला टेकलेल्या बादशहाच्या केवळ हट्टासाठी, कायमचे दुखविणे त्याला परवडण्यासारखे नव्हते. तेव्हा मराठ्यांशी त्याने लढाई चालू ठेविली होती खरी, पण ती अशा चातुर्याने की बादशहाचा ठपका तर येऊ नये पण मराठ्यांचाही वाईटपणा घ्यायची पाळी येऊ नये.

राजाराम व झुल्फिकारखान यांचे हे आतले सूत त्या काळी जगजाहीर होते. मार्टिनने म्हटले आहे– "झुल्फिकारखानाचे व राजारामाचे अंत:सूत बनले आहे. म्हणून जिंजी किल्ला काबीज करण्याची खानाची इच्छा नाही." "झुल्फिकारखान मराठ्यांना अनुकूल असल्याची दाट बोलवा ऐकू येते." "जिंजीच्या दक्षिण बाजूने मोगलांनी किल्ल्यावर जोराचा मारा चालवला आहे. त्या बाजूने मराठ्यांस जाणारी रसद बंद करण्याकरिता निवडक फौजांचा तांडा बसविला आहे. पण राजारामाशी खानाचे सूत असल्यामुळे रात्रीच्या समयी किल्ल्यास खुशाल सामान जाते." "झुल्फिकारखान व राजाराम यांचे अंत:स्थ सूत आहे असा जो बाहेर बोभाटा चालतो, त्यास पोषक अशा गोष्टी दिसून येतात. झुल्फिकार

खानाचे वकील खुशाल राजारामाकडे जात येत असतात. उभयतांच्या वाटाघाटी चालतात. त्या वाटाघाटी काही गुप्त व राजरोस घडत आहेत." झुल्फिकारखानाच्या सैन्यांतील राव दलपत याच्या पदरी असलेला भीमसेन म्हणतो— "झुल्फिकारखानाने मनात आणले असते तर तो जिंजीस पोचला त्याच दिवशी तो किल्ला हस्तगत करू शकला असता." मल्हार रामरावानेही म्हटले आहे की खानाने राजारामाकडे संधान लाविले की, "आमच्या गळा तुम्ही पडू नये. तुमच्या गळा आम्ही पडत नाही. फौज फौजेची गाठ पडली असता बेशक लढाई करावी. मोड होईल त्याचा पाठलाग करू नये. आणि तुम्हांकडील फौजेने आम्हासी लांडगेतोड करीत असावे." मद्रासच्या इंग्रजांनाही ही गोष्ट माहीत होती. "बादशहाने झुल्फिकारखानाला जिंजी घेण्याबद्दल अनेक वेळा लिहिले आणि जिंजी घेणे व मराठ्यांचा नाश करणे ही त्याच्या अगदी आवाक्यातली गोष्ट होती. पण त्या ऐवजी हे उघड दिसते की त्याने मराठ्यांशी संगनमत केले आहे; आणि दरबारातल्या त्याच्या हितशत्रूंचे प्रयत्न कितीही चालू असले, तरी खानाला येथे कायम ठेवण्यात त्याचा बाप यशस्वी झालेला आहे." १६९३ च्या जानेवारीत जर्जर झालेल्या झुल्फिकारखानाचा समूळ उच्छेद न करता वांदीवाशला परत जाऊ देण्याचा सामोपचार जो राजारामाने दाखविला, त्यामागील राजकारण हे असे होते.

पण जिंजीचे प्रकरण लांबविण्यात झुल्फिकारखानाचे केवळ राजकारणच नव्हते. मोहीम लांबवणे हा मोगल सेनापतींचा मुळी परंपरागत शिरस्ताच होता. कारण मोहीम संपवल्याचा परिणाम इतकाच झाला असता की, खानाची रवानगी दुसऱ्या मोहिमेवर झाली असती व बरेचसे सैन्य बेकार म्हणून निकालांत काढावे लागले असते. औरंगजेबाचे आदरणीय मामासाहेब शायिस्तेखान यांच्या शब्दांत, "ही आपत्ति आपण आपल्यावर काय म्हणून ओढवून घ्यावी. परमेश्वराच्या लेकरांचे भले व्हावे हाच ना आपला हेतु. मग बढतीची आशा धरून काम रेंगाळत ठेवावे हे बरे. याच पद्धतीने काम करण्याचा प्रयत्न करावा." तात्पर्य काही सौजन्य, काही राजकारण, काही काळकाढूपणा या सर्वांचा परिणाम असा झाला की झुल्फिकारखानाने सात वर्षे जिंजीचे घोंगडे भिजत ठेवले. त्याच्या या वृत्तीची जेथे फ्रेंचांना, मराठ्यांना व इंग्रजांना माहिती होती, तेथे ती औरंगजेबाला नसती तर त्याला वेडाच म्हणावे लागले असते. त्याला सर्व बातम्या कळत होत्या पण त्याचा नाइलाज झाला होता. त्याने हताशपणे उद्गार काढले की, "ही मोहीम आटपून लवकरच उत्तरेत परत जावे असा मी विचार केला होता. पण माझ्या सेनापतींनी मला आपले खेळणें बनविले आहे."

अशा परिस्थितीत, संताजीच्या मृत्यूनंतर अवघ्या एक महिन्याने, ८ ऑगस्ट १६९७ रोजी राजारामाने झुल्फिकारखानाशी तहाच्या वाटाघाटी करण्यासाठी

आपला दासीपुत्र राजा कर्ण याला शंकराजी मल्हार, गिरसोजी यादव व बाबाजी प्रभू यांच्याबरोबर पाठविले. संताजीच्या खुनानंतर अवघ्या महिन्याभरात, त्याला हरामखोर ठरवून त्याचे पारिपत्य करविणाऱ्या 'स्वामी'वर शत्रूशी वाटाघाटी करण्याची वेळ येते ही एकच गोष्ट संताजीचा कार्यभाग जिंजी लढविण्यात केवढा होता हे सिद्ध करण्यास काही अंशी तरी पुरेशी आहे. माणूस नसला म्हणजे त्याची किंमत जाणवते ती अशी. या तहाच्या वाटाघाटीत अटी अशा होत्या की, राजा कर्णाला वार्षिक एक लाख चक्रांचा मामला देण्यात यावा; राजारामाने जिंजी झुल्फिकारखानाच्या हवाली करावी, त्याने वेलोरला जावे, राजारामाची मोगलांकडे कैदेत असलेली बायको जानकीबाई त्याच्याकडे पाठविण्यात यावी. पण झुल्फिकारखानाला तह करण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळे त्या अटी त्याने आपल्या मालकाकडे रवाना केल्या.

तहाच्या वाटाघाटी चाललेल्या पाहून औरंगजेब अतिशय संतापला. वाटाघाटींचे हे एरंडाचे गुऱ्हाळ म्हणजे खानाच्या काळकाढूपणाचीच एक नवी आवृत्ति आहे असे त्याला वाटले. त्याने मुळीच विलंब न करिता जिंजीवर हल्ला करून तो किल्ला घ्यावा असा दरडावणीचा हुकूम खानाला पाठविला. दरबारात खानाचे हितचिंतक होते, त्यांनीही खानाला खाजगी रीत्या कळविले की किल्ला न घेतला तर खानाची अतःपर बादशहापुढे शोभा राहणार नाही. त्याचा बाप आसदखान यानेही त्याला लिहिले की, " या उपरी तुम्ही मर्दुमी करून कजाखी करीत जावी. बादशहाची गैरमर्जी होईल. इतराजीत येता. मराठी फौज तुम्हास लढाईने हाती लागत नाही हे सर्व पादशहाचे ध्यानी भरले. परंतु चंदीवरच येलगार करून किल्ला सत्वर फत्ते करावा. तरीच बरी गोष्ट." अशा प्रकारे सगळीकडून जेव्हा पराण्या बसू लागल्या, तेव्हा आपला अडेलतट्टूपणा सोडून झुल्फिकारखानाने राजा कर्णाला ऑक्टोबरांत निरोप दिला व जिंजीस वेढा घातला.

जिंजी हा एकच किल्ला नाही. पश्चिमेस राजगिरी, उत्तरेस कृष्णगिरी आणि दक्षिणेस चंद्रायणदुर्ग असे ते तीन स्वतंत्र आणि बळकट किल्ले आहेत. त्या प्रत्येकाला स्वतःची तटबंदी आहे व पुन्हा ते एका मजबूत तटबंदीने एकमेकाशी जोडलेले आहेत. शिवाय राजगिरी व चंद्रायणदुर्ग यांना जोडणाऱ्या तटबंदीस सैतानदरी नावाचा एक दरवाजा आहे. तो सध्या दगडमातीने बंद केला होता. जिंजीला वेढा घातल्यानंतर झुल्फिकारखानाने आपल्या साहाय्यकांना जागा वाटून दिल्या. उत्तरेकडच्या कृष्णगिरीवर राव दलपत बुंदेला होता. दक्षिणेकडच्या चंद्रायणदुर्गावर दाऊदखान पन्नी होता व सैतानदरी दरवाजापुढे झुल्फिकारखान होता. अशा प्रकारे हो ना करता झुल्फिकारखानाने जिंजीला एकदा वेढा तर घातला खरा.

झुल्फिकारखानाची मराठ्यांना आतून सहानूभूति होती हे खरे, पण त्याच्या हाताखालचे राव दल्पत व दाऊदखान हे मराठ्यांचे कट्टे दुष्मन होते. राव दल्पत हा हिंदु व राजपूत खरा, पण राजपुताचे इमान त्याने पूर्वीच्या राजा जयसिंगाप्रमाणेच औरंगजेबासारख्या महायवनाच्या पायावर वाहिले होते. दुसरा दाऊदखान पन्नी हा तर शुद्ध खवीस होता. त्याच्या पराक्रमाबद्दल प्रश्नच नव्हता, पण त्यांच्या धमन्यांतून रक्ताऐवजी क्रौर्यच वाहत असावे असे वाटण्याइतका दुष्टपणा त्याच्या नसानसांत भिनला होता. मनूचीने त्याच्या अनेक गोष्टी दिल्या आहेत. त्याच्या बायकोला दोन वेळा मुलीच झाल्या. आता मुलीच्या जन्मामुळे एखाद्या बापाचा हिरमोड झाला तर ते समजू शकते. पण दाऊदखानाचे सारेच जगावेगळे. त्याने संतापाने त्या कोमल अर्भकांचे तलवारीने तुकडे तुकडे करून टाकले! त्याला कुत्री, माकडे, ससाणे यांची फार आवड होती. कुठलाही अपूर्व प्राणी पाहिला की पडेल ती किंमत देऊन त्याने तो आपल्या शिकारखान्यात दाखल केलाच म्हणून समजावे. एकदा एक असेच कौतुकाचे माकड त्याने पाळले. पण काही आजार होऊन ते मेले तेव्हा त्याच्यावर देखरेख करणाऱ्या नोकराला त्याने सुळी दिले. आणि दुसऱ्या नोकराने आजारी कुत्र्याच्या किंकाळ्या कानांनी नीट ऐकून आपणांस कळविल्या नाहीत म्हणून त्याचे कान कापून टाकले. एक सुरेख कुत्रा त्याने मागविला. तो आणला जात असता प्रवासात त्याची बडदास्त सरकारी पाहुण्याप्रमाणे ठेवण्यात आली. त्याला बसायला पालखी, आंघोळ घालायला नोकर, माशा वारायला सेवक अशा थाटात त्या सारमेयश्रेष्ठाचे आगमन झाल्यावर दाऊदखानाने 'अरे माझ्या भावा, अरे माझ्या मित्रा असे' म्हणून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला! त्याच्यापाशी दोन विक्राळ जंगली कुत्रे होते. त्यांना बैलांवर व भिकाऱ्यांवर सोडून त्यांच्या चिंधड्या उडविताना पाहणे म्हणजे दाऊदखानाचा ब्रह्मानंद होता. एकदा हा प्रयोग आपल्या सैनिकावर करावयाची त्याला लहर आली. पण सैनिकांनी कुत्र्याची खांडोळी केली व दाऊदखान वेडा झाला म्हणून त्याला पागलखान्यात ठेवण्याची तजवीज चालविली तेव्हा दाऊदखानाने त्यांचे पाय धरले व त्यांना आवरले. वेलोरचा किल्ला त्याने जिंकला तेव्हा ईश्वराला संतुष्ट करण्यासाठी आपल्या तावडीत सापडलेले सारे चोर व दरोडेखोर त्याने खालच्या पाण्याच्या खंदकांतील सुसरींच्या तोंडी फेकून दिले. सुसरीही संतुष्ट, देवही संतुष्ट व दाऊदखानासारखा दानवही संतुष्ट. मद्रासच्या इंग्रजाचा त्याच्याशी बराच संबंध आला. त्यांनी त्याच्याबद्दल मार्मिक अभिप्राय लिहून ठेविला आहे. "तो जेव्हा नशापाणी करीत नाही तेव्हा अगदी बेभरवशाचा असतो. जेव्हा दारूने धुंद होतो तेव्हा फार मोकळा व उदार असतो. कसलेही क्रूर काम तडाख्यासरशी करण्याच्या हातोटीमुळे पूर्वीच्या व सध्याच्या बादशहाच्या गळ्यातला तो जणू ताईत झाला आहे."

ज्याचे क्रौर्य इतके की पोटच्या पोरींची खांडोळी करताना तो कचरला नाही तो हा विक्षिप्त व निर्दय इसम मराठ्यांना काय दया दाखविणार हे उघडच होते. या दाऊदखानाच्या मनात जिंजीचा किल्ला घेऊन दाखविण्याची व झुल्फिकारखानावर कडी करण्याची मोठी ईर्ष्या होती. त्याच्यापाशी तोफखाना वगैरे काही नव्हते. पण केवळ शौर्याने त्याने जिंजीपासून दीड मैलांवर असलेली चमारटेकडी काबीज केली. मराठ्यांना खरा धोका त्याच्यापासून होता.

पण दाऊदखानाचे शौर्य दोन कारणामुळे निकामी झाले होते. एक तर तो अट्टल दारुडा होता. दारू पिऊन बहुतेक काळ तो तर्र असे आणि दुसरे म्हणजे त्याचा वरिष्ठ झुल्फिकारखान हाच मुळी घरभेदेपणामुळे मराठ्यांचा 'खबऱ्या' बनला होता. दाऊदखान केव्हा हल्ला करणार आहे, कसा करणार आहे, कुठून करणार आहे, या सर्वांची बित्तंबातमी तो आधीच मराठ्यांना पोचवीत असे. त्यामुळे मराठे हुशार होऊन बसलेले असत. म्हणून अनेक वेळा, झुल्फिकारखानाने पसरून ठेवलेल्या केळ्यांच्या सालीवरून बिचारा दाऊदखानच घसरून पडे व त्याची मोठी फजिती होई. दाऊदखानाने निवडक सैन्यानिशी मराठ्यांवर एकदा हल्ला चढविला, पण मराठ्यांना त्याची वर्दी आधीच लागली होती. त्यांनी उलट दाऊदखानाचीच दोनशे उत्तम माणसे जाया केली. त्याचा स्वतःचा हत्तीसुद्धा जखमी केला. तेव्हा दाऊदखानाने आपला तळ आणखी लांब हलविला. पण येथेही बेटावलच्या जंगलातून मराठे रात्री त्याच्यावर हल्ले चढवीतच होते आणि लूटमार करीतच होते.

पण असे किती दिवस चालणार? वेढा पक्का बसला होता. औरंगजेबाचा हुकूम निर्वाणीचा होता. झुल्फिकारखानाच्या सौजन्याला अंत होता. मोगलांशी झगडायला महाराष्ट्रातून फौज येत नव्हती. सुटकेचा काही तरी उपाय करायला हवा होता. नाही तर सर्वनाश अटळ होता. वेलोरच्या सुसरीप्रमाणे वखवखलेला दाऊदखान आपला जबडा वासून बसला होता. राजारामाला त्याच्या कबिल्यासह जिवंत पकडू अशी त्याला उमेद होती.

अशा दारुण परिस्थितीत राजारामाच्या सेवेला उपस्थित झाला तो म्हणजे खंडो बल्लाळ चिटणीस होय. झुल्फिकारखानाच्या सैन्यात कोणी मराठे असतील तर त्यांच्या मदतीने वेढा पार करून जाणे एवढाच पर्याय राहिलेला होता. खानाचा त्याला अर्थात् विरोध नव्हताच. त्याच्यावर ठपका न येता राजाराम सुटून जावा हे त्यालाही हवेच होते, म्हणजे आजपर्यंत राखलेल्या राजारामाच्या स्नेहसंबंधातून तो सुखरूप उत्तीर्ण झाला असता. शोध करिता मोगल सैन्यात गणोजीराजे शिर्के हे जिंजीच्या नैर्ऋत्येला मोर्च्यावर असल्याचे दिसून आले. तेव्हा त्याच्याशी राजकारण करण्याचे खंडो बल्लाळाने ठरविले.

हे कार्य परम दुर्घट होते. गणोजीराजे शिर्के हे प्रत्यक्ष शिवाजीमहाराजांचे जावई होते. महाराजांची मुलगी राजकुंवरबाई ही त्यांना दिलेली होती. शिवाय, त्याची बहीण भिऊबाई ऊर्फ येसूबाई ही संभाजीची बायको होती. अशा प्रकारे शिर्क्यांचा व भोसल्यांचा आप्तसंबंध जवळचा होता. पण संभाजीच्या कारकीर्दीत शिर्के मंडळींना मनस्वी तोशीस पोचली. त्या छळाला कंटाळून गणोजी शिर्के, रामोजी शिर्के, देवजी शिर्के वगैरे शिर्के मंडळी मोगलांकडे निघून गेली. संभाजी-वर व पर्यायाने भोसले कुटुंबावर त्याचा राग फार होता. अशा स्थितीत त्याच्या तडाख्यात सापडलेल्या राजारामासारख्या भोसले कुलातल्या शिरोमणीला गणोजी निसटून जाण्यास मदत करणे प्रायः दुरापास्त होते. या बाबतीत त्याचे मन वळ-विणे म्हणजे दगडाला पाझर फोडण्यासारखे किंवा वाळूतून तेल काढण्यासारखेच होते आणि तसेच झाले.

खंडो बल्लाळाने आपल्या विषयाचे सूतोऽवाच करताच पहिल्या सपाट्यासरशी गणोजी राजे बोलले की, "जसे आमचे शिरकाण केले, तसे भोसले यांचा निर्वंश झाल्यास चिंता नाही हे फार चांगले होते!" तेव्हा खंडो बल्लाळाने त्याला स्वतःचे उदाहरण देऊन समजूतीच्या चार गोष्टी सांगितल्या. तो म्हणाला, "या समयास तुम्ही बोलता हे योग्य नाही. तुमचे शिरकाण केले तसेच आमचे तीन पुरुष हत्तीचे पायाखाली मेले, तेही गेले. परंतु हिंदूंच्या दौलतीकरिता आम्ही झटतच आहो. ज्यास जसा प्रसंग पडेल तसे झटतच आहेत. आणि तो तुम्ही तो आप्त शरीख आहा. या समयास महाराज व कबिले काढून द्यावे. तुमचे भाच्या-चेच राज्य. या समयास राजारामसाहेब यांस कुटुंबसुद्धा पार करून दिल्यास तुमची कीर्ति होईल." तेव्हा गणोजी बोलला, "तुम्हांस दाभोळचे वतन दिले ते आम्हांस द्यावे. म्हणजे आम्ही मराठे आहो, मराठी राज्य कसेही सुटावे, वृद्धीस जावे हेच आम्हास श्रेयस्कर. पुढे परंपरेने कार्यास तेच येईल. हे आमच्या कार्यास किती दिवस येणार?" त्यावर खंडो बल्लाळाने क्षणाचाही विलंब न लावता उत्तर केले, "स्वामीकार्याहून वतन व जीवित्व काही आम्हांस अधिक नाही. सर्व अर्थ आमचे स्वामीचे पाय आहेत." असे म्हणून त्याने तात्काळ वतनाचे पत्र करून दिले व मागाहून राजपत्र करून देण्याचे आश्वासन दिले. गणोजीने आणखीही अट घातली की, "मोहितेही आप्त. या राजकारणात त्यास घेतले पाहिजे. यास्तव त्यास रत्नागिरी तालुक्यात कुटरी गाव आहे तो इनाम करून द्यावा. आम्हास भोर तालुक्यात तीन गाव व वतन करून द्यावे." तेही खंडो बल्लाळाने कबूल केले व शिर्क्यांकडचे राजकारण अखेर शेवटास नेले.

हिंदूंच्या दौलतीसाठी स्वार्थत्याग करण्याचे प्रवचन खंडो बल्लाळाने अगदी बेंबीच्या देठापासून केले असले तरी ते गणोजीराजांना कितपत पटले असेल हा प्रश्नच आहे. पण जेव्हा का दाभोळचे वतन ताबडतोब देण्यास तो तयार झाला,

तेव्हा मात्र त्याचे म्हणणे खरे असल्याचा त्यांना साक्षात्कार झाला. याचे कारण एकतर, उपदेशापेक्षा स्वार्थत्यागाचे उदाहरणच अधिक बोलके असते हे तर झालेच; पण त्याहीपेक्षा वतनाच्या गळाला लागणार नाही असा कोणता मराठी मासा त्या काळात होता बरे ? शिर्क्यांच्या या दाभोळच्या वतनाच्या मागे इतिहास होता. गणोजीराजांचे वडील पिलाजीराजे शिर्के यांना शिवाजी महाराजांनी आदिल-शाहीतून स्वराज्यात घेतले, त्या वेळी त्यांच्या शिरस्त्याप्रमाणे हे दाभोळचे वतन अमानत केले म्हणजे सरकारजमा करून टाकले. पिलाजीराजांची स्वराज्यावर माया बसावी म्हणून त्यांच्या मुलाला आपली राजकुंवरबाई आणि आपल्या मुलाला त्यांची भिकुबाई करून घेऊन दुहेरी व्याहीसंबंध प्रस्थापित केला. पण पिलाजी-राजे पराक्रमी असले तरी महाराजांचा उदात्त ध्येयवाद त्यांना पेलण्यासारखा नव्हता. वाडवडिलांपासून चालत आलेले वतन आपण गमाविले या जाणिवेने अस्वस्थ होऊन त्यांनी महाराजांना लिहिले – "तरी दाभोळचे वतन सरकारात अमानत जाहले. हे आमचे वतन पुरातन. वाडवडिल खात आले. इमानेइतबारे तख्ताची चाकरी करीत आले. जे वडिली मिळविले ते जतन करावे हे लौकिकास योग्य होय. सांप्रतही आम्ही महाराजांची चाकरी इमाने करीत आहोत. तरी दाभोळचे आमचे वतन आम्हास परतोन द्यावे." व्याह्यांच्या या पत्राने महाराजांना मोठा पेच पडला. वतन द्यावे तर राज्याच्या दंडक सुटतो; न द्यावे तर व्याही रुसतात. तेव्हा 'आशां कालवतीं कुर्यात्' या प्रसिद्ध न्यायाने महाराजांनी व्याह्यांशी राजकारण केले व हा बिकट प्रश्न लांबणीवर टाकला. त्यांनी व्याह्यांना उत्तर पाठविले– "दाभोळचें वतन जे अमानत जाहलें ते परतोन मिळावे म्हणोन लिहिले. तरी आपले राज्यात वतने देण्याचा दंडक नाही. परंतु तुम्ही स्वामीकार्य केले व सोयरीकही तुम्हासी केली. तरी चिरंजीव राजकुंवरबाईस पुत्र होईल तेव्हा ते देशमुखी वतन आपण तुम्हांस देऊ." दरम्यान महाराज कैलासवासी झाले. पिलाजी राजेही गेले. गणोजीराजे मोगलांकडे गेले. वतन राजारामने खंडो बल्लाळाला दिले ते आपले दाभोळचे पुरातन वतन. आज, गणोजी राजांनी खंडो बल्लाळाला चिमटचात पकडून, त्याच्याकडून काढून घेतले. गणोजीराजे वडिलांच्या ऋणांतून मुक्त झाले. यात गणोजीराजांचा दोष काय ? सर्वसामान्य मराठ्यांची ती प्रवृत्तीच होती.

गणोजी राजांना वळविण्यासाठी खंडो बल्लाळाने आपल्या दाभोळच्या वतनावर पाणी सोडले ही गोष्ट ऐतिहासिक आहे; बखरीतील कल्पित कथा नव्हे. १६९८ च्या जानेवारीत राजारामाने शिर्क्यांना या वतनाची सनद करून दिली त्यात या गोष्टीचा स्पष्ट निर्देश आहे. राजाराम म्हणतो– "सुभा मामले दाभोळ यासी आज्ञा केली ऐसी जे, राजश्री रामाजी राजे व गणोजी शिर्के यानी स्वामी संनिध येऊन विनंती केली की, आपले वतन देशमुखी हमजाबाज व जाफराबाज

मामले मजकूर येथील पूर्वापार होते. त्यास वतनावरी आपला गुमास्ता होता. त्यास मुसलमान पादशहा होते. त्यांचे वेळेस मामले मजकुरी हवालदार होता. त्याने गुमास्त्यास कुटुंबासहित दस्त करून समुद्रामध्ये बुडविला. त्या दिवसापासून वतन आपले अमानत जाले. त्यास बहुत दिवस जाले तरी स्वामी धर्म प्रभू आहेत तरी स्वामींनी कृपाळू होऊन आपल्या वतनाचा जीर्णोद्धार करून आमचे वतन आम्हांस देविले पाहिजे म्हणोन विनंती केली. यैसियास हमजाबाज व जाफराबाज मामले मजकूर येथील देशमुखीचे वतन राजश्री खंडो बल्लाळ प्रभु याला दिले होते. त्यासी सांप्रत मनास आणिता देशमुखीचे वतन शिर्के यांचे खरे जाले. त्याजवरी या उभयतावरी स्वामी कृपाळु होऊन देशमुखीचे वतन खंड प्रभु याला दिले होते ते दूर करून सिरकियांची देशमुखी सिरके यास अजरामऱ्हामत करून दिली असे."

आजपर्यंत संताजी व धनाजी यांच्या उग्र क्षात्रतेजाने राजारामाचा बचाव झाला होता. पण या वेळी धनाजी दूरदेशी होता आणि संताजी मरण पावला होता. अशा त्या कठीण समयी राजारामाला संकटातून उत्तीर्ण केले ते खंडो बल्लाळांच्या अतुल स्वार्थत्यागाने होय. त्याचे सबंध जीवन हा स्वार्थत्यागाचा वस्तुपाठ आहे. त्याचा बाप, त्याचा चुलता व त्याचा भाऊ यांना संभाजीने रागाच्या भरात हत्तीच्या पायी दिले. पण त्याचा विषाद न मानता मनोभावे संभाजीची त्याने सेवा केली. गोव्याच्या स्वारीत मांडवी नदीत वाहून जात असलेल्या संभाजीला त्याने घोड्यासकट बाहेर काढले व वाचविले व संभाजीनेही दिलदारपणे त्याला चिटणिशीचा व पालखीचा बहुमान दिला. संभाजीवर संगमेश्वरी कल्पान्त कोसळला, तेव्हा खंडो बल्लाळ त्याच्या बरोबर होता. संभाजीनंतर राजारामाबरोबर तो संकटे सोसून कर्नाटकात आला व तेथेही त्याने त्याची निष्ठेने सेवा केली. अखेर त्याच्या सुटकेसाठी वतनावर पाणी सोडण्याची वेळ आली तेव्हा आनंदाने तो त्यास तयार झाला. हा त्याग सामान्य नव्हे. लहान असो की मोठी असो, कोणतीही कामगिरी वतन मिळाल्याशिवाय कोणी मराठा ज्या काळात उठवीत नसे, वतनासाठी मोगलांकडून मराठ्यांकडे व मराठ्यांकडून मोगलांकडे फितूर व्हायला ज्या वेळी भल्याभल्यांना दिक्कत वाटत नसे. फार काय, वतनासाठी सूर्याजी पिसाळाप्रमाणे मुसलमान होऊन एका जातीच्या दोन जाती करायला माणसे तयार असत, त्या काळी स्वतःचा कसलाही फायदा नसताना केवळ स्वामीहितासाठी वतनावर उदार होणारा खंडो बल्लाळ हा एक केवळ चमत्कार म्हटला पाहिजे. "चिटणीस म्हणजे छत्रपतीचा बहिश्चर प्राण" ही उक्ति बाळाजी आवजीनंतर त्यानेच सार्थ केली. या मोगली आक्रमणाच्या प्रलयसागरात मराठे तरले ते, संताजी सारख्याच्या शौर्याप्रमाणेच, खंडोबल्लाळासारख्याच्या स्वार्थत्यागानेही होय, ही गोष्ट विसरता येणार नाही.

शिर्के वळल्यानंतर राजारामाच्या सुटकेचा प्रश्न राहिला नाही. शिर्के व मोहिते यांनी राजारामास बुरख्याच्या पालखीत बसवून आपल्या आप्तांच्या बायका असे सांगून स्वतःच्या गोटात आणले. दुसरे दिवशी शिकारीचे निमित्त करून शिर्के बाहेर पडले व त्यांनी राजारामास वेलोरला पोचविले. वेलोरचा किल्ला या वेळी मराठ्यांच्या ताब्यात असून त्यावर जावळीच्या चंद्रराव मोऱ्याचा नातू मानसिंग मोरे किल्लेदार होता. त्याने राजारामाची सर्व व्यवस्था ठेवली. स्वतः खंडो बल्लाळानें या बाबतीत साक्ष दिली आहे. "मग चंदीच्या मुक्कामी ताम्रांनी चंदी सिकंदा (हैराण) जाहली. राजश्री स्वामींस कुटुंबासहवर्तमान बाहेर निघावे-सारिखा प्रसंग जाहला. तांब्राचे मोर्चे चहुकडे. ते वेळेस राजश्री गणोजीराव शिर्के तांब्राकडे होते. त्यांनी त्या संकटी एकनिष्ठता धरून श्रमसायास करून राजश्री चंदीहून बाहेर काढून येलुरास नेऊन पोहचविले."

२६ डिसेंबर सन १६९८ रोजी राजाराम जिंजीतून निसटला. तो गेल्यानंतर जिंजी काबीज करणे ही अगदी सहजातली गोष्ट होती. पक्षी उडून गेल्यानंतर रिकामा पिंजरा काबीज करण्यासारखेच ते होते. पण तरीही राजारामाचा कबिला अद्याप जिंजीतल्या राजगिरीवर होता. तो सुटेपर्यंत राजारामाप्रमाणे झुल्फिकार-खानाचाही जीव भांड्यात पडणे शक्य नव्हते; कारण तो जेव्हा सुरक्षित राजा-रामापाशी जाईल तेव्हाच झुल्फिकारखान आपल्या वचनातून मुक्त होणार होता. म्हणून जंगल जाळताना पक्ष्याचे एकच घरटे राखावे त्याप्रमाणे जिंजी घेताना कबिला राखणे खानाला भाग होते. त्याने चातुर्याने मराठ्यांचा वैरी असलेल्या दाऊदखानाला दूरच्या दक्षिणेकडील चंद्रायणदुर्ग घेण्याचे काम सांगितले व लांब ठेवले व उत्तरेकडच्या दरवाजावर असलेला मराठ्यांचा दुसरा दुश्मन राव दलपत याला आपणाकडे बोलावले. अशी तजवीज करून जिंजीवर एलगार करण्याचे नाटक खानाने सुरू केले. चंद्रायणदुर्गाच्या खाली असलेल्या भुयाराचा शोध लाऊन दाऊदखानाने चंद्रायणदुर्ग काबीज केला व त्याने कृष्णगिरीकडे कूच केले. याच वेळी राव दलपतने उत्तरेकडील तटावर चढून आत प्रवेश केला इतक्यात राजगिरी व चंद्रायणदुर्ग यांना जोडणारा सैतानदरी नावाचा दगडमातीने बंद केलेला दरवाजा होता. तो फोडण्यात झुल्फिकारखानाला यश आले. तोही किल्ल्याच्या तटात आला व राव दल्पतला येऊन मिळाला. मोगलांचा जोर पाहून कृष्णगिरी किल्ला त्यांना शरण आला. आता सर्वात उंच राजगिरी किल्ला तेवढा जिंकायचा राहिला होता तो जिंकताना मात्र राव दलपतला किंवा दाऊदखानाला झुल्फिकारखानाने येऊ दिले नाही. तो स्वतः राजगिरीच्या दरवाजाजवळ ठाणे देऊन राहिला व आपला विश्वासू हस्तक रामसिंग हाडा याला राजगिरीच्या मागच्या बाजूने दरडी चढून हल्ला करण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे राम-सिंगाने दरडी पार करून तटास शिड्या लावल्या व राजगिरीत प्रवेश केला.

राजारामाचा कबिला व शिबंदी खानास शरण गेली. अशा प्रकारे २७ डिसेंबर-पासून २ जानेवारीपर्यंत जिंजीचा किल्ला काबीज करण्यात आला. त्या दिवशी मकर संक्रांत होती. भीमसेन म्हणतो, "माझ्या असे ऐकण्यात आले की ज्याने ज्याने म्हणून जिंजीचा किल्ला घेतला, तो संक्रांतीच्या दिवशीच होय. योगायोग असा की जिंजीचा किल्ला हा संक्रांतीच्या दिवशीच मोगलांच्या ताब्यात आला."

किल्ल्यातील सर्व व्यवस्था लावण्यासाठी झुल्फिकारखानाने दुसऱ्या दिवशी किल्ल्यात मुक्काम केला. इतर अमीर–उमराव आपापल्या निवासस्थानी परतले. त्या दिवशी राजारामाचा कबिल्याची म्हणजे ताराबाई व तिचा मुलगा शिवाजी, राजसबाई व तिची मुलगी सोयराबाई–यांची सुटका झाली. हे काम सोपे नव्हते. झुल्फिकारखानाची राजारामाबद्दल सहानुभूति होती. पण तेवढेच. त्या पलीकडे सगळे मोगल मराठ्यांना पाण्यातच पाहात होते. किल्ल्यातून जरी ते निघून गेले असले तरी किल्ल्याबाहेर सर्वत्र त्यांचीच ठाणी होती. अशा स्थितीत हे अचाट साहस अंगावर घेऊन त्या राजस्त्रियांना संकटातून पार करून नेले ते गिरजोजी यादवाने होय.

हा गिरजोजी यादव खंडो बल्लाळ प्रमाणेच छत्रपतींचा निष्ठावंत सेवक होता. राजारामाच्या कारकीर्दीत, प्रतापगडावर राजाराम असताना त्याने जानकीबाई व शाहू यांना आणण्याची कामगिरी गिरजोजीलाच सांगितली होती. त्यानेच राजारामाचे सोने नाणे जिंजीला नेऊन पोचविले होते. राजा कर्णाला झुल्फिकारखानाकडे राजारामाने पाठविले तेव्हा त्याच्याबरोबर हाच गेला होता. जिंजीला वेढा पडला तेव्हा त्या धुमश्चक्रीत सावधपणाने 'सगळी वस्तभाव व जडजव्हाहीर' कड्याखाली अवघड जागेत नेऊन पुरून ठेविली ती यानेच. आणि अखेर या गिरजोजी यादवानेच जिवावर उदार होऊन राजकुटुंबास सुखरूप येलुरास नेऊन राजारामाच्या स्वाधीन केले. तेव्हा राजाराम परम संतुष्ट होऊन बोलला, "या संकटातून राजकुमारास घेऊन आले हे काही सामान्य कर्म केले नाही. येणे गुणे राज्यास दुणी आयुश चढले!"

आपल्या या कामगिरीचे वर्णन गिरजोजी यादवाने स्वतःच केलेले आहे. तो म्हणतो– "तों येकायेकी झुल्फिकारखानाने येऊन चंदीस वेढा घातला, बहुत जाहाले तेव्हा राजश्री स्वामी येलुरास जरोर गेले. मागे झुल्पुकारखान याने सुलतान ढवा करून चंदी घेतली. संपूर्ण लोकांचे कबिले धरिले. गनीमाने मार्गाचा अवरोध केला असता त्या संकट प्रसंगामध्ये आम्ही आपल्या जीवाची व कबिल्याची आशा सोडून केवळ साहासकर्म करून मातोश्री ताराबाईसाहेब व राजेश्री शिवाजीराजे व मातोश्री राजसबाईसाहेब यांचे उदरी राजेश्री संभाजीराजे यांचा संभव होऊन सहा महिने झाले होते. ती व त्यांची कन्या सोयराबाई व उभयता मातोश्रीचे सेवेसी बाइको असिली पाहिजे या करिता लखमु कारभारीण समागमे घेऊन

मार्गीचा स्वतः पाये उतारा करून परमश्रमे करून येलुरास राजश्री स्वामी समोक्ष घेऊन आलो. उभयेता मातुश्री आईसाहेब व राजेश्री शिवाजीराजे व सोयराबाई यांच्या व राजेश्री स्वामीच्या भेटी समई राजेश्री स्वामी व संपूर्ण सरकारकून व हुजरे परम संतोसी होऊन बोलिले की, या संकटातून राजकुमारास घेऊन आले हे काही सामान्य कर्म केले नाही. राजकुमार म्हणजे राज्याचे जीवन ते याणी आपल्या जीवाची होली करून सौंरक्षून आणिले. येणे गुणे राज्यास दुणी आयुश चढले."

राजारामाचा उरलेला कबिला म्हणजे साकी मुस्तैदखानाच्या मताप्रमाणे चार बायका, तीन मुले, दोन मुली ही झुल्फिकारखानाने कैद केली व औरंगजेबाकडे पाठवून दिली. औरंगजेबाने त्यांना गुलालबारमध्ये येसूबाईच्या छावणीशेजारीच कैदेत ठेवले. झुल्फिकारखानाला याप्रमाणे वागण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. त्याने ताराबाईसह सर्व बायका कैद केल्या असत्या तर राजारामाला दिलेल्या वचनाला त्याने हरताळ फासला असे झाले असते, आणि कोणालाही कैद केले नसते तर बादशहाशी बेईमानी केल्याचा आरोप त्याच्यावर आला असता. म्हणून या धर्मसंकटातून प्रमुख राण्यांची सुटका करावयाची आणि दुय्यम राण्यांना कैद करावयाचे असला मध्यम मार्ग त्यानें काढला.

नऊ वर्षांपूर्वी राजाराम लपतछपत जिंजीला आला आणि नऊ वर्षांनंतर आज लपतछपतच त्याला जिंजीतून जावे लागले ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. या नऊ वर्षांत झुल्फिकारखानाचे बळ वाढले नाही तर मराठ्यांचे बळ घटले. संताजी व धनाजी यांच्या यादवीला राजारामाला आवर घालता आला नाही, व त्यांच्या जिंजीवरील तेजस्वी पराक्रमाचे पर्व हे एक उज्ज्वल स्वप्नच ठरले, यामुळे राजारामावर ही वेळ आली हे उघड आहे. खंडो बल्लाळाचा स्वार्थत्याग आणि गिरजोजी यादवाचे साहस यांमुळे राजाराम जिवानिशी व कुटुंब कबिल्याच्या अब्रूनिशी बचावला हे खरे आहे, पण त्याच्या सुटकेमध्यें झुल्फिकारखानाच्या सौजन्याचा फार मोठा भाग आहे हे विसरता येणार नाही. त्याच्या सौजन्यामागे राजकारण असेलही, पण राजकारणात कोणते सौजन्य निःस्वार्थी असते ? राजारामाने संताजीचा आग्रह मानला नाही व झुल्फिकारखानाला गारद न करिता जिंजीतून सुखरूप जाऊ दिले. पण यात विशेष त्याने काहीच केले नाही. शरणागताला जीवदान देणे ही हिंदूंची परंपराच होती. राजारामही त्याचप्रमाणे वागला, पण झुल्फिकारखानाने मात्र त्या सौजन्याची जाणीव ठेवली. व उपकाराची फेड अपकाराने न करिता उपकारानेच केली हे त्याचे राजारामावर उपकार आहेत असे म्हणणे भाग आहे.

....९

जिंजी पडली व पुढे वेलोरही पडले, पण बाजी प्रभूप्रमाणे मराठी राज्याची सेवा करताना ते पडले. जिंजी व वेलोरचा विचार करताना वाटते की, व्यक्तीप्रमाणे स्थळांनाही इतिहासात ईश्वरदत्त म्हणून काही कार्य असते. त्या कार्यासाठीच त्यांचे अस्तित्व असते, ते कार्य संपले म्हणजे त्यांची इतिकर्तव्यता संपते. महाराष्ट्रावर औरंगजेबाने आक्रमण केले. संभाजीला मारले. रायगड घेतला. येसूबाई व शाहूला कैद केले. राजारामाला महाराष्ट्रात आसरा राहिला नाही. त्या कठीण काळी जिंजी आणि वेलोर यांनी राजारामाला आधार दिला व मराठी राज्य वाचविले. त्याचमुळे औरंगजेबाची फौज महाराष्ट्र व तामिळनाडूमध्ये विभागली गेली, आणि तिचा जोर लटका पडला. मराठ्यांना अखेरचा आश्रय देऊन जिंजी आणि वेलोर शेवटी मोगलांच्या हाती १६९८ मध्ये पडली. पण तोपर्यंत त्यांचे कार्य झालेले होते.

दक्षिणेतल्या नामांकित किल्ल्यांत जिंजीची गणना होते. "चंदी म्हणजे जैसे विजापूर तैसाच तख्ताचा जागा" असे सभासदाने त्याच्याबद्दल म्हटले. तसेच वेलोर. सभासदाच्या शब्दांत "तो कोट म्हणजे पृथ्वीवर दुसरा गड असा नाही. कोटात जीत पाणियाचा खंदक. पाणियास अंत नाही. उदकात दाहा हजार सुसरी. कोटाचे फांजियावरून दोन गाडिया जोडून जावे ऐशी मजबुती. पडकोट तरी चार फेरियावरी फेरे ये जातीचा कोट." त्या कोटास वेढा घालून मराठ्यांनी कोट घेतला. मनूची १७०३ साली वेलोरला गेला होता. त्या वेळी त्याने या पाण्याच्या खंदकातल्या दहा हजार सुसरी प्रत्यक्ष पाहून त्यांचे वर्णन लिहून ठेवले आहे. ते आज वाचलें तरी अंगावर काटा उभा राहतो. तो म्हणतो "या खंदकाच्या पाण्यात जिकडे तिकडे सुसरी आहेत आणि दुर्दैवाने जर का कोणी पाण्यात पडला तर या सुसरी त्याचे तुकडे तुकडे करतात व त्याला खाऊन टाकतात. मी उत्सुकतेने खंदकाच्या अगदी कडेवर जाऊन उभा राहिलो; पाण्यावर माणसाची सावली पडलेली मात्र त्या सुसरींनी पाहिली आणि लगेच त्यांनी आपले जबडे वासले. मी एक बोकड त्यांच्याकडे फेकला. ताबडतोब त्यांनी त्याची खांडोळी केली व एकमेकींच्या जबड्यांतून हिसडून काढून ती खाऊन टाकली. त्यांच्या गोंगाटाने खंदकाच्या दुसऱ्या भागातून आणखी सुसरी तेथे धावून आल्या त्या इतक्या होत्या व त्यांचा कोलाहल इतका माजला होता की माणूस बहिरा झाला असता. त्यांची मोजदाद करणे अशक्य होते. त्यांची डोकी पाण्यावर होती व जबडे वासलेले होते. मी त्यांना बोकडाचे तुकडे टाकीत होतो व त्या न चावताच ते एका घासात नुसत्या गिळत होत्या. काही जणांनी लांब शिंगे असलेली बोकडांची डोकी त्यांच्यात फेकली पण त्यांना त्याचे काय? त्यांनी आपल्या डोक्याला फक्त एक झटका दिला आणि ती शिंगे असलेली डोकी कडाकड फोडून खाल्ली." या सुसरींमुळे वेलोरचा किल्ला जवळ जवळ अजिंक्य झालेला होता.

हा वेलोरचा किल्ला व जिंजीचा किल्ला शिवाजीमहाराजांनी मुद्दाम रायगडाहून येऊन आपल्या दक्षिण दिग्विजयात एकवीस वर्षांपूर्वी सर केला. त्याच्या मागे मुलुखगिरीची हाव नव्हती की द्रव्यतृष्णा नव्हती. आपल्या माघारी मराठी राज्यावर औरंगजेब झडप घालणार हे त्यांनी ओळखले होते. त्या संकटास तोंड देण्यासाठी त्यांनी ही तजवीज करून ठेवली होती. महाराजांचा तर्क खरा ठरला व तंतोतंत त्याप्रमाणे घडून आले. याला म्हणावे दूरदृष्टि आणि याला म्हणावे द्रष्टेपणा!

महाराजांना मागाहून चिकटविलेला हा मोठेपणा नव्हे. त्यांनी जिंजी काबीज केली तेव्हाच एका चाणाक्ष जेझूइट गृहस्थाने हे लिहून ठेविले आहे. तो म्हणतो "शिवाजीने जिंजीचे राज्य घेतल्यावर हिंदुस्थानात मुसलमानांचे बळ लक्षात घेऊन त्यांच्या सर्व एकवटलेल्या सामर्थ्याचाही प्रतिकार करता यावा म्हणून बंदोबस्त करण्यास सुरुवात केली. मुसलमानांना त्या राज्यातून घालवून लावताना शिवाजीने आपला उद्देश सिद्धीस नेण्याकरिता निसर्गतःच दुर्जय असलेल्या जिंजी किल्ल्याची पुन्हा डागडुजी केली. पहिले तट पाडून नवे तट व बुरूज त्याने अशा कौशल्याने बांधले की ते काम हिंदी लोकांचे नसून युरोपियन लोकांचेच आहे असे वाटते. काही जुने निरुपयोगी किल्ले पाडून त्याने कित्येक नवे डोंगरी व भुईकोट किल्ले बांधले. पाश्चात्यांच्या पद्धतीचे अवलंबन करून त्याने मोठे खडक फोडले, तलाव बांधले व युद्धोपयोगी व इतर इमारती बनविल्या. या कामी त्याने आपल्या प्रजेकडून जुलूम करून जमविलेली अपार संपत्ति खर्च केली."

असो. वेलोर येथे पांच हजार फौजेनिशी धनाजी जाधव आलेला होता. त्याच्या बरोबर वेलोरहून निघून कोप्पळ भूधरगड मार्गाने राजाराम विशाळगडाला आला. तेथे त्याची व रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण सचिव व परशुराम त्र्यंबक प्रतिनिधि यांची भेट झाली. फार दिवसांनी स्वामीसेवकांना एकमेकांचे दर्शन होत होते. त्या प्रसंगी आनंदाने सर्वांचे कंठ दाटून आले. त्या वेळी पंतांनी विनंती केली "स्वामींचे राज्य आजपर्यंत कळेल तसे राखले आता स्वामींनी बंदोबस्त करावा." तेव्हा राजाराम म्हणाला, "पूर्वी तुम्हीच केलात; पुढेही तुम्हीच करणार!"

धन्य तो धनी की ज्याला असे कृतकर्मे सेवक मिळतात, व धन्य ते सेवक की ज्यांना असा कृतज्ञ धनी मिळतो. असा कृतार्थतेचा व असा कृतज्ञतेचा सोहळा भोगण्याचे भाग्य वाट्याला येणारा भाग्यवान् शतकांत एखादाच.

□ □

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था
१२१६ सदाशिव पेठ, ... ...,
... ... रोड, पुणे-४११ ०३०

# (८)

'पूर्वी तुम्हीच केलात, पुढेही तुम्हीच करणार –'

राजारामाच्या या शब्दांत केवळ स्तुति किंवा अर्थवाद नव्हता. त्यात गेल्या दहा वर्षांतल्या प्रतिकूल परिस्थितीत मराठी राज्याच्या कर्त्या पुरुषांनी केलेल्या कामगिरीचे यथार्थ मूल्यमापन होते. सोळा वर्षांपूर्वी औरंगजेब आपल्या चतुरंग सेनेसहित महाराष्ट्रात उतरला. त्याच्याशी संभाजीने प्राणपणाने सामना केला. पण या संघर्षात महाराष्ट्र देशाची दारुण दैना झाली. रामचंद्रपंताने 'आज्ञापत्रा'त म्हटल्याप्रमाणे "परंतु युद्धप्रसंगामुळे राज्याचा असा विज्वर प्रसंग होऊन गेला. संपूर्ण देशदुर्ग पादाक्रांत जाहले. राज्य असे नाव मात्र सावशेष उरले व तेही निर्मर्याद. राज्यातील प्रजा अनेक क्षुद्रोपद्रवामुळे बहुत पीडा पावली." स्वराज्यातले वतनदार मोगलांकडे जाऊ लागले. अंतर्गत संघर्ष उफाळून वर आले आणि संभाजीला पकडून औरंगजेबाने जेव्हा ठार मारले तेव्हा या दुर्दैवाचा कडेलोट झाला. एवढ्या-वरही थांबले नाही. संभाजीच्या मृत्यूनंतर मराठे दिङ्मूढ झाले असतानाच, मोगलांनी राजगड, सिंहगड, पुरंदर, तोरणा, पन्हाळा असे नामांकित किल्ले भरा-भर घेतले. मराठ्यांची राजधानी रायगड सर केली. महाराणी येसूबाई आणि राज्याचा भावी छत्रपति शाहू यांना कैद केले. राजारामाला बैराग्याचा वेष घेऊन जिंजीला पळून जाण्याचा प्रसंग आणिला. त्या वेळी असे वाटले की, शिवाजी महाराजांनी उभारलेले हिंदवी स्वराज्य हे केवळ स्वप्न होते, या संकटातून मराठे कधी काळी डोके वर काढू शकतील असे वाटले नव्हते.

या आपत्तीतून मराठी राज्य पार पाडले ते मुख्यतः रामचंद्रपंत अमात्याची बुद्धिमत्ता आणि संताजी घोरपडे, धनाजी जाधव, शंकराजी नारायण, परशुराम त्र्यंबक यांचा पराक्रम यांमुळे होय. अमात्य हा मुख्यतः बैठा मुत्सद्दी, तो रणांगणा-वर कधी गेला नाही. विशाळगडावर राहून राज्याच्या सर्व गोष्टींकडे जागरूकपणे लक्ष ठेवून तो कारभार करीत होता. चढाईचा कार्यक्रम ठरविणे, जिंजीकडे फौजा तयार करून पाठविणे, संताजी धनाजीसारख्या सरदारांची भांडणे तोडणे, मोगलांकडे गेलेल्या सरदारांना आणि वतनदारांना परत स्वराज्यात आणणे, मोगलांनी हस्तगत केलेले गडकोट परत मिळविणे, या सर्व व्यापामागील प्रतिभा रामचंद्रपंताची होती. पंतावर राजारामाचा इतबार एवढा होता की, प्रत्यक्ष छत्रपतींनेही त्याचे हुकूम उल्लंघू नये एवढ्या दर्जाचा 'हुकुमतपन्हा' हा किताब राजारामाने त्याला दिला होता. त्याचा बाप निळो सोनदेव याच्यापासूनच तो शिवाजीमहाराजांच्या तालमीत वाढला होता, आणि त्यामुळे महाराजांच्या राज-

नीतीचे सारसर्वस्व त्याच्या अंतःकरणात भिनले होते. रामचंद्रपंताचे कर्तृत्व राजाराम जाणून होता व अनेक वेळा त्याने त्याच्या कामगिरीचा मुक्तकंठाने गौरव केला होता. "पुढे औरंगजेब चालोन आले. संभाजी राजांवर सेना पाठविली ते हस्तगत झाले. त्या उपरी राजाराम सिंहासनारूढ झाले असता औरंगजेबाने सक्ती करून संपूर्ण राज्य आक्रमावयाचा उद्योग केला. ते समयी ताम्राचे उठाण विशेष देखोन देशातील राज्यभार रामचंद्रपंतावर टाकून राजाराम स्वार होऊन कर्नाटक प्रांते चंजीस गेले. मागे पंतांनी सेनासंभार मेळवून तांम्राच्या फौजा मारून घालविल्या. कित्येक देशदुर्ग पादाक्रांत जाले होते ते पुन्हा हस्तगत करून, गेले राज्य संपादून वरचेवरी संतोष-वार्ता चंजोस पाठवीत गेले. त्यावरून पूर्वीचा मजमूचा हुद्दा सांगून दिवसेंदिवस कृपा विशेष केली. त्यांनीही निष्ठापूर्वक वर्तोन स्वामींचे राज्य तांम्राक्रान्त झाले होते, ते संपूर्ण यथापूर्व हस्तगत केले. चंजोस तांम्राची जरब होऊन परीघ पडला, त्या समयी देशातून कर्नाटकात सेनासंभार पाठवून स्वामींचे संकट निरसन केले." मनसुबीची तलवार करून शर्थीने राज्य राखणारे 'भले बुद्धीचे सागर' नाना फडणीस उत्तर मराठशाहीत होऊन गेले. रामचंद्रपंत अमात्य हा एक प्रकारे नाना फडणिसाचाच पूर्वावतार होता असे म्हटले पाहिजे. तोही बुद्धीचा सागर होता. त्याचीही मनसुबीचीच तलवार होती. त्यानेही मर्दपणाने पडते राज्य सावरून धरले.

पंताच्या ब्रह्मतेजाला संताजी–धनाजी प्रभृतींच्या क्षात्रतेजाची जोड मिळाली हे महाराष्ट्राचे भाग्य होय. त्यापैकी शंकराजी नारायण सचिव व परशुराम त्र्यंबक हे प्रथम कारकुनी पेशाचे ब्राह्मण असूनही त्यांनी क्षात्रकर्म केले हे विशेष. पण हे शिवाजीमहाराजांच्या परंपरेला धरूनच होते. त्यांच्या वेळी न्यायाधीश व पंडित-राव या दोघांखेरीज बाकी सर्वच प्रधानांना मुलकी कामगिरीप्रमाणे लष्करी काम-गिरीही करावी लागे. शंकराजी नारायणाने आपल्या पराक्रमाने मावळ भागातून मोगल उखडून काढले. राजगड, तोरणा, प्रतापगड, सिंहगड, कारी सिद्धगड ही तांम्राक्रांत झालेली स्थळे परत हस्तगत केली. राजारामाने त्याच्या पराक्रमावर प्रसन्न होऊन त्याला 'मदारूलमहा' म्हणजे 'राज्याचा आधारस्तंभ' असा किताब दिला, आणि सचिवपद दिले. "स्वामींच्या पुण्यप्रतापे करून, देशदुर्ग काबीज होतील तेथपर्यंत स्वामींनी राज्यभार आमच्या स्वाधीन केलाच आहे. सांप्रत स्वामींनी आम्हांस सुरनिशीचा कार्यभाग सांगितला. रायगडापासून कोकण-पट्टी स्वाधीन केली. शंकराजी नारायणाप्रमाणेच परशुराम त्र्यंबकाने शर्थीने छापा घालून पन्हाळ्याचा किल्ला सर केला. परशुराम-त्र्यंबकाचा पराक्रम औरंग-जेबाचा जिव्हारी लागला. तो बोलला, "पन्हाळा गेला नाही. विजापूरच जणू गेले." औरंगजेबाचे हे शब्द परशुराम त्र्यंबकाच्या पराक्रमाची इयत्ता दाखविण्यास पुरेसे आहेत.

संताजी घोरपडे व धनाजी जाधव या दोघांनी तर खरे म्हणजे या दहा वर्षांचा इतिहास घडविलेला आहे. ही केवळ ईश्वराची कृपाच म्हणावयाची की संभाजीवर कल्पान्त कोसळला, त्या प्रसंगातून संताजी घोरपडे व खंडो बल्लाळ जिवंत बचावून रायगडाला आले. संताजी व धनाजी या दोघांनी मोगलांना सळो का पळो करून सोडले. इस्माइलखान मखा, अलीमर्दानखान, शर्जाखान यांच्यासारखे सरदार कैद केले. कासीमखान व हिंमतखान यांच्यासारखे नामांकित सुभेदार ठार मारले. जिंजीला वेढा घालून बसलेल्या झुल्फिकारखानाला झोडून काढले. त्यांच्या पराक्रमाने मराठ्यांचा आत्मविश्वास बळावला. संताजीच्या कर्तृत्वाचे समर्पक मूल्यमापन राजारामानेच केलेले आहे. "राजश्री छत्रपती स्वामी कर्नाटकांत जाते समयीं या प्रांतांत तुम्हांस ठेवून गेले. त्या समयी इकडे गलिमाची धामधूम बहूत होऊन कुल देशदुर्ग हस्तगत केली होती ती गेली. राज्यामध्ये काही अर्थ उरला नाही. कुल मराठे यांनी इमान खत्ता करून गलिमाकडे गेले. परंतु इमान खत्ता न करता राजश्रीच्या पायाशी बहूतच एकनिष्ठा धरून जमाव करून शेखनिजाम व सर्जाखान व रणमस्तखान व जाननिसारखान असे उमदे वजीर बुडविले. जागोजाग गनिमास कोट घालून नेस्तनाबूद केले व देश सोडविला. राज्यसंरक्षणाच्या प्रसंगास असाधारण श्रम केले. औरंगजेबास दहशत लाविली."

केवळ संताजीच्या किंवा धनाजीच्याच नव्हे तर सर्वच मराठ्यांच्या गेल्या दहा वर्षांतील कर्तृत्वाची ही फलश्रुति होती. औरंगजेब दक्षिणेत उतरला तेव्हा त्याच्या बरोबर कसलेले आणि नामांकित सेनापति होते. त्या सर्वांना मराठ्यांनी खडे चारले. हसन अलीखानाला कोकणातून जवळ जवळ पळून जावे लागले. रणमस्तखानाला कोंडीत पकडले. गोव्याच्या मार्गाने येणाऱ्या शहाआलमच्या सैन्याला उपासमार करून जवळ जवळ उघडेबोडके पळायला लावले. रामसेजवर व गांगोलीवर फिरोजजंगाचा पराजय केला. संभाजीला पकडणाऱ्या मुकर्रबखानाला पन्हाळ्याला जर्जर केले. जाननिसारखानाला नेस्तनाबूद केले. शर्जाखानाला जिवंत पकडले. अलीमर्दानखान व इस्माइलखान मखा यांना जिंजीचा तुरुंग दाखविला. कासीमखान व हिंमतखान या दोघांनाही दस्त केले. औरंगजेबाचा अजिंक्य म्हणून गाजलेला सेनापति झुल्फिकारखान याला प्राणांची भीक मागावयास लावली. औरंगजेबाचा एक सेनानी असा राहिला नाही की जो मराठ्यांच्या हातून सुखरूप सुटला होता. औरंगजेबाने जेवढे म्हणून मराठ्यांचे किल्ले सर केले होते, ते बहुतेक मराठ्यांनी परत घेतले होते. जेवढे म्हणून वतनदार फोडले होते, ते बहुतेक मराठ्यांना वळवून परत नेले होते. अठरा वर्षे मोहीम करून औरंगजेबाचा अमल महाराष्ट्रात कोठेच मूळ धरीत नव्हता. मराठे ठाणी लुटीत होते, रसद मारीत होते, छावण्यांवर छापे घालीत होते, रात्री बेरड घालून घोडी पळवीत होते. ते कोठे नाहीत असा भाग नव्हता. मुख्य म्हणजे औरंगजेबाची

दहशत महाराष्ट्रातून साफ उखडून निघाली होती. मराठे मोडत नाहीत असे त्याला दिसू लागले होते. मोगलांना मराठ्यांचेच अहोरात्र भय होऊन बसले होते. रात्री दिवसा कोणीकडून येतील, काय करतील असे केले. मोगलाई फौजेत आठही प्रहर भय बाळगीत. पादशहास बहूत आश्चर्य जाहले की, "मराठी फौज ही बळावत आहे. अकस्मात् यावे, बक मत्स्य उचलून नेतो तसा घाला घालावा, शिपाईगिरीची शर्त करावी, प्रसंग पडल्यास माघारे पळून जावे; खाण्यापिण्याची दरकार बाळगत नाहीत; पाऊस, ऊन, थंडी व अंधारी काही न पाहता घोड्यावरच हरभरे व भाकरी, चटणी, कांदे खाऊन धावतात. त्यांना कसे जिंकावे? एक्या मुलकांत फौज आली म्हणोन त्यांजवर रवानगी करावी, तो दुसरीकडे जाऊन ठाणी घेतात, मुलूख मारितात. हे आदमी नव्हत भूतखाना आहे!"

'दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा' अशी ज्याची आख्या त्या औरंगजेबाची अशी अवस्था झाली. मराठ्यांच्या या कर्तृत्वात राजारामाचा वाटा मोठा आहे. त्याने स्वतः राजकारण केले नाही पण राजकारण करणाऱ्या अमात्या-सारख्यांच्या कारभारात निष्कारण ढवळाढवळ केली नाही. तो स्वतः रणांगणा-वर गेला नाही पण रणांगणावर लढणाऱ्यांना त्याने प्रोत्साहन दिले. आपल्या कष्टांचे धनी चीज करतो ही भावनाच अत्यंत प्रेरक होती. राजारामाने सढळ हाताने इमाने, बक्षिसे, किताब, वतने, भूमि वृत्ति राज्यातील कर्तबगार लोकांना दिली. वतनाचे आकर्षण मराठ्यांना मोठे. त्यालाच राजारामाने आवाहन केले. जो मुलूख वतन म्हणून द्यावयाचा तो सामान्यतः मोगलांच्या ताब्यात असे. त्यामुळे तो जिंकण्यासाठी राजारामाच्या कारकिर्दीत मराठ्यांनी पराक्रमाची पराकाष्ठा केली. "ब्राह्मणांनी राज्यवृद्धी व्हावी म्हणोन अनुष्ठाने केली; त्यांनी चंदीस जाऊन तुमचे कल्याणार्थ अनुष्ठान केले म्हणोन सांगावे हे ऐकोन त्यांस इनाम जमीन अथवा गाव करून द्यावे." "जे कर्ते जाहले, त्यांस गाव, जमिनी, इनाम द्यावा." "कार्यकर्त्यांस इनाम द्यावे, त्यायोगे मनुष्यमात्र पेशजीपेक्षा प्राणही जावो परंतु महाराजांची सेवा घडोन राज्याची अभिवृद्धि व्हावी असे इच्छू लागले." "कर्ते मनुष्यांची बूज वाढवून किताबती व पदे देऊन त्यांचे हाते कार्ये करविली. त्यांनीही राजश्रीचा लोभ आपल्यावर असावा, चहातील ते देत आहेत यास्तव सरकार काम बजावण्यात जीवादारभ्य श्रम साहस करीत असावे" राजा-रामाच्या या गुणग्राहक वृत्तीमुळे तो खरा 'कार्य-कर्ता' छत्रपति झाला. अमात्याची बुद्धिमत्ता, प्रधानांचा पराक्रम, सेनेचे शौर्य या सर्वांचे 'अनंत हस्ते कमलावराने देता किती घेशील दो कराने' असे चीज करणारा धनी मिळाल्यामुळे औरंग-जेबाच्या आक्रमणावर मात करून शिवाजी महाराजांनी उभारलेले हिंदवी स्वराज्य टिकले. राजारामाचे हे कर्तृत्व सामान्य नव्हे.

ाष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, पुणे
.व्ह ट्रा. सोसायटी: पुणे।


राज्य जे टिकले ते सर्वस्वी शिवाजी महाराजांचे स्वराज्य होते काय? शिवाजी महाराजांच्या तत्त्वाचे त्यात कठोरपणें परिपालन करण्यात येत होते काय? राजारामाचा अमात्य हुकुमतपन्हा याने 'आज्ञापत्र' लिहिले आहे. त्याचा बाप निळो सोनदेव हा शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत मुजुमदार होता. त्याच्यानंतर ते पद रामचंद्रपंताला शिवाजी महाराजांनी दिले. संभाजीच्या कारकिर्दीतही रामचंद्रपंत कामावर होताच. त्याच्याकडे सचिवपद असून कुडाळपासून नरगुंद तुंगभद्रेपर्यंतचा प्रदेश त्यांच्याकडे सोपविलेला होता. राजारामाच्या कारकिर्दीत तर त्याचे कर्तृत्व कळसाला पोचले. तात्पर्य शिवाजी, संभाजी व राजाराम असे तीन छत्रपति त्याने पाहिले असल्यामुळे त्याने लिहिलेल्या आज्ञापत्रात शिवाजी महाराजांच्या राजनीतीचे सारसर्वस्व उतरलेले आहे, त्या राजनीतीतील तत्त्वांचे स्वरूप आणि ज्या तत्त्वांवर राजारामाचे स्वराज्य चालले होते, त्या तत्त्वांचे स्वरूप एकच होते काय? प्रश्न जरा गैरसोयीचा आहे खरे, पण या काळातील राजारामाच्या व मराठ्यांच्याच एकूण कर्तृत्वाचे मूल्यमापन करताना तो विचारल्याशिवाय गत्यंतर नाही.

मराठ्यांच्या सामाजिक प्रवृत्तीचा विचार करताना वतनाचे त्यांना वाटणारे आकर्षण केवळ अनिवार होते ही गोष्ट विसरून चालणार नाही. मग ते वतन देशमुखाचे असो, देशपांड्याचे असो की पाटिलकीचे असो. देशमुखी वतन म्हणजे सर्व वतनांचा केवळ शिरोमणीच म्हटला पाहिजे. सरकारी सुभेदार व कारकून येणारे जाणारे असत. पण देशमुख कायमचा असे. राजा जाई, अंमल बदले, काही गावे आदिलशाहीत जात. काही मोगलाईत जात, बदलत नसे तो फक्त देशमुख. त्याची सत्ता व त्याचा मान शाश्वत असे. देशमुख हा प्रांताचा किंवा परगण्याचा राजाच असे. प्रांताची वसाहत करणे, जमीन लागवडीस आणणे, परगण्यातील भूमि व रयत सांभाळणे ही सर्व कामे देशमुखांची होती. त्यांच्याच मार्फत राज्य चालविण्यास राजाला लागणारा पैसा व धान्यादि सामग्री मिळे, राजाचा व प्रत्यक्ष रयतेचा संबंध कधीही येत नसे, देशात राजा असला तरी संपूर्ण देशव्यवस्था या देशमुखांच्याच ताब्यात असे. त्याचा थाट राजासारखाच असे. त्याच्या कारभारासाठी त्याच्याही पदरी पेशवा असे. त्याची स्वतंत्र मुद्रा असे. प्रांतातील दप्तर त्याच्या मुद्रेशिवाय प्रमाण नाही. वार्षिक जमाबंदी, शेतोवरील आकार हे सर्व त्याच्या सल्ल्याने सुभेदाराने व मुजुमदाराने ठरवायचे. परगण्यात इनाम देणे, मिरासी हक्क देणे, तंटेबखेडे मिटविणे हा त्याचा मान असे. त्यामुळे देशमुखीच्या वतनाची अपूर्वाई काही विलक्षणच होती. खुद्द शाहू छत्रपतीला आपण छत्रपति असण्यापेक्षा 'देशमुख प्रांत वाई' असल्याचाच फार अभिमान वाटे. पेशवे सरकार स्वतःला श्रीवर्धनचे देशमुख म्हणवून घेण्यात भूषण मानीत. थोड्या फार प्रमाणात पाटिलकीच्या वतनाची गोष्ट अशीच होती. महादजी शिंद्यांच्या हातात दिल्लीची

महाराष्ट्र प्रकाशक संस्था, पुणे
(इ.व्ह.ट्रा. सोसायटी. पुणे)
११३३ सदाशिव पेठ, पुणे-३०



पादशाही आली; पण त्यापेक्षा स्वतःला पाटीलबुवा म्हणवून घेण्यात त्याला भलतीच धन्यता वाटे. इंदापूरचाएक देशमुख आढ्यतेने म्हणतो ते खरे आहे. "पांढरीवरी शतं भीष्म होऊन गेले असतील. सतत पाचशें वर्षे वतनावरी नाही तो आजी वतनावरी उभा राहिला. ऐसी (काय) गोष्टी आहे!" पांढरीवर शेकडो भीष्म म्हणजे राजे होऊन गेले असतील; पण काळीवरच्या म्हणजे शेतजमिनीवरच्या देशमुखापुढे ते काय होत!

या वतनदारीचा शिवाजी महाराजांनी कठोरपणाने बीमोड केला, देशमुखांच्या देशव्यवस्थेतील कर्तृत्वाबद्दल त्यांचा आक्षेप नव्हता. त्यांचा आक्षेप होता, तो देशमुखांच्या शासनाला, न जुमानणाऱ्या पुंड प्रवृत्तीला आणि राज्यापेक्षा वतनाला सर्वस्व मानण्याच्या स्वार्थी वृत्तीला. परचक्र आले म्हणजे हे देशमुख वतन राखण्यासाठी शत्रूला आधी जाऊन सामील होतात; व इकडचा भेद तिकडे जाऊन सांगतात. ते राज्याचे दायाद म्हणजे प्रतिस्पर्धी आहेत व घरभेदेही आहेत. शिवाजी महाराजांना बांदल देशमुखाच्या प्रकरणात देशमुखांचा दायाद वृत्तीचा अनुभव आला. आणि खंडोजी खोपड्याच्या प्रकरणात घरभेदेपणाचा प्रत्यय आला. अफझलखानाची स्वारी आली, तेव्हा वतन राखण्यासाठी हा उत्रोलीचा खोपडे देशमुख त्याला जाऊन मिळाला आणि त्यानेच खानाच्या वधानंतर त्याचा मुलगा फाझलखान याला वाचविले. वतनासाठी देशमुख देशद्रोह करतो तो असा. म्हणून वतनदारांबद्दलचे शिवाजी महाराजांचे हृद्गत सांगताना रामचंद्रपंताने 'आज्ञापात्रा'त म्हटले आहे की, "हे स्वल्पच परंतु स्वतंत्र देशनायकच आहेत..........हे लोक म्हणजे राज्याचे दायादच आहेत. आहे वतन इतक्रियावरच कालक्रमणा करावी, सर्व देशाचा स्वामी म्हणजे राजा, त्यासी निष्ठेने वर्तावे, कोण्हाचा अन्याय न करावा, हे यांची बुद्धि नाही. नूतन संपादावे, बळकट व्हावे, बळकट जाले म्हणजे येकाचे घ्यावे, दावे दरवडे करावे हा यांचा सहज ह्व्यास. राजशासन होईल हे जाणून अगोदर दुसरियाचा आश्रय करितात, स्थळे बांधतात, त्या बळे वाटा पाडितात, देश मारितात. समयी जीवाचीही तमा धरीत नाहीत. परचक्र आले म्हणजे वतनाचे आशेने अगोदर सलूख करितात; स्वतः भेटतात. तिकडील भेद इकडे, इकडील भेद तिकडे करून राज्यात शत्रूचा प्रवेश करितात. मग तेच लोक राज्यास अपायभूत होऊन दुःसाध्य होऊन जातात.

"पण चालते वतन बुडवणे हाही अन्याय म्हणून यांचे वतन ठेवावे. पण प्रजेवर यांची सत्ता चालू देऊ नये, यांस स्नेह व दंड यांमध्ये संरक्षून ठेवावे लागतात." शेवटी पंताने मार्मिक शेरा मारला आहे की "वतनदारामध्ये कार्यकर्ते आणि प्रामाणिक मनुष्य असल्या तैसे सेवक मिळणे परम कठीण. आधी वतनदार हा येक विश्वास, ततोपि प्रामाणिक म्हणजे सोने आणि सुगंध !"

वतनांप्रमाणे वृत्ति किंवा भूमि देण्यालाही शिवाजी महाराजांचा सक्त विरोध होता. माणूस कितीही गुणी असला तरी त्याला द्रव्यरूपाने रोख बक्षीस द्यावे, पण इनाम म्हणून भूमि कदापि देऊ नये. याला अपवाद फक्त देवस्थानांना किंवा सत्पात्र ब्राह्मणांना अग्रहार म्हणून दिलेल्या भूमीचा असे. जमीन इनाम न देण्याचे कारण स्पष्ट होते. "सेवक अथवा वृत्तिवंत यांसी हरयेक कार्यप्रयोजनामुळे भूमि इनाम देणे हा परम अन्याय. राजा होत्साता राज्याचा शत्रु असेल तेणे भूमीवर उदार व्हावे. 'राजा भूपति' यैसे भूमीकरिता म्हणावे ते भूमीच गेलियावर राज्य कशाचे करणार? पति कोण्हाचा होणार? कदाचित् विशेष सेवा केली म्हणोन ग्राम अथवा भूमि इनाम द्यावी तरी राज्य आहे तेथे वंशपरंपरेने कार्ये आहेतच. सेवकही कार्ये करणारे आहेत. तेव्हा ज्या समयी जे सेवक कार्ये करतील त्यास भूमि देत असावे. यैसे देता देता संपूर्ण राज्य भरीस घालावे यैसे होते. याकरिता जो राज्य करणार, राज्य वाढविणार, नीतिवंत म्हणोन कीर्ति संपादणार त्याणे सर्वथैव मोह न पावता यवोदर प्रमाण भूमि तेही इनाम देऊ नये." यवोदर प्रमाण म्हणजे जवाच्या दाण्याच्या मध्यभागाएवढी जमीन. महाभारतात दुर्योधन म्हणतो की "तीक्ष्ण सुईच्या अग्राने भेदली जाईल एवढीसुद्धा भूमि मी पांडवांना देण्यास तयार नाही." दुर्योधनाचा दुराग्रह वजा करून भूमिदान देण्याच्या बाबतीत शिवाजी महाराजांची वृत्ति अशीच होती. "यावद्धि तीक्ष्णया सूच्या विध्येदग्रेण केशव। तावदप्यपरित्याज्यं भूमेर्नः पाण्डवान् प्रति॥"

परंतु राजारामाच्या कारकिर्दीत शिवाजी महाराजांच्या या सर्वच तत्त्वांना हरताळ फासला गेला. राजारामाच्या कारकिर्दीतील मराठ्यांनी जे पराक्रम केले ते शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीतील मराठ्यांच्याच पराक्रमाच्या तोडीचे होते. मराठे तेच होते, त्यांचे क्षात्रतेज तसेच होते. पण त्या पराक्रमामागची प्रेरणा बदलली होती. ती निर्भेळ व निष्काम स्वराज्यसेवा राहिलेली नव्हती. तिची जागा वतनदारीच्या ईर्ष्येने घेतलेली होती. तिच्यात स्वार्थ शिरलेला होता. ती सकाम झालेली होती. ती बक्षीस मोबदला मागत होती. प्राणांची व कामगिरीची किंमत वसूल करीत होती, ते समर्पण संपले होते. त्याची जागा आता व्यापारी विनि-मयाने घेतलेली होती.

कारीच्या सर्जेराव जेध्याचा मुलगा नागोजी जेधे याला कोप्पळच्या लढाईत वीरमरण आले. शिवाजी महाराजांना फार दुःख झाले. पण त्यांनी जेध्याला गाव इनाम करून दिला नाही. नागोजीच्या आईला दर दसऱ्याला न चुकता शेरभर सोने पाठवण्याचा क्रम त्यांनी चालू ठेवला. बाजीप्रभु, मुरारबाजी, सूर्यराव काकडे, प्रतापराव गुजर अशा नामांकित वीरांनी धारातीर्थी प्राणार्पण केले. पण महा-राजांनी कुणालाही गाव किंवा वतन दिले नाही. या उलट राजारामाने गाव इनाम करून दिल्याची लागेल तेवढी उदाहरणे सापडतील. "श्री राजाराम छत्रपति याणी

आज्ञा केली ऐसीजे महादजी बिन गंगाजी बाबर याचेविशी राजश्री धनाजी जाधवराव यांनी चंदीचे मुक्कामी स्वामीसमीप विनंती केली की महादजी बाबर यांचे बाप गंगाजी बाबर देशमुख, कर्याती नाणेघोळ याणी आपल्या समागमे येऊन छ. १४ रजबी झुल्फिकारखानाची गाठी पडली ते समयी समरांगणी युद्धी स्वामीकार्यावरी देह दिला. यासी राजश्री रामचंद्र पंडित अमात्य हुकुमतपन्हा यांनी एक गाव मौजे केळाली कसबे मजकूर हा इनाम दिल्हा आहे. त्याखेरीज आणिक एक गांव इनाम यांचे पुत्र मशारनिल्हे यासी देविला पाहिजे म्हणोन विदित केले." बाजी सर्जेराव जेधे याने रोहिडा किल्ला घेतला व देशही सोडविला. पुढेही जमाव करून गडकोट व देश गनिमांपासून घेण्याचे त्याने आश्वासन दिले, पण त्याची अट अशी होती की, "स्वामींनी कृपाळू होऊन पेशजी आपला हक्क चालत होता तेणेप्रमाणे देखील इसाफतीचे गाव चालविले पाहिजेत." पुरंदर घेऱ्यांतील रामजी नाईक, जनकोजी नाईक वगैरे मंडळींनी आज्ञेप्रमाणे पुरंदरगड घेऊन देण्याचे कबूल केले. पण त्यांनी विनंती केली की "साहेबांच्या हुकुमाप्रमाणे गड घेऊन देतच आहो. परंतु किल्ल्याचा घेरा आहे तो उकरून खावयास साहेब मेहरबान होऊन दिल्हा तरी खाईन" साहेबांनी ती अट मान्य केली. अटीशिवाय कोणते कामच होत नव्हते.

नावजी बलकवड्याचें उदाहरण तर फारच बोधप्रद आहे. त्याने तानाजी मालुसऱ्याप्रमाणेच तटाला शिड्या लावून सिंहगड सर केला. पण बलकवडे हा अर्धा तानाजी होता. आधी लगीन कोंडाण्याचे म्हणून सिंहगड घेताना स्वामी सेवेत प्राणार्पण करणारा तानाजीचा स्वार्थत्याग कुठे आणि लढाईवर जाण्याच्या आधीच इनामगाव मिळण्याची अट घालणारा बलकवडे कुठे! मौज अशी की बलकवड्याने तानाजीचे उदाहरण स्वतःच दिलेले आहे. "स्वामीने आपणास धार नेमिली ती आपण कबूल केली. परंतु सिंहगड म्हणजे मोठे अश्रिफाचा आहे. पूर्वी राजश्री कैलासवासी स्वामीच्या वेळी किल्ला गनिमाकडे असता किल्ला हस्तगत करावयाचा प्रयत्न केला. तानाजी मालुसरे यासारखा सरदार धारेस नेमला होता. त्यांनी शर्थ करून किल्ला हस्तगत केला. तान्हाजी मालुसरे यासारिखे माणूस खर्च होऊन गेले. आपण जिवावरी निदान करून धार कबूल केली आहे. किल्ला हस्तगत जालियावरी मौजे सावरगाव तालुके पौनमावळ हा गाव आपणास इनाम दिला पाहिजे." त्याप्रमाणे त्याला सावरगाव इनाम मिळाला. नावजीच्या पराक्रमाबद्दल प्रश्नच नाही. पण पोवाडा त्याचा झाला नाही. तानाजीचा झाला. कारण तानाजीचा पराक्रम हे समर्पण होते; नावजीचा पराक्रम हा विनिमय होता असा हा शिवकालीन मराठ्यांत व राजारामकालीन मराठ्यांत झालेला फरक होता.

वतनदारांना राज्यापेक्षा वतन अधिक मोलाचे वाटते, परचक्र आले म्हणजे वतनदार वतनाच्या आशेने आधी तिकडे संधान बांधून स्वराज्याशी द्रोह करितात. हे वतनदारांच्या बाबतीत शिवाजी महाराजांचे मुख्य दुखणे होते. अशा घरभेदे-

पणाला त्यांच्यापाशी क्षमा नव्हती. पण राजारामाच्या काळी कितीतरी वतनदार वतनाच्या लोभाने मोगलांना फितूर होत, परत त्याच लोभाने स्वराज्यात येत, पण त्यांच्या या अपराधाला शासन म्हणून काही राहिले नव्हते. संभाजी नरसोजी गायकवाड देशमुख तपे बिरवाडी याचा बाप नरसोजी गायकवाड रायगडावर होता. त्याने इतिकदखानाने रायगडास वेढा घातला असता त्याला भेटून गडावरचा सर्व भेद सांगितला. म्हणून त्याची देशमुखी जप्त करण्यात आली. पण त्याचा मुलगा संभाजी गायकवाड याने इमानाने चाकरी केली म्हणून गुन्हा माफ करण्यात आला व पांचशें होन दंड घेऊन देशमुखी परत बहाल करण्यात आली. बाजी सर्जेराव जेध्याने तर स्पष्टच सांगितले आहे की, "रायगड व वरकड गडही किले कोट गनिमाने घेतले. मुलकाची अवकात चालले नाहीत. ये गोष्टींनी गनिमासी सामिल होऊन फिसाती केल्या; त्याबराबर आपणासी चारी दिवस वर्तावे ऐसे जाहाले." पुढे तो म्हणतो, "परंतु आपणही स्वामीच्या पायासी एकनिष्ठेने वर्तावे हाचि निश्चय करून होतो." मसूरचा देशमुख सुलतानजी जगदाळे याचीही कथा अशीच होती. तो वतन राखावे म्हणून प्रथम औरंगजेबाला भेटला, नंतर राजारामाकडे आला. राजारामाने त्याला काहीही शासन केले नाही. कारण जगदाळे वागत होता तसे सगळेच वागत होते. राजारामच म्हणतो "सुलतानजी जगदाळे याणे औरंगजेबास भेटून त्याजकडून आपले वतन मसूरच्या देशमुखीचे फर्मान करून घेतले, म्हणून याजवरी दोष ठेवावा, तरी वतनाचा मामला म्हणून, जी कारकीर्द झाली त्या कारकिर्दीचे कागदपत्र (लोक) करून घेतात, ते रीतीने याणेही फर्मान घेतले. ऐशियास हा स्वामींच्या पायापाशी आला याकरिता स्वामींनी याजला मोगलास भेटला तो अन्याय क्षमा करून, वतन मुक्रर करून दिले असे. तुम्ही याजवर काही दोष न ठेवणे. आणि याचे चालवीत जाणे. याच्या हाते स्वामीसेवा घ्यावयाची ते घेत जाणें. याच्या वतनास इतक्या उपर खलेल न करणे. याचे पूर्वापार फार दिवसाचे चाललेले आहे."

वतनाची अनिवार आसक्ति ही चीज काय आहे, व तिने झपाटला म्हणजे त्या काळचा मराठा कोणत्या थराला जाऊ शके याचे सूर्याजी पिसाळापेक्षा बोधप्रद उदाहरण शोधूनही सापडणार नाही. याने रायगडास मोर्चे लावून व मध्यस्थी करून गड झुल्फिकारखानास हस्तगत करून दिला. त्याबद्दल औरंगजेबाने त्याला वाईच्या देशमुखीची सनद दिली. पण वाई मराठ्यांनी घेतली हे कळल्याबरोबर जिंजीला झुल्फिकारखानाबरोबर वेढा घालण्यास आला असता, त्याला पारखा होऊन त्याने तडक राजारामाशी संधान बांधले, राजारामाची दासीकन्या आपल्या औरस मुलाला करून घेतली व वाईची देशमुखी मिळविली, पण ताराबाईच्या कारकिर्दीत त्याची डाळ शिजली नाही तेव्हा तो परत मोगलांकडे गेला. तेथे दंडेली करून आपला दावेदार दत्ताजी पिसाळ याच्याकडून अर्धे वतन लिहून घेतले. दत्ताजी

औरंगजेबाकडे फिर्याद घेऊन गेला तेव्हा यश मिळविण्यासाठी सूर्याजी मुसलमान-सुद्धा झाला! पण औरंगजेबालाच सत्याची चाड जास्त म्हणून त्याने त्याला वतन दिले नाही ही गोष्ट निराळी. पण वतनासक्तीने विवेकभ्रष्ट झालेल्या मराठ्यांचा सूर्याजी हा एक प्रतिनिधि होता इतकेच. "विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः!"

हा सूर्याजी काय किंवा जगदाळे काय किंवा जेधे काय किंवा नरसोजी गायकवाड काय, हे लोक काय आहेत हे राजारामाला किंवा रामचंद्रपंताला कळत नव्हते असे थोडेच आहे? वतनासक्ति हा मराठ्यांना जडलेला केवढा कर्करोग आहे याची त्यांना कल्पना नव्हती असे कसे म्हणावे? पण परिस्थितीच अशी आली होती की, वतने देईल तिकडे मराठे जात होते. राजारामाने दिली नसती तर औरंगजेब देत होता. स्वराज्य वगैरे दुय्यम, वतन मुख्य. अशा स्थितीत शिवाजी महाराजांची करडी शिस्त पाळण्याचा प्रयत्न केला असता तर राजारामाच्या पाठीमागे किती मराठे उभे राहिले असते हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. मुक्तहस्ताने वतने वाटली म्हणून मराठ्यांकडचे मराठे तर राहिलेच, पण मोगलांकडचेही नागोजी मान्यासारखे मराठे मराठशाहीकडे वळले. हणमंतराव घोरपडे, अमृतराव निंबाळकर, नागोजी माने अशा मोगलांकडच्या प्रत्येक मराठा सरदाराला राजारामाने वतन दिलेले आहे. "तुम्हांवर स्वामी कृपाळु होऊन नूतन सरदेशमुखीचे वतन सदरहु बारा महालाचे करून दिले असे–" "देशमुखीचे वतन कर्याती सेलगाव व कर्याती अंबापूर, पाटीलकीचे वतन मौजे भाडले, एकेबे व शिरढोणचे–" "तुमचे देशमुखीचे महाल इनाम करून दिल्हे आहेत–" अशी भाषा सर्वत्र आहे बाकी "स्वामीचे राज्य म्हणजे देवताभूमि, या राज्यास ताम्राचा उपद्रव न व्हावा, महाराष्ट्र धर्म रहावा, स्वामीच्या राज्याची अभिवृद्धि व्हावी–" ही फक्त बोलण्याची दरबारी भाषा. या कानाने ऐकायची व त्या कानाने सोडून द्यायची. जरा कोठे बिनसले, वतन मिळाले नाही की चालले औरंगजेबाकडे. मग कुठली देवता भूमि व कुठला महाराष्ट्रधर्म!

राजारामाच्या काळी वतनाची महापर्वणी झाली होती. याबद्दल त्याला जबाबदार धरताना त्या काळच्या परिस्थितीचा विचार जरूर केला पाहिजे. "जो कोणी वतनदार एकनिष्ठा धरून येईल, गडकोट हस्तगत करून देईल, या राज्याचे ठायी दृढनिष्ठा धरील, आणि स्वामीकार्य करून देईल, त्यास इसाफती व वतनभाग चालिला असेल तेणे प्रमाणे दुमाला करून लिहोन पाठविणे. सनद सादर होईल तेणेंप्रमाणे मजुरा असे." असे रामचंद्रपंताने वतनदारांना आश्वासन दिले. म्हणून मराठे स्वराज्यात राहिले व त्यांनी पराक्रम केले. आता हे पराक्रम निर्भेळ स्वराज्यनिष्ठेऐवजी शबल वतनासक्तीसाठी झाले हे म्हणणे शक्य आहे. पण तरी ते पराक्रम होते व त्यामुळे राज्य टिकले हेही मान्य करणे भाग आहे. औरंग-

जेबाच्या घशात जेथे सर्वच राज्य जाण्याचा प्रसंग आला होता, तेथे शिवाजी महाराजांच्या करडचा तत्त्वाला मुरड घालून का होईना, राज्य राखले ही कर्तबगारी काय सामान्य म्हणता येईल? तत्त्वाची महती सर्वमान्य आहे. राज्य आहे तेथे शिस्त असलीच पाहिजे हेही योग्य आहे. पण राज्यच नसले तर शिस्त कशाला लावणार? "सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पण्डितः" असे कवि म्हणतो ते काही खोटे नाही.

पण राज्य राहिले तरी तत्त्व गेले हाही नैतिक पराजय तितकाच मोठा होता. वतनाची चटक समस्त मराठ्यांना लागली, त्याच्यातून भले भलेही सुटले नाहीत. व राजारामाला त्यांना आवरता आले नाही. या काळातील मराठ्यांच्या सामूहिक नेतृत्वाची ही शोकांतिका आहे. धनाजी जाधव, संताजी घोरपडे, शंकराजी नारायण, रामचंद्रपंत अमात्य, सुंदर तुकदेव इत्यादि मराठी राज्यातील साऱ्या कर्त्या पुरुषांना या वतनदारीच्या मोहाने पछाडले होते. अपवाद जवळ जवळ शपथेलासुद्धा नव्हताच.

धनाजी जाधवराव एवढे पराक्रमी. मोगलांचे घोडे पाणी पीईनात तर 'पाण्यात तुला धनाजी दिसतो की काय' म्हणून त्यांनी घोडचाला विचारावे अशी त्याची कीर्ति. एवढा पराक्रम गाजविताना दिवसाचे चोवीस तास अपुरे पडावेत अशी खरे म्हणजे त्या वेळची परिस्थिति होती. पण तेवढ्या धामधुमीत कऱ्हाडच्या यादवाची बाजू घेऊन मसूरच्या जगदाळे देशमुखला सतावण्याइतकी सवड धनाजीबाबा काढीतच होते. मसूरचा हा महादजी जगदाळे आणि कऱ्हाडचा गिरजोजी यादव यांचा देशमुखीचा तंटा तत्कालीन मराठ्यांच्या मनोवृत्तीवर चांगलाच प्रकाश टाकणारा असल्यामुळे त्याची संक्षिप्त हकीकत देणे येथे अस्थानी होणार नाही असे वाटते.

गिरजोजी यादवाचे म्हणणे असे की परगणे कऱ्हाड व परगणे औंध येथली देशमुखी पूर्वापार आपली चालत आली आहे. यादवांच्या पूर्वजाने वणगोजी नाईक निंबाळकराला मिळून पुंडावा केला म्हणून आदिलशहाने ती देशमुखी जप्त करून रणदुल्लाखानाला व नंतर शहाजीला दिली. शहाजीकडून शिवाजी महाराजांकडे ती आली. महाराजांची सेवा करीत असता अर्जोजी यादवाने ती मागितली. तेव्हा फक्त औंध परगण्याची देशमुखी त्याला मिळाली. पण ती महाराजांच्या कैलासवासानंतर. कारण महाराजांनी वचन दिले असले तरी ते पूर्ण करण्यापूर्वीच ते मृत्यु पावले. ते वचन संभाजीने पूर्ण केले. अर्जोजी यादवानंतर गिरजोजी यादवाने कऱ्हाडची देशमुखी मिळविण्याचा राजारामाच्या कारकिर्दीत प्रयत्न केला. राजारामाची त्याने फार सेवा केली. रायगडावरून त्याचे सोने नाणे पन्हाळ्याला नेऊन पोचविले पन्हाळ्याहून जिंजीला पोचविले, प्रत्येक वेळेला दिलेले रोख बक्षीस नाकारून वतनाचीच मागणी केली तेव्हा राजारामाने त्याला संपूर्ण कऱ्हाड

परगण्याचे वतन न देता उंब्रज व तारगाव परगण्याचे वतन दिले. गिरजोजीचा प्रयत्न चालूच राहिला. राजा कर्ण झुल्फिकारखानाकडे शिष्टाईस गेला तेव्हा त्याच्याबरोबर गिरजोजीच होता. त्यानेच जिंजीच्या वेढ्यातून राण्यांना व राजकुमारांना सुखरूप राजारामाकडें पोचविले. तेव्हा राजारामाने त्याला कऱ्हाडच्या देशमुखीचे वतन देण्याचे ठरविले. पण प्रत्यक्षात ताराबाईने त्याला ते १७०३ मध्ये करून दिले. गिरजोजीच्या या 'यत्न तो देव जाणावा' अशा तपश्चर्येने संतुष्ट होऊन त्याचा भाऊबंद पिराजी यादव म्हणाला की, "तू आमचे कुळी जन्मलास. आमचा वतनाचा उधार केला."

गिरजोजी यादव हा खंडो बल्लाळाप्रमाणेच राजारामाचा निष्ठावंत सेवक. पण त्याची सेवा खंडो बल्लाळाप्रमाणे निष्काम नव्हे. जवळजवळ पंचवीस वर्षें छत्रपतींच्या सेवेत त्याने भोगलेले कष्ट पाहून जितके कौतुक वाटते, तितकेच हे कष्ट छत्रपतीपेक्षाही वतनाच्या प्राप्तीसाठी होते हे समजले म्हणजे खेद होतो. इतकेच नव्हे, तर छत्रपतीपाशी उभी हयात घालविलेला हा गिरजोजी यादव, विशाळगडावर औरंगजेब आला असता, प्रसंग पडला तर जवळ असावे, म्हणून मराठ्यांच्या ह्या कट्टया शत्रूचेही वतनासाठी फर्मान घेऊन ठेवतो! त्याचेच शब्द आहेत की "राजश्री शाहूराजे आले त्या अगोदर चारही वर्षें आम्ही पादशाहा औरंगजेब याचा फर्मान देशमुखीचा करून घेतला व दिवाणी परवाने व मिसला करून घेतल्या. त्यास खर्च रु. ॥३२००० दिल्हे ॥" म्हणजे वतन एकच पण फर्मान ताराबाईचेही घ्यावयाचे व औरंगजेबाचेही घ्यायचे! आणि हा माणूस राजारामाचा अत्यंत विश्वासू, त्याच्या अंतःपुराचा सरहवालदार होता. त्याने संगमेश्वराला संभाजीला मुसक्या बांधून नेंत असताना पाहिलेले होते, त्याने शिवाजी महाराजांचा पावनगड बांधला होता व त्यांची अमृतवाणी ऐकली होती! आणि अशा माणसाला औरंगशहाच्या फर्मानाची जरूर वाटावी! खरोखर, वतनदेवते तुझा महिमा अगाध आहे, हेच खरे!

आता मसूरच्या जगदाळेचे म्हणणे होते की कऱ्हाड व मसूरची देशमुखी पूर्वापार आपली. ती शहाजी राजांनी घेतली व तेथून शिवाजी महाराजांकडे व संभाजीकडे आली. संभाजीने आपणास मसूरची देशमुखी करून दिली. पण आपले दुर्दैव असे की धनाजी जाधव हा गिरजोजी यादव, पिराजी यादव, पदाजी यादव या यादवांचा पक्ष घेऊन तीही देशमुखी आपणास सुखाने खाऊ देत नाही. यादवाबद्दल धनाजीला ममत्व वाटावे यात नवल नाही. यादव व जाधव एकच. जगदाळे आपल्या तकरीरीत म्हणतो – "संभाजीस अर्ज केला. साहेबी कऱ्हाडची देशमुखी घेतली. मसूरीचे तरी आपले वतन दुमाला करणे, कऱ्हाडची नाव गोष्टी काढणार नाही. ते मेहेरबान होऊन मसूर परगण्याची देशमुखी दुमाला करावी ऐसे केले. राजाराम पळोन चंदीस गेला. त्याचे आर्जव करून देशमुखी दुमाला

करून घेतली. आपली देशमुखी करीत असता धनाजी जाधव याचे निसबतीचे पदाजी व पिराजी यादव यांचे लेक व हे हजारी पंचहजारी चाकर होते. यांनी व धनाजी जाधवाने मागती आपणासी कथला केला. राजारामाच्या लेकांनी (राजा कर्ण) तजवीज करून धनाजी जाधव यास सांगितले की कऱ्हाडची देशमुखी भोसल्यांची ऐसे कळले म्हणजे पादशाहा खालसा करतील. तरी पदाजी व पिराजी यादव यांस पाठवून कऱ्हाडचे देशमुखीवरी ठेवणे–जे पैसे लागतील ते त्यांस पुरविणे. ऐसी हुन्नरबंदी करून पदाजी व पिराजी यादव हे कऱ्हाडी ठेविले. जो टक्का लागतो तो धनाजी पुरवितो.... धनाजी व यादव मजसी दावा करीत आहेत."

हा जगदाळे आणखी एका ठिकाणी कळवळून म्हणतो– "त्यांचा (पिराजीचा) भाऊ गिरजोजी यादव हा राजीयापासी आहे. हा व धनाजी जाधव याने आपले स्वार व प्यादे मुलकामध्ये पाठविले आहेती की कोण्ही जमीनदार महादजी देशमुख मसूरकर यांची शहादी द्याल म्हणीजे मारिले जाल. म्हणौन धनाजीचा भाऊ रयतास धरून नेऊन मुचलके घेताती. ऐसे मजवरी जुलूम करून माझे कऱ्हाडीचे वतन घेतले व मसूरचे घेऊ म्हणोन कराडीच्या देसपांडियाचा भाऊ रुद्राजी चंदो यास धनाजीने ब ॥ देऊन प्रत्यक्ष गणीम मजवरी उभा केला आहे." या कऱ्हाडच्या देशपांडेला जगदाळेविरुद्ध भांडण्यासाठी धनाजीने पंधरा हजार रुपये दिले असे जगदाळे याचे म्हणणे आहे.

सुंदर तुकदेव म्हणून एक गृहस्थ राजारामाचा दासीपुत्र राजा कर्ण याचा कारमारी होता. हा चांगला कर्तृत्ववान् होता. पण अनेक वेळा त्याचे कर्तृत्व नको त्या मर्यादेस जाऊन भिडे. हा सुंदर तुकदेव आणि धनाजी जाधव या दोघांनी यादवाची बाजू घेऊन जगदाळयाच्या देशमुखीची वीस गावे ओरबाडून यादवाला दिली. जगदाळयाने राजारामाकडे तक्रार नेली तेव्हा त्याने धनाजी जाधवाला या बाबतीत लक्ष घालण्याची आज्ञा केली व सुंदर तुकदेवाला तंबी दिली की, "देशमुख मजकुराचे वतन चालत असता सांप्रत तुम्ही देशमुख मजकुराचे वतनास इस्कील करून कथला केला आहे म्हणून विदित झाले. व मसूर महालाचे गाव सत्तावन फर्मानी लिहिले आहेत त्यापैकी गाव सदतीस त्या महालाकडे चालत आहेत. बाकी वीस गांव यादव देशमुख ताा उंब्रज व ताा तारगाव व ताा आउंध याच्या कथले यामुळे चालत नाहीत म्हणून विदित जाले तरी महादजी जगदाळे देशमुख ताा मसूर यांचे वतन स्वामीने करार करून दिले असता तुम्हांस कथळा करावया काय गरज आहे. तरी महादजी देशमुख ताा मसूर याचे वतनासी कथळा न करिता सुरक्षित चाले ते करणे. फिरोन बोभाटा येऊ न देणे. जाणिजे." पण राजारामाच्या या ताकिदीला सुंदर तुकदेवाने बिलकुल दाद दिली नाही. त्याने ते ताकीदपत्र गुंडाळून ठेवून दिले.

या बाबतीत राजारामाने संताजी घोरपडेलाही लिहिले होते की, "कोण्ही बिलाहरकत करील त्यास तुम्ही ताकीद करून सुरक्षित चालविणे." तेव्हा संताजीने राजारामास कळविले की, "त्यास सांप्रत पदाजी यादव व आणखी त्याचे भाऊबंद यास देशमुखीच्या सनदा दिल्या. ते देशास येऊन खटपट करितात. यावरून वतनाचा व मुलुकाचा डोहाणा होतो. सांप्रत महादजी जगदाळे स्वामीच्या पायासी आले आहेत. स्वामी दयाळू होऊन देसमुखी करार केली त्याप्रमाणे यादव यास मागती पत्र करून दिले पाहिजे. दया पूर्ण केली पाहिजे." संताजीने जगदाळ्यांची बाजू घेतली त्यामुळे यादवांचा पाठपुरावा करणारा धनाजी गरम झाला. दोघांचे वाकडे येण्यास जी अनेक कारणे झाली त्यांत हे महत्त्वाचे कारण होते. संताजी मरून गेला. पण धनाजीने त्याचा द्वेष मनातून टाकला नाही. या प्रकरणानंतर सत्तावन गावच्या देशमुखीचे हे प्रकरण निकालात काढण्यासाठी महादजी जगदाळ्याचा मुलगा यशवंतराव जगदाळे हा संताजी घोरपड्याचा भाऊ हिंदुराव घोरपडे याच्या मार्फत शाहूला भेटला. तेव्हा धनाजीला संताप आला की, "आपला दावेदार घोरपडा याची पाठी करून महादजी जगदाळे याचा लेक आला तेव्हा कैसी देशमुखी खाऊ पाहतो म्हणौऊन राजश्री जाधवराऊ सेनापति यांनी निकस करून जोरावारीने महादजी देशमुखांची देशमुखी देह ५७ पुरातन चालत आली असता हाली छत्रपति साहेबास संकट घालून अतिशय करून पाटगावीचे मोकामी रुसवा करून सनद करून घेतली."

जी कथा सेनापति धनाजी जाधवरावांची तीच सचिव शंकराजी नारायणाची. त्याने तर दादजी नरस प्रभू गुप्त याला प्रत्यक्ष शिवाजी महाराजांनी दिलेले वतनच खाऊन टाकले. महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात प्रारंभापासून ज्यांनी त्यांना जिवाभावाने सहकार्य केले, त्यांच्यात दादजी प्रभु होता. महाराजांनी त्याला आश्वासन दिले होते की, "राजश्री दादापंताचे विद्यमाने बाबाचे व तुमचे व आमचे श्रीपासी इमान जाले ते कायम वज्रप्राय आहे. त्यात अंतर आम्ही व आमचे वंशज लेकराचे लेकरी वतन वगैरे चालविण्याविसी कमतर करणार नाही." राजारामाच्या काळी दादजी फार म्हातारा झाला होता. त्याचा थोरला मुलगा शाहू व येसूबाई यांच्या सेवेत औरंगजेबाच्या छावणीत होता. राजाराम जिंजीस होता. या राज्यक्रांतीच्या धामधुमीचा फायदा घेऊन शंकराजी नारायणाने दादजी प्रभूचे जुने दावेकरी जेधे व लोहोकरे यांचेशी संगनमत केले व दादजीचे वतन बेवारस आहे असे राजारामास कळवून त्याचे वतन घशाखाली घातले. सचिव शंकराजी नारायण याच्या हाती मावळात त्या वेळी 'कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम्' अशी सत्ता होती. जबरदस्ताच्या वाटेला कोण जाणार? तेव्हा दादजीने आपली तक्रार राजारामापुढे गुदरली. राजारामालाही ते ऐकून अतिशय संताप आला

आणि त्याने शंकराजी नारायणाला कडक पत्र लिहिले. पत्र खरोखर इतके कडक आहे की, इतकी कडक भाषा वापरण्याची वेळ राजारामासारख्या शांतिब्रह्मावर यावी, यावरूनच सचिवाचा गुन्हा केवढा असला पाहिजे याचा अंदाज करता येतो. " राजश्री दादजी नरस प्रभू देशकुलकर्णी व गाव कुलकर्णी देहाये तर्फ रोहिडखोरे व वेलवंडखोरे याचे वतन तुम्ही जप्त केले. त्यांनी नजराण्यांचा ऐवज रायगडी हुजूर कैलासवासी स्वामीपासी जामदारखान्याकडे दिला. त्याजवर वतनाची मोकळीक सर्वा जमेदाराबरोबर मावळ प्रांताची मोकळीक जाली तेव्हा याचीही केली. पुढे तुम्ही सर्जेराऊ जेधे देशमुख याचे तर्फेने आकसामुळे याचे वतन आपल्यास जेधे याजपासून करून घेतले. येविसी खबर प्रभू देशपांडे याणी पनाल्याचे मुक्कामी जाऊन राजश्री रामचंद्रपंत अमात्य यास सर्व वाका समजावून त्यांनी त्याची तकरीद घेऊन हुजूर चंदीचे मुक्कामी तेव्हा र ।। केली. नंतर याचे वृत्तीचा बंदोबस्त करावा तरी तुम्हीच अफलादीचा विशेष, वतन बेवारसी आपल्यास द्यावे म्हणोन विनंतीपत्र सक्राजी ढग्याबरोबर लिहिले. तेव्हा स्वामींनी राजकारणावर नजर ठेवून बेवारसी वतन असल्यास तुम्हास देसी आल्यावर चौकशी करून देता येईल असे लिहिले असता त्याचे पत्रावर तुम्ही प्रभूवर बलात्कार करून घरातून कागद नेले. त्यास हाली दादजी प्रभू हुजूर किले रांगण्याच्या मुकामी चंदीस येण्याबद्दल आले. तो स्वामी देसी येता भेट घेतली. सर्व कैफियत कळविली. त्यास तेच वेळी तुम्हांस पत्र लिहिले की हे वतन घ्यावयाचे नाही.... त्याचे वतन त्यास देवावे. असे ठरून हे आज्ञापत्र तुम्हांस सादर केले असे. हे वतन तुम्ही जेधें व लोहोकरे मिळोन नाहक घेतले. याचे चिरंजीव कृष्णाजी प्रभु अशा अडचणीचे प्रसंगी स्वामीस संकट समयी बादशहानी चिरंजीव व कबिले नेले. त्याजपाशी चाकरीवर हजर असता, मागे त्याचे वतन दरोबस्त घेता हे तुम्हांस उचित एकंदर नाही. तरी या उपरी याचे वतनाचे कागदपत्र नेले त्यासुद्धा परत देऊन त्यांचे वतन त्यांजकडे चालत आल्याप्रमाणे चालवणे. आणि खासा स्वारी तिकडे येताच यऊन भेटण. यांनी कै. थोरले स्वामीपाशी फार शर्थीची चाकरी हरवख्त हुजूर राहून धारेकऱ्यात मर्दुमी मोठे धाडसे, जिवाची परवा न धरिता केली. त्याचे वतन तुम्हांस जेधे यांस देण्यास अधिकार नाही व तुम्ही करून घेण्यास अधिकारच नाही. पेशजी व हाली या जातीने फार मर्दुम्या करून राज्य मिळविले व स्वामीकरिता खराब जाले व मारले गेले. सबब हे वतन परत देणे. मावळ मजकुरी स्वारी येण्याचे पूर्वी वतन न दिले हा बोभाटा आल्यास तुमचे अब्रूस व पदास धक्का येईल असे स्वामीस भासत आहे; व पुढे नाना प्रकारच्या अडचणी अशा करणीच्या तुम्हास येतील. कारण चिरंजीव (शाहू) कालेकरून तरी श्री देशी आणील. तेव्हा संकटी जी माणसे उपयोगी पडली त्यांच्या तसनसी आम्ही करविल्या; हे इकडे यावे आणि त्यांच्या चित्ती द्वेष यावा व राज्यकर्त्यास

इन्साफ पाहणे जरूर; त्यास हे तरी अविचाराचे कलम भलाई जाली ती सारी आमची एकीकडें जाऊन, अशी करणी तुम्ही केली यात स्वामीद्रोहाचेच करणे होय. उगेच भलते भरी न पडणे. पुढे ऊर्जित होय ते करणे. न केल्यास केले कामाचा फळे ज्याचे ते भरतील अशी श्रींची इच्छाच असली तर तुम्ही तरी का समजाल! जाणिजे."

पण उपयोग काही झाला नाही. सचिवाने स्वामींचा कडक निषेधखलिता वाचला आणि बाजूला ठेवून दिला. राजारामाच्या हयातीत बिचाऱ्या दादजीला त्याचे वतन काही परत मिळाले नाही. छत्रपतीचा आपल्या सरदारांवर वचक हा अशा प्रकारचा होता.

सामान्यतः संताजी घोरपडे हा करडचा शिस्तीचा पुरस्कर्ता असल्यामुळे वतनासक्तीपासून अलिप्त असावा असे वाटते. "आमचे राज्यात नवी वृत्ति करून द्यावी असा दंडक नाही" असे तो म्हणतो. महादजी जगदाळेला न्याय मिळावा म्हणून त्याने प्रयत्न केला आणि वैयक्तिक दोषाप्रमाणेच काही प्रमाणात तरी शिस्त राखण्याच्या अट्टाहासापायीच त्याची अखेर आहुति पडली ही गोष्ट प्रसिद्धच आहे. पण असे दिसते की, वतनाच्या बाबतीत संताजीही इतरांसारखाच होता. १६९२ मध्ये त्याच्या कामगिरीबद्दल मिरज कर्याती बेवीस येथील देशमुखी अजरामरामत करून दिली, ती त्याने नाकारली नाही, ती घेतली. हेही एक वेळ असो. पण पुढें उघडकीस आले ते असे की संताजीने राजारामास मिरजकर्यातीतल्या ह्या पूर्वीच्या देशमुखांबद्दल गैरवाका समजावून देशमुखीची मागणी केली. संताजी मेल्यानंतर या पूर्वीच्या देशमुखांपैकी नरहरि बल्लाळ व सिदोजी बिन हरमाजी देशमुख यांनी राजारामाकडे तक्रार केली की, "बावीस कर्यातीचे देशमुखीचे वतन पुरातन आमचे दरपिढी चालत आले आहे. असे असता संताजी घोरपडे चंदीचे मुक्कामी फौज घेऊन गेले ते समयी स्वामीस गैरबाका विदित केले की प्रांत मजकुराचे देशमुख मोगलाकडे मिळाले आहेत. स्वामीकडे रुजू होत नाहीत. याकरिता स्वामींनी प्रांत मजकुरीचे देशमुखीचे वतन आपणास अजरामरातब करून दिले पाहिजे. त्यावरून स्वामी याणी वतन संताजी घोरपडेस देऊन पत्र करून दिले. यैमियास आपण पुरातन वतनदार आहों, स्वामींचे पायासी एकनिष्ठेने वर्तणूक करितो" देशमुखांची ही फिर्याद ऐकून राजारामाची न्यायबुद्धि जागी झाली. संताजीही मरून गेला होता. त्यामुळे राजारामाने विलंब न लावता पूर्वीचा चूक दुरुस्त केली हे सांगणे नकोच. त्याने राजाज्ञा काढली की, "संताजी घोरपडे यास वतनाची पत्रे लिहून दिली होती ती दूर झाली आहेत."

प्रल्हाद निराजी हा राजारामाच्या कारकिर्दीतील आणखी एक कर्ता मनुष्य. त्याचा बाप निराजी रावजी याच्या वेळेपासून हा स्वराज्यात खपत होता. राजाराम जिंजीस गेला त्या वेळी प्रल्हाद निराजीने त्याला फार मदत केली. "त्यानेच

शत्रूचे निवारण करून राजारामास सांभाळून सुखरूपपणे आणले. नाना संकटांस तोंड देऊन त्याचा बचाव केला. त्याजकडेच राजारामाने जिंजी येथील आपला सर्व कारभार सोपविला. जणू काय हा प्रत्यक्ष बापच असा त्याचा मान राजाराम ठेवतो." असे फ्रेंच गव्हर्नर मार्टिन त्याच्याबद्दल म्हणतो. चिटणिसानेही त्याचा मोठा गौरव केला आहे. " प्रल्हादपंत शाहाणे बहूतच कर्ते निघाले. त्यांचे ठायी बहूत विश्वास. सर्व मसलतीचे मुळापासून माहीत तजविजा करणे (वगैरे गोष्टीत) अध्यक्ष तेच केले.....आपले प्रतिमेचे हे यास्तव. प्रतिनिधि ऐसे पद नवेच योजना करून दिले. " या प्रल्हाद निराजीचा निराळाच प्रकार होता. याचे बाबतीत वतनाचा बोभाटा काही ऐकू येत नाही. पण याला लाच खाण्याची जबर सवय होती. तेग्नापटणचा मजबूद गड, कुडालूरसारखे शहर व जवळची खेडी याने राजारामाची पैशाची नड भागण्यासाठी इंग्रजांना विकली. प्रथम सौदा दोन लाखांचा ठरला होता, पण इंग्रजांनी लाचाची रक्कम वाढवून दिल्याबरोबर दोन लाखाऐवजी अवघ्या पन्नास हजार चक्रांना हा व्यवहार प्रल्हाद निराजीने पार पाडला. इतकेच नव्हे तर इंग्रजांना सर्व राज्यातील व्यापारावर जकातही माफ करून दिली. या उद्योगात प्रल्हाद निराजीला आठ हजार, त्याच्या भावास पाच हजार व इतर अधिकाऱ्यांस सात हजार चक्रे मिळाली. १६९३ च्या जानेवारीत मराठ्यांचा अवसानघात करून राजारामाने झुल्फिकारखानाशी युद्धतहकुबीचा करार केला त्यामागे प्रल्हाद निराजीचा हात होता, असा प्रवाद होता. त्याने आपला खिसा भरून घेतला व खानाशी तह करण्याचा राजारामाला सल्ला दिला. असा संताजी घोरपडे प्रभृतींचा त्याचेबद्दल आक्षेप होता. " आपणास विचारल्याशिवाय फक्त एक प्रधानाच्या सल्ल्याने परभारे यांनी तहकुबीचा करार का करावा ? .... प्रधानांनी लाच खाऊन आपले खिसे भरावे. आणि आम्ही मात्र लढून मरावे." पण मुखलेप दिल्यानंतर मधुर ध्वनि करणाऱ्या मृदुंगाचे अनुकरण करण्याचा हा जो उपद्व्याप प्रल्हाद निराजीने केला तो त्याला अखेर फार महागात पडला. त्याची महाराष्ट्रात सर्वत्र नाचक्की झाली. अखेरीस देशी जातो म्हणून राजारामाचा निरोप घेऊन तो पंढरपुरास आला व तेथे पांडुरंगाचे दर्शन घेऊन पुंडलिकाच्या देवालयापाशी रेशमी दोरीचा फास घेऊन त्याने आत्महत्त्या केली असा प्रवाद आहे.

पण रामचंद्रपंत अमात्याचे उदाहरण तर या सर्व उदाहरणांना मागे टाकील असे आहे. पंत हा 'हुकमतपन्हा' होता, शिवाजी महाराजांचा दुर्लभ सहवास त्याला प्रत्यक्ष लाभला होता. त्यांच्या राजनीतीचे मर्म विशद करणारे आज्ञापत्र त्याने लिहिले. 'वतनदार म्हणजे राज्याचे दायादच होत.' 'यवोदर प्रमाण भूमी तेही इनाम देऊ नये.' ही शिवाजी महाराजांच्या राजनीतीची प्राणतत्त्वे त्याच्याच लेखणीतून बाहेर पडली. पण प्रत्यक्ष वतनाच्या बाबतीतला त्याचा अनिवार लोभ

पाहिला तर ' लोका सांगे ब्रह्मज्ञान ' अशाच कोटीतला तो गृहस्थ असल्याची साक्ष पटते. राजारामाच्या मृत्यूनंतर धाकट्या छत्रपतीने त्याच्या मज्मूचा हुद्दा त्याला देऊ केला, पण त्या पदाची त्याला किंमत नाही. तो त्याला ' बारगीर वस्तु ' असे तुच्छतेने म्हणतो. त्याला पाहिजेत ती त्या हुद्द्याबरोबर कदीम व नवी वतने ! " स्वामीने आपला मजमूचा हुद्दा जीर्णोद्धार करून सांगितला, परंतु हुद्दा म्हणजे बारगीर वस्तु आहे याकरिता स्वामींनी आपली पहिली वतने व इनामती, व नूतनही इनामती व वतने अजरामऱ्हामत करून वंशपरंपरेस चालेत ऐसी आज्ञा केली पाहिजे. " काही काळ शाहूकडे जाण्याचा पंताचा विचार चालला होता. तेव्हा शाहूला अट म्हणून त्याने घातली की, " आम्ही मान्य पुरुष हुकुमतपन्हा आहे ते चालवावे." त्याबरोबर मज्मूच्या वतनांची लांबलचक यादी आहे. त्यात शेंदोनशे गावांच्या वतनांची नावनिशी आहे. त्याशिवाय किल्ल्यांच्या सबनिशा, कारखाननिशा, लष्करच्या मजमा आहेत. त्या यादीत नाही काय हे सांगणे कठीण.

पण पंत मजकूर केवळ आप्पलपोट्या नव्हता. त्याने स्वतः बरोबर आपल्या बायकोची व मुलांचीही चिंता वाहिली. बायको जानकीबाई हिच्यासाठी मौजे बुरंबाड हे वंशपरंपरा इनाम करून घेतले. मुलगी ठकूबाई हिला दूध-भातानिमित्त संगमेश्वर तरफातला मौजे कडवई हा गाव इनाम करून घेतला. मुलीनंतर मुलगा आलाच. मौजे सेलोली तर्फ खानापूर हा गाव भगवंतराव रामचंद्र यास दूधभातानिमित्त इनाम करून देण्यात आला. पंत हा असा ' कुटुंबवत्सल ' मनुष्य होता. नाहीं तरी राज्य मुलालेकरांसाठीच असते. पंतांच्या वागण्यावरून ' वसुधैव कुटुंबकम् ' याचा अर्थ चांगला मनात ठसतो. कुटुंब हीच वसुधा.

' लोलंगते येवढे अभाग्य । दुसरे नाही ' असे समर्थांनी म्हटले आहे. पंत हा समर्थांचा शिष्य. त्यांचा प्रत्यक्ष अनुग्रह त्याला लाभला होता. पण या समर्थवचनाचे मर्म स्वारीच्या लक्षात आलेले दिसत नाही. स्वतःसाठी शेदोनशे वतने मिळविली, बायकोसाठी मिळविली, पोरासाठी मिळविली, पोरीसाठी मिळविली. पण पंताची वतनतृष्णा अग्नीत तूप ओतावे त्याप्रमाणे वाढतच चालली. ' न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति । हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ।' एकदा असे झाले की खटाव परगण्यातील अठरा गावांची गावकुलकर्ण व ज्योतिषे आणि परगण्याचे देशकुलकर्ण मूळ कृष्णाजी बुलगो इत्यादि असामींची असून ती दुसऱ्यांनी जबरदस्तीने बळकावली होती. हे लोक न्याय मागण्याकरिता पंताकडे आले. पंताने राजमंडळाची सभा भरवून कृष्णाजी बुलगो इत्यादि असामी खरे ठरविले व त्यांस न्याय दिला. येथपर्यंत ठीक होते. पण पंताने पुढे मखलाशी अशी केली की वतनाचा अर्धा भाग कृष्णाजी बुलगो प्रभृतींनी उपभोगावा व बाकीचा रामचंद्रपंताने घ्यावा. सबब काय, तर मूळ वतनदारांचे संरक्षण व्हावे. आणखी एक असेच

मजेदार उदाहरण आहे. समर्थांच्या प्रयाणानंतर त्यांचे शिष्य वेदमूर्ति दिवाकर भटजी यांना चाफळ व सज्जनगड येथील देवस्थानाच्या व्यवस्थेसाठी अनेक गावे छत्रपतींनी इनाम करून दिली. त्यात पंताचे साहाय्य अर्थात झालेच. पण पंताचे साहाय्य निरपेक्ष नव्हते. त्याने सज्जनगडावरील लेखनाची वृत्ति दरमहा पाच होनाप्रमाणे आपल्या नावे करून घेतली. ती तो स्वत: करणे अर्थात शक्यच नव्हते. त्या कामासाठी त्याने आपला मुतालिक नेमला. पण या मुतालिकाच्या जेवणासाठी त्या पाच होनातले पैसे खर्च व्हावेत अशी पंताची वासना नव्हती. पाच होनांपैकी फक्त दोन होन त्याला लेखनाच्या कामासाठी देणे व "त्याच्या भोजनाची श्रीच्या भंडारियात अनकूलता करून देणे" असे तो लिहितो. उरलेले तीन होन पंताच्या खिशात. राजनीति लिहिणाऱ्या रामचंद्रपंताचा बारकावा थक्क करण्यासारखा होता असे म्हणतात ते खरेच आहे. पण आता पाच होनांच्या सांगितलेल्या असल्या बारकाव्याने माणूस नुसताच थक्क होतो. त्याला आदर वाटत नाही. लक्षाधीशाने जमिनीवर पडलेल्या अत्तराचे चार थेंब वाया जाऊ नयेत म्हणून लगबगीने दाढीला चोपडावेत तसे हे आहे. त्यात काटकसर आहे पण मोठेपणा नाही.

भांगेत तुळस असावी, त्याप्रमाणे त्या काळी सगळीकडे बोकाळलेल्या या वतन-वेडास एकच ठळक अपवाद दिसतो. तो म्हणजे खंडो बल्लाळ चिटणीस होय. त्याने आयुष्यात जे केले ते केवळ स्वामीसाठी केले. त्यात स्वत:ची चिंता म्हणून काही केली नाही. सगळे मराठे वतनासाठी जीव टाकीत असता, याने शिर्क्यांने मागितल्याबरोबर दाभोळच्या वतनावर "स्वामीकार्याहून वतन व जीवित्व काही आम्हांस अधिक नाही. सर्व अर्थ आमचे स्वामींचे पाय आहेत" असे म्हणून पाणी सोडले व ते वतन शिर्क्याला करून दिले. खंडो बल्लाळाच्या या स्वार्थत्यागी व तत्त्वनिष्ठ वागणुकीचे प्रायश्चित्त त्याला लवकरच मिळाले. खंडो बल्लाळ स्वामि-भक्त खरा, पण पैशाच्या विवंचनेने सदा गांजलेला असे. येसूबाईचे व राजारामाचे त्याच्यावर प्रेम होते, व वेळोवेळी त्याला मोठ्या रकमा देऊन ते त्याची चिंता मिटवीत असत. याने आपल्यासाठी वतनावरही तिलांजलि दिली याची राजा-रामाला जाणीव होती. त्यामुळे त्याने चौलच्या सरदेशमुखीचे वतन खंडो बल्ला-ळाला करून दिले. पण वतन छत्रपतीने करून दिले असले तरी ते सुरळीतपणें चालू देणारा चौल-कुलाब्याचा सर्वेसर्वा कान्होजी आंग्रे होता. त्याची अनुकूलता मिळविण्यासाठी खंडो बल्लाळ वर्षभर कुलाब्याला जाऊन राहिला. कारण इलाज नव्हता. राजाराम मेला. शाहू आला. खंडोबा म्हातारा झाला. त्याचा स्वत:चा संसार मोठा– दोन बायका आणि बारा–तेरा मुले. त्यातच भाऊ निळोबाचा संसार होता. स्वत: खंडोबा काटकसरी आणि व्यवहारदक्ष होता. पण भावाच्या उधळे-पणामुळे तो टेकीला आला होता. बिचाऱ्या खंडोबाला पैशाची चणचण भासू लागली व 'प्रपंची पाहिजे सुवर्ण' या 'दासबोधा'ची कडू प्रचीति त्याला आली.

म्हणून कधी नव्हे तो हक्काचे वतन चालू करून घेण्यासाठी तो कान्होजीकडे गेला. पण कान्होजीने गोड बोलून त्याच्या तोंडाला पाने पुसली. अखेर खंडोबा विपन्न अवस्थेत मरण पावला.

"संसार वाढला. प्राप्ति नाही. तरी वृद्धापकाळात तसेच दिवस ढकलीत होते. तशात आपली वतनपत्रे आंग्र्याजवळून सोडवून कुलाब्याला गेले. वर्षभर राहून व आंग्र्याची खुशामत करून त्यांच्याकडून वतनपत्रे घेऊन साताऱ्यास आले. पण कबूल केल्याप्रमाणे वतनाचा अंमल आंग्र्यांनी चालविला नाही. शके १६४८ आश्विन शुद्ध पंचमीस अगदी गरिबीत अंत झाला. कोणाचे मिंधे झाले नाहीत किंवा स्वार्थ पाहिला नाही म्हणूनच दैन्य राहिले."

खंडो बल्लाळाचा मृत्यु ही त्या वेळच्या मराठशाहीच्या अंतरंगावर विदारक टीका आहे. नवल नाही की शिवशाहीतील पराक्रमाची परंपरा पेशवाईत जरी चालू राहिली, तरी शिवशाहीतील निष्काम स्वराज्यसेवेची परंपरा मात्र खंडो बल्लाळाबरोबरच अस्तंगत झाली. "स्वार्थत्यागाचे परामर्श घेण्याचे कौशल्य राष्ट्रात निपजले नाही तर स्वार्थत्याग गाभटतो व जिवंत स्वातंत्र्य प्रसविण्यास असमर्थ ठरतो," असे राजवाडे यांनी म्हटलेले आहे ते अक्षरशः खरे आहे.

रामचंद्रपंत अमात्य, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, शंकराजी नारायण ही सारी मोठी माणसे होती. यांच्यासारख्या मोठ्या माणसांनी वतन लोभाच्या आहारी जाऊन लहानाहून लहान व्हावे हे पाहून वाईट वाटते. हे सर्व शिवाजी महाराजांच्या तालमीत तयार झाले होते. त्यांनी तरी त्यांच्या तत्त्वाला हरताळ फासायला नको होता. "श्रुतींचा मार्ग दाखविणारे थोर लोक वाममार्गाने जात नाहीत."– 'पथः श्रुतेर्दर्शयितार ईश्वरा मलीमसामाददते न पद्धतिम् ।' असे कालिदासाने म्हटले आहे. तरी ते स्वार्थसंपादनाच्या मार्गाने गेले. याचे कारण एकच आहे. ती मोठी माणसे असली तरी शेवटी माणसेच होती. स्वार्थ, मोह, लोभ यांच्यापासून तीही मुक्त नव्हती. शहाणी माणसेसुद्धा मोहाने अंध झाली म्हणजे जाऊ नये त्या मार्गाने जातात असे कालिदासानेच म्हटले आहे. 'अपथे पदमर्पयन्ति हि श्रुतवन्तोऽपि रजोनिमीलिताः ।'

पण स्वार्थ, हेवादावा, मत्सर, कलह, लोभ ही सर्व असूनही मराठ्यांनी राज्य राखले, ही गोष्ट सामान्य झाली नाही. राजारामाच्या कारकिर्दीतील मराठ्यांचा स्वातंत्र्ययुद्धाचा जमाखर्च हा असा आहे. त्यांनी गमावले पुष्कळ, पण राखलेही पुष्कळ. त्यांनी हिंदुत्वाचे संरक्षण करणारे हिंदवी स्वराज्य राखले. महाराष्ट्रधर्म राखला. ही गोष्ट मोठीच होती. पण त्याबरोबर शिवाजी महाराजांचे तत्त्व गमावले, शिस्त गमावली. हेही नुकसान मोठेच होते. त्यांची दहशत औरंगजेबाला वाटली. पण छत्रपतीची दहशत त्यांना वाटत होती असे दिसत नाही. घटकेत औरंगजेबाकडे जावे, घटकेत छत्रपतीकडे यावे, वतन करून घ्यावे, स्वामीस गैर-

वाका समजावे, वतन चालवावे म्हणून छत्रपतींची ताकीद असली तरी मानू नये, मर्जीला येईल तिकडे भालेराई करीत हिंडावे अशी त्या काळी काही विलक्षण अंदाधुंदी माजली होती. ते कोणालाच आवरत नव्हते. 'हे आदमी नव्हत, भूतखाना आहे' असे औरंगजेब म्हणाला ते ठीकच होते. पण मराठ्यांचे बेबंद वर्तन पाहता, तेच उद्गार, पण फार निराळ्या अर्थाने काढण्याची वेळ छत्रपतींवर आली नसेलच, असे वाटत नाही.

असो. जिंजी पडली. राजाराम महाराष्ट्रात सुखरूप परत आला. आजपर्यंत कारभार विशाळगडावरून चालला होता. पण तो फार एकीकडे पडे. म्हणून राजारामाने सातारा येथे मराठ्यांची राजधानी स्थापन केली, श्रीकृपेने परत मराठ्यांच्या राज्याचा मामला थाटत चालला.

सात वर्षे झुल्फिकारखान जिंजीला वेढा घालून बसला होता. अखेर डोंगर पोखरून उंदीर बाहेर निघाला. औरंगजेबाचा फायदा काहीच झाला नाही. मराठे होते तसेच होते. त्यांचा छत्रपति, त्यांचे सैन्य, त्यांची धामधूम आणि त्यांचा उच्छाद यात काहीही कमी झालेले नव्हते. झुल्फिकारखानाने औरंगजेबाला मोठ्या ऐटीत लिहिले खरे की, "इस्लामच्या वीरांनी परमेश्वराच्या कृपेने व स्वतःच्या शौर्याने जिंजीचा किल्ला फत्ते केला. कर्नाटकात इतका मजबूत व युद्धास व रक्षणास आवश्यक असलेल्या साधनांनी समृद्ध असा दुसरा किल्ला नाही. परमेश्वरकृपेने सात डोंगरी किल्ल्यांनी युक्त असलेला हा किल्ला सर होऊन साम्राज्यात दाखल झाला." औरंगजेबालाही समाधान वाटले पण लवकरच त्याच्या लक्षात आले की हे समाधान फसवे आहे. राजाराम जिंजीला असल्यामुळे आजपर्यंत मराठे दक्षिणेत अडकून तरी पडले होते. पण तो महाराष्ट्रात आल्याबरोबर ते उत्तरेकडे बागलाण, खानदेश, वऱ्हाड, मराठवाडा, नगर, नासिक भागात पसरले बागलाण, खानदेशात येसाजी व खंडोजी दाभाडे, खानदेशात नेमाजी शिंदे व बुवासाहेब ऊर्फ विश्वासराव पवार, वऱ्हाडात परसोजी भोसले, मध्य महाराष्ट्रात धनाजी जाधव व हणमंतराव निंबाळकर आणि दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटक या भागात संताजीचा भाऊ बहिर्जी हिंदुराव घोरपडे आणि संताजीचा मुलगा राणोजी घोरपडे, अशा प्रकारे मराठ्यांचा संचार अनिर्बंध चालू झाला. ते उत्तरेकडून येणारे मोगलांचा खजिना व रसद लुटू लागले. आणि स्थानिक मोगल अधिकाऱ्यांकडून चौथाई वसूल करू लागले. इतक्या मराठ्यांचा प्रतिकार करण्यास औरंगजेबाचे सैन्य अपुरे पडू लागले. झुल्फिकारखानाच्या मागे टोचणी लावून त्याने त्याला जिंजी सर करायला लावली खरी, पण त्याचा परिणाम इतकाच झाला की दक्षिण दस्त करण्याच्या नादात उत्तर गमावण्याची त्याच्यावर वेळ आली.

जिंजीच्या पाडावानंतर मराठ्यांच्या धामधुमीच्या ज्या ज्या बातम्या येऊ लागल्या त्यामुळे औरंगजेब दिवसेदिवस फार दिलगीर होत चालला. बुऱ्हाणपुराहून बातमी आली की, "हलकट गनिमां ' चे सरदार नेमाजी शिंदे, धनाजी जाधव व इतर हे मोठी फौज घेऊन आले. त्यांनी बुऱ्हाणपूरला वेढा घातला. नजाबतखान सुभेदार व इतर बादशाही नोकर यांनी बाहेर पडून शत्रूंचा पाडाव करण्याची शर्थ केली. तीन दिवस ते हत्तीवर स्वारी करून होते. त्यांनी मोठे शौर्य गाजविले. यानंतर मराठे शहर सोडून निघून गेले." तेथून मराठ्यांचा माळव्यावर आक्रमण करण्याचा उद्देश होता. ते अकबरपूरच्या उतारावरून नर्मदा ओलांडण्याच्या हेतूने जाऊ लागले. तेव्हा फिरोजजंगाने त्यांचा पाठलाग केला व मोड केला. फिरोजजंगाच्या या कामगिरीबद्दल औरंगजेबानें त्याला स्वदस्तूरचे पत्र लिहून धन्यवाद दिले. मराठे परत फिरले आणि आठ हजार सैन्यानिशी त्यांनी नंदुरबार परगण्यात लुटालूट करण्यास प्रारंभ केला तेव्हा तेथील फौजदार हुसेन अलीखान हा थाळनेरहून निघून त्याच्यावर चालून गेला. त्याच्यापाशी अवघे सात आठशे स्वार व दोनतीन हजार बर्कंदाज होते. पण तो डगमगला नाही. त्यानें मोठे शौर्य गाजविले. पण मराठे संख्येने भारी होते. लढाईत हुसेन अली खानाला तीन जबर जखमा झाल्या व तो हत्तीवरून खाली पडला. मराठ्यांनी त्याला कैद केले; व सुटकेसाठी दोन लाखांची मागणी केली. खानाने आपली थाळनेरमधील मालमत्ता विकली. जडजवाहीर अलंकारही विकले. पण फक्त एक लाख आठ हजार रुपये जमा झाले. तेव्हा त्याने उरलेली रक्कम कर्जाऊ देण्यासाठी नंदुरबारमधील सावकारांना विनंती केली. पण त्यांनी सपशेल नकार दिला. नंदुरबारचे लोक मराठ्यांना चौथाई कधीच देत नसत; फौजदाराच्या आश्रयानें ते नेहमी त्यांचा प्रतिकार करीत. त्यामुळे मराठ्यांचा त्यांच्यावर राग होताच. आता हुसेन अलीखानही चिडला. त्याने मराठ्याशी संगनमत केले व दोघांनी मिळून श्रीमंतांना लुटायचे ठरविले. एक दोन दिवस त्याने प्रतिकाराची बतावणी केली. व मग शहराचे दरवाजे उघडले. ठरल्याप्रमाणे मराठ्यांनी सगळ्या सावकारांना यथास्थित लुटले. ठरले होते इतकेच की मराठ्यांनी खानाच्या खंडणीची उरलेकी बाकी फक्त सावकारांकडून वसूल करावी. ती ऐंशी हजार रुपये होती. पण करार मराठ्यांनी पाळला नाही व खानानेंही पाळला नाही. मराठ्यांनी ऐंशी हजार रुपयांऐवजी एक लाख चाळीस हजार रुपये वसूल केले. ते ठीकच होते. कारण मराठे बोलून चालून लुटायलाच आले होते. पण या परगण्याचा फौजदार व प्रजेचा त्राता असलेला जो हुसेन अलीखान त्यानेही स्वतःसाठी तीस हजार रुपये गोळा करून घेतले; व रयतेच्या पेटलेल्या चितेवर स्वतःची विडी पेटवून घेतली. आपल्या फौजदारसाहेबाची ही 'कर्तुकी' जेव्हा औरंगजेबाला कळली तेव्हा तो फार रागावला आणि म्हणाला, "आपल्यात लढण्याचे बळ नव्हते तर व्यर्थ लढण्यात काय हंशील होते !"

उत्तरोत्तर मराठें अनावर होत चालले होते. १६९९ च्या मे महिन्यात धनाजी जाधवाने हैदराबादपर्यंत मजल मारली. त्या वर्षीच्या ४ जूनला तर तो औरंगजेबाच्या ब्रह्मपुरीच्या छावणीपासून अवघ्या बाबीस मैलांवर येऊन थडकला. म्हणजे 'हलकट गनीम' आता घरातच घुसू पाहत होता. छावणीत घुसून शाही तंबूचे सोन्याचे कळस कापणारा संताजी व छावणीवर झडप घालू पाहणारा हा धनाजी हे दोघेही एकाच माळेचे मणी होते. एकीकडे बादशाही छावणीच्या इतक्या जवळ भिडलेले मराठे दुसरीकडे थेट नर्मदापार उत्तरेकडे माळव्यावर चालून जात होते. "या सुमारास कृष्णा सावंत हा मराठा सरदार पंधरा हजार स्वारानिशी नर्मदापार झाला. त्याने धामूनो या गावाजवळच्या प्रदेशात धामधूम उडविली. यानंतर तो तेथून परत फिरला. मुसलमान सुलतानांच्या काळापासून आजपर्यंत मराठे कधीच नर्मदापार झाले नव्हते. तेव्हा औरंगजेबाने विचार केला की, "या दुष्ट जमातीचे निवासस्थान म्हणजे किल्ले. ते जिंकून घ्यावे आणि या कुटिल जमातीची पाळेमुळे खणून काढावी."

त्याचे तर्कशास्त्र तसे बरोबर होते. उपनिषदात म्हटले आहे की, "दुंदुभीपासून बाहेर पडणाऱ्या ध्वनीच्या मागे लागून ते बंद पाडता येत नाहीत, दुंदुभी बंद पाडला म्हणजे ध्वनीही आपोआप बंद पडतात." आजवर मोगलांनी मराठ्यांचा केलेला पाठलाग- म्हणजे अवकाशात सैरावैरा संचारणाऱ्या व हुलकावण्या देणाऱ्या ध्वनीच्या लहरी पकडण्याचा अट्टाहास होता. तो यशस्वी झाला नाही यात नवल नाही. मोगल वरवरची पालवी खुडत गेले व फांद्या छाटीत गेले, पण मूळ तसेच राहिले ही गोष्ट ते विसरले. माशाचे बळ पाण्यात, त्याप्रमाणे मराठ्यांचे बळ त्यांच्या किल्ल्यांत होते. शिवाजी महाराजांची राजनीति सांगणाऱ्या रामचंद्रपंत अमात्यानें हे उत्तम प्रकारे जाणले होते. "संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग हे राज्य तर तीर्थरूप थोरले कैलासवासी स्वामींनी गडावरूनच निर्माण केले... गडकोट हेच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे सैन्याचे बल, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपली वसतिस्थळे, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार; किंबहुना गडकोट म्हणजे आपले प्राणसंरक्षण" अशा मार्मिक शब्दांत मराठ्यांच्या राज्याचे सारसर्वस्व त्याने व्यक्त केले होते. शिवाजी महाराजांना तर किल्ले बांधण्याचेच एकमेव व्यसन होते. 'किल्ले बहुत झाले, विनाकारण पैसा खर्च होतो' अशी एकदा तक्रार केली गेली असता त्यांनी उत्तर केले की "जैसा कुळंबी शेतास माळा घालून शेत राखतो तसे किल्ले राज्यास रक्षण आहेत. तारवांस खिळे मारून बळकट करितात, तशी राज्यास बळकटी किल्ल्यांची आहे." सतरा वर्षे मराठ्यांशी संग्राम केल्यानंतर, उशिरा का होईना औरंगजेबाच्या लक्षात त्यांच्या सामर्थ्याचे हे मर्म आले व ब्रह्मपुरीहून त्याने सैन्याला कूच करण्याचा हुकूम दिला. त्याने आज्ञा केली की, "दवंडी देण्यात यावी की तमाम अमीर उम-

राव आणि मनसबदार यांनी आपली बायकामाणसे व अनावश्यक सामान ही छावणीतच ठेवावी. कोणीही आपली बायकामुले बरोबर घेता कामा नये."

गेली साडेचार वर्षे औरंगजेब भीमेच्या दक्षिण काठावर असलेल्या ब्रह्मपुरीस मुक्काम करून होता. पंढरपूरपासून बावीस मैलांवर व सोलापूरच्या नैर्ऋत्येस तेवीस मैलांवर भीमेच्या एका मोठ्या सुमारे तीन चौरस मैलांच्या वाकणात ब्रह्मपुरी हे ठिकाण आहे. औरंगजेबाची छावणी केवळ ब्रह्मपुरीच नव्हे, तर वीस गाव, माचणूर, धोडेश्वर आणि मुंढेवाडी ही गावे व्यापून पाचसात मैल पसरली होती. येथेच त्याने छावणीच्या इमारती बांधल्या. येथूनच तो दरबारचे काम व साम्राज्याचो देखरेख पाहात असे. येथूनच दरवर्षी रमजान महिन्यात नमाज अदा करण्यासाठी व धर्मचिंतनासाठी तो सोलापूरच्या जुम्मा मशिदीत जात असे. येथेच त्याने बांधकाम खात्याचे कामगार जवाहरमल व हिरा यांच्याकडून तळा-भोवती मातीची तटबंदी व दोन विहिरी बांधविल्या. त्यासाठी त्याने पासष्ट हजार रुपये खर्च केले. ब्रह्मपुरीचे हिंदु नाव बदलून त्याने इस्लामपुरी असे नाव ठेविले. या सर्व गोष्टींवरून लोकांची साहजिकच कल्पना झाली की बादशहा आता काही ब्रह्मपुरीहून हालत नाही. दोन वर्षांपूर्वी पावसाळ्यात भीमेला महापूर आला. आसदखान मुखलिसखान वगैरे श्रीमंत मंडळींनी नदीच्या काठावर आकर्षक निवास-स्थाने बांधली होती. त्यांच्यात पाणीच पाणी झाले. नदीच्या काठापलीकडे टेकड्यावर शहाजादा बालाशुकोह, शहा आलीशाह कामबक्ष व इतर सरदारांची घरे होती. ती चाळीस गज उंचावर होती. तीन दिवसांत नदीचे पाणी या जागेच्या चार गज अंतरापर्यंत आले होते. रात्रंदिवस वाहतुकीची साधने तयार ठेवण्यात आली होती. तिसऱ्या दिवशी मध्यरात्री नदीचे पाणी ओसरू लागले व फार मोठे संकट टळले. तरी दहा हजार लोक पुरात वाहून गेले व सामान व जनावरे किती गेली याची मोजदादच नव्हती. तरीसुद्धा ब्रह्मपुरी सोडण्याचा औरंगजेबाच्या मनात विचार आला नाही. म्हणून लोकांना साहजिकच वाटले की बादशहा आता स्थिरावला, येथे त्याने घर केले. म्हणून त्यांनीही घरेदारे केली, वाडेहुडे बांधले व संसार करून ते सुखाने राहू लागले. एवढ्यात हा सारा बाडबिस्तारा गुंडाळून मोहिमेवर रवाना होण्याचा औरंगजेबाचा हुकूम वज्राघाताप्रमाणे त्याच्या कानावर आदळला. त्यांना परमावधीचे दुःख झाले. "औरंगजेबाला याची पूर्ण कल्पना होती. आपले सैनिक आपल्यावर कसे चडफडतात हे त्याला माहीत होते. तो मुअज्जमला एकदा म्हणालाच होता की, "वैराणमुलुखांतून व जंगलातून माझ्यामागोमाग रखडत यावे लागल्यामुळे चैनीला चटावलेले माझे सरदार मी केव्हा मरेन याची वाट पाहत असतात. मला मरण यावे अशीच ते देवाला प्रार्थना करीत असतात." पण त्याला त्याचा इलाज नव्हता. काम संपले नव्हते. परिस्थिति त्याला बोलावत होती. पूर्वीही विजापूर व गोवळकोंडा काबीज केल्यावर त्याचा वजीर आसदखान

यानें त्याला दिल्लीला परत निघण्याचा सल्ला दिला होता. त्या वेळी औरंगजेबाने त्याला उत्तर दिले होते की, "तुझ्यासारख्या शहाण्या सेवकानें अशी विनंती करावी याचे मला नवल वाटते. जोपर्यंत माझा अखेरचा श्वास आहे, तोपर्यंत कष्ट व परिश्रम यांच्यापासून मला सुटका नाही." परिस्थितीपुढे औरंगजेबाचा उपाय नव्हता आणि औरंगजेबापुढे सैनिकांचा उपाय नव्हता.

निघण्यापूर्वी औरंगजेबाने एक मोठी गोष्ट केली. आपल्यामागे छावणीचे रक्षण व्हावे म्हणून हुशार व तडफदार अधिकाऱ्यांकडून छावणीभोवती तट उभारण्याचा त्याने हुकूम दिला. एरवी या कामाने सहा सात महिने खाल्ले असते. पण या वेळी हुशार व्यवस्थापकांनी ते काम पंधरा वीस दिवसांत तडीस नेले. औरंगजेबाची मुलगी झिनतुन्निसा बेगम, औरंगजेबाची बायको उदेपुरी बेगम व इतर स्त्रियांना त्याने छावणीत ठेवले. त्यांच्या रक्षणासाठी त्याने वजीर आसदखान याची नेमणूक केली. अशा प्रकारे, एका अर्थी मागची सर्व निरवानिरव करून औरंगजेबाने ब्रह्मपुरीचा निरोप घेतला.

त्यानंतर दोन वर्षांनी इंग्रज वकील सर विलियम नॉरीस ब्रह्मपुरीच्या छावणीत आला होता. त्या वेळी औरंगजेब तेथे नव्हता. नॉरीसने आसदखानाची भेट घेतली व छावणीचेही बारकाईने निरीक्षण केले. छावणीबद्दल त्याचे मत काही फारसे चांगले झाले नाही. त्याच्या मते ब्रह्मपुरीच्या छावणीत त्या वेळी कमीत कमी एक लाख माणसे असावीत. बादशहाचे आणि सरदारांचे जनानखाने, मुले, माणसे, नोकर चाकर, व्यापारी, सराफ, दलाल फार काय वेश्या आणि कुंटिणी यांचाही छावणीत समावेश होता. पण यांपैकी लढण्यायोग्य अशी माणसे नॉरीसच्या मते चार हजारांच्यावरही नसतील. त्यातूनही निधड्या छातीचे असे कसेबसे पाचशे निघतील! गुजराथच्या सुभेदाराचा मुलगा नजर अलीखान हा एक हजार स्वार घेऊन औरंगजेबाकडे निघाला होता. पण मराठ्यांशी लढण्याची त्याला हिंमत होत नव्हती. त्याची मोठी इच्छा अशी की आपणास ब्रह्मपुरीस राहण्यास मिळावे म्हणून त्याने वजीर आसदखानाला भक्कम लाच दिली. हेतु हा की त्याने औरंगजेबाकडून ब्रह्मपुरीला राहण्याची परवानगी मिळवून द्यावी. हीच प्रवृत्ति थोड्याफार प्रमाणात इतरांची होती.

नॉरीससाहेब आसदखानाबद्दलही फारसे बरे बोलत नाही. तो म्हणतो– "तो अतिशय श्रीमंत आहे. त्याला तीस बायका आणि आठशे उपस्त्रिया आहेत. आसदखान आपला सर्व वेळ स्त्रियांच्या संगतीत घालवत असतो. वजीर आणि इतर अधिकारी दारूचे मोठे भोक्ते आहेत. दारूच्या भेटीसारखी प्रिय अशी इतर कोणतीही वस्तु त्यांच्या नजरेत नाही. बादशहाला हे सगळे माहीत आहे पण तो तिकडे कानाडोळा करतो. स्वतः बादशहा मात्र दारूच्या थेंबाला स्पर्श करीत नाही."

औरंगजेब काही वेडा नव्हता. त्याला हे उत्तम माहीत होते की आपला वजीर मदिरा आणि मदिराक्षी यांच्यात आकंठ बुडालेला आहे. त्याला हेही माहीत होते की आपला बक्षी बहरामंदखान हा जबर लाचखाऊ आहे. आपले अधिकारी कसे आहेत हे तो खूप ओळखून होता. म्हणूनच त्याने या मोहिमेची जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेतली. एक जिंजी सर करण्यास झुल्फिकारखानाने सात वर्षे घेतली. वेळेची अशी उधळपट्टी करणे औरंगजेबाला आता परवडणारे नव्हते. वेळ थोडा उरला होता. मजल मोठी मारायची होती. दिव्यातले तेल संपत आले होते.

१९ ऑक्टोबर १६९९ रोजी औरंगजेबाने ब्रह्मपुरी सोडली आणि मराठ्यांचे किल्ले सर करण्याच्या मोहिमेवर कूच केले.

त्या वेळी त्याचे वय ब्याऐंशी वर्षांचे होते.

□ □

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था
११११ सदाशिव पेठ, ... 
... पुणे-४११ ०३०

# (९)

याप्रमाणे मराठ्यांचे किल्ले काबीज करण्याचा उद्देश मनात बाळगून औरंगजेब ब्रह्मपुरीहून निघाला. त्याच्यापाशी प्रचंड सैन्य होते हे सांगणे नकोच. पण त्या बरोबर मीर आतिश तरबियतखान याच्या हाताखाली जय्यत तोफखाना होता. शिवाय झुल्फिकारखान, रुहुल्लाखान, हमीदुद्दीनखान, सर्जाखान, इखलासखान, फतुल्लाखान इत्यादि नामांकित सेनापति होते. शहाजादा महंमद आजम आणि त्याचा तडफदार मुलगा बेदरबख्त यांना बहादूरगडच्या छावणीतून औरंगजेबाने नुकतेच आपणाजवळ बोलावून घेतले होते. अठरा वर्षांपूर्वी बुऱ्हाणपूरहून दक्षिण-दिग्विजय करण्यासाठी ईर्ष्येने औरंगजेब महाराष्ट्रात उतरला होता, त्या स्वारी-चीच ही आवृत्ति होती. अठरा वर्षांच्या काळात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले होते. महाराष्ट्र हा खरोखरच राकट देश आहे, कणखर देश आहे, दगडांचा देश आहे याची प्रचीति झुल्फिकारखानापासून सर्जाखानापर्यंत समस्त मोगल सेनापतींना येऊन चुकली होती. मराठ्यांवर एलगार करण्याची त्यांची इरेसरी आता बरीच थंडावली होती. थंडावला नव्हता फक्त औरंगजेब. अठरा वर्षांतले जय पराजय पचवून मराठ देशातल्या बुलंद दुर्गाप्रमाणे तो अजूनही ताठ राहिला होता. आसदखान, झुल्फिकारखान अशा नामांकितांची त्याच्यापुढे बोलताना बोबडी वळे. आसदखानाने आता युद्ध आवरते घेऊन उत्तरेतल्या नंदनवनाकडे परतण्याचा सल्ला त्याला पूर्वीच दिला होता, पण औरंगजेबाने त्याला चांगलेच फटकारले होते. झुल्फिकारखानाचीही तीच गत होती. जिंजीला असताना औरंग-जेब त्याला सारखा तंबी देत होता की, "जिंजी काबीज न कराल तर तुमच्या तंबूचे तणावे काढून तुम्हाला उघड्यावर बसवू." जिंजीहून आल्यानंतर औरंग-जेबाशी बोलण्याच्या नादात झुल्फिकारखानाचे अवधान राहिले नाही आणि त्याचा गुडघा सिंहासनाच्या मसनदीला लागला, तेव्हा औरंगजेब म्हणाला, "माझ्या घरात वाढलेले हे सेवक दूर गेले म्हणजे दरबारची रीतभात कशी विसरतात? नक्कीच खानाची नजर बिघडलेली दिसते–" असे बोलून, त्याने तेथल्या तेथे चष्मा आणविला, व स्वतःच्या हाताने तो चष्मा खानाच्या नाकावर चढवून त्याला तीन दिवस तो चष्मा घालून दरबारात आले पाहिजे अशी शिक्षा फर्मावली. झुल्फिकारखानासारख्या दिग्विजयी सेनापतीला वागविण्याची औरंग-जेबाची ही अशी करडी शिस्त होती. त्यामुळे त्याच्यापुढे काही बोलण्याची कोणाची प्राज्ञा नव्हती. मनात असो वा नसो, मतभेद असो वा नसो, एवढे सगळे बुजुर्ग सेनापति नाकांत वेसण घातल्याप्रमाणे औरंगजेबाच्या मागून चालले होते.

औरंगजेबाचे बळ मोठे होते पण बळापेक्षा सुद्धा भेदनीतीचा प्रयोग करून काम साधण्याकडे औरंगजेबाचा जात्याच ओढा जास्त होता. महाराष्ट्रातील किल्ल्यावरील जी मोहीम त्याने हाती घेतली होती, त्या किल्ल्यांच्या बाबतीत सध्या रामचंद्रपंत अमात्य आणि परशुराम त्र्यंबक हे राजारामाचे सर्वश्रेष्ठ अधिकारी होते. त्यांच्यात एकमेकांबद्दल विकल्प यावा, आणि मराठ्यांचे नैतिक धैर्य खचावे या उद्देशाने औरंगजेबाने ३१ ऑक्टोबर १६९९ रोजी दोघांना दोन पत्रे पाठविली पण ती अशा बेताने की रामचंद्रपंताला लिहिलेले पत्र परशुरामपंतांच्या हातात पडावे व परशुरामपंताला लिहिलेले पत्र रामचंद्रपंताच्या हाती पडावे, व एकाच्या मनात असे यावे की दुसरा औरंगजेबाला फितूर झाला आहे की काय.

रामचंद्रपंताला औरंगजेबाने लिहिलेले पत्र असे होते –

" रामचंद्र याने जाणावे की सुदैवाने दूरवर विचार करून तुम्ही शुभ मुहूर्तावर तर बियतखानाला पत्र लिहिले, ते आम्ही वाचले. त्यातील सर्व प्रकार आम्हांस कबूल आहेत. त्यावरून आम्ही असे फर्मावितो की, तुम्ही भरंवशाचा व निष्ठेचा जो सन्मार्ग धरला आहे, तो कायम ठेवा. लिहिल्याप्रमाणे सर्व गोष्टी त्वरेने करून दाखवा. आणि त्या दुष्टाचा (राजारामाचा) आश्रय सोडून द्या. त्या दुष्टाच्या नश्वर आयुष्याचे जर अजून काही क्षण बाकी असून, आमच्या फौजेस भिऊन पळून जाण्याची त्यास इच्छा होईल, तर तुम्हीच सर्व किल्ले आमच्या स्वाधीन करावे हे योग्य आहे. परमेश्वराने तुम्हास सुबुद्धि देऊन दोन्ही गोष्टी केल्या म्हणजे तुमचा उत्कृष्ट सन्मान करून, तुम्हास उत्तमोत्तम बक्षिसे व मनसब देऊ. परंतु दुर्दैवाने आपले नफा नुकसान काय हे जर तुम्हास कळले नाही आणि तुमचे पत्रातील शब्द सर्व फोल असतील, तर मग तुम्ही व तुमचा राजा यास काय दिसायचे ते दिसेल. मुलांमाणसांसुद्धा तुमची सर्वांची डोकी कापली जातील कळावे."

अनुग्रह-निग्रह यांचा प्रयोग असलेले अशाच मासल्याचे पत्र त्याच दिवशी परशुराम त्र्यंबकला गेले–

" पन्हाळचाचा किल्लेदार त्रिबक याने जाणावे की, दुष्ट राजारामाचे किल्ले काबीज करून त्यास ठार मारण्याकरिता आमची फौज चालून जात आहे. थोड्याच दिवसात आमचा मुक्काम मुर्तजाबाद (मिरज) येथे होईल. परमेश्वर कृपेने त्या दुष्टाचे सर्व किल्ले व जागा आमच्या कबजात येतील. आणि त्या दुर्दैवी राजारामाची दशा त्याच्या दुष्ट भावासारखीच होईल. मराठ्यांचे काही किल्लेदार आमच्या पक्षास येऊ इच्छीत आहेत. आणि तुम्हीही आमच्या पूर्वीच्या पत्राप्रमाणे सुदैवास वश होऊन किल्ला आमचे हवाली कराल तर तुमच्यावर आमची मोठी मेहेरबानी होऊन तुम्हांस मोठो मनसब मिळेल. ईश्वराने तुम्हास ही सुबुद्धि न दिल्यास किल्ला हा आम्हो काबोज करूच आणि मग तुम्हास काय

दिसायचे ते दिसेल. तुम्हास व तुमचे कुटुंबांतील लहान थोर बायका मुले झाडून साऱ्यांस पकडून ठार मारण्यात येईल. कळावे."

अठरा वर्षांपूर्वी अजमीरला अशाच प्रकारच्या कपटविद्येचा प्रयोग औरंगजेबाने आपला बंडखोर मुलगा अकबर आणि त्याचा रजपूत साथीदार दुर्गादास याच्या विरुद्ध केला होता. त्याने अकबराला म्हणून पत्र लिहिले की, "राजपुतांस तुम्ही फसवून येथवर आणले ही फार चांगली गोष्ट केली. ठरल्याप्रमाणे त्यास तुम्ही आपल्या अग्रभागी ठेवा म्हणजे आम्ही पुढून व मागून तुम्ही मिळून त्याची अशी चंदी उडवून देऊ की एकाही काफर हिंदूने या प्रसंगातून सुटून जाऊ नये." पण हे अकबरास म्हणून लिहिलेले पत्र दुर्गादासाच्या हाती पडेल अशी औरंगजेबाने व्यवस्था केली. त्याचा परिणाम त्याच्या अपेक्षेप्रमाणेच झाला. दुर्गादासाच्या मनात अकबराविषयी विकल्प येऊन तो रातोरात आपले राजपूत घेऊन मारवाडात चालता झाला. लढाईच्या दिवशी सकाळी जागा होऊन अकबर पाहतो तो तळावर एकही राजपूत नाही. तेव्हा त्यालाही पळ काढण्यापलीकडे दुसरा उपाय राहिला नाही. अशा प्रकारे लेखणीच्या एका फटक्यासरशी औरंगजेबाने अकबराचे बंड साफ मोडून टाकले. ज्या वेळेला राजपुतांना औरंगजेबाचा कावा समजला, तेव्हा वेळ निघून गेली होती. त्याच्याविरुद्ध बोटे मोडण्यापलीकडे त्यांना काही करता येत नव्हते. त्याच कपटनीतीचा प्रयोग महाराष्ट्रात करावा असे औरंगजेबाला वाटले तर त्यात नवल नव्हते. पण त्याला यश आले नाही. त्याचा बाण फुकट गेला.

मिरजेच्या मुक्कामावर औरंगजेबाला बातमी समजली की राजारामाने देवगडच्या बंडखोर गोंड राजा बख्त बलंद याच्याशी संगनमत करून वऱ्हाड–खानदेशकडे मोहीम काढलेली आहे. बातमी खरी होती. औरंगजेबाने मराठ्यांच्या किल्ल्यावर मोहीम काढलेली पाहून, त्या मोहिमेला शह देण्यासाठी, उत्तरेतील मोगली मुलखावर आक्रमण करण्याच्या उद्देशाने २६ ऑक्टोबर १६९९ रोजी राजाराम साताऱ्याहून जालनापूरच्या रोखाने निघाला. साताऱ्याच्या पायथ्याशी त्याने संताजी घोरपड्याचा मुलगा राणोजी याला चार हजार स्वारानिशी ठेवले. राजारामाबरोबर या स्वारीत धनाजी जाधव, नेमाजी शिंदे, दादो मल्हार, परसोजी भोसले, रामचंद्रपंत अमात्य, हैबतराव निंबाळकर, खंडेराव दाभाडे, कान्होजी आंग्रे प्रभृति बहुतेक सर्व नामांकित सरदार होते. औरंगजेबाला ही वार्ता समजल्यानंतर त्याने तातडीने झुल्फिकारखान व बेदर बख्त यांना राजारामाच्या पाठलागावर रवाना केले व त्यांना हुकूम दिला की, "बेदर बख्त याने बाजारबुणगे मिरज येथे सोडावे आणि सड्या फौजेनिशी मजला मारीत शत्रूचा असा पाठलाग करावा की, आग तर विझावीच पण राखेखाली ठिणगीही शिल्लक राहू नये; नाहीतर पुन्हा आग पेटावयाची."

औरंगजेबाचा रोख पन्हाळ्यावर दिसत होता. पण मिरजेवर त्याने एकदम मार्ग बदलला आणि साताराच्या दिशेने त्याचे कूच चालू झाले. कराडवरून तो कृष्णाकाठी असलेल्या मसूरवर आला. तेथून तीन कोसांवर वसंतगड किल्ला होता. तो मराठ्यांच्या ताब्यात होता. तो जिंकून घ्यावा अशी औरंगजेबाने आज्ञा केली. तरबियतखानाने किल्ल्याला मोर्चे लावले. किल्ल्यातील लोकांनीही तोफांचा व बंदुकांचा अखंड मारा केला. ते ऐकून औरंगजेबाने आज्ञा केली की, किल्ल्यापासून एक कोसावर कृष्णा वाहते. नदीच्या काठी आपला तंबू देण्यात यावा. या जागेवर किल्ल्यावरून येणारे तोफांचे गोळे पडत असत. औरंगजेब म्हणाला, "ही मोहीम काढण्यात माझा हेतु केवळ जिहाद करणे हा आहे. या सेवेने परमेश्वर आणि पैगंबर हे संतुष्ट होवोत. उद्या मी स्वार होऊन किल्ल्यावर हल्ला करीन आणि काफर वधाचा ध्वज उभारीन." औरंगजेबाचे धाडस आणि निर्धार पाहून किल्ल्यातील लोकांनी शरणागति पत्करली आणि वेढा घातल्यापासून चार दिवसांत २५ नोव्हेंबर रोजी वसंतगड सर झाला. गड घेण्याच्या आपल्या मोहिमेला हा शुभशकुन झाला या भावनेने औरंगजेबाने वसंतगडचे नाव 'किलीदे फतह' म्हणजे यशाची किल्ली असे ठेवले. त्यानंतर साताराच्या रोखाने औरंगजेबाचे कूच सुरू झाले. ८ डिसेंबर १६९९ रोजी बादशहाची स्वारी साताऱ्याच्या पायथ्याशी पोचली.

साताराचा किल्ला ही मराठ्यांची राजधानी होती. खाफीखान म्हणतो की, "सितारा (नक्षत्र) हे या किल्ल्याचे नाव यथार्थ आहे. आकाशाच्याखाली इतका उंच आणि वैभवपूर्ण असा किल्ला क्वचितच पाहण्यात अगर ऐकण्यात आला असेल." किल्ला नऊशे फूट उंच होता. त्याची लांबी पूर्व-पश्चिम अकराशे यार्ड आणि उत्तर-दक्षिण सहाशे यार्ड आहे. किल्ल्याचा आकार त्रिकोणी आहे. किल्ल्याला दोन दरवाजे आहेत. एक उत्तरेच्या दिशेने आणि दुसरा दक्षिणेकडे. किल्ल्याच्या ईशान्य कोपऱ्यापासून थोडासा पश्चिमेकडे मंगळाई दरवाजा आहे. येथून दोन मैलांवर करंजा येथे औरंगजेबाची छावणी होती.

दहा डिसेंबर रोजी करंजास पोचल्यावर औरंगजेबाने प्रथम छावणीचा नकाशा कागदावर आखण्यास सांगितला आणि सरदारांना त्यांच्या छावणीच्या जागा दाखविल्या. किल्ल्याच्या पश्चिमेकडचा भाग शहाजादा आजम व खुदाबंदाखान यांच्याकडे होता. तरबियतखान याचे ठाणे मंगळाई दरवाज्यासमोर होते. मुनामखान हा त्याच्या उजवीकडे होता. दक्षिणेकडचा दरवाजा रुहुल्लाखान बक्षी याच्याकडे होता त्याच्या बाजूला दखनी तोफखान्याचा प्रमुख मन्सूरखान होता. याप्रमाणे मोगलांचे मोर्चे डोंगराच्या कुशीपर्यंत भिडले. मोर्च्यावर त्यांनी प्रचंड व अक्राळ विक्राळ तोफा चढविल्या. तोफांचा प्रचंड मारा किल्ल्यावर सुरू झाला.

पण परिणाम काही होईना. समोर तीस गज उंच असा सरळ डोंगरच उभा होता. त्यावर सहा गज उंचीचे दगडाचे तट बांधले होते. " सारांश, किल्ल्याचा तट म्हणजे भिंत नाहीच. तो डोंगरच होता." त्यामुळे तोफांची मारगिरी कारीगार होईना. तरबियतखानाने खंदक खणण्यासाठी आल्या दिवशीच किल्ल्या-भोवती टेहळणी केली. पण जमीन अत्यंत खडकाळ असल्यामुळे खंदक खणण्यास अवघड आहे असे दिसून आले.

खालून तोफांची सरबत्ती होत असताना वरून किल्ल्यातील लोकही तितक्याच निकराने उत्तर देत होते. साकी मुस्तैदखान म्हणतो, " सातारचा किल्ला म्हणजे त्या काफरांची राजधानी होती. किल्ल्यात तोफा रसद इत्यादि सामग्री भरपूर होती. किल्ल्यावर पाण्याचे झरे होते. उन्हाळ्यातही ते आटत नसत. किल्ल्यात कसलेले वीर होते. त्यांना आपले प्राण देणे म्हणजे क्षुल्लक गोष्ट वाटे. किल्ल्या-वरून मराठ्यांनी बाण, बंदुका, हुक्का, चादर, मश्क, मतवाला इत्यादि अस्त्रांचा मारा केला." या खेरीज दगड हे मराठ्यांचे मोठेच हत्यार होते. हजारो दगड ते किल्ल्यावरून खाली मोगलांवर लोटत होते. त्यात क्षणाचाही खंड नव्हता. त्यांच्या वर्षावाने जनावरे व माणसे जायबंदी होत होती. किल्ल्यावर हवालदार प्रयागजी प्रभू फणसे हा होता व सुभानजी लावघरे हा किल्लेदार होता. प्रयागजी हा शिवाजीमहाराजांच्या वेळेपासून कसलेला माणूस होता. या दोघांनी किल्ला लढविण्याची शर्थ केली. मोगल-मराठ्यांच्या या संघर्षाचे काव्यमय वर्णन खाफी-खानाने केले आहे. " या तोफा म्हणजे अजगराच्या आकाराच्या व मगरीप्रमाणे भयंकर होत्या. त्यांच्या आवाजापुढे मेघगर्जना फिक्की पडली असती व मंगळ व शुक्र हे विरघळून गेले असते. किल्ल्यावरून आणि खाली वेढ्यात गुंतलेल्या या सैन्याकडून, सारांश, उभय पक्षांतून डोंगरदुर्ग हलवून सोडणारा आगीचा पाऊस पडू लागला. किल्ल्यावरील लोकांनी रात्रंदिवस बाण, तोफांचे गोळे, बंदुकी यांचा अक्षरशः पाऊस पाडला. अंतराळात अग्नीची चादर धरल्यासारखे वाटत होते." एवढ्याने पुरे होईना म्हणून की काय, रात्री बेरात्री किल्ल्यातील मराठे बाहेर पडून बेलाशक मोगलांच्या मोर्चावर हल्ले करीत. एका आठवड्यात मुनीम-खानाच्या मोर्चावर मराठ्यांनी दोनदा हल्ले केले. अनेक मोगल जखमी झाले. खुद्द मुनीमखान याला दगडांनी सडकून काढले.

वेढा घालणारे मोगल सैन्य दूरवर पसरले होते. सैन्याला रसद आणि जना-वरांना गवत चारा मिळणे अत्यंत जरूर होते. मराठ्यांनी सभोवारचा चाळीस मैलांचा प्रदेश जाळून फस्त केला; आणि रसद आणणाऱ्या मोगल तुकड्यांवर हल्ले केले. रसद आणि दाणाचारा आणण्यासाठी अव्वल दर्जाच्या अमीराच्या हाताखाली सैन्याच्या मोठमोठ्या तुकड्या पाठवाव्या लागत व इतकेही करून रसद मिळेल याची खात्री नसे. ते एक मोठे कामच होऊन बसले होते व रसद

आणली म्हणजे त्या अमीराचा सन्मान करण्याची वेळ येई. उदाहरणार्थ– "बहरामंदखान बख्शी आणि हमीदुद्दीनखान बहादूर हे रसद आणण्यासाठी खटावकडे गेले होते. शत्रु सापडला तेथे त्याचा पाडाव करून त्यांनी छावणीत बरीच रसद आणिली. भेटीच्या वेळी बादशहाने त्यांची प्रशंसा केली. बहरामंदखानाला रत्नाचा एक मुतक्का (एक अलंकार) व हमीदुद्दीनखानाला एक शिरपेच ही बक्षिसे देण्यात आली."

किल्ल्याबाहेर पसरलेल्या मराठ्यांच्या आक्रमणाने मोगल गांजून गेले. धनाजी जाधवाने तर खुद्द ब्रह्मपुरीच्या बादशाही छावणीवर हल्ला केला. जेव्हा वजीर आसदखानाने शर्थीचा प्रतिकार केला, तेव्हाच तो हल्ला कसा बसा परतविला गेला. १० डिसेंबर रोजी मराठा सरदार शंकर याने चांभारगोंद्यावर हल्ला केला. १९ डिसेंबर रोजी कऱ्हाडचा मोगल फौजदार घोरीखान हा बादशाही छावणीतून कऱ्हाडकडे चालला होता. तीन हजार मराठ्यांनी त्याच्यावर हल्ला केला व त्याला कैद केले. तेव्हा २१ व २२ डिसेंबर रोजी हमीदुद्दीनखान हा धनाजी जाधवावर चालून गेला. त्याने त्याला मसूरपर्यंत मागे रेटले व घोरीखानाची सुटका केली. २७ डिसेंबर रोजी मोगल छावणीपासून अवघ्या चार मैलांवर हणमंतराव निंबाळकर याने हल्ला केला. मोगल सरदार इदतिमामखान, त्याचा मुलगा महंमदयार व नजाबतखानाचा एक मुलगा हे मारले गेले. एकदा तर मराठे बादशाही छावणीतील बाजारात घुसले आणि तेथे त्यांनी धुमाकूळ घातला. त्यांचा प्रतिकार करण्यास बादशाही छावणीतून पुरेशी तुकडी बाहेर पडू शकली नाही. भीमसेन म्हणतो, "बादशहाचे भाग्य म्हणूनच काही वेळाने मराठे हे बाजारातून निघून गेले."

साताऱ्याजवळ परळी येथे या वेळी पेशवा परशुराम त्र्यंबक याचा मुक्काम होता. शहाजादा आझम याचा तळ सातारच्या पश्चिमेस परळीच्या दिशेला होता. त्याच्याशी परशुराम त्र्यंबकाने राजकारण लावले व तिकडून रसद व कुमक किल्ल्यात पोचविली. मोगलांची दुर्दशा अनिवार झाली. "रसद पोचेना, कही येईना व किल्लाही येईना!" या पराक्रमाबद्दल किल्लेकऱ्यांना शाबासकी देताना परशुराम त्र्यंबकाने लिहिले –

'मा अनाम विठोजी बाबर देशमुख का नाणेघोळ यास– तुम्ही मयाजी तुकदेव या बा किऱ्येक आपण एकनिष्ठेचे वर्तमान सांगोन पाठविले. त्यावरून साकल्प केला आहे. ऐसियास तुम्हांपासून एकनिष्ठेस अंतर पडणार नाही हा भरवसाच आहे. आज औरंगजेब खासा येऊन सातारचे पाई बैसला आहे. अशा प्रसंगामध्ये तुम्ही आपले निष्ठेने इमानेइतबारे राहोन दाखविणे. हशमाचा जमाव करून कही कबाड खोरियात जात आहे ते मारणे. बैल, उंट, गुरेढोरे जे सापडेल ते तुम्हास माफ केले असे तुम्ही घेणे. निशान नगारा हे जे सापडेल ते दिवाणचे वरकडी तुम्हास बक्षीस

आहे. कोणे गोष्टीविषयी संदेह न धरता जमाव करून जागा जागा कही कबाड येते लुटून नेणे."

लढणाऱ्या लोकांस उत्तेजन कसे द्यावे याचा हा वस्तुपाठ आहे. औरंगजेबाची कही लुटाल ती तुम्हांस बक्षीस आहे. असे आश्वासन प्रत्यक्ष पेशवा देत असता तो रसद व दाणाचारा लुटणार नाही असा मराठा कोण असेल? सातारच्या लढावास इरेसरी चढावी म्हणून पेशवा आणखी इतरांचे पराक्रम पुढे वर्णन करून सांगतो—

"राजश्री स्वामीही लष्करच्या फौजेनिशी सिंहगडावर आले आणि कुल लष्कर औरंगजेबावरी रवाना केले आहे. राजश्री जाधवराव सेनापति व मल्हारराव व नेमाजी सिंदे व परसोजी भोसले व वरकड डोंगरे ऐसे जमावानशी ब्रह्मपुरीच्या रोखे जाऊन ब्रह्मपुरी मारिली. बेगम पादशहाची लेकी धरिली व भले भले लोकांचे कबिले कैद केले. तेथून येऊन दहाएक हजार लवाण मारून नेले. वर्धनगडच्या रोखे चाळीस एक हजाराच्या फौजेनीशी आले आहेत. राजश्री हणमंतराऊ व खंडोजी थोरात हे पंधरावीस एक हजाराच्या फौजेनसी चंदनवंदनाकडे आले आहेत. राजश्री माधवराऊ व राणोजी घोरपडे सुंदरपंत हेही इकडून आले. हे वर्तमान गनिमाने ऐकोन एकवटला आहे."

हे वर्तमान देऊन परशुराम त्र्यंबक म्हणतो—

"गनीम तो धिगवल आहे. सातारा हिंमत धरून भांडतो. हिसाब धरीत नाही. श्री कृपेने औरंगजेब पराभवाते पावतच आहे. हे खरे समजणे. न्याहारखानाचा लेक संग्रामखान पाडाव केला. बुधखानाचे तीन हत्ती पाडाऊ जाहले. सात आठशे घोडी पाडाऊ जाहाली. याउपरि कुल फौजेनसी खाशावर चालून येत आहेत. गनिमाचा हिसाब धरीत नाही. तुम्हीही हिंमत धरून जमाव करणे. कही कबाड मारणे."

१० जानेवारी १७०० रोजी रहमतपुरापलीकडे धनाजी जाधव, हणमंतराव निंबाळकर व राणोजी घोरपडे यांची व मोगल सरदार झुल्फिकारखान, बख्शी बहरामदखान आणि हमीदुद्दीनखान यांची निकराची लढाई झाली. मराठ्यांचे सैन्य पंधरा हजार होते. निकराच्या लढाईनंतर मराठे एक मैल मागे हटले. या लढाईत पांचशे मराठे मारले गेले. याच महिन्यात मराठे ब्रह्मपुरीच्या रोखाने पुन्हा चाल करून गेल्याचे कळल्यावरून झुल्फिकारखान त्यांच्या मागे गेला. त्याने मराठ्यांना भूम या गावापासून तीन चार कोस अलीकडे पर्यंत मागे रेटले. रात्रीच्या एक प्रहरापर्यंत त्याने चोवीस कोसांची मजल मारली. त्याने स्वतः विश्रांति घेतली नाही व मराठ्यांना घेऊ दिली नाही. मराठ्यांना दूर घालवून दिल्यानंतर त्याने परत ब्रह्मपुरीजवळ मुक्काम केला.

सातारच्या परिसरात अशा प्रकारे मोगल मराठ्यांशी झुंजत असता प्रत्यक्ष किल्ला घेण्याच्या नावाने प्रगति शून्य होती. किल्ल्याला खिंडार पाडण्यासाठी

तरबियतखानाने चोवीस गज उंचीचे दमदमे किल्ल्यासमोर उभे केले. त्यासाठी त्या भागातली सगळी झाडे कापण्यात आली व त्यांची लाकडे वापरण्यात आली. त्यावर तोफा ठेवून मोगल किल्ल्यावर तोफांचा भडिमार करू लागले. पण त्यांची मारगिरी कित्येक वेळा अशी बेफाम असे की गनिमापेक्षा मोगल मरण्याची धास्ती जास्त. 'कडकबिजली' नावाची मोगलांची एक तोफ होती. तिच्यातून दगडी गोळे उडविण्यात येत. पण नेम चुकून भलतीकडेच ते जात. एकापेक्षा अधिक वेळा असे झाले की किल्ल्याच्या पलीकडे शहाजादा आजमचा तळ होता. या तोफेंचे गोळे त्याच्या झोपण्याच्या तंबूपाशी जाऊन पडले. म्हणजे कडकबिजलीने कडाक्याचा धोका मराठ्यांपेक्षा शहाजाद्याला म्हणजे उद्यांच्या बादशहालाच जास्त होता. तोफ हलविण्यास दुसरी योग्य जागाही सापडेना. तेव्हा तोफ उडविण्याचे काम काळजीपूर्वक करावे अशी औरंगजेबाने आज्ञा केली. त्या भागातले मावळे हे किल्ले घेण्यात पटाईत होते. तीन वर्षांचा आगाऊ पगार म्हणून एक लाख छत्तीस हजार रुपये देऊन त्यांना नोकरीत घेण्यात आले. पण त्यांच्याकडूनही काम रेटेना. तेव्हा औरंगजेबानें आज्ञा केली की फत्तेउल्लाखान व रुहुल्लाखान यांनी मिळून किल्ल्यात मुख्य दरवाजासमोर मोर्चा कायम करावा. पण त्यामुळे तरबियतखानाच्या पोटात दुखू लागले. कारण त्याचे श्रेय हिरावले जात होते. खाफीखान म्हणतो, 'आपण असताना दुसऱ्याचा नांवलौकिक व्हावा अशी तरबियतखानाची इच्छा नव्हती." म्हणून तेही कार्य सफल होईना.

स्वत: औरंगजेब मात्र किल्ला सर व्हावा म्हणून जिवाचा आटापिटा करीत होता. वसंतगड सर करताना त्याने किल्ल्यावरून येणाऱ्या तोफांच्या गोळ्यांच्या टप्प्यात आपला तंबू देण्याची आज्ञा केली होती. सातारलाही तो तसाच हट्टाला पेटला होता. "तरबियतखानाने मोर्चामागे बादशहाकरिता एक तंबू उभा केला होता. तिकडे जाण्याकरिता बादशहा आपल्या उघड्या पालखीतून निघाला. पण तंबूत न जाता तो तसाच पुढे जाऊन डोंगराच्या पायथ्याशी पोचला. तेथून त्यानें दुर्बिणीतून किल्ल्याचे निरीक्षण केले. किल्ल्यावरून गोळे येत होते. परत चलण्याविषयी शहाजादा आजमने त्याला सांगितले. पण औरंगजेब तेथे एक तासभर उभा होता. मध्यान्हाच्या थोडे आधी तो आपल्या तंबूत परत आला.

पण असा जिवावर उदार झालेला औरंगजेब बिचारा एकटा होता. बाकीचे काडीने औषध लावणारे निव्वळ सांगकामे होते. लढाई हा त्यांचा मरण्याचा नव्हे तर जगण्याचा उद्योग होता. औरंगजेबाच्या मामानेच म्हटल्याप्रमाणे – "परमेश्वराच्या लेकरांचे भले व्हावे हाच ना आपला हेतु, मग बढतीची आशा धरून काम रेंगाळत ठेवणे बरे ! याच पद्धतीने काम करण्याचा प्रयत्न करावा." त्यामुळे ही मोहीम हा फक्त एकट्या औरंगजेबाच्या जिव्हाळ्याचा प्रश्न होऊन बसला होता. इतरांना त्याचे सोयर ना सुतक. उलट वेढा जितका लांबेल तितकी त्यांची पोळी पिकत

होती. त्यामुळे मागे रट्टे मारायला औरंगजेब असेल तोपर्यंत मोगल काम करीत. तो नसला की संपले.

स्वतः औरंगजेबालाही या गोष्टीची चांगली कल्पना होती. आपल्या सरदारांवर सामान्यतः तो नाराजच असे. आता तर तो फारच नाराज झाला. ९ फेब्रुवारी १७०० रोजी रात्री औरंगजेबाने लष्करचा मुख्य काजी महंमद इकराम याला बोलावू पाठविले. तो आल्यावर त्याने त्याला बसण्यास सांगितले. नंतर औरंगजेब आपल्या सिंहासनावरून उठून काजीपाशी खाली संतरजीवर बसला आणि त्याला म्हणाला. "रमजानचा महिना सोलापूर येथे प्रार्थना करण्यात घालवावा असे मला वाटत होते. पण काय करू? माझे अधिकारी मनःपूर्वक काम करीत नाहीत. मी त्यांना पुनः पुन्हा सांगतो पण त्याचा काहीच परिणाम होत नाही." बराच वेळपर्यंत औरंगजेब आपल्या सरदारांची गाऱ्हाणी सांगत होता. त्यानंतर त्याने काजीला निरोप दिला.

नवल नाही की वेढा घालून दोन महिने होत आले तरी किल्ला सर होईना. मराठ्यांचे हल्ले व आपल्या सरदारांची कुचराई यामुळे औरंगजेब जेरीला आला होता. सातारा भांडत होता. मराठे जोरावर होते. पेशवा परशुराम त्र्यंबकाने पुन्हा एकदा शाबासकीची थाप पाठीवर दिली.

"मा अनाम गण सावंत पंचहजारे हशम यासी परशराम त्र्यंबक प्रधान आजि औरंगजेब सातारियाचे पायी येऊन बसला आहे. त्यास तीन महिने जाहले. त्याणी मात्र उपाय करून डोईफोडी केली आहे. परत त्याचा उपाय तुम्ही चौकीकार गार होऊ दिला नाही. इति मर्दीनसी तडाख देऊन त्याचे हात खर्च केले आहे तरी शाबास तुमची तुम्ही लोकी निदान कबूल करून या गोष्टी केल्या. येणे करून तुमची कीर्ति सामान्य जाली नाही. राजश्री स्वामीस व आम्हाला तुम्ही लोकी बहुत संतोषाते पावविले आहे. तुम्हास निदान पडेल तेव्हा तुमच्या जिवास वोपोन देऊन आम्ही आपले जीव वांचवू हे घडत नाही ऐसी आपली निशा असो देणे."

याप्रमाणे साताराच्या समरभूमीवर मोगल मराठ्यांचा सामना निकराला आलेला होता. जय पराजयाचे पारडे वरखाली होत होते. श्रीकृपेने औरंगजेब पराभवाते पावतच आहे हा मराठ्यांचा विश्वास खरा होण्याची वेळ आली होती.

पण औरंगजेबाचे नशीबच शिकंदर.

ऐन याच वेळेला राजाराम मृत्यु पावला.

५ मार्च १७०० रोजी बातमीदारांनी बादशहाला कळविले की, "दुष्ट रामा हा वऱ्हाड प्रांताकडे परागंदा होऊन भटकत होता. तो अपयश पत्करून आपल्या देशाला परतला आणि नरकाला गेला."

राजारामाची उत्तरेकडील स्वारी बिलकुल यशस्वी झाली नाही. औरंगजेबाने महाराष्ट्रातील किल्ले सर करण्याची जंगी मोहीम काढली होती. तिला शह देण्यासाठी राजारामाने या उत्तर दिग्विजयाचे प्रस्थान ठेविले होते. त्याच्या-बरोबर धनाजी जाधव, नेमाजी सिंदे, खंडेराव दाभाडे यांच्यासारखे कसलेले वीर होते. पण बेदारबख्त व झुल्फिकारखान यांच्याशी झालेल्या अनेक लढायांत मराठ्यांचा पराजय झाला. उदाहरणार्थ, साकी मुस्तैदखान लिहितो "१७ नोव्हेंबर १६९९ – बादशहास कळविण्यात आले की नीरा नदीच्या पलीकडे शहाजादा कामबख्श व राजाराम यांच्या निकराच्या लढाया झाल्या. या युद्धात खानें आलम व सर्फराजखान यांनी उत्कृष्ट कामगिरी बजाविली. शत्रु फजीत होऊन व आपली मालमत्ता सोडून पळून गेला. शहाजादा व त्याचे सरदार यांना बक्षिसे पाठविण्यात आली. झुल्फिकारखान यास शहाजाद्यापाशी नेमण्यात येऊन त्याला आज्ञा करण्यात आली की राजारामाचा पाठलाग करून तो सापडेल तेथे त्याचा मोड करावा." झुल्फिकारखानाने राजारामाचा पाठलाग फार कसोशीने केला. त्याची पाठलाग करण्याची पद्धतच तशी होती. ब्रम्हपुरीकडे गेलेल्या मराठ्यांचा पाठलाग करताना, शत्रूला त्याने दम घेण्यास फुरसत दिली नाही. स्वतः झुल्फिकारखान यानें एक क्षणाचीही विश्रांति घेतली नाही. त्याने आपले बाजारबुणगे सोलापूर येथे ठेवले आणि यानंतर तो राजारामाच्या पाठलागावर रवाना झाला. भीमसेन म्हणतो "मोगल सैन्य येत असल्याचे ऐकून राजारामान पळण्यास सुरुवात केली. परंडा किल्ल्याच्या मार्गाने तो टेंभुर्णीजवळ आला आणि भीमानदी ओलांडून त्याने आपल्या देशाचा रस्ता धरला. त्याने धनाजी व इतर सरदारांना ब्रम्हपुरीच्या मोगल छावणीवर पाठविले. धनाजी वगैरेंनी ब्रह्मपुरीजवळ धाडसी आक्रमणे केली. झुल्फिकारखान हा ताबडतोब पोचला नसता तर त्यांनी खूपच धुमाकूळ घातला असता. झुल्फिकारखान त्याचा पाठलाग करीत रहमतपुरावरून मिरजेपर्यंत गेला." २६ डिसेंबर १६९९ रोजी शहाजादा बेदारबख्त हा राजारामावरील मोहिमेवरून परत आला व त्याने बादशहाची भेट घेतली. त्याच वेळी झुल्फिकारखान हाही बादशहास भेटला. इकडे राजाराम सिंहगडावर येऊन पोचला. त्याची उत्तरेकडची स्वारी अयशस्वी झाली व अर्धवटच झाली. २६ ऑक्टोबरला तो सातार्‍याहून निघाला व नोव्हेंबरात परतही आला. त्याने स्वतः केलेली अशी ही पहिली आणि शेवटचीच स्वारी म्हणावयाची.

राजारामाची प्रकृति जात्या नाजूक आणि अशक्त होती. त्या बाबतीत संभाजीच्या तो पासंगाला पुरू शकला नसता. असे म्हणतात की, संभाजीचे शरीर शिवाजी महाराजांपेक्षाही धिप्पाड होते व बळही इतके दांडगे होते की एका ठोशानेच तो कोणत्याही पटाईत वाघाला सहज ठार मारू शकत असे. चौल व फोंडा ही विजेसारखी घोडदौड संभाजीने वादळात व मुसळधार पावसात दीड

दिवसात केली. बिचाऱ्या राजारामाला असली घोडदौड कल्पनेतसुद्धा जमली नसती. त्याचा मोठ्यातला मोठा प्रवास म्हणजे पन्हाळा ते जिंजी. पण त्याही प्रवासात अनेक प्रसंग असे आले की बहिरजी घोरपड्याने त्याला खांद्यावर घेऊन लहान बाळाप्रमाणे चालविले. या मूळच्या अशक्त प्रकृतीत राजारामाच्या विलासी वृत्तीची भर पडली. राजाराम हा बदफैली माणूस नव्हता पण नाटकशाळा ठेवणे ही त्या काळची 'राजमान्य' रूढी होती व राजारामाने ती बऱ्याच 'निष्ठेनें' पाळली. मार्टिन म्हणतो, की स्वार्थी प्रल्हाद निराजीने मुद्दाम राजारामाला या विषयाची गोडी लावली, "त्याने राजारामाला खुशाल चैनीची चटक लावली. पहिल्याच तीन महिन्यांत त्याने तीन चार बायकांशी त्याचे विवाह जमविले. हिंदूंचा कोणताही समारंभ म्हटला म्हणजे त्यास नर्तक तर अवश्यच पाहिजेत. प्रल्हादपंताने या नर्तकांचे तांडे राजारामाला आणून दिले. मग त्याच्या उपभोगास सीमा काय?" सगुणाबाई ही राजारामाची अत्यंत सुंदर नाटकशाळाच होती. तिचाच मुलगा राजा कर्ण त्याच्यावर राजारामाचे प्रेमही फार होते. त्याची बहीण सूर्याजी पिसाळाच्या मुलाला दिलेली होती. राजारामाच्या या नाटकशाळा नक्की किती होत्या हे सांगणे कठीण आहे, गिरजोजी यादव आपल्या 'तकरीरीत' म्हणतो, "त्याउपरी राजेश्री स्वामींनी चौघा मातुश्रीसाहेबांस पालेकोटास पाठविले. त्या समागमे आपणास पाठविले." तसेच मुरराव यादव म्हणतो की "आपण (गिरजोजीने) पाठीमागे राहून वरकड राण्या व नाटकसाला महाराजांच्या यांचे आईबाप तेथे होते त्यांचे घरास घालऊन दिल्या." याखेरीज औरंगजेबाचे कैदेत असलेली जानकीबाई सोडली तरी ताराबाई व राजसबाई या राजारामाच्या विधिपूर्वक केलेल्या बायका होत्याच. असा हा राजारामाचा जनानखाना होता. आधीच बेतास बात असलेल्या राजारामाच्या प्रकृतीचे दिवाळे वाजण्यास हे कमी पडले म्हणून की काय राजारामाला अफू आणि गांजा यांचे जबर व्यसन लागले होते. "मराठ्यांचा राजा अफूच्या कैफांत व गांजाच्या तारेत सदैव धुंद असतो" असे मार्टिन म्हणतो. मद्रासचे इंग्रज तर एका बातमीपत्रात म्हणतात की 'अफू आणि गांजा यांच्या सेवनामुळे राजाराम हा राज्य करण्यास अपात्र होत चालला आहे. इतका की त्याचे हितचिंतक चिंताक्रांत झाले आहेत आणि त्याला पदच्युत करून त्याच्याऐवजी त्याच्या आठदहा महिन्यांच्या मुलाला राज्यावर बसविण्याचा त्यांचा विचार चाललेला आहे." माधवराव पेशव्यांच्या काळातल्या एका कवीने वर्णन केले आहे. रोगाने राजाराम क्षीण झाला असता ताराबाईने सुकृताच्या बळाने त्याचे रक्षण केले. "रोगे क्षीण परंतु सुकृतबळे तारामती रक्षिला." या सर्व बाबतीत राजारामाचा हाडवैरी जो औरंगजेब तो फारच श्रेष्ठ म्हणावा लागेल.

अशी ही राजारामाची प्रकृति मुळात नाजूक आणि तशात व्यसनांनी, विलासांनी व रोगांनी पोखरलेल्या त्याच्या तोळामासा प्रकृतीला स्वारीतली धावपळ आणि

दगदग मानवली नाही यात नवल नाही. ती स्वारी म्हणजे उंटाची पाठ मोडणारी गवताची अखेरची काडी होती. सिंहगडावर त्याला नवज्वर झाला. त्याला रक्ताच्या उलटया झाल्या आणि २ मार्च १७०० रोजी तो मृत्यु पावला. त्या वेळी त्याचे वय फक्त तीस वर्षांचे होते. त्या शेवटच्या क्षणी रामचंद्रपंत अमात्य त्याच्याजवळ होता. त्याला तो म्हणाला– "तुम्ही थोरले महाराजांपासून राज्याचे साधनास श्रम साहस करीत आला व करीत आहा. एक एक प्रतिसृष्टी करणार आहा. आमचा तो काळ समीप आला. याच्यामागे सर्वत्र मिळोन हल्ली करिता तसे करावे. आम्ही गेलो म्हणोन श्रमास अंतर न करिता शिवाजी महाराज सुटोन येत ते करावे. त्यांचे ठायी लक्ष ठेवून करणे म्हणजे त्यांस यश येईल. हे तुम्हास ठावेच आहे. त्यापेक्षा फार काय सांगू?" हे राजारामाचे शेवटचे शब्द.

तेच राजारामाचे सामर्थ्य होते. भरताचे वर्णन करताना कालिदासाचा राम सीतेला सांगतो– पित्रा विसृष्टां मदपेक्षया यः श्रियं युवाप्यङ्कगतामभोक्ता। इयन्ति वर्षाणि तया सहोग्रमभ्यसतीव व्रतमासिधारम्॥ "पित्याने ती केवळ मला अर्पण केलेली आहे म्हणून, जी राज्यलक्ष्मी हस्तगत झालेली असता, तरुण असूनही तिच्या उपभोगापासून अलिप्त राहणारा आणि इतकी वर्षे तिच्या बरोबर असिधारा व्रताचे पालन करणारा तो हा भरत होय." राजारामाने स्वतःस राज्याभिषेक करून घेतला नाही, त्याने राज्यचिन्हे धारण केली नाहीत. त्याने राज्यलक्ष्मीचा उपभोग घेतला नाही. तुरुंगात असलेल्या शाहूचा केवळ प्रतिनिधि म्हणून त्याने एक तप मराठी राज्य सांभाळले. ते राज्य राजारामाला मिळावे म्हणून त्याच्या आईने भगीरथ प्रयत्न केले. त्यासाठी अण्णाजी दत्तोसारख्या मंत्र्यांनी संभाजीच्या क्रोधाग्नीत आपली आहुति दिली. फळ पिकावे आणि आपोआप तोंडात पडावे, त्याप्रमाणे ते राज्य आपोआप त्याच्याकडे चालत आले होते. त्याला नऊ व ं कैदेत ठेवणाऱ्या संभाजीचा औरंगजेबाने शिरच्छेद केला होता. त्याची बायको व त्याचा एकुलता एक मुलगा शाहू– की जो एकमेव राज्याचा दावेदार होता तो औरंगजेबाने पकडून नेला होता. त्याच्या वाटेतले काटे नियतीने आपोआप दूर केले होते. अशा स्थितीत या राजारामाने 'त्या' राजारामाप्रमाणेच मिळत असलेले राज्य, वस्त्राला चिकटलेल्या कुसळाप्रमाणे झटकून टाकले. "राज्यं येन पटान्तलग्नतृणवत्त्यक्तं गुरोराज्ञया!" आणि राजा म्हणून नव्हे तर दूर असलेल्या राजाचा प्रतिनिधि म्हणून राज्याचा सांभाळ केला. राजारामाचे हे उदात्त चारित्र्य पाहिले म्हणजे, चौदा वर्षे नंदिग्रामी राहून रामचंद्राच्या पादुकांची पूजा करीत त्यांचे राज्य निक्षेप म्हणून सांभाळणाऱ्या वैराग्यमूर्ती भरताची आठवण आल्याशिवाय राहात नाही. राजारामाचा विचार करताना राम आणि भरत यांच्यासारख्या पुण्यश्लोकांची आठवण व्हावी हीच त्याच्या योग्यतेची उंची दर्शविणारी गोष्ट आहे.

दादजी नरस प्रभूचे वतन परत करावे असे शंकराजी नारायणाला सांगताना राजाराम लिहितो– "कारण चिरंजीव राजश्री (शाहू) काले करून तरी श्री देसी आणील....ते (शाहू) मुख्य सर्व राज्यास अधिकारी. आम्ही करितो तरी ते त्यांचेसाठीच आहे. प्रसंगास सर्व लोकांस तिकडेच पाहणे येईल व वागतील हे कारण ईश्वरीच नेमिले आहे." वाघाच्या जाळीत ठेवावा त्याप्रमाणे औरंगजेबाच्या 'जाळीत' असलेला आपला पुतण्या सुटून येण्याची व त्याच्या स्वाधीन राज्य करण्याची वाट पाहणारा राजाराम कोणीकडे आणि तीन भाऊ आणि बाप यांची वासलात लावून राज्य हाताखाली घालणारा औरंगजेब कोणीकडे! खरोखर, जगाच्या इतिहासातसुद्धा राजारामाच्या चारित्र्यास व स्वार्थत्यागास तोड असलेली उदाहरणे हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीच आढळतील यात शंका नाही. रामायण महाभारत सांगणाऱ्या हिंदु संस्कृतीला संजीवन देण्यात शिवाजी महाराजांची उभी हयात खर्च झाली त्या हिंदु संस्कृतीला आलेले राजाराम हे अमृत-फल म्हटले पाहिजे.

संभाजी आणि राजाराम दोघेही भाऊ भाऊ असले तरी शरीराप्रमाणे मनाच्या ठेवणीतही त्या दोघांत दोन ध्रुवांचे अंतर होते. संभाजी हा बाभळीच्या झाडाप्रमाणे ताठ आणि कणखर तर राजाराम हा शिरीषपुष्पापेक्षाही सुकुमार होता. संभाजी हा संतापी, तेजस्वी, मनस्वी, पराक्रमी होता. तो पराक्रम राजारामाच्या ठिकाणी नव्हता हे उघडच आहे. उभ्या आयुष्यात त्याने रणांगणात तलवार अशी गाजविलीच नाही. याचा अर्थ तो भ्याड होता असे नाही. त्याच्या पराक्रमी सरदारांनी ती वेळच त्याच्यावर येऊ दिली नाही. अशा एकाहून एक पराक्रमी लोकांची मने राजारामाने जिंकली हाच त्याचा सर्वांत मोठा पराक्रम होय. हा केवळ भाषेचा अलंकार नाही तर वस्तुस्थिति आहे. संताजी घोरपडे, धनाजी जाधव, शंकराजी नारायण, रामचंद्रपंत अमात्य ही माणसे संभाजीच्या वेळी नव्हती असे नाही. पण संभाजीच्या तेजस्वी व उग्र प्रकृतिस्वभावामुळे ही माणसे दबून गेली होती. राजारामाने आपल्या मार्दवाने आणि माधुर्याने ही आणि अशी हजारो माणसे जवळ केली, व त्यांच्या पराक्रमाला नवे क्षेत्र उपलब्ध करून दिले. या लोकांनी औरंगजेबाला सळो का पळो करून सोडले व "हे आदमी नव्हत, भूतखाना आहे," असे शब्द त्याच्या तोंडून वदविले. संभाजीच्या पराक्रमाने कुंठित होऊन त्याला पकडल्याशिवाय किंवा ठार मारल्याशिवाय पगडी डोक्यावर घालणार नाही अशी संतापाने औरंगजेबाने प्रतिज्ञा केली आणि आपली पगडी जमिनीवर आपटली. राजारामाने समरांगणात संभाजीप्रमाणे समोरासमोर तलवार गाजविली नसली तरी महाराष्ट्रावर आलेले औरंगजेबाचे परचक्र निवारण करण्याच्या बाबतीत त्याचे कर्तृत्व संभाजीच्याच तोडीचे होते. संभाजीप्रमाणे तो प्रत्यक्ष 'कर्ता' नसेल पण 'करविता' तर खासच होता. राजाराम आपल्या पाठीशी

आहे या केवळ भावनेने मराठ्यांना हत्तीचे बळ त्या काळी आले. तो जर नसता तर मराठ्यांच्या हातून एवढ्या प्रतिकूल परिस्थितीत एवढ्या पराक्रमाच्या कोटी झाल्या असत्या काय हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. पराक्रम तलवार करीत नाही, की हात करीत नाही तर मन करीत असते. मराठ्यांचे हे मन राजारामाने सतेज राखले हे त्याचे कर्तृत्व होय. संभाजीच्या मृत्यूनंतर राजारामाच्या कारकिर्दीच्या प्रारंभी महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यसूर्याला खग्रास ग्रहण लागले होते. राजारामाच्या कारकिर्दीच्या शेवटी ते ग्रहण जवळ जवळ सुटले होते व मोक्षकाल दृष्टिपथात आला होता. ज्याप्रमाणे ग्रंथाचा प्रारंभ व उपसंहार या दोन बिंदूंवरून ग्रंथाचे तात्पर्य काढतात, त्याप्रमाणे राजारामाच्या कारकिर्दीचा प्रारंभ व उपसंहार या दोन बिंदूंवरून त्याच्या कारकिर्दीची फलश्रुति स्पष्ट होते. कथा अशी आहे की राजाराम जन्मला तो पालथा जन्मला. तेव्हा शिवाजी महाराज म्हणाले, 'दिल्लीची पादशाही पालथी घालील.' राजारामाने आपल्या थोर पित्याचे भविष्य अक्षरशः खरे करून दाखविले व औरंगजेबाला बेदम करून दिल्लीची पातशाही खरोखरच पालथी घातली. असे वाटते की शिवछत्रपतींच्या मुखाने राजारामाच्या जन्मकाळी जणू भवितव्यताच बोलत होती. 'ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोऽनुधावति!'

याचे कारण उघड आहे. "स्वये श्वसणेचि सुकुमार । मुख मोहाचे माहेर । माधुर्या जाहले अंकुर । दशन जैसे ॥" असे राजारामाचे माधुर्य आणि मार्दव असले तरी मराठी राज्याच्या अभिमानाच्या बाबतीत त्याचे मन खरोखरच "कठिण वज्रासी भेदूं ऐसे" असे होते. "स्वामीचे राज्य म्हणजे देवताभूमि, या राज्याची अभिवृद्धि व्हावी" ही नागोजी मान्यासारख्या दोन डगरीवर हात ठेवणाऱ्या मंडळींची बतावणी असेल कदाचित, पण राजारामाची ती अनन्यसाधारण जीवननिष्ठा होती. संभाजी व राजाराम यांची प्रकृति भिन्न असली, मार्ग भिन्न असले, तरी स्वातंत्र्यलक्ष्मी ही उपास्य देवता एकच होती व अनन्यनिष्ठ भक्तीही एकच होती. 'प्रवर्तितो दीप इव प्रदीपात् ।' या न्यायाने एकाच शिवाजी महाराजांच्या या दोन पुत्रांत त्यांच्या आत्म्याचा आविष्कार दोन प्रकारे झाला असे म्हणता येईल. त्यांचे सूर्यासारखे उग्र, प्रखर, दाहक क्षात्रतेज संभाजीच्या रूपाने प्रकट झाले आणि राजारामाच्या व्यक्तिमत्त्वात त्यांची चंद्रासारखी शीतल, शांत व सात्त्विक सुषमा सोळा कलांनी अवतीर्ण झाली.

राजारामाची उत्तरक्रिया जीवजीराजे भोसले बावीकर यांनी केली. शिवाजी महाराजांच्या नित्यपूजेतला एक बाण होता. त्याचे नाव 'चंद्रशेखर' बाण. हा बाण फार मोठा व तेजस्वी असून त्यातून 'नित्यशः उदकस्राव' होत असे; म्हणजे हातात धरला असता चंद्रकान्त मण्याप्रमाणे त्याला पाझर फुटे व हात ओला होई. त्या बाणाला थोरले महाराज कधीही विसंबत नसत. त्यांच्यानंतर

राजाराम तो बाण जवळ बाळगू लागला व त्याची पूजा करू लागला. ज्या ठिकाणी राजारामाचे दहन झाले, तेथे या बाणाची स्थापना ताराबाईने केली; व राजारामाच्या समाधीवर छत्री बांधून, पूजाअर्चा, नैवेद्य, नंदादीपाची व्यवस्था रामचंद्रपंत अमात्याने करून दिली. तानाजीच्या प्राणार्पणाने सिंहगडाला पावित्र्य लाभलेच होते. आता राजारामाच्या चिरविश्रांतीचे स्थान होण्याचे भाग्य त्याला मिळाले आणि ते पावित्र्य द्विगुणित झाले.

ताराबाई आणि राजसबाई या राजारामाच्या बायका, राजारामाच्या मृत्यूच्या वेळी त्याच्याजवळ नव्हत्या. त्या पन्हाळचाला होत्या. तिसरी बायको अंबिकाबाई विशाळगडावर होती. तिला राजारामाच्या मृत्यूची बातमी कळली तेव्हा चार सहा घटका दिवस होता. तिने सहगमनाचा संकल्प केला आणि त्यासाठी मलकापूरहून साहित्य आणावयास हवालदारास सांगितले. तो बुचकळ्यात पडला आणि म्हणाला, " दिवस थोडा राहिला. मलकापुराहून साहित्य येणे त्यास रात्र होईल. गलबलीचे दिवस किल्ल्याचे काम. येविशी आज्ञा ? " तेव्हा बाई बोलली, " स्वार पाठवून जलदीने साहित्य आणवावे. मी गेल्यावाचून सूर्य अस्तास जाणार नाही. " असे म्हणून सदरेची सावली पडली होती, त्या सावलीजवळ किंचित् मातीचा ढीग करवून त्यावर पळसाचे पान रोवले व म्हटले की, " यास ओलांडून सावली जाणार नाही. " आणि असे सांगतात की, खरोखरच अंबिकाबाईचे सहगमन होईपर्यंत सावली त्या पळसाच्या पानाला ओलांडून गेली नाही. राजारामाचे पागोटे हृदयाशी धरून अंबिकाबाई सती गेली.

तिची समाधि विशाळगडावर आहे. राजारामाचे जीवन हे समर्पण होते. अंबिकाबाईचे जीवन हे राजारामाच्या चरणी वाहिलेले फूल होते. तिची समाधि ही त्या पवित्र समर्पणाची साक्ष आहे.

राजारामाच्या मृत्यूची बातमी शाहूला कळली तेव्हा त्याला व येसूबाईला अनिवार दुःख झाले. अकरा वर्षांपूर्वी रायगडहून जिंजीकडे जाताना राजारामाने शाहूला पोटाशी धरून 'पुन्हा भेट होईल तो सुदिन' असे म्हणून त्याचा निरोप घेतला होता. तो सुदिन राजारामाच्या हयातीत काही परत उगवला नाही. आपणास राजाराम सोडवून नेईल ही शाहूला मोठी आशा होती पण प्रतिकूल दैवामुळे ती उद्ध्वस्त झाली. त्याला असे झाले की " थोरले महाराज व संभाजी महाराज आज गेले. राज्यही बुडाले.......काकासाहेब सोडवून नेतील अशी खातरजमा होती, आता ईश्वरानी निराश्रित आम्हास केले. " त्या शोकसंतापाने शाहूस जबरदस्त दुखणे आले. पण तो बंदिवान्. आपले दुःख आणि आपले दुखणे याचे खरे कारणही औरंगजेबाला सांगण्याची त्याला बंदी होती. २६ ऑगस्ट १७०० रोजी औरंगजेबाची आणि शाहूची भेट झाली. त्या वेळी औरंगजेब शाहूला म्हणाला, " काय राजे, काय ही तुमची स्थिति, तुम्ही अगदीच फिक्कट

दिसता ? " जवळ हाफीज अंबर होता तो बोलला, " राजे डाळभातास बिलकुल स्पर्श करीत नाहीत. मिठाई खातात. कैदेत असता जेवू नये, फराळ करावा असे त्यांचे शास्त्र सांगते. " तेव्हा औरंगजेब म्हणाला, " तुम्ही कैदेत नसून तुमच्या स्वतःच्या घरीच आहात असे समजा. " या प्रसंगात व्यक्त झालेले शाहूचे राजारामावरील प्रेम जितके अविस्मरणीय आहे, तितकीच औरंगजेबाची शाहूबद्दल प्रकट झालेली ममता चकित करणारी आहे. सहाराप्रमाणे एरवी भगभगीत असलेल्या त्याच्या वैराण मनाच्या कोपऱ्यात चुकून फुललेली ही चोरटी हिरवळ.

स्वतः औरंगजेबाला मात्र राजारामाच्या मृत्यूची बातमी ऐकून पराकाष्ठेचे समाधान झाले आणि त्याने सुटकेचा निःश्वास सोडला आणि ते साहजिक होते. संभाजीप्रमाणे राजारामानेही त्याला फार छळले होते. संभाजीला त्याच्यापुढे जेरबंद करून आणले तेव्हा ईश्वराबद्दलच्या कृतज्ञतेने त्याला आसवे आवरेनात आणि त्याने बाहू उभारून परमेश्वराचे आभार मानले. आताही त्यानें तसेच केले. जणू संभाजी व राजाराम या दुश्मनांना श्रद्धांजलि वाहण्याचा हा खास बादशाही प्रकार असावा. खाफीखान म्हणतो-" परमेश्वराच्या लेकरांना त्या काफराकडून पीडा होत होती ती आता दूर झाली म्हणून बादशहाने परमेश्वराचे आभार मानले. आणि शहादणे वाजविण्याची आज्ञा केली. ही बातमी मोगल लष्करात पसरली. बादशहाचे हितचिंतक आणि एकनिष्ठ सेवक यांनी बादशहाचे अभिनंदन केले. परस्परांना ते मुबारक (अभिनंदन) म्हणू लागले. संभाजी कैद होऊन वध पावला त्या वेळी राजारामाच्या अस्तित्वाचे त्यांना महत्त्व वाटले नाही. त्या वेळी ते म्हणत की बरे झाले. दक्षिणेतून युद्धाचे मूळ (संभाजी) नाहीसे झाले. आताही (राजारामाच्या मृत्यूनंतर) ते असेच म्हणून आपल्या मनाचे समाधान करून घेऊ लागले. ते एकमताने म्हणू लागले, या दुष्ट मराठ्यांची पाळेमुळे नाहीशी झाली. त्याच्या (राजाराम) मागे त्याची लहान मुले आणि निराधार बायका राहिल्या आहेत. त्यांचा निकाल लावणे म्हणजे अगदी सोपे आणि क्षुल्लक आहे."

बिचारा औरंगजेब !

दक्षिणच्या मोहिमेतील त्याच्या आशा निराशांचा केविलवाणा खेळ पाहिला म्हणजे वाटते, की मराठेच नव्हे, तर मराठ्यांच्या रूपाने दैवच त्याला हुलकावण्या देत होते व त्याची क्रूर थट्टा करीत होते. औरंगजेबाची पावलोपावली होत असलेली ही करुण वंचना पाहिली म्हणजे तो मराठ्यांचा शत्रु होता या गोष्टीचाही क्षणभर विसर पडतो आणि मनाला त्याची कीव येते.

पण, तत्त्वज्ञानी लोक आपणास असे सांगतात की आपल्या दुःखाला आपणच जबाबदार असतो. आपल्या अज्ञानामुळे आपल्याला दुःख होते. सर्व सुखाचे माहेर

असलेला मोक्ष म्हणजे अन्तःकरणाला घट्ट बसलेला हा अज्ञानाचा गळफास तुटणे होय. या पलीकडे काही नाही. "अज्ञानहृदयग्रन्थिनाशो मोक्ष इति स्मृतः ।"

औरंगजेबाच्या दुःखाला औरंगजेबच जबाबदार होता. दुसरे कोणी नाही. त्याचे दुःख त्याच्या अज्ञानाने निर्माण केले होते. त्याला हे समजले नाही की राजाराम मेला म्हणजे मराठे मेले नाहीत. ते अमर होते.

शिवाजी, संभाजी, राजाराम या व्यक्ती नव्हत्या, त्यांच्या रूपाने अवघे मराठी राष्ट्र त्याच्याशी लढत होते. व्यक्ती मेली तरी राष्ट्र मरत नसते. पणती फुटली तरी ज्योति फुटत नसते, आरसा फुटला आणि प्रतिबिंबाचा चुराडा झाला म्हणून बिंबाच्या काही ठिकऱ्या उडत नाहीत. नदीच्या पात्रात जलबिंदु उठतात आणि विरतात पण अमरत्वाचे प्रतीक असलेली ती सरिता अखंड वाहत राहते, For men may come and men may go, but I go on forever !

राष्ट्र ही ज्योति आहे. राष्ट्र हे बिंब आहे, राष्ट्र ही नदी आहे.

कुशाग्र बुद्धीच्या औरंगजेबालाही समजले नाही ते हे की, मराठे ही जमात नव्हती ती झुंड नव्हती, ती लुटारूंची टोळी नव्हती, ते राष्ट्र होते.

२ मार्च १७०० रोजी राजाराम मृत्यु पावला. त्यानंतर त्याच्या नावाचे १७०० च्या आक्टोबरमधले येसाजी पानसरे याचे पत्र आहे. हा येसाजी पानसरे हा प्रतापगडच्या देवीचा हवालदार, त्या पत्रात राजारामाने प्रतापगडच्या भवानीला केलेल्या नवसाचा उल्लेख आहे. राजाराम मार्चमध्ये मृत्यु पावला व पत्र तर ऑक्टोबरातले, त्यावरून राजारामाने मृत्यूपूर्वी केलेली ही आज्ञा असावी ते युक्तिसंगत वाटते. तसे असेल तर राजारामाच्या अखेरच्या इच्छेवर या पत्राने पडणारा प्रकाश फारच बोधप्रद आहे. ते त्याचे मृत्युपत्रच आहे, आपल्या मागून येणाऱ्या लोकांना त्याने दिलेला तो वारसा आहे. 'अन्ते मतिः सा गतिः ।'

ते ऐतिहासिक महत्त्वाचे पत्र असे आहे–

"हुजरून श्रीच्या नवरात्राचे व बेगमीचे मोहछायाबदल ग्रैवज बा। हरि विठ्ठल मु।। मजमुदार व बालोजी लाडचांकर" हुजरात य बा।। दाभोली लारी नवसे पाठविली बा।। सनद छ २७ रबिलाखर पैवस्तगी छ ४ जमा दिलौवल श्रीच्या पोता जमा धरून स्वामीच्या आज्ञेप्रमाणे नवरात्रामध्ये शतचंडी अनुष्ठान व होम व श्रीदेवीस अभिषेक व ब्राह्मण भोजन व दंपत्यपूजन व मराठियाकडील सोवासिणी व गोंधल व इत्यादिक पूजा मोहछाये विजयादशमी परियेत यथासांग येथाविध सांग अनुष्ठान भले ब्राह्मण श्री क्षेत्रीचे आणून वेदमूर्ती राजश्री विश्वनाथभट श्रीक्षे व निळकंठ भट पूजक श्री याच्या विद्यमान श्रीस प्रार्थना करूनी दुष्ट पराभव होऊन दिली परियेत राज्य हस्तगत होऊन सर्व राज्यासहित स्वामीचे कल्याण उतरोतर म्हणौन शतचंडी अनुष्ठान करविले त्यास बा।। मोहछायास खर्च झा। छ ४ जमा दिलौबल ता। छ ९ रोज मि।। येकून सा रोज खर्च बेरीज

दाभोली लारी बाा जाबिता नख्ता झाडा ६६०॥ सासे साडेसाठी लारी खर्च जाहला. त्याचे जाबिते अलाहिदा नख्तच्या व यैनजिनसाच्या तपशीलवार सेवेसी रवाना. बाा बालोजी लाड दिमती चाकर हुजरती केला आहे. तेणेप्रमाणे सेवेसी श्रुत होये."

खुद्द राजाराम प्रतापगडावर १६८९ च्या एप्रिलमध्ये गेलेला होता. तेथून तो पन्हाळचाला आणि पन्हाळचाहून जिंजीला गेला. त्यामुळे राजारामाचा हा नवस १६८९ एप्रिलमधला असावा, असे जाणत्यांचे मत आहे. परंतु. या मताचा व पत्रावरील २० ऑक्टोबर १७०० या तारखेचा विरोध येत असल्यामुळे, राजारामाचा हा नवस मृत्यूपूर्वी बोललेला असावा असे वाटते हे वर सांगितले आहेच, पण हे बरोबर नसले व नवस १६८९ मधला असला तरी, त्यामुळे नवसाचे महत्त्व कमी होत नाही. उलट अनंतपटीने वाढते, कारण १६८९ च्या एप्रिलमध्ये मराठ्यांच्या दुर्दैवाने सीमा गाठली होती. पात्र काठोकाठ भरले होते. एक थेंबही आता वर राहू शकत नव्हता. संभाजीचा शिरच्छेद झाला होता. राजधानीला वेढा पडला होता. वेढ्यात राणी आणि युवराज होते, आणि ज्याच्यावर राज्याचा आता सारा भार तो मंचकारोहण झालेला शिवछत्रपतींचा दुसरा पुत्र राजाराम राज्य वाचविण्यासाठी जिंजीला चाललेला होता. साल्हेर, त्रिंबक, कल्याण, माहुली, राजगड, रोहिडा, तोरणा असे नामांकित किल्ले भराभर मोगलांच्या हाती पडले होते. जिंजीच्या मार्गावर भुजंग पसरावेत त्याप्रमाणे ठिकठिकाणी शेख निझाम, रुहुल्लाखान, सय्यद लष्करखान यांची सैन्ये पसरली होती. सगळीकडून संकटे कट केल्यासारखी गोळा झाली होती. राजारामाचे राज्य आणि प्राण दोन्ही संकटात होते. अशा वेळी 'दिल्लीपर्यंत राज्य हस्तगत व्हावे' अशी भवानीमातेला प्रार्थना करणाऱ्या राजारामाचा अजिंक्य निर्धार आणि उत्तुंग ध्येयवाद पाहिला म्हणजे मन विस्मयाने थक्क झाल्याशिवाय राहत नाही. तात्पर्य हे की, १६८९ साली प्राण संकटांत सापडले असताना काय किंवा १७०० साली प्राण जात असताना काय राजारामाचे डोळ्यापुढे एकच एक स्वप्न तरळत होते, त्याचे एकच एक भवानीच्या चरणी मागणे होते का "दुष्ट पराभव होऊन दिल्ला–परियंत राज्य हस्तगत होऊन सर्व राज्यासहित उतरोतर कल्याण व्हावे!"

भवानीला केलेला हा नवस ही एका व्यक्तीची वैयक्तिक महत्त्वाकांक्षा नव्हती, तर बिंदूमध्ये प्रतिबिंबित झालेल्या समुद्राप्रमाणे राजाराम या व्यक्तीत प्रतिबिंबित झालेल्या अवघ्या मराठी राष्ट्राची ती दुर्दम्य आकांक्षा होती. मराठी आत्म्याचा तो सामूहिक हुंकार होता, ईश्वरस्वरूप असलेल्या 'महा'-राष्ट्राचे ते निःश्वसित होते. 'अस्य वा महतो भूतस्य निश्वसितमेतद्यदृग्वेदः ।'

ज्या क्षणी मूल जन्माला येते त्याच क्षणापासून त्याच्या हृदयाचे स्पंदन सुरू होते, त्याप्रमाणे ज्या क्षणी मराठ्यांचे राष्ट्र जन्माला आले, त्याच क्षणापासून

त्याच्या हृदयाचे स्पंदन आणि त्याचे श्वास निःश्वास केवळ एकाच विचाराने होत होते की, दिल्ली हस्तगत करावी, स्वधर्माचे रक्षण करावे. त्याचे प्रतीक म्हणून औरंगजेबाने फोडलेल्या काशी विश्वेश्वराचा जीर्णोद्धार करावा. मोडली क्षेत्रे परत मांडावी आणि भरतभूमीचे आनंदवनभुवन करावे.

समज असा आहे की, दिल्ली मूळचे हस्तिनापूर इन्द्रप्रस्थ युधिष्ठिराची, पांडवांची राजधानी. दिल्लीचा शेवटचा हिंदु सम्राट् पृथ्वीराज चव्हाण याला शहाबुद्दीन घोरीने ११९३ साली ठाणेश्वरच्या लढाईत ठार मारले आणि तेव्हापासून दिल्लीला हिंदु कायमचे अंतरले. घोरीनंतर कुतुबमिनार बांधणारा त्याचा गुलाम कुतुबुद्दिन दिल्लीचा सुलतान झाला. त्याच्यानंतर गुलाम, खिलजी, तघलख, सूर, लोदी या इस्लामी राजवटींनी दिल्लीवर राज्य केले. अखेर १५२६ मध्ये झगताईखानाचा वंशज बाबर याने सिकंदर लोदीचा पराभव केला व दिल्लीचे तख्त हस्तगत करून चकत्यांच्या पातशाहीची प्रतिष्ठापना केली. त्याच्यानंतर दोनशे वर्षांत हुमायून, अकबर, जहांगीर, शहाजहान व औरंगजेब असे एकापेक्षा एक पराक्रमी बादशहा दिल्लीच्या सिंहासनावर आरूढ झाले. त्यांच्या कर्तृत्वाने व पांचशे वर्षांच्या अखंड साहचर्याने दिल्लीचे तख्त म्हणजे मुसलमानांचेच, हिंदूंचे नव्हेच, यवनाधीश म्हणजे दिल्लीपति असा समज, मुसलमानांच्या तर राहोच, पण हिंदूंच्याही मनामध्ये ठाम होऊन बसला होता. 'दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा मनोरथान् पूरयितुं समर्थः' माझे मनोरथ पुरे करण्यास समर्थ फक्त दिल्लीश्वर किंवा जगदीश्वर आहे–' अशी त्यांची प्रशस्ति जगन्नाथ पंडितासारखे हिंदु कविपुंगवच करीत होते, आणि 'दिल्लीवल्लभपाणिपल्लवतले नीतं नवीनं वयः' म्हणजे दिल्लीच्या वल्लभाने तळहातावरच्या फोडाप्रमाणे तरुणपणी माझे पालन केले, असे म्हणून स्वतःच्या भाग्याचा स्वतःच हेवा करीत होते. तात्पर्य हे की बाराव्या शतकाच्या अखेरीला दिल्लीची राज्यलक्ष्मी हिंदूना जी एकदा पराङ्मुख झाली ती परत काही सन्मुख झाली नाही; त्या राजधानीला राज्यकर्ते म्हणून पुन्हा काही त्यांचे पाय लागले नाहीत. दिल्ली त्यांच्या हातातून एकदा जी निसटली ती निसटलीच. 'दिल्ली ती ढीली भयी!'

यावर कळस म्हणूनच की काय, औरंगजेबाने सोमनाथचे मंदिर फोडले, मथुरेच्या केशवदेवाचे मंदिर उद्ध्वस्त केले आणि काशी विश्वेश्वराचा विध्वंस करून तेथे मशीद उभारली.

ती आपली दिल्ली पुन्हा हस्तगत करावी आणि तो आपला काशी विश्वेश्वर पुन्हा उभा करावा हा एकच ध्यास दोनशे वर्षे अहोरात्र मराठ्यांना लागला होता. त्यांच्या राष्ट्राचा जीवनहेतु तो होता.

१६४५ साली रोहिडखोऱ्याचा देशपांडे दादजी नरस प्रभू याला शिवाजी महाराजांनी लिहिले की, "श्री रोहिरेश्वर तुमचे खोरियातील आदिकुलदेव तुमचा

डोंगरमाथा पठारावर शेंद्रींलगत स्वयंभू आहे. त्याणी आम्हास यश दिले व पुढे तो सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरविणार आहे." "हे राज्य व्हावे हे श्रींचे मनात फार आहे." १६६४ मध्ये त्यांनी सुरतेची लूट केली, आणि त्यांचा मंत्री दत्ताजी त्रिमल वाकनीस याच्या नावावर मोडणारी '९१ कलमी बखर' म्हणते त्याप्रमाणे औरंगजेबाला पत्र लिहिले की, "तुमचा मामा शास्ताखान त्यास शास्त केली. तुमची सुरत होती ते बेसुरत केली. पातशाही पुरातन हिंदूंची आहे. पातशाही दिल्लीची तुमची नव्हे, पुरातन हिंदूंची."

१६६५ मध्ये जयसिंगाला महाराजांनी लिहिले की, "फार जोराचे प्रयत्न केले पाहिजेत व तलवारीस पाणी देऊन तुर्कांचा जबाब तुर्कीतच (जशास तसे या न्यायाने) दिला पाहिजे. जर तू मारवाडचा राजा जसवंतसिंग व मेवाडचा राजा राजसिंह यांच्याशी ऐक्य करशील तर फार मोठे काम होईल अशी आशा आहे.

"चोहोकडून गर्दी करून तुम्ही या सर्पाचे डोके दगडांनी ठेचून टाका. तेवढ्यात मी व माझे भाले बहाद्दर वीर विजापूर व गोवळकोंडा येथील दोनही बादशहांना जिंकतो.

"आम्ही लोक आमच्या सेनेच्या लाटा दिल्ली येथील त्यांच्या जर्जर झालेल्या घरात पोहोचवू म्हणजे त्यांच्या नावाचे औरंगही (राजसिंहासन) राहणार नाही व जेबही (शोभाही) राहणार नाही." ज्याला महाराजांनी हे पत्र लिहिले त्या जयसिंहाचा प्रशस्तिकार स्पष्टच म्हणतो की, 'शिवप्रभृतिभूपालाः दिल्लीन्द्रपदलिप्सवः।' – म्हणजे शिवाजी प्रभृति राजे दिल्लीपति होण्याची ईर्ष्या धरीत आहेत. जयसिंहासारख्या शत्रूच्या प्रशस्तिकारानेसुद्धा उल्लेख करण्याइतकी शिवाजी महाराजांची दिल्ली हस्तगत करण्याची महत्त्वाकांक्षा सर्वतोमुख झाली होती.

परंतु 'फलानुमेयाः प्रारम्भाः संस्काराः प्राक्तना इव' हा स्वभाव महाराजांचा. त्यांच्या मनातला संकल्प त्याला फल येईल तेव्हाच कळायचा. करावे फार, बोलावे थोडे हा त्यांचा स्वभाव. त्यांच्या या जन्मजात मितभाषी मुत्सद्दी स्वभावामुळे असेल किंवा परिस्थितीमुळे असेल, 'हिंदवी स्वराज्य' या मंत्रासारख्या अमोघ पण गूढ शब्दसंहतीपलीकडे त्यांच्या मनातला हेतु दर्शविणारा त्यांच्या हातचा अस्सल लेख त्यांच्या हयातीत उपलब्ध झाला नाही. त्यांच्या समकालीनांचे पुरावे व घटना यावरून त्यांच्या मनातले इंगित केवळ तर्काने ताडावे लागते. ती गोष्ट संभाजीची नव्हती. त्याचा स्वभाव स्पष्टवक्ता, त्याची परिस्थितीही वेगळी, औरंगजेब त्याच्याशी दारातच येऊन भिडला होता. त्यामुळे शिवाजी महाराजांच्या मनात अस्फुट असलेली कल्पना संभाजीने त्याच्या स्वभावाप्रमाण व परिस्थितीप्रमाणे छातीठोकपणाने ठणठणीत शब्दांत गर्जून सांगितली – "त्या यवनाधमाला सांप्रत असे वाटू लागले आहे की, आम्ही हिंदु म्हणजे तत्त्वशून्य झालेले आहोत. आम्हांला

...१२

धर्माचा काहीच अभिमान राहिला नाही. बादशहाची ही वागणूक यापुढे आम्हाला सहन होणे शक्य नाही. या दुष्ट यवनाशी युद्ध करण्यात आम्ही आमची संपत्ति, आमचा देश, आमचे दुर्ग, सारांश सर्व काही पणास लावण्यास तयार आहोत. आता अशी वेळ आली आहे की त्या यवनाधमाला पकडून कारागृहात घालणे शक्य होईल. मग आपल्याला देवतांची पुन्हा स्थापना करून धर्मकर्मे निर्विघ्नपणे पार पडतील अशी व्यवस्था करता येईल. हे सगळें लवकरच करण्याचे आम्ही ठरविले आहे याची आपण खात्री बाळगावी."

संभाजीची गुणसंपदा एरवी कितीही थोर असली, तरी राष्ट्राचा जीवनहेतु आकळणारी द्रष्टयाची प्रतिभाही शौर्याच्या जोडीला त्याला लाभली होती असे म्हणण्याचे धाडस करवत नाही, ते देणे ईश्वराचे. ते शिवाजी महाराजांना लाभले होते. संभाजीचा तो पितृदत्त सांस्कृतिक वारसा होता. तो त्याने राजारामाला दिला.

जिंजीला असताना राजारामाने ४ जून १६९१ रोजी हणमंतराव घोरपडे व त्याचा नातलग कृष्णाजी यांस सरंजाम ठरवून दिला, त्या वेळी म्हटले की "महाराष्ट्र धर्म पूर्ण रक्षावा हा तुमचा संकल्प स्वामींनी जाणून उभयतास जातीस व फौज खर्चास सहा लक्ष होनांची नेमणूक चालविण्याचा निश्चय करून दिधला असे. पैकी (१) रायगड प्रांत व (२) विजापूर (३) भागानगर व (४) औरंगाबाद हे चार काबीज केल्यावर दर कामगिरीस पाऊण लाखप्रमाणे एकंदर तीन लाख आणि तीन लाख प्रत्यक्ष दिल्ली घेतल्यावर द्यावयाचे असा निश्चय केला आहे. एकनिष्ठपणे सेवा करावी. स्वामी तुमचे बहुत प्रकारे चालवितील."

राजाराम गेला पण त्याच्या मरणाने, शिवाजी महाराजांपासून अविच्छिन्न वाहत आलेली ही विचारधारा तुटली नाही. ती अखंड राहिली. राजारामाचा हुकुमतपन्हा रामचंद्रपंत अमात्य याने १७१५ साली मराठ्यांच्या या जागतेपणाच्या स्वप्नाचा आपल्या 'आज्ञापत्रां'त जणु काही प्रत्यक्ष दृष्ट अशा शब्दात निर्देश केला. 'नर्मदेपासून श्रीरामेश्वरपर्यंत स्वामींचे राज्य निःकंटक जहाले – स्वामींनी दृढ विचार करून तमाम त्या प्रांतीचे रजपूत येकत्र करविले. स्वामी सुमुहूर्ते नर्मदापार जाहले. श्रीकृपे अचिरकालेच मुख्य शत्रूचा पराभव करून दिल्ली आगरे लाहोर बंगाले, ढकांभकर आदि करून संपूर्ण तत्संबंधी देसदुर्ग हस्तवश्य करून श्रीवाराणशीस जाऊन स्वामी श्रीविश्वेश्वर स्थापना करीत.'

१७०८ साली शाहू आला आणि परिस्थितीने मराठ्यांच्या राजकारणाला थोडी मुरड पडली. ते पातशाही सेवक झाले. पण दिल्ली हस्तगत करण्याचे त्यांचे ध्येय ते विसरले नव्हते. त्यांनी केले ते इतकेच की सरळ दिल्लीची पातशाहात गारद करण्यापेक्षा पातशाहात तर राखायची पण तिच्यावर 'कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम्' असे वर्चस्व मिळवावयाचे हे आडवळणी धोरण पत्करले.

१७३७ साली पहिल्या मराठ्याने थेट दिल्लीला धडक दिली आणि दिल्ली दरवाजा ठोठावला. त्या वेळी त्याने म्हणजे थोरल्या बाजीरावाने लिहिले की, "पुरे जाळावेत व मराठे आहेत असे पातशाहास अवलोकन करवावे ऐसा विचार करून .... लांब लांब मजली वीस कोसांच्या करून दिल्लीस कुशबंदी नजीक शहर येथे मुक्काम केला. पुऱ्यास आगी देऊन शहर खाक करावे, त्यास दिल्ली महास्थळ, पातशाहा बरबात जालियात फायदा नाही. दुसरे पातशाहाचे व खानडौराचे चित्तांत सलूख करावयाचे आहे. मोगल यांस सलूख करू देत नाहीत. अमर्यादा केल्यास राजकारणाचा दोरा तुटतो. याकरिता आगी लागावयाचे तहकूब करून पातशाहास पत्रे पाठविली....दिल्लीभवता मुलूख खालसा केला. पुढे सोनपत-पानपत यमुनापार मुलूख राहिला तोही ताराज करून मोगल अन्नास महाग होता ऐसेंच केले जाईल"... बाजीरावानंतर "आम्ही गनीम लोक शिवाजी महाराजांचे शिष्य आहोत" असे अभिमानाने सांगणाऱ्या नानासाहेबांच्या कारकिर्दीत राघोबाने १७५८ साली अटकेवर झेंडा फडकविला व लिहिले की– 'काबूल व कंदाहार हे अटकेपारचे सुभे हिंदुस्थानकडे अकबरापासून आलमगीरपावेतो होते, ते आम्ही विलायतेत का द्यावे ?'

१७६१ ला पानपतावर मराठ्यांना तडाखा जबर बसला, पण ते हिंमत हरले नाहीत; या प्राणांतिक आघातातून ते पुन्हा उभे राहिले, व अवघ्या दहा वर्षांत, "बहुत दिवस इकडे–तिकडे भटकत फिरत असलेले पातशाहा आलम," पुरा बारा वर्षांचा वनवास भोगल्यानंतर शुजाउद्दौल्याच्या नव्हे, इंग्रजांच्या नव्हे, तर केवळ मराठ्यांच्या मदतीमुळे दिल्लीच्या तख्तावर आरूढ झाले. अखेर मराठ्यांनी दिल्ली हस्तगत केली. ती हस्तगत होईपर्यंत ते स्वस्थ बसले नाहीत.

मराठे पातशाहीचे सेवक झाले खरे पण हा सेव्यसेवक भाव असा काही चमत्कारिक होता की स्वामीला स्वामी करणे म्हणजे बादशहाला तख्तावर बसवणे तर सेवकांच्या मर्जीवर होतेच, पण त्याला खर्चाला पैसे ऊर्फ 'पगार' हाही सेवकाकडूनच मिळत असे. असले बिलक्षण मालक व असले विलक्षण सेवक जगात कुठेतरी असतील काय? पण मोगल बादशहांच्या नाकर्तेपणामुळे आणि मराठ्यांच्या कर्तृत्वामुळे कल्पनेतही अशक्य असलेला असला प्रकार अठराव्या शतकाच्या अखेरीस हिंदुस्थानात घडून आला खरा. मराठ्यांच्या मदतीने तख्तावर असलेल्या या शहाआलम बादशहाला खर्चाला महादजी शिंदे देत असे तेव्हा बादशहाची गुजराण होई. या नोंदी पहा–२४ डिसेंबर १७८४ – 'विनंती करण्यात आली की, हुजुरांच्या खर्चाकरिता पाटीलबुवांनी आज एक लाख रुपये खजिन्यात दाखल केले आहेत. याबर (बादशहांची) आज्ञा झाली की, "इतके पुरे. यापेक्षा जास्त म्हणजे लोभीपणा समजावा." ४ डिसेंबर १७८४ – आज्ञा झाली की पाटीलबुवांना आम्ही सलतनतीचे मुखत्यार केले आहे. पाटीलबुवांना बादशहांनी म्हटले

की, "आम्हाला परगणे, महाल इत्यादींशी काही कर्तव्य नाही. अवर्षण आणि बंड यामुळे त्यांचे उत्पन्न बरोबर येत नाही. तुम्ही जाणें आणि मुलूख जाणें, मला नगद रक्कम देत चला." – बादशहांनी स्वतः एक हिंदी दोहा रचला होता. तो सुवर्णाक्षरांनी लिहून पाटीलबुवांच्या पागोटयावर खोवण्यात आला. " मुल्कमाल सब खोयेपर, पडे तुम्हारे बस। माधो ऐसी कीजियो, आवे तुमको जस।"– देश आणि सर्व संपत्ति गमावून आम्ही तुमच्या पदरी आलो आहोत. माधो (महादजी) जेणे करून तुम्हांला लौकिक लाभेल असे करा."

१७९१ मध्ये सवाई माधवरावांसाठी वकील –ई– मुतलकचे 'बादशाही फर्मान' घेऊन महादजी शिंदे पुण्यास आला, तेव्हा फर्मान बाडीचा दरबार झाला. तेव्हा संतुष्ट होऊन गोविंदराव पिंगळयाने नाना फडणिसास लिहिले की, "अटक नदीचे अलीकडे दक्षिण समुद्रापावेतो हिंदूंचे स्थान – तुरुकस्थान नव्हे. हे आपली हद्द पांडवांपासून विक्रमजित – पावेतो त्यांनी राखून उपभोग केला. त्यामागे राज्यकर्ते नादान निघाले. यवनांचे प्राबल्य जाले. चकत्यांनी हस्तनापूरचे पद घेतले. शेवटी आलमगिराचे कारकिर्दीत यज्ञोपवीतास साडेतीन रुपये जेझया बसून, ओले अन्न सेवावे, सर्वांनी घ्यावे हे नौबत गुजरली ! त्या दिवसांत कैलासवासी शिवाजी महाराज शककर्ते व धर्म राखते निघाले. त्यांनी किंचित् कोन्यात धर्म-संरक्षण केले....हल्ली श्रीमंतांच्या पुण्यप्रतापे करून व राजश्री पाटीलबुवांचे बुद्धि व तरवारीच्या पराक्रमे – करून सर्व घरास आले.... जाल्या गोष्टी यात केवळ मुलुख राज्य प्राप्त, इतकेच नाही तर वेदशास्त्र रक्षण, धर्मसंस्थापन, गोब्राह्मणप्रतिपालन, सार्वभौमत्व हाती लागणे, कीर्ति, यश यांचे नगारे वाजणे इतक्या गोष्टी आहेत." पातशाही सेवक होऊन मराठयांनी मिळविले काय याचा एका विचक्षण समकालीनाने मांडलेला हिशेब हा असा आहे.

नाव राहिले, गाव वाहून गेले ! बादशाहीचे नाव फक्त राहिले पण नावालाही महत्त्व राजकारणात फार आहे. मराठे सर्वाधिकारी झाले, दिल्लीश्वराचे दिल्लीश्वर (King-maker) झाले पण तपशिलाच्या बाबतीत, तत्त्वांच्या बाबतीत बादशहा बादशहा राहिला व मराठे सेवकच राहिले. मराठयांनी Defacto दिल्लीची पातशाही हस्तगत केली पण De Jurere ती मोगलांकडेच राहिली. मराठयांनी तपशील साधला पण तत्त्व गमावले आणि तत्त्वाचे महत्त्व राजकारणात फार आहे. विशेषतः ज्या महाराष्ट्रात " हा तत्त्वांचा प्रश्न आहे." हे वाक्य परवलीच्या शब्दासारखें गल्लीबोळात ऐकू येते, त्या महाराष्ट्रातल्या मराठयांनी दिल्लीपातशाहीचे राजकारण करताना तत्त्व गमावले हे पुष्कळांना अनुचित वाटते. कारण, राजकारणात तत्त्वाचे स्थान रमणीच्या भालप्रदेशावरील सौभाग्य दाखविणाऱ्या कुंकुमतिलकासारखे आहे. तो असेल तर सर्व नसून असल्यासारखे आहे. तो नसेल तर सर्व असून नसल्यासारखे आहे.

या आक्षेपात तथ्य आहे आणि ते पुष्कळच आहे. पण, एकतर मराठ्यांचा छत्रपति औरंगजेबाच्या कैदेतून सुटून राज्यावर आला तोच मुळी पातशाही सेवक होण्याची अट कबूल करून. त्यामुळे मराठ्यांचा वैचारिक पायाच मुळी कच्चा राहिला. दुसरे असे की राजकारण कधीही स्थिर नसते. बदलत्या परिस्थितीप्रमाणे तेही बदलतच असते. आणि चिवटपणाप्रमाणे राजकारणातल्या लवचिकपणाबद्दल मराठ्यांची ख्याति आहे ती थेट शिवाजी महाराजांपासून. तिसरे असे की तुटेल इतके ताणू नये हे मराठ्यांचे मुळी राजकारणाचे सूत्रच होते. त्यामुळे त्यांना ध्येय साधण्यासाठी सरळ मार्ग सोडून तिरपा मार्ग स्वीकारावा लागला. अर्थात् शिवाजी महाराजांच्या वेळची तत्त्वनिष्ठा जागृत असती व राजपूत, बुंदेले, जाठ, कर्नाटक इत्यादि परस्थ हिंदूंशी झगडत न बसता त्यांचे सहकार्य मिळविण्यात मराठे यशस्वी झाले असते तर फलश्रुति वेगळी व अधिक शुद्ध आणि निर्भेळ झाली असती हे उघडच आहे. पण ते एकट्या मराठ्यांवर अवलंबून नव्हते. मराठ्यांच्याप्रमाणेच या परस्थ हिंदूंत हिंदुत्वाभिमान आणि वैयक्तिक हितसंबंध याचे काही चमत्कारिक मिश्रण झाले होते. विशुद्ध ध्येयवाद बोलावा तितका सोपा नसतोच. कारण त्यात स्वार्थावर तिलांजलि द्यावी लागते. म्हणून प्राप्त परिस्थितीत, मराठ्यांनी केले नाही त्याबद्दल त्यांना दोष देण्यापेक्षा केले ते काही कमी नव्हते येवढे तरी म्हणणे भाग आहे. वळणे आणि आडवळणे घेऊन का होईना, अखेर त्यांनी दिल्लीचा मुक्काम गाठला यात संशय नाही. बाकी कोणाला संशय असला तरी, पातशाहीचे सेवकपद मिरविणाऱ्या मराठ्यांच्या "आन्तरः कोऽपि हेतू" बद्दल त्या वेळच्या मुसलमानांना मुळीच शंका नव्हती. गोविंदराव पिंगळ्यांचे शब्द मार्मिक आहेत– "यवनांचे मनात की काफरशाई जाली हे बोलतात, लेकिन ज्यांनी ज्यांनी हिंदुस्थानात शिरे उचलली त्यांची शिरे पाटीलबावांनी फोडिली... "कोणाच्याही मनात हे वाहडले, ते शेवटास जाऊ नये, यास्तव नाना स्वरूपे व युक्ती करून नाश करावे ऐसे आहेत."

पण त्या दिल्ली काबीज करण्याच्या ध्येय–प्राप्तीच्या आनंदातही सावध आणि व्यवहारी मराठे आपल्या तीर्थक्षेत्रांना विसरले नव्हते. थोरल्या माधवरावाने मरताना लिहून ठेविले होते की, "श्रीकाशी, प्रयाग ही दोन्ही स्थळे सरकारात यावी, असा तीर्थरूपांचा हेतु होता. त्यास प्रस्तुत करण्याजोगे दिवस आहेत. दहावीस लक्षांची जहागीर मुबदला पडली तरी देऊन दोन्ही स्थळे हस्तगत करावी. प्रयत्न करावा–" महादजी शिंदे दिल्लीचा सर्वाधिकारी झाला तेव्हा नाना फडणविसाने त्याला आठवण देऊन लिहिले की, "श्रीकाशीत विश्वेश्वराचे देवालय जुने हजार वर्षांचे मोडून मसीद केली. त्यास विश्वेश्वराचे स्थळ मोकळे होऊन पूर्ववत् देवालय व देवस्थापना व्हावी हे हिंदुधर्मास उचित आहे. या कामी पातशाहाजवळ उद्योग करून फिरोन दावा न राहे व उपद्रव न होय ऐसे पत्र

करून घ्यावे. विश्वेश्वराचे स्थलांत वसती असल्यास, त्याचे इमल्याचा पैका देविला जाईल. परंतु पातशाहाची परवानगी निर्वेध जाली पाहिजे. तसेच मथुरा–वृंदावन ही स्थळे सरकार–मालकीची असावी, त्यांच्या सनदा सरकारचे नावे घेऊन पाठविणे." पण ते त्या वेळी सर्वांशी साध्य झाले नाही. कारण "अमर्यादा केल्यास राजकारणाचा दोरा तुटतो." महादजीने नानास उत्तरादाखल लिहिले– "हे गोष्ट केल्याने सर्वां यवनांस वाकडे वाटेल. काशीबद्दल असोफुद्दौला व इंग्रज एक आहेत. ते पर्यायाची बोलणी बोलतात. मथुरा–वृंदावनाबद्दल पातशाही फर्मानाचे मसुदे केले आहेत. सनद तयार होऊन आल्यावर सेवेशी रवाना करितो–" १७९२ मध्ये त्या सनदा महादजीने स्वतःबरोबर पुण्यास आणल्या व पेशव्यास अर्पण केल्या.

दिल्ली हस्तगत करावी, यावनी मंडळ निर्यवन करावे, आपला धर्म व आपली धर्मक्षेत्रे राखावीत या हेतूने १६४६ साली शिवाजी महाराजांनी 'हिंदवी स्वराज्या'चा संकल्प सोडला, त्याची सांगता दीडशे वर्षांनी, संकटांवर मात करून व बदलत्या परिस्थितीप्रमाणे पवित्रे बदलून १७९२ साली सवाई माधवरावांच्या कारकिर्दीत मराठ्यांनी केली. दीडशे वर्षे मराठी मुलुखातले वीर आणि मुत्सद्दी, कवि आणि संत यांच्या डोळ्यापुढे स्वप्न तरळत होते ते हे हिंदवी स्वराज्याचे होय. ते 'कविः क्रान्तदर्शी' अशा क्रान्तदर्शी कवीचे स्वप्न होते, ते द्रष्टयाचे स्वप्न होते, ते समर्थ रामदासांचे स्वप्न होते, ते शिवछत्रपतींचे स्वप्न होते. "स्वप्नी जें देखिलें रात्री । तें तें तैसेचि होतसे ।"

राष्ट्रे स्वप्नावर जगतात. औरंगजेब मराठ्यांना नामशेष करू शकला नाही; कारण, मराठे हे एक राष्ट्र होते. ते राष्ट्र होते कारण त्यांच्याजवळ भविष्याचे उत्तुंग स्वप्न होते. मॅझिनीने म्हटले आहे, 'The nations that have no visions, perish' ज्या राष्ट्रापुढे स्वप्न नसते ती राष्ट्रे नष्ट होतात.

ती दीडशे वर्षांची यात्रा होती, ती दीडशे वर्षांची दीपावली होती, ती दीडशे वर्षांची लढाई होती. एक यात्रिक वाटेत पडला तर दुसऱ्याने त्याची जागा भरून काढली पाहिजे. एक दिवा विझला तर दुसरा पेटून उठला पाहिजे, एक शिपाई कामास आला तर दुसरा पुढे सरसावला पाहिजे पण यात्रा चाललीच पाहिजे. दिवाळी झालीच पाहिजे, लढाई लढलीच पाहिजे, घोष घुमलाच पाहिजे, 'हरहर महादेव !' 'हरहर महादेव !' 'जय बाबा विश्वनाथ !' 'जय बाबा काशीनाथ !' शिवाजी महाराज गेले.

संभाजी आला.  
संभाजी पडला.  
त्याची जागा राजारामाने घेतली.  
आज राजाराम पडला होता.

या तीन पिढ्यांशी झगडणारा औरंगजेब अजूनही होता तसा होता. अखंड वाहणारी नदी आटण्याची वाट पाहत, उन्हापावसांचे तडाखे खात, तिच्या काठावर चिवटपणाने तिष्ठत उभ्या असलेल्या प्राचीन महावृक्षासारखा पुराण पुरुष. कुरुक्षेत्रावरचा दीडशे वर्षांचा भीष्म आणि पंचाऐंशी वर्षांचा द्रोण यांच्याप्रमाणे तरुणाच्या तडफेने तो लढत होता. "आकर्णपलितः श्यामः वयसाशीतिपञ्चमः । रण पर्यचरद्रोणो वृद्धः षोडशवर्षवत्– (कानापर्यंत पांढरे केस झालेला पंचाऐंशी वर्षांचा म्हातारा सावळ्या रंगांचा द्रोण सोळा वर्षांच्या मुलाप्रमाणे रणात संचार करीत होता.) त्या औरंगजेबाच्या मागे उभी होती पाचशे वर्षांच्या इस्लामी राजवटीची प्रतिष्ठा, अक्षय खजिना, अपार सैन्य, ब्याऐंशी वर्षांचा परिपक्व अनुभव, कौटिल्या-सारखी बुद्धि आणि डोंगराएवढी जिद्द.

त्याच्याशी झगडण्यास, राजाराम पडल्यानंतर, मराठ्यांच्या बाजूने आता नेटाने पुढे सरसावली––

राजारामाची बायको
ताराबाई.
शिवछत्रपतींची धाकटी सून.
वय वर्षे पंचवीस फक्त.

□ □

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था पुणे
(इ.व्ह.ट्रा. सोसायटी: पुणे)
१३३ सदाशिव पेठ, पुणे-३०.



ताराबाई

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, पुणे
(डे.ग्रह ट्रा. ...पाघटी; पुणे)
९१३३ सदाशिव पेठ, पुणे-३०.

# ताराबाई

## ( छत्रपति दुसरा शिवाजी )

(२ मार्च १७०० ते २० फेब्रुवारी १७०७)

क्षणि धुळीत गेली वहात ती विषधार ।
शतखंडित झाले तें गर्वोन्नत ऊर ।
विच्छिन्न तनूंतुनि काढुनि उपसुनि दात ।
वाऱ्यापरि गेला नकुल वनातुनि दूर ।

संग्राम सरे, रक्ताचे ओघळ जाती
आनंदें न्हाती त्यात तृणाची पातीं
पिंजूनि कापसापरी पडे तो नाग
ते खंड गिळाया जमले कीटक भोंती ।

**–कुसुमाग्रज**
(अहि–नकुल)

# (१०)

राजारामाच्या मृत्युपूर्वी अवघे पाचच दिवस पेशवा परशुराम त्र्यंबक याने सातार्‍याच्या वेढ्यात झुंजणारा गण सावंत पंचहजारे याला शाबासकी देताना लिहिले होते– "आजि औरंगजेब सातारियाचे पाईं येऊन बसला आहे. त्यास तीन महिने जाहाले. त्याणी उपाय मात्र करून डोईफोडी केली आहे. परत त्याचा उपाय तुम्ही चौकीकार गार होऊ दिला नाही. इति मर्दीनेसी तडाख देऊन त्याचे हात खर्च केले आहे. तरी शाबास तुमची." ज्या हिंमतीने व मर्दुमकीने मराठे औरंगजबास तडाखे देऊन त्याचे हात खर्च करीत होते त्यात राजारामाच्या मृत्यूने कसलाही फरक झाला नाही. त्यांचे नीतिधैर्य ढळले नाही आणि उरातला अभंग आवेश किंचितही उणावला नाही. राजारामाच्या मृत्यूनंतर त्याची थोरली बायको ताराबाई हिने पतिनिधनाचे दुःख आवरले व आपला मुलगा शिवाजी याच्या नावाने राज्याची सारी सूत्रे हाती घेतली. तिच्या नेतृत्वाखाली मराठे परत औरंगजेबाशी निकराने झुंजू लागले. एकदाच फक्त ताराबाईने दंडनीतिऐवजी सामोपचाराचा प्रयोग औरंगजेबावर करून पाहिला. राजारामाच्या मृत्यूनंतर लगेच म्हणजे १२ मार्च रोजी बक्षी रुहुल्लाखानमार्फत औरंगजेबाशी तिने समेटाचे बोलणे लावले. तिच्या मागण्या अशा होत्या की, आपल्या पुत्रास सात हजारी मनसब व दक्षिणेच्या देशमुखीचे हक्क मिळावेत. त्याबद्दल दक्षिणेच्या मोगल सुभेदाराच्या सेवेत पाच हजार मराठी फौज राहील आणि मोगलांना सातारा, पन्हाळा, चंदन-वंदन, परळी इत्यादि सात किल्ले मिळतील आणि शिवाजी महाराज किंवा उदयपूरचा महाराणा यांना जशी दरबारी येऊन मोगल बादशहास मुजरा करण्याची सक्ती नव्हती, तशी आपले पुत्र शिवाजीराजे यांच्यावरही नसावी. पण औरंगजेबाला या अटी मान्य झाल्या नाहीत. मराठ्यांनी आपले सर्वच किल्ले देऊन टाकले तर त्यांच्याशी तह होऊ शकेल असे त्याने मराठी वकिलांना सांगितले. त्यामुळे तहाच्या वाटाघाटी बारगळल्या. दोन महिन्यांनी पुन्हा एकदा मराठ्यांकडून तहाचा प्रयत्न झाला. रामचंद्रपंत अमात्याचा वकील रामाजी पंडित व परशुराम त्र्यंबकाचा वकील अंबाजी पंडित तहाच्या वाटाघाटीसाठी बादशहाच्या छावणीत आले होते. या वेळी औरंगजेबाने त्यांना थोडेसे तर्‍हेवाईक उत्तर दिले. त्यांच्याशी तहाच्या वाटाघाटी त्याने केल्याच नाहीत. ते हेरगिरी करण्यासाठी छावणीत आले आहेत असा त्यांच्यावर त्याने आरोप ठेविला आणि चांगले सात आठ महिने कैदेत डांबून ठेवले. परत काय बिशाद कोणी मराठा तहाच्या वाटाघाटीसाठी औरंगजेबाकडे जाण्याचे धाडस करील !

औरंगजेबाचे वस्तुत: आता वय झाले होते. त्याचे सैन्यही युद्धाला कंटाळले होते. गेल्या अठरा वर्षांत आलेल्या अनुभवावरून मराठे आपणाला आवरत नाहीत हे त्याला उघड दिसत होते. तरीही त्याने आपल्या हाताने वाटाघाटींचा दरवाजा कायमचा लावून टाकला. याचे कारण उघड होते. मराठ्यांच्या प्रामाणिकपणा-वर त्याचा काडीचाही विश्वास नव्हता. आज ताराबाईने जरी किल्ले दिले तरी उद्या आपली पाठ वळल्यावर मराठे ते परत घेणार नाहीत याची शाश्वती काय? शिवाजीने पूर्वी जयसिंगाला दिलेले तेवीस किल्ले असेच हिसकावून घेतले होते. मराठ्यांच्या लबाडीचा अनुभव त्याला इतका आला होता की हा तह नसून तहाची हुलकावणी आहे असेच त्याला वाटले व म्हणून सर्व किल्ले देण्याची उघडच अशक्य अट मुद्दाम घालून त्याने स्वत: होऊनच तह फिसकटून टाकला असणे शक्य आहे. यापूर्वी १६८४ च्या डिसेंबरात संभाजीचे वकील तह करण्या-साठी औरंगजेबाकडे आले होते, संभाजीच्या वकिलांनी तह करण्याबाबत अर्ज आणिला होता. तो बादशहाने बघितला सुद्धा नाही. "हुकूम झाला की, या काफर-बच्च्याशी तह फक्त तलवारीनेच केला जाईल." या प्रसंगाला आता सोळा वर्षे होऊन गेली होती. पण मराठ्यांबाबत औरंगजेबाचे धोरण तेच ताठर आणि जिद्दीचे राहिले होते. त्यात काहीही फरक झाला नव्हता. त्यामुळे साताऱ्याच्या रणभूमीवर पूर्वीचाच जीवन-मरणाचा संघर्ष मागील अंकावरून पुढे चालू राहिला.

वेढा घालून चार महिने झाले. किल्ला काही हाती येईना. किल्ल्यावरील मराठे रात्रंदिवस बाण, बंदुकी आणि दगड यांचा पाऊस पाडीत आणि रात्री-बेरात्री बेधडक मोर्च्यांवर छापे घालीत. बाहेर पसरलेले मराठे वेढा घालणाऱ्या मोगलांची लांडगेतोड करीत आणि त्यांची रसद मारीत. तेव्हा औरंगजेबाने असे ठरविले की सुरुंग लावून तट उडवून द्यावा व किल्ल्यावर हल्ला चढवावा. तर-बियतखानाच्या माणसांनी मंगळाईच्या बुरुजाखाली चार गज लांब आणि दहा गज रुंद अशा खोल्या तयार केल्या होत्या. तेथे शिपायांच्या चौक्या कायम कर-ण्याचा विचार होता. त्याऐवजी त्यातून दारू ठासून भरण्यात आली. औरंगजेबाने आज्ञा केली की काही हजार पायदळ व कर्नाटकी बंदुकची यांनी मुखलिसखान बक्षी व हमीदुद्दीनखान बहादूर यांच्या नेतृत्वाखाली किल्ल्याच्या पायथ्याशी जमावे. खोल्यांतील दारू उडून भडका झाला व तटाला खिंडार पडले की हल्ला करावा असे ठरले. सैनिक जमा झाले आणि सुरुंगाचा भडका उडण्याची वाट पाहू लागले.

ती तेरा एप्रिल १७०० ची सकाळ होती. तटात खोदलेल्या दोन खोल्यांमधून सुरुंगाची दारू भरली होती. पहिल्या खोलीतल्या सुरुंगाला बत्ती दिली आणि कान-ठळ्या बसविणारा आवाज झाला. तटाची भिंत कोसळून किल्ल्याच्या आत पडली. अनेक मराठे ठार झाले. रस्ता मोकळा झाला हे पाहून मोगलांनी पुढे हिरिरीने

चाल केली. तोंच दुसऱ्या खोलीतल्या सुरुंगाच्या दारूचा स्फोट झाला. भिंत उडाली पण या वेळी ती किल्ल्याच्या आत मराठ्यांच्या अंगावर न पडता बाहेर उभ्या असलेल्या मोगलांच्या अंगावर कोसळली. दगड आणि माती यांचा डोंगरच मोगलांवर कोसळला. खंदकात, कोनाड्यात, कानाकोपऱ्यात आजूबाजूला जे लोक किल्ल्यावर चाल करण्यास सरसावून उभे होते ते सगळे त्या दगड धोंड्याखाली गाडले गेले. त्यांना पुरण्यास तयार थडगी आयती मिळाली. दोन हजार लोक न लढताच मारले गेले व पुरले गेले. खाफीखान मोठ्या दुःखाने म्हणतो– "त्यांच्या प्रेतांना स्नान लाभले नाही. कफन मिळाले नाही किंवा त्यांचा विधिपूर्वक दफन-विधि झाला नाही." हाहाकार एवढा उडाला की तट ढासळून किल्ल्यात घुसण्याची बाट मोकळी झाली होती, तरी केवळ धास्तीमुळे पुढे कोणी सरेना.

तरीही शंभर लोक वाचले ते तसेच किल्ल्याच्या तटावर पोचले. तेथे मराठ्यांची प्रेतेच पडली होती. कारण पहिल्या सुरुंगाच्या स्फोटात मराठेच फार दगावले होते. हे मोगल तेथे गेले. त्यात जतचा बाजीराव डफळे होता. ते ओरडून आपल्या सोबत्यांना बोलवू लागले. "मैदान रिकामे आहे. शूरांनो, लवकर इकडे येऊन पोहोचा." पण शूर मोगल वर जाण्यास धजेनात. या मंडळींच्या आरडा ओरड्याचा उपयोग इतकाच झाला की किल्ल्यावरचे मराठे सावध झाले व तेथे आले. त्यांनी पाहिले की या 'पुरोगामी' मंडळींना मोगलांचा 'पाठिंबा' दिसत नाही. तेव्हा त्यांनी त्या सगळ्यांना तलवारीने सरळ कापून काढले. त्यांचे मरण सुरुंगाच्या स्फोटांत नव्हते, पण मराठ्यांच्या तलवारीत होते, ते त्यांना टळले नाही. मोगल गांगरले आहेत हे मराठ्यांनी पाहिले आणि त्यांनी किल्ल्यावरून बंदुकीच्या गोळ्यांचा भडिमार त्यांच्यावर सुरू केला. सुरुंगाच्या आगीतून मोगल सुटले तोंच मराठ्यांच्या फुफाट्यात सापडले. त्यांच्या तोफा ठिकठिकाणी पडल्या होत्या. त्यांचे दमदमे मोडून पडले होते. लढण्याची त्यांना हिंमत नव्हती. साकी मुस्तैदखान म्हणतो– "मराठ्यांशी लढू शकेल असा तेथे कोण होता ?" उत्तर प्रश्नातच होते.

औरंगजेबाला ही बातमी कळली, तेव्हा तो ब्याऐंशी वर्षांचा म्हातारा घोड्यावर स्वार होऊन तडक तेथे आला. ते दगडामातीचे ढीग त्याने पाहिले. ते 'अफसोस् अफसोस' म्हणून ऊर बडविणारे सैनिक त्याने पाहिले. हजारो सैनिकांची छिन्न-विच्छिन्न शरीरेही त्याने पाहिली. पण त्याचे काळीज खरोखर वाघाचे म्हटले पाहिजे. त्याने आज्ञा केली, "प्रेतांच्या भिंती रचा. त्याचा ढालींसारखा उपयोग करा. हिंमत धरा आणि कमरा कसून हल्ला करा." पण सैनिकांना हिंमत येईना व ते काही कमरा कसेनात. तेव्हा तो पुन्हा बोलला, या वेळी तुमच्या मनात शंकाकुशंका कां निर्माण झाल्या ? तुम्हाला भीति का वाटली ? शत्रु काही अद्याप तुमच्यावर आक्रमण करून आला नाही. ज्यांना मृत्यु आला ते शहीद झाले

आहेत. धर्मनिष्ठांची हीच कमालीची इच्छा असते. सद्गति प्राप्त होताना हेच उपयोगी पडणारे आहे. तुम्हीसुद्धा जिहाद करण्याकरिता शरीरात प्राण आहेत तोपर्यंत लढले पाहिजे." पण औरंगजेबाचे हे गंभीर तत्त्वज्ञान, सुरुंगाच्या स्फोटापेक्षाही दुःखाने घायाळ झालेल्या लोकांच्या डोक्यांवरून, पालथ्या घड्यावरच्या पाण्याप्रमाणे गेले. तेव्हा तो चिडला व स्वतःच शहाजाद्याला बरोबर घेऊन किल्ल्यावर हल्ला करण्यास तयार झाला. त्या वेळी हे आता फार झाले असे वाटून संभावित सरदारांनी त्याची विनवणी करून त्याला त्या साहसापासून परावृत्त केले. तेव्हा औरंगजेबाने हुकूम दिला, की "सय्यद सर्फराजखान, मानाजी यांनी व बख्शी बहरामंदखान याच्या तुकडीने तरबियतखानाच्या सोबतीने जाऊन पुन्हा मोर्चे कायम करावेत." "बादशहा म्हणजे मूर्तिमंत निर्धार आणि शौर्य" असे साकी मुस्तैदखान म्हणतो ते खरे आहे.

पण मोर्चे कायम होऊ शकले नाहीत. त्यांना आग लावण्यात आली. आणि मौजेची गोष्ट म्हणजे ही आग मराठ्यांनी लावलेली नसून बादशहाच्याच सैनिकांनी लावून दिली होती. या सुरुंगाच्या स्फोटात तरबियतखानाच्या सैन्यातले बहेलिया पायदळाचे बरेच रजपूत सैनिक दगावले होते. औरंगजेबाने तरबियतखानाला बजाविले होते की, "आधी मोर्च्यांतील माणसे बाहेर काढा व मग सुरुंग उडवा." पण तरबियतखानाला वाटले की मोर्च्यांतील माणसे एकदा दूरवर पांगली की ऐन हल्ल्याच्या वेळी ती एकत्र जमणार नाहीत. म्हणून त्याने सुरुंगांना बत्ती देण्याच्या ऐन वेळीच मोर्च्यांतील लोकांना बाहेर पडण्याचा इशारा दिला. धन्याच्या हुकुमाच्या पुढे जाऊन तरबियतखानाने दाखविलेल्या या फाजील अक्कलहुशारीचा परिणाम इतकाच झाला की लोकांना चटकन् बाहेर पडता आले नाही व शेकडो शिपाई निष्कारण प्राणास मुकले. यामुळे तरबियतखानावर शिपायांचा फार राग होता. या आपल्या बांधवांना अग्निसंस्कार झाला नाही याचे त्यांना दुःख होते. तेव्हा त्यांनी त्या लाकडी मोर्च्यांना रात्री न कळत आग लावून दिली. ही आग सात दिवस व सात रात्र जळत होती. त्या आगीत हिंदु रजपूत मेले होते त्यांना तर अग्निसंस्कार झालाच, पण मेलेल्या मुसलमानांनाही झाला. इतकेच नव्हे तर जे जिवंत होते पण बाहेर पडू शकले नाहीत त्यांनाही अग्निनारायणाच्या कृपेने सदेह स्वर्गारोहणाचे भाग्य लाभले. हे लाकडी मोर्चे व दमदमे तरबियतखानाने मोठ्या कष्टाने तयार केले होते. "ते तयार करण्यात जो मालमसाला वापरण्यात आला त्यामुळे तीस चाळीस कोसात एक झाड शिल्लक राहिले नाही." त्यांच्या रक्षणासाठी बाजारातून आठ हजार पोती मागवून ती वाळूने भरून दमदम्याभोवती रचण्यात आली. लाकूड आणण्याच्या कामी तीनशे बैल कामाला लावण्यात आले होते. आणि तोफखान्याचा कारभारी कुंजमन याला चौदाशे उंट बरोबर घेऊन जंगलातून लाकडे आणण्यासाठी पाठ-

विण्यात आले होते. तरबियतखानाने गेले चार महिने केलेली ही सारी जिवापाड मेहनत त्याच्याच सैनिकांनी 'अग्नये स्वाहा' म्हणून अग्निनारायणाला समर्पण केली. सेनापति व सैनिक यांचे 'सहकार्य' असे असल्यानंतर हाती घेईल त्या कामात बादशहाला यश न येईल तर काय!

आता पुढे काय हा प्रश्न होता. औरंगजेबाप्रमाणे तो मराठ्यांपुढेही होता. सुरुंगामुळे मोगलांप्रमाणे मराठ्यांचीही हानि काही कमी झाली नव्हती. किल्ल्याचा सत्तर गज लांबीचा तट कोसळला होता. माणसेही फार जाया झाली होती. खुद्द किल्ल्याचा हवालदार प्रयागजी अनंत हा स्फोटातून मोठ्या योगायोगाने बचावला. त्याच्यावर तीन दगड असे पडले होते की जणू निसर्गाने त्याच्यावर आच्छादन घातले होते. त्याचा शोध करताना, त्याच्या अंगरख्याचा शेव दगडांतून फडफडत असलेला दिसला. तेव्हा लोकांनी दगडमातीचे ढिगारे बाजूला करून त्याला ओढून काढले म्हणून तो हाती लागला. 'अरक्षितं तिष्ठति दैवरक्षितम्।' म्हणतात ते असे.

पण प्रयागजी अनंतासारखे भाग्यवान् थोडे होते. मेलेलेच फार. तेव्हा आता किल्ला लढविण्यात मतलब नव्हता हे उघड दिसत होते. बादशहाचेही पुरेसे नुकसान झाले होते. तेव्हा परशुराम त्र्यंबक आणि सुभानजी लावघरे किल्लेदार यांनी शहाजादा आजमच्या मार्फत औरंगजेबाशी वाटाघाटी सुरू केल्या. किल्ल्यातील लोकांना जीवदान देण्यात आले व किल्ल्यावर २१ एप्रिल १७०० रोजी मोगलांचा विजयी ध्वज फडकू लागला. आजमच्या मध्यस्थीने किल्ला हाती आला म्हणून त्याचे नाव 'आज्जमतारा' ठेवण्यात आले. नगारे नौबतीच्या ध्वनीने आकाश दणाणून गेले.

किल्ला घेतल्यानंतर मोगलांना त्यात लूट काय मिळाली? सात मोठ्या तोफा, पाच लहान तोफा, हलविता येणाऱ्या नऊ लहान तोफा, चौदा मण दारू, एक मण तीन शेर शिसे, दोनशे ऐंशी ग्रेनेड आणि दहा बाण! सातारा ही मराठ्यांची राजधानी होती. त्या मानाने मोगलांना लूट काहीच मिळाली नाही. दरिद्री मराठ्यांची राजधानीही दरिद्रीच निघाली. पण ती राजधानी होती ही मुद्द्याची गोष्ट होती. औरंगजेब तसा तत्त्वनिष्ठ होता. त्याने जुनी राजधानी रायगड सर केली व नवी राजधानी साताराही सर केली. त्याच्या विजयी फौजा आता रामदासस्वामींच्या परळीकडे चालू लागल्या.

परळीचा किल्ला साताऱ्याच्या किल्ल्यापेक्षा उंच आणि मजबूत आहे. त्याला वेढा घालण्यासाठी औरंगजेबाने फतेहुल्लाखानाला पुढे रवाना केले आणि तीन दिवसांचा प्रवास करून ३० एप्रिल रोजी परळीच्या किल्ल्यासमोरील मैदानात आपली छावणी दिली. रुहुल्लाखान यास मीर मोर्चाल म्हणजे वेढ्याचा सेनापति नेमण्यात आले. त्याने काम उत्तम केले. "मोर्चे खणोत नेण्यात आणि टेकड्या-

वरून प्रचंड तोफा चढविण्यात त्याने इतकी उत्कृष्ट कामगिरी केली की वर्षांतून होणारे काम काही दिवसात तडीस गेले." त्याचप्रमाणे चिनकिलीजखान, फते-उल्लाखान वगैरे सरदारांनी किल्ल्याला वेढा देण्यात काही कसूर केली नाही. किल्ल्याभोवती कित्येक कोसपर्यंत मोगलांचे सैन्य पसरले होते.

पण मोगलांच्या दुर्दैवाने त्या वर्षी पाऊस लवकर सुरू झाला. आणि रात्रंदिवस तो वेड्यासारखा कोसळू लागला. गवत चारा, धान्य, सर्पण यांची कमालीची टंचाई झाली. शाहू त्या वेळी बादशहाच्या लष्करात होता, त्याला जोत्याजी केसरकरने एकदा तेलात काकडे भिजवून त्यावर भात शिजवून घातला. ही जर शाहूसारख्याची स्थिति तर सामान्यांची गोष्ट काय सांगावयाची आहे. ओढेनाले पाण्याने तुडुंब भरून गेले. त्यामुळे रसद येणे बंद झाले. जी येणे शक्य होते ती मराठे मारून नेत. "मराठे मुंग्या आणि टोळ यांच्याप्रमाणे बादशाही सैन्या-भोवती घिरट्या घालीत." त्यांनी भोवतालचा प्रदेश उद्ध्वस्त करून टाकला. औरंगजेबाने सैनिकांना दिलासा मिळावा म्हणून लष्करात रुपये वाटले पण तेव-ढ्याने काय होणार? खाफीखान म्हणतो, "पावसाच्या थेंबाचे मोती झाले असते तरी लोकांपाशी एक दमडी नव्हती; आणि धान्याचा एक कण नव्हता म्हणून तिकडे कोणी ढुंकूनही पाहिले नाही." मोगलांच्यात त्राण म्हणून राहिले नाही. त्यामुळे वेळोवेळी किल्ल्यातील लोक बाहेर पडत आणि त्यांच्यावर बेलाशक हल्ले चढवीत.

तशाही स्थितीत फत्तेउल्लाखानाने एका मोठ्या खडकापर्यंत मोर्चे नेले. हा खडक किल्ल्याच्या लहान दरवाजासमोर होता. तो ताब्यात आला असता तर किल्ला घेणे सोपे होते. पण खडकावर चढून जाणे कठीण होते. एका बाजूने तो पंधरा गज उंच तर दुसऱ्या बाजूने दहा गज उंच होता. त्याच्यावर ताबा मिळ-वायचा व तेथून लहान दरवाजावर तोफा चालवायच्या असा फतेउल्लाखानाचा बेत होता.

त्याने दोन्ही बाजूंनी खडकाला शिड्या लावल्या. त्याच्या इशाऱ्याप्रमाणे मोगल वर चढले. त्याबरोबर मराठ्यांची व त्याची तेथें झटापट सुरू झाली. ही संधि साधून दुसऱ्या बाजूने फतेउल्लाखान हा काही सैन्यासह वर आला. मराठ्यांचा पराजय झाला व ते किल्ल्यात पळून गेले. त्यांनी लहान दरवाजा बंद करून घेतला त्यांच्यामागे फतेउल्लाखान पाठलाग करीत गेला नाही. त्याला फक्त खडकावर ताबा हवा होता. तेथे काही आश्रयस्थान तयार करण्यासाठी म्हणून लाकूडफाटा गवत आणण्याच्या उद्देशाने तो खाली उतरला. बाकीचे मोगल खडकावर पाय रोवून उभे होते.

ते उघड्यावर होते. ते मराठ्यांच्या पथ्यावर पडले. त्यांनी किल्ल्यातून बंदुकीचा मारा सुरू केला, किल्ल्याला जाण्याच्या वाटेवर त्यांनी दारू भरून ठेवली होती

तिला त्यांनी आग लावली आणि उडवून दिली, त्या आगीच्या कल्लोळात आणि गोळीबारात साठसत्तर माणसे ठार झाली. त्यात फतेउल्लाखानाचा नातू होता. जखमी झालेली माणसे निराळीच. आपल्या सोबत्यांची ही दशा पाहून बाकीच्या मंडळींनी खडकावरून पळ काढला. अशा प्रकारे खडकावरून तोफा डागण्याचा फतेउल्लाखानाचा बेत बारगळला. या पराक्रमाबद्दल परशुराम त्र्यंबकाने परळीच्या लोकांचे अभिनंदन केले. "कृष्णाजी महादेव गोडबोले याणेकिल्ले सातारी याचे मुक्कामी हुजूर येऊन विनंति केली जे ... पादशाहा किल्ले सातारीयास व किल्ले सज्जनगडास येऊन परीघ देऊन बैसले. किल्ले सज्जनगडास दंगा करून घ्यावयास लोक चढविले होते. ते समयी आपला भाऊ गोविंद महादेव याणे गडावरी राहून लोक तांब्राकडील दंगा करू चढले होते, त्यास मारून काढून खाले घातले. स्वामींची फत्ते केली."

मोगलांनी सुलतान ढवा करून परळी घेण्याचा प्रयत्न करण्याची व त्यात फजीत पावण्याची ही घटना ४ जून १७०० रोजी घडली. पावसाला खळ नव्हता. उलट आता तर त्याचेच दिवस आले होते. हल्ला करून किल्ला घेणे जमत नव्हते. लष्कर खराब होत होते. "पातशाहा मनात खजील होऊन अशा किल्ल्यांचे कामास आपण बसोन खराब व्हावे यात फायदा नाही. मराठे लोक हरामजादे, रानचे हयवान, कजाखी करितात असे चित्तात दिलगीर होऊन बसले." तेव्हा बादशहाही जिकिरीला आला. पावसाळाही आला हे पाहून मोठी रक्कम घेऊन आजमच्या मार्फत, वाटाघाटी करून परशुराम त्र्यंबकाने अखेर एकदा किल्ला बादशहाला देऊन टाकला व त्याचा 'राजहट्ट' पुरविला.

परळी ही समर्थांच्या समाधीची जागा. त्याचप्रमाणे आपल्या निर्याणापूर्वी कर्नाटकातून आणवलेल्या राम, लक्ष्मण व सीता यांच्या मूर्तींची स्थापना समर्थांनी तेथे स्वहस्ते केली होती. औरंगजेबाच्या तावडीत सापडल्यानंतर या पुण्यस्थानांची तो काय दशा करील याचा नेम नव्हता. म्हणून जाण्यापूर्वी परशुराम त्र्यंबकाने समर्थांच्या समाधीची जागा चिणून टाकली व मूर्ति आपल्याबरोबर घतल्या. औरंगजेबाच्या ताब्यात किल्ला आल्यानंतर त्याने मंदिरे उद्ध्वस्त केली व पडक्या मशिदींची दुरुस्ती केली.

परळीचा किल्ला विजापूरच्या इब्राहिम आदिलशहाने बांधला. या गृहस्थाला एक नाद होता की, प्रत्येक गोष्टीला तो 'नवरस' हे नाव देत असे. जसे नवरसनामा, नवरसपूर, नवरस नाणे. आदिलशाही औरंगजेबानेच जमीनदोस्त करून टाकली होती. पण या वेळी स्वारीला तिचे थोडेसे पुनरुज्जीवन करण्याची लहर आली असे वाटते. त्याने परळीला नाव देऊन टाकले – 'नवरसतारा' सातारचा 'आज्जमतारा' आणि परळीचा 'नवरसतारा.'

परळी काबीज केल्यानंतर फौजेला विश्रांति देण्याच्या उद्देशाने औरंगजेबाने भूषणगडाकडे कूच केले. पण पावसाची झोड रात्रंदिवस लागली होती. ओझी वाहून नेणाऱ्या जनावरांची पाच महिन्यांच्या पावसाच्या माऱ्याने केवळ हाडे राहिली होती. त्या प्रदेशात पाऊस फार आणि हवामान फार प्रतिकूल, त्यामुळे लष्करात उंट नावालाही राहिले नव्हते. त्यामुळे सामान लादायचे कशावर हा प्रश्नच होता. पण तशाच त्या मरतुकड्या बैलांवर व हत्तींवर बादशहाचे व अमीर-उमरावांचे सामान कसेबसे लादले आणि सैन्यातील कफल्लकांनी आपली 'घरे कोंबड्यावर लादली' म्हणजे बिऱ्हाडे पाठीवर बांधली. खोल दऱ्या आणि उंच डोंगर यांच्या चढउतारावरून रडतरखडत त्या सैन्याने मुसळधार पावसात प्रवासास प्रारंभ केला आणि पाच कोसांचा प्रवास तीन टप्प्यांत करून संध्याकाळी कृष्णेच्या काठावर ते पोचले.

कृष्णेला महापूर आला होता. लाटांवर लाटा उठत होत्या. पलीकडचा काठ दिसत नव्हता. 'ते दृश्य पाहूनच अनेक जण मेले.' नदी ओलांडण्यास फक्त सात नावा होत्या व त्याही मोडक्या होत्या. जबरदस्तांनी दुबळ्यांवर दांडगाई करू नये म्हणून बादशहाने कडक गुर्जबर्दार नेमले व एक शहाजादा व एक प्रमुख सरदार यांनी एकेक दिवशी नदी उतरावी अशी शिस्त घालून दिली, पण त्याला विचारतो कोण? नदीकाठावर कटकटी सुरू झाल्या. तलवारी चालू झाल्या. दोन-तीन माणसे मेली नाहीत किंवा जखमी झाली नाहीत किंवा बुडून मेली नाहीत असा दिवस जाईना. तुर्कताजखान व त्याच्याचसारख्या काही बलदंड तुराण्यांनी दोन नावा बळकावल्या आणि नावाड्यांशी हातमिळवणी करून, प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाण्याप्रमाणे, आधीच जेरीस आलेल्या आपल्याच सैनिकांना पिळून काढण्याचा स्तुत्य उद्योग सुरू केला. एक रुपयाच्या जागी ते एक अश्रफी म्हणजे वीस रुपये उकळू लागले आणि लौकरच चांगले गबर झाले. ज्याच्याजवळ त्यांच्या-सारखा जोर नव्हता किंवा त्यांना द्यायला पैसा नव्हता, त्यांनी देवाचे नाव घेऊन पोहून पैलतीरास जाण्यासाठी कृष्णेच्या डोहात उड्या ठोकल्या पण ते कृष्णा-नदीच्या ऐवजी भवनदीच्या पैलतीरास पोचले आणि मुक्त झाले म्हणजे बुडून मेले. हजारो लोक मागे राहिले ते उपासमारीने मेले. अशा प्रकारे कसेबसे ते लष्कर भूषणगडास २५ जुलै १७०० रोजी पोचले. परळी ते भूषणगड हे पंचेचाळीस मैलांचे अंतर चालून जाण्यास औरंगजेबाच्या लष्करास पस्तीस दिवस लागले. म्हणजे सरासरी मजल दिवसाला सव्वा मैल पडली. काय वेग आहे!

भूषणगड येथे औरंगजेबाने आपल्या सैन्याची पुनर्घटना केली. शहाजादा आझम व त्याच्या पथकाला बुऱ्हाणपूरला विश्रांति घेण्यासाठी पाठविले. त्याचप्रमाणे आता-पर्यंत रंजीस आलेल्या पथकांना जवळच्या बादशाही इलाख्यात असलेल्या समृद्ध भागाकडे पाठविण्यात आले. ताज्या दमाची फौज जरूर होती, म्हणून औरंगाबाद,

विजापूर, अहमदाबाद, हैद्राबाद इत्यादि प्रांतांच्या सुभेदारांना हुकूम पाठविले; की प्रत्येकाने हजार हजार स्वार सरकारी खजिन्यातून सहा महिन्यांचा पगार आगाऊ देऊन रवाना करावेत. पावसाळ्यानंतर पन्हाळगडावर मोहीम करण्याचा औरंगजेबाचा बेत होता. म्हणून त्याने बेदरबख्ताला पुढे रवाना केले. त्याच्याबरोबर मीर अतिश तरबियतखान व झुलिफकारखान यांनाही पन्हाळ्यावर जाण्याचा हुकूम केला. यानंतर सैन्याला अधिक आराम मिळावा म्हणून त्याने खवासपुराकडे ३० ऑगस्ट रोजी कूच केले.

खवासपूर हे भूषणगडापासून पूर्वेस छत्तीस मैलांवर माणनदीच्या काठी आहे. तेथे गेल्यावर मोगल सैन्याला खरोखरच फार आराम मिळाला. तेथे पाणी मुबलक, गवतचारा भरपूर, मुलूख फळझाडांनी भरलेला होता. अन्नधान्य स्वस्त व भरपूर होते. तेथे मोगलांची खाण्यापिण्याची अगदी चंगळ उडाली. नदीच्या पात्रात पाण्याचा थेंब नव्हता. तेव्हा अनेक पथकांनी नदीच्या दोन्ही काठांप्रमाणे पात्रातही आपल्या राहुट्या ठोकल्या. लोकांनी परमेश्वरापाशी प्रार्थना केल्या की बादशहाला आयुरारोग्य लाभो आणि त्याचे राज्य चिरकाल टिको.

पण असे वाटते की महाराष्ट्रातल्या माणसांप्रमाणे महाराष्ट्रातला निसर्गही बिचाऱ्या बादशहाला गनिमी काव्याने हैराण करीत होता. ते पावसाचे दिवस नव्हते, पण एक ऑक्टोबरच्या रात्री वरच्या डोंगरात आणि खोऱ्यात मुसळधार पाऊस पडला आणि पाण्याच्या लोंढा रोरावत मोगलांच्या छावणीवर आदळला. नदीचे कोरडें पात्र पाहून ज्या मंडळींनी त्यात आपले तंबू ठोकले होते, आणि रात्रीच्या निरभ्र आकाशातल्या चांदण्या पाहात जे आनंदात झोपी गेले होते, त्यांना जागे होण्याचे कष्टच पडले नाहीत. लोंढा आला आणि ते सरळ निद्रेतून महानिद्रेत विलीन झाले. जे जागे होते ते आरडा ओरडा करीत सैरावैरा अंधारात धावू लागले. पण जिकडे तिकडे पाणीच पाणी झाले होते. जाणार कोठे? पाण्याकडून पाण्याकडे अशी ही अंधळ्याची अंधारयात्रा होती. हजारो माणसे व जनावरे बुडून मेली. तंबू आणि डेरे बुडबुड्याप्रमाणे पाण्यावर तरंगू लागले.

त्या वेळी औरंगजेब शौचालयात होता. त्याच्या कानावर छावणीतून उठलेला आक्रोश आला. त्याला वाटले की रात्रीच्या अंधारात मराठ्यांना छावणीवर छापा घातला असावा. त्यामुळे असा कल्पांतांचा कल्लोळ उसळला असावा. म्हणून तो घाईघाईने बाहेर येऊ लागला. त्या गडबडीत त्याचे पाय घसरले आणि त्याला जबर मार बसला. म्हातारपणात लचकलेले त्याचे पाय काही बरे झाले नाहीत. शेवटपर्यंत तो लगडतच राहिला. खाफीखान विनोदाने म्हणतो ते खरे आहे. "नाहीतरी तो तैमूरलंगाचाच वारस होता."

पाणी वाढत चालले आणि बादशहाच्या निवासस्थानाशी येऊ लागले तेव्हा स्वतःसाठी व. जनानखान्यासाठी बादशहाने स्वाऱ्या मागविल्या. एवढ्यात पहाट झाली व फटफटले. पाणीही ओसरू लागले. साकी मुस्तैदखान म्हणतो– ''अजून रात्र शिल्लक राहिली असती व पूर दिवसाच्या चारपाच घटकेपर्यंत चालू राहिला असता तर एकही मनुष्य जिवंत राहिला नसता. परमेश्वराची कृपा !''

या पुरात अनेक प्रतिष्ठितांचे सर्वस्व गेले. ते उघडेबोडके कंगालासारखे हिंडू लागले. औरंगजेबाचा पाय कायमचा लंगडा झाला. महाराष्ट्राच्या माणसाची आठवण औरंगजेबाचा मामा शायिस्ताखान याला त्याच्या तुटक्या बोटांमुळे जशी कायमची राहिली तशी महाराष्ट्राच्या निसर्गाची व ''पाण्याची' आठवण औरंगजेबाला त्याच्या लंगड्या पायामुळे कायमची राहिली असेल तर नवल नाही. महाराष्ट्राचे 'पाणीच' मोगलांना धार्जिणे नव्हते काय ?

□ □

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था
११११ सदाशिव पेठ,
पुणे-४११ ०३०

# (१२)

" सरितः कुर्वती गाधा पथश्चाश्यानकर्दमान् । यात्रायै चोदयामास तं शक्तेः प्रथमं शरद् ॥" रघुवंशातल्या दिग्विजयी रघूच्या विजय यात्रेचे वर्णन करताना कालिदासाने हे शब्द लिहिले आहेत. अर्थ असा की नद्यांना उतार देऊन आणि रस्त्यातला चिखल नाहीसा करून शक्तीच्याही पूर्वी शरद् ऋतूने, त्याला जययात्रेसाठी प्रवृत्त केले. याच शब्दांत औरंगजेबाचेही वर्णन करता येईल. तोही महाराष्ट्राच्या दिग्विजयासाठीच यात्रा करीत होता. हिवाळा आला. पाऊस ओसरला. नद्यांना उतार मिळाले, रस्त्यातला चिखलही वाळून गेला. तेव्हा औरंगजेबाने पन्हाळागड जिंकण्याच्या इराद्याने खवासपुराहून कूच केले, आपला नातू बेदारबख्त याला त्याने १६ सप्टेंबर १७०० रोजीच पन्हाळ्याला वेढा घालण्यासाठी रवाना केले होते. १४ सप्टेंबर रोजी तो बेदारबख्तला म्हणाला, " तयार व्हा. पन्हाळगडाला वेढा घालण्यासाठी तुम्हाला पाठवीत आहे." बक्षी उलमुल्क बहरामदखान यानें शहाजाद्याच्या सैन्याचा तपशील तयार करावा अशी त्यास आज्ञा झाली. तरबियतखानाने त्याला पुढील सामग्री पुरवावी अशीही आज्ञा झाली. "दोनशे बर्कंदाज, एक हजार पायदळ, तीनशे बाण, शंभर मण दारू, शंभर मण सुरस." १६ सप्टेंबर रोजी औरंगजेबाचा निरोप घेऊन बेदारबख्त पन्हाळ्यास रवाना झाला. ३० ऑक्टोबर रोजी औरंगजेबास कळले की तो किल्ल्यापाशी पोचला आहे. किल्ल्याचा परिसर पाहून तो मोर्चे बांधून वेढा घालण्याच्या बिचारात आहे.

बेदारबख्तच्या मागोमाग औरंगजेबाने त्याच्या मदतीसाठी झुल्फिकारखानाला रवाना केले. झुल्फिकारखानाने मिरज मुक्कामी बेदारबख्ताची गाठ घेतली. तेथे तो काही काळ थांबला. कारण नदीला पूर आला होता. पण औरंगजेबाने त्याला थांबू दिले नाही. त्याचे तातडीचे हुकूम आल्यामुळे बेदारबख्त व झुल्फिकारखान या दोघांनाही नाईलाजाने पन्हाळ्याकडे रवाना व्हावे लागले. औरंगजेबाने हुकूम पाठवले की बेदारबख्तने छावणी घातली आहे तेथेच राहावे आणि झुल्फिकारखानाने कोकणी दरवाजापुढे तळ द्यावा. त्याप्रमाणें खानाने कोकणी दरवाजापुढे छावणी केली, हा कोकणी दरवाजा म्हणजें ज्याला आज 'तीन दरवाजा' म्हणतात तोच होय. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात खान पन्हाळ्याहून निघाला आणि त्याने खेळणा प्रदेश लुटला. नंतर तो परत पन्हाळ्याच्या परिसरात आला. १६ नोव्हेंबर रोजी औरंगजेबाने मोर आतिश तरबियतखान याला दिवाणे खासच्या वाटेने बोलाविले व त्याला सात तोळे अत्तर देऊन म्हटले, "तयार राहा. मी

तुम्हांला शहाजादा बेदारबख्त याच्या फौजेत पाठवीत आहे." तरबियतखानाने पन्हाळयास येताना तोफा, दारूगोळा व वेढयासाठी लागणारी इतर साधनसामग्री आणली होती. आल्या दिवशीच राव दलपतच्या सहकार्याने त्याने किल्ल्याच्या दरवाजापाशी मोर्चे वगैरे बांधण्यास सुरवात केली. औरंगजेबाच्या आज्ञेने बेदार-बख्त हाही कोकणी दरवाजाकडे आला व तेथे त्याने आपली छावणी कायम केली.

तरबियतखान हा हुशार कामगार होता. त्याने खडकाळ जमीन खणून किल्ल्या-पर्यंत बोळ तयार केला. त्याने जमिनीच्या आत काही साखळयांच्या लांबीचे भुयार तयार केले. त्यातून एकाच वेळी तीन सशस्त्र माणसे जाऊ शकत. काही अंतरावर त्याने एक आश्रयस्थान बांधले. त्यात एकाच वेळी वीस माणसे बसू शकत. त्यात तोफखान्याचे शिपाई बसत. ते बंदुकींचा मारा करून मराठयांना तटावर डोके काढता येऊ नये असे करीत. तेच भुयार पुढे सरकवीत बुरुजांपर्यंत नेण्यात आले. बुरुजाचा खालचा भाग खणून इतका पोकळ करण्यात आला होता की खालील पोकळीत मोगलांचे एक पथक पहारा देत असे व त्यांना मराठयांचे हातगोळे किंवा बंदुकांचे गोळे यांचा काही उपसर्ग पोचत नसे. ते भुयार त्याने तसेच पुढे सरकवून तटाखालून किल्ल्याच्या आत नेले. बुरुजांवर तोफांचा मारा सुरू झाला. साकी मुस्तैदखान मोठ्या ऐटीत लिहितो– "विजांचा वर्षाव करणाऱ्या तोफा शत्रूंना होरपळून काढू लागल्या."

मुस्तैदखानाच्या लिहिण्यात थोडीशी अतिशयोक्ति आहे. होरपळण्याची वेळ त्याच्या बादशहावरच आली होती. मराठयांनी त्याच्या छावणीवर हल्ला चढविला होता आणि त्याच्या तातडीच्या हुकुमावरून झुल्फिकारखानाला पन्हाळा सोडून तिकडे जावे लागले होते.

एक जानेवारी १७०१ रोजी औरंगजेबाची स्वारी मिरजेत दाखल झाली. येथे रमजानचा महिना काढण्याचा त्याचा विचार होता. त्याचप्रमाणे ठिकठिकाणच्या सुभेदारांना ताज्या दमाची पथके पाठविण्याचे त्याने हुकूम सोडले होते. ती सैन्ये गोळा होण्याचीही तो वाट पाहात होता. मिरजेत औरंगजेबाचा मुक्काम असताना २३ जानेवारी १७०१ रोजी धनाजी जाधवाने औरंगजेबाच्या छावणीवर जोराचा हल्ला चढविला. त्याची मोगलांच्या बातमी-पत्रातील नोंद मुळातूनच वाचण्या-सारखी आहे.

"आज सकाळी हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की, धनाजी याने आपल्या सैन्याची, एक तुकडी व बुणगे ही कोल्हापूरकडे पाठविली. दुसरी तुकडी तडफदार घोडे-स्वारांची असून ती बादशाही छावणीभोवती घिरटया घालीत आहे." बादशहाने आज्ञा केली की, "हमीदुद्दिन याने फौजेसहित तयार व्हावे, बक्षीउलमुल्क याने आठ हजार सातशे सत्तर स्वार तयार केले. हमीदुद्दीन याच्या फौजेवर मुनीमखान याची बक्षी व वाकनीस म्हणून नेमणूक केली."

तोपर्यंत हरकाऱ्यांच्या बातमीवरून हमीदुद्दीन याने बादशहाला कळविले की "हलकट शत्रूचे सैन्य बादशाही छावणीपासून तीन कोसांवर आले आहे."

मुनीमखानाने सैन्य घेऊन छावणीच्या बाहेर ठाण मांडून राहावे असे ठरले. हमीदुद्दीनखान हा दोन प्रहरी मुनीमखानाला जाऊन मिळाला, तो कृष्णेच्या काठा. वर जाऊन पोचला. तेथून त्याने निरोप पाठविला की "शत्रूचे सैन्य एक कोसावर आले आहे. छावणीपासून इतक्याजवळ युद्ध करावे का ?" बादशहा म्हणाले, 'युद्ध करा.'

निकराचे युद्ध झाले. बाण, बंदुका यांचा उभय पक्षांकडून मारा सुरू झाला. बादशहाला कळविण्यात आले की काफरांचे सैन्य संख्येने अधिक आहे. बादशहानी बहरामंदखान, आर्शदखान व इनायतुल्लाखान यांनाही लढाईत रवाना केले. रुहुल्लाखान याने उजव्या फळीबद्दल जागरूक राहावे असे त्याला सांगण्यात आले. इतक्यात बातमी आली की मतलबखान व मराठे यांच्यात युद्ध चालू आहे. मराठ्यांचे सैन्य मोठे आहे. ते चारी बाजूंनी मतलबखानावर चालून गेले आहेत. पुन्हा बातमी आली की, "मरहूम खानजहान याची पथके मतलबखानाच्या मदतीला गेली आहेत. मराठे तिकडून हटले असून ते आता हमीदुद्दीनखानाशी युद्ध करीत आहेत. यात मुनीमखान, हाफीज अंबरी, राजा अवधूतसिंग, राजा सुजानसिंग हे गुंतले असून हातघाईची लढाई चालू आहे. उभय पक्षांत काहीजण ठार अगर जखमी झाले आहेत.

मुहंमद अमीनखान यास कळले की मराठे हे छावणीतील गुरेढोरे लूटून नेत आहेत. त्याने सियादतखान व फजले अलीखान यांच्या मदतीने त्याचा प्रतिकार केला व काही गुरेढोरे सोडविली. युद्ध संध्याकाळपर्यंत चालू होते. हमीदुद्दीनखान दीड कोस पुढें सरकला.

२५ जानेवारी १७०१–हमीदुद्दीनखानाने मराठ्यांच्या तळावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. या लढाईत कंधारचा किल्लेदार शमसुद्दीन मुहंमदखान हा हमीदुद्दीनखानातर्फे लढत असता मारला गेला. युद्ध बादशहाच्या छावणीपासून अकरा कोस लांब गेले.

२६ जानेवारी रोजी लढाई चालूच राहिली. यानंतर मराठे तेथून निघून गेले. बादशहाने झुल्फिकारखानासही धनाजीवर चालून जाण्यासाठी लिहिले होते. "चिकोडीच्या पलीकडे सहा कोसांवर आपले व धनाजीचे युद्ध झाले – पराजित होऊन धनाजी निघून गेला" असे झुल्फिकारखानाने कळविले (एक फेब्रुवारीची नोंद)

मिरजेस असलेल्या औरंगजेबाला अशा प्रकारे हैराण करीत असतानाच पन्हाळ्याला वेढा घालून बसलेल्या मोगल सैन्यावर २५ फेब्रुवारी रोजी मराठ्यांनी जोराचा हल्ला चढविला. या लढाईची बातमी तीन जणांनी तीन प्रकारांनी दिली आहे. औरंगजेबाच्या दरबारातील बातमीपत्रात बातमी देताना अर्थातच मरा-

त्यांना कमीपणा येईल आणि मोगलांचा कमीपणा झाकेल अशा प्रकारे ती देण्यात आलेली आहे. कारण ही बातमीपत्रे प्रथम खुद्द औरंगजेबाच्या नजरेखालून जावी लागत आणि मगच त्यांना मान्यता मिळे. बातमीपत्र म्हणते – "बादशहाला कळविण्यात आले की राजारामाचा कारभारी रामचंद्र हा धान्याची रसद, दोन हजार पायदळ व बंदुकची बरोबर घेऊन पन्हाळगडापाशी आला. झुल्फिकारखान याने त्वरा करून शत्रूशी युद्ध केले. गनिमांचे अनेकजण मारले गेले. धान्याची रसद लुटण्यात आली. शत्रूपैकी काहीजण पळून किल्ल्यात गेले. दुसऱ्या दिवशी शत्रु झुल्फिकारखानाच्या मोर्चावर चालून आला. तरबियतखानाने त्याचे पारिपत्य करून आपले मोर्चे कायम राखले."

आता भीमसेनाने हीच बातमी कशी दिली आहे पहा. हा भीमसेन औरंगाबादी 'तारीखे दिलखुशा'चा कर्ता. या वेळी राव दलपतबरोबर तो झुल्फिकारखानाच्या सैन्यात होता. त्याचा मुक्काम प्रत्यक्ष पन्हाळ्याला होता. याच वेळी तो आपला सुप्रसिद्ध इतिहास लिहीत होता. जाग्यावर असल्यामुळे त्याच्या लिहिण्याला 'चक्षुर्वै सत्य' अशा दर्जाचे महत्त्व आहे. तो म्हणतो – "रामचंद्र पंडित हा खेळण्याहून निघाला. त्याच्याबरोबर पायदळ व स्वार यांचे बरेच सैन्य होते. पन्हाळगडाभोवती असलेले मोगलांचे मोर्चे उधळून लावावे या उद्देशाने मराठे पन्हाळगडाजवळ आले त्यांनी आक्रमणाला सुरवात केली. कोल्हापूरच्या वाटेने वंजारी लोकांचा तांडा धान्य घेऊन येत होता. मराठ्यांनी त्यांच्यावर हल्ला केला. शहाजादा बेदारबख्त याने वंजाऱ्यांच्या मदतीसाठी आपले पथक पाठविले. पण मराठ्यांची संख्या अधिक होती आणि मोगल कमी होते. म्हणून सर्फराजखान दखनी याला पण मराठ्यांच्या पाडावासाठी धाडण्यात आले. पण मराठ्यांनी मोगलांच्यावर कठीण प्रसंग आणला. सर्फराजखानाने धावरून जाऊन शहाजाद्याकडे मदतीची याचना केली. शहाजाद्याच्या आज्ञेने झुल्फिकारखान, राव दलपत बुंदेला आणि रामसिंग हाडा हे मराठ्यांच्यावर तातडीने चालून गेले. दुष्ट शत्रूचे (मराठ्यांचे) जबरदस्त पायदळ सैन्य मैदानात आले होते. पण मोगलांसमोर टिकाव न लागून टेकडीवर चढणे त्यांना शक्य झाले नाहीं. राव दलपतच्या राजपुतानी शत्रूची सुमारे चारशे माणसे ठार केली. झुल्फिकारखान [हा तरबियतखानाच्या मदतीसाठी म्हणून रात्रभर मोर्च्यात तळ देऊन होता. न जाणो, मराठे मोर्च्यावर चालून यावयाचे पण असे करणे निरर्थक होईल असे समजून मराठे निघून गेले."

भीमसेन हा काही मराठ्यांचा पक्षपाती नव्हे. या उताऱ्यांतच तो त्यांना 'दुष्ट शत्रु' म्हणतो. तो राव दलपतचा नोकर म्हणजे पर्यायाने औरंगजेबाचा 'दासानुदास' आहे. पण बातमीपत्रातील सारवासारव त्याने केलेली नाही. मराठ्यांनी मोगलांवर कठीण प्रसंग आणला ही गोष्ट त्याने मान्य केली आहे.

याच लढाईचे वर्णन करताना मनूची म्हणतो, "याच वर्षाच्या फेब्रुवारी महिन्यात मराठ्यांनी फौज गोळा करून शत्रूवर चाल केली व त्यांच्या थेट मोर्च्यापर्यंत हल्ला केला, लढाई मोठ्या रक्तपाताची झाली. आणि शेवटी मराठ्यांना जय मिळाला. त्यांनी झुल्फिकारखानाला नामोहरम केले आणि पन्हाळ्याचा वेढा उठवून त्याला हुसकावून लावले. सर्व मोगल तोफखाना व सामानसुमान मराठ्यांच्या हाती पडले. त्यांनी मोगलांचा कसून पाठलाग केला. पळणाऱ्या सर्वांना पकडण्यात आले. जे ज सशस्त्र होते त्यांची त्यांनी गय केली नाही. मराठ्यांनी क्रूरपणे त्यांचे उजवे हात व नाके छाटली. मराठे या एका हल्ल्यावरच थांबले नाहीत. दररोज ते नवे हल्ले करीत आहेत. ठिकठिकाणी त्यांच्याशी लढाया देऊन त्यांची रसद बंद करीत आहेत. या घटनेनंतर बादशाही छावणीत भयंकर टंचाई निर्माण झाली आहे. अन्नधान्याचे भाव भडकले आहेत. इतके की २८ औसांच्या एका वजनी मापाला बऱ्याच वेळा अठरा रुपये मोजावे लागतात."

भीमसेनाप्रमाणे मनूची ही मराठ्यांच्या बाजूचा नव्हे. भीमसेन निदान हिंदु तरी होता. पण मनूची तर शुद्ध फिरंगी आहे. त्यातून तोही एके काळी औरंगजेबाचा नोकरच होता. शिवाजी महाराजांचे पारिपत्य करण्यासाठी जयसिंग आला होता. तेव्हा मनूची त्याच्या तोफखान्यात कामाला होता. औरंगजेबाचा थोरला मुलगा, शहाआलम याच्याबरोबर तर तो कितीतरी वर्षे फिरत होता. संभाजीच्या कारकिर्दीत शहाआलमने गोव्यावर स्वारी केली तेव्हा मनूची त्याच्याबरोबर होता. आता भीमसेनाप्रमाणे औरंगजेबाचे नाव काढल्याबरोबर मनूची सद्गदित होत नाही हे खरे. तो औरंगजेबाला मूर्तिमंत दंभाचारच समजतो. पण तरीही मराठ्यांचे वकीलपत्र घेण्याचे त्याला काहीच कारण नव्हते. तरी तो मराठ्यांचा जय झाला असे म्हणतो. तो जात्या गप्पीदास आहे. पण तरीही बातमीपत्रातील मराठ्यांना बाधक व मनूचीची मराठ्यांना पोषक अतिशयोक्ति वजा केली तर गोष्ट स्पष्ट आहे की मराठे मोर्चे मारून काढीत होते. किल्ल्यात रसद पोचवीत होते. औरंगजेबाच्या छावणीवर हल्ले चढवीत होते व प्रतिकाराची शर्थ करीत होते.

दोन मार्च १७०१ रोजी औरंगजेबाने मिरजेचा मुक्काम हलविला व तो पन्हाळ्याकडे जाण्यास निघाला. पांच मार्च रोजी तो अहिग्रे येथे पोचला. तेथे त्याला चीनकुलीजखान येऊन भेटला. सहा मार्चला औरंगजेबाने पंचगंगेवर मुक्काम केला. तेथे त्याला शहाजादा बेदारबख्त हा पन्हाळ्याच्या मोर्च्यातून येऊन भेटला. बादशहाने त्याच्या पाठीवर हात ठेवून म्हटले 'आफरीन बाद! खूब तरददुद नमुदे! शाबास! तुम्ही खूप झटलात!' त्याने त्याच्यापाशी पन्हाळगडच्या वेढ्याची व मोर्चाची चौकशी केली. आठ मार्चला तो कोल्हापूरहून निघाला. पंचगंगेच्या काठावर त्याला झुल्फिकारखान येऊन भेटला. नऊ मार्च रोजी औरंगजेब पन्हाळ्यास

पोचला. किल्ल्याच्या पायथ्यापासून एका तोफेच्या टप्प्याच्या अंतरावरून वाहणाऱ्या कासारी नदीच्या काठी त्याने आपली छावणी दिली.

स्वत: औरंगजेबच जातीने लक्ष घालू लागल्यामुळे वेढ्याच्या कामाला गति आली हे सांगणें नकोच. प्रत्येक गोष्ट जातीनिशी स्वतः पाहावयाची व करावयाची हा त्याचा जातिस्वभावच होता. आल्याबरोबर त्याने रुहुलाखान व मतलबखान यांना आज्ञा केली की, "पन्हाळगडच्या वेढ्यासाठी म्हणून कोठे कोठे ठाणी बसवायची त्या जागा पाहून या." त्याप्रमाणे रुहुल्लाखान व मतलबखान यांनी चीनकुलीजखान, राजा अवधूतसिंग, इत्यादींची ठाणी बसविली. मोर्च्यांच्या पुढे आघाडीला रुहुलाखानाला नेमण्यात आले. झुल्फिकारखानाला धनाजी जाधवाविरुद्ध पाठविण्यात आले होते त्या ठिकाणी चीनकुलीजखानाने आपला तंबू द्यावा अशी आज्ञा झाली, मन्सूरखानाने कोकणी दरवाजाच्या बाजूने तळ द्यावा असे त्याला फर्माविण्यात आले. मुहंमद सालेह आणि इखलासखान यांच्या ठाण्याभोवती भिंती उभारून देण्यास हमीदुद्दीनखानास सांगण्यात आले. सैन्यासाठी लागणारे धान्य, सामानसुमान, लाकूडफाटा इत्यादि आणण्यासाठी बक्षी बहरामदखान व हमीदुद्दीनखान यांनी जावे व त्यांच्याबरोबर पांच पांच हजारांच्या तुकड्या देण्यात याव्या अशी औरंगजेबाने आज्ञा केली. "या भागातील रमणे (जनावरे चारण्याच्या जागा व शिकारगाह (शिकारीच्या जागा) यांचे रक्षण करण्यात यावे" असाही हुकूम देण्यात आला.

पण जागेवरून हुकूम सोडून स्वस्थ बसण हे औरंगजेबाच्या स्वभावातच नव्हते. पन्हाळगड व पावनगड हा चौदा मैलांचा टापू व त्यांतले मोर्चे स्वतः डोळ्याखालून घालण्यासाठी त्याने स्वतः मोर्चांची पाहणी केली. "३१ मार्च रोजी बादशहा तख्तेरवांवर (वाहून न्यायचे सिंहासन) बसून निघाले. ते इखलासखान यांच्या मोर्चाकडे आले. वाटेत शहाजादा बेदरबख्त त्यांना भेटला. त्याने बादशहाला मुजरा केला. बादशहाने स्मितहास्य केले. त्यांनी त्याला काही गोष्टी सांगितल्या. बादशहा मोर्चाजवळ आले त्यानंतर बादशहा इखलासखान मियाना याच्या ठाण्यावरून पुढे गेले. त्यांनी पवनगड व पन्हाळगड हा परिसर पाहिला. यानंतर ते परत फिरले. जाऊन येऊन त्यांनी दोन कोसांचा प्रवास केला. पंधरा दिवसांनी परत त्याने मन्सूरखानाच्या मोर्चाची पाहणी केली. १४ एप्रिल एक प्रहर दिवस आला असता बादशहा तख्तेरवांवर स्वार होऊन निघाले. बादशहाबरोबर बादशहाजादा कामबख्श, शहाजादा बेदरबख्त, बक्षी बहरामदखान, रुहुल्लाखान, मुल्तफतखान व काजी मुहंमद अक्रम हे होते. बादशहा हे डोंगरावर मन्सूरखानाच्या मोर्चापाशी गेले तेथे त्यांनी तख्तेरवा थांबविला. या वेळी मन्सूरखान हा येऊन बादशहाला भेटला. राव सुजानसिंग हा त्यानंतर बादशहाला भेटला. बादशहाने मन्सूरखानाच्या डेऱ्याजवळ कनाती उभ्या करविल्या. बादशहा तेथे प्रार्थना पढले. त्यानंतर

त्यांनी बेदरबख्ताला त्यांच्या तंबूकडे जाण्यास निरोप दिला. मग दिवसाचे दोन प्रहर चार घटका झाल्या तसे बादशहा आपल्या निवासस्थानाला परत आले. एकंदर प्रवास साडेतीन कोसांचा झाला." हाच बारकावा नकाशावरून अभ्यास करण्याच्या बाबतीत. पन्हाळ्याची स्वारी नोव्हेंबर १७०० त सुरू झाली. त्यापूर्वी "२६ ऑगस्ट १७०० – आज बादशहाने पन्हाळगड किल्ल्याचा नकाशा मागवून पाहिला." या वेळी औरंगजेबाचा मुक्काम खटाव तालुक्यात भूषणगडाजवळ होता. परत "११ एप्रिल १७०१ रोजी दख्खनच्या तोफखान्याचा दारोगा मन्सूरखान याने आज्ञेप्रमाणे पन्हाळगड व पवनगड या किल्ल्यांचा नकाशा दुरुस्त करून बादशहासमोर ठेविला."

लढाईचे व वेढ्याचे काम चालू असताना सुद्धा बारीकसारीक प्रकरणे त्याच्या नजरेतून सुटत नसत. ती अर्थात तो सामान्यतः धर्मनिष्ठपणाने ऊर्फ धर्मद्वेष्टेपणान निकालात काढी. उदाहरणार्थ, बादशहाला कळविण्यात आले की "कोल्हापूरच्या देवाहऱ्यात (देव्हारा) खजिना पुरलेला आहे." बादशहाने कोल्हापूरचा ठाणेदार रणबाजखान याला निरोप देताना आज्ञा केली की "देवहारा उद्ध्वस्त करा पाडून टाका (मिसमार नमूदे) आणि खजिना काढून सरकारात दाखल करा."

उनाड व चुकार पोरांवर कडक देखरेख करणाऱ्या करड्या शाळा मास्तर-सारखी औरंगजेबाची तऱ्हा होती. हरकाऱ्यांच्या तोंडून त्याला कळले की "शत्रूचे सैनिक दारुगोळा बरोबर घेऊन खेळण्याच्या दिशेने येतात आणि चिनकुलीजखान याच्या ठाण्यातून प्रवेश करतात. तावडतोब औरंगजेबाने चिनकुलीजखानाला बोलावू पाठवले व त्याला विचारले "इतकी गफलत कशी काय झाली? (ईकंदर तगाफुल चराशुदा) तुम्ही रात्रीच्या वेळी खबरदारी बाळगली पाहिजे." चार दिवसांनी जेव्हा बातमी आली की, 'चिनकुलीजखानाची पथके पन्हाळगडाच्या भोवती तळ देऊन होती ती गस्त घालण्याच्या उद्देशाने खेळणा किल्ल्याच्या दिशेने गेली. तेथे गनिमांशी चकमक झाली. काही मराठे मारले गेले व काही जखमी झाले. सहा गनिमांची डोकी कापली. चार गनीम कैद करण्यात आले. सात घोड्या पकडण्यात आल्या. हाती आलेली गुरेढोरे सातशे आहेत. तेव्हा कोठें औरंगजेब संतुष्ट होऊन बोलला 'सेवा मान्य झाली.'

पण औरंगजेब स्वतः हजर असला म्हणून मराठ्यांचा प्रतिकार किंचितही उणावला होता, असे मुळीच नाही. रात्री-बेरात्री किल्ल्यातून बेलाशक बाहेर पडून ते मोगलांच्या मोर्चावर हल्ले करीत. आता औरंगजेबाची दरबारी बातमीपत्रे प्रत्येक वेळी मराठ्यांचा मोड झाला अशी बातमी देत असली तरी ती दरबारी भाषा होती. तो शिरस्ताच होता. मोगलांची हानि काही कमी होत नव्हती. खुद्द औरंगजेब असताना सारख्या चकमकी चालूच होत्या. २२ मार्च बादशहाला कळविण्यात आले की, "रात्री पन्हाळगडातून शत्रु (मराठे) बाहेर पडले ते मन्सूर-

खानाच्या मोर्च्याच्या बाजूने आले. मन्सूरखान आपल्या सहकाऱ्यासह त्वरेने त्यांच्यावर धावला. शत्रु पळून किल्ल्यात निघून गेले." ३ एप्रिल–"बादशाही लष्करातील माणसे, शेळी, मेंढरी, बकरी अशा पन्हाळगडच्या पायथ्याशी मन्सूर-खानाच्या मोर्च्याच्या काठाकाठाने चालली होती. किल्ल्यातून मराठे बाहेर पडले. त्यांनी लुटालूट केली. मन्सूरखान त्या स्थळी धावून गेला. बंदुकी, बाण, इत्यादींचा उभय पक्षाकडून मारा झाला. चकमकीत शत्रूंची काही माणसे ठार झाली. मोगलांचे बरेच लोक ठार झाले." १० एप्रिल–"पन्हाळगडच्या वेढयात असलेले ठाणेदार ख्वाजा मुहमद याने पुढीलप्रमाणे लिहून पाठविले– "आज्ञेप्रमाणे मी पवनगडच्या पायथ्याशी माझे ठाणे कायम केले होते. किल्ल्यातून सुमारे सातशे गनीम (मराठे) माझ्यावर चालून आले. युद्ध चालू आहे. शत्रूचे सैन्यबळ मोठे आहे. माझ्यापाशी माणसे कमी आहेत. मला कुमक मिळावी." बादशहानी तोफखान्याचा नायब फजले अलीखान यास पाठविले. तो तेथे पोचला. शत्रूपैकी अनेकजण चकमकीत ठार अगर जखमी झाले. शत्रूंचा पराजय होऊन ते किल्ल्यात पळून गेले. १३ एप्रिल– "बादशहांना कळविण्यात आले की, रात्री पन्हाळगडातून मागने बाहेर आली. ती तरबियतखानाच्या मोर्च्यावर चालून गेली. आपली दोन माणसे जखमी झाली. आपल्या लोकांनी गनिमांचे परिपत्य केले. ते पळून किल्ल्यात गेले."

मोर्च्यावर हल्ले करण्याप्रमाणे पन्हाळ्याच्या परिसरातील मोगल प्रदेशात धामधूम माजविणे, रसद व लमाण लुटणे आणि लहानसहान मोगली टोळ्या गारद करणे हे मराठ्यांचे आणखी एक युद्धतंत्र होते. कऱ्हाड भागात चांदजीराव पाटणकर याने आणि डफळापूर जत भागात सटवाजी डफळे यांनी मोगल आणि बलुची यांचे जमाव अशाच प्रकारे गारद केले. कोल्हापूर भागातली रसद नाहीशी करण्याचाही मराठ्यांचा बेत होता. १७ मार्च १७०१–"बादशहाला कळविण्यात आले की, कोल्हापूर भागात गवतचारा भरपूर आहे. पण शत्रु (मराठे) त्याला आग लावून नष्ट करण्याच्या विचारात आहेत. त्याचे रक्षण करण्यासाठी कुणाला तरी आज्ञा व्हावी." बादशहानी आज्ञा केली की "कोल्हापूरचा ठाणेदार रणबाज-खान याला गवतचाऱ्याचे रक्षण करण्यासाठी लिहिण्यात यावे."

पन्हाळ्या भोवतालचे सैन्यबळ कमी करणे हे मराठ्यांचे आणखी एक तंत्र होते. दक्षिणच्या सुभ्यात सारखी धामधूम माजवली म्हणजे मातब्बर सेनापतींना वेढ्यातून काढून तिकडे पाठविणे भाग पडे. मार्च महिन्यात ब्रह्मपुरावर बादशाही छावणीवर धनाजी जाधवाने चाल केली तेव्हा त्याच्यावर झुल्फिकारखानाला रवाना करण्याशिवाय इलाज राहिला नाही. त्या पुढच्याच महिन्यात संताजी घोरपड्याचा मुलगा राणोजी घोरपडे याने धामधूम उडविली. तेव्हा बेदरबख्ताला त्याच्यावर सोळा हजार सैन्यानिशी रवाना करावे लागले. एवढे सैन्य व माणूसबळ मोगलांचे पन्हाळ्याच्या वेढ्यातून कमी झाले. २० एप्रिल १७०१–"काल रात्री

हरकाऱ्यांच्या तोंडून कळले की संताजीचा मुलगा राणोजी हा वीस हजार स्वार घेऊन चिकोडी व ऐनापूर पन्हाळगडच्या इराद्याने निघाला आहे. यावर बादशहांनी आज्ञा केली की, "शहाजादा मुहंमद बेदरवख्त यांनी नजरअलीखान, खाने आलम, इत्यादि सरदार व सोळा हजार स्वार बरोबर घेऊन राणोजीच्या पारिपत्यासाठी जावे. मतलबखान याने आपल्या पथकानिशी बेदरबख्ताच्या तळाची काळजी घ्यावी अशीच सावधगिरी चिनकुलीजखान व फत्ते उल्लाखान यांनी बाळगावी."

किल्ल्यात रसद, शस्त्रे व माणसे पोचविणे हे आणखी एक युद्धतंत्र होते. फेब्रुवारीत रामचंद्रपंत अमात्य व झुल्फिकारखान यांची निकराची लढाई याच संदर्भात झाली होती.

आणि मराठ्यांच्या या चतुरस्त्र प्रतिकाराला आशीर्वाद देण्यासाठी ताराबाईचा अभयहस्त त्यांच्या मस्तकी अखंड ठेवलेला होता. आपला मुलगा शिवाजी याच्या नावाने कारभार पाहात असली तरी तीच या वेळी 'कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम्' समर्थ अशी महाराष्ट्राची सर्वेसर्वा होती. पावनगडचा किल्लेदार विठोजी केसरकर याला शाबासकी देताना ती म्हणते—"तुम्ही हमेशा कस्त करून गनिमास नतीजा पावविता एकदोन वेळा मोर्चा मारिला. औरंगजेबास तरी ठेचगा द्यावा अशी उमेद धरता म्हणून हे वर्तमान देवजी रघुनाथ व फडणीस यांनी विदित केले. त्यावरून तुमचा मजुरा झाला. ऐसियास तुम्ही एकनिष्ठ सेवक तैसेच आहा. याउपरी औरंगजेब आला आहे तरी त्याचा हिसाब न धरिता स्वामीची जागा जतन करणे. स्वामी ऊर्जित हरबाब करतील. दिलासा असो देणे."

या दृष्टीने पाहता बिचाऱ्या औरंगजेबाची स्थिति सर्वच दृष्टींनी मोठ्या हलाखीची होती असे म्हटले पाहिजे.

मोगलांनी तोफांच्या भडिमाराने किल्ल्याचे पाच बुरूज निम्म्या उंचीपर्यंत उडविले होते. किल्ल्यात शिबंदी अवघी तीनशे होती. पण किल्ल्यात आत शिरून हल्ला करण्याची मोगलांना काही छाती होत नव्हती. पन्हाळगडाच्या तटबंदीत त्यांनी दोन सुरुंग ठासून भरले होते. पण साताऱच्या सुरुंगाच्या प्रकरणात मोगलांचे तोंड दुधाने पोळले होते. त्यामुळे ते अनुभवाने आता हुशार होऊन पन्हाळ्याला ताकही फुंकून पिऊ लागले होते. तटावरच्या मराठ्यांपेक्षा तटाखालच्या मोगलांनीच सुरुंगाची धास्ती जास्त घेतली होती. त्यामुळे सुरुंग उडवून तट उडविण्याचा बेत केवळ मनोरथातच जमा होऊन राहिला होता.

पन्हाळ्याला किल्ल्यावरची एक मराठी बाई मोगलांनी पकडली. ती तरबियतखानाच्या मोर्च्यात आली. तरबियतखानाने तिला हुजुरात पाठविली. बादशहा म्हणाले, "हमीदुद्दीन खानबहादुर यांनी तिच्याबद्दल चौकशी करावी." बाईने सांगितले, "मी शहाजादा बेदारबख्तच्या छावणीतून येत होते. गनिमांनी कैद करून मला किल्ल्यात नेले. किल्ल्यात पाण्याचा साठा भरपूर आहे. धान्यही भरपूर आहे.

किल्ल्यात सुमारे चारशे माणसे आहेत. किल्ल्याची एका बाजूची तटबंदी लहान आहे." तिला सोडून द्यावी अशी बादशहानी आज्ञा केली.

त्या बाईने सांगितलेली माहिती बरोबर होती. किल्ल्यात फक्त चारशे माणसे होती. एका बाजूची तटबंदीही लहान होती. मोगल सैन्य असंख्य होते. त्यात निदान वीस हजार तरी लढवय्ये होते. पण किल्ल्यावर हल्ला करण्याचे धाडस करणारा मायेचा पूत त्यात कुणी नव्हता. 'हिम्मत मर्दा तो मदत खुदा' असे म्हटले आहे. पण मर्दाला हिंमतच नसली तर खुदा तरी मदत काय करणार ?

बेहिमतीप्रमाणे बेइमानीपणाचाही मोगल लष्करात सुळसुळाट झाला होता. सरंजामाचे खोटे हिशेब दाखवायचे आणि पैसे खायचे हा सेनापतींचा पैसा कमावण्याचा राजरोस मार्ग झाला होता. इंग्लंडच्या बादशहाचा वकील विलियम नॉरीस हा या वेळी औरंगजेबाच्या लष्करात होता. त्याने समक्ष पाहून वर्णन केले आहे की, "आठ हजार स्वारांच्या मनसबदाराचा पगार महिन्याला पंचवीस हजार स्टर्लिंग (त्या वेळच्या हिशेबाने साठ हजार रुपये) होता. पण मनसबदार इतके स्वार बाळगत नसत. दीड हजार स्वार त्यांनी बाळगले म्हणजे डोक्यावरून पाणी गेले असे समजण्यात येई. बाकीच्या साडेसहा हजार स्वारांचा पगार—म्हणजे सुमारे पन्नास हजार रुपये—मनसबदाराच्या खिशात जाई. यादीत मात्र आठ हजारांचा हिशेब लिहिलेला असे. अशा लबाडचा सर्रास चालत. लष्कराचा पगार चुकता करताना औरंगजेबाची तारांबळ उडे. महिनेच्या महिने लष्कराला पगार मिळत नसे. सैनिकात असंतोष वाढू लागला होता. लोक बादशहा व अधिकारी यांच्याबद्दल कडू शब्द उच्चारू लागले होते. कित्येक लोक लष्कर सोडून जाऊ लागले होते. नॉरीसला ही माहिती देणारा जो इंग्रज गोलंदाज होता, त्यालाही चौदा महिनेपर्यंत पगार मिळाला नव्हता. औरंगजेब वस्ताद व धूर्त खरा, पण त्याचे अधिकारी त्याच्यापेक्षाही वस्ताद व कावेबाज होते. ते त्याला हातोहात ठकवीत. अनेकांच्या लबाडीपुढे एकाचा वस्तादपणा तो काय पुरा पडणार ? पळणाऱ्याला बारा वाटा असतात, पण शोधणाऱ्याला एकच असते. वाईट इतकेच की मोगल अधिकारी मराठ्यांपेक्षा आपल्या धन्याला फसवण्यातच जास्त पटाईत होते.

मोगलांमध्ये सगळेच काही कमहिमतीचे आणि कामचुकार होते असे नव्हे. फतेउल्लाखान, हा तुर्क, कसलेला शिपाई, उत्कृष्ट कामगार होता तरबियतखान मीर अतिश हाही मोर्चे बांधण्यात व भुयारे खणण्यात वाकबगार होता. महंमद मुरादखान हाही शूर आणि निधडया छातीचा होता. त्याचप्रमाणे संभाजीला पकडणारा शेख निजाम ऊर्फ मुकर्रबखान, झुल्फिकारखान, फिरोजजंग इत्यादि सरदारांचे शौर्य वादातीत होते. पण फार पूर्वीपासून समस्त मोगल उमरावांना पोटदुखीचा जबरदस्त आजार जडला होता. दुसरा आपणाविरुद्ध वरचढ होऊ

लागला की मत्सराने त्यांचे पोट दुखू लागे आणि मग ते एकमेकांचे पाय ओढू लागत. त्यामुळे दोन उमरावांचे शौर्य केवढेही असले तरी शत्रूवर सोडलेल्या दोन बाणांनी एकमेकांवर आपटून परस्पराचे तुकडे उडवावेत, त्याप्रमाणे त्यांचे शौर्य निष्फल होऊन जाई. पूर्वी जिंजीचा वेढा चालू असताना झुल्फिकारखान व दाऊदखान, झुल्फिकारखान व कामबख्श यांचा हाच प्रकार झाला. साताऱ्याच्या वेढ्यात तरबियतखानाच्या मोर्च्याला त्याच्याच संतापलेल्या बहेलियांनी आग लावून दिली. या वेळी पन्हाळ्याच्या वेढ्यातही हेच झाले.

फतेउल्लाखान सुरुंग बांधीत किल्ल्याच्या पायथ्यापर्यंत गेला. त्याला मुनीमखानाने चांगलीच साथ दिली. "पण आपल्या मानाने फतेउल्लाखानाची कामगिरी उठून दिसावी अशी तरबियतखान व इतर सरदार यांची इच्छा नव्हती." तसेच पवनगडच्या पायथ्याशी ख्वाजा मुहमद हा ठाणेदार होता. त्याची मराठ्यांशी चकमक झाली. त्या वेळी त्याच भागात इखलासखान हा ठाणेदार होता. तो ख्वाजा मुहंमदच्या मदतीला गेला नाही. तोच प्रकार मुहंमद मुरादखानाचा.

महंमद मुरादखान हा लहानपणापासून औरंगजेबाच्या कुटुंबियात वाढला होता. तो या वेळी मुद्दाम गुजराथमधील गोध्राच्या फौजदारीहून औरंगजेबाच्या मोहिमेत भाग घ्यावा म्हणून पन्हाळ्याला आला. त्याने औरंगजेबाला लिहिले– "या वेळी बादशहा जिहाद करीत आहेत. काफरांचे किल्ले घेण्याकरिता ते कटिबद्ध झाले आहेत आणि आपण सुखाने काळ कंठावा हे आपल्याला आवडत नाही." औरंगजेबाला त्याचे मोठे कौतुक वाटले आणि पावनगडच्या पायथ्याशी त्याने ठाणेदार म्हणून त्याची नेमणूक केली.

पन्हाळ्यापासून पूर्वेस अर्ध्या मैलांवर पावनगड आहे. दोन्ही किल्ल्यांच्या मध्ये दरी आहे, या किल्ल्यांच्यामध्ये एक टेकडी आहे. या टेकडीच्या पायथ्याशी महंमद मुरादखान होता. दोन्ही किल्ल्यांवरून दगड, तोफा व बंदुका यांचा इतका भडिमार होई की त्या टेकडीवर जाण्याची कोणी हिंमत करीत नसे. पण महंमद मुरादखानाने शर्थ करून ती टेकडी काबीज केली आणि तेथे झेंडा लावला. मग तो टेकडीच्या आडोशात मोर्चे बांधण्याच्या उद्योगास लागला.

तो झेंडा सगळ्या लष्कराच्या दृष्टीस पडला आणि छावणीत एकच आनंदाचा कल्लोळ उठला. औरंगजेबाने कनातीचे पडदे दूर करून स्वतः ते दृश्य पाहिले व कारण विचारले. या वेळी महंमद मुरादखानाच्या पक्षाची माणसे त्याच्याजवळ हजर होती. त्यांनी महंमद मुरादखानाची स्तुति केली व तरबियतखानाची निंदा केली. याच वेळी मदत पाठविण्याबद्दल महंमद मुरादखानाची अर्जी आली. तेव्हा औरंगजेबाने रुहुल्लाखान व हमीदुद्दीनखान यांना पाठविले व महंमद मुरादखानाचे कौतुक करणारे स्वदस्तूरचे पत्रही त्याला लिहिले.

पण रुहूल्लाखान व हमीदुद्दीनखान हे महाभारतातल्या शल्याचे अवतार होते. ते तरबियतखानाच्या पक्षाचे होते, महंमद मुरादखानाचे पाय धरून ओढण्याचे सत्कृत्य सोडून ते त्याला मदत कशी करतील? ते संध्याकाळपर्यंत टेकडीच्या पायथ्याशी उभे राहिले व निरोप-प्रतिनिरोप करीत त्याच्याशी हुज्जत घालू लागले. ते त्याला म्हणाले " तू घिसाडघाई केलीस आणि आता आमचे साहाय्य मागत आहेस. तुला हवी ती मदत देणे कठीण आहे. तू आणि तुझे सहकारी स्वतःच्या प्रयत्नाने मोर्चे कायम करू शकाल तर हे तुम्हाला लखलाभ होवोत. नाही तर मोर्चे कायम करता येत नाहीत असे सांगून खाली निघून यावे."

बिचाऱ्या महंमद मुरादखानाला इकडे आड व तिकडे विहीर असे झाले. टेकडी सोडावी तर अब्रू जाते व न सोडावी तर मराठ्यांच्या बंदुकांखाली जीव जातो. त्यात पुन्हा तडजोडीचे बोलणे लावून किल्ल्यावरच्या लोकांनी त्याला मधाचे बोट लावून ठेवले होते. त्याचा निर्णय होईना. अखेर त्याला या शृंगापत्तीतून त्याच्या हितशत्रूंनी म्हणजे रुहुल्लाखान व हमीदुद्दीनखान यांनी सोडविले. ते म्हणाले– "आम्ही तुझ्या हाताखाली काम करावे आणि आतापर्यंत तरबियतखान आणि इतर उमदे सरदार यांनी जी कामगिरी केली आहे ती सर्व मातीत मिळून जावी अशी तुझी इच्छा आहे काय?" अखेर The cat was out of bag! थैलीतून मांजर बाहेर पडले! खरे दुखणे हे होते.

एवढ्यावरच ते थांबले नाहीत. त्यांनी औरंगजेबाला लिहिले– "महंमद मुरादखानाने शौर्याची आणि साहसाची शर्थ केली. पण टेकडी ताब्यात ठेवून तेथे मोर्चे बांधणे शक्य नाही. महंमद मुरादखान व त्याचे पथक रात्री टेकडीवर राहतील तर मोगल सैन्यावर फजितीचा भयंकर प्रसंग ओढवेल. उलट महंमद मुरादखानाला वाटते की आपण बादशहाच्या आज्ञेविरुद्ध खाली उतरलो तर आपल्या लौकिकाच्या दृष्टीने चांगले नाही."

औरंगजेबाला हे समजले तेव्हा तो चिडला. त्याने स्वदस्तूरचे पत्र महंमद मुरादखानाला लिहिले– "हे भलतेच धाडस कां केलेस? त्यामुळे पस्तावाच होईल. आता ताबडतोब खाली उतरून ये पाहू." त्यावेळी तरबियतखानाच्या पक्षाचे लोक औरंगजेबाजवळ होते. त्यांनी महंमद मुरादखानाच्या फाजील साहसाबद्दल त्याची बेफाम निंदा केली. महंमद मुरादखानाच्या बाबतीत सकाळच्या ओंब्याचा संध्याकाळच्या शिव्यांनी संक्षेप झाला.

रात्री औरंगजेबाला सर्व प्रकार समजला. सकाळी महंमद मुरादखान हा नेहमीप्रमाणे मुजरा करण्यास आला, तेव्हा औरंगजेबाने त्याचे समाधान करून म्हटले, "मला सगळी हकीकत कळून चुकली आहे. शौर्य आणि साहस दाखविण्यात तू काही कमी केले नाहीस. पण तुझी कामगिरी उठून दिसावी अशी आमच्या उमद्या सरदारांची इच्छा नव्हती." त्याच वेळी औरंगजेबाने

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, पुणे
(इ.व्ह. ... पुणे)
११११ सदाशिव पेठ, पुणे-३०.


हमीदुद्दीनखानाला बोलावून त्याला एकांतात म्हटले, "खानजमान ऊर्फ शेख निजाम याने त्या दुष्ट संभाजीला मुलामाणसांसहित पकडून उत्कृष्ट कामगिरी केली. त्याच्यावर मी कृपा करून गुणग्राहकता दाखवावी असे आमच्या निकटवर्ती अमीरउमरावांच्या मनात नव्हते. श्रमसाहसाची कामे करून त्या सरदाराच्या घराण्याने तैमूर घराण्याला ऋणी करून ठेवले आहे. त्याचप्रमाणे महंमद मुरादखानाचे शौर्य व साहस ही सफल व्हावी असे तरबियतखानाला वाटत नाही. तुला मी सच्चा समजतो. तू पण तरबियतखानाप्रमाणे अदूरदृष्टीचा झाला आहेस."

'दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा' अशी दिल्लीश्वराबद्दल सामान्य समजूत आहे, पण नोकरांच्या आपापसातल्या हेव्यादाव्यामुळे औरंगजेबासारख्या मनस्वी बादशहाची जी दीन अवस्था झालेली त्याच्या खिन्न उद्‌गारांतच दिसून येते, ती पाहिली म्हणजे अनेक वेळा नोकरशाही ही बादशाहीला पाणी पाजू शकते या गोष्टीची प्रचिती आल्याशिवाय राहात नाही. अशा लोकांना शास्त्रात 'शत्रुनन्दन' म्हणतात. मोगल सरदार परस्परच एकमेकांचे पाय ओढीत होते. त्यामुळे मराठ्यांचे काम आपोआपच सोपे होत होते. वेढा लांबत होता. किल्ला सर होत नव्हता.

पण वेढा रेंगाळला तरी काळ रेंगाळत नव्हता. हिवाळा संपला, उन्हाळा गेला, पावसाळी ढग दिसू लागले तेव्हा मोगलांचे धाबे दणाणले. कारण, त्या डोंगरमाथ्यावरचा पाऊस हा माणसापेक्षा हैराण करणारा होता. तेव्हा मोगलांनी शेवटच्या अस्त्राचा प्रयोग मराठ्यांवर केला. त्याने मात्र ते सपशेल गारद झाले व किल्ला त्यांनी मोगलांना देऊन टाकला. मोगलांच्या भात्यांतले ते अमोघ अस्त्र म्हणजे 'सुवर्णास्त्र' होय. शहाजादा कामबख्श व तरबियतखान यांनी पंचावन्न हजार रुपयांची दक्षिणा किल्लेदार साहेबांना अर्पण केली व पन्हाळा व पावनगड हे दोन्ही किल्ले 'सर' केले. औरंगजेबाने त्यांची नावे 'बनीशाहदुर्ग' व 'शाहबनीदुर्ग' अशी ठेवली. ज्या दिवशी किल्ले ताब्यात आले त्याच दिवशी २८ मे १७०१ रोजी औरंगजेबाने तातडीने मुक्काम हलविला. कारण पावसाळा सुरू होण्याच्या आत त्याला त्या प्रदेशातून बाहेर पडणे जरूर होते.

पण औरंगजेबापेक्षा निसर्ग जास्त चपळ होता. ज्या दिवशी औरंगजेब निघाला त्याच दिवशी प्रचंड वादळ झाले. लहानमोठे तंबू कागदाप्रमाणे हवेत उडाले. ज्याच्या तणावा फाटून चिंध्या झाल्या नाहीत असा एकही तंबू नव्हता. आणि उडून परत धडपणे खाली आले असे एकही कापड नव्हते. "या वादळाने तमाम माणसे त्रस्त होऊन 'परमेश्वरा आमचे रक्षण कर' असे ओरडू लागली. जनानखान्याचे तंबू उडाले, पडदे फाटले, पर्दानशीन स्त्रिया उघड्या पडल्या. लोभी गुंड आणि निर्लज्ज सौंदर्योपासक यांनी मात्र अवगुंठनविरहित अशा स्त्रियांकडे

पाहून नेत्रसुख पूर्णपणे भोगून घेतले." अशा थाटात औरंगजेबाने खटावकडे प्रयाण केले.

खटावच्या बाजूला पावसाचा जोर कमी असे. अन्नधान्य व गवतचाराही भरपूर असे. पण स्वस्थ बसणे हे औरंगजेबाच्या स्वभावातच नव्हते. पावसाळ्यातही त्या बाजूचे किल्ले घेण्याचे त्याचे उद्योग चालूच होते. फतेउल्लाखानाला 'बहादूर' अशी पदवी देऊन त्याने वर्धनगड घेण्यास पाठविले. त्याने तो ६ जून रोजी जिंकला. त्याचप्रमाणे ६ जुलै रोजी नांदगिरी व ६ ऑक्टोबर रोजी चंदनवंदन हे किल्ले बख्शी बहरामंदखान याने पैशाचा भडिमार करून जिंकले. या बाबतीत फतेउल्लाखानास सुप्रसिद्ध सूर्याजी पिसाळाचे साहाय्य झाले. हे स्वनामधन्य सद्‌गृहस्थ सध्या पक्षांतर करून मराठ्यांऐवजी मोगलांकडून काम करीत होते. "हे सूर्याजीस कळलियावरी मागती मोगलाईत जाऊन फजुलाखानास भेटला. चंदनवंदन, नांदगिरी हे किल्ले हस्तगत करून देऊन फजुलाखानास मेहेरबान करून घेतला." नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे औरंगजेबाने किल्ल्यांचेही बारसे करून त्यांना नवी इस्लामी नावे ठेवली. चंदन वंदनला मिफ्ताह व मफ्तह व नांदगीरला नामगीर अशी नावे ठेवण्यात आली.

औरंगजेबाची स्वारी आपल्या सरदारांवर या वेळी बरीच खूष होती असे वाटते. वर्धनगड फतेउल्लाखानाने जिंकला; म्हणून फतेउल्लाखानाचे नाव 'सादिक' हे त्या किल्ल्याला देऊन जिवंतपणीच त्याचे 'सादिकगड' असे स्मारक करून ठेवले. एवढेच नव्हे तर आपला लाडका सेनापति झुल्फिकारखान याचे इस्लामखान रूमी याच्या मुलीबरोबर लग्नही लावून दिले. भीमसेन म्हणतो- "बादशहाने जोडप्याचे खूप अगत्य केले."

□ □

# (१२)

१७०१ चा पावसाळा संपला. हिवाळा सुरू झाला आणि पुन्हा एकदा बादशहा सलामतनी महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यात दिग्विजय करण्यासाठी कमर कसली. खेळणा ऊर्फ विशाळगड घेण्याच्या इराद्याने ७ नोव्हेंबर रोजी औरंगजेबाने वर्धनगडाहून कूच केले. पन्हाळा गेल्या वर्षी घेतलाच होता. आता खेळण्यावर डोळे खिळले होते. औरंगजेबाच्या या मोहिमेमागे किल्ले घेण्याप्रमाणे आणखीही एक मुद्दा होता. औरंगजेबाच्या आक्रमणामुळे मराठ्यांची राजधानी सारखी हालत होती; आणि औरंगजेब ती जिंकीत चालला होता. त्याने रायगड जिंकला, त्याने जिंजी जिंकली, त्याने सातारा जिंकला, आता राजधानी विशाळगडावर होती. तेव्हा ती जिंकणे ओघानेच आले.

हे काम सोपे नव्हते. साकी मुस्तैदखान म्हणतो, "खेळणा किल्ला म्हणजे मूर्तिमंत कष्ट आणि संकटे. तो घेण्याची कल्पना जरी केली, तरी प्राण कासावीस होतात. उंच डोंगर म्हणजे त्याच्यासमोर धुळीत बसण्याच्या योग्यतेचा आणि आकाशाने उंचीच्या बाबतीत त्याच्यासमोर भिकारी म्हणून उभे राहावे असा हा खेळण्याचा किल्ला." त्याच्या आसपास किर्र जंगल आहे. "प्रचंड वृक्ष ठिकठिकाणी काफरांप्रमाणे आपल्या माना उंच करून उभे आहेत. त्यांच्या फांद्या एकमेकात इतक्या अडकल्या आहेत की त्यातून मुंगीसुद्धा अतिशय कष्टानेच जाऊ शकेल. जागजागी प्रचंड दरडी आणि खोल खड्डे या प्रदेशात आढळतात. दरसाल या प्रदेशात अडीचशे ते तीनशे इंच पाऊस कोसळतो. दहा दहा आणि वास वीस दिवस अहोरात्र पावसाचा वर्षाव होत असे. कोणाला डोळे उघडण्याची अगर डोके वर काढण्याची सोय नव्हता." अशा या मुलखात असलेला खेळणा त्या प्रदेशाइतकाच दुर्गम आहे. समुद्रसपाटीपासून त्याची उंची तेहतीसशे फूट आहे आणि त्यावर जायला फक्त दोन मार्ग आहेत. पश्चिमेकडून कोकणची पायवाट आणि पूर्वेकडची वाट, पूर्वेकडच्या वाटेवर किल्ल्याच्या पायथ्याशीच खोल दरी आहे. औरंगजेबाची येण्याची वाट हीच पूर्वेकडची होय.

औरंगजेबाच्या पूर्वी बहमनी सुलतानांच्या अमदानीत रांगणा, खेळणा इत्यादि कोकणातील किल्ल्यांवर कबजा मिळविणाऱ्या महमूद गावानने कोकणच्या मोहिमेबद्दल म्हटले होते, त्याची प्रचिती औरंगजेबालाही येणे अपरिहार्य होते. बहमनी बादशहाच्या एका वजिराला लिहिलेल्या पत्रात गावान म्हणतो– "कोकणच्या मोहिमेच्या अडचणी तुम्ही जाणता. कोकण म्हणजे जंगल आणि डोंगर. जंगलझाडी तोडण आणि खडक फोडून रस्ते बरोबर करण याशिवाय येथे पाऊल

टाकणे अशक्य आहे. त्यामुळे येथे किती तयारी करावी लागते याची कल्पना आपणास येईल." गावानने हे उद्गार खेळण्याच्या मोहिमेवर रवाना होण्यापूर्वी काढले आहेत. गावानच्या पूर्वी खलफ हसन बसरी ऊर्फ मलिक उत्तुजार हा प्रचंड सैन्य घेऊन कोकणात उतरला होता. खेळण्याचा शंकरराव मोरे आणि संगमेश्वरचा राजा यांनी संगनमत केले. खेळण्याच्या शिर्क्यांनी शरण आल्यासारखे दाखवून संगमेश्वर काबीज करवून देतो असे आश्वासन मलिकुत्तुजारला दिले व आपल्या मागोमाग आडवाटेने नेले. पूर्वी ठरल्याप्रमाणे शिर्के व संगमेश्वरचा राजा यांनी त्या आडवाटेवरच्या किर्र जंगलात रात्री छापा घालून सात हजार सैन्यासह मलिकुत्तुजारला गारद केले. ती हकीकत सांगणारा फिरिश्ता या प्रदेशाबद्दल म्हणतो– "या घाटातील वाटा इतक्या वाकड्या तिकड्या होत्या की त्यांची तुलना केसांच्या कुरळेपणाशी केली तरी बरोबरी होणार नाही. या पर्वतांचा काय भयंकर देखावा! प्रत्यक्ष राक्षस आणि भूते देखील इथल्या कड्यांपाशी आणि गुहांपाशी आल्यावर दचकतील! या अरण्यात सूर्याचा कवडसाही पडावयाचा नाही! इथे वाढलेले गवत सर्पांच्या सुळक्यांप्रमाणे चिवट, तीक्ष्ण! हवा अजगराच्या श्वासोच्छ्वासासारखी दुर्गंधिमय. इथल्या पाण्यामध्ये मूर्तिमंत मृत्यूचेच वास्तव्य. वाऱ्याची प्रत्येक झुळूक विषाने माखलेली. अशा या वाकड्या तिकड्या वाटांनी चालून मुसलमान सैन्य अगदी भिऊन आणि थकून गेले!"

असा हा शत्रूंना खेळवणारा भयंकर खेळणा आणि त्याच्या आसपासचा भयंकर परिसर. धाडस तर जिवावरचे होते. पण औरंगजेबाचे इतर दोष काहीही असले तरी कचखाऊपणा हा त्यांपैकी नव्हता. भीति त्याच्या अंतःकरणाला कधी शिवली नाही. खेळण्याच्या कड्याप्रमाणे तोही ताठ आणि बेलाग होता. ठरल्याप्रमाणे वर्धनगडाहून त्याने मुक्काम हलविला आणि रहमतपूर, कऱ्हाड, शिराळा, सातगाव या वाटेने प्रवास करीत तो सव्वीस नोव्हेंबर रोजी विशाळगडापासून सोळा मैलांवर असलेल्या मलकापूरला येऊन पोचला. वाटेने मराठ्यांचे हल्ले चालूच होते. औरंगजेबाचा नातू बेदारबख्त हा याच सुमारास कोल्हापूर जिल्ह्यातील सामानगड व भुदरगड हे किल्ले जिंकून घेऊन मलकापूरला औरंगजेबास येऊन भेटला. तो भुदरगडावरून येत असताना मराठ्यांनी त्याला गाठले व त्याच्यावर हल्ला चढविला व त्याच्यावर मोठा कठीण प्रसंग आणला. तेवीस नोव्हेंबरच्या औरंगजेबाच्या दरबारचा अखबार म्हणतो– "शहाजादा बेदारबख्त हा आपले सरदार मतलबखान, खाने आलम इत्यादींना बरोबर घेऊन विशाळगडाजवळ पोचला. त्याने किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या वाड्यांना आगी लावल्या. किल्ल्यातून मराठे बाहेर पडले. त्यांनी शहाजाद्याचे तीस उंट पळविले. हातघाईची लढाई झाली. स्वतः खाने आलम याला घोड्यावरून उतरून तलवार

चालवावी लागली. मराठे किल्ल्यात गेले. मोगलांचे अनेक लोक ठार अगर जखमी झाले. खाने आलमचा घोडाही जखमी झाला." हा खाने आलम म्हणजे संभाजीला पकडणाऱ्या मुकर्रबखानाचा मुलगा इखलासखान होय. औरंगजेबाला हे समजल्यावर तो मतलबखानावर फार संतापला. "मराठे इतक्या संख्येने तिकडे जमले असताना तू काय म्हणून शहाजादा बेदारबख्ताला तिकडे नेलेस." अशा शब्दांत त्याने मतलबखानाची हजेरी घेतली आणि शिक्षा म्हणून त्याची मनसब कमी केली.

मलकापूर येथे औरंगजेबाने एक आठवडा मुक्काम केला. कारण तेथून पुढे सहा मैलांवर अंबा घाट सुरू होत होता, व तो रस्ता अत्यंत कठीण होता. त्यात पुन्हा याच वेळी हिवाळ्यात पाऊस होऊन इतका चिखल झाला की कुणालाही एका तंबूतून दुसऱ्या तंबूत जाणे कठीण होऊन बसले. मग प्रवास करणे तर दूरच. रस्ता तयार करण्याच्या कामावर औरंगजेबाने फतेउल्लाखान याला नेमले. तो औरंगजेब आला त्याच दिवशी किल्ल्याभोवती मोर्चाच्या जागा ठरवून त्याला येऊन भेटला होता.

एकंदर विचार केला म्हणजे या फतेउल्लाखानाचे कौतुक वाटल्याशिवाय राहात नाही. या वेळी त्याचे वय बरोबर त्याचा मालक औरंगजेब याच्या वया-इतके म्हणजे पंचाऐंशी वर्षांइतके होते. पण त्याची जिद्द व त्याची तडफ ही पंचविशीतल्या तरुणाला लाजविण्यासारखी होती. औरंगजेबाप्रमाणेच तोही अस्सल तुर्क होता. हे दोघे तरुण म्हातारे हेच विशाळगडच्या वेढ्याचे खरे नायक होते; आणि त्यांच्या बाबतीत मनुस्मृतीतले "न तेन वृद्धो भवति येनास्य पलितं शिरः" (केस पांढरे झाले म्हणून काही कोणी म्हातारा होत नाही) हे सुप्रसिद्ध वचन फार निराळ्या अर्थाने खरे ठरले असते यात शंका नाही. कोकणच्या घाटाचा रस्ता तयार करताना फतेउल्लाखानाला खडक फोडावे लागले, झाडे तोडावी लागली. खिंडारे बुजवावी लागली, हे तर झालेच. पण डोंगरदऱ्यांच्या आसऱ्याने छापे घालणाऱ्या मराठ्यांशीही झुंजावे लागले. पण फतेउल्लाखानाने माघार घेतली नाही. त्याने रस्ता तयार केला तो इतक्या झपाट्याने व इतका उत्तम केला की, "त्यावरून एका वेळी शंभर स्वार जाऊ शकतील." "एक महिन्यात व्हावयाचे काम त्याने एका आठवड्यात पार पाडले." रस्ता तयार झाल्याची वार्ता आल्यावर औरंगजेबाने मलकापूरचा तळ उठविला व तो पुढे चालू लागला.

रस्ता नीट झाला हे खरे पण तो सगळा घनदाट अरण्याने आच्छादिलेला होता आणि जंगलातून मराठ्यांचा घाला केव्हा पडेल याचा नेम नव्हता. औरंग-जेब मलकापुराहून निघाला आणि त्याच दिवशी त्याच्या पिछाडीवर राणोजी घोरपड्याने हल्ला चढविला. हा राणोजी म्हणजे सुप्रसिद्ध संताजी घोरपड्याचा

मुलगा होय. नागोजी मान्याला हाताशी धरून औरंगजेबानं कपट विद्येच्या बळावर फार दिवस सलत असलेला संताजी घोरपड्याचा काटा काढला हे खरे; पण त्यामुळे त्याचा मार्ग निष्कंटक झाला असे नव्हे. कारण शिवाजीपेक्षा संभाजी त्याप्रमाणे संताजीपेक्षा राणोजी हा बापसे बेटा सवाई निघाला. त्याचे आणि धनाजी जाधवाचे वैर होते, पण त्याचा बादशहाला फायदा होण्यासारखा नव्हता. आपापसांत त्यांची कितीही लठ्ठालठ्ठी चालू असली, तरी औरंगजेबाला छळण्याच्या बाबतीत दोघेही एक होते. ज्याप्रमाणे संभाजी स्वतःला सवाई शिवाजी म्हणवून घेत असे, त्याप्रमाणे हा राणोजी सवाई संताजी होऊन बसला होता. गेल्या वर्षी पन्हाळगडच्या वेढ्यात बादशहा गुंतला असताना राणोजीने वीस हजार सैन्य जमा करून चिकोडी ऐनापूरच्या बाजूला एवढी धामधूम उडवून दिली की पन्हाळ्याहून बेदारबख्ताला वेढ्याच्या कामातून काढून सोळा हजार सैन्यानिशी राणोजीवर तातडीनें रवाना करणे औरंगजेबाला भाग पडले. या वर्षी विशाळगडाकडे बादशहा गुंतला असताना राणोजी कऱ्हाडपासून मलकापुरापर्यंत दौड करून रसदेचा पुरवठा तोडीत होता आणि अन्नदात्या बादशहाची अन्नान्नदशा करीत होता. जे धान्य ब्रह्मपुरीच्या छावणीत रुपयाला तेरा शेर मिळत होते, ते राणोजीच्या हल्ल्यामुळे मलकापूरच्या छावणीत रुपयाला पाच शेर विकत होते. या वेळी तर त्याने खुद्द औरंगजेबाच्या सैन्याच्या पिछाडीवरच हल्ला चढविला.

लढाई मोठ्या हातघाईची झाली. मोगलांकडले जयसिंगराव, ओछर्याचा अवधूतसिंग वगैरे लोक निकराने लढले व त्यांनी हल्ला परतवून लावला. पण लढाईत सय्यद मुजफ्फर या मोगल अधिकाऱ्याचा भाऊ जखमी झाला. मराठ्यांनी वंजाऱ्यांचे रसदेचे बैल लुटून आणले. या अनुभवाने औरंगजेब शहाणा झाला. त्याने पिछाडीला असलेल्या आसदखानाला आपल्याजवळ आणले व पिछाडीवर हमीदुद्दीनखानाची नेमणूक केली. आसदखान हा वजीरे आलम व मदारुल महाम म्हणजे राज्याचा आधारस्तंभ होता. राणोजी घोरपड्याच्या तलवारीखाली किंवा बंदुकीने हा आधारस्तंभ कोसळला तर भलतीच पंचाईत व्हायची. सहा डिसेंबरला औरंगजेब मलकापुरापासून दीड कोसावर असलेल्या दुर्दान गावी पोचला. तेथे त्याला शुभवार्ता कळली की ताराबाई विशाळगड सोडून सिंहगडाकडे चालती झाली. सात डिसेंबर रोजी दुर्दानहून पुढे निघून औरंगजेब सव्वादोन कोसांवर असलेल्या मौजे येलबारा ऊर्फ येळवण जुगाई येथे पोचला. येथून विशाळगड सात मैलांवर आहे. जवळच पांढरपाणी आणि बाजीप्रभूची पावन खिंड आहे. येथे औरंगजेबाने आपली छावणी ठोकली. या जागेला 'बादशहाचा माळ' म्हणतात. विशाळगडावर पळणाऱ्या शिवाजी महाराजांना पकडू पाहणाऱ्या सीदी जोहरचा जाबई सीदी मसूद याची बाजी प्रभूने नाकेबंदी केली व त्याचा रोरावणारा सेनेचा लोट अडवून धरला, त्या विख्यातकीर्ति पावनखिंडीत विशाळगड कवळू पाहणाऱ्या

औरंगजेबाला मुक्काम करण्याची बुद्धि व्हावी या ऐतिहासिक योगायोगाचे नवल वाटल्याशिवाय राहात नाही.

या पावनखिंडीत बसून औरंगजेब विशाळगडच्या वेढ्यावर लक्ष ठेवीत होता. २६ डिसेंबर रोजी त्यानें आसदखान, फतेउल्लाखान, हमीदुद्दीनखान आणि मुनीमखान यांना किल्ल्याला वेढा घालण्यास पाठविले. त्यांनी मोर्चे कायम केले, टेकड्या काबीज केल्या आणि त्यांच्यावर तोफा चढविल्या. हे काम करताना त्यांना तसूतसू जमीन मराठ्यांशी प्राणपणाने झगडा करून कबजात आणावी लागली. कारण एकवार फतेउल्लाखान मोर्चे कायम करून बादशहाकडे गेला असता मराठ्यांनी मागे ते परत काबीज केले होते. त्यामुळे फतेउल्लाखानाला कामाला सुरुवातीपासून सुरुवात करावी लागली. तो व आसदखान मोर्चे पाहण्यास गेले असता मराठ्यांनी किल्ल्याबाहेर पडून त्यांच्यावर हल्ला चढविला. निकराच्या चकमकीनंतर मराठे किल्ल्यात परत गेले व डोंगराच्या आड दडून आणि झाडाझुडपांच्या आसऱ्याने मराठे फतेउल्लाखानावर दगडांचा व गोळ्यांचा वर्षाव करू लागले. पण फतेउल्लाखान डरला नाही. तो जितका शूर तितकाच क्रूर होता. त्यांनी अगदी निर्दयपणाने मराठ्यांना भरडून काढले. अनेकांना लढाईत मारले. कित्येकजण पळताना कड्यावरून पडून मेले. उरलेले कैद झाले ते सर्वांत दुर्दैवी. फतेउल्लाखान मेलेल्या मराठ्यांची डोकी पेंढ्याने भरून काढी, व कैद केलेल्या मराठ्यांच्या गळ्यांत ती फळाप्रमाण लटकवी; आणि त्यांच्या कंबरेला धोंडे बांधून त्यांचा कडेलोट करी. फतेउल्लाखानाचे पोवाडे गाताना खाफीखान गर्वाने म्हणतो—"त्या दुष्टांना फतेउल्लाखानाच्या नावानेच धडकी भरे त्याने कायम केलेल्या मोर्च्यांवर हल्ला करण्याची त्यांना हिंमत होईना. फतेउल्लाखानाच्या नावाने ते झोपेतून दचकून उठत."

औरंगजेबाला जेव्हा फतेउल्लाखानाच्या कामगिरीची हकीकत कळली, तेव्हा खूष होऊन त्याने त्याच्या मनसबीत दोनशेची वाढ केली. त्याला ध्वज दिला. एक रत्नजडित खंजीर दिला. त्याच्या विनंतीवरून त्याच्या जमातीच्या मनसबदारांनाही मनसबीत बढती दिली. इतरांच्याही कामगिरीचे कौतुक करण्यात आले. त्यानंतर फतेउल्लाखानाने सुरक्षित आणि बंदिस्त असा बोळ जमिनीखालून किल्ल्याच्या आतपर्यंत तयार करीत नेला तो इतका सुरेख झाला की जमिनीखालची ती एक आकर्षक इमारतच वाटावी. त्यात ठिकठिकाणी वारा येण्याकरिता गवाक्षे तयार करण्यात आली होती. त्यातून घोडेसुद्धा जाऊ शकत. त्यात ठिकठिकाणी माऱ्याच्या जागा तयार करण्यात आल्या. औरंगजेबाला हे कळल्यावर तो जातीने स्वार होऊन ते भुयार व मोर्चे पहाण्यास आला व त्याने फतेउल्लाखानाचे मुक्तकंठाने कौतुक केले. त्याला असे वाटले की आपण अधिक जवळ मुक्काम केला तर सैन्याला उत्तेजन मिळेल व काम लवकर पार पडेल म्हणून त्याने पांढरपाण्या-

जवळचा आपला मुक्काम उठविला आणि किल्ल्यापासून अर्ध्या कोसावर गोणीमूठ येथे छावणी देण्याचे ठरविले.

"राजा बोले आणि दळ हाले!" पांढरपाणी ते गोणीमू हा प्रवास फक्त सात मैलांचा होता. वाटेत दरी ओलांडायची होती. या सात मैलांच्या प्रवासाला औरंगजेबाच्या सैन्याला दहा दिवस लागले. शेकडो माणसे मरण पावली, चिंचोळ्या दरीत चेंगराचेंगरी व रेटारेटी इतकी झाली की त्या चेंगराचेंगरीतच अनेक दगावले. त्यात दुर्गम प्रवासाने गांजलेल्या बिचाऱ्या मोगलांवर दुष्ट मराठे घारीप्रमाणे घिरट्या घालून हल्ले चढवीत होते. ते त्यांना ठार मारीत व त्यांची शस्त्रास्त्रे लुटून नेत. पिछाडीची पथके व प्रचंड साधनसामग्री मागे राहिली होती ती मोठ्या कष्टाने काही दिवसांनी तळावर पोचली. त्याही वेळी निम्मी सामग्री नष्ट झाली. नवीन व जुने तंबू तळावर शेकडो होते, पण ते आणायला वाहने नव्हती व मराठ्यांचे हल्ले होत होते. तेव्हा ते मराठ्यांच्या हाती पडू नयेत या हेतूने मोगलांनी त्या तंबूंना आग लावून दिली. अशी 'दिवाळी' करून बादशाही सैन्य किल्ल्यापासून अर्ध्या कोसावर एकदाचे कसेबसे पोचले. बिचारा खाफीखान रंजीस होऊन म्हणतो, "जे झाले ते झाले व जे हाल भोगायचे ते भोगून झाले."– "आंचे गुजिश्त गुजिश्त व आंचे कशीदद कशीदद!" याला म्हणावे राजहट्ट.

गोणीमूठला आल्यानंतर औरंगजेबाने प्रथम विशाळगडाकडे येणारे सर्व मार्ग ताब्यात घेऊन मराठ्यांची नाकेबंदी करण्याचा उपक्रम हाती घेतला. मराठे पन्हाळ्यापर्यंत पसरले होते, तिकडून विशाळगडास रसद पोचू नये यासाठी त्या भागाचा बंदोबस्त करण्याचे काम शहाजादा बेदारबख्त याच्याकडे सोपविण्यात आले. अंबाघाटाच्या तोंडाशी तरबियतखानाला बसविण्यात आले. विशाळगडच्या पश्चिमेला असलेल्या कोकणी दरवाजावर महंमद अमीनखानाची नेमणूक केली. त्याने कोकणात उतरून गावे व वाड्या जाळून उद्ध्वस्त केली आणि कोकणी दरवाजाकडची वाट बंद केली. त्याचप्रमाणे तरबियतखानाने अंबाघाटात मराठ्यांना मारण्यात म्हणजे 'काफरकुशी' करण्यात बिलकुल कसुर केली नाही. पूर्वेकडच्या दरवाजावर रेवणी बुरुज ताब्यात आणण्यासाठी प्रतापी योद्धा फतेउल्लाखान प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होता. किल्ल्याच्या दरवाजापासून रेवणीच्या बुरुजापर्यंत मराठ्यांनी गुप्त रस्ता तयार केला होता. या वाटेने ते बुरुजावर येत व मोगलांचा प्रतिकार करीत. फतेउल्लाखानाने एक बोळ तयार करून या रेवणीच्या बुरुजाच्या मागे असलेल्या खंदकापर्यंत तो तयार करीत नेला. त्या भुयारातून मोगलांनी शिड्या वर चढविल्या व तटाच्या भिंतीखालपर्यंत त्या आणल्या होत्या. त्या मराठ्यांनी उद्ध्वस्त केल्या. तेव्हा फतेउल्लाखानाने उंटाच्या हौद्यांच्या– त्यांना 'कजावे' म्हणत– शिड्या तयार केल्या. कजाव्यावर लाकडी फळ्या घालायच्या व दोरीने त्या वर चढवायच्या.

मोगल अशा प्रकारे प्रयत्नांची शर्थ करीत असता मराठेही प्रतिकाराची पराकाष्ठा करीत होते. रात्री अपरात्री ते फतेउल्लाखानाच्या मोर्चावर हल्ले चढवीत व वेलाशक मोगलांना कापून काढीत. फतेउल्लाखानाला हे कळल्यावर तो वाघासारखा त्यांच्यावर धावून गेला तेव्हा मराठे किल्ल्यात पळून गेले. खाली फतेउल्लाखानाची माणसे कजावे ठोकण्याची, ते वर चढविण्याची, दगड मातीच्या टोपल्या वर वाहून नेण्याची कामे करीत तेव्हा मराठे वरून बंदुकांचा भडिमार करीत. पण फतेउल्लाखान खरोखरच जिवावर उदार झाला होता यात शंका नाही. त्याने पैशाकडेही पाहिले नाही व प्राणाकडेही पाहिले नाही. ज्या ठिकाणी मजुरी म्हणून कवड्या द्यावयाच्या तेथे त्याने सोन्याची नाणी दिली आणि कामकऱ्यांचे नीतिधैर्य शाबूद राहावे म्हणून स्वतः तो हातात कुदळ फावडे घेऊन त्यांच्या बरोबरीनें काम करू लागत असे. त्याला जिवाची बिलकुल फिकीर नसे की मराठे वरून 'मतवाले' फेकीत आहेत, आपले कसे होईल. 'मतवाला' या गोड नावावरून गैरसमज होऊ नये, 'मतवाला' म्हणजे दगडाचा प्रचंड गोळा असे. एकेक दगडाचे वजन किमान शंभर ते दोनशे मण असे. तो एकदा कपाळात बसला म्हणजे संसारापासून मुक्त होऊन जीव मोक्षपदवीस पात्र होई.

एकदा असेच झाले. कजावा व इतर सामान दोराने बांधून डोंगरावर चढविण्याचे काम चालू होते. सामानाने भरलेला लाकडाचा प्रचंड फळा दोरीच्या साहाय्याने वर चढविण्यात येत होता. फतेउल्लाखान फळ्याच्या लाकडी बैठकीला धरून उभा होता. इतक्यात मराठ्यांनी वरून सोडलेला एक प्रचंड 'मतवाला' गडगडत खाली आला व त्या फळ्यावर आदळला. फळ्याचा चुराडा उडाला हे सांगणे नकोच. पण त्याचा तुकडा फतेउल्लाखानावर येऊन आदळला. त्याच्या डोक्याला व पायाला भयंकर मार बसला. कजाव्यासकट तो खाली दरीत गडगडत गेला. तो खरा मरायचाच पण त्याचे नशीब शिकंदर म्हणून तो कजावा गडगडत एका प्रचंड वृक्षाला अडकून राहिला. फतेउल्लाखानाने त्या कजाव्याला घट्ट धरून ठेवले होते. तो दरीत कोसळल्यावर सैन्यात हाहाकार उडाला व लोक धावत आले. त्यांनी त्याला वर काढले. त्याच्या डोक्याला व कमरेला इतका जबर मार बसला होता की पुढे महिनाभर तो अंथरुणाला खिळून होता. औरंगजेबाने आपल्या जवळची खास औषधे त्याला दिली. तो बरा झाल्यावर मुजरा करण्यासाठी आला तेव्हा औरंगजेबाने त्याची स्तुति केली व त्याला जडावाचा शिरपेच बक्षीस देऊन म्हटले, "तुझ्यामुळे तुराण्याची अब्रू राहिली." इतकी औरंगजेबाची त्याच्यावर मर्जी.

फतेउल्लाखान दरीत कोसळला या गोष्टीने मराठ्यांना आनंद झाला तर ते समजू शकते, पण फतेउल्लाखानाच्या सहकाऱ्यांनाही त्यामुळे आनंद वाटावा हे जरा अजब वाटते. पण पुष्कळ वेळा सत्य हे कादंबरीपेक्षाही चमत्कारिक असते

असे म्हणतात ते खरे आहे. फतेउल्लाखान कर्तृत्ववान् होता व त्याला आपल्या कर्तबगारीची मोठी घमेंड होती हे खरे आहे. पण त्याच्या कर्तेपणामुळेच नाकर्त्या माणसांची मोठी पंचाईत होई. इराणी व तुराणी त्याचा मत्सर करीत. त्याला जयाचे श्रेय मिळू नये अशी इतर सरदारांची इच्छा असे. त्याच्या कामगिरीचा उल्लेख कटाक्षाने गाळण्यात येत असे. अनुल्लेखाने मारण्याची कला ही अशा प्रकारे बरीच ऐतिहासिक दिसते. परस्परांचा मत्सर हा औरंगजेबाच्या सैन्यात पूर्वापार चालतच आलेला होता. संभाजीवर जय मिळवणारा मुकर्रबखान जेव्हा बादशहाच्या कृपेस पात्र झाला, तेव्हा अनेक बड्या अमीरांचा असाच पोटशूळ उठला होता. पन्हाळ्याच्या वेढ्यात महंमद मुरादखानाने मोक्याची जागा काबीज केली, तेव्हा तरबियतखानाच्या गटातल्या रुहुल्लाखान आणि हमीदुद्दीनखान यांच्यासारख्या उमद्या अमीरांनी लगबगीने त्याचे पाय खेचून त्याला खाली ओढले. पण या बाबतीत केवळ मोगलांना नावे ठेवणे बरोबर नाही. शिवाजी महाराजांच्या सैन्यातही मोरोपंत पिंगळे व अण्णाजी दत्तो या ब्राह्मण प्रधानांचे एकमेकांशी व दोघांचे मिळून बाळाजी आवजी या प्रभु चिटणिसाशी हाडवैर होते. हीच परंपरा धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांनीही पुढे चालविली. म्हणजे 'बोद्धारो मत्सरग्रस्ताः' या प्रकारचा हा मनुष्यस्वभावच दिसतो. अशा विघ्नसंतोषी मंडळींना फतेउल्लाखान बहादूर हे दरीत कोसळले, व त्यांचे टाळके व कंबरडे यथास्थित शेकून निघाले या बातमीने अस्मान ठेंगणे झाल्यासारखे वाटावे हे साहजिकच होते.

पूर्वेकडच्या कामाचा असा प्रकार झाला. पश्चिमेकडे मात्र महंमद अमीनखानाने कोकणी दरवाजाजवळची मराठ्यांच्या ताब्यात असलेली टेकडी ४ मार्च रोजी काबीज केली. पण तो आजारी पडला तेव्हा औरंगजेबाने पन्हाळ्याहून बेदारबख्ताला बोलावून घेतले व त्याची महंमद अमीनखानाच्या जागी नेमणूक केली. वेढा घालून चार महिने झाले. पण किल्ला सर होण्याचे लक्षण दिसेना. 'शेरदहन' आणि 'कडक बिजली' या मोगलांच्या तोफांच्या भडिमाराने डोंगराचा पाया हादरला असता, पण बुरुजाचे काही दगड ढासळण्यापलीकडे त्यांचा काही परिणाम होईना. उलट अहोरात्र मराठ्यांचा किल्ल्यावरून बंदुकी, तोफा, मतवाले यांचा मारा चालू होता. मराठ्यांच्या प्रतिकाराचे क्षेत्र केवळ विशाळगडापुरते मर्यादित नव्हते. राणोजी घोरपडे याने कऱ्हाडपासून मलकापुरपर्यंत धामधूम माजवून बादशहाची रसद तोडली होती. ३१ डिसेंबर रोजी त्याने साताऱ्यावर हल्ला चढविला. सीदी याकूतखानाने दोन हजार पायदळ वेढ्याचे सामान देऊन बादशहाच्या मदतीसाठी पाठविले होते. त्याला पायबंद घालावा म्हणून धनाजी जाधव व रामचंद्रपंत अमात्य कोकणात उतरले होते. सीदीला स्वतःचाच बचाव करण्याची भ्रांत पडलेली, त्यात तो बादशहाला मदत कसली करतो ! या सर्व

कारणांमुळे विशाळगडापुढे बसून राहिलेल्या औरंगजेबाची मोठी केविलवाणी परिस्थिति झाली होती. त्याच्या छावणीत धान्य महाग झाले होते. सैनिकांची पगारबाकी प्रचंड थकली होती. एकदा सावकाराकडून पांच लाख रुपये कर्ज काढावे असा त्याला सल्ला देण्यात आला. हे सावकारांना कळल्यावर "आपणावर जबरदस्ती झाली तर आपण छावणी सोडून जाऊ" अशी सावकारांनी धमकी दिली. तेव्हा बादशहा नरम आला, व उत्तरेकडून खजिना येईल तेव्हा पगारवाटप करायचे असे त्याने ठरविले. विशाळगडापुढेच तो या निरनिराळ्या कटकटीमुळ इतका गुंतून पडला होता की, मनात असूनही त्याला दुसरे काही करता येत नव्हते. नाहीतर विशाळगडाहून प्रतापगड दूर नव्हता. त्याने केव्हाच ताराबाईला व शिवाजीला कैद केले असते. पण विशाळगडाला ताराबाई म्हणते त्याप्रमाणे तो 'बिलगला' होता, त्या मिठीतून तो सुटणार तेव्हाच्या या गोष्टी!

त्याची अशीच स्थिति व्हावी अशी ताराबाईची इच्छा होती. या सुमारास प्रतापराव मोरे याला तिने एक पत्र लिहिले आहे. त्यात ती म्हणते, "स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २८ वृषभनाम संवत्सरे भृगुवासरे श्रीराजा शिवछत्रपति यांणी राजमान्य राजश्री प्रतापराव मोरे यासी आज्ञा केली ऐसी जे तुम्ही व राजश्री संताजी पांढरे फौजेनशी मलकापुरानजीक औरंगजेबाची चौकी होती ते मारली हे वर्तमान कळल्यावरी स्वामीने तुम्हास आज्ञापत्रे पाठविली आहेत. ती पाऊन वर्तमान कळले. औरंगजेब विशाळगडास बिलगला याजकरिता त्याचे कबिलाबाड मारून हमेशा गोटावर हल्ले करावे तरीच तो बलकुबल (धास्तावून) राहतो. याजकरिता तुम्ही लोक आपले अवघे एकदिल होऊन औरंगजेबास जडून राहणे. तुम्ही स्वामींचे एकनिष्ठ सेवक मायेचे विश्वासू आहा. तरीच या प्रसंगी साहस करून मुख्य शत्रूच्या मुकाबल्यास आलेत ये गोष्टीने औरंगजेब दिक होऊन थोरच कार्य होऊं आले. प्रस्तुत स्वामीचा मुक्काम किले प्रतापगडी जाला आहे. बलकुबलीच्या प्रसंगास स्वामींचे तोलदार फौज असली पाहिजे. औरंगजेब गनीम दगेखोर आहे. कोणे समयी काय विचार करील तोही काही कळत नाही. त्यास तुम्ही बळकट फौजेनिशी या तोंडे राहीस तरी त्याचे वस्तु चळवळ करवत नाही. आजींचे प्रसंगी भरंवसा तुम्हा लोकांचा आहे. ये गोष्टीचे अगत्य धरून फौजेनसी या तोंडे राहोन औरंगजेबाचा कबिलाबाड मारून हैराण करणे. तो विशाळगडचा ख्याल सोडी, तुम्हा लोकांच्या कीर्ति होऊन स्वामी समाधान पावेत ऐसी गोष्टी करणे. दूर प्रांते स्वारीस जाल तर हे तोंड सहजच मोकळें जाईल. म्हणजे औरंगजेब येखादी फौज या तोंडे पाठवावयास उशीर लावणार नाही. समयी स्वामी समीप यावया तुम्हास यावया गाठ पडणार नाही. याकरिता औरंगजेबास सोडून दुसरे (कडे) सर्वथा नच जाणे. समीपच राहोन स्वामी खुशाल या जागां रहात ते करणे. राज्य राखणे, तुमचे सेवेचा मजरा होय असी गोष्टी करणे. जाणीजे. बहुत काय लिहिणे."

अखेर २७ एप्रिल १७०२ रोजी औरंगजेबाच्या हुकुमावरून शहाजादा बेदारबख्त व राजा सवाई जयसिंग यांनी रेवणीच्या बुरुजावर हल्ला चढविला. किल्ल्यावरून दगडांचा व गोळ्यांचा वर्षाव होत होता. रजपूत व मोगल फार मारले गेले. पण अखेर बुरुज काबीज करण्यात मोगलांना यश आले. रेवणीचा बुरुज हा किल्ल्याच्या दरवाजाचा संरक्षक बुरुज होता. याच्यावर येऊनच मराठे मोगलांवर आगीची बरसात करीत. तो हाती आला म्हणजे किल्लाच हातात आल्यासारखे मोगलांना वाटले. त्यांनी बादशहाला आता किल्ला फत्ते होणार अशी शुभ सूचना देऊन मुजरे केले.

पण बादशहाला मुजरे करण्याइतके किल्ला सर करणे सोपे नव्हते हे त्यांना लवकरच कळून आले. रेवणीचा बुरुज काबीज करून महिना उलटला पण किल्ला पडण्याचे लक्षण दिसेना. औरंगजेबाने आज्ञा केली की शेरदहन, कडकबिजली इत्यादि लहानमोठ्या तोफा बुरुजाच्या आत न्याव्या व त्यांचा भडिमार करून किल्ल्याचा दरवाजा तोडून टाकावा. पण एवढ्यात घाटमाथ्यावरच्या त्या दुष्ट पावसाळ्याला सुरुवात झाली. कोकणपट्टीतील तो अकाळविकाळ पाऊस विशाळगडच्या माथ्यावर व मोगलांच्या डोक्यावर जेव्हा धो धो कोसळू लागला तेव्हा त्यांची पाचावर धारण बसली. एकीकडून मराठे आणि दुसरीकडून पाऊस यांच्या कात्रीत सापडल्यानंतर आपली गठडी कशी नामी वळते याचा त्यांना पूर्वी अनुभव आलेला होताच. तेव्हा काय वाटेल ते करून किल्ला लवकरात लवकर पदरात पाडून घ्यावा आणि या सैतानी मुलखांतून आपला पाय काढून घ्यावा यासाठी ते अगदी घायकुतीला आले. काय वाटेल ते करायचे म्हणजे अर्थातच किल्लेदाराला पैसा चारायचा. कारण मोगलांचा दंडप्रयोग आता संपल्यातच जमा होता. फक्त दामप्रयोग म्हणजे दिडक्या मोजण्याचा प्रयोग त्यांच्या हातांत होता. याही बाबतीत जास्तीत जास्त पैसे चारून सर्वांच्या आधी किल्ल्यात प्रवेश करण्याचे आणि किल्ला सर करण्याचे श्रेय कोण पटकावतो या बाबतीत त्यांच्यात चढाओढ सुरू झाली. फतेउल्लाखानाने आपणास सर्वांत आधी प्रवेश मिळावा म्हणून फार धडपड केली. पण इतर सर्व बाबतीप्रमाणे याही बाबतीत बिचाऱ्याला अपयश आले. बेदारबख्ताच्या बाजूने बोलणी करणारे रुहुल्लाखान व फजायुलखान यांनी किल्ल्यात प्रवेश मिळण्याच्या बाबतीत, "पळा पळा कोण पुढे पळे तो" अशी जी शर्यत चालली होती त्यात फतेउल्लाखानावर आघाडी मारली.

किल्लेदार परशुराम त्र्यंबक हा पक्का बिलंदर माणूस होता असे म्हटले पाहिजे. किल्ला घेण्याची मोगलांना घाई असली, तरी किल्ला देण्याची त्याला कसलीच घाई नव्हती. पावसाळा सुरू झाला म्हणजे मोगल आपल्या गच्च वया करतील हे तो समजून होता. तोही पावसाचीच वाट पहात होता आणि ताणता येईल तेवढे ताणून आपला भाव वाढवून घेत होता. कारण मोगलांनी वेढा घातला व

पावसाने त्यांना गाठले म्हणजे पावसाने धान्यापेक्षाही पैशाचे वेडे पीक येते हे त्याला माहीत झाले होते. रुहुल्लाखान व फजायुलखान यांच्या विनवण्याकडे प्रथम त्याने लक्षच दिले नाही. अखेर जेव्हा त्याच्या ७टी मान्य करणारे बादशहाचे स्वदस्तूरचे पत्र त्याला त्यांनी आणून दिले व वरती नगद दोन लाख रुपयांची दक्षिणा त्याच्या उपरण्यात ओतली, तेव्हा त्याच्या फत्तरासारख्या काळजाला पाझर फुटला आणि ४ जून १७०२ रोजी स्वतःच्या हाताने त्याने शहाजादा बेदारबख्त आणि रुहुल्लाखान यांची निशाणे किल्ल्यावर लावली. त्याही वेळी मोगल सेनेपैकी कोणीही तेथे हजर असता कामा नये अशी अट घालून त्याने आपल्या मनाचा खत्रूडपणा प्रकट केलाच. मोगलांनी तीही अट कबूल केली. करता काय. 'सुसरीबाई, तुझी पाठ मऊ !"

निशाणे लावली तेव्हा नगारे नौबतींचा मोठाच गजर झाला. त्या वेळी बादशहा सलामत कुराण पठण करीत बसले होते. नगाऱ्यांचा आवाज ऐकताना त्यांच्या नजरेला 'सरवरलना हा शब्द पडला. त्यांनी तेच नांव खेळण्याच्या किल्ल्याला देऊन टाकले व त्याला पावन करून घेतले 'सरवरलना' म्हणजे "धन्य परमेश्वराची. त्याने हा जय मिळवून दिला."

औरंगजेबाची कल्पना होती, त्यापेक्षा फार निराळ्या अर्थाने विशाळगडचे 'सरवरलना' हे नाव खरे होते. कारण केवळ शौर्याच्याच दृष्टीने पाहावयाचे तर विशाळगडापुढे मोगलांनी हात टेकले होते. ही ईश्वराचीच कृपा की त्याने परशुराम त्र्यंबकाला पैसे घेऊन का होईना, किल्ला मोगलांना देण्याची बुद्धि दिली. परशुराम त्र्यंबकाच्या अटींना मान्यता देणारे जे पत्र औरंगजेबाने लिहिले आहे, ते वाचले म्हणजे हसावे की रडावे हे कळत नाही. ही मराठ्यांपुढे औरंगजेबाने लिहून दिलेली शरणचिठ्ठी की मराठ्यांच्या गनिमी काव्याला दिलेले गनिमी काव्याचे मुत्सद्दी उत्तर याचा निर्णय करणे खरोखर दुर्घट आहे. पण एकवीस वर्षांपूर्वी अजमीरहून दक्षिण दिग्विजयासाठी वाजतगाजत निघालेल्या, व वसंतगडला वेढा देताना, "उद्या मी स्वार होऊन किल्ल्यावर हल्ला करीन व काफरवधाचा ध्वज उभा करीन" अशी घोर प्रतिज्ञा करणाऱ्या औरंगजेबासारख्या जिद्दी माणसावर अशा प्रकारचा डावपेच म्हणून का होईना, 'कबुलायत नामा' शत्रूला लिहून देण्याची वेळ यावी, यावरून तो किती जेरीला आला होता हे उत्तम समजते. परशुराम त्र्यंबकाला, लिहिलेल्या पत्रात औरंगजेब म्हणतो– "परशराम याने जाणावे की, तुम्ही आमचे इतके अपराध केले आहेत की त्यांना क्षमा नाही. पण शहाजादा बेदारबख्त याच्या लिहिण्यावरून समजले की तुम्हांला आपल्या कृतकर्माचा पश्चात्ताप झाला आहे. पुढील अटींवर तुम्ही खेळण्याचा किल्ला देण्यास तयार आहात. मोगल सैन्य यापुढे मराठ्यांचे किल्ले न घेता आपल्या मुलुखाकडे परत जाईल; तुम्ही आणि तुमचे सहकारी यांचे अपराध माफ करून त्यांना जीवदान देण्यात यावे.

शहाजाद्यापाशी तुम्ही जी विनंती केली ती मान्य करण्यात येत आहे. शहाजाद्याच्या लिहिण्यावरून आज्ञा करण्यात येत आहे ती अशी : तुम्ही शहाजाद्याना भेटावे आणि खेळण्याचा किल्ला ताब्यात द्यावा. नंतर तुमचे अपराध माफ करण्यात येऊन तुम्हांला आणि तुमच्या सहकाऱ्यांना जीवदान देण्यात येईल. आमची सैन्ये तुमचा मुलुख आणि किल्ले जिकून घेण्यासाठी पुढे चाल करून जाणार नाहीत. उलट ती आपल्या मुलुखाकडे परत जातील."

बिचाऱ्या औरंगजेबाने असले पत्र उभ्या जन्मात कोणाला तरी लिहून दिले असेल काय ?

इतिहासाची पुनरावृत्ति होते असे म्हणतात ते काही खोटे नाही. औरंगजेबापूर्वी अडीचशे वर्षे महमूद गावानने बहमनी सुलतानाच्या तर्फे या प्रदेशात स्वारी केली होती. त्याला रांगणा म्हणजे पन्हाळगड आणि खेळणा म्हणजे विशाळगड घेताना औरंगजेबासारखाच अनुभव आला. या मोहिमेतून लिहिलेल्या पत्रात तो म्हणतो — "केवळ शौर्याने आपण हा भाग जिंकून घेऊ हा विचार व्यर्थ आहे. संपत्ति मुबलकपणे खर्च करणे हाही उपाय अमलात आला पाहिजे. रांगण्याचा किल्ला फत्ते करण्यात आम्हांला या दोन्ही गोष्टींचा उपयोग करावा लागला.…खेळण्याचा किल्ला हस्तगत होईल अशी आशा आहे. नुसत्या शौर्याने लढून किल्ला घेणे कठीण आहे. त्याला दृढनिश्चय व सहनशीलता यांची आवश्यकता आहे. खेळण्याच्या बाबतीत मी असे केले आहे की जाखूराय व त्याचे सरदार यांना भक्कम देणग्या देऊन व गोड गोष्टी बोलून वश करून घेतले आहे. ते अगदी नरम पडले आहेत." गावानच्या वेळेस जाखूराय होता, औरंगजेबाच्या वेळेस परशुराम त्र्यंबक होता. बाकी परिस्थिति तीच.

किल्ला सर झाल्यानंतर विजयी वीरांना पारितोषिक-वितरण समारंभ साजरा करण्यात आला. बेदारबख्तला एक लाख रुपये देण्यात आले. रुहुल्लाखान, हमीदुद्दीनखान व मुनीमखान यांच्या मनसबीत वाढ करण्यात आली. फतेउल्लाखानाला जडावाचे अलंकार व आलमगीरशाही ही पदवी अर्पण करण्यात आली. पण फतेउल्लाखानाला त्या मानसन्मानात आता काही चव उरली नव्हती. घाटात रस्ता तयार करण्यात, भुयारे खणण्यात, कजावे चढविण्यात, मराठ्यांना मारण्यात ज्याने जिवापाड मेहेनत केली होती. दरीत कोसळून तो जायबंदी झाला होता. ती सारी मेहेनत मातीमोल झाली. किल्ला घेण्याचे श्रेय त्याला मिळाले नाही त्या वेळी भलते सलते पुढे सरकले व खरे मागे पडले. बादशहाच्या पदरी मुंगी होऊन साखर खाणारी जी मंडळी होती, त्यांनी या हत्ती होऊन लाकडे फोडू पाहणाऱ्या फतेउल्लाखानावर मात केली. तो बिचारा दिलगीर झाला आणि बादशहाला विनंती करून त्याने आपली बदली पार काबुलात करवून घेतली. अशा

प्रकारे समरांगणावर तळपणारा हा बहादूर योद्धा बादशाही उमरावांच्या कारस्थानात कामी आला.

बादशहाचे निशाण किल्ल्यावर लावल्यावर, दोन लाख रुपये कनवटीला लावून ७ जूनच्या अंधाऱ्या रात्री त्या दुष्ट परशुराम त्र्यंबकाने आपल्या जमातीसह तोंड काळे केल्यानंतर दहा जून रोजी फतेउल्लाखानाने तयार केलेल्या मोर्च्याच्या वाटेने बादशहाची स्वारी किल्ला पाहण्यास गेली. त्या प्रदेशाची साकी मुस्तैदखानाने मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. "या प्रदेशाची व येथील डोंगराची जितकी स्तुति करावी तितकी थोडीच आहे. जिकडे दृष्टि पडावी तिकडे हिरवी राने व फुलझाडे यांशिवाय काही दिसत नाही. ज्यातून काही ना काही लाभ होत नाही असे एक झाड येथे आढळणार नाही. ज्याच्या सुगंधाने मेंदू तर्र होणार नाही असे एकही फूल येथे आढळत नाही. या भागातील एकेका बीजांतून उत्पन्न होणाऱ्या धान्यांनी आणि फळाफुलांनी अनेक देशांतून व शहरांतून वसूल होणार नाही इतकी संपत्ति लाभते. या देशातील कणन् कण आकर्षक आणि रमणीय आहे." पण पाऊस अगदी पिसाळला होता. त्यामुळें त्या आकर्षक आणि रमणीय सृष्टि सौंदर्याचा आस्वाद घेण्यास बादशहांना फुरसद झाली नाही. त्यांनी त्याच दिवशी विशाळगड सोडला व परतीच्या प्रवासास सुरवात केली.

हा प्रवास फार कठीण होता. पाऊस मुसळधार कोसळत होता. थंडगार वारे अंगाला झोंबत होते. रस्त्यांत गुडघा गुडघा चिखल झाला होता. वाहतुकीच्या वाहनांचा पत्ता नव्हता. साकी मुस्तैदखान म्हणतो, त्याप्रमाणे लष्करातले बैल गुजराथेत व गाढव खुरासानात पळून गेले होते. ही हवा. उंटांना फार मारक त्यामुळे उंट फार मेले आणि हत्ती गाढवाप्रमाणे चिखलात रुतून बसले. मजुरांना शक्य तेवढे सामान आपल्या डोक्यावर वाहून न्यावे लागले. पण माणूस वाहून वाहून सामान किती वाहणार? १० जून रोजी विशाळगडाहून निघून औरंगजेब सव्वातीन कोसावर असलेल्या अंबाघाट येथे आला. पावसामुळे त्याला सहा दिवस तेथे मुक्काम करावा लागला. १६ जून रोजी त्याने आणखी दीड कोसांची मजल मारली. येथे एक ओढा पुराने अक्काळविक्राळ होऊन धावत होता. औरंगजेबाने ओढा तर ओलांडला पण बाकीचे सैन्य दुसऱ्या तीरावर अडकून पडले. सैन्याला येथे बराच काळ मुक्काम करावा लागला. "पावसामुळे कामकाज झाले नाही मागे राहिलेले तंबू अद्याप आले नाहीत" अशा प्रकारच्या रडकथा बादशाही अखबारात आढळतात. हमीदुद्दीनखान यानें बादशहाला सांगितले की बारबरदारी (वाहून नेण्याची साधनें) नसल्यामुळे छावणीचा सरंजाम मागच्या मजलेवर पडून आहे. हत्ती पाठवून सामान आणवून द्या अशी बादशहाने आज्ञा केली.

तो ओढा ओलांडताना मोगलांचे फार हाल झाले. औरंगजेबाने आज्ञा केली की लष्करातील बायकामाणसे व सामान यांना प्रथम अमीरउमरावांच्या व सरकारी

हत्तीवरून पार करावे. पण त्या धामधुमीत त्याच्या हुकमाला विचारतो कोण ? हत्तीच्या माहुतांना ही पैसे मिळविण्याची पर्वणी आली होती. त्या बायका मांडी-पर्यंत चिखलात अडकलेल्या असत. त्या काकुळतीला येऊन हत्तीच्या "माहुतांना आपल्याला ओढ्याच्या पार नेण्याची विनंती करीत. रुपयाच्या ऐवजी अश्रफ्या देत, नव्हे अंगावरचे दागिने देत." अशी समर्थांच्या कांतांची विटंबना झाली. तरी औरंगजेबानें बायकांना स्वारीत घेऊ नये अशी बेगमपूरहून निघतानाच कडक ताकीद दिली होती. पण त्याच्या रसिक शिपायांनी आपल्या अरसिक धन्याचा हुकूम धाब्यावर बसविला होता. या बाबतीत शिवाजी जास्त शहाणा होता असे म्हटले पाहिजे.

ओढा पार केला तरी या काठावरच्या चिखलातून त्या काठावरच्या चिखलात उतरण्यापलीकडे फारसा फरक होत नसे. कारण आधी तंबू कोणाजवळ फारसे नव्हतेच व होते त्यांना ते ठोकायला तसूभर कोरडी जागा नव्हती. खाण्यापिण्याचे जिन्नस तर नावालाही सापडेनात. या हालअपेष्टातून भलेभलेही सुटले नाहीत. जुम्दुतुल्मुल्क, मदारुलमहा, आसदखान यांच्याजवळ एक लहानशी राहुटी होती. कोरडी जमीन सापडेना तेव्हा नाईलाजाने चिखलातच त्यांनी आपला तंबू दिला. मेखा नीट ठोकल्या नव्हत्या. रात्री जोराचा पाऊस सुरू झाला. दोनदा राहुटी आसदखानाच्या डोक्यावर आदळली. आधीच बिचाऱ्याच्या मस्तकावर राज्याचा भार. त्यात राहुटीचा भार पडला. करणार काय? रात्रभर त्याचे नोकर तंबूच्या तणावा धरून उभे होते. काही शिजवून खावे म्हटले तर धान्याचा कण शिल्लक नव्हता. त्याने सगळी रात्र उपाशीपोटी घालविली. ही स्थिति महामंत्र्यांची, मग बाकीच्या चिल्लरांना विचारतो कोण ?

प्रवास पुढे चालू झाला. औरंगजेब मलकापूरला पोचला. तेथे पुन्हा एक दुथडी भरून वाहणारा ओढा बादशहाला आडवा आला. ज्या त्या कमबख्त मराठी ओढ्याने स्वतःची मर्यादा सोडली होती, तो बादशहाची मर्यादा काय सांभाळणार? ओढ्याच्या काठी परत औरंगजेबाला अडकून पडावे लागले. अहोरात्र पाऊस पडतच होता. अनेक वेळा औरंगजेबाच्या निवासस्थानावर माणसे हजर नसत. २७ जूनचा अखबार म्हणतो – "काल रात्री बादशहांनी विचारले सरदारापैकी कोणी माझ्या निवासाभोवतालच्या पहाऱ्यावर आहेत की नाहीत ?" उत्तर मिळाले, "काही पहारेकरी सोडले तर कोणी नाही. मुख्य प्रधान आसदखान, बख्शी बहरा-मंदखान वगैरे प्रमुख सरदार ओढ्याकडे गेले आहेत. काही सरदार मागे राहिले आहेत." बादशहा चिडून म्हणाले, "आम्ही ओढ्याच्या या बाजूला तर आमचे सरदार त्या बाजूला. हा काय प्रकार आहे ? गुर्जबरदारांचा दारोगा सियादत-खान व हफ्त चौकीचा अधिकारी सय्यदखान यांना बोलवा. त्यांनी रात्रभर दिवाण खासच्या दालनात हजर राहिले पाहिजे. रुहुल्लाखान बख्शी खास

चौकीचा अधिकारी मुहंमद काजम यांना पहाऱ्यासाठी बोलवा. बेलदाराचा दारोगा याला सांगा की आमच्या निवासस्थानाभोवती खंदक खणण्यात यावा. तरबियत-खानाचा भाऊ कामयाबखान याने निवासाभोवती रात्री गस्त घालीत राहावे."

नदीचा पूर कमी होईना. महागाई भयंकर वाढली."छावणीत महागाई भयंकर. वस्तूही मिळेनात. धान्याचा भाव रुपायाला शेर दीडशेर व सरपण चार शेर अशी स्थिति झाली." धान्यही मिळत नव्हते व पगारही मिळत नव्हता. कारण पगार द्यायला बादशहापाशी पैसा होता कोठे? औरंगजेबाचा एक हत्ती तीन हजार अश्रफ्या घेऊन येत होता. ओढा ओलांडताना तो सारा खजिना पुराच्या पाण्यात पडला. तीन हजार अश्रफ्या म्हणजे जवळ जवळ एक लाख रुपये अक्षरशः पाण्यात गेले. पाणबुड्यांनी खूप बुड्या मारल्या पण हाती भोपळासुद्धा लागला नाही. मराठ्यांच्या धामधुमीमुळे आधी खजिना येत नव्हता आणि आला तर त्याची अशी वाट लागत होती. त्यामुळे एखाद्या गांजलेल्या नोकराकडून एखादी विचित्र विनंती ऐकण्याचा 'प्रसंग' खाविंदांवर कोसळे व त्यांची मोठी पंचाईत होऊन जाई. उदाहरणार्थ – "२९ जून : एका कर्मचाऱ्याने बादशहाला विनंती केली की मला उपास पडत आहेत. घरात एक माणूस मरून पडले आहे. पगार मिळत नाही. पाच महिन्यांचा पगार बाकी आहे, पगार मिळावा म्हणजे मुड्यासाठी कफनाची (प्रेत वस्त्राची) व्यवस्था करितो." विनंती ऐकून बादशहांनी त्याला बारा होन दिले.

बादशहाच्या निवासस्थानाभोवती गस्त घालण्याचे काम कामयाबखानाकडे होते. त्याने काम बरोबर केले नाही. "काल रात्री फकिरांनी बादशहाच्या निवासस्थाना-भोवती जमून दानधर्मासंबंधी (खैरात) मोठ्याने ओरडून मागणी केली." बाद-शहाच्या कानावर तो आवाज आला. बादशहा म्हणाले "कामयाबखान असली कसली गस्त घालीत आहे?" त्याची मनसब पन्नास स्वारांनी कमी करण्यात आली.

अखेर ब्रह्मपुरीच्या तळावरून मागविलेले हत्ती ओढ्याच्या पलीकडे आले आणि औरंगजेबाने हत्तीवरून ओढा पार केला. छावणीचे सर्व सामान ओढ्याच्या पली-कडे अस्ताव्यस्त पडले होते. त्यात बादशहाचे मेणे, पालख्या, तख्तेरवा ही सारी प्रवासाची वाहने होती. बादशहा हत्तीवरून उतरला व मेण्यात बसला. या प्रसंगी तो मरता मरता वाचला. "४ जुलै : नोकरांनी मेणा हत्तीच्या जवळ आणला. हत्ती-वरून उतरून मेण्यात बसावे अशी बादशहाची इच्छा होती. हत्तीला खाली बस-विण्यात आले. औरंगजेब मेण्यात बसला. ऐन याच वेळी हत्तीवरील अंबारी घसरून मेण्यावर येऊन आदळली. मेण्याचा चक्काचूर झाला. सुदैवानें बादशहा सुरक्षित राहिला." औरंगजेबाने ओढा ओलांडला पण त्याला राहण्याला फक्त एक लहान

तंबू लाभला. तेच अदालत आणि तोच तसबीहखाना(प्रार्थनागृह) शहाजादे आणि इतर अमीरउमराव यांना तर आपापल्या तंबूत उभे राहण्यासही जागा नव्हती. पण औरंगजेब खरा धीराचा पुरुष यात शंका नाही. तो म्हणे –" थोडा पाऊस पडत आहे आणि थोडा वारा वाहात आहे. लोकांनी काय म्हणून इतके हात पाय गाळावे !" पुष्कळदा तो कुराणातील खालील अर्थाच्या ओळी म्हणून लोकांना धीर देई–"आम्ही निःसंशयपणे भीति, भय, भूक, नुकसान इत्यादि प्रकारांनी तुमची सत्त्व-परीक्षा करणार आहोत. संकटें आली की जे लोक म्हणतात, "आम्ही परमेश्वरा-साठीच आहोत आणि आम्ही त्यालाच शरण जाणार आहोत. त्यांना हे महंमद, तू आमचा शुभसंदेश नेऊन पोहोचीव." औरंगजेबाची ही धर्मश्रद्धा ' बोलाचीच कढी बोलाचाच भात ' अशा प्रकारची नव्हती. ती त्याच्या रोमरोमात भिनली होती. नुकत्याच झालेल्या अपघातात त्याला ईश्वराच्या कृपेची प्रचिती आलेलीच होती.

अखेर औरंगजेबाने तो ओढा ओलांडला आणि पावणेदोन कोस मजल मारली. आणखी पुढे जाऊन सव्वा दोन कोसांची मजल मारून तो पन्हाळगडाच्या जवळ पोचला, तेथे त्याने मुक्काम केला. तो पुढे चालला होता व सैन्य मागे रेंगाळत होते. सैन्याची पिछाडी सांभाळत तरबियतखान मागाहून येत होता. त्याने औरंगजेबाला विनंती लिहून पाठविली. " लष्करातली अनेक माणसे मागे राहिली आहेत. मराठ्यांनी तर विलक्षण उच्छाद मांडला आहे. आपण तर कूच दरकूच पुढेच चालला आहात. आम्हांस काय आज्ञा ?" औरंगजेबाने उत्तर दिले की, " आम्ही येथे तीन मुक्काम करू."

तरबियतखानाचे म्हणणे रास्त होते. पाऊस, वारा, चिखल, पूर याच्या भरीला मराठ्यांनी मोगलांना हैराण केले होते. ते बेधडक छावणीत घुसून सापडेल ती मालमत्ता लुटून नेत. गुर्जबर्दारांचा दारोगा सीयादतखान याच्या तळावर छापा घालून त्यांनी त्याची सगळी मालमत्ता पळविली. छावणीतील बाजाराचा माजी व्यवस्थापक इमामुद्दीन हा सामान वाहण्यास वाहने मिळत नसल्यामुळे मागे राहिला होता. मराठ्यांनी त्याच्यावर हल्ला करून त्याला ठार मारले व त्याचा सगळा सरंजाम लुटला.

अशा हालअपेष्टा भोगीत ते लष्कर एकदाचे पन्हाळ्याजवळ आले. पाऊस कमी झाला. एकदा छावणात प्रचंड गलका उठला म्हणून बादशहाने लगबगीने बाहेर येऊन पाहिले. विशष काही नव्हते. लोक आनंदाने नाचत होते व ओरडत होते. कारण साडेतीन महिन्यांनंतर त्यांना आज सूर्यदर्शन झाले होते.

पन्हाळ्याच्या पूर्वेस तेरा मैलांवर वडगाव येथे पावसाचा जोर जरा कमी होता. तेथे थोडी दया दाखवून औरंगजेबाने आपल्या लष्कराला पन्नास दिवस विश्रांति दिली. आणि ६ सप्टेंबर १७०२ रोजी तो बहादुरगडाकडे निघाला. वाटेत कृष्णा नदी ओलांडायची होती. येणाऱ्या बातम्या भयंकर होत्या. कृष्णेला

पूर आला होता. नदीकाठी चिखल माजला होता. पण अशा बातम्यांनी डरणारा औरंगजेब नव्हता. तो सैन्य घेऊन पुढे चालला. वाटेत जे हाल व्हायचे ते चुकले नाहीत. चिखलात व दलदलीत माणसे, गाढवे, हत्ती, बैल रुतून बसले; ते पुन्हा वर निघाले नाहीत. खाफीखान म्हणतो त्याप्रमाणे "चिरकालपर्यंत प्रवासातील संकटातून त्यांची मुक्तता झाली." कृष्णेच्या काठावर उतार सापडेनात, नावा थोड्या व त्याही मोडक्या. नावाडी बेमुर्वतखोर व भांडखोर. चिखलातून व पावसातून सुटले ते निर्दय नावाड्यांच्या तावडीत सापडले. त्यांनी त्यांचे सोनेनाणे धुऊन घेतले. मगच त्यांना नदीपार केले. एकेका नावेत माणसे किती भरावीत याला काही सीमा? साकी मुस्तैदखान म्हणतो त्याप्रमाणें एक थडगे व त्यात हजार मुडदे अशी स्थिति होती. "एक ताबूत व हजार मुर्दा!"

अशा प्रकारे पडत झडत कसेबसे, निघाल्यापासून बरोबर एक वर्षाने म्हणजे १३ नोव्हेंबर १७०२ रोजी औरंगजेबाचे ते लष्कर बहादुरगडला एकदाचे येऊन दाखल झाले. लष्कर तर पार बेदम झाले होते. पण औरंगजेब मात्र, मराठी मुलखातला वारा खाऊन गारा खाऊन खैराच्या खोडाप्रमाणे टणक होता. पूर्वी-सारखाच ठणठणीत. त्या हैराण झालेल्या आपल्या लष्कराला पठ्ठ्याने पुरते पंधरा दिवस काही दम घेऊ दिला नाही. त्याने तडक कोंडाण्याकडे कूच करण्याचा हुकूम सोडला. खाफीखान म्हणतो, "कूचाचा हुकूम ऐकून लष्करच्या कष्टी हृदयावर दुःखाचा डोंगर कोसळला." पण करणार काय? औरंगजेबापुढे मान वर करून बोलण्याची शहामत होती कोणाची?

ते चिर–प्रवासी लष्कर मुकाट्याने कोंडाण्याची वाट चालू लागले.

□ □

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था

# (१३)

२ डिसेंबर रोजी औरंगजेबाने बहादूरगड सोडले आणि तो कोंडाणा ऊर्फ सिंहगडच्या दिशेने निघाला. आता बादशहाची स्वारी सातारा व कोल्हापूर पादाक्रांत करून पुणे जिल्ह्यात संचार करू लागली होती. सिंहगडाकडे जाताना वाटेत जेजुरीच्या खंडोबाचे प्रसिद्ध देऊळ लागले. औरंगजेबापुढे वस्तुतः सिंहगड घेण्याचे मोठे काम होते. पण त्यातूनही त्याने खंडोबाच्या देवळाची मोडतोड करायला वेळात वेळ काढलाच. श्रींचा कळस व मंडप पाडून टाकला. त्या वेळचे एक पत्र म्हणते– " अवरंगशाह पातशाह याने श्री देवाचा मंडप व पडशाल पाडिली व कळसही थोडासा वरून पाडिला व देवाचे लेप फोडिले व बैल येक मारिला. परंतु स्वयंभू लिंगे वाचली आहेती. त्यास ढका लाविला नाही." किल्ले व मुलुख जिंकण्याप्रमाणे देवळांची मोडतोड हा औरंगजेबाच्या दक्षिणच्या मोहिमेत महत्त्वाचा कार्यक्रम असावा असे दिसते. कारकिर्दीच्या ऐन पणात असताना त्याने बनारसचे, मथुरेचे आणि सोमनाथाचे प्रसिद्ध देवालय फोडले हे तर झालेच. पण ऐंशी वर्षांचे वय झाले तरी या बाबतींतला त्याचा हिरवटपणा किंचितही निवळला नव्हता. दक्षिणेत असताना आपल्या एका सेनापतीला एक प्रसिद्ध देऊळ जमीनदोस्त करण्याबद्दल त्याने लिहिले, आणि घाई करण्याचे कारण नाही, वेळ मिळेल तेव्हा सावकाश हे काम करावे असे सांगताना त्याने खवचटपणाने शेरा मारला की, "त्या देवळाला पळून जायला पाय नाहीत."

असो. २२ डिसेंबरला जेजुरीच्या खंडोबाला आपला इंगा दाखवून औरंगजेब पुढे निघाला तो २७ डिसेंबर १७०२ रोजी सिंहगडच्या पायथ्याशी पोचला. पूर्वी जसवंतसिंग याने ज्या टेंकडीजवळ मोर्चे घातले होते तेथेच तोफखान्याचा प्रमुख तरबियतखान याने मोर्चे बांधले. वेढ्यासाठी लागणाऱ्या तोफा विशाळगडाहून सिंहगडला आणण्याचे काम फतेउल्लाखान याच्याकडे सोपविले होते. तो तोफा घेऊन येत असता रहिमतपुराजवळ मराठ्यांनी त्याच्यावर मोठा कठीण प्रसंग आणला. ऐन वेळेला झुल्फिकारखानाने त्याची मदत केली म्हणून निभावले, नाहीतर तोफा मराठ्यांच्या हातात पडल्या असत्या. झुल्फिकारखानाने सिंहगडला येऊन औरंगजेबाची गाठ घेतली. औरंगजेबाने त्याला शिवापूरच्या बाजून मोर्चे लावण्याची आज्ञा केली. पण एवढ्यात खानदेश आणि माळवा भागात मराठ्यांनी उच्छाद मांडल्याच्या बातम्या आल्यावरून झुल्फिकारखानाला तिकडे रवाना करणे भाग पडले.

सिंहगडच्या तटबंदीवर तोफांचा भडिमार करून तो सर करण्याची तरबियत-खानाला औरंगजेबाने आज्ञा केली. त्याने तोफा चालविल्या पण काम सोपे नव्हते. मराठे प्राणपणाने प्रतिकार करीत. पुढे प्रसिद्धीस आलेला बाळाजी विश्वनाथ भट हा या वेळी पुणे प्रांताचा सरसुभेदार होता. त्याने व धनाजी जाधवाने सिंहगडचा बचाव करण्याची पराकाष्ठा केली. काशो विश्वनाथ व आबाजीपंत पुरंदरे यांना त्यांनी ३० ऑगस्ट १७०२ रोजी लिहिलेले पत्र या दृष्टीने बोधप्रद आहे. औरंगजेबाचा वेढा डिसेंबरात पडला हे खरे आहे, पण पत्र मराठ्यांच्या त्या काळातील व पुणे-सिंहगड परिसरातील प्रतिकाराच्या हाल-चालीवर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. "तुम्हांकडे काही नाजूक काम आहे. तरी कागद देखताच भेटीस येणे. उजूर न करणे. कृष्ण मृत्तिकेची (म्हणजे बंदुकीच्या दारूची) बहुत जरूर आहे. तरी भगीरथ प्रयत्न करून अडीच मण दारू मेळवून हर इलाजे घेऊन येणे. जिवावरचा खेळ करणे, आजचे उद्यांवर कार्यास न ये. आज कूल रक्षिले तरच तुमचे राहणे या मुलकात होईल."

मराठे बेधडक मोर्च्यांवर हल्ले करीत. रोज मोगलांपैकी कित्येक ठार अगर जखमी होत. रसदेच्या वाटा मराठ्यांनी रोखून धरल्या होत्या. अगदी बादशाही छावणीच्या जवळ जाऊन ते लुटालूट करीत. हा खरोखर जिवावरचा खेळ होता. पुढे राजगडचा किल्लेदार झालेला इरादतखान आपल्या आठवणीत म्हणतो—"कोंडाण्याचा वेढा चालू असताना माझी नेमणूक बादशाही छावणीपासून चार कोसांवर करण्यात आली होती. सैन्याच्या आणि रसदेच्या हालचालीकरिता तो एकच मार्ग मोकळा होता. तो सुरक्षित ठेवण्याच्या कामावर मी होतो. बादशहाने दक्षिणची मोहीम हाती घेतली त्या वेळेपासून मी विजापूर, हैद्राबाद इत्यादि ठिकाणी अशा प्रकारची कामगिरी यशस्वीपणे पार पाडली होती. या वेळी शत्रूची (मराठ्यांची) संख्या प्रचंड होती. ते अगदी बादशाही छावणीच्या जवळ जाऊन लुटालूट करीत. माझे पथक अगदी लहान होते. पण परमेश्वरकृपेने मी आपले ठाणे सांभाळले."

परमेश्वराची कृपाच खरी म्हणायची. कारण जो कोंडाणा तानाजी मालुसऱ्या-सारख्या नरशार्दूलाने घोरपड लावून आणि प्राण खर्ची घालून सर केला, तो आरामप्रिय मोगलांना लढाई करून जिंकणे कदापि शक्य नव्हते हे उघड आहे. अगदी इरादतखानासारखे उद्‌गार साकी मुस्तैदखानाने काढले आहेत—"वास्तविक पाहता तो किल्ला इतका मजबूत आहे की परमेश्वरानेच तो मिळवून द्यावा. नाहीतर कितीही प्रयत्न करा, तो सर होणे शक्यच नाही." साडेतीन महिने वेढा रेंगाळला. अखेर तरबियतखानाने शेवटची राखून ठेवलेली 'हेम' गर्भाची मात्रा दिली. त्याने गोमाजी विश्वनाथ पुरंदरे यांच्यामार्फत किल्लेदार साहेबांना पन्नास हजार रुपयांचा नजराणा पेश केला व बादशहाचे निशाण किल्ल्यावर एकदाचे

फडकू लागले ! औरंगजेबाने सिंहगडाची आख्या बरीच ऐकली होती. किल्ला सर झाल्यावर तो मुद्दाम किल्ला पाहण्यास गेला. त्या किल्ल्याचे बेलाग कडे, त्याची उंची, आसपासच्या प्रदेशावर सत्ता गाजविण्यासारखे त्याचे मोक्याचे स्थान हे सारे पाहून तो कौतुकाने म्हणाला, 'जागा तर बुलंद आहे !' अशी जागा आपणांस लाभली हे पुरुषार्थापेक्षा परमेश्वराच्याच कृपेचे फल होय असे त्यालाही वाटले, आणि म्हणून त्याने सिंहगडाचे नांव 'बक्षिदाबक्ष' म्हणजे 'ईश्वरदत्त' असे ठेवले.

८ एप्रिल १७०३ रोजी किल्लेदाराने सिंहगड बादशहाला सुपूर्त केला. अजून पावसाळा सुरू होण्यास दोन महिने अवकाश होता. किल्लेदारास माणूस ऐवज इत्यादि सर्व उपराळा यथास्थित होत होता. अशा स्थितीत त्याने कच खाऊन पावसाळा येण्याच्या आधीच किल्ला बादशहाला द्यावा ही गोष्ट ताराबाईला बिलकुल आवडली नाही. तिने कडक शब्दात त्याची हजेरी घेतली-"राजा शिव-छत्रपति यांनी बधई बेरड व खंडई बेरड यांस आज्ञा केली ऐसी जे-सिंहगडास औरंगजेब बिलगला होता त्यास नतिजा पावावया निमित्त स्वामीने तुम्हांस किल्ला मजकुरी ठेविले होते. उतावली करून, हिंमत सोडून, तहरह करून राजगडास आलेस म्हणोन हे वर्तमान धोंडजी चव्हाण दिालब यानी हुजूर विदित केले. त्यास स्वामीने तुमचे मदतीस लोक पाठविले. एवजदास पाठविण्यास काही न्यून केले नसता उताविली करून हिंमत सोडून ही गोष्ट केली हे काही बरे केले नाही. पर्जन्य पडेपर्यंत भांडवावयाचा होता ती गोष्ट न केली."

सिंहगड जिंकल्यानंतर औरंगजेबाने पुण्यात सहा महिने मुक्काम केला. पुणे हे खाफीखानाच्या शब्दात 'नरकवासी' शिवाजीने वसविलेले गांव. ते औरंगजेबाला धार्जिणे ठरू नये यात नवल नव्हते. याच ठिकाणी औरंगजेबाच्या मामूसाहेबांवर प्राणांतिक प्रसंग कोसळला होता. त्याच स्मरणाने सुद्धा पायात बाभळीचा काटा रुतावा त्याप्रमाणे खाफीखान विव्हळ होतो-"येथेच हवेलीत अमीरुलउमरा शाहिस्ताखान याच्यावर भयंकर आपत्ति कोसळली होती." पुण्याच्या मुक्कामात औरंगजेबाचा नातू, शहाजादा कामबख्श याचा मुलगा मूहियूलमिल्लत दहा वर्षांचा होता, तो मृत्यु पावला. त्याला शेखसल्ल्याच्या दर्ग्यात पुरण्यात आले. या घातवाच्या निमित्ताने औरंगजेबाने शिवाजीच्या पुण्याचे 'मूहियाबाद' असे नाव ठेवले. मराठ्यांचे हल्ले चालूच होते. ऑगस्ट महिन्यात बेरडांनी शिरवळ व वाईचा फौजदार न्यामतखान याला कैद करून ताराबाईकडे रवाना केले. त्याही-पेक्षा विशेष म्हणजे ज्या लष्कराला विश्रांति मिळावी म्हणून औरंगजेबाने पुण्यात मुक्काम केला, ती विश्रांति बिलकुल मिळाली नाही. त्या वर्षी पाऊस अजिबात झाला नाही. दुष्काळ भयंकर पडला. रुपयाला तीन शेर या भावाने धान्य विकू लागले. महर्गता इतकी झाली की, लोक घरेदारे सोडून परागंदा झाले." साकी मुस्तैदखान म्हणतो "लष्करात रुपयास दोन शेर भावानेही धान्य मिळेनासे झाले;

बादशही लष्करातील धान्याचा बाजार तर गरीब गरीबांच्या आक्रोशांनी भरून गेला होता." मनूची म्हणतो–"सन १७०२ ते १७०४ या काळात दक्षिणच्या सुभ्यात पाऊस झाला नाही. उलट प्लेगाने धुमाकूळ घातला. दोन वर्षांत वीस लाख माणसे मृत्युमुखी पडली. भुकेने हैराण झालेले आईबाप चार आण्यांसाठी आपली पोटची मुले विकावयास तयार असत. पण त्यांना विकत घेणारे कुणी मिळत नसे." हा काय शिवाजीच्या वास्तूचा गुण औरंगजेबाला भोवला म्हणायचा की औरंगजेबाचा पायगुण शिवाजीच्या वास्तूला भोवला म्हणायचा ?

पण सुकाळ असो की दुष्काळ असो, ऋतुचक्र बदलले तरी औरंगजेबाचे किल्ले घेण्याचे वेळापत्रक यंत्राप्रमाणे काटकोर चालू होते. १० नोव्हेंबर १७०३ रोजी त्याने राजगड घेण्यासाठी पुण्यातून कूच केले.

राजगडचा प्रवास सुखाचा झाला नाही. राजगडच्या अलीकडे चार कोस घाटातला रस्ता लागला. रस्ता केवळ दुर्गम होता. सामान लादून उंट किंवा बैल त्या भागात नेणे कठीण होते. मग गाड्यांची गोष्टच बोलावयास नको. "मराठे आणि डोंगरांतून वावरणाऱ्या जमाती तेथे वावरत, तेही घोडी सोडून पाय उतारा होऊन." तरीही औरंगजेबाने एक महिना आधी काही हजार गवंडी, बेलदार आणि कामदार केवळ रस्ता नीट करण्याच्या कामावर नेमले होते. पण लष्कर पोचले तरी रस्ता नीट झाला नव्हता. त्यामुळे बरेचसे सामान जमेल तेथे टाकून द्यावे लागले. गाड्यांचे बैल सोडावे लागले. उंटावरील व गाड्यातील सामान काढून माणसांच्या डोक्यांवर द्यावे लागले. रस्त्यांवरची झाडे तोडावी लागली. किल्ल्यावरच्या मोहिमांत आजपर्यंत इतक्या ठेचा लागल्या तरीही लढाईवर बायका नेण्याची मोगलांची खोड काही सुटत नव्हती. राजगडच्या या भयंकर जंगलातही बायकांचे लटांबर बरोबर मोगलांनी बाळगले होतेच. बैलावरून, रथांतून, उंटांवरून, बैलगाड्यांतून त्या येत होत्या. घाटात अर्थातच त्या महिला-मंडळाला इतरेजनाप्रमाणे पाय उतार व्हावे लागले व तोंडावर बुरखे व डोक्यावर वस्त्रे घेऊन चालावे लागले. एवढ्या जिवावरच्या प्रवासातही आपल्या पुरुषांच्या मागे जाणाऱ्या त्या बायका, व त्या बायकांना आपल्याबरोबर आणणारे ते पुरुष यांच्यापैकी कोणाची तारीफ करावी हा प्रश्नच आहे. अशा प्रकारे सहकुटुंब सह-परिवार प्रवास करणाऱ्या त्या लष्कराचे बरेच सामान दरीत पडले. अनेक माणसे हिंस्र श्वापदांनी खाऊन टाकली. दीड कोसांची ती वाट, पण ती पार करण्यास मोगल सैन्यास पुरे सात दिवस लागले. अशा गजगतीने धडपडत मोगल सैन्याने घाट पार केला आणि २ डिसेंबर १७०३ रोजी त्यांच्या नजरेस राजगड पडला.

रायगड ही शिवाजी महाराजांची राजधानी. ती औरंगजेबाच्या कबजात होती पण रायगड झुलिफकारखानाने काबीज केला होता. औरंगजेबाने रायगड काही आपल्या डोळ्यांनी पाहिला नाही. एकंदरीतच कोकणच्या भूमीला औरंग-

जेबाच्या चरणांचा स्पर्श झाला नाही, पण काही बिघडले नाही, त्याने राजगड पाहिला, यातच तो सर्व भरून पावला. राजगड हीही शिवाजी महाराजांची रायगडाच्या आधीची राजधानीच होती. तीस वर्षं त्यांनी स्वराज्याची सूत्रे याच ठिकाणी राहून हलविली. राजगड हे नावही त्यांनीच दिले. त्यापूर्वी ' मुरुंब-देवाचा डोंगर ' म्हणून पडक्या स्थितीत तो ओळखला जात असे. तोरण्याच्या तटाची दुरुस्ती करीत असताना महाराजांना मोहोरांचा हंडा सापडला आणि त्या धनाचा विनियोग त्यांनी आधीच बुलंद असलेला राजगड आणखी दुर्लंघ्य करण्यास करून घेतला. बालेकिल्ला आणि तीन माच्या मिळून बनलेला हा किल्ला. आग्नेय दिशेला ' सुवेळा ' नैर्ऋत्येला ' संजीवनी ' व ईशान्येला ' पद्मावती ' अशा तीन माच्यांना शिवाजी महाराजांनी भक्कम तटबंदी उभारली व किल्ला नव्याने बांधून काढला. जे वर्णन रायगडाचे स्वतः महाराजांनी केले आहे, ते जवळजवळ जसेच्या तसेच राजगडला लागू पडते. "चखोट जागा. तीन गाव उंच. कड्यावर कुठे पाखरू उतरायलासुद्धा जागा नाही असा बेलाग कडा. एकाडचा डोंगर. तेव्हा ही जागा तख्तास बहुत उत्तम ' त्याचे तट, त्याचे बुरूज, त्याची बांधणी, त्याचा बालेकिल्ला सारे काही रायगडाप्रमाणेच दुर्लंघ्य आहे. तेव्हा दिल्लीपतीने शिवाजी महाराजांची ही राजधानी एकदा जातीने डोळे भरून पाहिली ते बरेच झाले म्हणावयाचे.

राजगडाचे वर्णन करताना खाफीखान अगदी गहिवरून आल्यासारखा बोलतो. "त्या किल्ल्याचे मी कसे वर्णन करू? काय त्या किल्ल्याची उंची, काय त्याचा विस्तार! जणू काय आकाशच पसरले होते. त्याचे टोक पाहून छाती दडपे. राजगड किल्ला म्हणजे डोंगरांची रांगच. त्याचा घेर बारा कोस होता. त्याला सगळी-कडून वेढा घालणे कठीण होते." राजगडला यायचे व शिवाजीची आठवण यायची नाही हे दिल्लीला जाऊन औरंगजेबाची आठवण न काढण्यासारखेच होते. ती आठवण खाफीखानाला आलीच व काफर शिवाजीवर बोटे मोडीत तो जळफळत लिहितो "राजगड हे शिवाजीचे मुख्य ठिकाण होते. सगळ्या युद्धाचे मूळ तो काफर (शिवाजी) होता. त्याच्यामुळेच बादशहाला त्या प्रदेशात उतरावे लागले आणि त्याच्यामुळेच खडतर प्रवासाची लोकांवर (मोगलांवर) आपत्ति आली होती." खाफीखान खरे बोलतो. नेमकी हीच भावना औरंगजेबाची होती. पन्हाळ्याला, खेळण्याला, सातारला, परळीला, खवासपूरला, अंबाघाटात, चिखलाने, पावसाने वादळाने व मराठ्यांच्या छाप्यांनी हैराण झाला असता, हीच खंत औरंगजेबाच्या जिवाला खात होती की आग्र्याला शिवाजी त्याच्या तावडीत चांगला सापडला होता, त्याच वेळी त्याचा निकाल लावून टाकला असता तर आज वनवासी होऊन मराठ्यांच्या पारिपत्यासाठी दाही दिशा वणवणा भटकायची आपत्ति त्याच्यावर कोसळली नसती. मरायच्या पूर्वी आपल्या आयुष्याचे सार म्हणून जो बारा

कलमांचा 'राज–बोध' त्याने लिहून ठेविला त्यात त्याने या गोष्टीचा मुद्दाम उल्लेख केलेला आहे "राज्याची उत्तम खबर असणे हा शासनाचा आधारस्तंभ होय. एका क्षणाचा गलथानपणा दीर्घकाळच्या यातनांना कारणीभूत होतो. माझ्या हलगर्जीपणामुळे तो दुष्ट शिवा निसटून गेला आणि त्याचा परिणाम म्हणून (मराठ्यांच्या विरुद्ध) अखेरपर्यंत मला कष्ट करावे लागत आहेत."

अखेर किल्ल्यास मोर्चे लागले. तरबियतखान आणि हमीदुद्दीनखान यांनी पद्मावतीच्या बाजूने मोर्चे लावले. किल्ल्याचा बुरुज तीस गज उंच होत. तितक्याच उंचीचा दमदमा तयार करून समोरच्या टेकडीवर बांधला आणि तटावर व बुरुजावर ते तोफांचा भडिमार करू लागले. खुद्द बादशहाचा तळ सुवेळा माचीसमोर होता. तिकडूनही मोर्चे बांधून हल्ल्याची तयारी झाली. मराठ्यांनीही प्रतिकारात काही कसूर केली नाही. तोफांचा आणि बंदुकांचा भडिमार तिन्ही माच्यांवरून ते करीत आणि भरीला भर म्हणून प्रचंड दगड मोगलांवर लोटून देत. किल्ल्याचा घेरच मुळी बारा कोसांचा असल्यामुळे वेढा घालून मराठ्यांची रसद तोडणे मोगलांना कल्पनेतही शक्य नव्हते. त्यात पुन्हा घनघोर अरण्यांतून व डोंगर खोऱ्यांतून सापाचा सुळसुळाट होता व जंगली जनावरांचा मनस्वी उपद्रव होता. त्यामुळे मोगल अगदी कावून गेले.

राजगड हा गुंजण मावळात येतो. त्या गुंजण मावळाचा देशमुख संताजीराव सिलीमकर याला या प्रसंगी ताराबाईने राजगडावर नामजाद केले होते. त्याला लिहिलेल्या पत्रात ती म्हणते–"श्री राजा शिवछत्रपति याणी संताजीराव सिलंबकर व महिपतराव सिलंबकर देशमुख ता गुंजण मावळ यासी आज्ञा केली ऐसी जे अवरंगजेब किल्ले राजगडास बिलगला आहे. मोर्चे चालऊन यालगार करितो. परंतु तुम्ही त्याचा हिसेब न धरिता शर्तीनसी नतीजा पावविता म्हणून शंकराजी पंडित सचीव याणी लिहिले. व सांप्रत तुमचे मर्दानगीचे वर्तमान राजश्री सोनजी फर्जंद याणी लिहिले. त्यावरून कळो आले. तुमचे सेवेचा मजुरा जाला. तरी तुम्ही स्वामीचे एकनिष्ठ सेवक तरवारेचे आहा पुढेही एच रीतीने औरंगजेबास नतीज पाववून फत्तेचे वर्तमान लिहून पाठविणे. स्वामी तुमची सर्फराजी करतील."

पण ताराबाईने दिलेली ही शाबासकी ऐकण्याचे संताजीराव सिलिमकराच्या नशिबात नव्हते असे दुःखाने म्हणावे लागते. १९ डिसेंबर १७०३ रोजी ताराबाईने हे पत्र रांगण्याहून लिहिले. आणि ते पत्र राजगडाला येऊन पोचण्यापूर्वीच २० डिसेंबर रोजी संताजीराव लढाईत ठार झाला. त्या दिवशी सुवेळा माचीवर मोगलांनी जोरदार हल्ला केला. तो संताजीरावाने मोडून काढला पण ऐन प्रसंगी तोफेचा गोळा लागून तो धारातीर्थी पतन पावला. तीन वर्षांपूर्वी त्याचा भाऊ सुभानजी हाही पुरंदर लढवीत असता मारला गेला होता. मावळ प्रांताचा अधिकारी शंकराजी नारायण सचिव याने संताजीरावाचा मुलगा प्रतापराव याचे सांत्वन

करताना मोजक्या पण समर्पक शब्दांत संताजीरावाचा गुणगौरव केला- "मा संताजीराव सिलंबकर, तुमचे बाप, राजगडी सुवेळेस खासा मोर्चेत होते. त्यास औरंगजेबाच्या पादशाही मोर्चाकडून गोळी लागोन स्वामीकार्यावरी पडिले हे वर्तमान आजीच राजगडाहून आले. अशास संताजीराऊ थोर कामाचे मर्दाने एकनिष्ठ होते. त्यांनी आपला पुरुषार्थच संपादून घेतला."

दोन महिने झाले. वेढा रेंगाळू लागला. अखेर ४ फेब्रुवारी १७०३ रोजी मोगलांनी पुन्हा एकदा जोरदार हल्ला केला व एका माचीचे प्रवेशद्वार ताब्यात घेतले. मराठ्यांनी प्रतिकाराची शर्थ केली. पण उपयोग झाला नाही. त्यांना बाले किल्ल्यात माघार घ्यावी लागली. पण तरीही बारा दिवस त्यांनी किल्ला लढविला पण अखेर रुहुल्लाखानाच्या मध्यस्थीने तडजोड झाली. त्याप्रमाणे किल्लेदाराने मोगलांचे निशाण स्वहस्ते किल्ल्यावर लावले व आपली माणसे घेऊन तो किल्ल्यातून निघून गेला. रात्र अंधारी होती त्यामुळे मोगलांचे निशाण दिसत नव्हते. सकाळी बादशहाला समजले की मोगलांचे निशाण लागले व किल्लेदार पळून गेला. तेव्हा विजयाची शहाजणे वाजू लागली.

किल्ला हाती आला खरा, पण तो सांभाळणारा कोण? वस्तुतः शिवाजीची राजधानी हस्तगत झालेली होती. तिचा किल्लेदार म्हणून मिरविणे हा बहुमान काही सामान्य नव्हता. पण मोगल अधिकाऱ्यांपैकी कोणालाही हा बहुमान नको होता. ते भलतेच प्रसिद्धि पराङ्मुख झाले होते. बादशहाने सर्वांना विचारले पण प्रत्येकाने या ना त्या कारणाने नकार दिला, अखेर इरादतखान तयार झाला. त्याची राजगडचा किल्लेदार म्हणून बादशहाने नेमणूक केली. इरादतखान म्हणतो "राजगडचा किल्ला महत्त्वाचा असून नुकताच ताब्यात आला होता. त्यावर एखाद्या प्रमुख सरदाराची नेमणूक करावी असे बादशहाला वाटले. त्याने बऱ्याच सरदारांना विचारून पाहिले. पण राजगडची किल्लेदारी म्हणजे कटकटीची जागा यामुळे सर्वांनी या ना त्या कारणाने ती पतकरण्यास नकार दिला. बादशहाच्या हुजुरात मी रुजू झाल्यावर ते म्हणाले "तुला राजगडला पाठवावे म्हणतो. तुझी तयारी आहे ना?" मी म्हटले "हा सेवक तयार आहे." त्यांनी मला आशीर्वाद दिला.' औरंगजेबाने राजगडचे नाव 'बनीशाहगड' असे ठेविले.

राजगड काबीज केल्यानंतर औरंगजेबाने तेथून आठ मैलांवर कानदखोऱ्यात असलेल्या तोरणा किल्ल्याकडे मोर्चा वळविला. २३ फेब्रुवारी १७०४ रोजी तो तोरण्यास पोचला आणि त्याने किल्ल्यास वेढा देण्याचा हुकूम केला. तरबियत-खानाने किल्ल्यास मोर्चे लाविले आणि महंमद अमानखानाने किल्ल्याच्या बाहेर पडण्याच्या वाटा रोखून धरल्या. पण साकी मुस्तैदखान म्हणतो ते खरे आहे- "पण किल्ल्याच्या टोकापर्यंत मोगलांचे हात पोचणे कठीण होते. बादशहाच्या भाग्याने हा अवघड वेढा सुलभ रीतीने सुटला."

कारण उंची व बळकटी या दृष्टीने पाहिले तर तोरणा हा महाराष्ट्रात पहिल्या दर्जाचा किल्ला म्हणावा लागेल. समुद्रसपाटीपासून त्याची उंची ४६०६ फूट आहे. त्याच्यावर दोन माची आहेत– झुंजार माची व बुधला माची. भक्कम तट आणि खोल कडे आहेत. झुंजार माचीवरून गडाखाली उतरायला एक वाट आहे, पण ती इतकी अवघड आहे की किंचितही तोल गेला की कपाळमोक्ष ठरलेला. भिंतीसारखे सरळ तासलेले काळे कडे, अरुंद वाटा, बुलंद दरवाजे, भक्कम तटबंदी, एक कोस लांब व पाव कोस रुंद असा गडाचा विस्तार या सर्वांमुळे लढून तोरणा घेणे म्हणजे केवळ वल्गना ठरली असती. गडावरच्या मराठ्यांना हे माहीत होते म्हणून खासा औरंगशहा आला तरी ते निर्धास्त होते.

आणि येथेच त्याचा घात झाला. मोगल सैन्यातला अमानुल्लाखान हा शूर आणि धाडसी होता. किल्ले चढून जाण्यात पटाईत असलेले काही मावळे त्याने पैदा केले. किल्ल्यावर दोर फेकण्यात येऊन प्रथम दोन माणसे हत्यारे घेऊन वर चढली. तटावर चढल्यावर त्यांनी इशारा करून बाकीच्यांना वर बोलाविले. पंचवीस मावळे वर गेल्यानंतर अमानुल्लाखान त्याचा भाऊ अताउल्लाखान व इतर साथीदार वर चढले. त्यांनी रणशिंग फुंकून किल्ल्यातील लोकांवर हल्ला केला. त्याच वेळी हमीदुद्दीनखानही कमरेला दोर बांधून तटावरून आत शिरला व मराठ्यांशी लढू लागला. लढाईचा शेवट उघड होता. मराठे शरण आले. उरले त्यांना बादशहाने अभय देऊन किल्ल्याबाहेर जाऊ दिले. या प्रसंगी मोगल मराठ्यांसारखे चातुर्याने वागले व मराठे मोगलांसारखे गाफीलपणाने वागले. अमानुल्लाखानाचे धाडस तारीफ करण्यासारखे होते यात शंकाच नाही. पण वाईट वाटते ते याचेच की त्याला मदत करणारे मावळेच होते. १५ मार्च १७०४ रोजी तोरणा सर झाला. त्या दिवशी चांद्रयानाने औरंगजेबाचा एकूणनव्वदावा वाढदिवस होता. बिचाऱ्याचे अनेक वाढदिवस आले व गेले, पण त्या निमित्ताने तोरण्यासारखा किल्ला शौर्याने जिंकून बादशहाला नजर करणारा अमानुल्लाखानासारखा खाल्ल्या मिठाला जागणारा सेवक एखादाच. औरंगजेबाला या प्रसंगी केवढी धन्यता वाटली असेल याची कल्पनाच केली पाहिजे. तोरण्याचे नाव 'फतेहुलगैब'–म्हणजे 'दैवी विजय' असे ठेवण्यात आले.

तोरण्याचे महत्त्व आणखीही एका दृष्टीने आहे. तोरणा घेतल्यानंतर औरंगजेबाने खेडला पावसाळ्यासाठी छावणी केली. त्या मुक्कामात त्याच्या सरदारांनी लोहगड व राजमाची हे किल्ले जिंकले हे खरे. पण परमार्थाने पाहता स्वत: औरंगजेबाने जिंकलेला तोरणा हा महाराष्ट्रातला शेवटचा किल्ला होय. पाच वर्षांपूर्वी त्याने किल्ले जिंकण्याच्या मोहिमेला प्रारंभ केला त्याचा शेवट तोरण्यास झाला. ही गोष्ट इतिहासांत प्रसिद्ध आहे की किल्ले जिंकण्याच्या आपल्या मोहिमेला शिवाजी महाराजांनी तोरण्यापासून प्रारंभ केला व स्वराज्याचे तोरण

बांधले. ज्या ठिकाणी शिवाजी महाराजांच्या कार्याचा उपोद्‌घात व्हावा तेथे औरंगजेबाच्या कार्याचा उपसंहार व्हावा हा एक चमत्कारिक ऐतिहासिक योगायोग दिसतो ! औरंगजेबाच्या किल्ल्यांच्या मोहिमेतही तोरण्याचे वैशिष्टच आहे. खाफीखान म्हणतो–ते अगदी खरे आहे– " लोकांत एक गोष्ट जगजाहीर आहे आणि मुस्तैदखानाने आपल्या दक्षिणच्या मोहिमेच्या इतिहासात तसे नमूदही करून ठेविले आहे. ती गोष्ट ही की हा एकच किल्ला हल्ला करून जिंकून घेण्यात आला. त्यात तडजोडीच्या गोष्टी किंवा देण्याघेण्याच्या गोष्टी घडून आल्या नाहीत. "

सिंहगड, राजगड व तोरणा हे पुण्याच्या परिसरातले किल्ले जिंकून घेण्याच्या निमित्ताने १७०२ ते १७०४ या दोन वर्षांच्या काळात औरंगजेबाचा मुक्काम पुणे जिल्ह्यात पडला होता. पुण्यास असताना शाहूचा एक राजकारणातील प्यादे म्हणून उपयोग करून घेण्याचा औरंगजेबाने प्रयत्न करून पाहिला तो सांगण्यासारखा आहे.

मराठ्यांशी तडजोडीची बोलणी करण्याच्या या प्रकरणात पुढाकार औरंगजेबाचा नव्हता, तर शहाजादा कामबख्शाचा होता. याचे कारण उघड होते की, गेली बावीस वर्षे व विशेषतः अलीकडची पाच वर्षे मराठे व औरंगजेब यांनी एकमेकांवर मोहिमा काढून एकच धुमाकूळ उडवून दिला असल्यामुळे मोगल अगदी कंटाळून गेले होते. मराठे हटत नव्हते, व म्हातारबुवाही हटत नव्हते. मधल्यामध्ये मोगलांची मात्र मृदुंगाप्रमाणे दोन्हीकडून थपडा खाऊन दामटी वळत होती. त्यांना मराठे जास्त छळत होते की औरंगजेब जास्त छळत होता हे सांगणे कठीण होते. खाफीखान म्हणतो की " बेगमपुरहून कूच करण्याचा औरंगजेबाने हुकूम दिला, तेव्हा तेथे घरे दारे करून सुखवस्तु झालेल्या लोकांना मोठेच दुःख झाले. त्यांना वाटले की बादशहा काही येथून लांबचा प्रवास करणार नाही." तीच स्थिति विशाळगडाहून आल्यावर बहादुरगड सोडून कोंडाण्याकडे कूच करताना, किंवा पुणे सोडून राजगडाकडे चाल करून जाताना– " मोगल लष्करातील लोकांनी मोहिमांचे अनेक कष्ट सहन केले होते. बायकापोरांपासून त्यांना दूर राहावे लागत होते. त्यामुळे ते कष्टी होते. पुण्याला पोचल्यावर काही दिवस तेथे आरामाने काढण्यास मिळतील म्हणून त्यांनी आपली बायकापोरे बोलावून घेतली होती. काहींनी तर तेथे लग्नसंबंध जोडले होते. खडतर प्रवास आणि डोंगरदऱ्यातून भटकणे याच्या दगदगींतून मुक्त होऊन ते आरामात राहू लागले होते. त्यांना आता राजगडकडे जावे लागले. " आपल्यावर ही वेळ आणणाऱ्या बादशहावर सैनिक मनातून दात ओठ खात व तो मरतो केव्हा याची वाट पाहात. औरंगजेबाला या गोष्टीची उत्तम जाणीव होती. तो मुअज्जमला एकदा म्हणाला देखील– " माझ्या मागून जंगलातून आणि ओसाडीतून भटकावे

लागत असल्यामुळे चैनीला चटावलेले माझे सरदार माझ्या मरणाची इच्छा करितात.'' स्वत: इतके हाल सोसणारा आणि स्वतः बरोबर आपल्या सैनिकांनाही हाल सोसायला लावणारा औरंगजेब मराठ्यांशी तडजोडीची बोलणी करण्यात पुढाकार घेईल हे त्याच्या इभ्रतीलाही धरून नव्हते आणि त्याच्या स्वभावालाही धरून नव्हते. तो पुढाकार अर्थात शहाजादा कामबख्श याने घेतला. ज्याचे पोट दुखते तोच ओवा खातो ही म्हण प्रसिद्धच आहे. कामबख्शाला मराठ्यांशी बोलणी करण्याचा अनुभव जुनाच होता. जिंजीला त्याला झुल्फिकारखानाला मदत करण्यासाठी पाठविले असता मराठ्यांशी बोलणी करण्याचा उद्योग करून त्याने बापाला या बाबतीतली आपली करामत पूर्वी दाखविली होतीच.

कामबख्शावर औरंगजेबाची मर्जीही बरीच होती. त्याच्या विनंतीवरून औरंगजेबाने शाहूला गुलालबारातील आपल्या निवासस्थानातून काढून कामबख्शाच्या हवाली केले. तुरुंगात कोठडीत कुलुपबंद केलेल्या कैद्याला कोठडीतून काढून तुरुंगाच्या आवारात फिरण्याची परवानगी देण्याइतपतच ही मोकळीक होती. पण आजपर्यंतच्या नजरकैदेच्या मानाने तीही बरीच होती म्हणावयाची. ही बोलणी रायभानजी भोसले म्हणून शहाजीचा दासीपुत्र होता, त्याच्यामार्फत चालू झाली. त्याच्या बोलण्याला वजन यावे म्हणून औरंगजेबाने त्याला सहा हजारी मनसबदारही बनविले. कामबख्शाने एकाहून अनेक वेळा आपली माणसे धनाजी जाधवाकडे बोलणी करण्यासाठी पाठविली. पण ती निराश होऊन परत आली. तडजोडीची घाई मोगलांना झाली असली तरी मराठ्यांना कुठे झाली होती? भीमसेन म्हणतो ते खरे आहे– "मोगलांनी मराठ्यांना थोडेच जिंकून घेतले होते? दख्खनचा तमाम सुभा, शिऱ्याचा गोळा घशात घालण्यास मिळावा, तसा त्यांच्या ताब्यात गेला होता. ते काय म्हणून तहास प्रवृत्त होतील?'' समेटाचा बार फुकट गेला. शाहूची परत गुलालबारांत रवानगी करण्यात आली. आवारातला कैदी परत कोठडीत बंद करण्यात आला.

त्याला औरंगजेबाचा नाईलाज होता. मराठे छापा घालून शाहूला केव्हा पळवून नेतील याचा नेम नसल्यामुळे त्याला नजरकैदेत ठेवण्याशिवाय इलाज नव्हता. पण तेवढी एक गोष्ट सोडली तर औरंगजेबाने शाहूला पराकाष्ठेच्या सौजन्याने वागविले यात शंका नाही. संभाजीच्या मृत्यूनंतर झुल्फिकारखानाने कैदी म्हणून धरून आणलेला शाहू, छावणीत दाखल झाला तेव्हा सात वर्षांचा होता. त्याच वेळी औरंगजेबाने त्याला सात हजारी मनसब व 'राजा' ही पदवी दिली. त्याच्या शिक्षणाची शक्य तितकी व्यवस्था केली. आता त्याला लष्करी मोहिमावर पाठवून त्याच्या क्षात्रतेजाला वाव देण्याची सोय औरंगजेबाने केली नाही हे खरे. पण त्याचे कारण उघड आहे. ते त्याला परवडण्यासारखे नव्हते

आणि मोकळा सोडलेला शाहू मराठ्यांना जाऊन मिळणार नाही याची खात्री काय? किती झाले तरी तो शिवाजीचा नातू होता आणि बाटवून मुसलमान केलेला नेताजी पालकर जेथे मराठ्यांना सामील होतो, तेथे शिवाजीच्या नातवाचा भरंवसा कोणी द्यावयाचा?

एरवी औरंगजेब शाहूशी फार प्रेमळपणाने वागत असे. राजारामाच्या मृत्यूने शाहूला पराकाष्ठेचे दुःख झाले. त्याने अन्नपाणी सोडले. तो बादशहाच्या भेटीला गेला असता त्याचे अस्थिपंजर शरीर पाहून औरंगजेब म्हणाला, "काय राजे ही तुमची स्थिति!" तेव्हा हाफीज अंबर बोलला "राजे डाळभातास बिलकुल स्पर्श करीत नाहीत. सदैव मिठाई खात असतात. कैदेत असता जेवू नये, फराळ करावा असे त्यांचे शास्त्र सांगते." तेव्हा औरंगजेबाने हमीदुद्दीनखानाकडून शाहूस सांगून पाठविले की, "तुम्ही कैदेत नाहीत, तुम्ही आपल्या घरीच आहात. तुम्ही अन्न सेवन करीत जावे." आता विशाळगडसारख्या स्वारीत पाण्यापावसात सर्वांचेच हाल होत. जोत्याजी केसरकराने त्या वेळी शाहूला तेलात काकडे पेटवून त्यावर भात शिजवून घातला अशी कथा आहे. जेथे प्रत्यक्ष बादशहाचा वजीर पावसाच्या माऱ्यात उपाशी पोटी राहुटीखाली कुडकुडत रात्रभर उभा राहत असे, तेथे एकट्या शाहूबद्दल औरंगजेब तरी काय करणार?

अनेक वेळा त्याच्या मनात येई की शाहूला मुसलमान करून टाकावे म्हणजे सर्वच प्रश्न मिटला. त्याप्रमाणे पुण्याच्या मुक्कामात मोहरमच्या उत्सवात शाहूला इस्लामची दीक्षा देण्याचा हुकूम त्याने जाहीर केला व त्याचे मन वळविण्यासाठी हमीदुद्दीनखानाला त्याच्याकडे पाठविले. त्या वेळी शाहू व येसूबाई यांच्यावर आभाळ कोसळले, व त्यांनी आजपर्यंत शाहूवर कृपेची पाखर धरणारी औरंगजेबाची लाडकी मुलगी जी झीनतुन्निसा बेगम हिची करुणा भाकली की तिने औरंगजेबाची समजूत काढावी. तेव्हा बादशहाच्या शब्दाचा मान राखण्यासाठी म्हणून, एका शाहूबद्दल दोन प्रसिद्ध पुरुष मुसलमान होत असतील तर आपला हुकूम मागे घेण्यास औरंगजेब तयार झाला. त्याप्रमाणे शाहूबरोबर कैद झालेले प्रतापराव गुजराचे मुलगे, खंडेराव आणि जगजीवन यांनी धन्यासाठी धर्मावर पाणी सोडले. १६ मे रोजी त्यांना इस्लामची दीक्षा देण्यात येऊन त्यांची नावे अब्दुर्रहीम व अब्दुर्रहमान अशी ठेवण्यात आली. शिवाजीचा नातू हिंदुधर्मात राहिला हा गुजर बंधूंच्या निःसीम स्वार्थत्यागाचा परिणाम यात वादच नाही. पण धर्माच्या बाबतीत कधीही तडजोड न करणाऱ्या औरंगजेबाने फक्त या वेळी केवळ शाहूसाठी आपल्या शब्दाला मुरड घातली या त्याच्या सौजन्याला काहीच किंमत नाही काय?

याच सालच्या मार्गशीर्षात शाहूचे औरंगजेबाने मोठ्या थाटाने लग्न केले. बादशहाच्या पदरचे सरदार मानसिंग जाधव यांची कन्या राजसबाई व कण्हेरखेड शिंद्याकडची अंबिकाबाई या दोन मुली जोत्याजी केसरकर व मोरोपंत सबनीस

यांनी पसंत केल्या. लग्नप्रसंगी औरंगजेबाने शाहूला अक्कलकोट, सुपे, बारामती, इंदापूर व नेवासे या पाच परगण्याची जहागीर करून दिली; आणि एक सोन्याची तलवार रायगडचा पाडाव करून आणलेली शिवाजीची भवानी तलवार, व अफझलखानाची तलवार अशा तीन तलवारी बक्षीस दिल्या. गेली पंधरा वर्षे जे सौजन्य औरंगजेबाने शाहूला दाखविले होते, त्याची येथे केवळ पराकाष्ठा झाली.

काही अभ्यासकांच्या मते औरंगजेबाने शाहूला दाखविलेले हे प्रेम निरपेक्ष नव्हते. शाहू जर पुढेमागे छत्रपति झाला तर त्याने मोगल बादशाहीचे रक्षण करावे या उद्देशानेच त्याने शाहूला माया दाखवून मिंधा करून ठेविला होता. औरंगजेबाची अशी जर अपेक्षा असेल तर ती त्याच्या कल्पनेबाहेर यशस्वी झाली असे म्हणणे प्राप्त आहे. कारण, बादशाहीशी निष्ठा राखावी, हे तत्त्व केवळ शाहूचेच नव्हते, तर त्याच्यानंतर आलेल्या छत्रपति रामराजाचेही होते. १७५१ साली दिल्लीतील पेशव्यांच्या वकिलाने महंमदशाहा बादशहाच्या वाढदिवसानिमित्त एकशे एक मोहरांचा नजराणा बादशहापुढे पेश केला. त्याचबरोबर त्याची राजनिष्ठा व आज्ञाधारकता निवेदन करणारी अर्जीसुद्धा बादशहाच्या हाती देण्यात आली. १७५० साली बादशाहीचे रक्षण करण्यासाठी बादशहाने मराठ्यांशी करार केला. त्या अन्वये ठठ्ठा, मुलतान, पंजाब, रजपुताना व रोहिलखंड एवढ्या प्रदेशावरील चौथाई बादशहाने मराठ्यांस फौजेच्या खर्चासाठी करून दिली. त्यातली मुख्य अट होती की अब्दाली, रोहिले, रजपूत राजे व सिंधचे अमीर यांना मराठ्यांनी तंबी पोचवून त्यापासून पादशाहीचे संरक्षण करावे. या करारातूनच पानपतचा घनघोर प्रसंग निर्माण झाला. त्या वेळी पानपतावर जाताना भाऊने आपला उद्देश पातशाहीचे रक्षण करण्याचा आहे हे स्पष्ट शब्दांत सांगितले आहे– " परंतु तो (सुजाउद्दौला) आम्ही एक होऊन तैमूरियाचे सलतनीचा नाश करावा हे आम्हांस योग्य नाही. हिंदुधर्म व तैमूरियाचे काहीच नाही असे होणे हे आमचे पाहिल्यात कसे होईल? पातशाहात दिल्लीस कायम करून परकी शत्रु नाहीसा करावा. मग घरचा बंदोबस्त सहजात होईल." पुढेही महादजी शिंद्याने दिल्ली काबीज करून प्रत्यक्ष बादशहाला आपला 'पेन्शनर' बनविले, तरी पेशव्यासाठी सर्वांत मोठा मान कोणता आणला होता– तर वकील–इ–मुतलक ! आणि ते बादशाहाचे फर्मान समारंभ करून स्वीकारण्यात पेशव्यांना मोठाच गौरव वाटला. पेशव्यांना किंवा छत्रपतीला कमीपणा आणण्याचा यात उद्देश नाही. पण आपण बादशहाचे ताबेदार, पादशाहीचे रक्षण ही आपली जबाबदारी ही मराठ्यांची वृत्ति शाहूपासून अखेरच्या छत्रपतीपर्यंत कायम होती. त्या प्रवृत्तीचा उगम शाहूच्या औरंगजेबाबद्दलच्या कृतज्ञतेत होता ही गोष्ट उघड आहे. हा शाहू जर संभाजीप्रमाणे मोकळा राहिला असता किंवा त्याच्याऐवजी औरंगजेबाबद्दल ममत्वाचे प्रयोजन नसलेली ताराबाई छत्रपति झाली असती,

तर मोगल साम्राज्याच्या ठिकऱ्या उडाल्या असत्या. म्हणून म्हटले की आपल्या मागे शाहू बादशाही रक्षील या अपेक्षेने औरंगजेबाने त्याला माया लावली असेल तर त्याची ती अपेक्षा अपेक्षेपेक्षा पूर्ण झाली यात शंका नाही. म्हणून त्याचे प्रेम निरपेक्ष नव्हते असा काहींचा आक्षेप आहे.

पण म्हणून काय बिघडले? औरंगजेब हा बोलून चालून राजकारणी पुरुष होता. राजकारणातले कोणते प्रेम निरपेक्ष असते? आणि भावी स्वार्थावर नजर ठेवून शाहूला औरंगजेबाने सौजन्य दाखविले असेल तर त्याच्या मुत्सद्देगिरीची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. मराठ्यांवरच्या त्याच्या लष्करी मोहिमा साफ फसल्या पण शाहूच्या अंतःकरणावर मार्दवाने केलेली त्याची मोहीम फत्ते झाली. One who treads softly goes far असे चिनी म्हणतात ते काही खोटे नाही. या बाबतीत महाभारतही तेच बोलते. 'नासाध्यं मृदुना किञ्चित् तस्मात् तीव्रतरं मृदु।' रजपुतांना स्नेहाने पोखरणाऱ्या अकबराप्रमाणे औरंगजेब या वेळी वागला. त्याच्या जीवनातील मुत्सद्देगिरीची बहुधा एवढीच गोष्ट असावी असे वाटते.

पण खरे बोलायचे तर असे नसावे असे वाटते. पोटात शिरून शत्रु काबीज करण्याचे अकबराचे मार्ग औरंगजेबाचे नव्हते. तो त्या मानाने सरळ माणूस होता. आणि तो दूरदर्शी असला तरी पुढल्या शंभर वर्षांचा हिशेब बांधण्याइतका दूरदर्शी नव्हता. त्या काळी तरी ताराबाई बाजूला फेकली जाऊन शाहू छत्रपति होणे ही जवळ जवळ अशक्य गोष्ट होती. आणि छत्रपति झाल्यावर तो केलेले उपकार स्मरेल हे जितके शक्य होते तितके विसरेल हेही शक्यच होते. पोटच्या पोरांबद्दल विपरीत अनुभव आलेला औरंगजेब, ज्याला आपण हाल करून ठार मारले त्या शत्रूच्या पोराबद्दल हा आपण मेल्यावर आपले उपकार आठवील अशी अपेक्षा बाळगत असेल तर तो भलताच आशावादी तरी असला पाहिजे, किंवा अत्यंत मूर्ख तरी असला पाहिजे. दोन्ही शब्दांचा अर्थ एकच. औरंगजेब दोनही नव्हता. म्हातारपणाचा सर्वांत मोठा फायदा त्याला झाला होता तो म्हणजे सर्वांच्याच बाबतीत त्याचा भ्रमनिरास झाला होता. 'Sadder and wiser by experience' तेव्हा शाहू बेइमान होणारच नाही अशी भलती आशा त्याने बाळगली असेल असे वाटत नाही.

खाफीखान मोठा ढुढ्ढाचार्य आहे. तो लिहितो– "त्या दुष्टाचा मुलगा शाहू हा सात वर्षांचा होता. तो आणि त्या दुष्ट जमातीतील इतर काही जण यांना बादशहाने जीवदान दिले. शाहूच्या शिक्षणाकरिता त्याने हुशार माणसे नेमली. त्याला सात हजारी मनसबदारी नेमण्यात आली. सापाला ठार करावयाचे आणि त्याचे पिल्लू पोसायचे, आग विझवायची पण निखारे शिल्लक ठेवायचे असा प्रकार झाला. याची फळे औरंगजेबाच्या मृत्यूनंतर दिसून आली. याचा अर्थ खालील

कवितेप्रमाणेच झाला– " आकिबत गुर्गज़ादा गुर्गशवद गच बा आदमी बुज़ुर्ग शवद– लांडग्याचा बच्चा माणसाबरोबर वाढला तरी शेवटी तो लांडगाच होणार." तात्पर्य, औरंगजेबाने शाहूला दाखविलेले सौजन्य निष्फळ होईल, नव्हे त्याला विपरीत फळेच येतील असे भाकित करणारे लोक औरंगजेबापाशीही होते. एवढेच की औरंगजेब स्वतः खूप शहाणा होता, त्याला खाफीखानासारख्या शिष्टाकडून शहाणपण हातउसने आणण्याची जरूर नव्हती.

तर मग औरंगजेबाने शाहूशी जे वर्तन केले त्याचा अन्वयार्थ काय लावावयाचा? हाच की, त्याचे शाहूबद्दलचे प्रेम हे खरोखरच निर्व्याज होते. संभाजीला त्याने ठार मारले पण शाहूलाही ठार मारून त्याने वडाचे तेल वांग्यावर काढले नाही. आपल्या नातवासारख्या असलेल्या त्या असहाय मुलाबद्दल प्रथम अनुकंपा आणि नंतर सहवासाने जिव्हाळा आपोआप त्याच्या अंतःकरणात निर्माण झाला असावा असा निदान तर्क तरी करण्यास हरकत नसावी. त्याच्या मायेत मायावीपणा असता तर तो न ओळखण्याइतका शाहू मूर्ख खचितच नव्हता. ते प्रेम खरोखर निरपेक्ष आहे हे त्याने मनोमन ओळखले असावे व म्हणूनच औरंगजेबाच्या मृत्यूनंतरही त्याने त्याच्या प्रेमाला उत्कटपणे प्रतिसाद दिला असावा. " धन्य कळवळ्याची जाती । करी लाभाविण प्रीति " असे तुकारामाने म्हटले आहे व स्वार्थी व निःस्वार्थी प्रीतीतला फरक दाखविताना रस्किनही म्हणतो की– " सेवकाच्या कृतज्ञतेचा फायदा उठविण्याच्या हिशेबाने त्याला प्रेमाने वागवा; तुम्हाला त्यामुळे काहीही फायदा होणार नाही, पण कोणताही उद्देश न धरता प्रेम द्या व तुमचे सारे उद्देश आपोआप साध्य होतील. सर्व बाबतीप्रमाणे आर्थिक बाबतीतही जो जीवन गमावतो तो राखतो, जो राखतो तो गमावतो."

हे पटायला थोडे जड जाते हे खरे. कारण राजकारणातली औरंगजेबाची जी प्रतिमा आपणापुढे आहे ती कपटी, कारस्थानी, धर्मवेडी, क्रूर अशा प्रकारची आहे. पण राजकारणाचे निकष निराळे व व्यक्तिगत जीवनातले निकष निराळे. आपल्या भावांचे मुडदे पाडणारा औरंगजेब आपली बहीण गौहर आरा हिच्या मृत्यूने ढसढसा रडला हे आपण विसरतो. त्याचे धर्मवेड लक्षात घेताना हीही गोष्ट त्याच्या बाजूने लक्षात घेणे न्यायाची आहे की सूर्याजी पिसाळ वतनासाठी मुसलमान झाला असतानाही औरंगजेबाने न्यायाची चाड राखून वाईची देशमुखी त्याला न देता दत्ताजी पिसाळाला दिली; आणि शाहूला मुसलमान करण्याचे जाहीर केले असताही ऐन वेळी त्याने हुकूम मागे फिरविला. अहोरात्र राजकारण करणाऱ्या ह्या निर्विकार माणसाच्या अंतःकरणात निःसीम प्रेम करण्याची पात्रता होती. झैनाबादीच्या बाबतीत त्याची एकदा प्रतीति येऊन गेली होती व उदेपुरीच्या बाबतीत ती येतच होती. मनाचे हे

मार्दव शाहूच्या बाबतीत पराकाष्ठेच्या वात्सल्याच्या रूपाने प्रकट झाले असे जर मानले – आणि राजकारणी माणूसही असा असू शकतो, कारण अखेर तो 'माणूस' असतो – तर औरंगजेबाने शाहूशी केलेले वर्तन हे त्याच्या व्यक्तिमत्त्वातले अत्यंत उदात्त वैशिष्टच समजावे लागेल. अर्थात् औरंगजेब राजकारणी होता हा एक पक्ष व तो राजकारणी शाहूच्या बाबतीत निदान सर्वस्वी तरी नव्हता हा दुसरा पक्ष–हे दोन पक्ष धरून शाहूबद्दलचे औरंगजेबाचे वर्तन स्पष्ट करू पाहणारे हे तर्क आहेत, सिद्धान्त नव्हेत हे सांगणे जरूर आहे.

असो. खेडचा मुक्काम संपत आला. महाराष्ट्रातली किल्ल्यांवरची मोहीमही संपलेली होती. औरंगजेबाला सत्त्याऐंशीवे वर्ष चालू होते. पण विश्रांतीचा विचारही त्याच्या मनात येत नव्हता.

हमीदुद्दीनखानानें त्याची एक आठवण दिलेली आहे.

मुअजमला त्याने बंदिवासातून मुक्त केले व काबूलला त्याची नेमणूक केली. त्याला निरोप देताना त्याने उपदेशाचे दोन शब्द त्याला सांगितले–"बादशहाने कधीही स्वतःला आरामाची सवय जडू देऊ नये; कारण या सवयीमुळेच राज्ये कोसळतात व सत्ता नष्ट होते. शक्य असेल तितका नेहमी फिरत जा. कारण कवीने म्हटले आहे " एकाच जागी राहणे हे पाण्याला व राजाला दोघांनाही सारखेच वाईट आहे. पाणी गढूळ होते व राजाची सत्ता निसटते. सन्मान, विश्रांति, राजवैभव प्रवासात आहे. सुखाची व चैनीची चटक त्यांना (राजांना) बेभरंवशाचे बनवते."

उत्तर कर्नाटकात वाकिणखेडचाच्या बेडर जमातीने पिडनायकाच्या पुढारपणाखाली मराठ्यांशी हातमिळवणी करून धुमाकूळ घातला होता. आजपर्यंत दिलेरखान, रणमस्तखान, रुहुल्लाखान, फिरोजजंग असे नामांकित सरदार औरंगजेबाने त्याच्यावर पाठविले होते. पण कधी लढाई देऊन तर कधी खंडणी देऊन पिडनायकाने आपले संस्थान तरते ठेवले होते. संताजी घोरपडे, बहिर्जी घोरपडे, राणोजी घोरपडे या सर्वांशी त्याचे सूत होते. इतकेच नव्हे तर अनेक मराठे सरदारांचे कबिलेच वाकिणखेड्यात होते. आधी बेडर म्हणजे लढवय्ये, पटाईत बर्कंदाज. त्यात त्यांना मराठ्यांची साथ मिळालेली म्हणजे आगीला वाऱ्याची साथ मिळावी तसे झाले. आता तर विजापूर त्याच्या हाती पडण्याचा धोका उत्पन्न झाला. तेव्हा त्यांच्या परिपत्यासाठी स्वतःच जाण्याचे ठरवून औरंगजेबाने २२ ऑक्टोबर १७०४ रोजी खेडचा मुक्काम हलविला.

प्रवास करता करता भीमेच्या काठाने औरंगजेबाची स्वारी पंढरपूरला आली. येथून पंधरा मैलांवर ब्रह्मपुरीला त्याची छावणी होती. दहा वर्षांपूर्वी त्याने प्रथम तेथे छावणी केली, तेव्हा त्याच्या धास्तीने पंढरपूरच्या बडव्यांनी विठ्ठलाची मूर्ति देगावच्या सूर्याजी पाटलाच्या वाड्यात लपवून ठेवली; औरंगजेब ब्रह्मपुरी सोडून

किल्ले घेण्यासाठी १६९९ मध्ये जेव्हा बाहेर पडला तेव्हाच बडव्यांनी ती मूर्ति परत आणली. सहा वर्षानंतर परत औरंगजेबाचे पाय पंढरपूरला लागले.

पंढरपूरला मुक्काम असताना औरंगजेबाने एक पुण्यकार्य केले. त्याच्या दरबारचा अखबार सांगतो–

'काल रात्री ख्वाजा मुहमदशहा मुहतसब याने बादशहांना पुढीलप्रमाणे कळविले,–पंढरपूर गावात देवालय आहे. लष्करातील हिंदु माणसे मोठ्या संख्येने तेथे जातात व मूर्तीची पूजा करतात. यावर बादशहांनी मुहमद खलील, बेलदाराचा अधिकारी खिदमतराय, व मुहमद अमीन यांना हुजुरात बोलाविले. आज्ञा झाली की देऊळ उद्ध्वस्त करण्यात यावे व लष्करच्या कसाबांना देवळात नेण्यात यावे व त्यांच्याकडून गायीची हत्या करण्यात यावी. तरबियतखान बहादुरचा मुलगा मुहम्मद इसहाक याने जाऊन गर्दी (देवळातील) हटवावी.

त्याप्रमाणे अमलबजावणी करण्यात आली.' (२ जानेवारी १७०५)

अशा प्रकारे पंढरपूरला वाकिणखेड्याच्या स्वारीचा शुभमुहूर्त करून औरंगजेबाने पुढे कूच केले. ८ फेब्रुवारी १७०५ रोजी तो वाकिणखेड्यास दाखल झाला.

□ □

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था
११११ सदाशिव पेठ, [illegible],
[illegible] चौक, पुणे-४११ ०३०

# (१४)

१६९९ च्या ऑक्टोबरात ब्रहमपुरीची आपली छावणी सोडून औरंगजेब मराठ्यांचे किल्ले घेण्यासाठी बाहेर पडला. १६९९ मध्ये वसंतगड काबीज करून त्याने या मोहिमेचा शुभारंभ केला व १७०५ मध्ये राजमाची घेऊन परिसमाप्ति केली. या सहा वर्षांच्या काळात औरंगजेबाने स्वत: जातीनें हजर राहून वसंतगड, सातारा, पन्हाळा, विशाळगड, सिंहगड, राजगड व तोरणा हे मोठे किल्ले घेतले. त्याच्या सरदारांनी परळी, वर्धनगड चंदनवंदन, सामानगड, भुदरगड, कलानिधि, लोहगड व राजमाची हे किल्ले हस्तगत केले. मिळून सहा वर्षांत चौदा किल्ले औरंगजेबाने सर केले.

वसंतगडापुढे आपला तळ देताना औरंगजेबाने आपल्या या मोहिमेचा उद्देश नि:संदिग्ध शब्दांत जाहीर केला– "ही मोहीम काढण्यात माझा हेतु केवळ जिहाद करणे हा आहे. या सेवेनें परमेश्वर आणि पैगंबर हे संतुष्ट होवोत." किल्ल्यावर मोहीम करण्याचा उद्देश खाफीखानाने अधिक निश्चित शब्दात सांगितलेला आहे. "या दुष्ट जमातीचे निवासस्थान म्हणजे किल्ले. ते जिंकून घ्यावे व या कुटिल जमातीची पाळेमुळे खणून काढावी. या कामाच्या मागे लागले पाहिजे. बादशहाने या मोहिमेचा पक्का निर्धार केला." स्वत: औरंगजेबाचे मत असेच असावे यात शंका नाही. पहिला किल्ला त्याने जिंकला तो वसंतगड. त्याला त्याने नाव दिले 'किली–द– फतेह.' म्हणजे विजयाची किल्ली. म्हणजे मराठ्यांचे किल्ले सर करणे हीच त्यांच्यावर विजय मिळविण्याची गुरुकिल्ली आहे ही औरंगजेबाची भावना या नावातून प्रतीत होते. नावात काय आहे असे कवि खुशाल म्हणोत. औरंगजेबाने दिलेल्या प्रत्येक नावामागे इतिहास आहे, त्याची संस्कृति आहे व त्याची भावना आहे. सहा वर्षे जीव तोडून औरंगजेबाने हा खटाटोप केला. त्यावरूनच त्याला ही गोष्ट किती महत्त्वाची वाटत होती हे दिसून येईल.

सहा वर्षांच्या या भगीरथ प्रयत्नांचा फलश्रुति काय? औरंगजेबाने गमावले किती व कमावले किती ? 'मुळावर घाव घातला की फांद्या आपोआप खाली येतील' या न्यायाने मराठ्यांचे किल्ले घेतले की त्यांच्या बेबंद आक्रमणाला आपोआप पायबंद बसेल असा त्याचा हिशेब होता. तो कितपत बरोबर ठरला ?

औरंगजेब हा हाती घेतलेल्या कामात सर्वस्व पणाला लावणारा जिद्दी माणूस होता यात शंकाच नाही. केवळ मनुष्यहानीचाच विचार केला तर मनूची म्हणतो की औरंगजेबाच्या मोहिमेत दरसाल एक लाख माणसे व तीन लाख जनावरे मरत असत. पण अतिशयोक्ति हा मनूचीचा आवडता अलंकार आहे. तो बाजूला ठेवला

तरी लढाईत मेलेले, मराठ्यांनी छापा घालून मारलेले, पुराने, चिखलाने, उपासमारीनें, अपघाताने, हालअपेष्टांनी मेलेले मोगल सैनिक व बाजारबुणगें यांची संख्या स्तिमित करणारी आहे. माणसांची ही कथा तर जनावरांबद्दल बोलायलाच नको. ज्या रांगणा, खेळणा प्रदेशांत औरंगजेब मोहीम काढीत असे, तेथला पावसाळा उंटांना बिलकूल मानवत नसे. तीच गोष्ट हत्ती, घोडे, बैल, गाढवे यांची. पावसाने व पुराने त्यांची वाताहत होई. हत्ती गाढवाप्रमाणे दलदलीत रुतून बसत. माणूस व जनावरे यांच्याप्रमाणे सामान व सरंजाम पावसाने किती निकामी झाला, मराठ्यांनी किती लुटला, व मराठ्यांच्या हाती पडू नये म्हणून मोगलांनी स्वतःच्या हातांनी किती जाळून टाकला याची गणती करणे खरोखर अशक्य आहे. याशिवाय तोफा, दारूगोळा, बंदुका, दमदम्याला लागणारे लाकूड, लाकडे तोडणारे बेलदार, गवंडी, इत्यादींचा हिशेब निराळाच. यातली एकही गोष्ट, एक शिपाई, एक तंबू, एक उंट, एक बैल, एक घोडा, एक हत्ती, पैसा मोजल्याशिवाय मिळणे शक्य नव्हते. औरंगजेब मोहिमेवर असला म्हणजे मराठे छापे घालून त्याची रसद तोडीत. त्यामुळे सामान्यतः त्याच्या छावणीत दुष्काळच असे. रुपयाला दोन शेर तीन शेर धान्य मिळे. सैन्याला पगार महिनोमहिने मिळत नसे. त्यात पुन्हा किल्लेदाराला पन्नास हजारापासून दोन लाखापर्यंत लाच देणे भाग पडे. अशा सर्व दृष्टींनी विचार करता पैशाच्या बाजूनेही ही मोहीम औरंगजेबाला फार खर्चाची पडली असे म्हणणे भाग आहे.

खाफीखान म्हणतो – "शहाजहान बादशहाने साठविलेला सगळा खजिना बादशहाने ओतला." खाफीखानाच्या शब्दांत फार अर्थ आहे. शहाजहानचा खजिना किती होता? शहाजहानची कारकीर्द म्हणजे मोगल बादशाहीचे सुवर्णयुग होते. त्याच्या राज्यातील बावीस सुभ्यांचा वसूल दरसाल छत्तीस कोटी रुपये होता. शहाऐंशी लाख रुपयांची रत्ने रत्नशाळेतून निवडून काढून व एक कोटी रुपये खर्च करून त्याने मयूरसिंहासन बनविले. पन्नास लाख रुपयांचा ताजमहाल बांधला. एवढे कलाकौशल्यावर खर्च करून अखेरीस त्याने चोवीस कोटी रुपये शिल्लक ठेविले होते. शिवाय सोन्याचांदीचे इतर अपार दागिने होते ते निराळेच. त्याच्या मंत्र जपण्याच्या दोन माळाच मुळी वीस लाख रुपयांच्या होत्या. हा सर्व खजिना औरंगजेबाला मिळाला. तो बादशहा झाल्यावर चौदाशे गाड्यांवर लादून हा प्रचंड खजिना त्याने आग्र्याहून दिल्लीला आणला. हा सर्व अपरंपार पैसा त्याने मराठ्यांच्या स्वारीत ओतला. मनूची तर म्हणतो की एवढ्याने भागले नाही, म्हणून औरंगजेबानें अकबर, जहांगीर व नूरजहान यांचे साठविलेले खजिनें बाहेर काढले व ते वापरले. अखेर आपल्या घरातली चांदीची भांडीही वितळविली. मनूची वारेमाप लिहीत असेलही. पण ही गोष्ट खरीच आहे की, औरंगजेबाला पैसा पुरत नसे. त्याच्या सैन्याला वेळेवर पगार मिळत नसे. पन्हाळ्याच्या स्वारीत नॉरिसला

माहिती देणारा जो युरोपियन गोलंदाज होता त्यालाच मुळी चौदा महिने पगार मिळाला नव्हता. विशाळगडच्या स्वारीत पगारबाकी प्रचंड थकली होती, त्यासाठी सावकारांकडून सक्तीने पाच लाखांचे कर्ज काढण्याचा औरंगजेबाने विचार करताच त्यांनी छावणी सोडून जाण्याची धमकी दिली. बंगालचा सुभेदार मुर्शीदकुलीखान दरसाल चौदा लाख रुपये वसूल औरंगजेबाला नियमितपणे पाठवी म्हणून त्या बिचाऱ्याला कसेबसे खायला तरी मिळे. एक अंदाज असा आहे की कमीत कमी वीस कोटी रुपये, वीस लाख माणसे व तितकीच गुरेढोरे या मोहिमेत औरंगजेबाने वीस वर्षात मराठ्यांसाठी खर्ची घातली. मराठ्यांच्याबद्दलची औरंगजेबाची ही विरोध-भक्ति वाखणण्यासारखी आहे यात शंकाच नाही.

पण लढाई आहे तेथे कर्ज आहे, अर्थनाश आहे, जीवितहानि आहे. कर्ज तर पहिल्या बाजीरावालाही होते. " शिलेदारांच्या पाया पडता पडता कपाळ छिनत चालले " असे त्याचे उद्गार आहेत. मरताना त्याला चौदा लाख रुपये कर्ज होते व तीस सावकार होते. पण त्यामुळे त्याच्या पराक्रमाला कमीपणाही येत नाही व त्याला कोणत्याही मोहिमेत कधी अपयशही आले नाही. कारण मोहीम यशस्वी होते ती पैशापेक्षाही मोहीम करणाऱ्या सैनिकांच्या वृत्तीवर. या बाबतीत बाजीरावाने आपल्या सैनिकांची मने पूर्ण जिंकलेली होती, व त्यांना माया लावलेली होती. बाजी भिवराव रेठरेकर तारापूरच्या लढाईत ठार झाल्यावर त्याच्या आईला लिहिलेल्या पत्रात बाजीराव म्हणतो– " आमचा तर भाऊ गेला. सारांश, मीच तुमचा बाजीराव असा विवेक करून धीर धरावा. " अशा सेनापतीवरून कोणता सैनिक आपला जीव ओवाळून टाकणार नाही ?

या दृष्टीने पाहिले तर औरंगजेबाच्या या मोहिमेत एकच सेनापति व एकच सैनिक होता– तो म्हणजे फक्त औरंगजेब. एक औरंगजेब सोडला तर बाकी कोणालाही या वीस वर्षे चाललेल्या मोहिमेत काडीचाही अर्थ वाटत नव्हता. मोठमोठ्या कामदारांवर कोकणासारख्या अवघड मोहिमांत प्रसंग यावयाचे की स्वत: पीठ घेऊन कोणाच्या तरी घरी जावे आणि दोन रुपये देऊन तेवढ्याची भाकरी भाजून घ्यावी. नोकराचाकरांना तर झाडाचा पाला मिळाला म्हणजे भाग्य. असले सगळे हाल सोसून बहादुरगडसारख्या ठिकाणी मुक्कामाला येऊन जरा कुठे श्वास टाकावा तोंच पुढे दुसऱ्या किल्ल्याकडे निघायचा हुकूम व्हायचा. "कूचाचा हुकूम ऐकून लष्कराच्या हृदयात धडकी भरली" "कूचाचा हुकूम ऐकून लष्कराच्या कष्टी हृदयावर दुःखाचा डोंगर कोसळला " असे खाफीखान म्हणतो. ते काही खोटे नाही. अक्षरशः थकलेल्या बैलाला पराणी टोचून उठवावे, तसा औरंगजेब आपल्या लष्कराला चालवीत असे. त्यांचे मनच मुळी त्या मोहिमेत नव्हते. आणि असेल तरी कसे ? भीमसेनाने फार हृदयद्रावक वर्णन केलेले आहे– " बादशहा गादीवर आल्यापासून तो एखाद्या शहरात राहिला आहे असे कधीच

झाले नाही. सारख्या मोहिमाच मोहिमा चालू झाल्या. त्यामुळे सरदार सैनिकांना एकाकी जीवन कंठावे लागले. त्यामुळे ते बेजार झाले. त्यांनी आपली बायका-माणसे लष्करात बोलावून घेतली आणि लष्करातच त्यांनी आपला संसार थाटला. तेथेच त्यांना मुलेबाळे झाली ती लष्करातच वाढून मोठी झाली. आणि लष्करातच म्हातारी झाली, आणि लष्करातच मरण पावली. दगडामातीच्या घराची तोंडे काही त्यांच्या दृष्टीस पडली नाहीत. त्यांना हेच वाटे की जगात उत्तम निवास-स्थान म्हणजे तंबू होत." राजहट्ट कसा असतो याचा हा विलक्षण नमुना आहे !

औरंगजेबाच्या स्वारीतली ही सुखे जगजाहीर होती. त्यामुळे, दरसाल उत्तरे-कडून ताज्या दमाच्या फौजेची भरती करण्याचा त्याचा शिरस्ता असला तरी भरती होण्यास स्वखुषीने तयार होणारे महंमद मुरादखानासारखे लोक सामान्यतः थोडेच असत. गोव्याचा फौजदार असताना त्याने स्वतःच बादशहाकडे येण्याची तयारी दाखविली व लिहिले की, "या वेळी बादशहा जिहाद करीत आहेत. काफरांचे किल्ले जिंकून घेण्याकरिता ते कटिबद्ध झाले आहेत आणि आपण सुखाने काळ कंठावा हे आपल्याला आवडत नाही. बरे आज्ञेवाचून आपल्या सेवेत हजर होता येत नाही. मला आपल्याजवळ नेमण्यात आले तर एखाद्या खानाजाद्याला आपला नायब म्हणून येथे सोडून मी आपल्या सेवेत हजर होईन. शक्य तितकी माणसेही मी आपल्याबरोबर घेऊन येईन आणि जिहाद करण्याचे पुण्य अंशतः तरी मला लाभेल." औरंगजेबाला त्याची अर्जी वाचून मोठेच कौतुक वाटले. त्याने सहा महिन्यांचा प्रत्येक स्वाराला साठ रुपये असा पगार ठरवून हजार स्वार बरोबर आणावे असे त्याला कळविले. त्याप्रमाणे महंमद मुराद-खानाने पन्हाळ्याच्या वेढ्यात उत्कृष्ट कामगिरी बजाविली हे प्रसिद्धच आहे. पण स्वेच्छेने बादशहाच्या सेवेत हजर होण्याची व जिहाद करण्याचे पुण्य संपादन करण्याची मनीषा बाळगणारे महंमद मुरादखानासारखे लोक हाताच्या बोटावर मोजण्याइतके होते. बहुतेकजण गुजराथचा सुभेदार शुजाअतखानासारखेच पळवाट काढू पाहणारे होते.

पन्हाळ्याला जात असता औरंगजेब सैन्याची जमवाजमव करण्यासाठी मुद्दाम मिरजेला थांबला होता. प्रत्येक प्रांताच्या सुभेदाराने हजार स्वार तयार करून पाठवावे असा त्याचा हुकूम होता. त्याप्रमाणे शुजाअतखानाने आपला दत्तक मुलगा नजरअलीखान याच्याबरोबर हजार स्वार पाठवावे असे त्याला कळवि-ण्यात आले. शुजाअतखानाने मुलाला तर पाठविलेच नाही— उलट कळविले की अहमदाबादचे लोक मोहिमेवर येण्यास तयार नाहीत. याबद्दल त्याने दोन लाख रुपये पाठविले.

शुजाअतखानाच्या या चुकारतट्टूपणामुळे औरंगजेबाला अतिशय संताप आला. त्याने त्याला कडक पत्र लिहिले की— "तुम्ही शहाणे आहात. तुमच्या

बुद्धिमत्तेचे कौतुक करावे तितके थोडेच आहे. तुमच्यावर इतके उपकार केले आणि लहान हुद्द्यावरून मोठ्या हुद्द्यावर चढविले. सुभेदारीची कामे तुम्ही करीत आहात. या वेळी मी जिहाद करीत आहे व दुष्ट काफरांचा नायनाट करण्याकरिता अखंड परिश्रम करीत आहे. धर्माचा अभिमान असणाऱ्या प्रत्येक मुसलमानाने या वेळी जिहादीत गुंतलेल्या इस्लामच्या बादशहाला मदत केली पाहिजे. सरकारी खजिन्यांतून पैसे खर्च करून हजार स्वार पाठवा म्हणून मी हुकूम केला होता. पण यात तुम्ही टाळाटाळ केलीत. निरनिराळी कारणे दाखविलीत. आपल्या दत्तक मुलाला पाठविण्यात अशीच वागणूक केली. आमच्या रागाची काळजी केली नाही. यात तुमचे फुटके नशीब, दुसरे काय ? स्वार पाठविता आले नाहीत म्हणून तुम्ही अल्प रक्कम पाठविली आहे. ही रक्कम म्हणजे सूर्याला धूळ दाखविणे किंवा समुद्रात पाण्याचा एक थेंब घालण्यासारखे आहे. आमचे हिंदुस्थानचे साम्राज्य म्हणजे अथांग समुद्र आहे. प्रत्येक वर्षी आणि प्रत्येक महिन्यात कोट्यवधि रुपये दाखल होतात आणि खर्च होतात. तुम्ही एकनिष्ठ सेवक आहात. बादशहाची भक्ति हीच तुमची आराधना होय. तुम्हीच इकडे येण्याची तयारी दाखविण्यास हवी. तुम्ही ताबडतोब अयोग्य विचार आपल्या मनातून काढून टाकावेत आणि आपल्या दत्तक मुलाबरोबर उमदी फौज पाठवावी.''

औरंगजेब एवढे करूनच थांबला नाही. त्याने कडक गुर्जबर्दार नजरअलीखानाला आणण्यास अहमदाबादेस पाठविले. त्याप्रमाणें त्या अडेलतट्टू नजरअलीला ते गुर्जबर्दार पुढे घालून घेऊन आले. पण हे म्हणजे रडतराऊला घोड्यावर बसविण्यासारखे होते. नजरअलीखानाला, काही मराठ्यांशी लढायची हिंमत नव्हती. "ढालतरवारे गुंतले हे कर । म्हणे तो जुंझार कैसा जुंझो ''अशी नजरअलीखानाची अवस्था होती. तो ब्रह्मपुरीला आला आणि त्याने आसदखानाला सपाटून लाच चारली. उद्देश हा की आसदखानाने बादशहापाशी जोरदार शिफारस करून नजरअलीखानाला ब्रह्मपुरीस राहण्याची परवानगी मिळवून द्यावी. पुढे काय झाले हे समजण्यास मार्ग नाही. पण आसदखानावर औरंगजेबाची मर्जी असली तरी तो त्याच्या तंत्राने चालणारा नव्हता. जरूर वाटली तेव्हा औरंगजेबाने खुद्द आसदखानाला त्याच्या ब्रह्मपुरीच्या रंगमहालातून, दारूच्या बुधल्यांतून आणि बायकांच्या गराड्यांतून दरदरा ओढीत बाहेर काढले आणि खेळण्याच्या मोहिमेत आपल्याबरोबर चालविले. त्याच प्रवासात वादळी पावसात उडालेली राहुटी आसदखानाच्या टाळक्यावर आदळली व त्याला खायलाही मिळाले नाही हे आपण मागेच पाहिले आहे. जिथे आसदखानासारख्या बड्या धेंडाची ही स्थिति, तेथे नजरअलीखान म्हणजे कोण्या झाडाचा पाला !

अशी ही औरंगजेबाची कदर होती म्हणजे मुद्दा तोच. स्वखुषीने किंवा संतोषाने काम म्हणून कोणी करणार नाही. बैलाला पराणी टोचली तरच बैलोबा पुढे पाऊल टाकणार. हा सगळा धाकाचा आणि भीतीचा मामला होता आणि तो मात्र जबर होता. फणा काढून टवकारत पाहणाऱ्या नागापुढे उभे असलेल्या माणसाप्रमाणे औरंगजेबापुढे सारे थरथर कापत असत. एवढा दूर काबूलला असलेला त्याचा मुलगा मुअज्जम, पण बापाचे पत्र पाहिले की त्याच्या पोटात गोळा उठे आणि चेहरा पांढरा फटक होई. या धाकामुळे असेल किंवा धर्मद्वेषामुळे असेल, पण मराठ्यांना मिळालेले औरंगजेबाकडचे मोगल जवळजवळ कोणीही नव्हते. आणि मुद्दाम कुचराई अशी औरंगजेबाच्या सैन्यात कोणी केल्याचे उदाहरण नाही. या दृष्टीने सैन्यात सुसूत्रता आणि हुकुमत राखण्याच्या बाबतीत औरंगजेब मराठ्यांपेक्षा उजवा ठरला असे म्हणावेसे वाटते.

असा हा कसलेला व जिद्दीचा सेनापति, असे हे हुकमतीत वागणारे सैन्य, असा हा पाण्यासारखा ओतलेला पैसा, पण या सर्वांचा किल्ले घेऊनही मराठ्यांच्या आक्रमणाला पायबंद घालण्याच्या दृष्टीने काहीही उपयोग झाला नाही. उलट त्यांचे आक्रमण वाढतच गेले. कारण महाराष्ट्रातल्या डोंगराळ मुलखात एकेका किल्ल्यासमोर औरंगजेब पन्नास पन्नास हजार फौज घेऊन सहा सहा महिने बसू लागला. त्याच्याबरोबर तरबियतखान, हमीदुद्दीनखान, फतेउल्लाखान, रुहुल्लाखान, बहरामदखान, मुखलिसखान इत्यादि नामांकित सरदारही अडकून पडू लागले. बाहेर मराठ्यांच्या मागे धावायला फक्त झुल्फिकारखान, फिरोजजंग व बेदारबख्त एवढे मोकळे असत. पण ते बिचारे धावून किती धावणार? अलीमर्दानखान, रुस्तुमखान, खुदाबंदाखान, हसनअलीखान असे जे दुय्यम सरदार व सुभेदार होते, त्यांना मराठे मोजतही नसत. असा प्रकार सहा वर्षे चालला. आणि या सहा वर्षांत मराठ्यांनी उत्तरेत उज्जयिनीपासून दक्षिणेत मच्छलीपट्टणापर्यंत आक्रमण करून एकच कहर उडवून दिला. आधी महाराष्ट्रात वामनाप्रमाणे असलेल्या मराठ्यांनी आता बळीला पाताळात दडपणाऱ्या उग्र त्रिविक्रमाचे रूप धारण केले. दास मारुतीचा वीरमारुति झाला. संरक्षक युद्धाची परिणति आक्रमक चढाईत झाली. मराठे केवळ अनावर झाले. खाफीखान मार्मिकपणाने म्हणतो "बादशहाने मराठ्यांच्या मुलुखात शिरून त्यांचे गगनचुंबी किल्ले घेतले. मराठ्यांना त्याने बेघर करून सोडले. पण मराठ्यांचा पराक्रम वाढतच गेला. बादशहा आणि त्यांचे अमीरउमराव दूर डोंगराळ मुलुखात आहेत, हे पाहून मराठे मोठमोठी सैन्ये घेऊन बादशाही मुलुखात आक्रमण करून उच्छाद मांडू लागले."

१६९९ च्या ऑक्टोबरात औरंगजेब वसंतगडाला वेढा घालून बसला असतानाच संताजी घोरपडेचा मुलगा राणोजी घोरपडे आणि भाऊ बहिर्जी ऊर्फ हिंदुराव घोरपडे यांनी कर्नाटकात धामधूम उडवून दिली व हुबळी कसबा हस्तगत केला.

दक्षिणकडे हिंदुराव घोरपडे याप्रमाणे कर्नाटकात मोहीम करीत असता त्याच वेळी उत्तरेस कृष्णा सावंत या सरदाराने नर्मदापार होऊन माळव्यात प्रवेश केला व धामुनीच्या प्रदेशात धामधूम मांडली. मराठ्यांनी नर्मदा ओलांडली हे मोगल साम्राज्याच्या दृष्टीने अरिष्टाचे पूर्वलक्षण होते. भीमसेन सक्सेना म्हणतो "मुसलमान सुलतानांच्या काळापासून आजपर्यंत मराठे कधीच नर्मदापार झाले नव्हते." यात मराठ्यांपेक्षा औरंगजेबाचीच करामत जास्त म्हटली पाहिजे, तो त्यांच्या किल्ल्यांत शिरला म्हणून ते त्याच्या घरात शिरले. त्याने त्यांना 'बेघर' केले व नर्मदेच्या पार 'हाकून' लावले !

पुढील वर्षी औरंगजेबाने पन्हाळ्याला वेढा घातला असता राणोजी घोरपड्याने गुलबर्ग्याकडे धामधूम सुरू केली. त्याच्यावर फिरोजजंगाची औरंगजेबाने रवानगी केली. पण तो जाऊन पोचण्याच्या आत राणोजी वीस हजार फौजेनिशी पन्हाळ्याच्या परिसरात येऊन दंगल उडवू लागला. पण हे काहीच नव्हे असा तडाखा पुढल्या वर्षी औरंगजेबाला बसला. त्या वर्षी म्हणजे १७०२ मध्ये त्याने खेळण्याला वेढा घातला. भीमसेन म्हणतो "बादशहाने खेळण्याला वेढा घातला त्या वेळी मराठ्यांचा जोर सर्वत्र वाढला. त्यांनी ठिकठिकाणच्या वाटा बंद पाडल्या लूटमार करून ते संपन्न बनले. मी तर असे ऐकले आहे की बादशहाला आयुरारोग्य लाभावे म्हणून मराठे दर आठवड्यास देवाची प्रार्थना करून आपापसांत प्रसाद आणि दक्षिणा वाटीत !"

खेळण्याला औरंगजेब वेढा घालून बसला असता मराठ्यांनी बुऱ्हाणपूरवर हल्ला चढविला. त्यांनी ते शहर उद्ध्वस्त केले व तेथील बेदारबख्ताचा नायब सुभेदार अलीमर्दानखान हैदराबादी याला कैद केले. त्याने जेव्हा खंडणी दिली तेव्हाच त्याची सुटका झाली. यानंतर त्यांनी गोवळकोंड्याकडे कूच केले आणि तेथूनही धमक्या देऊन मोगल सुभेदाराकडून सपाटून खंडणी वसूल केली.

खेळणा घेतल्यानंतर औरंगजेब डिसेंबर १७०२ मध्ये सिंहगडाकडे निघाला. त्याच सुमारास म्हणजे जानेवारी–फेब्रुवारी १७०३ च्या सुमारास मराठ्यांची तीस हजार फौज गुजरातवर कोसळली. खानदेश मार्गाने तापीच्या खोऱ्यातून कूच करून ते सुरतेजवळ येऊन थडकले. पण या वेळी त्यांनी शिवाजी महाराजांप्रमाणे सुरतेची बेसुरत केली नाही. सुरतेच्या परिसरातली फक्त थोडीशी खेडी जाळली आणि ते परत फिरले. पण गुजरातमध्ये मराठ्यांनी या वेळी चंचुप्रवेश केला हीच चिंतेची बाब होती.

पण या वर्षीचे सर्वांत महत्त्वाचे मराठ्यांचे आक्रमण म्हणजे माळव्यावरचे होय. त्यांचे नेतृत्व नेमाजी शिंद्याकडे होते. त्याच्याबरोबर केशव त्रिमल व परसोजी भोसले होते. त्याचप्रमाणे पवार घराण्यातील काळोजी व संभाजी व त्यांचे चुलते केरोजी व रायाजी हेही होते. पन्नास हजार घोडदळाची ही जंगी फौज प्रथम

वऱ्हाडात घुसलो व तेथे धामधूम उडवू लागलो. वऱ्हाडची सुभदारी गाजीउद्दीन फिरोजजंगाकडे होती. पण त्याचा नायब म्हणून रुस्तुमखान विजापुरी हा काम पाहात होता. मराठे वऱ्हाडात घुसल्याचे पाहून तो एलिचपुराहून निघाला, व त्यांच्यावर चालून गेला. लढाईत मराठ्यांनी त्याचो दोन हजार माणसे कापून काढली. त्याचा जावई ठार केला व त्याला स्वतःला कैद केले. संताजी घोरपड्याने साताऱ्च्या लढाईत तेरा वर्षांपूर्वी त्याला असाच चतुर्भुज केला होता. मागच्या सिलसिल्याप्रमाणे याही वेळी मराठ्यांना भक्कम खंडणी देऊन रुस्तुमखान त्यांच्या तावडीतून मुक्त झाला. रुस्तुमखानाचा पाडाव केल्यानंतर मराठ्यांनी नर्मदा ओलांडली व ते माळव्यात घुसले.

माळव्यात शिरल्यावर मराठ्यांनी आपल्या फौजा विभागल्या. एक फौज उज्जयिनीवर चालून गेली व तिने लुटालूट सुरू केली. दुसऱ्या फौजेने सिरोंजला वेढा दिला. मराठ्यांच्या फौजा नरवर ते सिरोंज या मार्गावरील कालाबागपर्यंत पसरल्या होत्या. माळव्यात छत्रसाल बुंदेल्याचा शिवाजीमहाराजांसारखाच मोगलांच्या विरुद्ध स्वराज्य स्थापनेचा उद्योग कित्येक वर्षे चालला होता. त्याच्याशी हातमिळवणी करून नेमाजी शिंद्याने सगळा माळवा उद्ध्वस्त करून टाकला.

माळव्यावर या वेळी शाहिस्तेखानाचा मुलगा अबूनसरखान हा सुभेदार होता. शिवाजीचे मराठे हे काय प्रकरण आहे याचा त्याच्या बापाला अनुभव आला होताच. रुस्तुमखानाला कैद करून मराठे आपला परामर्श घेण्यासाठी येत आहेत हे पाहून त्याने मराठ्यांना चकविण्यासाठी युक्ति केली. तो उज्जयिनीमध्येच लपून राहिला आणि मराठ्यांना मुळी सापडलाच नाही. अशा प्रकारे बादशाही सुभेदारांना लढाईत पकडून दंड उकळण्याची मराठ्यांना जी दुष्ट खोड जडली होती ती त्याने चांगली मोडली. तो लढला नाही, तो सापडला नाही. त्याने दंडही भरला नाही. त्याने चामडीही बचावली व दमडीही बचावली. याला म्हणावे कावेबाजपणा. उज्जयिनीजवळच मांडवगडचा किल्लेदार नवाजिशखान होता. त्याने मराठ्यांशी लढायची तयारी केली व अबुनसरखानाकडे कुमक मागितली. तेव्हा सुभेदारसाहेबांनी पन्नास हजार मराठ्यांविरुद्ध लढण्यासाठी त्याच्याकडे थोडीथोडकी नव्हे तर साठ स्वारांची प्रचंड कुमक पाठवून त्याचे हात बळकट केले. आपल्या सुभेदाराचे असले सहकार्य पाहून नवाजिशखानाचीही घाबरगुंडी उडाली व तो धारला पळून गेला.

धनधान्याने समृद्ध असलेली माळव्याची ही 'अनूपभूमि' हिंदुस्थानच्या अगदी मध्यावर आहे. उत्तरेकडून दक्षिणेकडे जाणारे मोगलांचे रसदेचे व सैन्याचे सगळे मार्ग माळव्यातूनच जात होते. त्यामुळे माळवा हे खरोखरच मोगलसाम्राज्याचे काळीज होते. त्या काळजावरच मराठ्यांनी आघात केलेला पाहून औरंगजेब चिंताक्रांत झाला. आता ही मराठी भुते आग्ऱ्यावर जाऊन कोसळतील अशी

त्याला भीति वाटली. त्याने मराठ्यांच्या मागे जाऊन त्यांना माळव्यातून हुसकून काढावे अशी फिरोजजंगाला आज्ञा सोडली. आपले बुणगे बुऱ्हाणपूरला ठेवून फिरोजजंग जो तडक निघाला, तो सिरोंजला वेढा घालून बसलेल्या नेमाजी शिंद्यावर कोसळला. लढाईत मराठ्यांचा त्याने पराभव केला. इतकेच नव्हे तर सोन्याची कुऱ्हाड असलेल्या वऱ्हाडातून मराठ्यांनी जी लूट पैदा करून आणली होती तीही त्याने त्यांच्यापासून काढून घेतली व त्यांचे कसे मोकळ केले. या वेळी अनेक मोगल कैदीही मराठ्यांच्या तावडीतून त्याने सोडविले. जबर खंडणी देऊ शकणारे हे मोगल कैदी म्हणजे मराठ्यांच्या चालत्या बोलत्या बँकाच होत्या. तेथून मराठे बुंदेलखंडाकडे गेले, पण फिरोजजंग त्यांच्या पाठीवर होताच. अखेर मराठे बुऱ्हाणपुराहून दक्षिणेस पसार झाल्याचे त्याने पाहिले तेव्हाच त्याने बुऱ्हाणपूरला येऊन दम घेतला.

फिरोजंगाची विजयवार्ता जेव्हा आली तेव्हा औरंगजेबाची स्वारी शिवाजी महाराजांच्या तोरणा किल्ल्याच्या खनपटीस बसली होती. फिरोजजंगाच्या विजयाने औरंगजेबाला पराकाष्ठेची धन्यता वाटली. त्याने फिरोजजंगास ‘ सिपाह सालार ’ ही पदवी दिली. त्याच्या स्वारांत दोन हजार स्वारांच्या मनसबीची बढती दिली व एक लाख रुपये बक्षीस दिले. त्याच्या अधिकाऱ्यांनाही बढत्या दिल्या.

फिरोजजंगाच्या या पराक्रमापेक्षा निराळाच ‘ पराक्रम ’ भीमसेन सक्सेनाने वर्णन केलेला आहे. तो म्हणतो– “ फिरोजजंग सिरोंजपर्यंत पोचला. पण त्याने नेमाजीशी युद्ध केले नाही, उलट आपण नेमाजीवर मोठा जय मिळविला असा वृत्तान्त त्याने बादशहाला लिहून कळविला. बादशहाने त्याला ‘सिपाह सालार’ ही पदवी दिली... पण खरी वस्तुस्थिति काय आहे हे बादशहाला कळून आल्यावर त्याने खान फिरोजजंगाची ‘सिपाह सालार’ ही पदवी काढून घेतली. तसेच बढत्या वगैरे दिल्या होत्या त्याही काढून घेतल्या. खान फिरोजजंग हा वऱ्हाडला परतला. ” यातले खरे खोटे काय ते एक फिरोजजंगाला माहीत की भीमसेनाला माहीत की परमेश्वराला माहीत.

पण अबूनसरखान व नवाजिशखान यांच्या बाबतीत मात्र बादशहाच्या भ्रमाचा भोपळा फुटला ही गोष्ट त्रिवार सत्य आहे. माळव्यासारख्या मोक्याच्या ठिकाणी अबूनसरखानासारखा कातडीबचाऊ माणूस ठेवल्याबद्दल बादशहाला स्वतःचा संताप जास्त आला की अबूनसरचा संताप जास्त आला हा कठीण प्रश्न आहे. त्याने त्याची माळव्यातून उचलबांगडी केली व त्याच्या जागी बेदारबख्तची स्थापना केली. त्याचप्रमाण नवाजिशखानाला मांडवगडाहून खानदेशात बदलले.

पण ज्या वेळी माळव्यामध्ये मराठी फौजेचा धुमाकूळ चालू होता त्याच वेळी दुसरी मराठी फौज हैदराबादहून पुढे होऊन मछलीपट्टणपर्यंत जाऊन पोचली

होती. या फौजेत बारा हजार घोडदळ व दहा हजार पायदळ होते. मछलीपट्टण-जवळच्या पालाकोलू या ठिकाणावर मराठ्यांनी हल्ला केला आणि आजूबाजूच्या प्रदेशांत फौजा पाठवून सक्तीने चौथाई वसूल केली. जूनमध्ये त्यांनी गोवळकोंडा लुटले आणि किल्ल्यात दडून बसलेल्या सुभेदाराकडून भलीमोठी रक्कम वसूल केली तेव्हाच त्याला सोडले.

१७०४ च्या मे महिन्यात तोरणा जिंकण्याच्या दगदगीतून औरंगजेबाची स्वारी नुकतीच मोकळी होऊन खेड-ऊर्फ मकसूदाबादला श्रमपरिहाराचे सुख अनुभवीत बसली होती. त्या वेळी धनाजी जाधव, हणमंतराव निंबाळकर आणि हिंदुराव घोरपडे यांच्या नेतृत्वाखाली पन्नास हजार मराठ्यांची फौज कर्नाटकात शिरली. मराठ्यांनी आपल्या फौजेचे तीन भाग केले. एका फौजेने थेट त्रिचनापल्लीपर्यंत खाली दक्षिणेत जाऊन तीस लाखांची खंडणी गोळा केली. दुसरी फौज गोवळ-कोंड्याकडे चाल करून गेली व तिसरी फौज कर्नाटकातील ठाणी व प्रदेश काबीज करू लागली.

कर्नाटकात या वेळी जिंजीच्या वेढ्यातील सुप्रसिद्ध दाऊदखान पन्नी होता. दाऊदखान हा झुल्फिकारखानासारखाच रणझुंजार शिपाई गडी होता. पण मराठ्यांचे संकट पाहून त्याचीही पाचावर धारण बसली– त्याने आपल्या वकिला-करवी मराठ्यांना निरोप पाठविला की आपण दोन लाख रुपये देण्यास तयार आहोत. मराठ्यांनी आपणास त्रास देऊ नये. मराठ्यांनी त्याला उत्तर पाठविले की पैसा देण्याची फिकीर खानांनी करायची जरूर नाही. पैसा वसूल कसा करावा हे मराठे चांगले जाणतात. दाऊदखानाची मराठ्यांशी जानपछान फार जुनी– म्हणजे जिंजीच्या वेढ्यापासून होती– त्याला या निरोपाचा अर्थ समजायला वेळ लागला नाही. त्याने चटकन् अर्काट सोडले व वेलोरच्या मजबूद ठाण्याचा आश्रय घेतला. पण मराठ्यांनी चालविलेली लूटमार पाहून त्याचा आत्मा पुन्हा तळमळू लागला. त्याने पुन्हा निरोप पाठविला की पाच लाख रुपये देतो. मराठ्यांनी कर्नाटकातून निघून जावे. दारी आलेल्या लक्ष्मीला परतवून लावणे हे मराठ्यांचे ब्रीदच नव्हते. त्यांनी दाऊदखानाचे अर्धे म्हणणे मान्य केले व पाच लाख रुपये खिशात घातले. पण ते कर्नाटकातून निघून काही गेले नाहीत. अदोनी व सिरा या दरम्यानच्या मुलखात ते लुटालूट करीत राहिले. अखेर १७०४ च्या ऑगस्टात अदोनीच्या जादा सुभेदारीच्या कामावर नेमणूक झाल्यामुळे दाऊद-खानाला वेलोरहून बाहेर पडावेच लागले. तो बाहेर पडल्याबरोबर मराठ्यांनी चपळाईने त्याला घेरले व त्याचा फडशा पाडण्याचा चंग बांधला. पण दाऊद-खानही मराठ्यांसारखाच चपळ होता. त्याने ताबडतोब धर्मावरम् किल्ल्याच्या आश्रयाने मोर्चे उभारले व आपल्या फौजेचे रक्षण केले. तेव्हा गाठ पडली ठका-

ठका असे समजून मराठ्यांनी त्याचा नाद सोडला व ते निघून गेले. पण जाण्यापूर्वी दाऊदखानाकडून सात लाख रुपये दंड वसूल करण्यास ते चुकले नाहीत.

एवढ्या प्रचंड मुलखात वादळ यावे आणि जावे किंवा टोळधाड यावी आणि जावी आणि मागून तिचा मागमूस उरू नये असा मराठ्यांचा प्रकार असता तर एकवेळ परवडले असते. पण तसेही नव्हते. ते जेथे जात तेथे आपले पाय रोवून बसत. मराठे सरदारांनी बादशाही परगणे आपापसांत वाटून घेतले आणि बादशाही पद्धतीप्रमाणे त्यांनी सुभेदार, कमावीसदार राहदार इत्यादि आपले अधिकारी नेमले. या सुभेदारांचे काम म्हणजे सामानसुमान किंवा खजिना घेऊन येणाऱ्या काफिल्यांची लूटमार करणे आणि कमावीसदारांना मुकाट्याने चौथाई न देणाऱ्या नाठाळ जमीनदारांना आणि मोगल फौजदारांना वठणीवर आणणे. मराठ्यांचे राहदार व्यापाऱ्यांकडून कर वसूल करीत; आणि प्रत्येक गाडी आणि बैल यांच्या मागे बादशाही अधिकारी जी राहदारी घेत तिच्या तिप्पट–चौपट राहदारी मराठे घेत. प्रत्येक सुभ्यात मराठ्यांनी एकदोन गढ्या बांधल्या होत्या. भोवतालच्या भागातून लुटून आणलेली मालमत्ता ते त्या गढ्यातून ठेवीत. अशा प्रकारे बिचारा औरंगजेब खेळणा, रांगणा, सातारा अशा प्रदेशात वाऱ्या वादळात कुडकुडत हिंडत असता, त्याच्या संपन्न मुलुखात वर्षानुवर्षे मराठे मात्र बायकामुले घेऊन हत्ती, घोडे, तंबू अशा थाटात मजेत राहात होते.

भीमसेन म्हणतो, "या सुमारास नर्मदेच्या दक्षिणेस दख्खन, खानदेश, वऱ्हाड, कोकण या प्रांतांतील परगण्यांतून आणि खेड्यांतून, सारांश, सर्वत्र, मराठे हे टोळ आणि मुंग्या याप्रमाणे पसरले होते." त्यात आश्चर्य काहीच नाही. हा प्रदेशच मुळी मराठ्यांचा होता. तो अक्षरशः 'मराठ-वाडा' होता, महाराष्ट्र होता. उपरे आणि परकी होते, ते या प्रदेशात मोगलच. औरंगजेबापाशी आणि दक्षिणच्या सुभ्यात जागोजाग तैनात केलेले सगळे सैन्य सरकारी कागदपत्राप्रमाणे फक्त एक लाख सत्तर हजार होते. एवढ्या सैन्याने समुद्रापर्यंत पसरलेल्या दक्षिणच्या विस्तृत सुभ्याचे रक्षण काय होणार होते असे भीमसेन म्हणतो ते बरोबर आहे. उत्तर हिंदुस्थान ही मोगलांची विलायत. ते विलायती बेणे दरवर्षी औरंगजेब इकडे मागवणार तेव्हा कोठे दक्षिणच्या मोगलांच्या संख्येला बाळसे येणार. त्यात पुन्हा औरंगजेबाने विजापूर आणि गोवळकोंडा ही राज्ये साफ बुडवून टाकली; त्यामुळे विजापूर राज्यातले दीड लाख आणि गोवळकोंड्याचे ऐंशी हजार सैन्य मोडीत निघाले. औरंगजेबाच्या या उपद्व्यापाचा परिणाम इतकाच झाला की हा सारा प्रदेश मराठ्यांना लुटालूट करण्यास मोकळा सापडला, आणि खंडणी मिळवून ते गबर झाले. माळव्यापासून त्रिचनापल्लीपर्यंत त्यांना अडसर असा काहीच राहिला नाही; आणि मुलुखगिरी करून जन्मात पाहिली नसेल इतकी संपत्ति त्यांना मिळू लागली. औरंगजेबाने किल्ले घेऊन त्यांना बेघर केले नसते

तर त्यांना हे भाग्य लाभलेच नसते. म्हणूनच औरंगजबाला आयुरारोग्य लाभावे म्हणून ते देवाची प्रार्थना करीत व दक्षिणा वाटीत. 'Our antagonist is our best friend' "आपला शत्रु हा आपला उत्तम मित्र असतो" या म्हणीचे इतके समर्पक उदाहरण शोधूनही सापडणे कठीण आहे.

उज्जयिनी किंवा त्रिचनापल्ली ही ठिकाणें बादशहाच्या छावणीपासून दूर होती, त्यामुळे त्यांना मराठ्यांचा उपद्रव होत होता असे म्हणावे तर खुद्द जिल्हे सुभानी हजरतींच्या प्रत्यक्ष वास्तव्याने पुनीत झालेल्या बादशाही छावणीवरही त्या काफरांच्या छाप्याची धास्ती टांगलेल्या तलवारीप्रमाणे अखंड असे. विशाळगडाहून सिंहगडाकडे जाताना औरंगजेबाने अठरा दिवस बहादुरगडला मुक्काम केला त्या अल्पावधीतही मराठ्यांनी औरंगजेबाला इंगा दाखविलाच. बादशाही फौजेतील हत्ती रानात चरण्यासाठी नेण्यात आले होते. छावणीपासून दोन कोसांवरून मराठ्यांनी हत्तींना पळविले. ते परत आणण्याच्या कामावर महंमद अमीनखानाची औरंगजेबाने नेमणूक केली. अमीनखान बडा माणूस होता. तो निजामुल्मुल्काच्या बापाचा चुलतभाऊ होता. बादशहाचा मुख्य न्यायाधीश होता, 'बहादूर' होता. ही पदवी विशाळगडच्या वेढ्यात कोकणी दरवाजाजवळची टेकडी त्याने काबीज केल्याबद्दल बादशहाने त्याला दिली होती. एवढ्या मोठ्या असामीचा मान मराठ्यांनी ठेवावा तसा ठेविला नाही ही मोठ्या दिलगिरीची गोष्ट आहे. त्यांनी त्याचे हत्ती, घोडे, इतर सरंजाम हे तर लुटलेच; पण त्याची शस्त्रास्त्रे हिरावून घेतली, व बिचाऱ्याच्या अंगावरचे कपडेही ओरबाडून घेतले. मग फजीत झालेला तो अमीनखान एकटाच रानोमाळ हिंडत एका खेड्यात पोचला. तेथल्या पाटलाला त्याची दया आली व त्याने त्याला आपल्या बैलगाडीत बसवून चांभारगोंद्याचा फौजदार इबादल्ला जोरकाशी याचेकडे पोचते केले. त्याने मग खानसाहेबांना कपडेलत्ते देऊन औरंगजेबाकडे पाठविले. औरंगजेबाने त्याला बढती दिली व त्याचा सन्मान केला. कशासाठी ते बिचाऱ्या औरंगजेबालाच माहात. कदाचित मराठ्यांनी अमीनखानाचा सदरा काढून घेऊन अपमान केला, त्याचा अहिंसक सूड घेण्याचा ही औरंगजेबाची शक्कल असावी.

असाच प्रसंग आणखी तीन वर्षांनी परत आला. औरंगजेब खेडहून वाकिणखेड्याला चालला असता बहादुरगडला उतरला. त्या वेळी मराठ्यांनी मोगल सैन्याच्या बाजारबुणग्यांवर हल्ला केला. त्यांनी बुणगे लुटले आणि बऱ्याच सामानाला आग लावून दिली. भीमसेन म्हणतो, "मागील वर्षांच्या मानाने मराठ्यांचे धाडस या वर्षी अतिशयच वाढले होते" ते खरे आहे. या वर्षी एप्रिलच्या सुमारास उत्तरेकडून दोन काफिले व खजिने आले. बुऱ्हाणपुराहुन ते औरंगाबादेकडे येत असता फर्दापुरजवळ मराठ्यांनी त्याना पूर्णपणे लुटले.

आपल्या अल्पाक्षर पण समर्पक शब्दांत खाफीखानाने मराठ्यांच्या या आक्रमणाचे चांगले वर्णन केले आहे – 'मराठ्यांनी अहमदाबाद आणि माळव्याच्या सरहद्दीपर्यंत लुटालूट करून सर्व काही धुळीस मिळविले. त्यांनी अहमदाबाद आणि उज्जैन या प्रदेशापर्यंत उच्छाद मांडला. बादशाही छावणीपासून दहाबारा कोसांवरसुद्धा ते व्यापाऱ्यांच्या काफिल्यावर तुटून पडत. बादशाही खजिन्यावरही ते हल्ले करून तो लुटून नेत. पुढे आजम खाफीखान मोठ्या खेदाने शेरा मारतात, "त्यांच्या कारवायांचे वर्णन करणे म्हणजे निरर्थक रंजीस होणे आहे." मराठ्यांचे किल्ले घेतले म्हणजे त्यांना पायबंद बसेल असे औरंगजेबाचे गणित होते ते साफ चुकले, व त्याच्या पदरी इच्छा नसता राजकारणातील 'शून्यलब्धी'चा शोध लावल्याचे मात्र अनाहूत श्रेय आले. त्याबद्दल खाफीखान म्हणतो – "बादशहा मराठ्यांचे किल्ले घेण्यात गुंतला होता, पण शेवटी मराठ्यांचा बीमोड करण्याच्या दृष्टीने त्याचा काही उपयोग झाला नाही." खाफीखान हा मराठ्यांचा द्वेष्टा असला तरी औरंगजेबाचा पक्षपाती नाही. तो दोघांनाही न्याय देणारा इतिहासकार आहे. त्याचे मत या दृष्टीने निर्णायक समजणे भाग आहे.

पण किल्ले घेण्याच्या प्रकरणातली खरी शोकांतिका याच्यापुढेच आहे. किल्ले घेण्यात औरंगजेबाची काही चूक नव्हती. पण घेतलेले किल्ले सांभाळण्याची यंत्रणा त्याच्यापाशी काहीच नव्हती. त्यामुळे महाराष्ट्राकडे त्याची पाठ फिरल्याबरोबर मराठ्यांनी गेलेले किल्ले परत घेण्यास सुरुवात केली. १७०५ च्या जानेवारीत धावजी विसार याने लोहगड काबीज केला. या वेळी औरंगजेब पंढरपुरास होता. १७०५ च्या एप्रिलमध्ये रामजी फाटक, पंताजी शिवदेव, त्र्यंबक शिवदेव यांनी सिंहगड हस्तगत केला. १७०५ च्या जूनमध्ये गुणाजी सावंत व धावजी विसार यांनी राजमाची घेतली. औरंगजेब या वेळी वाकिणखेड्याच्या बेडरांपुढे डोकेफोडी करीत बसला होता. याच प्रकारे रोहिडा व राजगड हे शंकराजी नारायणाने सर केले. पन्हाळा, पावनगड, सातारा व वसंतगड हे परशुराम त्र्यंबकाने काबीज केले. औरंगजेबाची सहा वर्षांची मेहनत मराठ्यांनी दोन वर्षांत मातीमोल करून टाकली. किल्ल्यापरी किल्ले गेले व मराठे सगळीकडे बळावल्यामुळे होते ते राज्यही जाण्याची वेळ आली. दक्षिण जिंकण्याच्या नादात हातातली उत्तर गमावण्याचा धोका ओढवला. बिचाऱ्या औरंगजेबाचे तेल गेले, तूप गेले आणि हाती धुपाटणे मात्र आले. 'इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः' अशी त्याची अवस्था झाली. 'देव ना संसार। तुका दोहींकडे चोर!' मराठ्यांचा प्रश्न पूर्वी होता तितकाच बिकट राहिला. औरंगजेबाला त्याचे उत्तर सापडेना. तो दिङ्मूढ होऊन गेला.

औरंगजेबाच्या या भीषण शोकांतिकेचे कारण असे आहे की मराठे हे काय प्रकरण आहे, हे तो समजूच शकला नाही. मराठ्यांना तो 'चोर' आणि 'गनीम' म्हणतो. खाफीखानही मराठ्यांना 'दुष्ट जमात', 'कुटिल जमात' असेच म्हणतो

पण मराठे हे चोर नाहीत, गनीम नाहीत, जमात नाहीत, तर ते एक राष्ट्र आहेत ही कल्पना खाफीखानालाच काय, किंवा औरंगजेबालाच काय, कोणत्याही मोगल सेनापतीला किंवा विचारवंताला सुचली होती याचा दाखला नाही. ती त्यांची ऐपतच नव्हती.

मराठे पराक्रमी होते, पण गेल्या पन्नास वर्षांत त्यांच्या पराक्रमाला विशिष्ट दिशा व विशिष्ट ध्येय होते. ते ध्येय म्हणजे हिंदु संस्कृतीचे व धर्माचे संरक्षण करण. मराठ्यांचा महाराष्ट्र धर्म हा जयिष्णु हिंदुधर्म होता. ती विजिगीषु हिंदुत्वाची उपासना होती; तिचे अंतिम साध्य दिल्लीस हिंदुपदपादशाही स्थापन करणे हेच होते. शिवाजी महाराजांच्या 'हिंदवी स्वराज्य' या शब्दसंहतीत हीच संकल्पना होती. संभाजीच्या उद्‌गारांत हीच कल्पना प्रकट झालेली आहे. "त्या यवनाधमाला सांप्रत असे वाटू लागले आहे की आम्ही हिंदु म्हणजे तत्त्वशून्य झालो आहोत. आम्हांला धर्माचा काहीच अभिमान राहिला नाही. बादशहाची ही वागणूक यापुढे आम्हांला सहन होणे शक्य नाही. या दुष्ट यवनाशी युद्ध करण्यात आम्ही आमची संपत्ति, आमचा देश, आमचे दुर्ग, सारांश सर्व काही पणास लावण्यास तयार आहोत. चोरांची जमात पन्नास पन्नास वर्षे अशा प्रकारे एका ध्येयासाठी उद्योग करीत नसते. पराक्रम तर पूर्वीही मराठे करीतच होते पण ते पोटासाठी; मुसलमानांचे भाडोत्री बारगीर म्हणून. ते पराक्रम देशासाठी, धर्मासाठी, हिंदुत्वासाठी करण्याची प्रेरणा देण्याचे श्रेय शिवाजी महाराजांचे आहे. त्यांनी मराठ्यांचे राष्ट्र निर्माण केले, राष्ट्रीय अस्मिता निर्माण केली, मराठी माणसाला आत्मा दिला.

पण राष्ट्रकल्पना ही आत्मकल्पनेसारखीच आहे. आत्म्याची ओळख सर्वांनाच पटते असे नाही. अज्ञानाने, भ्रमाने, मोहाने माणसाला आत्मसाक्षात्कार होत नाही हे प्रसिद्ध आहे. राष्ट्रकल्पनेचीही तशीच स्थिति आहे. त्यामुळेच अनेक मराठे औरंगजेबाच्या बाजूने मराठ्यांशी झगडण्यास तयार होते. जिथे मराठ्यांनाच आपल्या मराठी अस्मितेची ओळख पटत नव्हती, तेथे ती औरंगजेबाला पटली असेल असे समजणे म्हणजे त्याच्या बुद्धिमत्तेची भलतीच खुशामत करण्यासारखे आहे.

आणखी एका दृष्टीने राष्ट्रकल्पना आत्मकल्पनेसारखी आहे. ती निराकार आहे पण सर्वव्यापी आहे. ती अव्यक्त आहे पण व्यक्तीतही आहे. ती अविनाशी आहे. आणि येथेच औरंगजेबाची घोर वंचना झाली. त्याला वाटले की किल्ले जिंकले म्हणजे मराठे जिंकले जातील पण त्याला हे समजले नाही की किल्ल्याप्रमाणे किल्ल्याबाहेरही मराठी अस्मिता स्थिरचर व्यापून दशांगुळे उरला होती. खांबात नरसिंह होता हे खरेच आहे. पण खांबाच्या बाहेरही नरसिंह होता हेही तितकेच खरे आहे. ते हिरण्यकश्यपूला उमगले नाही हीच त्याची शोकांतिका. अशा

ज्वलंत राष्ट्रीय अस्मितेने भारलेले मराठ्यांसारखे छोटे राष्ट्र तमाम हिंदुस्थानच्या औरंगजेबासारख्या शहेनशहालाही भारी ठरू शकते हाच पंचवीस वर्षांच्या मराठ्यांच्या या स्वातंत्र्ययुद्धाचा बोध होय.

ताराबाईच्या कारकिर्दीपासून मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाचे अखेरचे पर्व सुरू झाले. परशुराम त्र्यंबक, संताजी सिलिमकर, शंकराजी नारायण, परसोजी भोसले राणोजी घोरपडे, हणमंतराव निंबाळकर, नेमाजी शिंदे, अशा अनेक मराठी वीरांनी या कालखंडात मराठी अस्मिता दाखवून औरंगजेबाला पाणी पाजले त्या नररत्नांच्या प्रभावळीत आपल्या प्रखर आणि निस्तुल तेजाने तळपणारा कोहिनूर म्हणजे धनाजी जाधव होय.

□ □

# (१५)

मराठ्यांच्या औरंगजेबाशी चाललेल्या स्वातंत्र्य संघर्षाला संभाजीच्या वधा-नंतर जे अटीतटीचे स्वरूप प्राप्त झाले, त्या काळात संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव हे दोघेही सारख्याच प्रकर्षाने इतिहासाच्या क्षितिजावर गुरु-शुक्राप्रमाणे तळपत होते. संताजीने ज्याप्रमाणे शर्जाखान, कासीमखान, हिंमतखान, अलीमर्दान-खान इत्यादि मोगल सरदार आपल्या प्रतापाने धुळीस मिळविले त्याप्रमाणे धनाजी जाधवानेही रणमस्तखान, इस्माइलखान मखा इत्यादि सरदारांना जमीनदोस्त केले आणि चंदनवंदनच्या तुंबळ रणसंग्रामात आपला मुलगाही स्वदेशास समर्पण केला. पण कारण कोणतेही असो, संताजी जिवंत असेपर्यंत धनाजीचा पराक्रम विशेष झळकला नाही. संताजीच्या मृत्यूनंतर १६९७ ते १७०७ या दहा वर्षांच्या कालखंडात धनाजीने या संग्रामाचे नेतृत्व केले. या कालखंडाच्या पूर्वार्धावर जर संताजीची मुद्रा उमटलेली आहे, तर उत्तरार्धावर धनाजीच्या कर्तृत्वाचा ठसा उमटलेला आहे

१६९९ च्या ऑक्टोबरात औरंगजेब मराठ्यांचे किल्ले घेण्यासाठी बाहेर पडला. त्याने वसंतगड घेतला व तो साताऱ्याला वेढा घालून बसला. त्या वेळी इतर मराठे सरदारांबरोबर धनाजीनेही आसपासच्या प्रदेशात धामधूम उडवून त्याला हैराण करून सोडले. १९ डिसेंबर १६९९ रोजी त्याने कऱ्हाडच्या मोगली ठाण्यावर हल्ला करून तेथील फौजदार घोरीखान यास कैद केले. त्याला हमीदुद्दीनखानाने लढाई करून सोडवून नेले. धनाजी जाधवाने आपल्या सैन्याचे तीन भाग केले व तो ब्रह्मपुरी येथील बादशाही छावणीवर चालून गेला. तेथे असलेल्या आसदखानाला निकराचा प्रतिकार करून हल्ला परतवावा लागला. १० जानेवारी १७०० रोजी रहमतपुरापलीकडे धनाजी जाधव, हणमंतराव निंबाळकर व राणोजी घोरपडे यांचे व झुल्फिकारखान, हमीदुद्दीनखान व बहरामंदखान यांचे असे तुंबळ युद्ध झाले. निकराच्या युद्धानंतर मराठे एक मैल मागे हटले. २२ जानेवारी रोजी धनाजी जाधवाने हल्ला करून खानापूरचा मोगल फौजदार आवजी आढळ धरला. अशा प्रकारे आसपासच्या प्रदेशात आक्रमक हालचाली करून औरंगजेबाला संत्रस्त करण्यात धनाजीने इतर मराठे सरदारांबरोबर मोठी कामगिरी साताराच्या वेढ्यात बजावली.

पण या काळातील धनाजी जाधवाची सर्वात महत्त्वाची कामगिरी म्हणजे त्याने झुल्फिकारखानाला आपल्या मागे मैलच्या मैल धावायला लावले आणि त्याच्याशी धावपळीची लढाई देऊन त्याला हैराण केले ही होय. असे करण्यात मोगलांना

गनिमी काव्याने सतावणे हा तर धनाजीचा उद्देश होताच, पण त्याहीपेक्षा औरंगजेबाच्या सैन्यातून झुल्फिकारखानाला बाहेर ओढून काढून औरंगजेबाचे बळ घटविणें हाही उद्देश होता. औरंगजेबापुढेही पर्याय नव्हता. आजवरच्या अनुभवाने मराठ्यांच्या पाठलागावर पळायला झुल्फिकारखानाशिवाय लायक माणूसच त्याला सापडत नव्हता. त्याने त्याला कायमचा पाठलाग मंत्रीच करून टाकले होते. झुल्फिकारखानासारखा अखंड विजयी सेनापति बाहेर फिरतीच्या पळापळीच्या कामावर नेमल्यामुळे किल्ले सर करण्यास बळ उणे पडत होते. औरंगजेबाला हे माहीत होते. पण त्याला त्याचा काही इलाज नव्हता. धनाजीने हे औरंगजेबाचे मर्म नेमके ओळखले व त्याप्रमाणे आपल्या डावपेचांची आखणी केली. झुल्फिकारखानाचा सरदार राव दलपत याच्याबरोबर भीमसेन सक्सेना या मोहिमेत होता. त्याने धनाजी पुढे आणि झुल्फिकारखान मागे अशा या मोहिमेचा सुरस व चमत्कारिक वृत्तान्त दिलेला आहे.

भीमसेन म्हणतो– "झुल्फिकारखान याने तुळजापूर, नळदुर्ग आणि गुंजोटी भागात कूच केले. त्यानंतर तो पांढरी, मुंगीपैठण, हीरूकला, अष्टी, परंडा, नांदेड, औसा, उद्गीर करीत हैदराबादच्या सुभ्याच्या सरहद्दीपर्यंत त्याने मराठ्यांचा पाठलाग केला. मराठ्यांच्या बरोबर अनेक निकराची युद्धे झाली. मराठे प्रत्येक वेळेस मार खाऊन पळून जात. धनाजी हा आपल्या सरदारांना बरोबर घेऊन मोगलांच्या विरुद्ध होणाऱ्या या युद्धात असे. भीमसेन याला महाराष्ट्रात येऊन आता अठरा वर्षे झाली होती. जिंजीच्या वेढ्यात तो समक्ष हजर होता. असे असून मराठ्यांच्या गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीची त्याला कल्पना अजूनही येऊ नये ही आश्चर्याची गोष्ट आहे. मराठ्यांचा पराभव कधीच होत नसे, ते पळून जात पण तुटून पडण्यासाठी परत येत हे या मोहिमेत त्याने अनेक वेळा पाहिले. पण त्याला 'उमजले' नाही. यालाच मराठी युद्धतंत्राचे अज्ञान म्हणतात.

या मोहिमेत धनाजीने आणखी एक चतुराई केली. राणोजी घोरपडे याच बाजूला होता. राणोजी घोरपडे व धनाजी जाधव यांचे वैर राणोजीच्या बापापासून चालत आले होते. पण या वेळी समजूतदारपणा दाखवून धनाजीने राणोजीशी तडजोडीचे बोलणे लावले. राणोजीनेही ते कबूल केले. दोघांची भेट आलमेला येथे व्हायचे ठरले. पण झुल्फिकारखानाला हे कळताच, त्याने धनाजी आलमेल्याला पोचण्याच्या आधीच, त्याच्यावर हल्ला चढविला. धनाजीने मागे वळून युद्ध केले पण 'युद्धतज्ज्ञ' भीमसेनाच्या शब्दांत 'त्याचा पराभव झाला.'

पण झारीतल्या शुक्राचार्याप्रमाणे झुल्फिकारखान आडवा पडला म्हणून धनाजी आणि राणोजी यांची भेट व्हायची काही राहिली नाही. फक्त ती आलमेल्याला न होता गुलबर्ग्यापासून सोळा मैलांवर फिरोजाबादला झाली. राणोजी व धनाजी यांची सैन्ये एक झाली. त्यांची संख्या कमीतकमी पस्तीस हजार होती. झुल्फि-

कारखान टाळायला पाहात होता ते हेच. कारण त्या बिचाऱ्याजवळ तीन हजारां-पेक्षा जास्त सैन्य नव्हते.

मराठे पुढे चाल करून आले. मोगलांच्या पिछाडीला रामसिंग हाडा होता. मराठ्यांनी त्याच्यावर दोन तीन हल्ले चढविले. मोगलांच्या उजव्या फळीवर त्यांनी अनेक हल्ले चढविले. मोगलांनीही जबर प्रतिकार केला. भीमेच्या पलीकडे मराठ्यांची छावणी होती. तिच्यावर हल्ला करण्यासाठी मोगल नदी ओलांडू लागले. तेव्हा मराठ्यांनी त्यांना अडथळा केला. बाण आणि बंदुकांची एकच धुमश्चक्री झाली. या गडबडीत दाऊदखान पन्नी आघाडीस होता, त्याने नदी ओलांडली पण एकटाच फार पुढे जाण्याच्या त्याच्या या 'पुरोगामी' वृत्तीमुळे तो इतर तुकड्यांपासून लांब गेला व संकटात सापडला. त्याच्यावर राणोजी प्रचंड सैन्यानिशी कोसळला. तेव्हा राव दलपत त्याच्या मदतीला तातडीने धावून गेला. सकाळपासून रात्रीच्या एक प्रहरपर्यंत युद्ध चालू होते. मग मराठे अदृश्य झाले. झुल्फिकारखान विजयाचे चौघडे वाजवीत रात्रभर तेथेच तळ देऊन बसला. सकाळी लढाईसाठी मोगल तयार झाले, पण मराठ्यांचा पत्ता नसल्यामुळे त्याची निराशा झाली. मराठे वाकिणखेड्याकडे बेडर बंदुकचींची मदत आणायला गेल्याचे समजल्यावरून झुल्फिकारखान तसाच पुढे तालिकोटला गेला व त्याने कृष्णेच्या सर्व वाटा रोखून धरल्या. अखेर धनाजी पन्हाळ्याकडे व राणोजी वाकिण-खेड्याकडे गेल्याचे कळल्यावर तो परत फिरला.

भीमसेन म्हणतो की या मोहिमेत मराठ्यांचे फार नुकसान झाले. ते किती झाले याचा ताळेबंद त्याच्यापाशी असल्यास कल्पना नाही. पण त्याच्याच लिहिण्यावरून हे सिद्ध आहे की मोगलांचे नुकसान फार झाले. मराठ्यांच्यामागे झुल्फिकार-खानाला या मोहिमेत दोन हजार कोसांची पायपीट करावी लागली. "मोगल सैन्यातील घोडी अगदी गळून गेली होती. त्यांच्या अंगात चालण्याचे सामर्थ्यच राहिले नव्हते. पुष्कळ स्वार पाय उतार होऊन चालू लागले." होती तीही जनावरे भयंकर पावसामुळे नष्ट झाली. "या सततच्या चालण्यामुळे लष्करातील हत्ती लंगडू लागले. लष्कराच्या पिछाडीच्या सैन्याला चालण्याशिवाय काही काम नव्हते."

या वर्षीच्या म्हणजे १७०० च्या नोव्हेंबरमध्ये औरंगजेबाने पन्हाळ्याला वेढा घातला. त्या स्वारीवर तो चालला असता रमजानचा उपास करण्यासाठी म्हणून तो मिरजेस मुद्दाम महिनाभर थांबला होता. त्या वेळी धनाजी जाधवाने त्याच्या छावणीवर हल्ला करून मोठा कठीण प्रसंग आणला. छावणीपासून दोन कोसांवर येऊन त्याने धुमाकूळ माजविला. त्याच्यावर औरंगजेबाने मुनीमखान आणि हमी-दुद्दीनखान यांना पाठविले. पण त्यांनाही तो आटपेना. तेव्हा निर्वाणीचे ब्रह्मास्त्र म्हणून पन्हाळ्यास असलेल्या झुल्फिकारखानाला तातडीने बोलावण्यात आले. झुल्फिकारखान हा पन्हाळ्याहून निघाला आहे असे कळल्यावर धनाजी निघून

गला. झुल्फिकारखान त्याचा पाठलाग करीत विजापूर हद्दीतल्या चिकोडीपर्यंत गेला. पण त्याला भीति वाटली की न जाणो, आपल्या गैरहजेरीचा फायदा घेऊन पन्हाळ्याला असलेल्या शहाजादा बेदारबख्तावर मराठे कोसळायचे. तेव्हा तो पन्हाळ्याला परत आला. त्या वर्षीच्या मार्च महिन्यात औरंगजेब पन्हाळ्याला पोचला व जातीने वेढ्याचे काम पाहू लागला. ऐन याच वेळी धनाजी हा ब्रह्मपुरीच्या बादशहाच्या छावणीकडे वळला व तिकडील मुलुखात धामधूम करू लागला, तेव्हा औरंगजेबाला त्याच्यावर झुल्फिकारखानाला पाठविणे भाग पडले.

पुढील वर्षाच्या नोव्हेंबरात औरंगजेबाने खेळण्याला वेढा घातला तेव्हा १७०१ नोव्हेंबर ते १७०२ जूनपर्यंत परत धनाजीच्या मागे झुल्फिकारखानाला धावावे लागले. त्याने परंड्यापाशी मराठ्यांना गाठले व त्यांच्याशी युद्ध केले. पण मराठे पळून गेले. पुन्हा चारठाण्याजवळ लढाई झाली. मराठ्यांशी युद्ध करीत मेहकर व कुसलपुरीहुन पुढे होत झुल्फिकारखान वऱ्हाडात दाखल झाला. वऱ्हाडात स्थानिक जमीनदार मराठ्यांना मिळाले व त्यामुळे त्यांची संख्या साठ हजार झाली. बिचाऱ्या झुल्फिकारखानापाशी मोजून अडीच हजारसुद्धा सैन्य नव्हते. जास्त असते तरच नवल. कारण, एकंदर लष्करापैकी सिंहाचा वाटा औरंगजेब ओरबाडून घेई; तो घेऊन तो दरवर्षी एखाद्या डोंगरी किल्ल्यापुढे महिनोन् महिने तळ ठोकून बसे. उरलेला भाग निरनिराळ्या जिल्ह्याच्या सुभेदारांकडे तैनात झालेला असे. त्या सुभेदारांनी झुल्फिकारखानाला काही मदत केली तरच त्याचे निभण्यासारखे होते. झुल्फिकारखान हा वऱ्हाडात एलिचपूरपासून दोन कोसांवर आला होता. त्याने साहजिकच वऱ्हाडचा सुभेदार अलीमर्दानखान याला बोलावणे पाठविले. तो आला, पण झुल्फिकारखानाबरोबर मराठ्यांशी लढायला तो पुढे येण्यास तयार होईना. आपणाला एलिचपूरला परत जाऊ द्यावे म्हणून साख्या विनवण्या करू लागला. पण झुल्फिकारखानाने त्याला तसेच दामटून पुढे चालविले. या मोहिमेत त्याने एकदा बरीच मजल मारली व संध्याकाळच्या सुमारास तो एका टेकडीवर पोचला. तेथून दूरवर मराठ्यांचा तळ त्याच्या दृष्टीस पडला. त्याने मध्यरात्री त्यांच्या तळावर छापा घातला व मराठ्यांचा मोड केला. पण मराठ्यांनी कुशलतेने आपला तळ हलविला. दुसऱ्या दिवशी लांबलांब मजला मारीत सतरा कोसांवर असलेल्या नांदेड जिल्ह्यात ते शिरले. झुल्फिकारखानही त्यांच्या मागोमाग आला. जाताना त्याने इतका वेळ दातांच्या कण्या करीत असलेल्या अलीमर्दानखानावर दया केली व त्याला एलिचपुरास जाण्यास निरोप दिला. अलीमर्दानखानाचेही म्हणणे बरोबर होते. एक वेळ मराठ्यांच्या तावडीत तो सापडला होता व दंड भरून सुटला होता. परत तोच अनुभव घेण्यात काही मतलब नव्हता.

झुल्फिकारखान नांदेडला पोचला. तेथेही तोच अनुभव. नांदेडला खुदाबंदाखान हा सुभेदार होता. खुदाबंदाखान हे सुप्रसिद्ध शाहिस्तेखानाचे चिरंजीव आणि

झुल्फिकारखानाचे मेव्हणे. त्यांनी झुल्फिकारखानाचे स्वागत केले. पण मराठ्यांच्या भीतीने तेही इतके पछाडले होते की नांदेडचा किल्ला सोडून ते बाहेर येईनात. अखेर झुल्फिकारखानाने परमेश्वरावर भरवसा ठेवला. तोच खरा खुदाचा बंदा असलेला खान ठरला. खुदाबंदाखान नावापुरताच खुदाबंदा होता. मलोनी गावानजीक मराठ्यांवर त्याने हल्ला चढविला व त्यांच्याशी सतत चार दिवस युद्ध करीत तो हैदराबाद सुभ्याच्या हद्दीतील कैलासला पोचला. कैलासच्या किल्ल्याच्या पायथ्याशी आपले बाजारबुणगे ठेवून तो मराठ्यांवर तुटून पडला. त्याच्यापाशी फक्त दीड हजार सैन्य होते. त्याच्या त्याने तीन तुकड्या केल्या. एक स्वतःकडे, एक राव दलपतकडे व एक रामसिंग हाडाकडे. मराठे तिन्ही तुकड्यांवर चालून आले. पण तिघांनीही उत्तम कामगिरी बजावली. तीन कोसपर्यंत मराठ्यांस दम घेण्यास त्यांनी फुरसत दिली नाही. रात्र झाली व मराठे पळून गेले. झुल्फिकारखानाने आपले बाजारबुणगे मलोनी मुक्कामी ठेविले व तो त्यांच्या पाठलागावर निघाला. बाणगंगेच्या काठी मुद्गल येथे मराठ्यांचे प्रचंड सैन्य गोळा झाले होते. आपल्या दोन हजार सैन्यानिशी झुल्फिकारखानाने त्यांच्याशी सामना दिला. झुल्फिकारखानाच्या पिछाडीला रामसिंग हाडा होता. त्याच्यावर मराठ्यांनी मोठा कठीण प्रसंग आणला. पण अखेर झुल्फिकारखानाने लढाई जिंकली. भीमसेन म्हणतो, "दक्षिणी व मोगल यांच्यात अशा प्रकारचे युद्ध पूर्वी झाल्याचे कुणी ऐकले नाही आणि पाहिले नाही." पण मराठे हरले होते तरी मोडले नव्हते. सकाळी झुल्फिकारखान मलोनीकडे निघाल्यावर ते पुन्हा एक झाले व त्याच्या पिछाडीला येऊ लागले. तोफा व बंदुकी यांचा मारा करीत ते गोदावरीच्या तीरापर्यंत आले व पुढे पसार झाले. "या युद्धाची वस्तुस्थिति बादशहाच्या कानावर गेली असती तर प्रत्येकावर बादशहाच्या कृपेची खैरात झाली असती. पुढे मलोनी मुक्कामी असता मराठे नांदेडकडे जात असल्याचे ऐकून झुल्फिकारखान तातडीने निघाला व त्यांच्या आधी नांदेडला पोचला. पूर्वीप्रमाणे याही वेळा सुभेदारसाहेब खुदाबंदाखान यांनी नांदेडच्या बाहेर येऊन झुल्फिकारखानाचे स्वागत केले. झुल्फिकारखानाचे स्वागत करणे व त्याला निरोप देणे एवढेच बिचाऱ्याच्या हातात होते. ते मात्र तो निष्ठेने करीत होता. या सहा महिन्यांत झुल्फिकारखानाने मराठ्यांबरोबर एकोणीस लढाया मारल्या व त्यांचा पाठलाग करीत तो तीन हजार कोस फिरला. शत्रूला आपल्या-मागे पळवून त्याची दमछाक करण्याची धनाजीची युद्धनीति ही अशा प्रकारची होती.

पुढील वर्षी औरंगजेब पुणे प्रांतात कोंडाण्याला भिडला असता धनाजी हा कर्नाटकात धामधूम करीत होता. औरंगजेबाने नेहमीप्रमाणे त्याच्यावर झुल्फि-कारखानाला पाठविले. विजापूर कर्नाटकाचा फौजदार चीनकिलीजखान याच्या-कडे विजापूर सुभ्याचेही काम देण्यात आले असल्यामुळे तो विजापूरकडे निघाला

होता. त्याचा निकाल लावावा म्हणून धनाजी त्याच्यावर चालून गेला. चीनकिलीजखानाला हे कळल्यावर त्याने विजापूरला न जाता विजापुरापासून सोळा कोसावर असलेल्या मुद्गलच्या किल्ल्यात आश्रय घेतला. तोपर्यंत झुल्फिकारखान विजापूरला येऊन पोचला होता. तो आलेला पाहून धनाजी गुलबर्ग्याकडे वळला. त्याच्यामागे शिरस्त्याप्रमाणे झुल्फिकारखान निघाला, तोच औरंगजेबाने त्याला कोंडाण्याला बोलावून घेतले. १७०४ च्या मे महिन्यात धनाजीने पुन्हा एकदा कर्नाटकात धुमाकूळ उठविला व दाऊदखान पन्नीकडून सात लाखांची खंडणी घेतली.

पण धनाजी हा केवळ गनिमी काव्याच्या लढाया देत घोडदौड मारणारा पटाईत लढवय्या होता असे नव्हे; तो राजकारणी बोलणी करण्यात वाकबगार असलेला मुत्सद्दीही होता. १७०३ च्या मे महिन्यात औरंगजेबाचा मुक्काम पुण्यास असताना कामबख्शाने शाहूला पुढे करून मराठ्यांशी तडजोडीची बोलणी सुरू केली. या त्याच्या प्रयत्नांना औरंगजेबाचा प्रच्छन्न आशीर्वाद होता. मराठ्यांच्या बाजूने या वाटाघाटीत भाग घेण्यात धनाजी प्रमुख होता कारण त्याचे सेनापतिपद, त्याचे वय, त्याचा अनुभव, त्याची ज्येष्ठता या सर्वांमुळे मराठे मंडळात त्यास अद्वितीय स्थान प्राप्त झाले होते. खाफीखानही असेच म्हणतो. "धनाजी जाधव हा सर्वांच्या मते मातबर सरदार होता. त्याने बादशहाला तहाच्या अटी कळविल्या." मराठे सरदार प्रथम लष्करापासून चार पाच कोस अंतरावर शाहूला भेटतील, नंतर शाहुच्या मार्फतीने ते कामबख्शाला भेटतील. व कामबख्श त्यांची व औरंगजेबाची भेट घडवून आणील. यासाठी बादशहाने प्रथम प्रमुख मराठे सरदारांना समाधानाची पत्रे पाठवून बोलवावे. खाफीखानाच्या म्हणण्याप्रमाणे औरंगजेबाने हा तह मोडून टाकला. त्याने सत्तर मराठे सरदारांना पत्रे तयार करण्याचा हुकूम दिला. पण नंतर तो रद्द केला, कारण त्याला संशय आला की चाळीस पन्नास हजार मराठे शाहूला व कामबख्शाला घेऊन आपल्या दुष्कर डोंगराळ मुलुखात पळून जातील. खाफीखानापेक्षा भीमसेनाचा वृत्तान्त थोडा निराळा आहे. पण दोन्हीतही प्रमुख व्यक्ति धनाजीच आहे. कामबख्शाने आपली माणसे एकाहून अधिक वेळा धनाजीकडे पाठविली; पण ती निराश होऊन परत फिरली, पण कामबख्श मोठा चिकट. त्याने तहाचा नाद काही सोडला नाही त्या वर्षी राजगडची मोहीम चालू होती आणि तोरणा जिंकण्याचे घाटत होते, म्हणजे १७०४ फेब्रुवारीअखेर "शहाजादा कामबख्श हा धनाजी जाधवाकडे तहासाठी म्हणून पुन्हा पुन्हा माणसे पाठवीत होता. तहाच्या वाटाघाटी होत होत्या; पण धनाजीने निरनिराळी निमित्ते दाखवून काळकाढूपणाचे धोरण अवलंबिले. यालाच राजनीति म्हणतात. धनाजीने ती या वेळी उत्तम प्रकट केली. एका बाजूने त्याने युद्ध चालू ठेविले व दुसऱ्या बाजूला वाटाघाटीचे एरंडाचे गुऱ्हाळही सुरू ठेविले, मोगलांना तहाची

आशा दाखवून झुलवीत ठेवले आणि नानातऱ्हेची निमित्ते काढून तह लांबणीवर टाकला.' ' कणिक नीतीं'त म्हटले आहे ते खरे आहे. "आशां कालवतीं कुर्यात् कालं विघ्नेन योजयेत् । विघ्नं निमित्ततो ब्रूयात् निमित्तं वापि हेतुतः ।।"

आजपर्यंत धनाजीने दक्षिणेतच मोगलांना गनिमी काव्याने हैराण केले होते. या वेळी त्याने नर्मदा ओलांडून गुजरातवर धडक मारली आणि दक्षिण्यांची ही गनिमी काव्याची युद्धपद्धत काय असते याचा इंगा उत्तरेतल्या मोगल सुभेदारांना दाखविला, नेमाजी शिंद्याने ज्याप्रमाणे माळव्यात धुमाकूळ घातला, त्याप्रमाणे नर्मदाकाठी बाबा पियाराच्या उतारावर व रतनपूर येथे ४ मार्च १७०६ रोजी गुजरातच्या नजरअलीखान, सफदरखान, अब्दुल्हादीखान इत्यादि सरदारांना धनाजीने धुळीस मिळविले. ज्याप्रमाणे दोड्डेरीची लढाई ही संताजीच्या गनिमी काव्यातील चातुर्याची परिसीमा समजली जाते, त्याप्रमाणे रतनपूरची लढाई ही धनाजी जाधवाच्या पराक्रमाने व चातुर्याने गाठलेली शीग समजावी लागेल.

गुजरातवर औरंगजेबाचा मुलगा शहाजादा आजम हा सुभेदार होता. गुजरातेतून आपली बदली करण्यात यावी अशी त्याने औरंगजेबाला वारंवार विनंती केल्यावरून औरंगजेबाने काश्मीरचा सुभेदार इब्राहिमखान याची गुजरातवर नेमणूक केली, तो येऊन रुजू होईपर्यंत अवकाश होता म्हणून आजम याने गुजरातचा ताबा गुजरातचा दिवाण अब्दुल हमीदखान यास देऊन यावे असे औरंगजेबाने कळविले. त्याप्रमाणे त्याला ताबा देऊन आजमने २५ नोव्हेंबर १७०५ रोजी अहमदाबाद सोडले. अब्दुल हमीदखान कारभार पाहू लागला. गुजरातचा जुना सुभेदार गेला होता, नवा यायचा होता, सुभेदारीची जागा रिकामी पडली होती. या संधीचा फायदा घेऊन धनाजी जाधवाने ऐंशी हजार सैन्यानिशी गुजरातकडे मोर्चा वळविला.

मराठे येत आहेत हे ऐकून अब्दुल हमीदखानानें नजरअलीखान, सफदरखान बाबी, इल्तिफाखान, सय्यद इद्रीसखान, अलीमर्दान इत्यादि अधिकाऱ्यांना सैन्य देऊन आज्ञा केली की सुरतेपर्यंत पोचून मराठ्यांचा प्रतिकार करावा. ह्या लोकांनी जाऊन नर्मदेच्या बाबा पियारा उतारावर तळ दिला. पण मराठे आहेत कोठे हे त्यांना न कळल्यामुळे त्या ठिकाणी ते दीड महिना मजेत रेंगाळत राहिले. एवढ्यात हेरांनी बातमी आणली की सुरतेच्या दिशेने मराठे पसरले आहेत. तेव्हा नजरअलीखान वगैरे मंडळींनी मराठे आले आहेत व त्यांची संख्या इतकी असल्याचे समजते असे पत्र अब्दुल हमीदखानाला पाठविले. अब्दुल हमीदखानाने त्यांना कळविले की, "मी लवकरच चांगली फौज आणि तोफखाना घेऊन येत आहे पण तुम्ही आतापर्यंत नर्मदेच्या काठावर मजा मारीत रेंगाळत राहावे, मोहिमेसंबंधी काही करू नये व सुरतेपर्यंतही जाऊ नये हे काही बरे केले नाही."

त्याच्या या टोमण्याने ते लोक रागावले. पूर्वी त्यांनी मुळीच हालचाल केली नव्हती. आता त्यांनी दुसरे टोक गाठले. त्यांच्यापाशी फक्त दोन हजार सैन्य होते. पण त्यांनी अब्दुलहमीदखानाची वाटही पाहिली नाही. त्यांना वाटले की असे केले तर त्यात आपला भित्रेपणा दिसून येईल. मराठे येऊन पोचण्यापूर्वीच आपण सुरतेला जाऊन पोचावे म्हणून ते सपाटयासरशी निघाले. त्यांनी त्याच दिवशी नर्मदा पार केली व मोठी मजल मारून रतनपूर येथे आपला तळ दिला. भडोचच्या पूर्वेस चौदा मैलांवर हे गाव आहे. हे लोक इतके मूर्ख होते की सर्वांनी मिळून एकत्र तळ द्यावा ही सावधगिरीची साधी गोष्ट त्यांना सुचली नाही. प्रत्येकाने मर्जीला येईल त्या जागेवर आपला तंबू ठोकला.

वेळ दुपारची होती. मोगलांनी आपली छावणी अद्याप धड लावलीही नव्हती. एवढ्यात मराठ्यांनी त्यांच्यावर हल्ला केला. मोगलांनी मोठ्या निकराने त्यांचा प्रतिकार केला व त्यांना पळवून लावले. “इस्लामच्या वीरांना वाटले की आपला विजय झाला.” त्यांनी थोडा वेळ मराठ्यांचा पाठलाग केला व नंतर ते तळावर परत आले. काहीजण झोपी गेले, काहीजणांनी घोड्यावरच्या खोगिरी उतरवल्या व कमरेचे पट्टे सोडले; काहीजण चूल पेटवून पोटपूजेच्या तयारीला लागले. अशा प्रकारे मोगल तळावर सर्वत्र श्रमपरिहार चालू असता एकाएकी प्रचंड धुरळा उठला आणि मराठ्यांचे प्रचंड सैन्य त्यांच्यावर कोसळले. “ते दृश्य पाहून मोगलांच्या डोळ्यांसमोर अंधारी आली, त्यांची छाती धडधड करू लागली. ते वेताप्रमाणे थरथर कापू लागले.”

सफदरखान बाबी याने मोठ्या ऐटीत आपला तळ इतरांपासून दूर दिला होता. मराठे प्रथम त्याच्यावर चालून गेले. त्यांनी त्याच्याभोवती कडे केले. त्याचा मुलगा मारला. तो स्वतः भयंकर जखमी होऊन मराठ्यांच्या हाती सापडला. मराठ्यांनी त्याचा सगळा सरंजाम लुटला. इख्तिफाखानाने नदीत घोडा घातला व तो पळून गेला. त्याचप्रमाणे पुरदिल शेरानी यानेही नदीत उडी ठोकली आणि तो पळाला. तोपर्यंत संध्याकाळ झाली होती. नजरअलीखान काही पळून जाऊ शकला नाही, मराठ्यांनी त्याच्यावर पाळत ठेवली व त्याच ठिकाणी मुक्काम केला.

हा नजरअलीखान गुजरातचा माजी सुभेदार शुजाअतखान याचा दत्तक मुलगा. औरंगजेबाने सक्ती केल्यामुळे नाक मुठीत धरून तो पूर्वी दक्षिणेत आला होता. पण मराठ्यांशी त्याला लढायचे नव्हते. म्हणून ब्रह्मपुरीला राहून त्याने आसदखानाला भक्कम लाच दिली होती. पण मरणापासून पळाले म्हणून मरण काही टळत नाही. त्याने मराठ्यांना दक्षिणेत टाळले, पण मराठे त्याची खबर घेण्यासाठी त्याच्या घरी दक्षिणेतून उत्तरेत आता आले होते. तो मरणाचा निर्धार करून सकाळी लढाईला उभा राहिला. पण धनाजीने त्याला निरोप पाठविला — काळाच्या प्रभावाने अनेक मोठ्या लोकांवर असे प्रसंग येतात. या जगाची ही

रीतच आहे. कधी खोगिरावर आपण तर कधी आपल्यावर खोगीर. तुम्ही मर्दुमकी करावयाची होती ती केली. आता संख्येनें प्रचंड असलेल्या मराठ्यांशी लढू पाहणे अदूरदृष्टीचे ठरेल. त्यांच्यावर तुटून पडून जीव गमावणे यात काही अर्थ नाही." धनाजीचा हा निरोप म्हणजे जिंकलेल्या शत्रूंना तो किती सौजन्याने व संभावित-पणे वागवीत असे याचा उत्तम नमुना आहे. त्याच्या या निरोपानंतर लढाई झाली नाही हे सांगणे नकोच. नजरअलीखान व इतर मोगल हे मराठ्यांचे कैदी झाले.

नजरअलीखानाच्या कुमकेसाठी अब्दुलहमीदखान अहमदाबादहून निघाल्याची व तो याच दिशेने जवळ आल्याची बातमी कळताच मराठ्यांनी रातोरात कूच केले आणि नर्मदाकाठी बाबा पियाराच्या उतारावर त्याला गाठले. रात्रीच त्यांनी त्याच्या छावणीवर हल्ला केला. एकच हाहाकार उडाला. सकाळी युद्ध परत सुरू झाले. पण मोगलांचा पराभव अटळ होता. अब्दुलहमीदखान व त्याचे सहकारी शर्थीने लढले, पण शेवटी मराठ्यांनी त्यांना कैद केले.

औरंगजेबाला ह्या बातम्या कळल्यावर त्याने बेदारबख्ताला तातडीने गुजरातच्या सुभ्यावर दाखल होण्याचा हुकूम केला. तो १ जुलै १७०६ रोजी अहमदाबादला आला. पण पावसाळा आला म्हणून त्यापूर्वीच मराठे निघून गेले. अब्दुल हमीद खानावर तीन लाख रुपये खंडणी मराठ्यांनी लादली. पण त्याच्या घरची सारी संपत्ति, सोने चांदी, जडजवाहीर भरतीला घातली तरी खंडणी पुरी होईना औरंगजेब अब्दुल हमीदखानावर इतका संतापला की त्याने सोरठचा फौजदार मुहमंद बेगखान, जो सध्या अहमदाबादचा कारभार पाहात होता, त्याला निक्षून कळविले की, अब्दुल हमीदखानाच्या सुटकेसाठी सरकारी खजिन्यातून एक पैसाही देण्यात येऊ नये. अखेर अब्दुल हमीदखानाला आपला भाचा व पुतण्या मराठ्यां-कडे ओलीस म्हणून ठेवून अहमदाबादला यावे लागले. पुढे ते पळून आले हा भाग निराळा. मनूचीच्या म्हणण्याप्रमाणे मराठ्यांनी मोगलांवर आठ लाख रुपये खंडणी लादली. पण या लढाईचे खरे महत्त्व पैशात मोजता येणारे नाही. स्वातंत्र्ययुद्धाच्या या अखेरच्या कालखंडात मराठ्यांनी बचावाचे धोरण सोडून चढाईचे धोरण स्वीकारले त्याचे हे निदर्शक आहे. माळव्यामध्ये नेमाजी शिंद्याच्या पराक्रमामुळे मराठ्यांचा प्रवेश झाला, त्याप्रमाणे गुजरातचे दार धनाजी जाधवाच्या या परा-क्रमाने मराठ्यांना उघडले.

१६७२ साली धनाजीने प्रथम उंबराणी आणि नेसरी या लढायांत प्रतापराव गुजराच्या हाताखाली पराक्रम गाजविला. १६७७ मध्ये येलबुर्ग्याच्या संग्रामात हंबीरराव मोहित्याबरोबर कोपळच्या हुसेनखान मियानाचा पाडाव करताना त्याने जे अप्रतिम शौर्य दाखविले, त्याची शिवाजी महाराजांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली. तेव्हापासून गेली पंचवीस तीस वर्षे धनाजी स्वराज्याच्या उद्योगात सारखा खपतच होता. संभाजीच्या कारभारात तो फारसा पुढे आला नाही, पण त्यानंतर राजा-

रामाच्या कारकिर्दीत संताजी घोरपड्याच्या बरोबरीने त्याने विशाळगडपासून जिंजीपर्यंत मोगलांना हैराण केले, आणि राजारामाच्या व संताजीच्या मृत्यूनंतर तर ताराबाईच्या कारकिर्दीत पराक्रम, अनुभव, वय, चातुर्य या दृष्टीने त्याच्याशी तुलना करता जवळ जवळ कोणीच नसल्यामुळे त्याचे स्थान केवळ एकमेवाद्वितीय होऊन बसले. संताजीच्या मृत्यूनंतर त्याच्यासारखाच तोडीस तोड असा धनाजीसारखा सेनापति मिळाला, हे मराठ्यांनी या स्वातंत्र्यसंग्रामात औरंगजेबावर मात केली त्याचे प्रमुख कारण आहे.

याचा अर्थ असा नव्हे की धनाजी सद्‌गुणांचा केवळ पुतळा होता. त्याच्यामध्ये दोष होते आणि ते मोठे होते. मराठ्यांच्या दोषांची चिकित्सा करताना वासुदेवशास्त्री खरे यांनी "स्वार्थसाधनाची बेसुमार हाव आणि समूहरूपाने कार्य करण्याची नालायकी" या त्यांच्या दोन वैगुण्यांचा ठळकपणे निर्देश केलेला आहे. धनाजी हा अस्सल मराठा होता. त्यामुळे हे दोन्ही दोष त्याच्या वाट्याला भरपूर प्रमाणात आले असले तर त्यात नवल नाही. धनाजी हा महापराक्रमी होता, पण त्याला दुसरा पराक्रमी मनुष्य सहन होत नसे. संताजी घोरपडे जिवंत असेपर्यंत धनाजीने त्याचा अतिशय द्वेष केला. आता ज्या कसावकरणीने संताजीचा खून झाला, त्याला धनाजीचे अनुमोदन असेल असे म्हणणे योग्य नाही; कारण प्रत्यक्ष शत्रूशीही औदार्याने वागण्याचा त्याचा शिरस्ता होता. पण त्याचबरोबर हेही विसरता येत नाही की संताजीच्या सैन्याची मोडतोड करून त्याला कारखळ्याच्या जंगलात पळवून लावण्यात धनाजीचा हात होता. संताजीच्या मागे लागलेला हणमंतराव निंबाळकर हा धनाजीचा हस्तकच होता. म्हणजे, धनाजीचे चातुर्य असे की, त्याने पाहुण्याच्या हातून साप मारविण्याचा उद्योग केला. संताजी मेल्यानंतर धनाजी सेनापति झाला, पण तेव्हाही नेमाजी शिंद्याशी त्याचे पटत नसे. भीमसेन म्हणतो की, "नेमाजी शिंदे याचे धनाजी जाधवाशी विशेष सूत नव्हते. नेमाजी शिंद्याला आपल्या पराक्रमाचा गर्व होता." "संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांच्यात पूर्वीपासून वैमनस्य होते." पुढे भीमसेनाचा शेरा मार्मिक आहे– "मराठ्यांच्यातही विशेष एकी दिसून आली नाही. प्रत्येकजण आपल्याला मोठा सरदार समजे आणि मोहिमेवर निघे." आता यात संताजीचा दोष किती आणि धनाजीचा किती हे सांगणे कठीण आहे. पण मराठ्यांचा स्वभाव हा असा होता. मग त्याला एका म्यानांत दोन तरवारी राहू शकत नाहीत असे म्हणावे किंवा तेजस्वी पुरुषाचा हा स्वभावच असतो की दुसऱ्याचे तेज त्याला सहन होत नाही, "न तेजस्तेजस्वी प्रसृतमपरेषां विषहते।" अशा सुभाषितावर आपले समाधान करून घ्यावे.

धनाजी तसा खुनशी आणि दीर्घद्वेषी होता. संताजी मेला पण धनाजीच्या पोटातला घोरपड्यांचा द्वेष काही गेला नाही. बारा वर्षे गेली तरी तो तसाच

होता. मसूरच्या जगदाळे देशमुखाचा मुलगा यशवंतराव हा शाहूकडे आपल्या दापापासून चालत आलेल्या सत्तावन्न गावांच्या देशमुखीचा यादवांशी असलेला तंटा तोडण्यासाठी आला. येताना तो हिंदुराव घोरपडे, संताजीचा भाऊ याच्या मार्फतीने आला. त्याबरोबर धनाजीचे पित्त खवळले. पुढे काय झाले ते जगदाळ्याच्याच शब्दात वाचा– " रा॥ जाधवराऊ सेनापति यांनी राग केला की आपला दावेदार घोरपडा याची पाठी करून माहादजी जगदाळे देशमुख याचा लेक आला; तेव्हा कैसी देशमुखी खाऊ पाहतो म्हणौऊन राजश्री जाधवराऊ सेनापति यांनी निकस करून जोरावारीने माहादजी देशमुखाची देशमुखी देह सत्तावन्न पुरातन चालत आली असता हाली छत्रपति साहेबास संकट घालून अतिशय करून पाटगावीचे मोकामी रुसवा करून सनद करून घेतली."

वतनाची आसक्ति धनाजीला अतिशय होती. त्याने शाहूची सेवा मनोभावे केली हे खरे पण त्या सेवेची किंमतही त्याने तितक्याच मनोभावाने वसूल केली. वर दिलेल्या जगदाळ्याच्या पत्राप्रमाणे शाहूला अडवून धनाजीने आपल्या नावे मसूर परगण्यातील सत्तावन गावाची सनद जबरदस्तीने करून घेतली; कारण आपणावाचून शाहूचे अडते व ना म्हणण्याची त्याची प्राज्ञा नाही हे तो जाणून होता. या पत्रात ज्या पद्धतीने धनाजीने शाहूला सनद देण्यास भाग पडले, तिचे वर्णन करताना जगदाळ्याने वापरलेले शब्द मार्मिक आहेत व ते ' जाधवराऊ सेनापतीं'च्या स्वभावावर नको तितका प्रकाश पाडतात. ' निकस करून ' ' जोरावारीने ' ' छत्रपतीसाहेबास संकट घालून ' ' अतिशय करून ' ' रुसवा करून ' सनद करून घेतली. राजारामाच्या कारकिर्दीत तर कऱ्हाडच्या यादवांची पाठ राखून महादजी जगदाळ्याला त्याने सळो की पळो करून सोडले. पदरचे पंधरा हजार रुपये देऊन कऱ्हाडच्या रुद्राजी देशपांड्याला महादजीशी भांडायला धनाजीने उभे केले व त्याच्या मागे नसते शुक्लकाष्ठ लावून दिले. तात्पर्य, गावगुंडीची हुन्नरबंदी धनाजीबाबाही खूप जाणत होते. ताराबाईच्या कारकिर्दीत खटावखाली शाहूचा तोतया उभा राहिला व परशुरामपंत व रामचंद्रपंत यांचा गर्गशा वाढून मोठीच गडबड उडाली. त्या गडबडीत धनाजीबाबांनी आपले हात धुवून घेतले– "तेव्हा धामधुमेत पत्र जाहले ते जयसिंग जाधवराऊ सेनापति याणी आड घालून पिराजी यादव व पदाजी यादव व गिरजोजी यादव व समध नसता धनाजी जाधव प॥ मजकूर म्हणोन पत्र आपलेच विद्यमाने लेहोन गलबलियात मुद्रा करून घेतले– " पण " गलबलियात मुद्रा करून घेण्याची " धनाजीची हातचलाखी त्याला पचली नाही, कारण त्याची गाठ गिरजोजी यादवाशी होती. तेव्हा त्याने मोगलांना मिळालेल्या सुभानजी, स्वरूपजी, पदमोजी व पदाजी या मंडळींकडून कऱ्हाड परगण्यातील देशमुखीचे दहा गाव विकत घेतले. पण लवकरच हीही गावे त्याला गिरजोजी यादवाकडें परत करावी लागली. ' ज्या गावच्या बोरी त्याच

गावच्या बाभळी ' असे म्हणतात ते खरे आहे. पण साधेल तेथे हात मारण्याची ही प्रवृत्ति, धनाजीसारख्या मोठ्या माणसाला शोभा देत नाही असे म्हणणे भाग आहे.

पण त्याला इलाज नाही. माणूस आहे तेथे दोष आहेतच. पण धनाजीचे दोष हे सर्व मराठ्यांचे होते, त्याचे गुण मात्र त्याचे एकट्याचे होते; आणि त्याच्या दोषापेक्षा त्याचे गुण फार मोठे होते, म्हणूनच मराठ्यांच्या इतिहासांत त्याचे नाव अढळपदी राहिलेले आहे.

धनाजीच्या अतुल पराक्रमाबद्दल प्रश्नच नाही. पण पराक्रमाप्रमाणेच त्याच्या ठिकाणी समंजसपणा फार होता. या बाबतीत तो संताजीपेक्षा श्रेष्ठ ठरेल असे वाटते. घोरपड्याबद्दल त्याच्या मनात अढी होती हे खरे आहे. पण मिळते घेण्याचा मनाचा मोठेपणा त्यानेच दाखवला हेही तितकेच खरे आहे. संताजीच्या वधानंतर समस्त घोरपडे मंडळींचे व धनाजीचे वैर चालू राहिले. सन १७०० च्या अखेरीस मोगलांशी लढत असता एकीकडे घोरपडे व धनाजी ब्रह्मपुरीच्या आसपास एकमेकांशी लढत होते. त्यात घोरपड्यांचा मोड झाला व ते अहीर-वाडीस पळून गेले. पण पुढच्याच वर्षी पारडे फिरले. निरेच्या काठी लढाई होऊन त्यात धनाजीचा पराभव झाला व त्याचा प्रमुख सहाय्यक हणमंतराव निंबाळकर घोरपड्यांच्या हातात पाडाव पडला. या लढाईनंतर धनाजी स्वतः घोरपड्यांस भेटला व त्याने त्यांच्याशी सख्य केले. या तडजोडीचा फायदा झुल्फिकारखाना-विरुद्ध फिरोजाबादच्या लढाईत काय झाला हे आपण पाहिलेच आहे.

धनाजीने शिवाजी महाराज, संभाजी, राजाराम व ताराबाई अशा चार छत्र-पतींच्या कारकिर्दी पाहिल्या व प्रत्येक छत्रपतीशी तो एकनिष्ठ राहिला. संता-जीचा प्रकार निराळा होता. त्याचे राजारामाशी पटले नाही. " संताजी घोरपडे याणी स्वामींच्या पायासी हरामखोरी केली " असे राजारामच म्हणतो. असाच प्रकार त्याचा भाऊ हिंदुराव घोरपडे याचा ताराबाईच्या बाबतीत झाला. इति-हासाची पुनरावृत्ति झाली आणि ज्याप्रमाणे राजारामाने संताजीच्या, त्याप्रमाणे ताराबाईने हिंदुरावाच्या पारिपत्यासाठी धनाजीची रवानगी केली. पण इति-हासाची पुनरावृत्ति येथेच थांबली नाही. धनाजी व हिंदुरावाची अथोनीजवळ लढाई होऊन हिंदुरावाचा पराजय झाला; व त्याने कुपगलच्या किल्ल्याचा आश्रय घेतला. धनाजीने किल्ल्यास वेढा दिला; तेव्हा हिंदुरावाने झुल्फिकार-खानास आपल्या मदतीस बोलाविले. झुल्फिकारखानाने आनंदाने या गोष्टीस संमति दिली. तो तुंगभद्रेपर्यंत आल्याचे कळताच धनाजी वेढा उठवून चालता झाला. तेव्हा हिंदुराव किल्ल्यातून बाहेर पडून सोंडूरास निघून गेला. तो झुल्फि-कारखानास मिळाला नाही. या प्रसंगात घोरपडे घराण्याच्या एका अत्यंत उदात्त वैशिष्ट्याचे दर्शन होते. त्यांची छत्रपतीविषयी निष्ठा संशयास्पद असेल पण त्यांची मराठी राज्याविषयी निष्ठा संशयातीत होती. हिंदुरावापेक्षा भीषण

प्रसंग संताजीवर कोसळला होता. त्याला प्रत्यक्ष छत्रपतीने हरामखोर ठरवून देशोधडीस लावले होते, त्याचे सहकारी त्याच्यावर उलटले होते, वाघाच्या मागे शिकारी कुत्रे लागावेत त्याप्रमाणे कारखळ्याच्या जंगलांत मारेकरी त्याचा माग काढीत होते. अशा स्थितीत त्याने एका शब्दानेही मोगलांकडे येण्याची इच्छा प्रकट केली असती तर औरंगजेबाने किंवा झुल्फिकारखानाने त्याचे केवढ्या हर्षाने स्वागत केले असते याची कल्पनाच केली पाहिजे. पण तो विचारही त्याच्या मनाला शिवला नाही. त्याने मरण पतकरले पण तो मोगलांकडे गेला नाही हा केवळ अपघात नव्हता. तो एका मनोधारणेचा आणि संस्कृतीचा स्वाभाविक आविष्कार होता आणि ती मनोधारणा आणि संस्कृति शिवछत्रपतींच्या प्रत्यक्ष सहवासाचे फलित होते. संताजी–धनाजी हे शिवाजी महाराजांच्या तालमीत तयार झाले होते, असे म्हणतात याचा अर्थ हा असा आहे. धनाजीची स्वराज्यनिष्ठा त्याच्या स्वराजनिष्ठेंप्रमाणेच निष्कलंक होती हे सांगणे नकोच.

असा हा शिवमंत्राचा महिमा आहे. ज्यांना त्या मंत्राचा संस्कार झाला नाही त्यांच्यात स्वराज्याबद्दलही निष्ठा निर्माण झाली नाही व छत्रपतीबद्दलही झाली नाही. फक्त स्वार्थनिष्ठा तेवढी राहिली. ते नुसतेच पराक्रमी झाले. स्वतंत्र राज्य निर्माण करण्याची ऐपत असलेला नेमाजी शिंद्यासारखा धुरंधर सेनापति–माळव्याचा अवघा मुलुख त्याने घोड्याच्या टापांखाली तुडवला. पण हाच नेमाजी शिंदे पुढे स्वराज्य सोडून बहादूरशहाच्या पदरी सात हजारी मनसब पत-करून मोगलांची भाकरी खात आयुष्य कंठू लागला. महाप्रमाण नेमाजी 'अङ्गुष्ठमात्र पुरुष' झाला. कळसूत्री बादशहाच्या दरबारात स्वतःच एक कळ-सूत्री बाहुले बनून राहिला. अरेबियन नाइटस्‌मधल्या गोष्टीतल्याप्रमाणे आधी तो राक्षस आकाशभर पसरला होता आणि नंतर पाहता पाहता तो बाटलीत बंद झाला. नेमाजीचे नावही पुढे ऐकू येईनासे झाले. आधी तो मोगलांकडे होता, मग मराठ्यांकडे आला, मग परत मोगलांकडे गेला. संताजी धनाजीपाशी जे राष्ट्रीय चारित्र्य होते ते नेमाजी शिंद्यापाशी औषधालाही नव्हते हेच याचे तात्पर्य होय.

धनाजी काय, नेमाजी काय, परशुराम त्र्यंबक काय किंवा रामचंद्रपंत अमात्य काय, हा सर्वच माणसे एकापेक्षा एक कर्तबगार होती. मराठी राज्याला कर्तबगार माणसांची वाण कधीच भासली नव्हती. वाण होती तो या सर्व पराक्रमी माण-सांना एका हुकमतीत राबविणाऱ्या समर्थ प्रशासकाची. त्याच्या अभावी मन मानेल तिकडे भालेराई गाजविणारे सगळेच बारभाई मिळाले असते तर अराजकाच्या आपत्तीत सापडलेले हे मराठी राज्याचे तारू या आणीबाणीच्या प्रसंगी कोठे भरकटत गेले असते, हे सांगणे कठीण आहे. जिच्यामुळे या संकटापासून स्वराज्याचा बचाव झाला ती व्यक्ति म्हणजे ताराबाई होय.

□ □

# (१६)

ज्या वेळी राजाराम मृत्यु पावला तेव्हा ताराबाई फक्त पंचवीस वर्षांची होती. ऐन तारुण्यात तिच्यावर वैधव्याची कुऱ्हाड कोसळली. तिचा मुलगा शिवाजी हा केवळ चार वर्षांचा अजाण अर्भक होता. पण तिला मनमुराद रडायलाही वेळ नव्हता. औरंगजेबाने वसंतगड सर करून साताऱ्याला मोर्चे लावले होते; आणि साताऱ्याच्या समरभूमीवर मोगल आणि मराठे यांचा सामना अटीतटीला आलेला होता. आता मराठी राज्याची सारी मदार तिच्यावर होती. तिनेच त्या भयंकर परिस्थितीचे वर्णन केले आहे- "या प्रांते आलियावरी मुख्य ताम्राने (औरंगजेबाने) राज्यावरी चालोन घेतले. गड किले आक्रमीत चालिला. तैशा प्रसंगात राजश्री कैलासवासी स्वामीने (राजारामाने) सिंहगडचे मुक्कामी कैलासवास केला. स्वामीवरी (शिवाजी) व मातुश्री साहेबावरी (ताराबाई) संपूर्ण राज्याचा कसाला पडिला." तिने मुकाट्याने आपले दुःख आवरले आणि परिस्थितीला तोंड दिले.

परिस्थिति फार बिकट होती. राजाराम मृत्यु पावला होता. छत्रपतींचे सिंहासन रिकामे पडले होते. ते कोणत्याही परिस्थितीत रिकामे राहणे इष्ट नव्हते. लढणाऱ्या मराठ्यांचे नीतिधैर्य अभंग राहण्याच्या दृष्टीने सिंहासनावर बाल का होईना छत्रपति असणे फार जरुरीचे होते. याचसाठी हजार मैलांवर का होईना, जिंजीला राजारामाने आपली राजधानी थाटली होती. कारण राज्य ही निर्गुण निराकार कल्पना आहे; राजा हे त्या कल्पनेचे साकार व सगुण रूप आहे. ते सगुण रूप समोर असल्याशिवाय माणसांच्या भावनांना आवाहन होऊ शकत नाही. राजारामाचा मृत्यु २ मार्च १७०० ला सिंहगडावर झाला, तेव्हा ताराबाई विशाळगडावर होती. तिला ४-५ मार्चला ही बातमी कळली. तिने वेळ घालविला नाही. आणखी चारपाच दिवसांत १० मार्च १७०० रोजी वर्षप्रतिपदेच्या मुहूर्तावर तिने आपला मुलगा शिवाजी याचे मंचकारोहण करविले आणि मराठ्यांना प्रथम छत्रपति मिळवून दिला.

तितक्याच तातडीने तिने दुसरे राजकारण केले. राजारामाच्या मृत्यूनंतर अवघ्या दहा दिवसांत औरंगजेबाच्या दरबारचे अखबार सांगतात की ताराबाईचे वकील वाटाघाटीसाठी बादशहाकडे आले. ताराबाईने तहाच्या अटी कळविल्या त्या अशा- (१) आपल्या पुत्रास सात हजारी मनसब व दक्षिणच्या देशमुखीचे हक्क मिळावेत. (२) त्यासाठी दक्षिणच्या मोगल सुभेदाराच्या सेवेत पाच हजार

मराठी फौज राहील. आणि मोगलांना पन्हाळा, सातारा, चंदनवंदन, परळी इत्यादि सात किल्ले मिळतील. (३) छत्रपति शिवाजी महाराज (थोरले) किंवा उदयपूरचा महाराणा यांना जशी दरबारी येऊन बादशहास मुजरा करण्याची सक्ती नव्हती तशी सक्ती शिवाजीराजे यांच्यावरही नसावी. पण औरंगजेब मुलुखाचा हेकट असल्यामुळे तहाच्या वाटाघाटी फिसकटल्या. मराठ्यांनी सर्वच किल्ले देऊन टाकले तर त्यांच्याशी तह होऊ शकेल असे त्याने ताराबाईच्या वकिलांना सांगितले. असल्या स्वतःच स्वतःला भडाग्नि देण्याच्या अटीवर तह करायला कोणता माणूस तयार होईल? त्यामुळे तह बारगळला यात नवल नाही.

ताराबाईच्या या तहाच्या वाटाघाटी म्हणजे औरंगजेबापुढे शरणागति होती असे समजणे चूक ठरेल. तो राजकारणातला एक पवित्रा होता. त्यामागील उद्देश असा होता की वाटाघाटीत औरंगजेबाला गुंतवून त्याचे लक्ष्य द्विधा करावयाचे आणि यदाकदाचित् वाटाघाटी यशस्वी झाल्याच तर काही प्रदेश व किल्ले औरंगजेबाला देऊन त्याला प्रथम दक्षिणेतून काढून उत्तरेला रवाना करून द्यावयाचे. त्याची पाठ वळली म्हणजे किल्ले आहेत आणि आपण आहोत. अशी ही राजनीति होती. नेहमीच सरळ वागून चालत नाही. वाकडे बोट केल्याशिवाय तूपही निघत नाही हा रोजचा अनुभव आहे. मग हे तर राजकारण होते. तेथे केवळ नीतीही चालत नाही व केवळ शौर्यही कामी येत नाही. वेळेप्रमाणे दोन्ही वापरावे लागते. "कातर्यं केवला नीतिः शौर्यं श्वापदचेष्टितम् । अतः सिद्धिसमेताभ्यामुभाभ्यामन्वियेष सः ॥" शिवाजी महाराजांनीही वेळ होती तेव्हा जयसिंगाला किल्ले दिले व वेळ आली तेव्हा परत घेतले. हे उदाहरण ताराबाईपुढे होते. औरंगजेबाला किल्ले दिले म्हणजे तो काही मारुतीने द्रोणागिरि उचलला, त्याप्रमाणे किल्ले उचलून दिल्लीला नेऊन ठेवणार नव्हता. ते येथेच राहणार होते. हे न समजण्याइतकी ताराबाई खुळी नव्हती.

औरंगजेब हटत नाही हे पाहून मात्र ताराबाईने किल्ले लढविण्याचा निश्चय केला. पण त्यातही तिने तारतम्य राखले. किल्ले लढवायचे, पण त्यात शक्य तो इरेला पडावयाचे नाही, शरणागति पतकरायची पण ती भक्कम पैसे घेऊन; किल्ला खाली करून द्यायचा, पण मुसळधार पाऊस लागल्यावर; पावसाळ्यात किल्ल्यावरच्या व परत जाणाऱ्या मोगलांवर छापे घालून त्यांची लांडगेतोड करावयाची. त्याच वेळी मोगलांची रसद तोडावयाची, आणि बाकीच्या फौजेने बादशाही मुलखात धुमाकूळ घालून मोगलांना हैराण करायचे अशी तिने योजना आखली. ताराबाईची ही सारी योजना किती यशस्वी झाली याची साक्ष इतिहास देतच आहे.

पन्हाळा, खेळणा, सिंहगड, राजगड इत्यादि किल्ल्यांवर एकामागून एक अशा प्रकारे औरंगजेबाचे आक्रमण होत असताना तिने त्या किल्ल्याच्या किल्लेदारांना लिहिलेली पत्रें एकापुढे एक ठेवून वाचली म्हणजे ताराबाईच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक स्पृहणीय विशेष ध्यानात आल्याशिवाय राहात नाहीत. किल्ल्याच्या शिबंदीला किल्ला ईर्षेने लढवण्याबद्दल तिची चेतावणी, औरंगजेबाच्या दगेखोर स्वभावाचे तिचे सम्यक् आकलन, त्याला अद्दल घडविण्याची तिची जिद्द, तिच्या लष्करी डावपेचांचे चातुर्य तिच्या या पत्रांतून पदोपदी दिसून येते. ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की ही सारी पत्रे छत्रपति शिवाजीच्या नावाने लिहिली असली तरी तो केवळ राजनैतिक उपचार होता; ही गोष्ट पत्रे लिहिणाऱ्याला आणि वाचणाऱ्याला उत्तम माहीत होती. आपल्या देशात बायकांनी राज्य करण्याची पद्धत नाही. त्या नूरजहानप्रमाणे नवऱ्याच्या मार्फत किंवा चांदबिबीप्रमाणे मुलाच्या मार्फत राज्य करू शकतात, याला ताराबाईचा नाइलाज होता. एरवी ज्या थैलोला वंदन करून मराठे किल्लेदार तीमधील पत्रे वाचीत होते, त्या पत्रांतील आपल्या कानावर पडणारी ओजस्वी आणि घणाघाती वाणी प्रत्यक्ष मराठ्यांच्या महाराणीची व शिवछत्रपतीच्या सुनेची आहे, हे ते मनोमन जाणत होते आणि त्यामुळे ते मोहरून उठत होते. "प्रवर्तितो दीप इव प्रदीपात्" ज्योतीने ज्योत पेटवावी त्याप्रमाणे जिच्या या पत्रांनी त्यांच्या अंतःकरणात औरंगजेबाचा प्रतिकार करण्याची आग पेटवली, त्या ताराबाईच्या अंतःकरणात तो प्रतिकाराचा ज्वालामुखी कसा धग गत असेल याची केवळ कल्पनाच केली पाहिजे.

पन्हाळ्याला औरंगजेबाने वेढा दिला असता ती विठोजी केसरकराला लिहिते—"तुम्ही हमेशा कस्त करून गनिमास नतिजा पावविता. एकदोन वेळ मोर्चा मारिला. औरंगजेबाला तरी ठेचगा द्यावा अशी उमेद धरता. या उपरी औरंगजेब आला आहे तरी त्याचा हिसाब न धरिता स्वामीची जागा जतन करणे—" आणि ती केसरकराला दिलासा देण्यास विसरत नाही—"स्वामी ऊर्जित हरबाब करतील. दिलासा असो देणे." पुढील वर्षी औरंगजेब विशाळगडला आला, तेव्हा ती प्रतापराव मोऱ्याला लिहिते. "औरंगजेब विशाळगडास बिलगला याजकरिता त्याचे कबिलाबाड मारून हमेशा गोटावर हल्ले करावे. तरीच तो बलकुबल राहतो." ताराबाईचे हे सूत्र विशाळगडला औरंगजेब असताना तर मराठ्यांनी आचरणात आणलेच, पण बहादूरगडला तो छावणी करून असता तेथेही त्याचे कबिलाबाड मारून महमंद अमीनखानाची फजिती केली. औरंगजेबाचा स्वभाव ताराबाई उत्तम जाणत होती. ती म्हणते— "औरंगजेब गनीम हा दगेखोर आहे. कोण समयी काय विचार करील तोही काही कळत नाही. त्यास तुम्ही बळकट फौजेनिशी या तोंडे राहिस तरी त्याचे वस्तु चळवळ करवत नाही." पावसाळा येईपर्यंत किल्ला लढवायचा, त्या आधी तो मोगलांना द्यावयाचा नाही हे ताराबाईचे धोरण होते.

सिंहगडच्या बधई आणि खंडई या बेरड प्रमुखांनी पावसाळा येण्याच्या आत एप्रिल-मध्येच घाईघाईने मोगलांना किल्ला दिला याबद्दल तिला संताप आला—"सिंहगडास औरंगजेब बिलगला होता. त्यास नतिजा पावावयानिमित्त स्वामीने तुम्हास किल्ला मजकुरी ठेवले होते. उतावळी करून, हिंमत सोडून, तहरह करून किल्यावरून उतरून राजगडास आलेस म्हणोन ··· हुजूर विदित केले. त्यास स्वामीने तुमचे मदतीस लोक पाठविले. ऐवजदास पाठविण्यास काही न्यून केले नसता उतावळी करून हिंमत सोडून ही गोष्ट केली हे काही बरे केले नाही. पर्जन्य पडेपर्यंत किल्ला भांडवावयाचा होता ती गोष्ट न केली." राजगडावर संताजीराव व महिपतराव सिलिंबकर यांनी औरंगजेबाचा शर्थीने प्रतिकार केला, तेव्हा तिने त्यांची मुक्तकंठाने प्रशंसा केली व सेवेचे चीज होईल असे आश्वासन दिले—"अवरंगजेब किले राजगडास बिलगला आहे. मोर्चे चालऊन यालगार करितो. परंतु तुम्ही त्याचा हिसाब न धरिता शर्तीनसी नतीजा पावविता म्हणून शंकराजी पंडित सचिव याणी लिहिले व सांप्रत तुमचे मर्दानगीचे वर्तमान सोनजी फर्जंद यांणी लिहिले त्यावरून कळो आले. तुमचे सेवेचा मजुरा जाला. तरी तुम्ही स्वामींचे एकनिष्ठ सेवक तरवारेचे आहा. पुढेही एच रीतीनें औरंगजेबास नतीजा पावऊन फत्तेचे वर्तमान लिहून पाठविणे. स्वामी तुमची सर्फराजी करितील." याप्रमाणे स्वतः जिद्द धरून आणि लोकांत जिद्द पेटवून तिने किल्ल्यामागून किल्ला लढविला. औरंगजेबाने किल्लें घेतले तरी त्याचा दरकार बाळगला नाही. त्याचे जास्तीत जास्त नुकसान व आपले कमीत कमी नुकसान कसे होईल याचे अवधान सावध चित्ताने सदैव राखले; साहससुद्धा मोजून मापून करायचे हा मराठी मनाचा उदात्त व्यवहार ती विसरली नाही, व तुटेपर्यंत तिने ताणले नाही. आपली जास्तीत जास्त कर्ती माणसे शाबूद राखून व औरंगजेबाची जास्तीत जास्त माणसे मारून, त्यांच्याकडून जास्तीत जास्त पैसा उकळून, त्यांचे सामानसुमान लुटून त्याला गरीब करून व आपल्या लोकांना श्रीमंत करून तिने त्याला किल्ले तात्पुरते घेऊ दिले आणि त्याची महाराष्ट्राकडे पाठ फिरल्याबरोबर ज्या वेगाने तो किल्ले सर करीत गेला त्याच्या दुप्पट वेगाने त्याने जिंकलेले सारे किल्ले परत काबीज करून, त्याचा सहा वर्षांचा खटाटोप तिने केवळ दोन वर्षांत नामशेष केला. आभाळ यावे आणि जावे पण आकाश निर्लेप राहावे, अशा 'अभ्रपटल' न्यायाने औरंगजेब आला आणि गेला इतकेच झाले. मराठ्यांचे किल्ले मराठ्यांकडेच राहिले. मराठ्यांचा प्रसिद्ध गनिमी कावा वापरून ज्या हिकमतीने आणि चातुर्याने ताराबाईने औरंगजेबाचा हा डाव त्याच्यावर सपशेल उलटविला, त्याला इतिहासात खरोखरच तोड नाही.

महाराष्ट्रातील किल्ल्यांचे रणक्षेत्र जिद्दीने लढवीत असता ताराबाईने त्या रणक्षेत्राची व्याप्ति दक्षिणेत त्रिचनापल्ली, गोवळकोंडा, विजापूर आणि उत्तरेत

गुजरात आणि माळव्यापर्यंत वाढविली. दक्षिणेतील आक्रमणे महाराष्ट्राला नवी नव्हती. शिवाजी महाराजांनी जिंजी घेऊन दक्षिणविजयाची प्रस्तावना केलीच होती. पण उत्तरेत नेमाजी शिंद्याच्या नेतृत्वाखाली माळव्यात आणि धनाजी जाधवाच्या हाताखाली गुजरातेत मराठी फौजा घुसविण्याची जी दूरदृष्टि ताराबाईने दाखविली ती मात्र अभूतपूर्व होती. या उत्तरेच्या स्वारीचे किंचित् सूतोवाच आपल्या अखेरच्या दिवसांत राजारामाने केले होते हे खरे. पण ते काम पुरे न होताच त्याला मृत्यु आला. नवऱ्याचे अपुरे राहिलेले काम ताराबाईने पुरे केले असे म्हणावे काय ? औरंगजेबाचे कबिलाबाड केवळ त्याच्या छावणीपर्यंत पसरले होते असे नाही. त्याचे उत्तरेकडचे प्रांत हे त्याचे खरे कबिलाबाड होते ते मारून ताराबाईने त्याला सदैव बलकुबल राखले आणि दक्षिण घेता घेता उत्तरही जाते कीं काय असा त्याच्या मनाला धाक लावला. पुढे मराठ्यांनी उत्तरेत फार दिग्विजय केले आणि अटकेवर झेंडे लावून तर त्या दिग्विजयावर कळस केला. पण मराठ्यांची तोंडे उत्तरेकडे फिरविण्याचे आणि उत्तर दिग्विजयाची कल्पना समूर्त करण्याचे पहिले श्रेय ताराबाईचे आहे हे निर्विवाद आहे. औरंगजेबाने बेडरांच्या वाकिणखेड्याला वेढा घातला तेव्हा 'शत्रूचा शत्रु तो आपला मित्र' या राजनीतीतल्या तत्त्वाची आठवण ठेवून तिनें धनाजी जाधव व हिंदुराव घोरपडे या कसलेल्या सेनानींच्या नेतृत्वाखाली पाच हजारांचे घोडदळ व वीस हजारांचे पायदळ त्यांच्या मदतीसाठी रवाना केले व औरंगजेबाची बाजू आणखी कमकुवत करून टाकली.

तिने राज्याची सूत्रे हाती घेतली, तेव्हा तिच्यावर आभाळ कोसळले होते. तिचे वय लहान होते. तिचा अनुभव थोडा होता. तिचा नवरा मेला होता. तिचा मुलगा लहान होता. ती बाईमाणूस होती. तिच्या राज्यावर शत्रूने आक्रमण केले होते. पण अवघ्या सात वर्षात तिने आपल्या चातुर्याने, हुन्नराने, हिकमतीने, धैर्याने इकडचे जग तिकडे केले व प्रतिसृष्टि निर्माण केली. तिने किल्ले लढविले आणि परत घेतले. तिने औरंगजेबाच्या उत्तरेकडच्या प्रांतांत धुमाकूळ माजविला आणि दक्षिणेकडचा मुलुख बेचिराग केला. तिने औरंगजेबाच्या शत्रूंना बळ दिले आणि त्याला कमजोर केले. तिच्याच शब्दांत तिने औरंगजेबाचा 'हिसाब धरिला नाही' आणि महाराष्ट्रावर आक्रमण करण्याचे फाजील धाडस केल्याबद्दल तिने औरंगजेबाला चांगला 'ठेचगा दिला' आणि 'शर्तीनसी बरा नतीजा पावविला' "औरंगजेबासारिखा महान् शत्रु हतोद्यम होत्साता परिताप सागरी निमग्न केला." तिने स्वतःलाही तारले व आपल्या राष्ट्रालाही तारले हाच तिच्या शहाणपणाचा पुरावा. ताराबाईचीही कामगिरी महाराष्ट्राच्या इतिहासात तर चिरंतन झळकत राहील यात शंकाच नाही; पण जगाच्या इतिहासातही तिच्याशी तुलना करता येण्यासारख्या स्त्रिया हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या तरी निघतील कीं नाही

हा प्रश्नच आहे, ज्या मराठ देशाच्या बायका सुद्धा इतक्या शूर आणि हिकमती, तो मुलूख आपल्या दावणीला बांधण्याचे मनात मांडे खाणारा औरंगजेब एक तर भलताच भाबडा तरी असला पाहिजे नाहीतर भलताच आशावादी तरी असला पाहिजे.

आपण मराठी माणसे, त्यामुळे ताराबाईची आपण स्तुति करावी यात नवल नाही. आपल्या स्तुतीत अतिशयोक्तीची धास्ती आहे. पण नवलाची व आनंदाची गोष्ट अशी की मराठ्यांचा कट्टा दुश्मन् असलेला खाफीखानही ताराबाईच्या कर्तबगारीवर निहायत खुष आहे. खाफीखान हा सच्चा इतिहासकार आहे. राजारामाच्या मृत्यूनंतर मराठे मोडले म्हणून औरंगजेबाचे अभिनंदन करणाऱ्या मूर्ख सरदारांचा उपहास करताना तो म्हणतो– "त्यांची दृष्टि वरवरच होती. परमेश्वराच्या दरबारात काय संकल्प आहे याची त्यांना काय कल्पना ? संभाजी कैद होऊन वध पावला त्या वेळी त्यांना राजारामाच्या अस्तित्वाचे महत्त्व वाटले नाही. त्या वेळी ते म्हणत की बरे झाले, दक्षिणेतून युद्धाचे मूळ नाहीसे झाले. आताही ते असेच म्हणून आपल्या मनाचे समाधान करून घेऊ लागले. ते एकमताने म्हणू लागले, " या दुष्ट मराठ्यांची पाळेमुळे नाहीशी झाली. त्याच्या मागे त्याची लहान मुले आणि निराधार बायका राहिल्या आहेत. त्यांचा निकाल लावणे म्हणजे अगदी सोपे आणि क्षुल्लक आहे. पण कवीने म्हटले आहे– "शत्रूला क्षुद्र आणि दुर्बळ म्हणून कधीही लेखू नका."

आणि तो ताराबाईबद्दल म्हणतो– "ताराबाई ही राजारामाची थोरली बायको होय. ती बुद्धिमान् आणि शहाणी होती. सैन्याची व्यवस्था आणि राज्यकारभार या बाबतीत नवऱ्याच्या हयातीतच तिचा मोठा लौकिक झाला होता. तिने विलक्षण धामधूम उडविली. त्यात तिच्या सैन्याच्या नेतृत्वाचे आणि मोहिमांच्या व्यवस्थेचे गुण प्रकर्षाने प्रकट झाले."

"तिने आपल्या तीन वर्षांच्या मुलाला राजारामाच्या जागी बसविला. तिने सगळा कारभार आपल्या हाती घेतला. सरदारांच्या नेमणुका, त्यांच्या बदल्या, राज्याचा कारभार, बादशाही मुलुखावरील हल्ले या सर्व गोष्टी तिच्या तंत्राने चालू लागल्या. तिने आपल्या सरदारांची मने आपल्याकडे ओढून घेतली. तिने आपल्या सैन्याची योजना अशी केली की, दक्षिणेचे सहा सुभे, सिरोज, मंदसोर आणि माळव्याच्या सरहद्दीपर्यंत मराठ्यांनी धामधूम उडविली. बादशहाने आपली हयात मोहिमा करणे आणि किल्ले घेणे यात घालविली, तिच्याविरुद्ध तो शेवटपर्यंत लढत राहिला. पण काफरांचे बळ आणि बंड ही दिवसेदिवस वाढतच गेली."

खाफीखानाप्रमाणेच 'तारीखे दिल्कुशा'चा कर्ता भीमसेन सक्सेना याने ताराबाईच्या कामगिरीचे मूल्यमापन केलेले आहे. भीमसेन हा हिंदु इतिहासकार आहे

पण म्हणून काही तो मराठ्यांचा पक्षपाती आहे असे नव्हे. औरंगजेबाचा नोकर राव दलपत याचा तो नोकर आहे. म्हणजे परंपरेने तो औरंगजेबाचा दासानुदास आहे. औरंगजेबाला तो 'सच्चरित्र, ईश्वराचा परमभक्त व धर्मनिष्ठ बादशहा' समजतो. औरंगजेबाने मराठ्यांवर केलेल्या आक्रमणात त्याला काही अन्याय दिसत नाही. पण ताराबाईबद्दल तो म्हणतो की, "राजारामाची बायको ताराबाई हिचा आपल्या नवऱ्यापेक्षाही अधिक असा दरारा होता." "राम (राजाराम) हा जिंजीहून निघून स्वदेशी आला आणि मरण पावला. त्याच्या अल्पवयी मुलाला त्याच्या जागी गादीवर बसविण्यात आले, पण सगळा कारभार त्याच्या आईच्या— (ताराबाईच्या) हातात आला. तिने इतकी उत्तम व्यवस्था केली की मराठे सरदार तिच्या आज्ञेशिवाय काही करीत नसत." खाफीखान आणि भीमसेन हे दोघेही इतिहासकार या स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळी दक्षिणेत होते. त्यामुळे त्यांच्या लिहिण्याला 'चक्षुर्वै सत्यं' अशा प्रत्यक्ष पुराव्याचे महत्त्व आलेले आहे.

शंभर घाव सोनाराचे व एक घाव लोहाराचा अशी म्हण आहे. त्या न्यायाने स्वजनांच्या शंभर स्तुतिवचनांपेक्षा शत्रूचे एक स्तुतिपर वाक्य लाख मोलाचे आहे. या दृष्टीने पाहता खाफीखान आणि भीमसेन यांच्यासारख्या शत्रुपक्षीय इतिहासकारांनाही जिची प्रशंसा करण्याचा मोह आवरला नाही, त्या ताराबाईच्या कर्तृत्वाचे आणखी अधिक विवेचन करण्याची आवश्यकता नाही.

औरंगजेबाचे हे आपल्या राज्यावर आलेले परचक्र परतवून लावताना ताराबाईला स्वकीयांशीही झगडावे लागले. सकृद्दर्शनी हे चमत्कारिक वाटते. कारण मराठ मंडळाने ताराबाईशी सामान्यत: सहकार्य केले व ते अपेक्षितही होते अशी आपली समजूत आहे. पण मनुष्यस्वभावाचा विचार करता त्यात चमत्कारिक काही नाही. देशाभिमान असला म्हणजे काही वैयक्तिक रागद्वेष, हेवेदावे, सत्तेचा मोह, मत्सर, लोभ हे स्वभावाचे कंगोरे नाहीसे होत नाहीत. राष्ट्रभक्ति ही काही बहात्तर व्यक्तिदोषांवर गुणकारी असलेली जडीबुट्टी नव्हे. ताराबाईला तिच्या सहकाऱ्यांत असलेल्या या सर्व उपद्रवी गोष्टींशी झगडावे लागले, आणि त्याला इलाज नव्हता. कारण ज्याला घरचा एकमुखी पाठिंबा नाही त्याला बाहेरच्या शत्रूशी निश्चितपणे मुकाबला करणे फार कठीण होते. विरोधाची अडगळ आणि केरकचरा साफ झाडून काढून घर आरशासारखे लख्ख करणे त्याला भागच आहे.

रामचंद्रपंत अमात्य, धनाजी जाधव, परशुराम त्र्यंबक, नेमाजी शिंदे, परसोजी भोसले, हिंदुराव घोरपडे हे तिच्या कारकिर्दीच्या प्रारंभी कारभारात प्रमुखपणे वावरत होते. पण या कर्तबगार पण बहुधा एकमेकांना पाण्यात पाहणाऱ्या आणि नेहमीच मालकाशी वाकून राहणाऱ्या नाठाळ धेंडांना जरबेत आणून त्यांच्याकडून काम करून घेणे ही फार कठीण गोष्ट होती. त्यांचे वय, त्यांचा अनुभव, त्यांची

इभ्रत या सर्वच दृष्टीने पाहता ताराबाई ही खरोखरच त्यांच्यापुढे 'कालची पोर' होती. रामचंद्रपंत अमात्य हा हुकुमतपन्हा होता, म्हणजे त्याचे हुकूम प्रत्यक्ष छत्रपतीनेही मोडता कामा नयेत अशी उंच पदवी राजारामाने त्याला दिली होती. राजाराम त्याच्या तंत्राने चालत असे. तेव्हा राजाराम असेपर्यंत पंताचा कारभार सुरळीत चालला. पण ताराबाई ही कोणाच्या तंत्राने चालणारी नव्हती. ती स्वतः खबरदार बायको होती. तिला काम करून दाखविण्याची हौस होती, निर्णय घेण्याचे धारिष्ट होते आणि सत्ता गाजविण्याची महत्त्वाकांक्षा होती. त्यामुळें पंताचे आणि तिचे पदोपदी बिनसू लागले.

तिच्या कारकिर्दीच्या प्रारंभीच एका नाजूक आणि मूलगामी बाबतीवरून तिचा आणि पंताचा खटका उडाला. आपला मुलगा शिवाजी याचे तिने मंचकारोहण केले आणि नंतर त्याच्या मुंजीचा व राज्याभिषेकाचा विचार करून पंतांस बोलावले आणि म्हटले– "शिवाजी महाराजांची मुंज करावी व राज्याभिषेक करावा." तेव्हा पंत चमत्कारला, कारण इतर मराठ मंडळाप्रमाणे त्याची निष्ठा सर्वस्वी शाहूला वाहिली होती. पण ताराबाई शाहूला राज्याचा वारस म्हणून मुळी ओळखतच नव्हती. ती त्याला आपल्या मुलाचा दायादच समजत असे. ताराबाईचा विचार ऐकून पंत म्हणाला, "एव्हाच मुंजीची गडबड कां? थोरले शिवाजी महाराज (शाहू) लष्करात आहेत. त्यांची मुंज अद्यापि जाहली नाही. त्यांचे वीस वर्षांचे वय जाहले. तेही लवकरच येतील... असे जोशीराव वगैरे यांच्या सांगण्यात आहे. त्यांचाही निरोप भक्ताजी बंकी गायकवाड हुजरे यांजबरोबर आपल्यास आलाच आहे. ते आलियानंतर त्यांची व यांची मुंज एकदाच बहुत समारंभे करून करू." आणि असे बोलून पंताने ताराबाईला चतुराईची मसलत सांगितली की, "ते तख्तारूढ होतील. हे उभयता युवराजपद करतील." पण पंताची ही मसलत ताराबाईच्या मनास आली नाही. ती बोलली, "ते धनी, हे चोर आहेत असा अर्थ नाही. यांची मुंज अगत्यमेव मला कर्तव्य." त्यावर पंत परखडपणे म्हणाला, "मी अशा भावनेनें बोललो नाही. राजारामसाहेब हे राज्याभिषेक करून न घेता मंचकारूढ जाहले. तख्तारूढाचे अधिकारी ते (शाहू) असे वास्तविक लक्षात वागवून त्यांचे ठायी अंतःकरण लक्ष तसे होते. मरणान्त समयी बोलिले ते सर्वांस माहीत आहे. त्यावरून मी बोलिलो. तुमच्या मनात द्वैत उत्पन्न होऊन कर्तव्य असल्यास अगत्यमेव करावे." असे बोलून पंत तडक चालता झाला.

त्या वेळी शंकराजी नारायण आणि परशुराम त्र्यंबक या ताराबाईच्या हस्तकांनी उभे राहून पंतापुढे हात जोडले व त्याला विनंती केली की, "आपण या गोष्टीस आग्रह कां धरिता? धन्याची मर्जी त्यास आपण रुकार द्यावा." पण पंत काही परशुराम त्र्यंबक किंवा शंकराजी नारायणासारखा ताराबाईच्या ताटा-

खालचे मांजर नव्हता. तोही ताराबाईप्रमाणे स्वतंत्र बुद्धीचा व केला सवरलेला माणूस होता. त्याने त्यांना ताडकन् चाबूक वाजवावा तसे चमकावले– "धणी म्हणतील तसा रुकार द्यावयाचा मी नव्हे ! तुमच्या सर्वत्रांचे मर्जीस आल्यास लक्ष प्रकारे करावे. मी काही नको म्हणत नाही." असे बोलून तो घरास गेला.

पण ताराबाई पंताची किंमत जाणून होती. तिने परशुराम त्र्यंबक व शंकराजी नारायणाला सांगितले की, "पंतांचे घरी जाऊन पंताचा राग शांत करून रुकार घेऊन उद्योग करावा." तेव्हा ते दोघे पंताच्या घरी गेले. त्यांनी पंताची मर्जी पाहून विनंती केली की, "आपण बरायखुद (स्वतः) धणीपणा करीत आला तसाच महाराज धणी चालवीत गेले. परंतु आईसाहेबांची मर्जी एक प्रकारची, आपण रुकार दिलाच पाहिजे." काळ बदललेला आहे, ताराबाई म्हणजे राजाराम नव्हे, असा हा सेवकांनी बोध केल्यानंतर पंताने संदिग्ध उत्तर दिले– "कल्याणप्रद असेल ते करावे." पुढे शिवाजीची मुंज आणि राज्याभिषेक ताराबाईने निपटून शेवटास नेला हे निराळे; पण याच प्रसंगी तिने मनाशी खूणगाठ बांधली की पंत आपला नव्हे. तिने त्याचा बोज राखला, त्याचा अधिकार कायम ठेवला, पण त्याचे सहकार्य मिळावे म्हणून ती त्याची आर्जवे करीत बसली नाही. तिने चतुराईने परशुराम त्र्यंबक व शंकराजी नारायण यांना हाताशी धरले व त्यांच्या करवी ती आपली कामे करून घेऊ लागली. त्यामुळे पंत जास्तच चवताळला. कारण हे दोघे त्याच्या हाताखाली पाच होनावर वाढलेले कारकून होते. ज्यांना आपण पोटाला लावले, त्या कारकुनांनी आपल्या मांडीला मांडी ठोकून राजकारणे करावी हे पंतासारख्या 'मान्य पुरुषा'ला कसे सहन व्हावे ? पण त्याला इलाज नव्हता. आपल्या तत्त्वनिष्ठ व स्वतंत्र स्वभावाच्या गुणामुळे किंवा दोषामुळे पंत ताराबाईच्या कारभारात मागे पडला व परशुराम त्र्यंबक व शंकराजी नारायण बळावले.

आणखी एका प्रसंगाने रामचंद्रपंताची निष्ठा आपणाकडे म्हणजे आपला मुलगा शिवाजी याच्याकडे नसून ती शाहूकडे आहे हे ताराबाईच्या निदर्शनाला आले. खटावच्या खंडोपंत कुलकर्ण्याने शाहूचा तोतया उभा केला, त्या प्रसंगी राज्यात डोहणा माजून परस्पर सरकारकुनात पन्हाळ्याखाली गर्गशा लागला. हे परस्पर सरकारकून म्हणजे परशुराम त्र्यंबक आणि रामचंद्रपंत अमात्य होत. रामचंद्रपंताने शाहूची म्हणजे तोतयाची बाजू घेतली व ताराबाईच्या पक्षाच्या परशुराम त्र्यंबकाने त्याला विरोध केला. या प्रसंगी ताराबाई फार चातुर्याने व संयमाने वागली. तिने तोतया खंडोपंत कुलकर्ण्याचे टाळके सडकले पण रामचंद्रपंताच्या अंगाला हातही लावला नाही. वस्तुतः ताराबाईची सेवा करीत असता शाहूचा कैवार घेणे हा पंताचा तसे म्हटलेच तर राजद्रोह होता. पण पंताची स्वराज्यनिष्ठा ती जाणून होती. त्यामुळे पंताचा रथ इतरांपेक्षा जमिनीपासून दहा अंगुळे

वर चाललेला दिसत होता. आपल्या निष्ठांशी जागणाऱ्या पंताच्या धैर्याची जेवढी तारीफ केली पाहिजे, तेवढीच त्याची निष्ठा समजूनही त्याला सहिष्णुतेने सांभाळून घेणाऱ्या ताराबाईच्या चातुर्याचीही केली पाहिजे. एवंच राजारामाच्या कारकिर्दीत कर्ता व भोक्ता पुरुष असलेल्या पंतास ताराबाईच्या कारकिर्दीत साक्षी व तटस्थ असलेल्या पुराण पुरुषाचे स्थान प्राप्त झाले. त्याचे काम एवढेच राहिले– आशीर्वाद देणे व 'तथास्तु' म्हणणे.

ताराबाईच्या कारकिर्दीत तोतयाचे खूळ नवेच निर्माण झाले. "अबला यत्र प्रबला बालो राजा–" अशी ही स्थिति काही मूर्ख आणि उपद्व्यापी लोकांच्या पथ्यावर पडली; व त्यांनी गडबड उडविण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण ताराबाईपुढे त्यांची डाळ शिजली नाही. खटावच्या खंडो लिंगो कुलकर्ण्याने मोगलांच्या निर्बंधातून सुटून आलेला संभाजीचा मुलगा शाहू तो आपणच म्हणून गडकिल्ल्यांवर कागदपत्र चालविले. त्याचा बंदोबस्त ताराबाईने कठोरपणे केला. त्याला समक्ष आणवले व 'हा शाहू नव्हे' अशी सर्वांची खात्री पटल्यावर त्याला ठार मारले. शाहूचा तोतया करण्याची हुक्की आणखी एका इसमाला आली. तो म्हणजे सुप्रसिद्ध नावजी नाईक बलकवडे हा होय. या माणसाने सिंहगड घेताना खरोखरच तानाजी मालुसऱ्याच्या तोडीचा पराक्रम केला होता. तशाच पराक्रमान त्याने कोरीगड सर केला. त्याला राजारामाने पावनमावळातला मौजे सावरगाव इनामही दिला होता. पण सुखाने त्याला इनाम खाववेना. त्याला दुर्बुद्धि आठवली. त्याला शाहूचे सोंग आणावेसे वाटले. हेही तोतयाचे बंड खंबीरपणाने ताराबाईने मोडून काढले. पेशवा बहिरो मोरेश्वर लिहितो–" सालगुदस्ता जावजी बलकवडा याने हरामखोरीचे ढंग करून, किल्ले सुधागडचा आसरा करून, तोतयाचा बहाणा केला आणि लोक जमाव करून मुलखात स्वारी घालून गाव मारून नेऊ लागला. त्यास नतीजा त्याचे कर्तव्यानुरूप झाला."

जो प्रकार रामचंद्रपंत अमात्य आणि परशुरामपंत प्रतिनिधि यांचा होता, तोच थोड्याफार फरकाने धनाजी जाधव आणि हिंदुराव घोरपडे यांचा होता. दोघेही पराक्रमी होते, पण दोघांचेही एकमेकांशी बिलकुल पटत नसे. ताराबाईने दोघांचाही उपयोग करून घेतला पण ती दोघांच्याही आहारी गेली नाही. तिच्या कारकिर्दीत हिंदुराव घोरपड्याने तिच्याविरुद्ध बंड केले तेव्हा धनाजी जाधवाला त्याच्यावर रवाना करून तिने त्याला वठणीवर आणले. राजारामाच्या कारकिर्दीत धनाजी सेनापति होता, तसाच तो तिच्याही काळात राहिला, पण तिने त्याला डोक्यावर बसू दिले नाही. कऱ्हाडच्या यादवांच्या प्रकरणात धनाजीने राजारामाला सळो का पळो करून सोडले, पण ताराबाईपुढे त्याची मात्रा चालली नाही. मागे सांगितलेल्या खंडोपंत कुलकर्ण्यांच्या तोतया प्रकरणाने राज्यात मोठीच धमाल उडाली असता त्या गडबडीचा फायदा घेऊन धनाजी जाधवाने

कऱ्हाडच्या देशमुखीचे जे कागदपत्र झाले, त्यात पदाजी, पिराजी व गिरजोजी यादव या खऱ्या वतनदारांबरोबर संबंध नसता आपलेही नांव दडपून देऊन 'गलबलियात मुद्रा करून घेतले.' पण धनाजीने घातलेला हा 'मुद्राराक्षसा'चा गोंधळ त्याची 'मुद्रिते' शुद्ध करून ताराबाईनें दूर केला, तेव्हा मोगलांना मिळालेल्या गिरजोजी यादवाचे स्वरूपजी, सुभानजी व पदमोजी या भाऊबंदांकडून कऱ्हाड परगण्यातील देशमुखीचे दहा गाव धनाजीने विकत् घेतले; पण गिरजोजी यादवाने तक्रार केल्यावरून ताराबाईच्या हुकुमावरून तेही गाव त्याला परत करावे लागले.

हे गाव धनाजीकडे असता सुप्रसिद्ध पालीच्या डबीचा तंटा उद्‌भवला. पालीच्या खंडोबाची पौषात भरणारी यात्रा ही महाराष्ट्रात शिवकालापासून प्रसिद्ध होती. पालखी निघाल्याच्या दुसऱ्या दिवशीच्या डबीवर देशमुख–देश कुलकर्णी यांचा हक्क असे. डबी म्हणजे देवापुढे भक्तांनी अर्पण केलेल्या वस्तु. पाली हे गाव धनाजीने विकत घेतलेल्या दहा गावांत मोडत होते. त्यामुळे या डबीवर सकृद्दर्शनी त्याचा हक्क पोचत होता. पण हे गाव उंब्रज तर्फाखाली मोडत होते व उंब्रज व तारगांव तर्फाची देशमुखी गिरजोजी यादवाची होती. त्यामुळे धनाजी जाधव व गिरजोजी यादव यांचा या डबीवरून तंटा होणार हे जाणून ताराबाईने आधीच ही डबी साताऱ्याला आणून रामचंद्रपंताकडे अनामत ठेवली. अपेक्षेप्रमाणे सज्जनगडावर दोघांची कटकट झालीच. तेव्हा स्वतः या प्रकरणी निवाडा देऊन ताराबाईने ही डबी गिरजोजी यादवास सुपूर्द केली. ही गोष्ट १६९९ सालची. म्हणजे ताराबाई राज्यावर येण्याच्या पूर्वीची आहे हीं बाब लक्षात ठेवली पाहिजे.

गिरजोजी यादव हा ताराबाईचा विश्वासू, सेवक होता हे खरे; पण धनाजी जाधव हा सबंध मराठी राज्याचा सेनापति होता. त्याच्या मानाने पाहिले तर गिरजोजी ही एक अगदी क्षुल्लक असामी होती. अशा स्थितीत, त्याचा कैपक्ष घेऊन 'न्यायापुढे सारे सारखे' या उदात्त तत्त्वाची बूज राखण्याचे, व धनाजीसारख्या मातबर माणसाला नाराज करण्याचे धारिष्ट राजारामाने म्हणजे तिच्या नवऱ्याने तरी दाखविले असते काय ? संभाजीने जरूर दाखविले असते; कारण संभाजी पक्का बेडर माणूस होता. तो कुणाचीच पत्रास बाळगीत नसे. ज्याने सचिव आणि चिटणीस असल्या बड्या धेंडांना हत्तीच्या पायी तुडवायला मागेपुढे पाहिले नाही, तो धनाजी जाधवासारख्याला काय मोजणार हे दिसतेच आहे. आणि शिवाजी महाराजांबद्दल तर प्रश्नच नाही. तेव्हा मातबर माणसे तर जवळ बाळगावयाची, त्यांचा उपयोग तर करावयाचा, पण नाकापेक्षा मोती तर जड होऊ द्यावयाचे नाही हे अंतर्गत राजकारण चालविण्याचे अवघड तंत्र ताराबाईने आत्मसात् केले होते यात शंका नाही. या बाबतीत तिचे चातुर्य शिवाजी

महाराजांच्या तोडीचे होते असे म्हटले तर ती अतिशयोक्ति होणार नाही असे वाटते.

पण शिवाजीमहाराजांच्या कणखरपणाला जी कनवाळूपणाची जोड लाभली होती ती ताराबाईच्या स्वभावात असावी असे वाटत नाही. ‘ सगट लोकांचा जिव्हाळा । मोडू नये । ’ ‘ राखावी बहुतांची अंतरे । ’ ‘शिवरायाचे सलगी देणे । कैसे असे । ’ या शब्दात समर्थांनी सांगितलेले लोकसंग्रहाचे मर्म तिला साधता आले नाही. ती नुसतीच कणखर आणि कडक होती आणि त्यामुळे वेळ आली तेव्हा ती अगदी एकटी पडली. शाहूशी लढायला म्हणून पाठविलेला धनाजी जाधव त्यालाच जाऊन मिळाला. आपणाशी एकनिष्ठ राहावे म्हणून दूधभातावर हात ठेवून शंकराजी नारायणाकडून तिने शपथक्रिया करविली; पण शिरवळास शाहूकडून बोलावणे आले तेव्हा शाहूकडे जावे तर शपथ मोडते, व न जावे तर स्वामिद्रोह घडतो या संशयात त्या कर्तबगार माणसाला आत्महत्या करावी लागली. खंडो बल्लाळाचे नाव तर तिच्या कारभारात कोठेही ऐकू येत नाही ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. धनाजी हा शाहूबरोबर लढाईला म्हणून गेला आणि नंतर स्वतःबरोबर इतरांनाही शाहूकडे घेऊन गेला. तीच गोष्ट परसोजी भोसल्याची. रामचंद्रपंत अमात्य तर उघड उघड पहिल्यापासूनच शाहूचा पुरस्कार करीत होता. एक परशुराम त्र्यंबक मात्र तिच्याकडे राहिला, कारण तिनेच त्याला पुढे आणला होता. रामचंद्रपंताच्या बाबतीत एक कथा अशी आहे की परशुराम त्र्यंबकाचा पराभव करून शाहूने त्याला कैद केल्याची बातमी आल्यावर ताराबाईने आपला शिवाजी आणि आपली सवत राजसबाई हिचा संभाजी यांना रामचंद्रपंताच्या मांडीवर बसवले, व यांचा सांभाळ करावा अशी विनंती केली, तेव्हा पंत ताराबाईचा कारभार पाहू लागला म्हणजे ज्याला आपला समजून शाहूवर पाठविले तो धनाजी जाधव शाहूला मिळाला व ज्याला शाहूचा समजून आजपर्यंत अव्हेरिले तो पंत आपला ठरला. राजकारणात अनेक वेळा घडून येणाऱ्या अतर्क्य चमत्कारांपैकीच हा एक चमत्कार म्हटला पाहिजे. पण चमत्काराचा प्रश्न सोडला आणि नैतिकदृष्टया शाहूचा पक्ष ताराबाईपेक्षा जास्त प्रबळ होता हे डोळचाआड केले तरी संकटाच्या काळी जिवाला जीव देणारे सहकारी ताराबाईला जोडता आले नाहीत हे तिचे वैगुण्य ठळकपणे नजरेस आल्याशिवाय रहात नाही. यात तिच्या कठोर, करारी हुकमत गाजवू पाहणाऱ्या तुसडचा व हेकेखोर स्वभावाचा बराच भाग असावा असे वाटते. त्यात कित्येकदा तत्त्वासाठी व न्यायासाठी तिने समर्थांनाही धुडकावून लावले हे खरे. पण तत्त्वासाठी कां होईना, माणूस दुखावला जातोच. त्यामुळे तत्त्वनिष्ठ माणसाबद्दल आदर वाटला तरी प्रेम वाटत नाही. त्यात पुन्हा ताराबाई ही एकतंत्री सत्ता गाजविणारी हुकुमशहा होती. पण काळ फिरला

म्हणजे सारे हुकुमशहा एकाकी पडतात. ती त्यांची नियति अटळ असते. ताराबाईलाही ती चुकविता आली नाही पण तरीही हुकुमशहाची एकतंत्री सत्ता तिने जास्तीत जास्त स्वराज्याच्या कल्याणासाठीच वापरली ही गोष्ट तिच्या बाजूने जमेस अवश्य धरली पाहिजे.

ताराबाई केवळ हुकुमशहा होती म्हणूनच ती दोषास पात्र होती असे वाटत नाही. कारण हिंदु राजनीतीप्रमाणे हुकुमशहालाही म्हणजे राजालाही धर्मनियंत्रण असतेच. शिवाजी महाराजही त्याप्रमाणे धर्मनियंत्रण मानणारे पण जबरदस्त हुकुमशहाच होते. थोरल्या माधवरावाचीही गोष्ट तीच होती. तेव्हा ताराबाई हुकुमशहा झाली हे तिच्याच नव्हे तर आपल्याही लोकांच्या प्रकृतीशी सुसंगतच झाले. नव्हे, ती त्या काळाची गरजच होती. मराठ्यांना जर कोणी जबर शासक नसता तर अराजक झालेले ते राष्ट्र संकटांतून निभणे कठीण होते. कारण परचक्राइतकेच अराजक हेही दारुण संकट आहे. ती गरज ताराबाईने ओळखली व पूर्ण केली हेच तिचे इतिहासातील कार्य व ऐतिहासिक नियति होय. आणि 'हुकुमशहा,' हुकुमशहा' म्हणून एखाद्याच्या नावाने खडे फोडताना लक्षात ठेवले पाहिजे की हुकुमशहा व्हायलाही जातीचाच लागतो. ते येरा गबाळाचे काम नव्हे. शेतात बुजगावणे किंवा पोरांपुढे बागुलबोवा उभा करण्याइतके हुकुमशहा होणे सोपे नसते. त्याला अंगचाच वकूब लागतो. पण यंत्राचे कामाला स्निग्धता यावी म्हणून वंगण घालतात त्याप्रमाणे हुकुमशाहीच्या यांत्रिक कारभाराला ओलावा आणण्यासाठी जिव्हाळा वापरावा लागतो, तो ताराबाईला वापरता आला नाही एवढेच तिचे वैगुण्य.

ताराबाईच्या स्वभावाला मर्यादा होत्या. तिने स्वार्थ एवढाच पाहिला की महाराष्ट्राचे राज्य हे आपले आणि आपल्या मुलाचे आहे अशी तिची धारणा होती. तिची ही समजूत अगदी पक्की होती. ती शाहूचा हक्क मुळी मानायलाच तयार नव्हती. शिवाजी महाराजांनी हे राज्य स्थापन केले. ते संभाजीने पार विध्वंसून टाकले. ते राजारामाने परत अगदी नवे निर्माण केले. ते आपण रक्षण केले. त्या या राज्यावर शाहूचा कसलाही हक्क नाही. इतकेच नव्हे तर अनेक इतिहासकारांनी ध्वनित केल्याप्रमाणे तिची अशी निश्चित धारणा होती की, शिवाजीमहाराजांच्या मनात मुळी महाराष्ट्राचे राज्य संभाजीला द्यावयाचेच नव्हते तर राजारामाला द्यावयाचे होते. शाहू महाराष्ट्रात आल्यावर तिने सैतवडेच्याच्या सोम देसायाला जे पत्र लिहिले आहे, त्यात तिचे हे सर्व विचार व्यक्त झाले आहेतच, पण जरब देणारा करडा स्वभावही प्रकट झालेला आहे.

"राजश्री शाहुराजे ताम्रांच्या निर्बंधातून निघाले आहेत म्हणून हुजूर वर्तमान आले. यैशास हे राज्य थोरल्या कै. स्वामींनी बहुताश्रमें मेलऊन, सर्वार्थे संपूर्ण केले होते– ते राजश्री संभाजीराजे काका याणी विध्वंसून कैलासवासी स्वामी राज्या-

धिकारी जाले. त्याणी स्वपराक्रमे नूतनच राज्य संपादिले. स्वामींनी त्याचे संरक्षण करून ताम्राचा पराभव केला. राज्याची अभिवृद्धि होत चालली. दुसरी गोष्टी. हे राज्य थोरल्या कै. स्वामींनी तीर्थस्व. कै. स्वामींस द्यावेसें केलें होते. ऐसे असता त्यांस या राज्याशी संबंध नाही. त्या डोहणियात जे मिळाले आहेत, व मिळतील त्यास नतीजा पावावयाची आज्ञा करून, रा. जयसिंगराव जाधवराऊ सेनापती व हंबीरराव मोहिते सरलष्कर व वरकड सरदारांस फौजेनिशी पाठविलें आहेत. रा. परशराम पंडित प्रतिनिधि यांसही रवाना केले आहे. ज्याचे अनुसंधान त्याकडे लागले असेल त्यास हे मुलाहिजा होणार नाहीत. शासन करितील. तुम्ही वतनदार एकनिष्ठ आहा. तुम्हांपासून अनसारखी वर्तणूक होणार नाही. परंतु शाहूराजे यांजकडील कागदपत्र तुम्हांस आलें असता काही वर्तमान हुजूर लिहिले नाही म्हणजे काय! त्याकडून माणूस आले तेच कैद करून पाठवावयाचे होते. ते गोष्टी न केली. यामध्ये बरे काय विचारिले आहे! या उपरी ऐसे करीत न जाणे. त्याकडील कागदपत्र घेऊन माणूस येईल ते कैद करून हुजूर पाठवीत जाणें. कदाचित् कोण्ही त्यांकडे अनुसंधान लावील, राबता राखेल तरी त्याचा उबार राहणार नाही. तुम्ही अनसारिखा प्रसंग मनात आणाल, कागदपत्र येईल तो पन्हाम कराल, तरी तुमचे बरे होणार नाही. वतनापासून दूर व्हाल हे जाणोन स्वामीच्या पायाशी निष्ठा धरोन राहोन लिहिलेप्रमाणे वर्तणूक करणे. जाणिजे.” ताराबाईच्या या लिहिण्याशी राजारामाचे लिहिणे तोलून पहावे म्हणजे उभयता नवरा-बायकोच्या स्वभावातील तफावत तुलनेने सहजच मनात भरेल. शंकराजी नारायणाने दादजी नरस प्रभूचे वतन जबरीने बळकावले, तेव्हा त्याला तंबी देताना राजाराम लिहितो– “पुढे नाना प्रकारच्या अडचणी तुम्हास अशा करणीच्या येतील. कारण चिरंजीव (शाहू) कालेकरून तरी श्री देसी आणील.... ते (शाहू) मुख्य सर्व राज्यास अधिकारी. आम्ही करितो तरी त्याचेसाठीच आहे. प्रसंगास सर्व लोकास तिकडेच पाहाणे येईल व वागतील. हे कारण ईश्वरीच नेमिले आहे.”

राजारामाची उदात्तवृत्ति ताराबाईच्या ठिकाणी नव्हती हे उघड आहे. पण म्हणून एकदम उडी मारून जे उदात्त नव्हे ते नीच अशा दुसऱ्या टोकाला जाणेही बरोबर नाही. ताराबाई ही बाई होती आणि आई होती, हा तिचा स्त्रीस्वभाव आपण ध्यानात घेतला पाहिजे. कोणतीही बाई मालमत्तेतला सुतळीचा तोडासुद्धा दुसऱ्याला सुखासुखी द्यायला तयार होत नाही हे आपण नेहमी पाहतो. मग येथे तर राज्याचा प्रश्न होता. आणि कोणत्या आईला वाटत नाही की आपला मुलगा छत्रपति व्हावा ताराबाईने आपल्या मुलाला शिवाजीमहाराजांचे नाव ठेवले ते काही तिला दुसरे नाव सापडत नव्हते म्हणून नव्हे. आपला मुलगा आपल्या प्रतापी सासऱ्याप्रमाणे तिन्ही लोकांत झेंडा लावणारा निघावा ही तिची महत्त्वा-

कांक्षा त्या नावातच व्यक्त झालेली आहे. तिला महत्त्वाकांक्षा असली म्हणून काय झाले? राजकारणात महत्त्वाकांक्षा असणे काय पाप आहे? त्या महत्त्वाकांक्षेसाठी तिने किंमत दिली होती. ते राज्य तिने प्राणपणाने सांभाळले होते, ते राखण्यासाठी डोंगरदऱ्या तुडविल्या होत्या, हाडाची काडे केली होती. त्या राज्याचे उदक आपल्या दिराच्या मुलाच्या हातावर, केवळ तो तुरुंगातून सुटून आला म्हणून समाधानाने सोडायला तिने काही प्रपंचावर निखारे ठेवलेले नव्हते. आणि तो दीरही कसा, की ज्याने आपल्या नवऱ्याला नऊ वर्षे कैदेत ठेवले. शाहूचा विचार करताना ताराबाईच्या मनाला असे करकोचे पडले असणे अगदी शक्य आहे.

तिचा नवरा मेला होता, पण तिचा मुलगा जिवंत होता. तिचेही काही देवदेव करण्याचे वय झाले नव्हते. तिची तर पस्तिशीसुद्धा अद्याप उलटली नव्हती. तिने काय म्हणून राज्यावर उदार व्हावे? जन्मसिद्ध हक्काने शाहू जर राज्य मागू शकत होता तर कर्मसिद्ध हक्कानें ताराबाईलाही ते मागता येत नव्हते काय? त्यात उदात्तता नसेल पण व्यवहार निश्चित आहे.

शाहू व ताराबाई यांच्यातील लढा हा एक प्रकारे जन्मसिद्ध हक्क आणि कर्मसिद्ध हक्क यांच्यामधला आहे. राज्य हे मिळेल त्याचे किंवा मिळवील त्याचे? असा हा प्रश्न आहे. नेपोलियन हा जन्माने राजा नव्हता, पण तो कर्माने सम्राट झाला. तो म्हणे– "फ्रेंच राजवंशाचा मुकुट धुळीत पडला होता. तो मी पराक्रमाने जिंकून माझ्या मस्तकावर ठेवला." ताराबाईची कैफियतही अगदी अशीच आहे. आणि ती तिच्या दृष्टीने तरी बिनतोड आहे असे म्हणणे भाग आहे.

आता राजारामाची समर्पणशीलता ताराबाईच्या ठिकाणी असती तर मराठ्यांचा इतिहास बदलला असता हे सांगण्यास कोणा ज्योतिषाची जरुरी नाही. पण "असे असते तर तसे झाले असते" अशा जरतारी तर्कांना इतिहासात काही किंमत नाही. माणूस आहे तसा घेऊन चालले पाहिजे. त्या दृष्टीने ताराबाई ही 'करील त्याचे राज्य' असे मानणारी, रोखठोक व्यवहार बोलणारी, अस्सल प्रापंचिक स्त्री होती. तिचा नवरा गोसावी होता म्हणून तिनेही गोसावी व्हायला हवे होते असे समजणे म्हणजे तुकारामबुवा साधु होते म्हणून त्यांच्या बायकोनेही भाकऱ्या बडवायच्या सोडून हरिभजनी सादर व्हायला पाहिजे होते अशी अपेक्षा करण्यासारखे आहे. ते स्वभावतःच होणे नव्हते.

राजाराम आणि ताराबाई या दोन व्यक्तिमत्त्वांतला संघर्ष हा ध्येयवाद आणि वास्तववाद, परमार्थ आणि प्रपंच, श्रेय आणि प्रेय या मूल्यांतला संघर्ष आहे. तो सनातन आहे मानवी जीवन या जगतीतलावर अस्तित्वात आले तेव्हापासून तो सुरू आहे, व जीवनाबरोबरच त्याची समाप्ति होणार आहे. पूर्वेला जा की पश्चिमेला जा, समस्या तीच व संघर्ष तोच. आपल्या पडत्या काळाकडे नजर द्यावी आणि तत्त्वाला मुरड घालून विरुद्ध पक्षाच्या पण आपल्याबद्दल आदर बाळग-

णाऱ्या सरकारची नोकरी पतकरावी असा सल्ला देणाऱ्या बायकोला मिल्टन ताडकन् म्हणाला, "You, like other women, want to ride in coach, I, for my part want to live and die an honest man. तुला इतर बायकांसारखी घोडागाडी उडवायची आहे, मला प्रामाणिक माणूस म्हणून जगायचे आहे आणि मरायचे आहे !" खालच्या मजल्यावर भयाण घरात एकट्याच वावरणाऱ्या बायकोची उपेक्षा करून द्रष्टा होऊ पाहणारा कार्लाईल वरच्या मजल्यावर बारा बारा तास एकटाच वाचीत बसे. तेव्हा त्याची बायको दुःखाने म्हणाली, "भावी पिढ्यांसाठी माझी केवढी उपेक्षा केली जात आहे!" तुकारामाची बायको जिजाबाई संतापून म्हणाली की, " मजचि भोवता केला येणे जोग, काय याचा भोग अवतरला ।। कोणाची बाईल होऊनिया वोढू संसारी आपदा काढू किती?" तिला दोष तर तुकारामानेही दिला नाही. फक्त आपणासारखाच अनासक्तीचा उपदेश केला की, "आस निरसूनी कठिन हे मन । करी वो समान वज्र तैसे" टॉलस्टॉयचा परमार्थ आणि त्याच्या बायकोचा प्रपंच यांचा संघर्ष तर इतका करुण आहे की तीच एक त्याच्या जीवनातील रक्ताने लिहिलेली War and Peace कादंबरी आहे. ' अनृतं साहसं माया ' अशा संस्कृत आणि " बाईल पैशाची, विरळा गत पुरुषाची" असा प्राकृत बहुमानांचा आहेर करून स्त्रीच्या संसारी प्रवृत्तीला दोष देण्याची जगरहाटी जुनीच आहे. पण स्त्रीच्या संसारी वृत्तीशिवाय प्रपंच होत नाही व प्रपंचाशिवाय परमार्थही होत नाही. " प्रपंच सांडूनी परमार्थ केला, अन्न मिळेना खायाला." तात्पर्य हे की, ताराबाईमध्ये प्रापंचिक आणि व्यावहारिक प्रवृत्ति अधिक होती म्हणूनच केवळ तिला दोष देणे न्यायाचे होणार नाही. अनेक वेळा हे दोषच गुण ठरलेले आहेत व राजारामाला त्यांनी कठीण काळात आधार दिला आहे. महाराष्ट्राच्या तर आहेच पण राजारामाच्याही वादळी जीवनात ताराबाई ही ' भवति भवार्णवतरणे नौका ' अशी तारून नेणारी नाव ठरली आहे.

राजाराम जिंजीला आला, तेव्हा तो केवळ प्राण बचावून आला. पैसा असा त्याच्यापाशी औषधाला नव्हता. तो लाखालाखाचे सरंजाम सरदारांना देई खरा पण तो साराच बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात असला प्रकार होता तो मोगलांचा मुलूख जिंकावा तेव्हा आणि त्याच कारणाने पैसा मिळणार आणि मुलूख जिंकला जाण्यासाठीच सनदा दिल्या जात. चांगल्या अर्थाने हलवायाच्या घरावरचे हे तुळशीपत्रच होते. पण पगार द्यायला जवळ पैसा नव्हता ही कठोर बाब होती. पाँडिचरीचा फ्रेंच गव्हर्नर मार्टिन लिहितो "जिंजीत उघड लूट चाललेली आहे. लष्करास पगार नाही. लष्करी लोक दुकानात व कोठारात शिरून वाटेल तो माल घेऊन जाऊन धनिकांकडून जबरदस्तीने पैका उकळतात. शत्रु मुलखाप्रमाणे आपल्या मुलखाची नासधूस चालली आहे." रायगडाहून निघताना

राजारामाने बरोबर जे दोन अडीच लाखांचे जडजवाहीर घेतले होते, ते सुद्धा गिरजोजी यादवाने नंतर मोठ्या शर्थीने राजारामास नेऊन दिले. तात्पर्य आर्थिक दृष्टया राजाराम केवळ खंक होता.

धनसंपदेप्रमाणेच शरीरसंपदेच्या बाबतीतही राजारामाचे ग्रह नीचीचेच होते. प्रथमपासूनच त्याची प्रकृति सुकुमार आणि आयुष्याचा बराचसा काळ त्याचा प्रथम रायगडला नऊ वर्षे आणि नंतर जिंजीला नऊ वर्षे असा अशा काही स्थानबद्धतेत गेला की मोकळचा संचाराला त्याला फारसा वावच मिळाला नाही. त्याच्या आयुष्यातले सारे दगदगीचे प्रवास, तसे ते थोडेच होते तरी ते त्याच्या केवळ जिवावरून गेले. रायगडहून जिंजीच्या प्रवासात तुंगभद्रेच्या तीरी, केशव पंडित म्हणतो, त्याप्रमाणे "बहिरजीने दाईचे, नोकराचे, मित्राचे त्याचप्रमाणे स्नेहसंबंधीयांचें सर्व काम केले." त्याच्या शेवटच्या स्वारीत साताऱ्यापासून नगर–सोलापूरपर्यंतच्या प्रदेशात फिरण्यानेच त्याची दमछाक होऊन गेली. बरोबर अनुभवी सरदार घेतल्याशिवाय सामान्यतः तो कोणत्याही स्वारीवर गेला नाही. या बाबतीत संभाजी आणि राजाराम केवळ दोन ध्रुव होते असे म्हणावे लागते. ताकदीच्या बाबतीत ''वपुःप्रकर्षात् अजयत् रघुर्गुरुम्' अजराजावर ताण करणाऱ्या रघूप्रमाणे संभाजी बापालाही भारी होता. संभाजीने वादळात आणि पावसात अंधाऱ्या रात्री फोंड्यावर घोडदौड केली, ती राजारामाला कधीच शक्य झाली नसती. मूळची त्याची नाजूक 'तोळा की मासा' प्रकृति, व्यसनांची भर पडल्यामुळे पोखरून गेली होती. मार्टिन म्हणतो– "स्वतःच्या स्वार्थासाठी प्रल्हाद निराजीने तरुण राजाला व्यसनांची गोडी लावली. आल्याबरोबरच पहिल्या दोन–तीन महिन्यांतच तीन–चार बायकांशो त्याची त्याने लग्ने लावून दिली. (या अर्थात् नाटकशाळा होत्या.) याखेरीज नृत्यांगना होत्याच. "त्याने त्याला कायम अफूच्या कैफात आणि गांज्याच्या तारेत तर्र होऊन राहण्याची सवय जडविली." प्रल्हाद निराजीने जडविलेली असोत की दुसरा कोणी 'समानधर्मा' मार्गदर्शक भेटल्यामुळे भेटलेली असोत, राजाराम हा व्यसनी झाला होता हे पुराव्यानेच सिद्ध आहे. अशा बेसावध व व्यसनी माणसाकडून राज्य सांभाळले जाणे हे सोपे नव्हते. "राज्यं हि सुमहत्तन्त्रमप्रमत्तैरेव धार्यते।"– बेसावध न झालेल्या माणसालाच राज्यासारखी गंभीर जबाबदारी पेलता येते.

राजारामाचा स्वभाव जात्याच गरीब व कोमल; परिस्थितीने तो जास्तच गरीब आणि गरजू झाला होता मुळात तो कल्याणप्रकृतीच जवळ जवळ अजातशत्रु त्यामुळे व्यसनांच्या आहारी जाऊन त्याच्या हातून कोणाचा छळ झाला नाही हे खरे. पण या चांगल्या स्वभावाचा वाईट परिणाम हटकून असा होई की, 'मृदुर्हि परिभूयते' या न्यायाने त्याचा धाक कोणाला वाटत नसे व मऊ लागले की कोपराने खणावे असा प्रकार होई. सरकार म्हणतात– "राजाराम हा

सैन्य नसलेला राजा होता. त्याच्याजवळ खजिना नव्हता, त्याच्या सत्तेखाली प्रजा नव्हती. किल्लेबंद होऊन पडल्यामुळे प्रत्येकाला त्याला होकार द्यावा लागे आणि नाही म्हणण्याची त्याची प्राज्ञा नव्हती. नोकरांना तो शिस्त लावू शकत नव्हता. कोणीही मराठा शिलेदाराने उठावे, हजार–पाचशे स्वार गोळा करावेत आणि आपल्या छत्रपतींना सेवा करण्याबद्दल अटी सांगाव्यात असला सगळा प्रकार होता." त्याचे सेवक कर्तृत्ववान् होते खरे पण तितकेच हमरीतुमरीवर येणारे होते. अशा संताजी धनाजीसारख्या भांडखोर प्रतिस्पर्ध्यांत राजारामाने मध्यस्थी करणे हे दोन एडक्यांच्या टकरीत सशाने पंचाचे काम करण्यासारखे होते. त्याच्या खाजगीकडचे गिरजोजी यादवासारखे सेवक हे सामान्यतः विश्वासू, हिकमती व हरहुन्नरी होते हे खरे; पण ज्या वेळेला 'स्वामींच्या' म्हणजे राजारामाच्या, त्याच वेळेला पातशाहाच्या सनदा आपल्या वतनासाठी घेऊन ठेवण्याइतके व्यवहारी आणि उभयान्वयीही होते. अशा सेवकांस ताळ्यावर आणण्यास तसाच खंबीर व करडा शासक हवा होता. राजारामाला ते काम सांगणे म्हणजे जातीच्या भ्रमराला फुले सोडून लाकडे फोडायचे साकडे घालण्यासारखे होते.

हे राजारामाचे भाग्य होय की त्याच्या ध्येयवादी आणि कोमल प्रकृतीला व्यवहारी आणि कठोर प्रवृत्तीच्या ताराबाईची जोड लाभली. ती जिंजीला १६९१ च्या मार्चमध्ये पोचली, आणि तेव्हापासून तिने केवळ राजारामाची व्यसनेच नव्हे तर त्याचे सेवकही ताब्यात राखले, असे समजण्यास आधार आहे. खाफीखान म्हणतो–" ती बुद्धिमान् आणि शहाणी होती. सैन्याची व्यवस्था आणि राज्यकारभार या बाबतीत नवऱ्याच्या हयातीतच तिचा मोठा लौकिक झाला होता." विशेषतः राजारामाच्या मृत्यूनतर रामचंद्रपंत अमात्य आणि धनाजी जाधव यांच्यासारख्या बड्या धेंडांनाही तिने ज्या जरबेत राखले त्यावरून हा समज जास्तच दृढ होतो. राजारामाच्या जिंजीवासातला संताजीच्या पदच्युतीचा निर्णय हा मोठा क्रांतिकारक निर्णय होता, आणि त्यात ताराबाईचे अंग होते असे वाटते. कारण सेनापति कितीही कर्तृत्ववान् असला तरी अखेर छत्रपतीचा तो सेवकच राहिला पाहिजे नाकापेक्षा मोती जड होता कामा नये, हा कणखर दृष्टिकोन, "समयास कैसा पावला नाहीस?" म्हणून सेनापति असलेल्या नेताजी पालकरासही बडतर्फ करणाऱ्या शिवाजीमहाराजाचा होता; तो ताराबाईत पुरेपूर उतरला होता. त्याचबरोबर संताजीचा ज्या प्रकारे शेवट झाला तसा तो व्हावा, अशी तिची इच्छा होती असे समजणे केवळ अश्लाघ्यपणाचे होईल हेही लक्षात ठेवणे जरूर आहे. राज्यचालकाला कठोर निर्णय वेळोवेळी घ्यावेच लागतात. त्यात वैयक्तिक शत्रुत्वाचाच भाग असतो असे समजणे म्हणजे राज्यव्यवहाराचे अज्ञान प्रकट करण्यासारखे आहे. म्हणून राजकारणातल्या पारमार्थिक वृत्तीच्या राजारामाच्या

बाबतीत प्रापंचिक ताराबाई ही त्याला बाधक न ठरता साधक ठरली; आणि "मी जरि अशक्त निर्धन कोपी तरी बहु भली रमा भार्या" ही कविवर्य मोरोपंतांनी आपल्या पत्नीच्या बाबतीत केलेली 'भार्या–प्रशस्ति' राजारामाच्याही बाबतीत तितकीच सार्थ ठरली असा एकंदर निष्कर्ष आहे.

ताराबाईचा विचार मनात आला की येसूबाईचा विचार मनात अपरिहार्यपणे येणे भाग आहे. दोघीही शिवछत्रपतींच्या सुना, दोघींनीही संभाजी व राजाराम या एकामागोमाग एक झालेल्या राजपुरुषांची राज्ञीपदे भूषविली; दोघींनीही मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धात वैशिष्टयपूर्ण कामगिरी केली. मराठी स्त्रीचे दोघीही आपापल्या परीने उज्ज्वल नमुने आहेत. ताराबाईचे कर्तृत्व येथवर वर्णन केले. आता येसूबाईचे थोडचा तपशिलाने पाहू.

येसूबाईच्या जीवनाचा विचार करताना एक महत्त्वाचा प्रश्न अपरिहार्यपणे उपस्थित होतो व त्याचे उत्तर दिले पाहिजे. प्रश्न असा की, संभाजीच्या जीवनात येसूबाईचे स्थान काय होते? येसूबाईचा जन्म १६६१ च्या सुमारास झाला. ती दाभोळ येथील मामले–रायरीचे देशमुख पिलाजी राजे शिर्के यांची मुलगी. माहेरचे नाव राजसबाई किंवा जिऊबाई. शिर्क्यांचे घराणे सुसंस्कृत आणि सुविद्य होते. त्यांच्या घराण्याशी शृंगारपूर आणि संगमेश्वर भागातील केशव पंडित, रघुनाथ पंडितराव व मोरेश्वर पंडितराव इत्यादि पंडितांचा संबंध फार घनिष्ठ होता. या केशव पंडिताने रामायण आणि अठरा पुराणे क्रमाने संभाजीला शृंगारपूरच्या वास्तव्यात ऐकविली व त्याबद्दल संभाजीने त्याला रामायणश्रवणाची सांगता म्हणून "दक्षणा भूमिदान ता. संगमेश्वर प्रांत राजापूर येथें कोंड ५ शेते ठिकाणे ३ भूमिमहसल दाभोळी लारी १६०० धारादत्त दिले." तात्पर्य, हे की अशा पंडितांच्या सहवासाचा सुगंध लाभलेले येसूबाईचे माहेरचे घराणे होते.

२९ एप्रिल १६६१ रोजी शिवाजी महाराजांनी शृंगारपूर घेतले व शिर्क्यांना आपल्याकडे वळविण्यासाठी त्यांची येसूबाई आपल्या संभाजीला करून घेतली आणि आपली राजकुंवरबाई गणोजीराजे शिर्के यांना दिली. शिर्के हे शृंगारपूरच्या सुर्व्यांचे दिवाण, व सुर्वे आदिलशाहीचे चाकर. त्यामुळे अर्थातच ही दोन्ही लग्ने राजकारणातल्या असतात त्याप्रमाणे मुख्यतः राजकीय सोयरिकीच होत्या. पण या लग्नसंबंधामुळे शिर्क्यांची मुलगी भोसल्यांची सून झाली.

हा विवाह १६६५ च्या सुमारास झाला असावा असा पंडितांचा तर्क आहे म्हणजे येसूबाई व संभाजी यांच्या वयांत चारपाच वर्षांचेच अंतर होते. भोसल्यांच्या कुटुंबात आल्यानंतर येसूबाईला जिजाबाईसारख्या परिणतप्रज्ञ राजमातेचा सहवास लाभला. जिजाबाईचा सहवास हेच मुळी शिक्षण होते. पंधरा वर्षे येसूबाईने शिवाजी महाराजांचे भव्य कर्तृत्व डोळे भरून पाहिलेच, पण घरातलेही त्यांचे वागणे तिला पाहता आले व 'शिवराजाचे कैसे बोलणे, शिवराजाचे कैसे चालणे' या

वचनाची तिला प्रचिती आली. राजारामाचा सहवास तर तिला जन्मापासूनच लाभला, कारण राजाराम तिच्याहून दहा वर्षांनी लहान होता. त्याचा जन्म २४ फेब्रुवारी १६७० चा. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजीच्या मृत्यूपर्यंत नऊ वर्षे भोसल्यांच्या कुटुंबात कर्ती स्त्री हीच होती. संभाजीचा सहवास सामान्यतः चोवीस वर्षे तिला लाभला. १६७८ साली शृंगारपूरला भवानीबाई आणि १६८२ च्या १२ मे ला रायगडजवळील गांगोलीला शिवाजी ऊर्फ शाहू अशी दोन अपत्ये तिला झाली. भवानीबाईचे लग्न शंकराजी राजे महाडिक यांच्याशी झाले. शंकराजी मृत्यु पावल्यावर भवानीबाई सती गेली. शाहूबरोबर येसूबाई तर औरंगजेबाच्या कैदेतच होती. शाहू १७०७ साली सुटून आला तरी ती येऊ शकली नाही. शाहूच्या चांगल्या वर्तणुकीचा जामीन म्हणून ती दिल्लीला बादशहाच्या नजरेखाली होती. अखेर औरंगजेबाने म्हटल्याप्रमाणे ' शाहू हा सावच आहे, त्याच्या आजाप्रमाणे चोर नव्हे' अशी दिल्लीच्या औरंगजेबाच्या वारसाची खात्री झाली तेव्हाच शाहूच्या विनंतीला मान देऊन तिला दक्षिणेत पाठविण्यात आले ते १७१८ साली. त्यानंतर काही वर्षे मुलाजवळ आनंदात काढून येसूबाई मृत्यू पावली. सरदेसायांच्या मताप्रमाणे तिचे वय त्या वेळी सत्तर वर्षांचे होते.

अशी ही येसूबाईच्या जीवनाची सामान्य रूपरेखा आहे. आता प्रश्न असा आहे की, इतक्या सुसंस्कृत माहेरच्या घराण्यात वाढलेल्या, शिवाजी महाराज व जिजाबाई यांच्या सहवासाचे भाग्य लाभलेल्या, दोन मुलांची आई असलेल्या, या कुटुंबवत्सल स्त्रीचे संभाजीच्या जीवनात कोणते स्थान होते ? संभाजीच्या जीवनात या प्रश्नाचे महत्त्व उघडच आहे. संभाजीच्या चारित्र्यावरील आक्षेप पाहता तो कदाचित् बहुस्त्रीक असेल पण इतिहासातील नोंदीवरून त्याची विवाहित स्त्री येसूबाई ही एकच होती असे म्हणावे लागते.

दुसरी दुर्गाबाई होती, ती दिलेरखानाकडे जाताना त्याच्याबरोबर होती. संभाजी पळून गेल्यानंतर दिलेरखानाने तिला अटकेत ठेवली. ती पुढे येसूबाईबरोबर औरंगजेबाच्या अटकेत होती. याखेरीज संभाजीला मदनसिंग हा दासीपुत्र होता. पण दासीपुत्र हा रक्षेचा पुत्र. त्या काळी रक्षा बाळगण्याचा प्रघात सार्वत्रिक होता व ते चारित्र्यहीनतेचे लक्षण समजण्यात येत नव्हते. १८ मे १६८४ ची साकी मुस्तैदखानाची नोंद अशी आहे– "संभाजीच्या दोन बायका, एक मुलगी आणि तीन दासी या आपल्या ताब्यात आहेत. अशा प्रकारची सही शिक्क्यानिशी रशीद पोच बहादुरगडचा किल्लेदार अब्दुर्रहमान याने पाठविली ती बादशहासमोर ठेवण्यात आली." १७०४ ची नोंद अशी आहे, "संभाजीच्या मुलीचे सिकंदरखान विजापुरी (विजापूरचा शेवटचा बादशहा सिकंदर आदिलशहा) याचा मुलगा महंमद मुहियूद्दिन याजबरोबर लग्न लावण्यात आले." पण, या संभाजीच्या लग्नाच्या बायका असतील असे वाटत नाही. त्या त्याच्या रक्षा

असाव्यात आणि ती मुले-मुली मदनसिंगाप्रमाणे दासी-पुत्र आणि दासी-कन्या असाव्यात. कारण, जेथे राजाराम छत्रपति नव्हे पण राजकुटुंबातला राजपुरुष असताना, त्याच्या जानकीबाई, ताराबाई आणि राजसबाई यांच्याशी झालेल्या तीनही लग्नांचे उल्लेख बिनचूक सापडतात, तेथे संभाजी युवराज असताना काय किंवा नंतर काय त्याने विधिपूर्वक केलेल्या विवाहांचे उल्लेख अवश्य सापडायला हवे होते. तसे ते सापडत नाहीत. फक्त येसूबाईशी लग्न झाल्याचा उल्लेख आहे. संभाजीच्या चरित्र्याचा विचार करताना त्याच्या बाजूची ही गोष्ट अवश्य जमेस धरली पाहिजे. त्याच्या चारित्र्यावर अपवाद आणणारे उल्लेख असे दर्शवितात की संभाजी हा बहुस्त्रीक असावा; पण त्याच्या आयुष्यातले एकुलते एक लग्न असे दाखविते की त्याची वैवाहिक निष्ठा फार श्रेष्ठ दर्जाची होती.

सामान्यत: लोकसमजूत अशी आहे की, संभाजी एरवी कितीही व्रात्य असला तरी व्यसनांच्या धुंदीतही येसूबाईची किंमत तो जाणून होता. तिचा त्याने कधी पाणउतारा केला नाही; तिने वेळोवेळी त्याला वाममार्गापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला व त्याच्या आयुष्यात त्याच्या बरोबरीने तिने जबाबदारीचा वाटा उचलला. औंधकरांच्या प्रसिद्ध 'बेबंदशाही' नाटकात संभाजीच्या तोंडी पुढील वाक्ये घातलेली आहेत, त्यात ही लोकसमजूत उत्तम प्रकारे व्यक्त झालेली आहे- "राणीसाहेब, बाका वखत आणलात आपण! आम्ही शराबीने धुंद झालो आहो, अशा वेळी आमच्या मुलाखतीला कां येणे केले?.... राणीसाहेब, मघांपासून आमच्या मनाला आम्ही बजावतो आहोत की, 'मना, ही राजलक्ष्मी तुझ्यासमोर आली आहे, ही साध्वी तुझ्याकडे पाहते आहे. कैफात काही वेडेवाकडे बडबडू नको.' पण आमच्या मनावरचा ताबा आता उडत चालला आहे. कैफातही आमच्याकडून आपला अपमान व्हावा असे आम्हांला वाटत नाही. आल्यापावली आपण बाळराजांना घेऊन वाड्याकडे परता!" संभाजीला एकच विवाहित राणी होती. या इतिहासातल्या घटनेवरून निघणाऱ्या तर्काने ह्या समजुतीला पुष्टि कशी मिळते हे वर दाखविलेच. आता इतिहासातल्या पुराव्यानेही हीच गोष्ट सिद्ध होते, हे सांगण्यास आनंद वाटतो. तो पुरावा म्हणजे येसूबाईची मुद्रा होय.

"श्रीशम्भो: शिवजातस्य मुद्रा द्यौरिव राजते। यदङ्कसेविनो लेखा वर्तते कस्य नोपरि॥"- शिवपुत्र संभाजीची मुद्रा आकाशाप्रमाणे तळपत आहे; ज्यांच्या चरणांची सेवा करणाऱ्याचे वर्चस्व जगात कुणावर चालत नाही?" अशी संभाजीची मुद्रा आहे. जसा स्वभाव तशी मुद्रा. जणू अभिमानानेच मनुष्यरूपाचा आश्रय केला आहे असे वाटते. पण संभाजीने येसूबाईला जी मुद्रा करून दिली होती तीही अशाच मार्मिक आहे- "श्री सखी राज्ञी जयति."-ही राणी आहे आणि सखी पण आहे.

आधी संभाजीने येसूबाईला शिक्का दिला हा तिच्या शहाणपणावरच्या व कर्तृत्वावरच्या त्याच्या विश्वासाचा पुरावा आहे व त्या शिक्क्यातली शब्दयोजना त्याच्या निष्ठेची द्योतक आहे असा अर्थ आहे. "भार्या मन्त्रिवर: सखा परिजन: सैका बहुत्वं गता !"

संभाजीच्या गैरहजेरीत राज्याचा सर्व कारभार येसूबाईला पाहावा लागे. तो पाहात असताना 'पत्रे आज्ञा' म्हणून निघत. तो नसताना येसूबाई पत्रें 'राजाज्ञा' म्हणून काढी. व्यक्तिगत पत्रावर, 'अजरख्तखाने सौ. येसूबाई' म्हणून मायना लिही, आणि महत्त्वाच्या पत्रांवर मोर्तबाशिवाय तिला दिलेला शिक्काही करीत असे. हा कारभार म्हणजे गुन्हेगारांची वासलात लावणे, फंदफितुरांचा बंदोबस्त करणे, कैद्यांची किंवा नजरकैदेत ठेवलेल्या इसमांबाबत दक्षता बाळगणे आणि मुलकी कारभार सांभाळणे. १६८१ मध्ये राज्याभिषेक झाल्यापासून व औरंगजेबाची स्वारी आल्यापासून संभाजी मोहीमशीरच असे. कधी बुऱ्हाणपूर ते सोलापूर, कधी औरंगाबाद, कधी रायगड ते फोंडा अशी त्याची घोडदौड चालू होती, त्या बिकट प्रसंगी राजधानी व राज्य सांभाळण्याचे काम येसूबाईने केले. प्रसंग मोठाच बिकट होता; कारण बाहेर औरंगजेब होता व आत मधून मधून कट होतच होते; १६८४ साली एक झाला, १६८६ साली राजारामाला पळवून नेण्याची खटपट झाली असे इंग्रज म्हणतात, १६८८ त शिर्के प्रकरण होते, शिर्के–कविकलश कलह कळसास पोचला तेव्हा १६८८–८९ मध्ये येसूबाई रायगडला होती. संगमेश्वरला गेली नव्हती. अशा धामधुमीच्या काळात ती कारभार सांभाळीत होती, हीच तिच्या कर्तृत्वाची व संभाजीच्या तिच्या वरील विश्वासाची पावती.

राजाच्या गैरहजेरीत राज्य सांभाळण्याचा असा बहुमान यापूर्वी फक्त एका व्यक्तीला मिळालेला होता. ती म्हणजे जिजाबाई होय. शिवाजीमहाराजांनी आग्र्याला जाताना सारे राज्य "वरकड, राजगड व कोट मोरोपंत पेशवे व निळोपंत मुजुमदार व नेताजी पालकर (प्रतापराव गुजर हवे, नेताजी पूर्वीच मोगलांकडे गेला होता.) सरनोबत असे मातुश्रीच्या हवाले केले." पण जिजाबाईची गोष्टच वेगळी होती. ती तर शिवाजी महाराज लहान असताना स्वतःच जहागिरीचा कारभार पाही. "चवथा वाडा मोर्तब सूद" असा तिचा शिक्का होता. पण जिजाबाईनंतर कारभार पाहण्याचा बहुमान मिळाला तो फक्त येसूबाईला होय. या वेळी ती फक्त वीस वर्षांची होती.

जिजाबाईची अनेक पत्रे उपलब्ध आहेत. पण येसूबाईची फक्त दोनच पत्रे उपलब्ध आहेत. त्यांतले एक तर १७०५ च्या एप्रिलातले म्हणजे संभाजीच्या मृत्यूनंतरचे आहे. हे पत्र लिहिले तेव्हा येसूबाई औरंगजेबाच्या कैदेत अहमदनगरला होती. तिची अगदी दैना झाली होती.

तेव्हा तिने छावणीतल्या कर्जदारांपासून मुक्त होण्यासाठी कर्ज देण्याची मोठ्या करुण वाणीने "इंगळास वोळंबे लागले" म्हणून चिंचवडच्या देवांची प्रार्थना करणारे पत्र लिहिले. ते पत्र वाचले म्हणजे येसूबाईसारख्या मानिनीवर 'काय समर्थाची कांता । कोरान्न मागे ' अशा आलेल्या कठीण काळाबद्दल वाईट वाटते.

तिचे दुसरे पत्र, चाफळ येथील देवस्थानला दिलेले अभयपत्र आहे. संभाजीच्या कारकिर्दीतले तिचे एवढे एकच पत्र उपलब्ध आहे. त्या पत्रात ती म्हणते की, "श्री देवाची यात्रा आली आहे. यात्रेस लोक यावयास अनमान करिताती की आपले लोक दौड करून यात्रेस तसवीस देतील. ऐसीयासी अभयपत्र आलियाने देवाचा मोहछाये करितील म्हणून हुजूर मालूम जाले. त्यावरून यात्रेस अभये पत्र दिल्हे आहे. आमचे तर्फेने कोणी वाटे जाणार नाही. गावोगांवी कागद पाठवून यात्रकरी बोलाऊन श्रीचा समारंभ करणे, आमचे अभये असे. जैसे सालाबाद चालिले तेणेप्रमाणे आपलेही पत्र पाहिजे म्हणौन राजश्री माधव गोसावि यांनी सांगितले तरी आमचेही अभयेपत्र आहे. देवाचे इनामस्थळ तुमचे आहे. आमचे तर्फेने आजार लागणार नाही, मोर्तब सूद. देवाचा प्रसाद पाठविला तो आम्हास पावला."

संभाजीच्या कारकिर्दीतले येसूबाईचे हे एकमेव उपलब्ध पत्र होय. पण त्यावरून संभाजीच्या कारभारात येसूबाईचा कार्यभाग फारसा नव्हता असे अनुमान काढणे धाष्टर्याचे होईल. कारण, मराठ्यांच्या इतिहासात अशा किती व्यक्ति आहेत की ज्यांची एकूण एक निदान बहुसंख्य पत्रे उपलब्ध झालेली आहेत? तेव्हा पत्राची उपलब्धि किंवा अनुपलब्धि किंवा मर्यादित उपलब्धि हे काही अखेरचे प्रमाण होऊ शकत नाही. याखेरीज येसूबाई ही संभाजीची गृहिणी व सखी, तेव्हा त्याच्या जीवनात तिचा बराचसा भाग 'कान्तासंमिततयोपदेशयुजे' अशा प्रकारचा अन्तःस्थ पडद्याआड अलिखित असणे या स्वभावाला, व्यवहाराला व संस्कृतीला धरूनच होते. 'विपत्तौ बुद्धिदात्री च' अशा प्रकारचा हा येसूबाईचा संभाजीच्या जीवनातला भाग कोणता याचे दिग्दर्शन संभाजीच्या चारित्र्यावर टीका करणाऱ्या चिटणिसानेच केलेले आहे. त्या ठिकाणी येसूबाईचे संभाजीच्या जीवनातले स्थान व संभाजीच्या चारित्र्यातली चांगली बाजूही त्याने दाखविलेली आहे.

प्रसंग आहे १६८१ च्या सप्टेंबरातला. त्या वेळी संभाजीविरुद्ध कट केल्यावरून, "संभाजीराजे यांणी कविकलशाच्या बोले मागती अण्णाजी दत्तो सचीव यांजवर ईतराजी करून मार दिल्हा. त्या माराने राजश्री अनाजीपंत व बाळ प्रभु व सोमाजी दत्तो व हिरोजी फर्जंद परळीखाले कैद करून मारिले. कर्नाटकात श्यामजी नाईक यास कैद करविले." बाळाजी आवजी पुत्रांसुद्धा तिघे मारले असे कळले तेव्हा संभाजी म्हणाला, "त्यांस मारावयाचे कारण नव्हते." आणि महालात गेला. पुढे चिटणीस लिहितो– "तेथे येसूबाईसाहेब यांणी बाळाजी प्रभू

मारिले हे उचित न केले; बहुतां दिवसांचे आणि इतबारी व पोख्त – थोरले महाराज कृपाळू (त्यांचे) सर्व अंतरंग त्यांजपाशी होते. चिटणीस आपले व राज्याचे प्राण ऐसे म्हणत आले. वंशपरंपरेने चिटणिशी देऊन पत्र शपथपूर्वक त्यांस दिले. ते माहीत असोन त्यांणी अपराधही काही केला नाही. (असे असता) लहानाचे सांगण्यावर हे गोष्ट कशी केली ? सर्व कारकून गेले, मारिले बेदील जाले, अन्यायीही जाले, एक एक होते, तेही ऐसे केले. पुढे राज्य कसे चालेल ?" इत्यादि बोलिली. तेव्हा "आमचेही मनात ही गोष्ट नव्हती. परंतु रागाचे समयी बोलिलो तितक्यावर परवानगी सांगून जाले ते वाईट वाटून उठून आलो. वाईट गोष्ट जाली खरी. तुम्ही त्यांचे धाकटे पुत्र दोघे आहेत ते खासगीकडे (ठेवून) त्यांचा बंदोबस्त दरमहा देऊन चालवावा. मुले लहान आहेत. त्यांजवर कृपा करावयाची." तेव्हा येसूबाईने बाळाजीचे पुत्र निळो बल्लाळ व खंडो बल्लाळ यांचे रक्षण केले. चिटणीस तर पुढे लिहितो की, "शिक्के शिवाजी महाराज जिजाबाई साहेब यांजकडे ठेवून करवीत होते त्याप्रमाणे संभाजी महाराज यांणी शिक्के पेटीत घालून, देवापाशी ठेवून, पेटीची किल्ली वाड्यात असावी, शिक्के करणे ते परवानगीची याद जाली म्हणजे नेऊन समजवावी, नंतर शिक्के तेथेच आणोन करावे, असे येसूबाईसाहेब यांजपासून करवू लागले." अर्थ असा आहे की, संभाजीच्या बेलगाम वारूंमुळे उधळलेल्या जीवनरथाची येसूबाई सारथी झाली. तुफान दर्यात हेलकावे खाणाऱ्या त्याच्या जीवननौकेची कर्णधार झाली. तो खरा जातीचा कर्णधार की ज्याची दृष्टि ध्रुवताऱ्यावर स्थिर असते. येसूबाईच्या योग्यतेचे गमक हेच की, या ध्रुवावरून तिची दृष्टि कधी ढळली नाही. मराठ्यांच्या राज्याच्या हिताशिवाय दुसरा ध्रुवतारा कोणता होता ? तिने संभाजीला विचारलेल्या प्रश्नात हीच राज्याची चिंता व्यक्त झाली आहे. "सर्व कारकून गेले मारिले बेदिल जाहले अन्यायीही जाहले, एक एक होते तेही ऐसे केले. पुढे राज्य कसे चालेल ?"

पुढील जीवनात संभाजीविरुद्ध कट नेहमीप्रमाणे झालेच व नेहमीप्रमाणे त्याने शासनही बरे वाईट केलेच. पण कोणालाही त्याने देहान्तशासन केल्याचा उल्लेख नाही. हे येसूबाईचे कर्तृत्व होय असे समजणे युक्तिसंगत आहे व बाळाजी आवजीच्या मृत्यूनंतर तिने व संभाजीने व्यक्त केलेल्या प्रतिक्रियेस धरून आहे. "१६८४ कार्तिक शु ॥२ मानाजी मोरे व गंगाधरपंत, वासुदेवपंत राहुजी सोमनाथ यासी संभाजीराजे यांणी कैद केले." "त्यास (राहुजी सोमनाथास) दस्त करून घर नागविले, अटकेत ठेविले, पुन्हा त्यावरी कृपाळू होऊन कार्यभाग सांगितला." १६८८ नोव्हेंबर-डिसेंबर– "कार्तिक मासी कवि कलश यांजवरी सिरके पारखे जाले– कलश पलोन खिलणियावरी गेला तेच मासी संभाजी राजे रायगडाहून कलशाचे मदतीस आले. समगे स्वारी सिरकियासी युद्ध करून त्यास

बलऊन खेलणियास आले." "मार्गशीर्ष मासी संभाजीराजे यांणी कविकलशाच्या बोले प्रल्हादपंत व सरकारकून व कितेक लोकांस धरिले..." त्यातले मानाजी मोरे, गंगाधरपंत, वासुदेवपंत, राहुजी सोमनाथ, प्रल्हाद निराजी प्रभृति लोकांचा हत्तीच्या पायाखाली अण्णाजी दत्तोप्रमाणे कपाळमोक्ष झाला नाही ही बहुधा येसूबाईची पुण्याई होय. त्यांच्या अटकेला ती अर्थातच प्रतिबंध करू शकली नाही, किंवा त्यांच्या किंवा तिच्या माहेरच्या शिर्क्यांच्या घरादाराची जाळपोळ कदाचित् तिच्या मनात ती थांबविण्याचे असूनही, ती थांबवू शकली नाही. कारण एक तर तो राजकारणाचा मामला होता, तो तिला दखल नव्हता. संभाजीचा मारता हात तिने आवरला एवढीच तिची मर्यादा होती. एवढीही आहे या परिस्थितीत बरीच होती असे म्हणणे भाग आहे; कारण यामुळे एवढी नररत्ने तरी संभाजीच्या क्रोधातून आणि कविकलशाच्या जाळ्यातून वाचली. हेही नसे थोडके. कारण यांपैकी प्रल्हाद निराजी व मानाजी मोरे राजारामाबरोबर जिंजीला गेले. व पुढे मानाजी मोरे तर शाहूचा सेनापतीच होता. येसूबाईचे हे कर्तृत्व लहान म्हणता येईल काय ?

यापेक्षा अधिक नियंत्रण येसूबाईला संभाजीवर ठेवता आले नाही याची कारणे उघड आहेत. पहिले कारण असे की, संभाजीला येसूबाईबद्दल कितीही आदर असला तरी आनंदीबाईच्या आहारी जाणाऱ्या राघोबाप्रमाणे तो बाईलबुद्धि नव्हता असे वाटते. 'स्त्रीबुद्धिः प्रलयं गता' व बायकांच्या बुद्धीने राजकारण नासते. या कल्पना त्याही काळी प्रचलित होत्या. त्यामुळे एका विशिष्ट मर्यादेपलीकडे येसूबाईचा सल्ला संभाजीने राजकारणात विचारला असेल व तिने दिला असेल असे हिंदु संस्कृतीतील स्त्री पुरुष संबंधावरून व परंपरेवरून पाहता वाटत नाही.

दुसरे असे की, येसूबाईप्रमाणे आणि येसूबाई इतकेच महत्त्वाचे स्थान संभाजीच्या जीवनात कविकलशाला होते हे विसरता येत नाही. कविकलश हाही येसूबाई इतकाच निष्ठावंत होता. त्यानेही संभाजीबरोबर मरण पत्करले. फरक इतकाच की, येसूबाईची निष्ठा सात्त्विक आणि निःस्वार्थी, व्यापक राज्यहिताची चिंता वाहणारी आणि जात्या कल्याणप्रवृत्त होती; तर कविकलशाची निष्ठा राजस व तामस स्वार्थाने डागळलेली, आणि राज्याचे हित हा पदार्थ न समजणारी होती. चिटणीस म्हणतो ते खरे आहे– "ब्राह्मण लघु असता योग्यता आली तेव्हा त्यास तर्क व कर्तेपणा बुद्धि कोठील हे कळतच आहे." हा फरक येसूबाई व कविकलश यांच्यात पडण्याचे कारण उघड होते. येसूबाई मराठी मातीत वाढलेली मराठी स्त्री; राज्य साधताना तिच्या लोकांनी रक्ताचे सडे शिंपून राज्य वाढविलेले ती पाहात आलेली होती; मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी, हिरोजी फर्जंद, प्रतापराव गुजर, हंबीरराव मोहिते यांचे कर्तृत्व

तिने उघडया डोळयांनी पाहिले होते; सिंहगडावर धारातीर्थी पडलेला तानाजी मालुसरे आणि साल्हेरला प्राणार्पण करणारा सूर्यराव काकडे तिला माहीत होता. या सर्वांचा मेरुमणि शिवछत्रपति तिने डोळयांनी पाहिला होता; त्यांचा देवदुर्लभ राज्याभिषेक पाहिला होता. मराठ्यांचे स्वराज्य निर्माण होत असताना घडलेल्या या साऱ्या गोष्टींचे संस्कार तिच्या मनावर होत गेले होते, आणि त्यामुळे छत्रपतींकडे, स्वराज्याकडे आणि स्वराज्यातल्या अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी यांच्यासारख्या कर्तबगारांकडे पाहण्याची तिची दृष्टि मुळातच वेगळी होती. ती दृष्टि परंपरेने तिच्या रक्तात आलेली होती. ती बिचाऱ्या कविकलशाला कोठून येणार? तो परदेशी होता, कनोजी होता, मराठी राज्यसंवर्धनात त्याने किंवा त्याच्या पूर्वजांनी काही भाग घेतलेला नव्हता. हा त्याचा अपराध नव्हता हे खरे आहे. पण त्यामुळें त्याला ती दृष्टि लाभली नाही हेही नाकारता येत नाही. ही 'बहुतां सुकृतांची जोडी' होती. भूषणापाशी ती होती म्हणून उत्तर प्रदेशात राहूनही त्याला शिवाजी महाराज समजले. कविकलशापाशी ती नव्हती, त्यामुळे रायगडला राहूनही मराठी राज्य त्याला कळू शकले नाही.

त्यामुळे येसूबाई आणि कविकलश या एकमेकांच्या विरुद्ध शक्ति संभाजीच्या जीवनात कार्यशील असाव्यात. येसूबाईचा प्रभाव संभाजीवर संपूर्णपणे न पडण्याचे हे एक कारण असणे शक्य आहे.

खरी गोष्ट अशी आहे की संभाजीच्या स्वभावाचा नीट उलगडा झाल्याशिवाय येसूबाईचे त्याच्या जीवनातील स्थान काय, याही प्रश्नाचा समाधानकारक निर्णय करता येणार नाही. एक 'तंत्रशास्त्रपारंगत' कविकलशाचे अपवादात्मक उदाहरण सोडले, तर संभाजीचा स्वभाव कोणाच्याही तंत्राने वागण्याचा नसावा असा तर्क आहे. लोकांशी पटवून घेण्याचा सामान्यतः संभाजी प्रयत्न करीत असला तरी आयुष्यात त्याचे फारसे कोणाशी पटल्याचे दिसत नाही. प्रत्येक वेळी संघर्ष झालेला आहे. शृंगारपूरला असताना मंत्र्यांशी त्याचे पटले नाही. परळीहून दिलेरखानाकडे जाताना त्याचे स्वजनांशी पटले नाही. त्याने गडावरून बरोबर आलेल्या माणसाबरोबर निरोप पाठविला की "महाराजांना कळवा की मी सह्याद्रीला पीडण्यासाठी परत येईन." दिलेरखानाने हिंदूंवर अत्याचार केले आणि त्याचे व संभाजीचे फाटले हे बरोबरच होते. "दलेलासुराने गुडघा लावल्यामुळे संतप्त झालेल्या, कविकलशाच्या प्रोत्साहनाने लाल झालेल्या डोळयांनी" इत्यादि आपले वर्णन तो स्वतःच करतो. त्याच्या या स्वभावगुणावर किंवा स्वभावदोषांवर नेमके बोट मर्मज्ञ शिवाजीमहाराजांनी ठेवले आहे. "त्यासही कळो आले की ये पातशाहीत अगर विजापूरचे अगर भागानगरचे पातशाहीत आपले मनोगतानुरूप चालणार नाही ऐसे जाणोन त्याणी आमचे लिहिण्यावरून स्वार होऊन आले." ज्या संभाजीच्या स्वभावाला आपण दुर्दम्य आणि मनस्वी म्हणतो त्यालाच शिवाजीमहाराज

'आपले मनोगतानुरूप' अशा साध्या शब्दांत संबोधितात. "वडील पुत्र संभाजी राजे जाणता आहे. पण बुद्धि फटकळ आहे, काय करावे? " हे महाराजांचे संभाजीच्या स्वभावावरचे भाष्य ! ओल्या मातीला आकार द्यावा त्याप्रमाणे माणसाच्या मनाला आकार देऊन या दगडांच्या देशात हिंदवी स्वराज्याचे कैलास लेणे ज्याने निर्माण केले त्या सिद्धहस्त कलावंताची प्रतिभासुद्धा संभाजीच्या स्वभावाला आकार देताना थकली आणि खिन्न होऊन पराङमुख झाली. तेथे बिचाऱ्या येसूबाईने त्या स्वभावाला बंधन कसे घालावे व आकृतिबंध साधावा कसा ?

आणखी एका बाबतीत संभाजीच्या जीवनात येसूबाईचा कार्यभाग महत्त्वाचा आहे. ती बाजू अप्रसिद्ध आहे. ती बाजू म्हणजे राजारामाच्या बाबतीत येसूबाईने केलेले कार्य होय. सामान्य समजूत अशी आहे की संभाजीने राजारामाला पराकाष्ठेच्या सौजन्याने वागविले व या समजुतीला इतिहासाचाही आधार आहे. ही गोष्ट संभाजीला भूषणास्पद आहे, पण या बाबतीत संभाजीच्या बरोबरीने, कदाचित् 'काकणभर' अधिकच येसूबाईचा श्रेयाचा वाटा आहे हे विसरता येत नाही.

चांगुलपणातही प्रकार असतात, अफाट उत्तुंग उत्कट भव्य याची ओढ असलेला चांगुलपणाचा एक प्रकार आहे. त्याला व्यवहारातली बारकी सारकी हजार अवधाने सांभाळण्याची जिकीर वाटते. दुसऱ्या प्रकारचा चांगुलपणा हा जास्त व्यवहारी, पावलोपावली व घटकोघटकी व्यवहाराच्या खाचाखोचा सांभाळीत प्रकट होणारा असतो. कारण त्याही कोणी तरी सांभाळायला पाहिजेत. कारण लहान लहान गोष्टी मिळूनच घटकांचा प्रहर व्हावा त्याप्रमाणे मोठ्या गोष्टी होत असतात. संभाजीच्या बाबतीत हे काम येसूबाईने केले. तिचा चांगुलपणा या दुसऱ्या प्रकारचा होता व ते तिला जमले. कारण तिचे स्त्रीसुलभ चातुर्य आणि संसारबुद्धि. 'बेबंदशाही' नाटकात येसूबाई राजारामाबद्दल म्हणते "दुहीसांजा भाऊजींच्या भेटीविना अन्नाला कधी जीभ लावली नाही की, देवीला हळदी कुंकू वाहिले नाही." या ठिकाणी त्या प्रतिभाशाली नाटककाराने येसूबाईच्या वैशिष्टयपूर्ण चांगुलपणाचा अचूक वेध घेतलेला आहे.

संभाजीच्या संसारात त्या काळात कर्ती स्त्री फक्त येसूबाई होती. तो काळ कठीण होता. बाहेर शत्रु होते व आत विरोधक होते. संभाजी उमदा असला तरी उग्रप्रकृति होता. त्याचा सचिवोत्तम कविकलश जुन्यांना नामशेष करू पाहात होता व जुने त्याच्या विरुद्ध नेट धरू पाहत होते. अशा त्या काळात संभाजीच्या संसारात व राजकारणात येसूबाईने शहाणपणाने व निष्ठेने त्याला साथ दिली व सोबत केली. राजारामाची अवघड जबाबदारी चातुर्याने सांभाळली. तिच्यापेक्षा राजाराम दहा वर्षांनी लहान. त्याचा जन्म झाला तेव्हा ती शिवाजीमहाराजांच्या कुटुंबातच होती. तो तिला धाकट्या भावासारखा किंवा मुलासारखा होता आणि

निर्व्याज वात्सल्याने त्याला तिने सांभाळले व प्रेमाची त्याच्यावर पांखर घातली. तिच्या कार्याची फळे संभाजीच्या मृत्यूनंतर आलीच. पण संभाजी जिवंत असतानाही राजारामाच्या बाबतीत त्याला जी निश्चितता लाभली ती त्याच्याप्रमाणे येसूबाईच्याही कर्तृत्वाचे फळ होय. याखेरीज राजकारणातली पडेल ती जबाबदारी तिने उचललीच. या सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे असे म्हणणे भाग आहे की, इतर कोणत्याही बाबतीत संभाजी दुर्दैवी असो की नसो, गृहिणीच्या बाबतीत मात्र तो सुदैवी ठरला यात शंका नाही.

संभाजीच्या मृत्यूनंतर राज्याचा सारा कारभार राजारामाने विश्वस्त म्हणून शाहूच्या नावाने चालविला. शाहू परत आल्यानंतर सांभाळलेले राज्य त्याच्या स्वाधीन करावयाचे व ज्याचो ठेव त्याला परत केल्याचे अनिर्वचनीय समाधान आस्वादायचे, एवढीच त्याची मनीषा होती.

पण या जगात नियम असा आहे की, पेरल्याशिवाय उगवत नाही. राजारामाचा चांगुलपणा जर इतका लोकोत्तर असेल, तर एवढे उदंड पीक येण्यासाठी येसूबाईने पेरलेला चांगुलपणा किती लोकोत्तर असला पाहिजे बरे ! राजारामाने त्या चांगुलपणाची जाणीव ठेविली हा त्याचा चांगुलपणा होय. पण म्हणून येसूबाईच्या चांगुलपणाची किंमत कमी होत नाही.

संभाजीच्या काळात येसूबाईने जी कामगिरी त्याच्या जीवनात म्हणजेच स्वातंत्र्ययुद्धात केली तिचे वर्णन येथपर्यंत आले. त्यानंतर राजाराम व ताराबाई या काळात ती औरंगजेबाच्या कैदेतच होती. पण रायगड सोडण्यापूर्वी तिने जी कामगिरी केली तिने स्वातंत्र्ययुद्धाला संभाजीच्या मृत्यूनंतर कलाटणी दिलेली आहे. ती कामगिरी म्हणजे राजारामाला रायगड सोडून जिंजीला जाऊन तेथे तळ बांधून औरंगजेबावर आक्रमण करण्याची तिने दिलेली मसलत होय. त्यामुळे राजाराम बचावला; म्हणजे छत्रपतीच बचावला. रायगड गेला पण जिंजी राजधानी राहिली. औरंगजेबाला महाराष्ट्र व तामिळनाडू या दोघा आघाड्यांवर झुंजावे लागले, व त्याचे बळ हळुहळू पार मोडले. ही मसलत जर तिने दिली नसती तर बहुधा त्याच वेळी रायगडासकट राजाराम, येसूबाई वगैरे सर्व औरंगजेबाचे कैदी झाले असते असे समजणे फारसे चूक नाही. म्हणजे या मसलतीनें येसूबाईने मराठी राज्य वाचविले – पण त्यात ती स्वतः औरंगजेबाची बंदिवान झाली. स्वतः आत्मार्पण करून तिने मराठी राज्य जिवंत ठेवले. निःस्वार्थी राजकारणी बुद्धि कोणत्या मर्यादेपर्यंत जाऊ शकते याचा येसूबाई हा या प्रसंगीचा उत्तम नमुना होय. कारण ह्या आणीबाणीच्या क्षणी केवळ तिच्या शहाणपणामुळे मराठी राज्य तरून गेले.

'सुखाद्बहुतरं दुःखं जीविते नात्र संशयः ।' हे महाभारतातले वचन येसूबाईच्या जीविताचा विचार करताना मनात आल्याशिवाय राहात नाही, पिलाजीराजे

शिर्क्यासारख्या देशमुखाची लेक आणि शिवछत्रपतींची सून होण्याचेही भाग्य तिला लाभले. तिचा नवरा युवराज झाला, छत्रपतीही झाला आणि ती मराठी राज्याची महाराणी झाली. पण, कल्पवृक्षाचे फूल हाती येण्यापूर्वी सारे अंग काटद्याने रक्तबंबाळ व्हावे त्याप्रमाणे ही राज्यलक्ष्मी हस्तगत होण्यापूर्वी तिला अनन्वित यातनांतून जावे लागले. नवरा एकीकडे आणि घरातली सारी कर्ती माणसे शिवाजीमहाराजांसकट एकीकडे असल्याचे दृश्य तिला पाहावे लागले. संसाराला फूल आले, पहिल्या अपत्याचा जन्म झाला आणि कमलवेलीवर बर्फ पडावे, त्याप्रमाणे संभाजी दिलेरखानाकडे निघून गेल्याची वार्ता तिला ऐकावी लागली. तो छत्रपति झाला आणि अण्णाजी दत्तोसारखे विरोधक सारी प्रतिष्ठा पणाला लावून संभाजीच्या विरोधात उभे राहिले. ते विरोधकही अशा दर्जाचे होते की, येसूबाईला जवळ जवळ त्यांच्याशी सहमत होण्याइतका आदर होता. त्यांच्या विरोधाने तिला दुःख होत होते तरी ते मारले गेले त्यामुळे तिला हायसे वाटले नाही. ते गेले आणि चंदनाला भुजंगाचा विळखा पडावा, त्याप्रमाणे कवि-कलशाचा विळखा संभाजीला पडलेला तिला पाहावा लागला. एवढ्यात औरंग-जेबाची बला येऊन उभी राहिली. त्या भीषण काळात संभाजीचे छत्रपतिपद काय किंवा येसूबाईचे राज्ञीपद काय, केवळ सुळावरची पोळी होती. अखेर तिचा कुंक-वाचा धनी औरंगजेबाने हालहाल करून ठार मारला आणि तिच्या दुःखाने शीग गाठली. पण दुर्दैवाचे माप पुरे भरले नव्हते म्हणूनच जणू काही औरंगजेबाचे धरणे आले आणि त्या महाशत्रूच्या स्वाधीन मुलाबाळासकट तिला व्हावे लागले. राज्य गेले, राजा गेला, राजधानी गेली, आपणही चाललो, सारे संपले. ‘कठीण त्यावरी कठीण आले आता न दिसे उरी!’

पण तृषार्ताला वाळवंटात अकस्मात् अमृताचा झरा लागावा, त्याप्रमाणे औरंग-जेबाने तिला आणि शाहूला पराकाष्ठेच्या सौजन्याने वागविले, हा केवळ त्याचा चांगुलपणा होय. पण त्या वेळी तरी तिने उघड्या डोळ्यांनी अंधारात घेतलेली ही उडी होती, हे नाकारता येत नाही. औरंगजेबाच्या हयातीत महाराष्ट्रात आणि त्याच्यानंतर दिल्लीला तिची तीस वर्षांची नजरकैद म्हणजे एक लांबच लांब, उदास कंटाळवाणी जन्मठेप होती. पण तेथेही तिने आपली इभ्रत राखली, आपला व आपल्या मुलाचा धर्म राखला आणि आपल्या शहाणपणामुळे वाहवा मिळविली. तिच्या डोळ्यांदेखत संभाजी व राजाराम यांच्या कैदी म्हणून सापडलेल्या मुलींची औरंगजेबाने मुसलमानांशी लग्ने लावून दिली. पण त्याला तिचा इलाज काहीच नव्हता. बादशहा आपले ऐकत असला तरी कोणत्या मर्यादेपर्यंत आपण हट्ट केला असता तो चालू शकेल याची तिला उपजत जाणीव होती म्हणून शाहूला न बाटविण्यापुरताच तिने आग्रह धरला. जास्त हट्ट केला तर औरंगजेबाची प्रतिष्ठा आड येईल व पदरी नकार घ्यावा लागेल हे समजण्याइतकी ती चतुर

होती. अखेर औरंगजेब मेला तरीही ती सुटली नाही, शाहूसाठी ती जणू दहा वर्षे ओलीस राहिली. स्वतः मरण पतकरायचे पण दुसऱ्याला जगवायचे हा स्वार्थत्याग तिच्या रोमरोमांत भिनला होता. त्यामुळे बन्धन तिने पतकरले व मुलाचा बंधमोक्ष साधला. म्हणून तिच्या जन्मसमयी विधात्याने तिच्या ललाटावर लिहिलेल्या रेषांचा विचार करताना वाटते की, तिच्या बाबतीत सुखाच्या रेषा पुसट आणि नागमोडी आणि दुःखाच्या रेषा मात्र ठळक आणि सरळ असाव्यात.

पण ‘ Made perfect through suffering ’ दुःखाशिवाय माणसाला पूर्णता नाही असे इंग्रजीत वचन आहे, त्याची प्रचिती, येसूबाई मुक्त होऊन महाराष्ट्रात परत आल्यावर आली. तिच्या तीस वर्षांच्या यातना ही एक तपश्चर्या होती. त्या तपस्येने तिला जे पावित्र्य लाभले होते, त्याची तुलना फक्त एखाद्या विभूतीशीच करता येण्यासारखी होती. शिवाजीमहाराजांपासून राजारामापर्यंतच्या त्या उज्ज्वल भूतकाळातला ती अखेरचा दुवा होती. त्यामुळे दंतकथांचे गूढ वलय असलेल्या अद्‌भुतरम्य व्यक्तीप्रमाणे तिच्याकडे कुतूहल, आश्चर्य, आदर, प्रेम अशा संमिश्र भावनांनी लोक पाहात होते. शिवाजीमहाराजांच्या काळात जिजाबाईचा शब्द अखेरचा मानला जाई, त्याप्रमाणे शाहूच्या काळात येसूबाईच्या शब्दाला ‘ शब्दप्रामाण्या’चे माहात्म्य होते.

शंकराजी नारायण सचिवाच्या मुलांनी वाटणीपत्र केले त्यात येसूबाईबद्दलची ही भावना स्पष्ट दिसते.—“ यादी वाटणी राजश्री नारो शंकर व महादजी शंकर गांडेकर सुहूर सन तिसा अशर मया अलफ. कै. शंकराजी नारायण यांणी महादजी पंत दत्तपुत्र घेतले. पुढे औरसपुत्र नारोपंत जाले. त्या उभयतामध्ये कथला पडू लागला. सबब मातुश्री येसूबाई यांणी चौघांस बोलावून उभयतांची समजूत करावी. त्यावरून उभयतांनी चालावयाची कलमे. वडिलांचे वेळचे दागिने चीजवस्तुसुद्धा निमेनिमे घ्यावी—श्यामजी हरी सुभेदार यांणी मातुश्री येसूबाई यांस शंकतपूर्वक पुसून वाटणी करावी. उभयतांनी एक विचारे चालून मातुश्रीचे आज्ञेन राहून लौकिक राखावा. एकूण कलमे सात. ”

‘ All's well that ends well’ येसूबाईची अखेर गोड झाली. ती महाराष्ट्रात परत आली. आपल्या मुलाजवळ सुखाने राहिली. त्याने संभाजीचे वृंदावन बांधले होते त्याची निगा राखली जात असलेली तिने पाहिली. आपला मुलगा छत्रपति झालेला तिने पाहिला. त्याच्या राजधानीत, त्याच्या सांनिध्यात तिने सुखाने देह ठेवला. त्या वेळी शाहूचा सावत्र भाऊ, कोल्हापूरचा संभाजी याने शाहूचे सांत्वन केले की, “ मातुश्री येसूबाईसाहेब यांस वेथा होऊन कैलासवास जाला म्हणोन लिहिले, त्यावरून ममताविषये चित्तास परम खेद प्राप्त जाला. हा अयत्नी मार्ग ऐसाच आहे. वडील सर्वज्ञ आहेत. विशेषेंकरून चित्ताचे सांतवन होय ते केले पाहिजे. विशेष लिहावे तरी वडील सुज्ञ आहेत. ” कालांतराने

येसूबाईच्या त्या संगममाहुलीच्या वृंदावनासमोरच शाहूचे वृंदावन बांधले गेले. आईच्या मांडीवर चिरविश्रांतीसाठी मुलगा झोपी गेला.

येसूबाई ही थोरली जाऊ आणि ताराबाई ही धाकटी जाऊ. त्यामुळे दोघी जावांची तुलना साहजिकच मनात आल्याशिवाय राहात नाही. ताराबाई ही वर्चस्व गाजविण्यासाठीच जन्माला आली होती. ती जन्मजात राणी होती. " शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् । दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् " असा क्षात्रधर्म कायावाचामनात भिनलेली ती मूर्तिमंत क्षत्राणी होती. तिला नवराही मिळाला तो भित्रा जरी नसला तरी उलट प्रकृतीचा, शरीराने व मनानेही कोमल. त्यामुळे ताराबाईच्या अंगचे मूळचे क्षात्रतेज विरोधाभासामूळे अधिकच उजळ झाले. त्याउलट येसूबाईचा स्वभाव सत्ता गाजविण्यापेक्षा मन वळविण्याचा होता असे वाटते. प्रसंग पडल्यावर तिनेही कारभार केलाच. पण तो तिचा स्वभाव नव्हता; आणि असता तरी संभाजीपुढे तिचे तेज पडले नसते. तो स्वतःच सारा कारभार आटपत असे. त्याची प्रकृति अग्नीसारखी तेजस्वी– ' ज्वलज्ज्वलनतेजसः " –त्याच्यापुढे धनाजी संताजीसारखे गुरुशुक्रसुद्धा फिके पडले. तेथें येसूबाईची काय कथा ? त्यामुळे जसे निसर्गतः तसेच परिस्थितीमुळे धैर्य, तितिक्षा, स्वार्थत्याग हे येसूबाईचे विशेष आहेत, तर कर्तृत्व, हिंमत, पराक्रम धडाडी, ईर्ष्या हे ताराबाईचे गुण आहेत. ताराबाई सूर्यप्रभा आहे तर येसूबाई चंद्रकला आहे. ताराबाई विद्युल्लता आहे तर येसूबाई दीपज्योति आहे. ताराबाईचे धैर्य वीरांगनेचे आहे तर येसूबाईच धैर्य सतीचे आहे; दोघीही सारख्याच वंदनीय आहेत. अशा सुना ज्याला मिळाल्या तो सासरा केवढा भाग्यवान् म्हणावा बरे !

ताराबाई आणि येसूबाई या दोघींच्याही पुण्यप्रतापाने महाराष्ट्र राज्य आज या यशाला आले होते.

येसूबाई आज अहमदनगरला औरंगजेबाच्या नजरकैदेत होती. ताराबाई पन्हाळ्याला होती. महाराष्ट्रातल्या सात वर्षांच्या दुर्गयात्रेचे तोरण्याला 'मावंदे' करून औरंगजेब महाराष्ट्राच्या बाहेर वाकिणखेड्याला गेला होता; त्याची व वाकिणखेड्याच्या बेरडांची झुंज जुंपली होती. वाकिणखेड्याचे युद्ध हे मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाचाच एक भाग होता. कारण, शत्रूचा शत्रु तो आपला मित्र या न्यायाने मराठे व हे बेरड एकमेकांना राजारामाच्या काळापासून मदत करीत आले होते. आजहा ताराबाईने पाच हजार घोडदळ आणि वीस हजार पायदळ वाकिणखेड्याच्या मदतीसाठी पन्हाळ्याहून रवाना केले होते.

१६८० पासून पंचवीस वर्षे चालत आलेले मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध खरे म्हणजे मराठ्यांच्या दृष्टीने आता संपत आलेले होते; इतकेच नव्हे तर त्याची यशस्वी सांगता जवळ जवळ झाल्यासारखीच होती. कारण संभाजी, राजाराम, ताराबाई यांच्यासारखे धुरंधर छत्रपति त्यांना या कठीण काळी मिळाले होते; हंबीरराव

मोहिते, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, नेमाजी शिंदे, रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण यांच्यासारखे सेनापति व मुत्सद्दी यांनी आपले सारे बाहुबळ व बुद्धिबळ पंचवीस वर्षे या संग्रामात वेचले होते. आणि या मराठदेशच्या सुपुत्रांनी रायगडपासून जिंजीपर्यंत आणि माळव्यापासून मद्रासपर्यंत प्रत्येक समरभूमीवर शत्रूला खडे चारले होते, आणि या सर्वांच्या मागे 'हे महाराष्ट्र राज्य आहे' हा हिंदुपदपादशाहीचा उत्तुंग ध्येयवाद होता.

या साऱ्या कारणांमुळे विजयश्रीने मराठ्यांना माळ घातली. पण आणखी एक तितकेच महत्त्वाचे कारण होते; ते म्हणजे मराठ्यांची समरनीति होय. सुटचा समरप्रसंगांची जंत्री कितीही आकर्षक असली तरी त्यांतून एक एकसंध, अखंड व सम्यक् दर्शन निर्माण होत नाही; सूत्र नसलेले जसे सुटे मणि किंवा फुले तसे सुटे समरप्रसंग समजावेत. ते व्यक्तिशः कितीही रमणीय असले तरी सुटचा मण्यांना मणिहाराचे सौंदर्य नाही किंवा सुटचा फुलांना फुलांच्या माळेचे ऐश्वर्य नाही; त्याचप्रमाणे समरनीतीच्या सूत्राशिवाय समरप्रसंगांचे खरे तात्पर्य लक्षात येणार नाही; इतकेच नव्हे तर प्रत्येक राष्ट्राची युद्धकला व युद्धनीति ही त्या राष्ट्राच्या सांस्कृतिक व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार असते. या समरनीतीच्या सूत्राचे महत्त्व इतके आहे की, त्याच्या अभावी एकामागून एक वेधक समर प्रसंग कितीही असले तरी, एकमेकांशी संबंध नसलेल्या चित्रपटातल्या चित्रांच्या मालिकेप्रमाणे आकर्षक असले तरी ते अखेर– "Full of sound and fury, signifying nothing" या न्यायाने निरर्थक ठरतात. तेव्हा आता मराठ्यांच्या युद्धनीतीचा परामर्श घेण्याकडे वळू.

□ □


महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था
१२११ सदाशिव पेठ, ... ...,
... ... चौक, पुणे-४११ ०३०

## (१७)

औरंगजेब बुऱ्हाणपूरला म्हणजे महाराष्ट्राच्या सीमेवर असताना एक विलक्षण प्रकार घडला. त्याचा चरित्रकार साकी मुस्तैदखान लिहितो– " बुऱ्हाणपुरातील राजवाड्याला (किले अरक) लागून असलेल्या दोन कोठारांत दारूचा स्फोट झाला. बरीच माणसे ठार झाली. त्याच रात्री लालबागेजवळ असलेल्या लुत्फुल्ला-खान कोका याच्या तळावर डाका पडला. सहा माणसे मारली गेली. वीस जखमी झाली, आणि मालमत्ता लुटण्यात आली." खाफीखान आणखी थोडी माहिती पुरवितो– " बुऱ्हाणपुरात किले अरक आणि चौक यांना लागून एक सराई (धर्मशाळा) आहे. त्यात बादशाही कराचे देणेदार कैद करून ठेवीत. या सराईत बादशाही अन्न शिजत होते. सराईला आग लागली. इमारतीत दारूचे काही साठे होते. त्याचा स्फोट होऊन सराईचे छत उडून गेले. कित्येक माणसे जळून मेली."

आता प्रश्न असा आहे की धडधडीत बादशहाच्या डोळ्यांदेखत सराईला आग लावणारे आणि तळावर डाका घालून माणसे मारणारे व मालमत्ता लुटणारे हे चोर होते तरी कोण ?

तर्क असा आहे की ते चोर म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून मराठेच होते. दोन्ही शब्दांचा अर्थ औरंगजेबाच्या दृष्टीने एकच होता; कारण पंचवीस वर्षे मराठ्यांचा अनुभव घेतल्यानंतर औरंगजेबाने मराठ्यांना 'चोर' हा सन्माननीय किताब बहाल केला होता. या खास पदवीदानसमारंभाचा उल्लेख साकी मुस्तैद-खानाने केलेला आहे. " मासिरे आलमगिरी: नोंदी: १७०६ जानेवारी: मराठ्यांचा उल्लेख यापुढे चोर म्हणून करण्यात यावा अशी बादशहाने आज्ञा केली." पाहुणा गावच्या शिवेवर आला म्हणजे बंदुकांच्या फैरी झाडून त्याचे स्वागत करण्याची रीत महाराष्ट्रात फार पुरातन आहे. या वेळी तर खास दिल्लीचे बादशहा पाहुणे आलेले. शिवाजी महाराजांच्या वेळेपासून येतो येतो म्हणून म्हणत होते. जयसिंगाला रवाना करताना म्हणाले– " शिवाजीवर तुम्ही जाणे; आपण पातशहांनी जावे किंवा तुम्ही जावे असे जाणोन तुम्हांस रवाना करितो." महाराजांनी जयसिंगाने ओरबाडून घेतलेले सारे किल्ले परत घेतले व वरती मुखशुद्धि म्हणून बागलाणही भक्षण केला, तेव्हा पुन्हा एकदा शिवाजीच्या भेटीला जाण्यासाठी बादशहाच्या जिवाची तळमळ सुरू झाली– " आता कोण पाठवावे ? कोणी पाठवावयास दिसत नाही. याउपरी आपण खासा कंबरबस्ती करून शिवाजीवर जावे तर शास्ताखानाचा न्याय जालियास काय करावे ? याकरिता शिवाजी जोवर जिवंत तोवर दिल्ली आपण सोडत नाही." मिळून आधी



औरंगजेब

कार्यबाहुल्यामुळे, नंतर शायिस्ताखान, इखलासखान, बहादुरखान, दिलेरखान, जयसिंग यांच्यासारखे एकापेक्षा एक नामांकित सरदार शिवाजीवर जाण्यासाठी 'मी' 'मी' म्हणत आडवे आल्यामुळे आणि अखेर शिवाजी जिवंत असल्यामुळे बादशहांना महाराष्ट्रात येणे काही फावले नाही. अखेर सारे अडथळे दूर झाले, शिवाजीमहाराजही मृत्यु पावले, तेव्हा फार दिवस मनी धरलेला बादशहांचा संकल्प सिद्धीस गेला आणि त्यांचे पांढरे पाऊल – कारण बादशहा स्वतः गोरेपान होते– महाराष्ट्राच्या शिवेवर पडले. त्या प्रसंगी मराठ्यांनी आपल्या गनिमी काव्याची सलामी दाखविली आणि बादशहांचे मराठी भूमीत उत्स्फूर्त आणि खास मराठमोळे स्वागत केले. त्यानंतर थोडीथोडकी नव्हे, तर चांगली पंचवीस वर्षे बादशहांचा मुक्काम महाराष्ट्रात होता. त्या मुदतीत मराठ्यांनी त्यांचे आदरातिथ्य याच पद्धतीने अगदी मनापासून केले. तो पाहुणचार बादशहांच्या काय किंवा बादशाही फौजेच्या काय, फारसा पचनी पडला नाही हे इतिहास सांगतच आहे.

खास मराठ्यांची म्हणून ओळखली जाणारी ही युद्धनीति 'गनिमी कावा' किंवा 'वृक युद्ध' या नावाने प्रसिद्ध आहे. या पद्धतीचे पहिले वैशिष्टय हे आहे की, शत्रूच्या तळावर रात्री बेरात्री बेधडक छापा घालणे, त्याचे करता येईल तेवढे नुकसान करणे, तंबूला आग लावणे आणि माणसे मारणे आणि मालमत्ता पळविणे आणि तो सावध होण्याच्या आत पळून जाणे. या कामासाठी मोठी फौज वापरली जात नाही. लहान लहान तुकड्या लागतात, आणि सामान्यतः लोकांना जे गैर-सोयीचे मुहूर्त असतात, ते रात्रीचे, मध्यरात्रीचे मुहूर्त या छाप्यांना शुभमुहूर्त समजले जातात. पावसाळी दिवस हा संस्कृत भाषेत 'दुर्दिन' समजण्याचा प्रघात आहे. तो दुर्दिन गनिमी काव्याच्या दृष्टीने केवळ सुदिन आणि सुवेळ आहे. मध्यरात्र असावी आणि मुसळधार पाऊस पडत असावा म्हणजे गनिमी काव्याच्या दृष्टीने दुधात साखर पडल्यासारखे झाले म्हणायचे. अशा छोट्या पण अखंड छाप्यांचा उद्देश शत्रूला सुखाची झोप लागू न देणे, त्याच्या मनात अहोरात्र धास्ती निर्माण करणे, त्याचे नीतिधैर्य खच्ची करणे, त्याला त्रासून सोडणे हा आहे. मोठी लढाई एकदाच इरेसरीने मारणे फार सोपे आहे. पण रोज उठून लहान लहान भुरट्या छाप्यांना तोंड देताना शहाणी माणसेसुद्धा वेडी होतात, जिकिरीला येतात. स्पॅनिश इन्क्विझिशन, चिनी सत्तेखाली आणि हिटलरच्या कॉन्सेन्ट्रेशन कॅंपमध्ये कैद्यांना छळण्याची एक अभिनव युक्ति होती. कैद्याचे हातपाय बांधले जात व त्यांच्या डोक्यावर एक पाण्याची पिशवी लटकत ठेवण्यात येई. तिच्यातून एका वेळेला एकच थेंब, पण अखंड दिवसरात्र चोवीस तास पाणी त्यांच्या डोक्यावर टपटपत राही थोडे थोडे पण सतत होत असलेल्या त्या अभिषेकामुळे ते कैदी अखेर संतापाने व वैतागाने वेडे होऊन जात व त्यांना ते पाण्याचे थेंब शेवटी

....२०

घणाच्या घावासारखे वाटू लागत. छोटे छोटे पण अखंड पडत राहणारे मराठ्यांचे गनिमी छापे ही अशीच शत्रूला वैतागाने वेडे करणारी छलयंत्रणा होती.

संभाजीच्या कारकिर्दीत या पद्धतीने मराठे औरंगजेबाशी लढत राहिले. बुऱ्हाणपुरावरच्या छाप्यानंतर शहाबुद्दीनखान रामसेजला वेढा देऊन बसला असताना त्याच्यावर मराठ्यांनी छापा घातला. रामसेजच्या किल्ल्यातले मराठे शहाबुद्दीनखानावर तोफात कातडे भरून उडवीत होते. असली एक तोफ दहा तोफांचे काम करी. त्याच वेळेला किल्ल्याबाहेरचे मराठे शहाबुद्दीनखानाच्या तळावर छापे घालीत होते. १६८२ च्या मे महिन्यात रूपाजी भोसले आणि मानाजी मोरे यांनी गणेश गावाजवळ शहाबुद्दीनखानावर हल्ला चढविला आणि त्याची पाचशे घोडी पाडाव केली. पाथरी भागात बादशहाचे व शहाजादा मुअज्जमचे हत्ती चारणीसाठी ठेवले होते, ते मराठ्यांनी हाकलून नेले अशी बातमी लागल्यावरून खानजहान त्यांच्या पाठलागावर निघाला. त्याने हत्ती सोडविले, पण या पाठलागात त्याला नांदेडपासून गोवळकोंड्याच्या सरहद्दीवरील तुरुकचांद्यापर्यंत वणवण भटकावे लागले. मराठ्यांच्या गनिमी काव्याचे हे आणखी एक वैशिष्टच. शत्रूला आपणामागे इतके पळवायचे की पळून पळून त्याची दमछाक झाली पाहिजे.

अर्थात्, नेहमी छापे घालणे किंवा चोरटे हल्ले चढविणे इतक्यापुरतीच गनिमी काव्याच्या तंत्राची व्याप्ति मर्यादित नव्हती. काळवेळेची अनुकूलता पाहून, प्रसंगी निकराची लढाईही केली जाई. कोकणात १६८३ साली रणमस्तखान आणि रुहुल्लाखान उतरले होते, त्यांचा पाडाव या दोन्ही मार्गांनी मराठ्यांनी केला. कल्याण भिवंडीच्या जवळ हंबीरराव मोहिते याने वीस हजार स्वार आणि दहा हजार पायदळ यांच्यासह रुहुल्लाखानावर हल्ला चढविला आणि त्याचे पद्मसिंग राठोड, भगवतसिंग दखनी, इब्राहिम बेग यांच्यासारखे नामांकित सरदार ठार मारले. या वेळी औरंगजेबाने वापरलेले शब्द फार मार्मिक आहेत—"रुहुल्लाखानास दक्षिणी लोकांच्या लढाईची पद्धत माहीत नव्हती. तशाही परिस्थितीत तो टिकून राहिला." हो 'दक्षिणी लोकांच्या लढाईची पद्धत' हाच मराठ्यांचा गनिमी कावा होय. तो औरंगजेबाच्या लोकांना समजला नाही आणि समजूनही ते त्याला पुरे पडू शकले नाहीत, हे मोगलांच्या अपयशाचे एक मोठे कारण म्हटले पाहिजे.

छोटे पण घातक हल्ले आणि मोठ्या व निकराच्या लढाया यांच्या आलटून पालटून स्थलकालाच्या अनुकूलतेप्रमाणे केलेल्या उपयोगाप्रमाणेच गनिमी काव्याच्या तंत्रातले अत्यंत मोठे तंत्र म्हणजे वाटा अडविणे आणि रसद तोडून शत्रूची उपासमार करणे हे आहे. शत्रूची संख्या केवढीही प्रचंड असो, या दोन चापात त्याला पकडल्यावर तो जेरीस आल्याशिवाय राहत नाही. कारण जितकी संख्या

प्रचंड तितकी खाणारी तोंडे असंख्य आणि तितकीच उपासमार प्रचंड. रुहुल्लाखानाची रसद तोडण्याचा संभाजीने जास्तीत जास्त प्रयत्न केला. सुरतेचे मोगली आरमार समुद्रमार्गाने औरंगजेबाच्या हुकुमावरून रणमस्तखानाला धान्य पुरवीत असे. ती धान्याची जहाजे ठाणे बंदरातून कल्याण भिवंडीला रणमस्तखानाकडे जाण्यास पोर्तुगीजांची परवानगी लागे. ती परवानगी पोर्तुगीजांनी दिली. तेव्हा संभाजी इतका संतापला की, त्याने पोर्तुगीजांचा दमणपासून वसईपर्यंतचा मुलूख जाळून टाकला. कदाचित् यामुळे असेल, पण पुढे रणमस्तखानाला रसदेची टंचाई भासू लागली. उन्हाळा आला तेव्हा कोकणात राहणे बरे नव्हे म्हणून तो परत फिरला, तो मराठ्यांनी दुसऱ्या अस्त्राचा त्याच्यावर प्रयोग केला. टिटवाल्याच्या अवघड घाटात मराठ्यांच्या पस्तीस हजार सैन्याने त्याची वाट अडविली. त्याला पुढेही जाता येईना आणि मागेही फिरता येईना. खायलाही मिळेना. औरंगजेबाने कुमक पाठवावी म्हणून त्याने दाताच्या कण्या केल्या. पण औरंगजेबाने नकार दिला. "तुमच्यापाशी आठ हजारांचे सैन्य आहे तुम्हांला अधिक कुमकेची आवश्यकता वाटू नये. मराठ्यांच्या सेनापतीचा मुलगा तुमच्या ताब्यात आहे. त्याला सोडून देण्याच्या अटीवर तुम्ही सुलभपणे तेथून माघार घेऊ शकता." दुसरीकडे रुहुल्लाखानही अशाच अवघड वाटेत मराठ्यांकडून अडविला गेला. अखेर मोठ्या शिकस्तीने दोघेजण मराठ्यांच्या तावडीतून निसटले. पुन्हा म्हणून 'कोकणदर्शना'ची त्यांनी इच्छा प्रकट केली नाही.

खोल दऱ्या आणि उंच डोंगर यांनी खचलेला कोकणचा मुलूख हा इतर बाबतीत नापीक असला तरी गनिमी काव्याच्या फलनिष्पत्तीच्या दृष्टीने फारच सुपीक म्हटला पाहिजे. पुढच्या वर्षी रायगडावर आलेला शहाबुद्दीनखान आणि दक्षिण कोकणात उतरलेला शहाआलम यांचा समाचार संभाजीने याच भौगोलिक पार्श्वभूमीच्या आधाराने व गनिमी काव्याचे तंत्र वापरून घेतला. दिवस आणि रात्र, नद्या आणि ओढे, डोंगर आणि दऱ्या, झाडे आणि झुडूपे, घळी आणि जंगले, वळणे आणि वाकणे, घाट आणि उतार हे जे या भूगोलाचे विशेष आहेत त्यांचा वाटा गनिमी काव्याच्या साहाय्याने इतिहास घडविताना फार मोठा आहे हे विसरता कामा नये. शहाबुद्दीनखानाला तर कविकलशाने रायगडच्या अलीकडून गांगोलीहूनच बोरघाटातून परतून लावले; आणि शहाआलम तर दक्षिण कोकणात सापडला होता. या प्रदेशाची महती खाफीखानाच्याच नमुनेदार व प्रत्ययकारी शब्दांत गायलेली बरी "त्याने (शहाआलमने) गगनचुंबी डोंगर आणि खोल दऱ्या असलेल्या मुलुखात प्रवेश केला. तो प्रदेश काटेरी वृक्षांनी आणि घोर अरण्यांनी व्यापलेला होता. त्या देशात कुळीथ इत्यादि निकृष्ट धान्यें पिकतात. इतर भागातील लोक व प्रवासी यांनी ते अन्न खाल्ले तर त्यांच्यावर विषारी अन्न खाल्ल्यासारखा परिणाम दिसून

पतो, घोडे आणि उंट यांना तेथील हवा मुळीच मानवत नाही. या मोहिमेत अनेक माणसे व जनावरे नाश पावली. सैन्यात घोडे शिल्लक राहिले नाहीत." निसर्गाने आधी समाचार घेऊन शहाआलमला अशा प्रकारे अर्धमेला केला आणि मग संभाजीने त्याची वाट अडविली व रसद तोडली आणि चोरटे हल्ले चढविले. मग जो काय हाहाकार उडाला तो काय विचारावा ! पुन्हा एकदा खाफीखान–" काफरांनी चहूकडून वाटा अडविल्या. त्यामुळे रसद मिळेनाशी झाली. फौजेची स्थिति इतकी पेचाची झाली की शहाजाद्याला त्या प्रदेशात राहणे कठीण झाले. शेवटी त्याने बादशहाला विनंती केली. त्यावर बादशहाने त्याला आपल्याकडे बोलावून घेतले." पण कोकणात शिरणे एक वेळ सोपे पण बाहेर पडणे कठीण याचा अनुभव संभाजीने त्याला आणून दिला. परततानाही त्याची उपासमार झाली. सुरतेहून आलेली धान्याची एकशेवीस गलबते समुद्रात उभी होती पण ती गोवेकरांनी शहाआलमला मिळू दिली नाहीत, "आम्ही तुम्हांस धान्य पोचविले तर संभाजी आमचा सूड घेतल्याशिवाय राहणार नाही" असे त्यांनी त्याला उत्तर दिले. ते त्यांचे स्वानुभवाचे बोल होते, कां को, ते नुकतेच संभाजीच्या तावडीतून जिवावरच्या संकटातून कसेबसे बचावले होते. दोन वेळा सीदीने समुद्रमार्गाने रसद पाठविली पण समुद्रकिनाऱ्यावर मराठ्यांचे किल्ले होते ते पाळतीवर राहिले आणि रसद मधल्यामध्ये त्यांनीच पळविली. अखेर संभाजीचा समाचार घेण्यासाठी गेलेल्या शहाआलमला सांभाळून आणण्या-साठी औरंगजेबाने रुहुल्लाखानाला पाठविले, तेव्हा तो 'मोरू परतुनी आला.'

इरेला पडणे, हट्टाला पेटणे, बेभान होणे व स्वतःला विसरणे, कोणताही प्रश्न प्रतिष्ठेचा करणे हे गनिमी काव्याच्या तंत्रात बसत नाही. याचा अर्थ त्यांना स्वाभिमान नसतो असे नव्हे, तर कमीत कमी वेळात कमीत कमी माणसे खर्ची घालून शत्रूचे जास्तीत जास्त नुकसान करण्याचा साधा व्यावहारिक हिशेब त्यांच्या डोळ्यांपुढे असतो. त्या दृष्टीने नाटक किंवा लघुकथा ही जशी वाङ्मयात तशी गनिमी कावा ही युद्धशास्त्रात 'काटकसरीची कला' Art of economy म्हणता येईल. म्हणून पळून जाणे किंवा माघार घेणे ही गोष्ट यात अप्रतिष्ठेची नसून उलट शहाणपणाची समजली जाते. शीर सलामत तो पगडी पचास; किंवा 'Discretion is the better part of valour, in which better part I have saved myself' हे फालस्टाफचे वाक्य गनिमी काव्याचे आद्य-तत्त्व समजण्यास हरकत नाही.

त्या दृष्टीने संभाजीची जंजिऱ्यावरची स्वारी गनिमी काव्याच्या तंत्रात बसेल कीं काय याची शंका वाटते. शिवाजी महाराजांनी चार वेळा जंजिऱ्यावर स्वारी केली व संभाजीनेही केली पण त्यांचा प्रकार निराळा व संभाजीचा निराळा. काम आहाराबाहेर जात असले की महाराज ते आवरते घेत. संभाजीने जंजिऱ्याची

सबंध खाडीच मुळी कापसाच्या गासड्या आणि लाकडाचे ओंडके यांनी भरून काढण्याची अचाट कल्पना काढली. 'सेतु बांधारे सागरी' म्हणून समुद्रावर पाषाणाचा सेतु बांधू पाहणारे दोन पुरुषोत्तम कालाने पाहिले. सत्ययुगात रामचंद्र आणि कलियुगात संभाजी. कल्पनेची भव्यता आणि जिद्द याबद्दल प्रश्नच नाही; संभाजीवर रामायणाचा किती खोल संस्कार झाला होता हेही त्यावरून दिसू शकते; पण कल्पना व्यवहारात बसत नाही व जे व्यवहारात बसत नाही ते मराठ्यांच्या युद्धनीतीत बसत नाही. त्याचप्रमाणे मांडवी नदीतून पळणाऱ्या पोर्तुगीजांचा पाठलाग करताना संभाजी इतका ईर्ष्येला पेटला की भरतीच्या पाण्यात त्याने बेधडक घोडा घातला; त्या वेळी खंडो बल्लाळ पुढे धावला म्हणून संभाजी वाचला.

हे दोन अपवाद वजा केले तर संभाजीने आपल्या कारकिर्दीत मोगलांना तोंड दिले ते छापे घालणे, रसद मारणे क्वचित् मोठे हल्ले चढविणे, वाटा अडविणे या गनिमी काव्याच्या तंत्राने होय.

"अति सर्वत्र वर्जावे । प्रसंग पाहोनी वर्तावे । हठनिग्रही न पडावे । विवेकी पुरुषे ॥" हे मराठ्यांच्या युद्धनीतीचे मध्यवर्ती सूत्र होते, हे आणखी एका उदाहरणावरून सिद्ध करता येण्यासारखे आहे. संभाजीच्या कारकिर्दीनंतर राजारामाची कारकीर्द सुरू झाली; त्या वेळी साऱ्या बाजूने आभाळ फाटावे असे झाले होते. पण आभाळ कोसळले तरी हिंमत हरावयाची नाही, विजयाने धुंद व्हायचे नाही व पराजयानेही खचायचे नाही हा दोन टोकामधला मराठी प्रवृत्तीचा सामान्यत: असलेला सुवर्णमध्य या वेळी येसूबाईने प्रकट केला. "ये समयी सर्व कुटुंब निघोन एकदाच सर्वांनी शत्रूस हस्तगत व्हावे ऐसे होईल. यास्तव राजारामसाहेब व त्यांचा कबिला ऐसे काढून निघोन जावे .... चंदी चंदावर प्रांती दम खाऊन पुन्हा मसलत बळावून राज्य साधनही करणे पडेल तरी करावे" अशी सल्ला तिने राजारामाला दिली व त्याला जिंजीकडे काढून लावले. आपण व शाहू रायगडच्या बेलाग जागी राहिली. राज्य राखणे असेल तर विभक्त झाले पाहिजे या अगदी उलट अर्थाने Divide and Rule हे तत्त्व तिने या वेळी उपयोगात आणिले. झुल्फिकारखानाचा वेढा सख्त पडला. पल्ला पोचेना तेव्हा व्यर्थ इरेला न पडता तिने "कार्तिक मासी रायगड सला करून मार्गसीर्ष सुध २ रविवारी मोगलास दिल्हा–" या दोन्ही प्रसंगांत येसूबाईची युद्धनीति बचावाची, 'आहे तितुके जतन करावे' अशा प्रकारची होती हे उघड होते.

तीच गोष्ट राजारामाची. तो जिंजीला जो गेला तो लपतछपत गेला; वैराग्याचा वेष करून गेला. तो पळाला. तेथे प्रतिष्ठेचा प्रश्नच नव्हता. जीव वाचविण्याचा प्रश्न होता. पोकळ प्रतिष्ठेच्या आहारी जाऊन तो पन्हाळ्याहून जिंजीकडे वाजत गाजत गेला असता तर जिंजी तर दूरच

राहिली पण रंकाळचाच्या तलावावरही पोचला नसता. ज्या मुकर्रबखानाने संभाजीला संगमेश्वरला धरले होते, तोच पन्हाळचाला वेढा देऊन बसला होता. त्याने संभाजीप्रमाणेच राजारामालाही चतुर्भुज करून औरंगजेबाकडे नेले असते व मग मोठचा भावाच्या वाटेनेच धाकटचा भावाला जावे लागले असते. सोळावा लुई आठ घोडचांच्या रथात बसून फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळेस पळाला म्हणून सापडला आणि 'भले बुद्धीचे सागर' नाना पानपतच्या प्रलयातून शुद्ध लंगोटी लावून पळाले म्हणून बचावले हा इतिहास आहे. तेव्हा पोकळ प्रतिष्ठा आणि बहुमोल जीवित यांचे तारतम्य लावण्याचा हा प्रश्न आहे. असे असून साकी मुस्तैदखान राजारामाला फार दोष देतो –" रामाने (राजारामाने) बैराग्याचा वेष घेतला आणि तो किल्ला सोडून पळून गेला. आपली प्रतिष्ठा, आपल्या भावाचा कबिला, आपल्या वाडवडिलांची अब्रू इत्यादि गोष्टींचा त्याने मुळीच विचार केला नाही. पहा तो निर्लज्ज. चांगले भाग्य त्याच्या वाटचाला कधीच येणार नाही. त्याने फक्त स्वतःचे सुख पाहिले. बायकापोरांना त्याने संकटात लोटले." आपल्या बायकापोरांचा कळवळा राजारामाला नक्राश्रु ढाळणाऱ्या साकी मुस्तैदखानापेक्षा खचितच जास्त होता. पण, त्यांच्या रक्षणासाठीच स्वतःचे रक्षण करणे जरूर होते. हेच 'आत्मानं सततं रक्षेत् दारैरपि धनैरपि' या शब्दांत व्यक्त केलेले आत्मरक्षणाचे ऊर्फ बचावात्मक युद्धनीतीचे तत्त्व होय.

पण मराठे नेहमीच बचावाचे युद्ध खेळत असत असे नव्हे. केवळ बचाव म्हणजे कातडी बचावणेच म्हटले पाहिजे. तो भ्याडपणाच आहे. 'कातर्यं केवला नीतिः!' तसे नाही. संरक्षणाच्या नाण्याचीच आक्रमण ही दुसरी बाजू आहे, आणि संधि सापडेल तेव्हा गरुडांनी सर्पांच्या छावणीवर झडप घालावी तसे मराठे मोगल छावणीवर तुटून पडतच होते. या दृष्टीने १६८९ च्या ऑगस्टात संताजी घोरपडे याने तुळापुरच्या औरंगजेबाच्या छावणीवर घातलेला छापा उल्लेखनीय आहे. वेळ रात्रीची, दिवस पावसाळचाचे, मोगल छावणी संभाजीच्या वधामुळे मदोन्मत्त झालेली, अशा वेळी संताजीने झडप घातली आणि बखरकार म्हणतो त्याप्रमाणे शाही तंबूचे सोन्याचे कळस कापून आणले. या कृतीचा अर्थ फार मोठा होता. अर्थ हा होता की, संताजीच्या मार्मिक शब्दात–" माझे पथकानिशी तुळापूरचे मुक्कामी जाऊन बरायखुद पादशहा यांजवर मी छापा घालितो. मराठे आहेत असे खाशास कळवून येतो." संताजीच्या छाप्यात मोगलांची किती डोकी गमाविली हा प्रश्न महत्त्वाचा नाही. महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, मेले ते मेलेच, पण जे जिते राहिले त्यांचे नीतिधैर्य साफ खलास झाले व त्यांनी मराठचांची धास्ती खाल्ली. गनिमी काव्याचे प्राणभूत उद्दिष्ट ते हेच.

खरे म्हणजे हा साराच कालखंड संताजी घोरपडे याच्या पराक्रमाने तळपणारा आहे. त्याच्या बरोबरीने धनाजी जाधवाने व इतर सरदारांनी पराक्रम केले हे

खरे; परंतु या काळात संताजी हा सेनापति होता म्हणून; "प्राधान्येन व्यपदेशा भवन्ति" मुख्याचा उल्लेख केला की त्यातच इतरांचे येतात म्हणून किंवा एकाच वेळी आकाशात दोन सूर्य तळपू शकत नाहीत म्हणून, राजारामाचा काल हा संताजीचा काल आणि ताराबाईचा काल हा धनाजीचा काल असे म्हटले तर ते चालू शकेल असे वाटते.

गनिमी काव्याचे युद्धतंत्र संताजीने पूर्णतेस नेले; सैन्याच्या तुकड्या करणे निरनिराळ्या तुकड्यांनी निरनिराळ्या ठिकाणी हल्ले चढवून शत्रूचा गोंधळ करणे, हुलकावणी देणे, रसद तोडणे, घेरा घालणे, इत्यादि गनिमी काव्याची सारी वैशिष्ट्ये त्याच्या युद्धपद्धतीत दिसून येतात. त्याला उपकारक असा एक बदल घडून आला. राजाराम जिंजीला गेला त्यामुळे झुल्फिकारखानाला तिकडे पाठवून महाराष्ट्र व तामिळनाडू या दोन आघाड्यांवर लक्ष ठेवण्यासाठी 'देहली दीपन्याया'प्रमाणे दोन खोल्यांच्या मधल्या उंबरठ्यावरच्या दिवटीप्रमाणे औरंगजेब गलगल्याला मुक्काम ठोकून बसला. मोगलांची आघाडी दोन ठिकाणी विभागली गेली. त्यांचे बळ कमी झाले. रायगड ते जिंजी हा हजार मैलांचा रस्ता संताजी धनाजीच्या संचाराला मोकळा मिळाला होता. मधले विजापूर गोवळकोंड्यांचे अडथळे औरंगजेबाच्या कृपेने दूर झालेच होते. त्याचा रसद लुटण्यासाठी मराठ्यांनी पुरेपूर फायदा करून घेतला. कासीमखान, हिंमतखान, रुस्तुमखान, जाननिसारखान, अलीमर्दानखान अशा नामांकित सरदारांना संताजीने या काळात धुळीस मिळविले.

सातारा आणि दोड्डेरी येथील लढाया ह्या संताजीच्या व्यूहरचनेच्या दृष्टीने पाहण्यासारख्या आहेत. या प्रत्येक लढाईत कमीत कमी तीन ते चार मराठ्यांच्या तुकड्या निरनिराळ्या वेळी निरनिराळ्या ठिकाणी कामे करीत होत्या व ते सारे पूर्वनियोजित होते. या नियोजनाचा 'योजकस्तत्र दुर्लभः' असा दुर्लभ योजक अर्थातच संताजी होय.

(१) सातारचा किल्ला घ्यावा अशा हेतूने रुस्तुमखान विजापुरी चालून आला. त्याच्यावर संताजी घोरपडे प्रचंड सैन्यानिशी चालून गेला. मोगल सैन्याच्या आघाडीला हत्ती उभे केले होते. त्यांच्यावर मराठी बर्कंदाजांनी गोळ्यांचा वर्षाव केला. हत्ती घाबरून मोगल सैन्यात पळू लागले. गोंधळ उडाला. (२) या वेळी मराठ्यांच्या गजदलाने चाल केली. मोगलांचे घोडे घाबरून उधळले. (३) तेव्हा रुस्तुमखानाने पांगलेले सैन्य एकत्र करून हल्ला चढविला तेव्हा मराठ्यांची आघाडीची पथके पळू लागली. मोगल पाठलाग करू लागले. (४) या वेळी मराठ्यांच्या दुसऱ्या तुकडीने मोगलांवर हल्ला केला तेव्हा रुस्तुमखानाने आपला हत्ती मराठ्यांवर घातला. (५) याच वेळी मराठ्यांच्या आघाडीला असलेले कर्नाटकी बर्कंदाज मोगलांच्या पिछाडीवर तुटून पडले व त्यांनी मोगलांची छावणी

लुटण्यास सुरुवात केली. मोगल पळू लागले. (६) या वेळी सातारच्या किल्ल्यातून हंवीरराव बाहेर पडला व पांच हजार स्वार व पायदळ यांनिशी त्याने मोगलांवर हल्ला केला. (७) याच वेळी मराठ्यांची एक तुकडी रुस्तुमखानाच्या छावणीत घुसली व त्यांनी रुस्तुमखानाची आई, बायको व मुलगी यांना पकडून किल्ल्यावर नेले.

दोड्डेरीची लढाई कर्नाटकचा फौजदार कासीमखान व संताजी यांच्यात झाली. खानाजादखान व इतर सरदार यांना मेजवानी द्यावी असे ठरवून कासीमखानाने सारे सामान पेशखान्याबरोबर अधोनीच्या किल्ल्यातून तीन कोस पुढे पाठविले. ही बातमी संताजीला कळली. त्याने आपल्या सैन्याच्या तीन तुकड्या केल्या. (१) एका तुकडीने पहाटे चार घटका रात्र असता पेशखान्यावर हल्ला करून तो साफ लुटला. (२) दुसरी तुकडी मोगल सैन्यावर चालून येण्यास सज्ज झाली. पेशखाना लुटल्याची बातमी कळल्यावर कासीमखान व खानाजादखान तातडीने तेथे जाऊन पोचले व निकराने लढू लागले. (३) तिसरी तुकडी राखीव म्हणून ठेवली होती. कासीमखानाबरोबर मोगल सैन्य लढाईला गेले व मागे छावणी मोकळीच पडली. ती छावणी या राखीव दलाने साफ लुटली. (४) मोगल दोड्डेरीच्या किल्ल्याजवळ गेले. मराठ्यांनीं त्यांना चहूकडून कोंडून धरले. तीन दिवस मोगल घोड्यावर बसून होते. मराठे समोर येत. पण ते लढत नव्हते. चौथ्या दिवशी लढाई झाली. बचावले ते मोगल दोड्डेरीच्या किल्ल्यात पळाले. (५) मराठ्यांनी किल्ल्याला चहूकडून वेढा दिला. उपासमार केली. अखेर मोगल शरण आले.

नेपोलियनबद्दल असे सांगतात की, नाटक पहात असताना एकीकडे त्याच्या डोक्यात विचारचक्र चाले—"माझ्यापाशी हजार सैनिक स्ट्रासबर्गला आहेत. पंधरा हजार मॅग्डेबर्गला आहेत व वीस हजार वर्टझबर्गला आहेत. कशा टप्प्यांनी त्यांनी दौड केली पाहिजे की जेणे करून रॅटिस्टबॉनला एका दिवसामागून एक असे तीन दिवसांत त्या तीन तुकड्या येतील?" नेपोलियन हा उत्तम गणिती होता हे प्रसिद्ध आहे. व युद्धशास्त्र हे गणिती शास्त्र आहे. नेपोलियनवर एक लाख पुस्तके आहेत व त्याने चार खंडांचे आत्मचरित्रही लिहिले आहे. त्यामुळे त्याचे हे मनोव्यापार आपणास समजू शकतात. पण बिचारा संताजी! त्याच्या हातचे अशा प्रकारचे एक अक्षर उपलब्ध नाही. पण त्याचेही मनोव्यापार नेपोलियनसारखेच असावेत अशी कल्पना केली तर ती अस्थानी होईल असे वाटत नाही

राजारामाच्या कारकिर्दीत ज्या तंत्राने मराठ्यांनी मोगलांना हैराण केले ते हे होय. संताजीने मोगलांच्या मनात जी धास्ती निर्माण केली होती तिचे वर्णन करताना खाफीखान म्हणतो— "जगात धडकी भरवून सोडणारी फौज घेऊन तो

कोठेही पोचला की नरव्याघ्राप्रमाणे असलेल्या योद्धयांचीही हृदये कंपायमान होत. भले भले नामांकित वीर संताजीचे नांव ऐकताच घाबरून जात. त्यांचे अवसान गळून जाई." जे संताजीचे वर्णन तेच सामान्यतः सर्व मराठी सेनानायकांचे व सैनिकांचे वर्णन म्हणता येईल– "रात्री दिवसा कोणीकडून येतील, काय करतील असे केले. मोगलाई फौजेत आठही प्रहर भय बाळगीत–"– गनिमी काव्याच्या तंत्राच्या फलश्रुतीची यापेक्षा कोणती पावती हवी ?

गनिमी काव्याच्या शास्त्रात ज्याला 'दग्धभू धोरण' म्हणतात, ते मराठ्यांनी ताराबाईच्या कारकिर्दीत साताराच्या वेढ्यात मोठ्या प्रमाणात वापरले. दग्धभू धोरण म्हणजे आपल्याच मुलुखातील गवत धान्य साफ जाळून टाकणे. या उद्देशाने की शत्रूला गवताची काडी किंवा धान्याचा दाणा मिळता कामा नये. साताराला औरंगजेब दस्तुरखुद वेढा घालून बसला. त्याच्या छावणीवर हल्ले करणे, मोगलांची रसद तोडणं, त्याप्रमाणे आसपासचा मुलूख वैराण करणे ही तीनही तंत्रे मराठ्यांनी या वेळी वापरली. साकी मुस्तैदखान म्हणतो–" किल्ल्याच्या बाहेर पसरलेल्या असंख्य मराठा सैन्यांनी रसदेच्या ने-आणीवर हल्ले केले. जनावरांना गवत-चारा ही आवश्यक आहेत. वीस कोसांच्या प्रदेशात मराठ्यांनी गवतचारा इत्यादि जाळून फस्त केली. काही वेळा तर अतिशय धाडस दाखवून ते बादशाही छावणीपर्यंत चालून आले." मराठ्यांच्या या धोरणाला मोगलांनीही नकळत कां होईना हातभार लावला. त्यांनी तीस चाळीस कोसांत एक झाड शिल्लक ठेविले नाही. त्यांचा नाइलाज होता. त्यांना तोफा डागण्यासाठी दमदमा रचायचा होता व दमदम्यासाठी लाकडे हवी होती. म्हणून त्यांनी चाळीस कोसातील झाडे सत्कारणी लावली. परिणाम त्यांनाच भोगावा लागला.

राजारामाच्या कारकिर्दीत संताजी घोरपडे त्याप्रमाणे ताराबाईच्या कारकिर्दीत धनाजी जाधव आपल्या अद्वितीय तेजाने तळपला. त्यांची भांडणे त्यांच्याबरोबर गेली; गनिमी काव्यातल्या चातुर्याच्या बाबतीत त्या दोघांत डावे उजवे करणे केवळ अशक्य आहे. 'दीपा आगिलु मागिलु । सूर्यु धाकुटा वडीलु । अमृतसिंधु झोलु उथळु । कायसा ॥' दोघांनीही सारख्याच कर्तबगारीने औरंगजेबाला 'दे माय धरणी ठाय' करून सोडले म्हणून दोघांचाही उल्लेख मोगल करीत, त्याप्रमाणे आपणही समुच्चयाने करणे श्रेयस्कर आहे. "मोगलांचे घोडे पाण्यावर आले असता पाणी न पीत त्यांस मोगली लोकांनी म्हणावे जे, पाण्यामध्ये धनाजी व संताजी दिसतो की काय ?" रसद तोडणे, खजिने लुटणे, छापे घालणे हे तर धनाजीने व दादोमल्हार प्रभृति त्याच्या सहकाऱ्यांनी केलेच. पण औरंगजेब साताराला वेढा घालून बसला असता धनाजीने बेगमपूरच्या त्याच्या छावणीवरच हल्ला चढविला. मिरजेला त्याचा मुक्काम असता खुद्द त्याच्याच छावणीवर धनाजी चालून आला. विशाळगडाहून परत येत असता पावसाने व पुराने गांजलेल्या औरंगजेबाच्या

फौजवर मराठ्यांनी तुटून पडून जी लांडगेतोड केली ती वाचली म्हणजे औरंग-जेबाची सुद्धा क्षणभर कीव आल्याशिवाय राहत नाही. त्याचप्रमाणे शत्रूला आपणामागे पळवून पळवून दमविण्याचे तंत्रही मराठ्यांनी या वेळी उत्तम प्रकारे वापरले. राणोजी घोरपडे व धनाजी जाधव यांनी झुलिफकारखानाला या वेळी आपल्या मागे दोन हजार मैल पळायला लावले. "त्यांस कसे जिंकावे ? एक्या मुलकात फौज आली म्हणोन त्यांजवर रवानगी करावी, तो दुसरीकडे जाऊन ठाणी घेतात. मुलूख मारितात. हे आदमी नव्हत, भूतखाना आहे!" असे औरंग-जेब रडकुंडीस येऊन म्हणाला. हे यश गनिमी काव्याचे होय.

या वेळी राज्य करणारी ताराबाई ही राज्य राखावे कसे हेही जाणत होती. गनिमी काव्याचे तंत्र तिने किती आत्मसात् केले होते हे तिचेच उद्‌गार वाचले म्हणजे सहज समजू शकते– "औरंगजेब विशाळगडास बिलगला याजकरिता त्याचे कबिला बाड मारून हमेशा गोटावर हल्ले करावे, तरीच तो बलकुबल राहतो. औरंगजेब गनीम दगेखोर आहे" पण मराठ्यांच्या युद्धनीतीला या वेळी तिने आणखी दोन गोष्टींची जोड दिली व तिचा पाया व्यापक व मजबूत केला. "शत्रूचा शत्रू तो आपला मित्र" हे राजनीतीतले सनातन तत्त्व आहे. विजापूर व गोवळकोंडा यांच्याशी मैत्रीचा तह शिवाजीमहाराजांनी याच दृष्टीने केला होता की, "दक्षिणियांची पातशाही दक्षिणियांचे हाती राहे." महाराजांच्या नंतर संभाजाने तो पुढे चालविला आणि विजापूर व गोवळकोंडा नष्ट झाल्यावर वाकिणखेड्याच्या बेडरांशी संगनमत करून ताराबाईने तीच परंपरा पुढे चाल-विली. या बेडरांनी बादशहाला कसे खडे चारले हे प्रसिद्धच आहे. दुसरे असे की औरंगजेब दक्षिणेत मराठ्यांचे किल्ले घेण्याच्या नादी लागून एकाएका किल्ल्या-पुढे सहा सहा महिने बसू लागला तेव्हा ताराबाईने गुजराथ व माळव्यावर स्वारी केली. दक्षिणेत ह्या किल्ल्यांचे मागे पळताना हातची उत्तर गमाविण्याची औरंग-जेबावर वेळ आली.

ताराबाईची कारकीर्द ही बऱ्याच मोठ्या प्रमाणात किल्ल्यांची कारकीर्द आहे. किल्ल्यांनी या स्वातंत्र्ययुद्धात बजाविलेल्या कामगिरीचा उल्लेख केल्याशिवाय मराठ्यांच्या युद्धनीतीचे विवेचन पूर्ण होणार नाही. शकुनाचा किल्ला म्हणून १६८२ साली रामसेजच्या किल्ल्याला वेढा घालून औरंगजेबाने महाराष्ट्र विज-याच्या आपल्या मोहिमेचा शुभारंभ केला आणि १७०४ मध्ये तोरणा घेऊन महाराष्ट्रापुरते व आपल्या जीवितापुरते त्या मोहिमेचे सूप वाजविले. या प्रदीर्घ काळात जिंकून घेतला तो तोरण्यासारखा एखादा किल्ला. बाकी रामसेजपासून राजगडापर्यंत किल्ल्याला वेढा घालून बसावे; किल्ल्यातल्या मराठ्यांनी व बाहेरच्या मराठ्यांनी छापे घालून बादशाही फौजेची लांडगेतोड करावी, रसद मारावी, खजिने लुटावेत व अखेर पैशाची लाच देऊन बादशहाने किल्ला घ्यावा,

आणि बादशहाने तो धनधान्याने समृद्ध केला की मराठ्यांनी तो परत घ्यावा ही औरंगजेबाच्या दुर्गयात्रेची चित्तरकथा होती. एवढा बलाढ्य आणि जिद्दीचा माणूस पण अखेर टेकीस आला हे कर्तृत्व किल्ल्यांचे होय. सर्व व्यसनांपासून मुक्त असलेल्या शिवाजीमहाराजांना किल्ले बांधण्याचे एकच व्यसन होते. "किल्ले बहुत झाले. विनाकारण पैका खर्च होतो"– असे हितचिंतक म्हणाले तेव्हा महाराज म्हणाले– "दिल्लीन्द्रासारखा शत्रु उरावर आहे. तो आला तरी नवे जुने तीनशे साठ किल्ले हजरतीस आहेत. एक एक किल्ला वर्ष वर्ष लढला तरी तीनशे साठ वर्षे पाहिजेत. किल्ल्याच्या योगाने औरंगशहा सारख्याची उमर गुजरून जाईल." महाराजांची अर्थभारवती भविष्यवाणी खरी ठरली. "संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग" हे त्यांचे महावाक्य प्रचितीस आले.

सत्तावीस वर्षे चाललेल्या या स्वातंत्र्ययुद्धात गनिमी काव्याच्या या तंत्राने मराठ्यांनी औरंगजेबावर मात केली.

परंतु, हे विधान पूर्ण सत्य नाही. अर्धसत्य आहे. कारण गनिमी काव्याचे तंत्र हे मराठ्यांनी या स्वातंत्र्ययुद्धात काही नव्याने शोधून काढले होते असे नाही. यापूर्वी शिवाजीमहाराजांनी हेच तंत्र वापरले होते. शायिस्ताखानावर छापा त्यांनी रात्रा घातला होता. पन्हाळा मध्यरात्री घेतला होता. माहुलीला पराजय झाला तेव्हा पळ काढला होता व संधि सापडली तेव्हा पुन्हा अंधाऱ्या रात्री हल्ला करून काबीज केला होता. त्यांच्यापूर्वी शहाजीने खानजमानशी लढताना कोकणात हेच तंत्र वापरले होते. "कुंभ्याच्या घाटाने कोकणात उतरून, जमान खोपवलीच्या रानातून पुढे येतो न येतो तोंच त्याला उजव्या बाजूस टाकून, पाल, जांबूळपाडा, खालापूर, कल्याण या रस्त्याने शहाजी मुरंजनास पोचला...जमानच्या दुप्पट वळण घेऊन, शहाजी जमानच्या निमपट वेळात माहुलीस जाऊन पोहोचला यात त्याचे व त्याच्या मावळी सैन्याचे गतिकौशल्य व्यक्त होते." माहुलीत शिरल्यावर शहाजी जमानचा बाप होऊन बसला. कोकणातली मुसळधार बरसात, त्यात माहुलीच्या रानातील किर्र झाडी, तीत उघड्यात वेढा देऊन दुर्दैवी जमान बसला. पाखरांच्या पाखांवर ( म्हणजे पंखांवर )पावसाळ्यात जेथे शेवाळ उगवते, तेथे देसोर माणसांच्या अंगावर बुरशी चढल्यास नवल काय ? जमानचे या मोहिमेत पराकाष्ठेचे हाल झाले." (राजवाडे – राधामाधव विलास चंपू, प्रस्तावना)शहाजीच्या पूर्वी शिर्क्यांनी खेळण्याच्या जंगलात मलिकुत्तुजारचा काटा अशाच प्रकाराने काढलेला होता. तेव्हा हे तंत्र नवे असे नव्हते.

महाराष्ट्रात डोंगर दऱ्या फार, त्या भूरचनेचा परिणाम म्हणून हे तंत्र अस्तित्वात आले हे म्हणणेही तितकेसे खरे नाही. कारण दऱ्या डोंगराचे वरदान केवळ महाराष्ट्रालाच मिळाले आहे असे नाही. निःपक्षपाती परमेश्वराने राजस्थानालाही ते वरदान दिलेले आहे. इतके असून मराठ्यांची युद्धपद्धति राजपुतांच्या

युद्धपद्धतीपेक्षा अगदी वेगळी आहे. उदयपूरचे राजे लवापासून आणि जयपूरचे राजे कुशापासून आपली उत्पत्ति समजतात म्हणून या रघुवंशाचा मूळपुरुष जो सूर्य त्याच्या उपासनेचे महत्त्व राजपुतांत फार आहे. शहरात प्रवेश करण्याचा प्रमुख दरवाजा 'सूर्यपोळ,' राजवाड्यातील प्रमुख दिवाणखाना 'सूर्यमहाल', राजवाड्यातील सर्वांत उंच गोपुर 'सूर्यगोपुर' अशा प्रकारे व्यवहारातल्या उंच व महत्त्वाच्या ठिकाणाशी त्यांनी सूर्याचे नाव जोडून टाकले आहे. याच न्यायाने राजपूत वीरांची जीवनातली सर्वांत उच्च महत्त्वाकांक्षा म्हणजे मेल्यानंतर सूर्यलोकास जाऊन पोचण्याची होय. हे धन्य मरण फक्त दोघांच्या वाट्याला येते. योगयुक्त संन्यासी आणि धारातीर्थी पाठ न दाखविता प्राणार्पण करणारा वीर. "द्वाविमौ पुरुषौ लोके सूर्यमण्डलभेदिनौ । परिव्राड् योगयुक्तश्च रणे चाभिमुखे हतः ॥" यामुळे 'मारिता मारिता मरावे' हे राजपूत युद्धनीतीचे सूत्र आहे. त्याचप्रमाणे स्त्रीदाक्षिण्य व हाती आलेल्या शत्रूला औदार्याने वागविणे हेही. मराठ्यांची युद्धपद्धति अगदी वेगळी आहे. चिमाजी अप्पा म्हणतो, त्याप्रमाणे "दक्षिणी फौज म्हणजे मऊ लागले म्हणजे बेजरब खणावयाचे; कठीण लागले म्हणजे फिरोन पाहणे नाही." किंवा भाऊसाहेबांचा बखरकार म्हणतो त्याप्रमाणे "उत्तम प्रकारे गाठ पडिली तरी झुंज द्यावे, नाही तरी पळोन जावे, हा मराठी धर्म पुरातन चालत आला आहे. तेणे करूनच पृथ्वीस पालाण घातले होते–" याचा अर्थ मराठे शौर्यात कमी होते असे नाही. शूर होते म्हणून तर त्यांनी राज्य स्थापिले व तीस वर्षे झुंज घेतली. पण शौर्याच्या त्यांच्या कल्पना रजपुतांपेक्षा निराळ्या आहेत. त्याचप्रमाणे सौजन्य व स्त्रीदाक्षिण्य यांनाही ते पारखे नाहीत. एवढ्या प्रदीर्घ संग्रामात मराठ्यांनी शत्रूकडच्या स्त्रियांना हीन रीतीने वागविल्याचे उदाहरण सामान्यतः आढळत नाही. उलट साताराचा किल्लेदार हंबीरराव याच्यासारखीच उदाहरणे बहुसंख्येने आहेत– "हंबीररावाने मोगलांच्या फौजेवर हल्ला केला. रुस्तुमखानाच्या बायका आणि कुटुंबातील इतर स्त्रियांनी हे संकट पाहून खंजीर हातात घेऊन आत्महत्त्या करण्याचा बेत केला. पण हंबीररावाने ओरडून सांगितले की, "रुस्तुमखान जिवंत आहे. मी तुमच्यावर हल्ला करीत नाही. तुम्ही आत्महत्येचा विचार करू नका." बहुसंख्येने म्हणण्याचे कारण इतकेच की, अशा उज्ज्वल स्त्रीदाक्षिण्याला, व "परमुलखांत पोर बायका न धरावी" या शिवाजीमहाराजांच्या उदात्त तत्त्वाला हरताळ फासणारेही उदाहरण आहे व ते संभाजीच्या कारकिर्दीतले आहे– "हजार घोडदळ व तीन हजार पायदळ साष्टमध्ये शिरले. येथील चर्चमध्ये दोनशे स्त्रिया होत्या. मराठ्यांनी त्यांच्याजवळ असलेल्या सर्व वस्तु काढून घेतल्या. मराठा सैनिकांनी त्यांच्यावर खूप अत्याचार केला. म्हणून काही स्त्रियांनी विहिरीत उड्या टाकल्या तर काहींनी जाळून घेतले." असले उदाहरण एखादेच व तेही अपवादादाखल.

पण एखादा असला व अपवाद असला, तरी तो आपल्याविरुद्ध असला, तर तोही सांगणे भाग आहे. असा एखादा अपवाद सोडला तर मराठ्यांपाशी रजपुतांइतकेच स्त्रीदाक्षिण्य आहे; आणि पाडाव झालेल्या शत्रूला सौजन्य तर सर्वच मराठ्यांनी दाखविले आहे. एवढा कर्दनकाळ संताजी घोरपडे, पण हाती सापडलेल्या अलीमर्दानखान, खानाजादखान अशा सरदारांना क्रौर्याने तर राहोच पण अपमानाने सुद्धा त्याने वागविल्याचे एकही उदाहरण नाही. दोड्डेरीच्या वेढ्यानंतर मोगल शरण आले तेव्हा संताजीने निरोप पाठविला– "किल्ल्यातील लोकांनी काही भय न बाळगता बाहेर यावे. कुणापाशी काही चीजवस्तु असल्यास त्याला कोणत्याही प्रकारचा उपसर्ग होणार नाही. त्यांनी हव्या त्या जिनसा माझ्या लष्करातून विकत घेण्यास माझी परवानगी आहे."

आता प्रश्न असा आहे की, शौर्य तेच, स्त्रीदाक्षिण्य तेच, शत्रूशी सौजन्य तेच, स्वातंत्र्याची ईर्षा तीच व हिंदुत्वाचा अभिमानही तोच, असे असता राजपूत व मराठे यांच्या युद्धनीतीतला नेमका फरक कोणता? त्याचे उत्तर हेच की शौर्य, दाक्षिण्य, सौजन्य, दया यांना पडणाऱ्या व्यवहाराच्या मर्यादाबाबत मराठे सदैव सावध आहेत. सद्‌गुणांचा अतिरेक म्हणजेच दुर्गुण अशा प्रकारची सद्‌गुणविकृति त्यांच्या युद्धनीतीत आढळत नाही. महंमद घोरीला अकरा वेळा जिवंत सोडून देणारे पृथ्वीराज चव्हाण रजपुतात अनेक झाले; प्रतापराव गुजराने उमराणीवर बहलोलखानाच्या बाबतीत तो प्रेमाचा प्रयोग केला मात्र, शिवाजीमहाराजांनी त्याला 'सला काय निमित्य केला' म्हणून करकचून कानपिचक्या दिल्या. अशा या युद्धनीतीचे मूळ मराठ्यांच्या उदात्त तत्त्वज्ञान व कठोर व्यवहार यांच्या बरोबर सुवर्णमध्य साधणाऱ्या, त्यांच्या प्रदेशातल्या हवेप्रमाणेच समशीतोष्ण असणाऱ्या त्यांच्या स्वभावरचनेत सापडणे शक्य आहे. मराठ्यांच्या या स्वभावाचे वर्णन मराठी अस्मितेचा उद्‌गाता असलेल्या तुकारामाने केले आहे, त्यापेक्षा यथार्थ वर्णन कोण करू शकेल?

मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास । कठीण वज्रासी भेदू ऐसे ॥
भले तरी देऊ कासेची लंगोटी । नाठाळांचे काठी देऊ माथा ॥
मायबापाहूनी आम्ही मायावंत । करूं घातपात शत्रूहूनी ॥
अमृत तें काय गोड आम्हांपुढे । विष तें बापुडें कडू किती ॥
दया तिचे नाव भूतांचे पालन । आणिक निर्दलन कंटकांचे ॥

म्हणून मराठ्यांचा गनिमी कावा हा त्यांच्या उदात्त पण सावध स्वभावाचेच युद्धशास्त्रात पडलेले प्रतिबिंब म्हटले पाहिजे. ते शिकायला कुठल्या शाळेत ते गेले नव्हते. त्याचे त्यांना बाळकडू मिळाले होते. 'पडिले वळण इंद्रियां सकळां' असा त्यांचा तो दुसरा स्वभाव बनला होता. तेव्हा मुद्दा हा आहे की, गनिमीकाव्याचा नित्य संबंध महाराष्ट्राच्या दुर्गम भूरचनेपेक्षा मराठ्यांच्या स्वभावरचनेशी आहे.

याचा अर्थ असा नव्हे, की गनिमी काव्याचे तंत्र शोधण्याचे श्रेय सर्वस्वी मराठ्यांना देता येईल. महाराष्ट्रात मराठ्यांची वसाहत होण्यापूर्वी 'महाभारत', 'मनुस्मृति' व 'शुक्रनीतिसार' या ग्रंथांत 'धर्मयुद्ध' व कूटयुद्ध ऊर्फ 'वृकयुद्ध' या दोन युद्धपद्धतींचा उल्लेख व विवेचन आढळते. त्यापैकी धर्मयुद्ध पद्धत ही रजपुतांची व कूटयुद्ध पद्धत ही मराठ्यांची म्हणता येईल. दोन्ही पद्धतींचा उद्देश एकच आहे– 'धर्मयुद्धैः कूटयुद्धैर्हन्यादेव रिपुं सदा'– धर्मयुद्धाने म्हणा की कूटयुद्धाने म्हणा, शत्रूचा नाश केलाच पाहिजे. 'धर्मयुद्धे तु कूटे वै न सन्ति नियमा अमी। न युद्धं कूटसदृशं नाशनं बलवद्रिपोः ॥' कूटयुद्धात धर्मयुद्धासारखे नियम नाहीत. प्रबल शत्रूचा नाश करण्यासाठी कूटयुद्धासारखे साधनच नाही. 'क्षणं युद्धाय सज्जेत क्षणं चापसरेत् सदा। अकस्मान्निपतेत् दूराद्दस्युवत् परितः सदा ॥" 'शत्रूवर अचानक एकाएकी दुरून आलेल्या चोराप्रमाणे हल्ला करावा व क्षणात हल्ला करून पलायन करावे.' हे वर्णन मराठ्यांचेच आहे असे वाटते. कारण औरंगजेब मराठ्यांना 'चोर'च म्हणत असे. तात्पर्य हे आहे की, गनिमी काव्याचे तंत्र मराठ्यांनी शोधले नाही. ते महाभारताइतके जुने आहे. मराठ्यांच्या स्वभावाला ते रुचले व परिस्थितीला परवडले म्हणून त्यांनी ते उचलले इतकेच.

पण केवळ या गनिमी काव्याच्या तंत्राने मराठ्यांनी औरंगजेबावर मात केली हे म्हणणे टिकणारे नाही. कारण मराठे अस्तित्वात आले तेव्हापासून कर्णाच्या कवचकुंडलाप्रमाणे हे तंत्र त्यांच्यापाशी होतेच. पण तरीही ते पाचशे वर्षे बहमनी सुलतानांचे व दिल्लीच्या मोगलांचे गुलामच राहिले. इतकेच नव्हे तर हे तंत्र वापरून आदिलशाहीतले बाजी घोरपडे व निजामशाहीतले मलिकंबराच्या फौजेतले मराठे पादशाहीची सेवा बजावीत होते. मग आजच असे काय घडले, की स्वातंत्र्यरक्षणाच्या कामात हे तंत्र प्रभावी ठरले?

मंत्राशिवाय केवळ तंत्र पंगु आहे. तंत्र हे शरीर आहे. मंत्र हा आत्मा आहे. तंत्र ही तलवार आहे. मंत्र ही तलवारीची मूठ आहे. गनिमी काव्याचे तंत्र मराठ्यांपाशी पूर्वीचे होतेच. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली आणि त्या तंत्राला 'हे महाराष्ट्र राज्य आहे.' 'हे देवाब्राह्मणाचे राज्य आहे.' या 'हिंदवी स्वराज्या'च्या महामंत्राची जोड दिली. त्या तंत्रात राष्ट्रभावनेचा प्राण ओतला; आणि गनिमी कावा हे तंत्र आणि हिंदवी स्वराज्य हा मंत्र असा अपूर्व संयोग झाल्यावर पर्वताची शकले करणाऱ्या इंद्राच्या वज्राप्रमाणें मराठ्यांचा गनिमी कावा औरंगजेबाला भारी ठरला, असा या एकंदर विवेचनाचा निष्कर्ष आहे.

हे लोकयुद्ध तर खरेच. कारण हे लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालविलेले युद्ध होते. मराठी जनता हीच या युद्धातली नायिका होती, नेती होती व अनुयायी होती. प्रत्येक घर हा किल्ला होता व प्रत्येक माणूस हा सैनिक होता, सेनापति

होता. संताजी घोरपडे, हंबीरराव मोहिते, धनाजी जाधव, नेमाजी शिंदे, ताराबाई, संभाजी असे नाव घेण्यासारखे सेनापति मराठ्यांपाशी होते हे खरे; पण खरे म्हणजे हे राज्य माझे आहे, मला त्याचे रक्षण केले पाहिजे या मंत्राने भारलेला प्रत्येक मराठी माणूस हा स्वयमेव सेनापतीच होता. सेनापतीप्रमाणे ती अंतरंगातील जिवंत राष्ट्रभावना आणि धर्मभावनाच त्याचे मार्गदर्शन करीत होती. त्यामुळे एका व्यक्तीवर मराठे कधीच अवलंबून राहिले नाहीत. ते असतानाही प्रत्येकाच्या कल्पनाशक्तीस, नेतृत्वास व कर्तृत्वास भरपूर वाव मिळत होता. संभाजी मारला गेला, संताजीचा खून झाला, तरी मराठे मोडले नाहीत याचे रहस्य हे आहे. राजारामाच्या नेतृत्वाखालील या मराठी फौजेला चिटणीस 'रामसेना' म्हणतो आणखी एक समकालीन कवि ' रामफौजा ' म्हणतो या रामसेनेत म्हणजेच लोकसेवेत कोण होते याचे त्या कवीने वर्णन केले आहे, ते वाचले म्हणजे मराठ्यांचे हे लोकयुद्ध होते हे विधान पटल्याशिवाय राहत नाही.–

'पाटील सुटे कुणबी धूलाई । चांभार कुभार परीट न्हावी ।
सोनार कोली उदमी फुलारी । या वेगळे लोक किती बिगारी ॥

मराठ्यांचे सैन्यबळ किती आणि मोगलांचे सैन्यबळ किती, हा प्रश्न याचमुळे काहीसा अप्रस्तुत आहे. कारण, मराठ्यांच्या सैन्यांची मुळे त्यांच्या भूमीत खोल गेली होती. युध्यमान सैन्याप्रमाणेच त्याच्यामागे उभ्या असलेल्या अदृश्य जनतेची गणना सैन्यातच केली पाहिजे. कारण एका सैन्यामागे दहा नागरिक असतात. म्हणून मराठ्यांची सैन्यसंख्या नक्की सांगता येत नाही, हाच त्याचा गुण आहे. शिवाजी महाराजांच्या मृत्यूच्या वेळी एक लक्ष पायदळ व एक लक्ष पाच हजार घोडदळ होते. संभाजीच्या कारकिर्दीचे आकडे अनिश्चित व वेळोवेळी बदलले आहेत. बऱ्हाणपुरावर संभाजीने छापा घातला, तेव्हा त्याच्याजवळ तीस हजार सैन्य होते; फोंड्यावर स्वारी केली तेव्हा पंधरा हजार, कल्याण भिवंडी स्वारीच्या वेळी सात हजार घोडदळ, आठ हजार पायदळ, हंबीरराव मोहित्याने कोल्हापूरला तळ दिला तेव्हा वीस हजार घोडदळ, संताजी घोरपडे व केशव त्रिमल यांच्याबरोबर जिंजीस पाठविले ते बारा हजार घोडदळ असे निरनिराळे आकडे उपलब्ध आहेत. पण त्यावरून सम्यक् चित्र डोळ्यांपुढे उभे राहत नाही. तीच गोष्ट राजारामाच्या कारकिर्दीची. संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांच्याबद्दल खाफीखान म्हणतो "त्यांच्यापाशी पंधरा वीस हजारांच्या जंगी फौजा होत्या." ताराबाईच्या कारकिर्दीत झुल्फिकारखान मराठ्यांच्या पाठलागावर होता. १७०२ साली झुल्फिकारखानाचे सैन्य अडीच हजारांपेक्षा अधिक नव्हते. खानदेश व माळवा येथे मराठे पसरले होते. ते त्या भागातील जमीनदारांना मिळाले व त्या सर्वांची मिळून जवळ जवळ साठ हजार फौज तयार झाली. ते सर्व झुल्फिकारखानाशी लढण्यास प्रवृत्त झाले. मराठ्यांच्या सैन्य बळाबाबत भीमसेन म्हणतो ते फार बरोबर आहे. "या सुमारास

(स. १७०२) नर्मदेच्या दक्षिणेस, दख्खन, खानदेश, वऱ्हाड, कोकण या प्रांतांतील परगण्यातून आणि खेड्यातून सारांश सर्वत्र मराठे हे टोळ आणि मुंग्या याप्रमाणे पसरले होते." भीमसेनाचे हे म्हणणे औरंगजेबाच्या अखेरच्या पत्रातील उल्लेखाशी आश्चर्यकारक रीत्या जुळते " शिवा व त्याचे मुलगे जिवंत असेपर्यंत त्यांच्यापाशी बारा हजाराहून अधिक स्वार असल्याचे ऐकिवात नव्हते, आणि आता आम्हांला पुन्हा पुन्हा कळविण्यात येते की, हलकट गनिमांची वीस वीस, चाळीस चाळीस हजारांची सैन्ये सर्वत्र पसरली आहेत. आमच्यासमोर येणारी बातमीपत्रे पाहता या प्रतिस्पर्ध्यांचे सैन्य दोन लाख स्वारांपर्यंत जावे. हे प्रकरण म्हणजे एक गूढ आहे." औरंगजेबाला जे गूढ वाटले, त्याचा साधा अर्थ हा होता की मराठी सेना व मराठी जनता यांचे या स्वातंत्र्ययुद्धात संपूर्ण ऐक्य झाले होते; नांगराच्या फाळाच्या तलवारी झाल्या होत्या. ते लोकयुद्ध झालेले होते.

याच्या उलट औरंगजेबाची स्थिति होती. खडकावर टाकलेले बी रुजू शकत नाही, त्याप्रमाणे त्याचे सैन्य महाराष्ट्राच्या खडकाळ भूमीत रुजू शकले नाही. शरीरात गेलेला परकीय विजातीय विषारी पदार्थ शरीरात टिकू शकत नाही. शरीरातील यंत्रणा त्याच्याविरुद्ध बंड करते व खळबळ माजवते व अखेर उलटीच्या वाटेने त्याला घालवून देते, तसे त्याच्या सैन्याचे झाले. त्यामुळे कागदोपत्री त्याचे सैन्य मराठ्यांच्या सैन्यापेक्षा जास्त असले तरी वस्तुत: कमीच होते. त्याचे सैन्य प्रचंड असले तरी मर्यादित होते व मोजता येत होते. मराठ्यांचे अमर्याद होते. १६९५ साली डॉक्टर करेरीने प्रत्यक्ष पाहून लिहिले की, "बादशहाची लढाऊ फौज साठ हजार स्वार व एक लाख पायदळ, ओझ्याकरिता पन्नास हजार उंट व तीन हजार हत्ती इतकी होती. त्याचा दुसरा अंदाज तीन लाख स्वार व चार लाख पायदळ असा होता. अनेक इतिहासकारांच्या मते फक्त फौजेचीच संख्या चार लाख होती. औरंगजेबाचे दुर्दैव असे की त्याच्या फौजेत कोणालाच हे युद्ध आपले असे वाटत नव्हते, त्यांना तो बादशहाचा खाजगी कौटुंबिक व्यवहार वाटे. हिंदुस्थानचे राज्य म्हणजे औरंगजेबाची वडिलोपार्जित मालमत्ता आहे व एखादा जमीनदार जशी आपल्या इस्टेटीची व्यवस्था पाहतो, तसा औरंगजेब त्या इस्टेटीची व्यवस्था पाहात होता; त्याचे बरे वाईट तो त्याच्या कुटुंबाचा विचार आहे, आपला नव्हे अशी सामान्य भावना होती. आणि औरंगजेबाच्या कुटुंबातली माणसे या युद्धात खपत होती, ती पाहिली म्हणजे हे विधान खरे वाटू लागते. खुद्द औरंगजेब त्याची तीन मुले, मुअज्जम, (कोकण स्वारी), आझम (सातारा-परळी मोहीम) कामबख्श (जिंजी), नातू मुइजुद्दीन (पन्हाळा वेढा), नातू बेदरबख्त (विशाळगडचा वेढा), शायिस्ताखानाचा मुलगा खुदाबंदाखान (साताऱ्याचा वेढा), मावशीचा नवरा वजीर आसदखान (जिंजी), मावस भाऊ झुल्फिकारखान (सर्वत्र), मावस भाऊ बख्शी बहरामदखान, मावस बहिणीचा मुलगा बख्शी रुहुल्लाखान, दुसऱ्या

मावस भावाचा मुलगा मरहमतखान, (चाकणची स्वारी), दूधभाऊ बहादुरखान (रामसेजचा वेढा), त्याचा मुलगा हिंमतखान (बसवापट्टणची लढाई), अशी ही सोळा लोकांची श्रेयनामावली आहे. औरंगजेबाने कुटुंबातली माणसे कारभारात घेतली, येवढ्याबद्दलच त्याला दोष देण्याचे कारण नाही. कारण बादशहाचे नातेवाईक म्हणून जन्माला येणे हा काही अपराध नाही. कोणीही झाले तरी आपल्या परिचयातली माणसेच पहिल्यांदा नेमणार. संताजी घोरपडे व धनाजी जाधव व हंबीरराव मोहिते हेही शिवाजीमहाराजांचे नातेवाईकच होते. औरंगजेबाचे अपयश हे होते की या कुटुंबातल्या माणसांतही तो या युद्धाबद्दल आत्मीयता निर्माण करू शकला नाही. त्यांनाही हे युद्ध आपले वाटले नाही. औरंगजेबाचे वैयक्तिक वाटले.

याचे मूळ औरंगजेबाच्या स्वभावात होते. औरंगजेब हा अति उद्योगी मनुष्य होता. मोहिमेच्या योजना तो आखी, लढाईचे नकाशे तो तयार करी, नेमणुका तो करी, बारीकसारीक हुकुमही तोच देई, स्वतःच्या हाताने लिही, लहानशा कारकुनाची नेमणूकही त्याच्या हस्तेच होई. हा उद्योगीपणा प्रशंसनीयच आहे हे खरे, परंतु कोणत्याही सद्‌गुणाचा अतिरेक हा दुर्गुण होतो, या न्यायाने औरंगजेबाचा हा अति उद्योगीपणा त्याच्या सैन्याला वरदान न होता शाप होऊन बसला. कारण, बादशहा सारे काम स्वतःच झपाट्याने आटपून टाकीत असल्यामुळे त्याच्या नोकरांना करण्यासारखे कामच राहिले नाही. राज्यकर्त्याचा मुख्य उद्योग इतरांना उद्योग करायला लावणे हा आहे. हाताखालच्या लोकांकडून काम करून घेणे हेच त्याचे प्रमुख काम आहे. पण सारी कामे करून टाकण्याच्या नादात हेच मुख्य काम औरंगजेब विसरला. त्याचे कारण स्वतःबद्दल फाजील विश्वास व दुसऱ्याबद्दल फाजील अविश्वास. त्यामुळे त्याच्या लोकांचा हिरमोड झाला, त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्याला व विकासाला वावच राहिला नाही. औरंगजेबाचे सारे सेनापति आपापल्या परीने कर्तबगारच होते, पण झाडाखाली झाड वाढू शकत नाही, त्याप्रमाणे औरंगजेबाच्या दडपून टाकणाऱ्या सावटाखाली कोणीही वाढू शकले नाही. 'राजा बोले दळ हाले' या म्हणीचे अत्यंत विकृत स्वरूप त्याच्या सैन्याला प्राप्त झाले. मराठ्यांशी तुलना करिता औरंगजेबाचे सैन्य ही यांत्रिकता Mechanism होती तर, मराठ्यांचे सैन्य जिवंत पेशींचे Organism होते असे म्हणता येईल. औरंगजेबाच्या सैन्याची प्रचंड व जगड्व्याळ यंत्रणा यंत्राप्रमाणेच यांत्रिक व निर्जीव होती. तिचो मुख्य कळ औरंगजेब होता. सत्यवानाच्या शरीरातून "अङ्गुष्ठमात्रं पुरुष निश्चकर्ष यमो बलात्" असा अङ्गुष्ठमात्र पुरुष यमाने बाहेर काढल्यावर तो जसा निश्चेतन झाला, त्याप्रमाणे मोगल सैन्यातून औरंगजेबासारखा अंगुष्ठमात्र पुरुष निघून गेला रे

गला की त्या सैन्याचे चलन वलन थांबले, हातपाय काष्ठासारखे थंडगार पडले. या उलट मराठ्यांचा वृक्षाप्रमाणे जीवनरसाने थबथबलेल्या जिवंत पेशीमध्ये असलेला आत्मा सर्वव्यापी, सर्वरस, सर्वस्पर्श, सर्वगंध होता. त्यामुळे एक मराठा मेला, एक संभाजी मेला, एक संताजी मेला, तरी मराठे मेले नाहीत.

निसर्गक्रमाने म्हणा कीं युद्धप्रसंगाने म्हणा, औरंगजेबाचे सारे कर्तृत्ववान् सेनापति एकामागून एक मरण पावले. मुकर्रबखान, बहादुरखान, फिरोजजंग, रुहुल्लाखान, बख्शी बहरामंदखान हे औरंगजेबाच्या हयातीतच आजारी पडून मेले. खानेआलम, तरबियतखान, आझम, कामबख्श, दलपत बुंदेला हे जाजूच्या लढाईत मारले गेले. झुल्फिकारखान व आसदखान यांना फर्रुखसेयरने गळा दाबून ठार मारले. पण खरी गोष्ट अशी आहे की, औरंगजेब असतानाच हे असून नसल्यासारखे होते. माटे यांनी 'सगाजीबोवा' नावाचे सुंदर व्यक्तिचित्र लिहिले आहे. सगाजी शंभर वर्षे जगला व मेला. सामाजिक उपेक्षेमुळे येवढे प्रचंड जोवन वाया गेले. त्या उपेक्षिताच्या अंतरंगाची ती शोकांतिका वर्णन करताना माटे दुःखाने लिहितात "सगाजी असताना नसल्यासारखा होता. आता नसल्यावर तर तो नसणारच." औरंगजेबाचे सारे सेनापति अशा प्रकारे 'सगाजीबुवा' होऊन बसले होते. या दुरवस्थेला औरंगजेब स्वतःच जबाबदार होता. एरवी फार चांगला, पण ज्या त्या कामात ढवळाढवळ करण्याची मोठी खोड त्याच्या स्वभावात भरली होती. या त्याच्या खोडकर स्वभावामुळे 'भीक नको पण कुत्रा आवर' अशी त्याच्या उद्योगी स्वभावाबद्दल त्याच्या सेनेची स्थिति होऊन बसली. औरंगजेबाचा समकालीन असलेला इंग्रज कवि ड्रायडन याने औरंगजेबावर Aurangzeb याच नावाचे नाटक लिहिले आहे. त्यात औरंगजेबाच्या तोंडी घातलेले शब्द त्यालाच फार उत्तम रीतीने लागू पडतात की 'such virtue is the plague of mankind. मोगल आणि मराठे या युध्यमान पक्षांच्या या अंतःप्रवृत्तीप्रमाणेच त्यांच्या सैन्यरचनेत व युद्धपद्धतीतही मोठा फरक होता. रात्री बेरात्री छापे घालणे, कही मारणे, लुटालूट करणे या गनिमी काव्याच्या तंत्राला प्राणभूत गोष्ट कोणती असेल तर विजेसारख्या चपळ लष्करी हालचाली होत, आणि या हालचाली सर्वस्वी सैनिकांच्या गतीच्या पल्ल्यावर, काटकपणावर आणि साधेपणावर अवलंबून असतात. मराठा सैनिकांची सेना म्हणज फक्त तिघांची बनलेली असे. तो सैनिक, त्याचा घोडा आणि त्याचा भाला. भाला हच मराठ्यांचे विशेष आवडते हत्यार असे. इतके की 'भालेराई गाजविणे' हा वाक्प्रचार किंवा 'भालेराव' यासारखी आडनावे यामुळे रूढ झाली असे समजणे वाजवी होईल त्या मराठा सैन्याचे वर्णन ग्रँटडफने केलेले आहे ते देण्यासारखे आहे. 'मराठ्यांचे सामानसुमान म्हटले म्हणजे थोडीशी कांदाभाकरी व एक घोंगडी येवढे काय ते असे रात्री कोठे उतरले तर ते घोड्याचे लगाम हातात धरूनच घोंगडी पसरून त्यावर काही वेळ अंग

टाकून राहत. त्याचप्रमाणे दिवसा दोन प्रहरी काही खाण्याकरिता किंवा ऊन टाळण्याकरिता ते उतरले, म्हणजे पांच पांच सहा सहा जण एखादे झाडझूड असले तर त्याचे छायेखाली पडलेले दृष्टीस पडत. परंतु, उघडे मैदानच असले तर ते जमिनीत भाले रोवून त्यास ते आपले घोडे बांधून भाल्याचे टोकावरून एखादी घोंगडी आडवी पसरून देत व तिच्या लहानशा छायेत फक्त डोकी ठेवून बाकी सर्व अंगास दुपारचे जबर ऊन लागत असताही, जमिनीवर घोरत पडलेले आढळत. आपल्या तरवारीस मात्र ते कधी विसरत नसत. त्या ते कुशीशी ठेवीत. त्याजवळ उंट, बैल वगैरे काही नसून फक्त लहान खुजी, चपळ व काटक अशी तट्टे असत. मिळालेली लूट त्यावर लादून ती ते फार जलदीने लांबवीत." मराठ्यांची तट्टे ही सह्याद्रि लगतच्या खडकाळ मुलुखात दौड करण्यास कसलेली देशी भिमथडी तट्टे होती. ही अत्यंत चपळ, काटक, व लांब मजला मारण्यात पटाईत होती. मराठा सैनिकांचा घोडा हा जीव की प्राण होता आणि त्याची योग्यताही तशीच होती. पानपतला पराभव झाल्यानंतर मराठा स्वारांची एक तुकडी रात्रीत पंचवीस मैलांची दौड करून सोनपतला पोचली व तिने सराईत मुक्काम केला. भाकरी खातात तो पाठीवर गिलचे आल्याची बोंब झाली त्याबरोबर मराठे निघू लागले. इतक्यात रक्षकाने सराईचे दरवाजे बंद केले. तेव्हा एका मराठा स्वाराने तटावरून उड्डाण करण्याचा निश्चय केला व घोडीला टाच दिली. तीही ससाण्याच्या वेगाने उडाली पण दुर्दैवाने तटावरच्या दोन दगडांच्या खाचेत अडकली व मेली. त्या मर्द घोडीच्या हाडांचा सांगाडा तटात अडकून राहिलेला इतिहासकार शामलूने स्वतः पाहिला होता. असे हे मराठ्यांचे घोडे. पुढे महादजी शिद्याने कवायती कंपू उभारले ती गोष्ट पुष्कळ मराठ्यांना बिलकुल आवडली नाही. या कवायती कंपूसाठी उज्जयिनीस कायम घरांची छावणी बांधण्याचा हुकूम दौलतराव शिद्याने गोपाळरावभाऊ चिटणीस याला केला. तेव्हा तो स्पष्टवक्ता साफ बोलला, "आपल्या वाडवडिलांनी राज्य स्थापिले त्यांस घोड्याच्या पाठीखेरीज दुसरे घर माहीत नव्हते. दिवसे दिवस ऐष आराम वाढून याचे ऐवजी तंबू आला. आता आपणास दगडामातीची घरे बांधण्याची बुद्धि होत आहे. पण थोड्याच काळात ही घरे धुळीस मिळणार नाहीत अशी खबरदारी घ्या म्हणजे झाले." दौलतराव तिरस्काराने हसला व म्हणाला, "माझी पायदळ पलटणे व तोफा आहेत तों माझ्याशी लढण्यास उभे राहण्याची कुणाची छाती होईल?" गोपाळरावभाऊ म्हणाला "हीच पलटणे व तोफा तुमच्या छातीवर बसतील." तात्पर्य, घोड्याकडे पाहण्याच मराठ्यांचा दृष्टिकोन हा असा होता. घोडदळ म्हणजे केवळ घोड्यावरच्या स्वारांचे दळ नव्हते. घोड्यांचे महत्त्व स्वारांइतकेच होते.

अशा तरतरीत, काटक व चपळ मराठ्यांशी तुलना करता, 'देखनेमें ढब्ब और चलनेमें शिवराई' अशा थाटाच्या मोगल सैन्याची कीव आल्याशिवाय राहात

नाही. ते काही कमी शूर होते असे नाही. एका जागी उभे राहून लढू लागले म्हणजे ते मरणालाही भात नमत. बंदुका, तरवारी, धनुष्यबाण, तोफखाना इत्यादि हत्यारेही ते बऱ्या प्रकारे वापरीत, पण त्यांचा मुख्य दोष हा होता की त्यांच्यात गतिचापल्य जवळजवळ नव्हतेच. खरे म्हणजे त्यांच्या कारकिर्दीचा आता उत्तरार्ध सुरू झाला होता आणि फार दिवसांच्या स्वास्थ्यामुळे ते सुस्त झाले होते. शास्त्रज्ञ सांगतात की, आयुष्याच्या उत्तरार्धात स्वास्थ्यामुळे शरीर स्थूल होते, हालचाल मंदावते, स्वास्थ्यच अस्वास्थ्याला निमंत्रण देते. म्हणून श्रीमंताने गरीबासारखे कष्ट करावे, साधे राहावे व साधे खावे प्यावे हा आरोग्याचा मार्ग आहे. व्यक्तीच्या शरीराप्रमाणे राष्ट्राच्याही आरोग्याला हे विधान अक्षरशः लागू आहे. तो मोगल साम्राज्याचा संस्थापक बाबर हा काबूलहून हिंदुस्थानात आला, त्या वेळी त्याला वाटेत जितक्या नद्या लागल्या तितक्या तो स्वतः पोहून गेला. दिवस-रात्र तो कित्येकदा घोड्यावर असे व ऐंशी कोसांची मजल दिवसाला मारी. त्याच्यासारखेच त्याचे सैन्य होते. पण त्या गोष्टी आता भूतकाळात जमा झाल्या होत्या. दोनशे वर्षे होऊन गेली होती आणि औरंगजेबाच्या सैन्यात दारूला न शिवणारा साधा शिपाईगडी फक्त औरंगजेब होता. त्याने महाबतखानाला शिवाजी महाराजांवर पाठविले त्या वेळी महाबतखानाच्या छावणीत चारशे अफगाण व पंजाबी नृत्यांगना होत्या. आज खुद्द औरंगजेब जागेवर असताना प्रत्येक सैनिक कमीजास्त प्रमाणात महाबतखानाचा कित्ता गिरवीत होता. सैन्य आळशी व मिजासी झाले होते. लष्कराचे पोषाख भारी किंमतीचे व अवजड होते. ते चढविण्यास वेळ जाई व श्रमही लागत. प्रत्येक लहानसा शिपाईसुद्धा आपल्या तंबूत शरीरसुखाची भरपूर तजवीज करून ठेवी. बायका, कारागीर, दुकानदार नोकरचाकर, गवई, नृत्यांगना वगैरे मंडळींचा छावणीत भरपूर भरणा असे. बाजारच अडीचशे असत. छावणीचा परीघ पांचपासून साडे सात मैल असे. अशी ही अगडबंब छावणी एका ठिकाणाहून उठून दुसरीकडे मुक्काम करी तेव्हा किती वेळ लागत असेल याची कल्पनाच करावी. आणि अशा या अजगरासारख्या छावणीवर जेव्हा मराठ्यांच्या टोळधाडी कोसळत, त्या वेळी त्यांना तोंड देणे व त्यांचा पाठलाग करणे दूरच, त्यांच्यापासून मोगल आपला बचाव कसा करीत असतील हा विचारही मनात आला तर क्षणभर का होईना, मोगलांच्या कट्ट्या शत्रूचेही हृदय कळवळल्याशिवाय राहिले नसते. अशा मोगलांवर मराठ्यांनी मात केली नसती तरच नवल.

'मोठेपणाचा मार्ग मरणाच्या मैदानातून जातो' असे गडकऱ्यांनी म्हटले आहे. त्याच न्यायाने असे म्हणता येईल की, वैभवाचा मार्ग वैराग्यातून जातो. 'साधी राहणी आणि उच्च विचारसरणी' हे उदात्त नीतितत्त्व आहेच; पण राष्ट्राला उच्च वैभवाला नेण्यासाठीसुद्धा साध्या राहणीशिवाय तरणोपाय नाही. 'कष्टे-

विण राज्य नाही । कष्टवीण फळ नाही । केल्यावीण होत नाही । काही जनीं ।' हे रामदासांनी सांगितलेले वचन मराठ्यांच्या गनिमी काव्याचेही तात्पर्य आहे. मराठे सुखाला भुलले नाहीत; त्यांनी कष्ट भोगले व दुःख सोसले म्हणून त्यांनी सुखाचे दिवस पाहिले. 'सुखं सुखेनेह न जातु लभ्यम् । दुःखेन साध्वी लभते सुखानि ।' म्हणून राजवाडे म्हणतात तेच खरे की "महाराष्ट्रातील लोकांच्या अंगी अनन्य सामान्यत्वेकरून एखादा जर कोणता गुण असेल तर तो त्यांच्या अंगचा काटकपणा हा होय. विलास आणि मराठा या दोन अर्थांची व्याप्ति मागेही कधी झाली नाही व पुढेही कधी होईल असा रंग दिसत नाही. साधी रहाणी व उच्च विचार हे दोन गुण मराठ्यांच्या स्वभावाचे मुख्य घटक होत. पैकी उच्च विचाराचा विसर मराठ्यांना मधून मधून कधी पडला असेल, परंतु साधी रहाणी मराठ्यांनी आजपर्यंत कधीही सोडलेली इतिहासास माहीत नाही."

अतिशयोक्ति हा अलंकार आहे आणि भूषण आहे, पण ते काव्यात; इतिहासात नव्हे. इतिहासात ते भूषण नसून दूषण आहे. कारण, इतिहासाचा केवळ अलंकारच नव्हे तर आत्मा आहे तो अतिशयोक्ति नव्हे तर स्वभावोक्ति होय. ती स्वभावोक्ति की जिची व्याख्या साहित्यकारांनी "स्वभावोक्तिरसौ चारु यथावद् रूपदर्शनम् ।" आणि जी क्रॉम्वेलने आपले चित्र काढू पाहणाऱ्या चित्रकाराला सांगितली की, 'Paint me as I am.' त्यामुळे मराठ्यांचे स्वातंत्र्यसमर हे जगाच्या इतिहासातील एकच नव्हे तर एकमेवाद्वितीय स्वातंत्र्ययुद्ध आहे असे आपण म्हटले तर आपल्या प्रादेशिक अस्मितेला कितीही सुख झाले, तरी ती कविता होईल; तो इतिहास होणार नाही. ते विधान सत्याच्या कसोटीवर टिकणारे नाही. कारण, मराठ्यांना परमेश्वराने म्हणा कीं निसर्गाने म्हणा, स्वातंत्र्यप्रेम दिले आहे तसेच त्याने ते इतर देशांनाही दिलेले आहे; आणि त्यांनीही आक्रमकांशी टक्कर देऊन आपले स्वातंत्र्य निष्कलंक राखलेले आहे. जगाच्या इतिहासात आजपर्यंत निरनिराळ्या काळी निरनिराळ्या देशांनी स्वातंत्र्ययुद्धे केलेली आहेत. ऑस्ट्रियन साम्राज्याविरुद्ध इटलीचे स्वातंत्र्यसमर मॅझिनी, गॅरिबाल्डी, काव्हूर हे लढले. मोगलांविरुद्ध शीखांनी १६७५ पासून १७०७ पर्यंत लढा दिला व पंजाब स्वतंत्र राखला. १९४१ ते ४३ पर्यंत जर्मनी-विरुद्ध रशिया लढला. १८१२ साली फ्रान्सविरुद्ध रशिया लढला; १९५५ ते ६२ पर्यंत फ्रान्सविरुद्ध अल्जीरिया, १९४६–५४ पर्यंत फ्रान्सविरुद्ध व्हिएटनाम, १९६० ते १९७२ पर्यंत अमेरिकाविरुद्ध उत्तर व दक्षिण व्हिएटनाम, १९३७ ते ४९ पर्यंत चिनी साम्यवादी कोमिन्टांग ही स्वातंत्र्ययुद्धे प्रसिद्ध आहेत. मराठ्यांचें स्वातंत्र्यसमर, जे शिवाजी महाराजांनी मोगल व आदिलशाहीविरुद्ध १६५७ मध्ये सुरू करून १६८० पर्यंत चालविले, व जे त्यांच्या मृत्यूनंतर औरंगजेबा-

विरुद्ध मराठ्यांनी १६८० ते १७०७ पर्यंत चालवून त्याची यशस्वी सांगता केली, ते जगात ह्या या फार थोड्या पण फार उज्ज्वल स्वातंत्र्यसमरांपैकी एक आहे की ज्याचे अस्तित्व हे त्या प्रदेशाचे भाग्य आहे, आणि अभिमान आहे; इतका की, इतर देशांनीही त्याचे आदराने अनुकरण, मनूने म्हटल्याप्रमाणे करण्यात धन्यता मानावी. "एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मन: । स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवा: ॥" "या देशात जन्मलेल्या ब्राह्मणांपासून वागावे कसे हे पृथ्वीतल्या सर्व माणसांनी शिकावे." किंवा रामचंद्रपंत अमात्यांच्या शब्दांत – "ज्या राज्याचा बदोबस्त यैसा होता जे इतर स्थलिकास व सकल मांडलिकांस व देशाधिकारी यांस आपले देशसंरक्षणाविषयी याच युक्तीचा आधार; या राज्यातील नीति व मर्यादा सर्वांनी सिकोन जाव्या." या विधानाचा पुरावा पाहण्यास फार दूर जाण्याची जरूर नाही. व्हिएटनामचे अध्यक्ष होचिमिन्ह हे १९७८ साली मे महिन्यात भारतात दौऱ्यावर आले असताना, त्यांच्याशी चर्चा करताना, व्हिएटनामच्या जनतेने अमेरिकेविरुद्ध जो चिवट लढा दिला, त्याविषयी गौरवपर बोलताना मोहन धारिया म्हणाले की, "तुमचा हा लढा पाहून आम्हांला शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याची आठवण होते." ते ऐकून होचिमिन्ह तात्काळ उत्तरले की, "तुम्ही म्हणता ते खरे आहे. आम्ही अमेरिकन सरकारबरोबर लढताना जे तंत्र निश्चित केले ते करताना शिवाजी महाराजांच्या युद्धतंत्राचा मुद्दाम अभ्यास केला होता."
– (महाराष्ट्र टाइम्स, ता. १० मे १९७८)

या साऱ्या स्वातंत्र्ययुद्धांचे डोळ्यांत भरणारे साम्य आणि वैशिष्ट्य हे आहे की ही सारी स्वातंत्र्ययुद्धे गनिमी काव्याच्या पद्धतीची होती. याचे कारण उघड आहे. या युद्धात दोन पक्ष होते. आपल्या राष्ट्राचे पारतंत्र्य नष्ट करू पाहणारे किंवा स्वातंत्र्य राखू पाहणारे संरक्षक राष्ट्र व त्या राष्ट्राचे स्वातंत्र्य हरण करून त्याला गुलाम करू पाहणारे आक्रमक राष्ट्र. आक्रमक राष्ट्र हे संरक्षक राष्ट्रापेक्षा धनशक्ति, शस्त्रशक्ति, शास्त्रशक्ति, व मनुष्यबळ या सर्वच बाबतीत श्रेष्ठ व बलिष्ठ होते. इटलीविरुद्ध ऑस्ट्रिया या संघर्षात ऑस्ट्रियाचे तर साम्राज्यच होते. रशियावर हिटलरने व नेपोलियनने स्वारी केली त्या दोन्ही वेळी हिटलर व नेपोलियन युरोपात 'कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम्' अशा पदवीला पोचले होते. व्हिएटनामवर अमेरिकेने चाल केली तेव्हा अमेरिकेच्या वैज्ञानिक व आर्थिक श्रेष्ठतेबद्दल प्रश्नच नव्हता. आणि मराठ्यांवर औरंगजेब चालून आला, तेव्हा त्याची तुलना बखरकाराने रावणाशीच केली. "औरंगजेब पादशाहासारखा शत्रु (ज्याची) लाखो फौज (व) खजिना बेमुबलक, छकड्यास छकडे द्रव्याचे भरोन कोटिशा (ज्याचे) चालत आहेत-" आणि शायिस्ताखान नबाब शास्ताखान म्हणजे पातशाहाची प्रतिमाच दुसरी. स्वारी म्हणजे कलियुगींचा रावणच. जैशी

रावणाची संपत्तीची गणना करते तैसाच बरोबरी खजिना बेमोहीन–" पण या सार्‍या स्वातंत्र्ययुद्धाचा एकही अपवाद नसलेला निरपवाद आणि अत्यंत महत्त्वाचा निष्कर्ष हा आहे की, आक्रमक कितीही प्रचंड आणि विराट् असू द्या, स्वातंत्र्यरक्षणाच्या पवित्र भावनेने झुंजणारे राष्ट्र त्याला धुळीला मिळविल्याशिवाय राहत नाही.

असे कां व्हावे, या प्रश्नाचे उत्तर तार्किकदृष्टया देणे केवळ अशक्य आहे. या कोड्याचा उलगडा करण्यास वेदान्ताशिवाय कोणतीही उपपत्ति समर्थ वाटत नाही. त्या तत्त्वज्ञानाप्रमाणे माणसाचा आत्मा हा नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त, सर्वतन्त्रस्वतन्त्र आहे. आणि राजकीय स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, आर्थिक स्वातंत्र्य, व वैचारिक स्वातंत्र्य, ही सर्व त्या मूळ स्वरूपाचे आविष्कार होत. त्या स्वरूपाच्या साक्षात्कारासाठी आत्म्याची चाललेली धडपड ही सर्व स्वातंत्र्याच्या संघर्षाची मूलभूत प्रेरणा आहे. ‘ Man is born free, but every where he is found in fetters ’ असे रूसो म्हणतो किंवा " स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे " असे टिळक म्हणतात; त्यातील ‘ born free ’ आणि ‘ जन्मसिद्ध ’ या शब्दांची उपपत्ति या तत्त्वज्ञानाशिवाय लागू शकत नाही. अशा प्रकारे सार्‍या स्वातंत्र्यसंघर्षांत ही आत्मिक व नैतिक शक्ति मुळाशी असते व ही आत्मिक शक्ति अखेर भौतिक शक्तीचा पाडाव केल्याशिवाय राहात नाही. हजारो सूर्यांचा आकाशात एकाच वेळी लखलखाट व्हावा, एवढी प्रभा असलेला ॲटमबाँबसुद्धा अखेर चिच्छक्तीच्या चिरंतन ज्योतीपुढे, विद्युल्लतेपुढे मेणबत्ती मिणमिणते, त्याप्रमाणे फिका पडल्याशिवाय राहत नाही. हेच महातत्त्व महाभारतात निराळ्या शब्दांत सांगितले आहे की, " यतः कृष्णस्ततो धर्मः, यतो धर्मस्ततो जयः ।"

ही राष्ट्राच्या स्वातंत्र्याची भावना ही गनिमी काव्याचे केवळ सारसर्वस्व आहे. कारण ती वजा केली व केवळ तंत्राचाच विचार केला, तर गनिमी काव्याचे तंत्र चोर–दरोडेखोरांच्या तंत्रापेक्षा काही वेगळे नाही. कारण, चोरही छापे घालतात व दरोडेखोरही लुटालूट करतात. औरंगजेब व पाश्चात्य व्यापारी यांना मराठ्यांचे हे तंत्र तेवढे समजले. पण त्यामागील स्वातंत्र्यसंपादनाची दिव्य भावना त्यांच्या डोक्यावरून गेली. म्हणूनच औरंगजेब मराठ्यांना ‘ चोर ’ म्हणे आणि डच शिवाजीमहाराजांना ‘ दरोडेखोर ’ म्हणत. " दरोडेखोर शिवाजी सुरतेस यथेच्छ चरत आहे. "

सुरा एकच असतो. पण त्याने काकडी कापली म्हणजे ते उपकरण होते, आणि त्याने खून केला म्हणजे ते हत्यार होते. वस्तु एकच, पण फरक भावनेने होतो. तलवार मराठ्यांजवळही होती व औरंगजेबाजवळही होती. पण मराठ्यांची तलवार ही स्वातंत्र्याचे रक्षण करणारे उपकरण होते, तर औरंगजेबाची तलवार

हे स्वातंत्र्याची हत्या करणारे हत्यार होते. अखेर उपकरणान हत्यारावर मात केली; कारण, निर्मिति ही विनाशापेक्षा नेहमीच श्रेष्ठ असते.

म्हणून राष्ट्रभावनेच्या महामंत्राशिवाय गनिमी काव्याचे केवळ तंत्र हे अत्यंत पंगु आहे. इटली, रशिया, व्हिएटनाम, ग्रीस इत्यादि देशांप्रमाणे मराठ्यांनीसुद्धा या तंत्राचा समंत्रक म्हणजे मंत्रयुक्त प्रयोग औरंगजेबासारख्या महाशत्रूविरुद्ध आपल्या स्वातंत्र्यसंग्रामात केला म्हणून त्यांना सिद्धि मिळाली आणि अखेर विजयश्रीने माळ घातली, असा मराठ्यांच्या युद्धतंत्राबद्दलचा अखेरचा निष्कर्ष आहे.

दि. १४ नोव्हेंबर १९७३ रोजी पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळात ले. क. दीक्षित यांनी 'असईची लढाई' या विषयावर व्याख्यान दिले. त्या वेळी त्यांनी गनिमी काव्याच्या युद्धतंत्राचे जे विश्लेषण केले, ते एका सैनिकी तज्ज्ञाचे विवेचन या दृष्टीने मुद्दाम उल्लेखनीय आहे. ते म्हणाले, गनिमी कावा राजकीय उद्दिष्टे साध्य करण्याकरिताच असतो. तो एक पारंपरिक युद्ध करण्याची पद्धत आहे. मोगल मराठ्यांना गनीम म्हणत. हल्ली या युद्धतंत्रास जानपद युद्ध किंवा मुक्तियुद्ध म्हणण्याचा प्रघात पडला आहे. वेदांत, रामायण, राजतरंगिणी, वगैरे पुराण इतिहासांत याचा कूटयुद्ध, तूष्णीम्युद्ध असा उल्लेख आढळतो. पण यात लबाडी व राजकीय डावपेचास हिंसाचारापेक्षा जास्त महत्त्व दिले आहे.

या काव्याच्या वापराने परतंत्र जनता स्वतंत्र बनण्याचा यत्न करते. आक्रमणाविरुद्ध पण आम जनता याच पद्धतीचा अवलंब करते. आधुनिक दृष्ट्या राजकीय प्रणालि व त्याप्रमाणे राज्यशासन स्थापन करण्याकरिता या तंत्राचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. या तंत्रामागे काही ठाम वैचारिक भूमिका आहे ती अशी :—

(१) गनिमीयुद्ध जनतायुद्ध असले तरी प्रारंभी सर्व जनतेचे सहकार्य पाहिजेच असे नाही. जसजसा युद्धाचा वेग वाढेल तसतसे जनतेचे छुपे वा उघड साहाय्य मिळेल. २) या युद्धात राजकारण व हिंसाचार यांची गुंतागुंत असते. ३) गनिमी युद्धास राजकीय ध्येय नसेल तर अपयश येईल. राजकीय ध्येय असतानाही ते ध्येय जर जनतेच्या आकांक्षांविरुद्ध असेल तरीही अपयश येईल.

(२) गनिमीयुद्धाची वाटचाल. १) जनतेमध्ये शत्रूविरुद्ध (स्वकीय व परकीय) चीड व द्वेष निर्माण करणं, २) शत्रूच्या प्रस्थापित बळास खच्ची करणे. गनिमी सेनेस नामोहरम करण्याकरिता शत्रूस प्रचंड शस्त्रास्त्र व सैन्यबळ खर्ची करावयास लागेल अशी परिस्थिति तयार करणे. ३) शेवटी गनिमी युद्धाचा वेग वाढत जातो. गनिमसेना म्हणून प्रस्थापित होतात व उघडपणे शत्रूला जेथे तेथे मुकाबला देतात. अखेरीस पारंपारिक पद्धतीच्या लढाया देऊन गनिमी यंत्रणा आपली उद्दिष्टे साध्य करतात.

(३) गनिमी युद्धपद्धति —१) प्रारंभी गनीम कमजोर असतात. म्हणून समोरासमोरच्या लढाया टाळतात. भयानक धाडी घालणे, रसद तोडणे, लुटालूट

करणे अशा कारवाया केल्या जातात. २) गनिमांना काळाचे बन्धन नाही. जसजसे शत्रूचे बळ क्षीण होत जाईल तसतसे गनीम बळ पुष्ट होत जाईल. ३) ज्याप्रमाणे काळाचा अनिर्बंध फायदा घेणे त्याचप्रमाणे प्रदेशाचा, भूरचनेचा व हवामानाचा अनिर्बंध उपयोग करून युद्ध जितके लांबविता येईल तितके लांबविणें. शत्रूला काळाचे व इतर गोष्टींचे बंधन असते. ४) लढायात अपयश येता कामा नये, त्याचप्रमाणे विजय मिळविणे हे एकमेव ध्येय असणे फायद्याचे नाही. गनिमी युद्ध तत्वज्ञ व विशारद .... चाणक्य, लेनिन, मावत्से तुंग, चे गव्हेरी, त्रु त्रु आँग चिन्ह, कॅस्ट्रो, जिआप वगैरे मशहूर आहेत. त्यानंतर 'फौजी कायद्यानुसार जी युद्धे चालत नाहीत ती गनिमी युद्धे.' असे क. पळसोदकरांनी सांगितले.

नेपोलियनने रशियावर स्वारी केली तिचे औरंगजेबाने मराठ्यांवर केलेल्या स्वारीशी आश्चर्य वाटावे इतके साम्य आहे. औरंगजेबाने पाच लाख फौज बरोबर घेतली, नेपोलियनने सहा लाख फौज घेतली व सोळाशे तोफा बरोबर घेतल्या. औरंगजेबाच्या स्वारीप्रमाणे नेपोलियनच्या स्वारीतही कधी नव्हे ते प्रत्येक सैनिकाने बायकामुले बरोबर घेतली होती. औरंगजेबाने झुंजार सेनापति बरोबर घेतले होते तसे नेपोलियनने ने दाव्हू यांच्यासारखे सेनापती बरोबर घेतले होते. औरंगजेबाला जसा मराठ्यांच्या पावसाळ्याने छळले, तसे नेपोलियनला रशियाच्या हिवाळ्याने छळले. General Winter सरसेनापति हिवाळा हाच रशियाचा सेनापति होता असे म्हटले जाते. त्याच अर्थाने मराठ्यांच्या बाजूने सारा सह्याद्रि लढत होता असे म्हणतात. पण माणूस माणसाला मदत करील तोपर्यंतच निसर्ग त्याला मदत करतो.God helps them who help themselves माणसाला स्वातंत्र्याची किंमत नसली व आत्मस्वातंत्र्याचा हक्क तो गुलाम होण्यासाठीच वापरीत असेल तर सह्याद्रीच काय पण हिमाद्रीसुद्धा आणि हिमाद्रीच काय सारे सातीही कुलपर्वत आले तरी त्यांचे ते रक्षण करू शकणार नाहीत हे उघड आहे. ' वृक्ष न धरी पुष्पफळ । काय करील वसंतकाळ । ' असे तुकारामाने म्हटले आहे ते काही खोटे नाही. या हिवाळ्याचा फायदा घेऊन गनिमीकाव्याने ज्या रशियन वीरांनी नेपोलियनला दे माय धरणी ठाय करून सोडले त्याचे वर्णन वाचताना मराठ्यांची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. –" त्यांच्या सैन्यात डॉन आणि व्होल्गा या प्रांतातले कोसाक लोक होते. ते तर अतिशयच शूर आणि मर्द होते. आठ वर्षांच्या कोवळ्या वयापासून घोड्यांच्या उघड्या पाठीवर बसून वाटेल तिकडे रानाडोंगरात फिरत असावे, जे मिळेल ते खावे, आणि सापडेल तसे पाणी घटाघटा प्यावे अशी त्यांची राहणी असे. यामुळे ते मनाचे शूर आणि हाडांचे काटक असत. समोर तोंड न देता वारंवार छापे घालून शत्रूचा नाश करण्याच्या कामात ते फार निष्णात होते." पण हे विलक्षण साम्य येथेच संपत

नाही. या कोझॅक लोकांच्या तावडीत नेपोलियन पडण्याची वेळ आली होती. तो शर्थीने निसटला. पण या प्रसंगाचा त्याने असा काही धसका घेतला की तेव्हापासून तो चोवीस तास विषाची एक कुपी जवळ बाळगू लागला. हेतु हा की रशियनांच्या हाती जिवंत पडून अपमानाने मरण्यापेक्षा स्वत:च्या हाताने आत्महत्या करणे फार बरे.

वाकिण खेड्यानंतर देवापूरचा मुक्काम संपवून औरंगजेब बहादूरगडला आला. तेथून तो नगरला आला त्या वेळी धनाजी जाधवाने साठ हजार सैन्यानिशी त्याच्या छावणीवरहल्ला चढविला. त्या प्रसंगी रशियनांच्या हाती नेपोलियन तसा औरंगजेब मराठ्यांच्या अगदी हातांत पडण्याची वेळ आली होती.

तो प्रसंग म्हणजे मराठ्यांच्या गनिमी काव्याच्या तंत्राचा परमोच्च कळस होता. कालक्रमाने आपण तेथे आलेलो आहोत म्हणून मराठ्यांच्या युद्धतंत्राचे हे विवेचन आवरते घेऊन त्या रोमहर्षक प्रसंगाकडे वळणे बरे.

□ □

खरा शब्द 'बेडर' नाही. तो आहे, 'बेरड'; पण विजापूरच्या पूर्वेस पसरलेल्या भीमा व कृष्णा या नद्यांच्या दुआबांत राहणाऱ्या या जमातीचा निर्भयपणा पाहून इतिहासकाराला शब्दाचा खेळ करण्याचा मोह आवरला नाही आणि त्याने 'बेरड'चा 'बेडर' करून टाकला. आणि मरणाला कःपदार्थ समजणारे हे लोक खरोखरच सर्व बाबतीत 'डर तो पीछे रही' असा बाणा असलेले बेडर आहेतच. शिसवीसारखे काळे कुळकुळीत, फार उंच नाहीत फार ठेंगू नाहीत, बांध्याने बळकट असे हे लोक गुरेढोरे पळविण्यात व रात्री बेरात्री दरोडे घालण्यात पटाईत होते; आणि बंदुकीचा नेम मारण्यात तर त्यांचा हात कोणी धरू शकत नसे. त्यांची शेती ही केवळ शपथेपुरती असे. मुख्य धंदा म्हणजे डाकूगिरीचा. त्यांच्यात प्रचलित असलेल्या कथेप्रमाणे भगवान् शंकराकडून त्यांच्या पूर्वजाने दोन वर मागून घेतले होते. पहिला म्हणजे त्यांच्या वंशजांना थोडया श्रमाने पीक काढता यावे आणि दुसरा म्हणजे ते उत्तम बर्कंदाज व्हावेत. त्यामुळे फारशी यातायात न पडणारी उन्हाळी पिके ते काढीत व उरलेला काळ दरोडेखोरीच्या स्तुत्य उद्योगात खर्च करीत.

पण ते केवळ दरोडेखोर होते असे समजणे चूक होईल. विजयनगरच्या साम्राज्यात सरहद्दीचे रक्षण करण्यात त्यांनी मोठी कामगिरी बजावली आणि नंतर आदिलशाहीचे ते निष्ठावंत सरदार होते. त्यांच्यापैकी पामनायक या बेरड सरदाराने औरंगजेबाने जेव्हा विजापुरावर आक्रमण केले तेव्हा त्याच्याशी निकराने झगडा केला. त्याचे प्रायश्चित्त अर्थात् त्याला भोगावे लागले. खानाजादखानाला पाठवून औरंगजेबाने त्याचे राज्य व त्याची राजधानी सागर दोन्ही खालसा केली व त्याला स्वतःला नाक मुठीत धरून औरंगजेबाच्या दरबारी शरण यावे लागले.

त्याच्यानंतर त्याचा पुतण्या पिडनायक हा बेरडांचा प्रमुख झाला. हा पिड नायक मोठा बेरकी आणि हुन्नरबाज माणूस होता. त्याला औरंगजेबाने मनसब दिली आणि रुहुल्लाखानाबरोबर रायचूरचा किल्ला घेण्यास पाठविले. पिडनायकाने लढाईत मेहेनत बरी केली आणि नंतर रुहुल्लाखानाला सांगितले की, "तुम्ही परवानगी द्याल तर मी एक आठवडयासाठी वाकिणखेडयाला जाऊन सरंजाम वगैरे व्यवस्थित करून येतो." पिड नायकाच्या बोलण्यात रसवंती फार. त्यामुळे रुहुल्लाखानाने त्याला परवानगी दिली. पण पिडनायक वाकिणखेडयाला गेला, तो परत आलाच नाही. सागरची राजधानी मोगलांनी सर केल्यानंतर

बेरडांनी आपले ठाणे वाकिणखेडचाला केले होते. सागरच्या पश्चिमेस बारा मैलांवर डोंगरावर ते खेडें होते. पिडनायकाने ते मजबूद केले. त्याला तटबंदी बांधली. बारा तेरा हजार बंदुकच्यांचे सैन्य उभे केले. भोवतालच्या प्रदेशातील शेतीला तो उत्तेजन देऊ लागला आणि विशेष म्हणजे संताजी घोरपडे, धनाजी जाधव इत्यादि मराठ्यांना मिळून त्याने गुलबर्गा जिल्ह्यात लुटालूट सुरू केली. आपणाला पिडनायकाने फसविले हे समजल्यावर रुहुल्लाखान संतापला. त्याने त्याला जेर करण्याचा प्रयत्न केला. पण "काळानेच पिडनायकाला साहाय्य केले." रुहुल्लाखानाला औरंगजेबाने आपणांजवळ बोलाविले. पिडनायकाची गुलबर्गा जिल्ह्यातली धामधूम मर्यादेबाहेर गेली तेव्हा दोन वर्षांनी (१६९१) औरंगजेबाने आपला मुलगा कामबख्श याच्या हाताखाली बहरामंदखान व हमीदुद्दीनखान यांना वाकिणखेडा जिंकण्यासाठी पाठविले. पण दोनच महिन्यांत कामबख्शाला जिंजीला पाठविण्याची निकड निर्माण झाली, तेव्हा पुन्हा रुहुल्लाखानाची रवानगी करण्यात आली. पण बेरडांनी त्याला सळो का पळो करून सोडले. रुहुल्लाखानाबरोबर संभाजीच्या काळात काम केलेला कोकण स्वारीतला प्रसिद्ध रणमस्तखान पन्नी आला होता. त्याला त्यांनी ठार मारले. तेव्हा रुहुल्लाखानाने तहाची बोलणी सुरू केली. पिडनायकाला तेच हवे होते. त्याने रुहुल्लाखानाला भक्कम लाच चारली व त्याला गप्प बसविले. पण औरंगजेबाने त्याच्या जागी शहाजादा आझमला पाठविले. पिडनायक त्यालाही पुरून उरला. त्याने आझमशहाला दोन लाख रुपये दिले व बादशहाला सात लाखांची खंडणी भरून चांगले वागण्याचे आश्वासन दिले. त्याच्या आश्वासनाची खातरजमा पाहण्याइतका वेळ आझमला नव्हता, कारण औरंगजेबाने त्याला तातडीने जिंजी स्वारीवर कर्नाटकाकडे रवाना केले. त्याची पाठ फिरल्याबरोबर पिड नायकाने परत वाटमारी आणि मुलुखगिरीचा धंदा सुरू केला. तेव्हा १६९६ मध्ये औरंगजेबाने त्याच्यावर फिरोजजंगाला पाठविले. पण फिरोजजंगालाही नऊ लाख रुपयांची खंडणी भरून पिड नायकाने परतवून लावले. त्याची धामधूम इतकी वाढली की प्रत्यक्ष विजापूर त्याच्या हातांत पडण्याचा धोका निर्माण झाला. तो स्वतः एक वेळ लुटालूट करीत असता तर निराळे. पण त्याने मराठ्यांशी हातमिळवणी केली होती ही जास्त चिंताजनक गोष्ट होती. धनाजी जाधवाचे व त्याचे विशेष सख्य होते. धनाजी जाधवाची मुले माणसे वाकिणखेडचाच्या किल्ल्यात ठेवली होती. त्याप्रमाणे इतर मराठे सरदारांचेही कबिले वाकिणखेडचात होते. औरंगजेब मराठ्यांच्या किल्ल्यावर घसरला तेव्हा किल्ल्यातले आपले कबिले काढून आणून त्यांनी वाकिणखेडचात ठेविले. म्हणजे पिडनायकाचे मराठ्यांशी संघटन या मर्यादेपर्यंत वाढले होते. राणोजी घोरपडे संताजी घोरपडे, हिंदुराव घोरपडे यांच्या सैन्यात तर अनेक बर्कंदाज पिडनायका-

चेच असत. ज्या प्रदेशात पिडनायकाचा हा पुंडावा माजला होता, तो गोवळकोंडा व विजापूर यांच्यामधला प्रदेश मोठा मोक्याचा होता. सागरपासून विजापूर बहात्तर मैलांवर, गुलबर्गा पन्नास मैलांवर, मालखेड पंचेचाळीस मैलांवर होते व रायचूर व बिदर ही मोठी शहरेही काही फार दूर नव्हती. तेव्हा पिडनायकाचे हे बंड ही मोठी डोकेदुखी होऊन बसली होती.

औरंगजेबाला या सर्व गोष्टींची उत्तम कल्पना होती. या लबाड बेरडाने आपल्या भल्या भल्या सेनापतींना पैशाचा मुखलेप देऊन कसे गप्प बसविले, आणि गोड गोड थापा देऊन कशी तोंडाला पाने पुसली हे तो चांगले ओळखून होता. आपले सारे सेनापति किती कुचकामाचे आहेत याचा त्याला पुन्हा एकदा प्रत्यय आला होता. पण त्याचा सध्या तरी काही इलाज नव्हता. गेली सहा वर्षे मराठ्यांचे किल्ले सर करण्याच्या कामात तो गुंतला असल्यामुळे त्याचे हात बांधले गेले होते. पण आता तो त्या कामातून मोकळा झाला होता. 'आरब्धस्यान्तगमनं द्वितीयं बुद्धिलक्षणम्' हे बुद्धीचे लक्षण सार्थ करून, हाती घेतलेल्या त्या अवघड कामाची त्याने तड गाठली होती. तेव्हा फार दिवस रेंगाळत असलेले पिडनायकाचे प्रकरण शेवटास नेण्याचे त्याने ठरविले. त्याप्रमाणे २२ ऑक्टोबर १७०४ रोजी तो पुणे जिल्ह्यातील खेडहून निघाला व साडेतीन महिने प्रवास करून ७ फेब्रुवारी १७०५ रोजी वाकिणखेड्यास दाखल झाला.

तोरणा, खेळणा, राजगड, पन्हाळा अशा महाराष्ट्रातल्या गगनचुंबी किल्ल्यांची छाती दडपून टाकणारी उंची नुकतीच औरंगजेबाच्या नजरेखालून गेली होती. त्याला जवळजवळ सपाट मैदानावर असलेला वाकिणखेड्याचा किल्ला पाहून खरोखर हसूच कोसळले असेल. एका फक्त अडीचशे फूट उंचीच्या पर्वतावर नव्हे तर पर्वतीवर हा वाकिणखेड्याचा 'बेरडगड' उभा होता. सात बुरूज असलेल्या या पंचकोनी किल्ल्याची बांधणी व तटबंदीही तशी ओबडधोबड आणि वेडीवाकडीच होती. कित्येक ठिकाणी तर जमिनीतून वर आलेल्या खडकाची सरळसोट कपारच तटबंदी म्हणून वापरली होती आणि निसर्गाने येवढी कृपा केली असता माणसाने मुद्दाम आणखी जादा तट बांधण्याचा चोंबडेपणा करण्याचे बेरडांनी शहाणपणाने टाळले होते. किल्ल्याचे बांधकाम पाहून बादशहाला संतोष झाला नाही यात काही नवल नव्हते. कारण, बांधकामाबद्दल किंवा कलाकौशल्याबद्दल बेरडांची कधीच फारशी प्रसिद्धि नव्हती. किल्ल्याच्या पूर्वेला आणि उत्तरेला बऱ्याचशा छोट्या टेकड्या होत्या. त्यांची तटबंदी करणे किंवा इतर काही उपायाने त्या दुर्लंघ्य करणे खरोखरच जरूर होते; कारण, त्या टेकड्या शत्रूच्या ताब्यात गेल्या असत्या तर त्यांच्यावरून तोफांचा भडिमार करून वाकिणखेड्याच्या किल्ल्याची पाहता पाहता चटणी उडविणे त्याला अगदी सहज शक्य होते. पण काय असेल ते असो, त्या टेकड्या मजबूत करण्याची कल्पना

काही बेरड मंडळींच्या डोक्यात आली नाही किंवा येऊनही त्यांना तिची जरूर वाटली नाही.

त्यांना जरूर वाटली नाही हेच जास्त खरे. कारण वाकिणखेड्यात त्यांचे ठाणे असले, तरी त्याच्यावर त्यांची मुळीच भिस्त नव्हती. त्यांची सारी मदार होती ती मरणाला कस्पटासमान लेखणाऱ्या आपल्या मर्दांच्या छातीवर आणि आकाशातली उडती पाखरे पटाईतपणे टिपून अचूक खाली पडणाऱ्या आपल्या हुकुमी नेमबाजीवर. बंदुक ही त्यांची खरी सहचरी, राजद्वारात आणि स्मशानात सदैव बरोबर असणारी सखी. ती त्यांची भगवती होती. तिच्या बळावर कर्नाटकाच्या उघड्या मैदानात, आकाशाखाली आपल्या किल्ल्यात ठाण मांडून भल्या भल्या मोगल सरदारांच्या दाढ्या ओढण्याचा बेडर खेळ ते खेळत होते. आपल्या या काळच्या बर्कंदाजांचे बारा हजारांचे सैन्य तर पिड नायकाने या प्रसंगी गोळा केलेच होते. त्याशिवाय त्याने ताराबाईकडे पैगाम लावला होता; आणि आपल्या सैन्यात सर्व जातींच्या लोकांची भरती केली होती, आणि साकी मुस्तैदखान विषादाने म्हणतो त्याप्रमाणे 'त्यात बदनाम झालेले मुसलमानही होते.'

वस्तुत: पिड नायक ऊर्फ पिऱ्या बेरड हा अवाढव्य मोगल सल्तनतीच्या हिशेबाने कुठल्या झाडाचा पाला. थोर मोगल बादशहाच्या एखाद्या मामुली सरदाराने सुद्धा त्याला सहज होता की नव्हतासा केला असता. पण बेरड पक्का बेरकी म्हणून म्हणा की मोगल सरदार पक्के गलथान म्हणून म्हणा की, त्यांचा पैशाचा लोभ अनावर म्हणून म्हणा. सुरुवातीला यःकश्चित् वाटलेला हा इसम, आता ठिणगीचा वणवा व्हावा त्याप्रमाणे इतका बळावला होता. साध्या पुळीची काळपुळी झाली होती. काट्याचा नायटा झाला होता. दुखणे गळ्यापर्यंत आले होते, त्यामुळे म्हातारपणामुळे मान लटलटत असतानासुद्धा शहेनशहांना जातीने वाकिणखेड्याला येऊन पायधूळ झाडावी लागली होती व कर्नाटकची भूमि चरणस्पर्शाने धन्य करावी लागली होती. ते आल्याबरोबर विजापूरचे सुभेदार चीनकिलीजखान बहादुर, महंमद अमानखान बहादुर, तोफखान्याचे मीर आतिश तरबियतखान बहादुर, हमीदुद्दीनखान बहादुर इत्यादि बहादुर मंडळींचा ताफा त्यांच्या सेवेत रुजू झाला हे सांगणे नकोच. इतके नामांकित सेनापति घेऊन प्रत्यक्ष बादशहाला वाकिणखेड्यास येण्यास भाग पाडल्याबद्दल पिडनायकाची तारीफ करावी, की इतके नामांकित सेनापति घेऊन वाकिणखेड्यासारख्या क्षुल्लक मोहिमेवर गेल्याबद्दल बादशहाची कीव करावी हे सांगणे फार कठीण आहे. वाकिणखेडा आजपर्यंत फक्त भूगोलात होते, ते इतिहासात आले ते केवळ या प्रसंगाने.

किल्ल्यापासून अर्ध्या मैलावर चीनकिलीजखान, तरबियतखान, हमीदुद्दीनखान व इतर तोफखान्याच्या लोकांनी तळ दिला. किल्ल्यापासून दोन मैलावर खुद्द औरंगजेबाचा तंबू होता. लढाईला सुरवात झाली. मोगलांनी किल्ल्याभोवती मोर्चे

बांधले व ते पुढे सरकविण्याच्या प्रयत्नास लागले. बेरडही रात्रंदिवस गोळ्यांचा व बाणांचा वर्षाव करू लागले. त्या भडिमारापुढे मोगलांचे मोर्चे टिकणेही कठीण झाले. मग पुढे सरकविण्याची गोष्टच बोलावयास नको.

अशा परिस्थितीत एके दिवशी सकाळी चीनकिलीजखान, महंमद अमीनखान, अजीजखान रोहिला व इखलासखान मियाना हे किल्ल्याभोवती टेहेळणी करीत; फिरत असता एकाएकी त्यांनी हल्ला करून लाल टेकडी काबीज केली व तेथल्या बेरड बर्कंदाजांना हाकून लावले. तांबडमातीची ही लाल टेकडी मोठी मोक्याची जागा होती; आणि ती हातात आल्यावर किल्ल्यावर मारा करणे सोपे होते. पण मोगलांना टेकडी लाभाची ठरली नाही. बेडरांनी मोगलांभोवती एकच गर्दी केली, व दगड धोंड्यांचा प्रखर मारा केला. मोगलांनी पायदळ आणले व औरंगजेबाने कामबख्श व आसदखानाच्या हाताखाली कुमक पाठविली. पण काही उपयोग झाला नाही. जितक्या सपाट्याने मोगल टेकडीवर चढले, त्याच्या दुप्पट सपाट्याने ते लगबगीने खाली आले. उन्नतीपेक्षा अवनती फार झपाट्याने होते हे प्रसिद्धच आहे. बेडरांनी चालविलेल्या त्या गोळ्यांच्या भडिमारात महंमद अमीनखान याच्या घोड्याचे दोन पाय उडाले आणि चीनकिलीजखानाचा घोडा ठार झाला, दोघेही खान घोड्यावरून खाली आले आणि पायी पळू लागले. टेकडीवरच्या रणधुमाळीत हत्ती, घोडे, माणसे मरून पडली होती. त्या प्रेतांच्या खेचाखेचींतून मोठ्या मुश्किलीनें त्यांनी वाट काढली. आपण बचावलो म्हणून ईश्वराचे त्यांनी आभार मानले ते बरोबर होते. कारण याच लाल टेकडीवर पूर्वीं रणमस्तखान पन्नी गोळा लागून गारद झाला होता. औरंगजेबाला ही बातमी कळल्यावर त्याने दोघांसाठी दोन उत्तम व सोनेरी साज असलेले अरबी घोडे तर पाठवलेच, पण खास चीनकिलीजखानासाठी अंबरचे सुगंधी औषध पाठविले. कारण खाफीखान म्हणतो, 'चीनकिलीजखानाला हृदयाचा विकार होता. अशा प्रसंगी तो आणखी वाढणारच.' हे रास्तच आहे; कारण बेडरांचा गोळीबार खरोखरच हृदयस्पर्शी होता.

पण अखेर मोगलांना टेकड्या काबीज करण्यात यश आले. वरील घटनेच्या तिसऱ्या दिवशी हमीदुद्दीनखानाने एक टेकडी काबीज केली. महंमद अमीनखानाने लाल टेकडी काबीज केली. बाकरखान याने आणखी एक टेकडी काबीज केली. बेरडांकडून त्यांच्यावर सतत बंदुकीतून गोळ्यांचा आणि गोफणातून धोंड्यांचा वर्षाव होत होता. पण त्या गोळ्या खाऊन आणि ते दगड खाऊन मोगल तेथे टिकून राहिले. टेकड्या घेतल्यानंतर किल्ला सर करणे ही सोपी गोष्ट होती. यश मोगलांच्या अगदी दृष्टिपथात आले.

पण म्हणतात ना, 'पेला लागे ओठा आणि दैव मारी सोटा' तशातली बिचाऱ्या मोगलांची गत झाली. दुसऱ्या दिवशी लष्करात बातमी पसरली की दुष्ट मरा.

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, पुणे
(ड.व्ह.ग्रं ... पुणे)
... पेठ, पुणे-३०



त्यांची प्रचंड फौज बेरडांच्या मदतीसाठी चालून येत आहे, आणि ती खरोखरच आलीसुद्धा. पांच हजारांचे घोडदळ आणि वीस हजारांचे पायदळ असलेली ती जंगी फौज घेऊन धनाजी जाधव आणि हिंदुराव घोरपडे आल्याचे समजल्यावर मोगलांच्या पोटात भीतीने गोळाच उठला. त्या दोघांची आपापसात भांडणे होती पण त्यांचा मोगलांना काहीच फायदा नव्हता. कारण बाकी इतर बाबतीत त्यांचे एकमेकांशी कितीही वाकडे असले तरी मोगलांचा धुव्वा उडविण्याच्या बाबतीत त्यांचे संगनमत होते. मराठ्यांनी आल्याबरोबर मोगलांना एकीकडे लढाईत गुंतवून ठेवले आणि दुसरीकडे दोन-तीन हजारांच्या तुकडीने किल्ल्यात शिरून आपले कबिले बाहेर काढले व घोड्यावर बसवून त्यांना सुरक्षितपणे बाहेर आणले मग त्यांनी पिडनायकाला सल्ला दिला की सध्या बादशहापुढे शरणागति पत-करावी आणि आपला मुलुख वाचवावा. पण पिडनायकाला तो सल्ला मानवला नाही.

ही आश्चर्याची गोष्ट होती. 'तुटेपर्यंत ताणू नये' ह्या मराठ्यांच्या गनिमी काव्याला धरूनच हा सल्ला होता; आणि स्वतः पिड नायकाने वारा येईल तशी पाठ देण्याच्या पद्धतीनेच आजपर्यंत आपले शीर सलामत राखले होते. त्याला या सल्ल्यात नवीन काहीच नव्हते. आज तो बादशहापुढे वाकला असता तर बाद-शहाचेही काम झाले असते व त्याचेही काम झाले असते. बादशहा वेढा उठवून सुखासमाधानाने परत गेला असता व त्याची पाठ फिरल्यावर पिऱ्या नाईक आपले नेहमीचे उद्योग करायला मोकळा झाला असता. बरे, बादशहा परत येऊन त्याची पक्की खोड मोडील अशी धास्ती बाळगण्याचे त्याला काही कारण नव्हते. कारण, बादशहाचा एकंदर रागरंग पाहता स्वारीचे पुढचे कूच आता परलोका-च्याच मोहिमेवर होण्याची शक्यता जास्त होती. तेथून तो पृथ्वीवर पिऱ्या बेरडाची खबर घ्यायला परत येईल हे शक्य नव्हते. कारण त्या लोकाला गेलेला कोणताही माणूस आजपर्यंत परत आलेला नव्हता. अशा स्थितीत म्हाताऱ्या बादशहाचा अधिक अंत न पाहता त्याने शरण जाणे योग्य होते. पण पिऱ्या जातीचाच दुष्ट म्हणा की प्रत्यक्ष बादशहाच आला आहे तर त्यालाच एकदा चांगला बेरडाचा इंगा दाखवावा असे वेड त्याच्या डोक्यात शिरले होते म्हणून म्हणा, आपली नेहमीची 'महापुरे झाडे जाती । तेथे लव्हाळे वाचती' अशी वैतसी वृत्ति नेमकी याच वेळी त्याने सोडली आणि 'मारीन किंवा मरेन' अशा रजपुती बाण्याने तो युद्धाला उभा ठाकला.

पिड नायक पैसेवाला माणूस होता. त्याने मराठ्यांना भक्कम रक्कम दिली. शिवाय तो त्यांना खर्चासाठी म्हणून रोज निराळी रक्कम देऊ लागला, त्याने अट इतकीच घातली की, वेढा उठेपर्यंत मराठ्यांनी आपणास मदत करावी. मदत करावी म्हणजे काय तर मोगलांना मारावे. मराठ्यांनी ही अट आनंदाने पाळली हे सांगणे

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था पुणे
(इ.व्ह ट्रा. सोसायटी: पुणे)
१२३३ सदाशिव पेठ, पुणे-३०.



नकोच. ते दररोज पिडनायकाकडून पैसे घ्यायचे आणि मोगलांचे मुडदे पाडायचे. परिणाम असा झाला की टेकडचा काबीज करून बिचाऱ्या मोगलांनी जें यश मिळविले होते त्यावर सपशेल बोळा फिरविला गेला आणि किल्ला सर करण्याचे दूरच पण आपण जिवानिशी सुटतो कसे याचीच त्यांना भ्रांत पडली. मोगल छावणीत पराकाष्ठेची दहशत 'तजल्जुल तमाम' पसरली. भल्या भल्या सेनापतींची गाळण उडाली. मृदंगाला दोन्हीकडून सपाटून थपडा बसाव्यात तसे जिजीच्या वेढयाच्या वेळचे संकट मोगलांवर पुन्हा कोसळले. त्या वेळी मराठे समोर किल्ल्यातून तोफांचा भडिमार करीत असताना धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे अंधारात मोगल सैन्याची लांडगेतोड करीत असत. त्या वेळी बादशहाची स्वारी जिजीला नव्हती. पण तेव्हा मोगलांची दुर्दशा कशी झाली असेल याची खाशी प्रतीति 'याचि देही याचि डोळा' त्याला वाकिणखेडचाला घेण्याची संधि लाभली. समोर किल्ल्यावरून बेरडांचे तोफांचे व बंदुकीचे अग्निहोत्र अहोरात्र पेटलेलेच होते. त्यात यज्ञात अजापुत्रांच्या, त्याप्रमाणे मोगलांच्या आहुति पडतच होत्या. त्या कमी झाल्या म्हणून की काय दुष्ट मराठे छापे घालून उरलेल्या मोगलांची कत्तल उडवीत होते. भीमसेन म्हणतो "छावणीतील मोगल सैन्य अगदी मेटाकुटीस आले. छावणीच्या बाहेर पाऊल टाकण्याची एकाही मोगल सैनिकाला हिंमत होईना."

अशा स्थितीत एके दिवशी औरंगजेबाचा वाकेनवीस हिदायतकैश याने एक नवीनच प्रकरण बादशहापुढे आणले. त्याने पिडनायकाचे एक पत्र बादशहापुढे ठेविले. त्या पत्रात पिडनायकाने म्हटले होते की आपणाला फार पश्चात्ताप झालेला आहे, तरी बादशहाने आपले अपराध माफ करावेत आणि तह करण्याची कृपा करावी. पत्र कोठून मिळाले याची चौकशी करिता हिदायतकैशने सांगितले की आपणास ते अब्दुल गनी नावाच्या लष्करातील एका काश्मिरी माणसाने आणून दिले. अब्दुल गनी हा तसा काही मोठ्या घरंदाज कुळातला इभ्रतदार माणूस नव्हता. तो धान्य वगैरेचा थोडाफार चिल्लर व्यापार करी आणि थोडीशी साव-सावकारीही करी. पण माणूस पाहिले तर फडतूसच होता. त्याच्या म्हणण्याप्रमाणे एके दिवशी संध्याकाळी फिरत फिरत आणि नमाज पढण्यासाठी म्हणून किल्ल्याच्या पायथ्याशी गेला असता एकाएकी बेरडांनी त्याला हल्ला करून धरून पिडनायकाकडे नेले. त्याने त्याची चौकशी केली आणि नंतर बादशहाला देण्यासाठी म्हणून हा कागद लिहून त्याच्याजवळ दिला.

कागद पाहून पुढे काय करावे याबद्दल बादशहाला मोठाच विचार पडला. तो स्वतः पक्का संशयखोर, स्वतःच्या सावलीचीही शंका घेणारा. पिडनायक हा तर एक नंबरचा लबाड म्हणून जगजाहीर होता. अब्दुल गनी हा सुद्धा फालतू आणि

उडाणटप्पूच माणूस– इतका की खुद्द वाकेनवीस साहेबसुद्धा त्याच्याशी एखाद दुसरा शब्द मोठ्या कष्टाने बोलत असत; इतर प्रतिष्ठित अमीर तर त्याच्याकडे ढुंकूनसुद्धा पाहत नसत. अशा स्थितीत पिडनायकाच्या या तथाकथित अर्जीवर काय हुकूम द्यावयाचा हा प्रश्नच होता. पण बादशहाने विचार केला की दुसरे कोणी नसले तरी या प्रकरणात हिदायतकैश तरी जबाबदार माणूस होता; कारण तो सगळ्या मोगल राज्याचा वाकेनवीस होता. दुसरे असे की आपल्या सैन्याची व सेनापतीची कशी घाबरगुंडी उडालेली आहे हे त्याला ढळढळीतपणे दिसत होते. तेव्हा 'बुडत्यास काडीचा आधार' या न्यायाने त्याने शहाजादा कामबख्श व हिदायतकैश यांच्या मार्फतीने तहाच्या वाटाघाटी करण्यात याव्यात असा हुकूम केला.

त्या वाटाघाटीप्रमाणे पिडनायकाने आपला भाऊ सोमशंकर याला दरबारात पाठविले. त्याला मनसबदारी देण्यात यावी, पिडनायक हा किताब देण्यात यावा आणि जमीनदारी देण्यात यावी, अब्दुल गनीचा स्नेही मुहतशिमखान याला किल्लेदारी देण्यात यावी अशा बेरडांच्या अटी होत्या. त्याप्रमाणे बादशहाने सोमशंकराला मनसब व जमीनदारी दिली व तो दरबारात येऊन रुजू झाला. वाकिणखेडयाच्या किल्लेदारीवर मुहतशिमखान याची बादशहाने नेमणूक केली. तो किल्ल्यात शिरला त्या वेळी मोगल छावणीत विजयाचे नगारे बडविण्यात आले. ठरले होते असे की दुसऱ्या दिवशी सकाळी पिडनायकाची गाठ पडेल व तो मग बादशहाच्या भेटीला येईल. एका आठवड्यात किल्ला रिकामा करून देण्याचे ठरले व त्याप्रमाणे खरोखरच बेरडांनी सामानसुमान व म्हातारीकोतारी माणसे हलविण्यास सुरुवातही केली. मोगलांच्या छावणीत आनंदी आनंद पसरला. मोर्च्यातील सरदारांना बादशहाने परत बोलाविले. बेरड मित्र झाले, मित्रावर कोणी गोळीबार करतो का, म्हणून मोर्च्यांतून होणारा गोळीबारही बंद करण्यात आला. तहाची कामगिरी बजाविल्याबद्दल हिदायतकैश याला हादीखान असा किताब देण्यात आला. अब्दुल गनीसाहेबांनासुद्धा तीनशेची मनसब बहाल करण्यात आली. आजवर ते तेलातुपाचा चिल्लर धंदा करून आपले पोट चालवीत होते. आता त्यांना त्याची जरूर राहिली नाही. त्यांनी आपले छावणीतले पाल मोडून टाकले, कारण ते आता सरदारसाहेब झाले होते. प्यादयाचा फर्जी झाला होता.

तीन प्रहरपर्यंत बातमी अशी होती की पिडनायक मुहतशिमखानाला भेटला. पण नंतर ती बातमी खोटी ठरली. पिडनायक त्याला भेटलाच नाही. त्याला सपाटून ताप आला होता. नंतर बातमी आली की तापामुळ त्याला भ्रम झाला. नंतर बातमी पसरली की वेडाच्या भरात पिडनायक किल्ल्याच्या बाहेर निघून

गेला आहे. मग तो आत्महत्त्या करून मरायला गेला की मराठ्यांना मिळायला गेला, कोण जाणे.

मग पिडनायकाच्या आईने मोठा गळा काढला आणि गाव गोळा केला. तिने अब्दुल गनीबरोबर बादशहाकडे निरोप पाठविला की, "तो दुष्ट पिडनाईक त्या सैतान मराठ्यांना मिळण्यासाठी किल्ल्याच्या बाहेर गेला आहे. आपण सोमशंकराला किल्ल्यांत पाठवावे. म्हणजे तो आपले जमीनदारीचे काम पाहू लागेल. तो मुहतशिमखानाला भेटून खजिने कोठे दडलेले आहेत ते दाखवून देईल. एका आठवड्यात किल्ला रिकामा करून देण्यात येईल." त्याप्रमाणे बादशहाने सोमशंकरला किल्ल्यावर पाठविले. त्याने किल्ला आज देतो, उद्या देतो म्हणून टाळाटाळ चालविली. मोगलांना किल्ल्यात जायला आणि किल्ल्यातून यायला बंदी केली आणि भावी किल्लेदारसाहेब मुहतशिमखान यांना तर कोठडीत बंद करून ठेवले.

गोष्टी या थराला आल्या तेव्हा कोठे बादशहाला त्या काफर पिऱ्याचे कपट उमगले. त्याच्यासारखीच त्याची आई. तिचे रडणे कढणे म्हणजे एक मोठे ढोंग होते आणि बेमालूम नाटक वठविण्यात ती म्हातारडी आपल्या इब्लिस कारट्यापेक्षाही बदमाश निघाली. त्यात काही नवल नव्हते. कारण 'खाण तशी माती' असे म्हटलेच आहे. एवढा मोठा बादशहा पण आयुष्यात दुसऱ्यांदा घसरला. पूर्वी एकदा त्या काफर शिवाजीने त्याच्या हातावर तुरी देऊन त्याच्या आग्ऱ्याच्या कोठडीतून पलायन केले तेव्हा अशीच बादशहाची सगळ्या जगात नाचक्की झाली होती. आणि या वेळी पिऱ्या बेरडाने तो नाकासमोर चालला असता—मुद्दाम केळ्याच्या साली रस्त्यावर फेकून त्याला पालथे पाडले होते. घसरल्याचे माणसाला इतके दुःख होत नाही, पण घसरताना आपल्याला दुसऱ्याने पाहिल्याचे दुःख फार असते. तसेच या वेळी झाले. बादशहाची फजिती जगजाहीर झाली. छावणीतल्या तंबू तंबूतून लोक बादशहाला फिदीफिदी हसत होते आणि एवढ्या बुद्धिमान् बादशहाला बेरडासारख्या हलकट माणसाने फसवावे याबद्दल त्याची टर उडवीत होते. खरी नामुष्कीची गोष्ट हीच होती. मानखंडना केव्हाही वाईटच, पण आपणापेक्षा मोठ्या किंवा निदान आपल्या तोलाच्या माणसाने ती केली, तर थोबाडीत बसली तरी निदान बरोबरीच्याने तरी श्रीमुख रंगवले एवढे समाधान तरी गाल चोळता चोळता मिळण्याची शक्यता असते. औरंगजबाने पूर्वी हा अनुभव घेतला होता. इराणचा शहा अब्बास हा नेहमी त्याला हसत असे. एकदा औरंगजेबाने वकिलाबरोबर पाठविलेले नजराणे त्याने घेतले सुद्धा नाहीत, त्याच्या 'आलमगीर' पदवीची थट्टा केली; बापाला जिंकणारा तो फक्त 'पिदरगीर' आहे असे म्हटले, त्याला राज्य करता यत नाही, शिवासारखा क्षुल्लक बंडखोर त्याला मोडता येत नाही, अशी नानाप्रकारे त्याने औरंगजेबाची

टर उडविली, इतकेच नव्हे, तर शेवटच्या भेटीत, आपल्या एका सरदाराकडून त्या वकीलसाहेबांच्या लंब्याचवड्या दाढीला आग लावून दिली, व 'हिंमत असेल तर काबुलावर चालून या' असा निरोप औरंगजेबाला कळवावा म्हणून बजावले. औरंगजेबाला हा अपमान सहन झाला नाही. पण तो शहाचे काहीच वाकडे करू शकत नव्हता. वड्याचे तेल वांग्यावर काढावे त्याप्रमाणे शहावरचा राग त्याने त्या वकिलावर काढला– "तुम्ही तेथल्या तेथे शहाचा खून कां केला नाही" असे बोलून तेथल्या तेथे त्याने साप चाववून त्या वकिलाला ठार मारले. शहाच्या भेटीत बिचाऱ्या वकिलाला आपली दाढी गमवावी लागली. औरंगजेबाच्या भेटीत त्याला आपले प्राण गमवावे लागले.

पण अपमान झाला तरी शहा अब्बास औरंगजेबाच्या बरोबरीचा– नव्हे औरंगजेबाला ज्याची धास्ती वाटावी इतका मोठा माणूस होता, एवढे तरी त्या दुःखात सुख होते. त्याच्या मानाने पिऱ्या बेरडाची काय पदवी होती! त्याला का खानदान होते की रीतभात होती? त्याला का लिहितां येत होते की वाचता येत होते? त्याला का कला कळत होती की कौशल्य समजत होते? त्याचा तो किल्ला म्हणजे दगडाविटांचा वेडावाकडा ढिगारा होता. त्याला स्वतःला रंग नव्हता आणि रूप नव्हते. शुद्ध भुतासारखा दिसे. आणि काळा कुळकुळीत तर इतका होता की अंधारात दिवा घेऊन आला असता, तर दिवा अधांतरी चालला म्हणून लोकांनी भयाने किंकाळी ठोकली असती. बादशहाला कुर्निसात करताना किती अंशांचा कमरेचा कोन करायचा आणि कुर्निसात डाव्या की उजव्या हाताने करायचा, ह्या दरबारच्या धर्मसिंधूतला ओ का ठो तरी त्या टोणग्याला कळायची अक्कल होती का? असल्या या टुकार इसमाने हिंदुस्थानच्या बादशहासारख्या श्रीमंताची अब्रू साखसुरत घ्यावी ही केवढ्या दुःखाची गोष्ट होती? संतापाने आणि शरमेने बादशहा इतका वेडा झाला की धरणी आपणाला पोटात घेईल तर बरे असे त्याला होऊन गेले.

पण औरंगजेब फसला नव्हता. त्याला फसविणे इतके सोपे नव्हते. त्याचीही सगळी हयात राजकारण खेळण्यात गेली होती. त्याने आजपर्यंत अनेकांना फसविले होते. याही वेळी त्याने स्वतः फसल्याचे सोंग करून बेरडांना फसविले. आपल्या सैन्याने बेरडांची धास्ती घेतली आहे हे त्याला माहीत होते. तो झुल्फिकारखानाची वाट पाहात होता, आणि तो येईपर्यंत वेळ काढण्यासाठी म्हणून तहाच्या वाटाघाटी करीत होता. छावणीत हलकल्लोळ झाला, तरी त्याच्या चेहऱ्यावरची सुरकुतीसुद्धा वाकडी झाली नव्हती.

झुल्फिकारखानाला बुऱ्हाणपुराहून खजिना घेऊन येण्याचे काम सांगण्यात आले होते. तो आला. त्याच्याबरोबर त्याचे डावे उजवे हात असलेले राव दलपत व रामसिंग हाडाही आले. जिंजीचा नायब सुभेदार दाऊदखान पन्नी, गुलबर्ग्याचा

कामयाबखान, कर्नूलचा किल्लेदार यूसुफखान, जमशीदखान विजापुरी इत्यादि अनेक किल्लेदार आणि फौजदार छावणीत येऊन दाखल झाले. पण सरदारांचा सरदार खरा पठ्ठ्या झुल्फिकारखान होता. तो आल्यावर बादशहाच्या जीवात जीव आला. मोगल सरदारात तेवढा एकच असा होता की ज्याला मराठे थोडफार भीत असत. भीमसेन म्हणतो " मराठ्यांना स्वप्नात जरी झुल्फिकारखान याचे नाव कानी पडले तरी ते बेशुद्ध होत. मराठ्यांनी झुल्फिकारखानाची धास्ती घेतली होती. त्याच्यासमोर ते टिकत नसत. त्याच्यापासून तीस—चाळीस कोस लांब वावरत. "

झुल्फिकारखानाने बादशहाची भेट घेतली व सपाट्यासरशी तो वाकिण-खेड्याच्या दरवाजापाशी आला. त्याने आसपासच्या स्थळांची काळजीपूर्वक पाहणी केली व ज्या टेकडीवरून पूर्वी हमीदुद्दीनखानाला बेरडांनी हाकलून दिले होते तेथे तो पोचला. त्याच्यावर बेरडांनी हल्ला केला. डोंगर व खडक यांचा आश्रय करून ते गोळीबार करू लागले. मोगल सैन्य हाणामारी करीत टकडी-पर्यंत पोचले. तेव्हा बेरडांनी किल्ल्याच्या दरवाजासमोर पायथ्याशी अस-लेल्या तिलवारा या खेड्यात आसरा घेतला. तेथेही राव दलपत त्यांच्यावर चालून गेला. दुसऱ्या एका टेकडीवर बेरडांनी गर्दी केली होती. त्यांच्यावर झुल्फिकार-खान चालून गेला. झुल्फिकारखानाने किल्ल्यासमोरील दोन्ही टेकड्या अखेर काबीज केल्या.

ही लढाई फार निकराची झाली. राव दलपतचे राजपूत भाले आणि तलवारी यांनी लढत होते. बेरड बाण आणि बंदुकांचा भडिमार करीत होते. कितीतरी रजपूत ठार झाले. भीमसेन राव दलपतच्या मागे हत्तीवर चिलखत घालून बसला होता. तो म्हणतो – "या लढाईत राव दलपतच्या हत्तीला एक बाण आणि बंदुकीच्या सत्तावीस गोळ्या लागल्या. झुल्फिकारखानाचा झेंडा हातात धरलेले हत्तीवरील दोन माहूत जखमी झाले व एक मारला गेला. झेंड्याच्या वस्त्राला गोळ्यांच्या माऱ्यांनी, मगरीच्या कातड्याला पडावी तशी असंख्य भोके पडली होती. सैन्याच्या आघाडी आणि पिछाडीवरील अनेक सैनिक मारले गेले अगर जखमी झाले. "

झुल्फिकारखानाने आता वरून आडोसा प्राप्त करून देणारे मार्ग तयार केले व त्यातून सरकत सरकत तो थेट किल्ल्याच्या तटाशी जाऊन भिडला. त्याने बेर-डांच्या विहिरी ताब्यात घेतल्या व त्याचे पाणी तोडले. आता खेळ खलास झाला असे समजून बेरडांनी तहाचे नाटक बंद केले व चीनकिलीजखान व कामबक्श यांना मध्ये घालून तहासाठी ते बादशहाची आर्जवे करू लागले. पण झुल्फिकार-खानाने त्यांच्या विनवण्याकडे बिलकुल लक्ष दिले नाही. त्याने दाऊदखान पन्नी, रामसिंग हाडा व राव दलपत यांना बरोबर घेऊन बेरडांच्या तिलवारा या

खेडयावर हल्ला केला. त्याही वेळी बेरडांनी त्याच्याशी भयंकर मारामारी केली. पण अखेर झुल्फिकारखानाने खेडयावर कबजा मिळविला. अशा प्रकारे बेरडांची सर्व प्रकारे नाकेबंदी करून २७ एप्रिल १७०५ रोजी वाकिणखेडयाच्या किल्ल्यावर त्याने अखेरचा हल्ला चढविला.

खाफीखान म्हणतो, "त्या दिवशी बादशहा स्वतः घोडयावर स्वार होऊन मुद्दाम गोळयांच्या टप्प्यात येऊन उभा राहिला. मराठयांचे किल्ले घेताना बादशहाचा हेतु जिहाद करणे आणि त्या कार्यांत शहीद होणे (धर्मयुद्धात मृत्यु येणं) हा होता. त्याचप्रमाणे तो आता किल्ल्याजवळ आला." खाफीखानाचे म्हणणे खोटे मानण्याचे काही कारण दिसत नाही. कारण, औरंगजेब मरणाला नुसताच तुच्छ मानीत नव्हता, तर मरणाला आपण केवळ तुच्छ मानतो याची जाहिरात करण्याची त्याला भलतीच हौस होती. मोगल किंवा बेरड काय; दोघांचीही ही अखेरची लढाई होती, त्यामुळे दोघेही प्राणपणाने लढले हे सांगणे नकोच. "काफरांनी इतक्या निकराने हल्ला केला की कित्येकांना पाय उतारा होऊन लढावे लागले–" दोन्हीकडचे अनेक लोक ठार झाले व जखमी झाले. "माणसे इतकी मरून पडली की जग म्हणू लागले, आता पुरे. हद्द झाली." पण अखेर मोगलांनी बाजी मारली. ते बेरडांचा पाठलाग करीत किल्ल्याच्या दरवाजापर्यंत पोचले व त्यांनी तेथे झेंडा लाविला.

तेव्हा पिडनायकाने दोन हजार बर्कंदाज दरवाजापाशी ठेवले. भयंकर रणधुमाळी माजली. तेवढया अवधीत आपली बायकापोरे आणि नेता येईल तेवढे सामान घेऊन पिडनायकासकट सगळे बेरड किल्ल्यातून पसार झाले व मराठयांना जाऊन मिळाले. जाताना त्यांनी घरादारांना स्वतःच्या हाताने आगी लावून दिल्या. त्या आगीचे लोळ आठ मैलांवरून दिसत होते. संध्याकाळच्या सुमारास मोगलांच्या तोंडावरचे बर्कंदाजही फरारी झाले.

किल्ल्यातून उठणाऱ्या आगीच्या प्रचंड ज्वाळा दिसू लागल्या. किल्ल्यावरून होणारा गोळयांचा वर्षावही कमी कमी होत पार थांबला. तेव्हा मोगल किल्ल्यात घुसले. तेथे चिटपाखरू नव्हते. त्यावरून बेरडमंडळींनी पलायन केल्याचे त्यांच्या ध्यानात आले. घरामागून घरे धडाडा जळत होती. एका खोलीतून किंकाळया ऐकू आल्या म्हणून मोगलांनी लगबगीने तेथे जाऊन पाहिले. त्या बंद खोलीत वाकिणखेडयाचे होऊ घातलेले किल्लेदार मुहतशिमखानसाहेब सैरावैरा धावत होते. आगीच्या ज्वाळा त्या खोलीपर्यंत येऊन भिडल्या होत्या आणि कोणी आपणास वाचवावे म्हणून तोंडावर हात घेऊन किल्लेदारसाहेब जिवाच्या आकांताने शंखवाद्याचा प्रयोग करीत होते. त्यांचा पाञ्चजन्य वेळेवर मोगलांच्या कानी पडला म्हणून बरे झाले. नाही तर, थोडा गाफीलपणा होण्याची खोटी की, बेरडांनी पेटविलेल्या त्या आगीत किल्लेदारांना सद्‌गति प्राप्त व्हायला वेळ लागला

नसता. मोगल सैनिकांबरोबर नेहमीप्रमाणे लुटालूट करण्यासाठी हौशा आणि गवशा मंडळींचा प्रचंड लोंढा किल्ल्यात घुसला होता. ते लोक मुहतशिमखाना-इतके भाग्यवान ठरले नाहीत. आग पसरत पसरत एका दारूच्या कोठारापाशी आली. प्रचंड भडका उडाला आणि स्फोट झाला. बेरडांच्या वस्तु लांबविण्यासाठी आलेली मोगलांकडची अनेक जिज्ञासू आणि संशोधक मंडळी त्या स्फोटात भस्म-सात् झाली. त्यांच्याच तुटलेल्या मुंडक्यांचे व तंगड्यांचे संशोधन करण्याची वेळ त्यांच्या बायकापोरांवर आली.

अशा प्रकारे वाकिणखेड्याचा किल्ला अखेर सर झाला. हे सारे श्रेय खरे म्हणजे झुल्फिकारखानाचे होय. पण औरंगजेब तरी किती विक्षिप्त पहा. झुल्फि-कारखान जेव्हा त्याला मुजरा करायला म्हणून गेला, तेव्हा आता नाही, पुन्हा दुसऱ्या वेळी तुझी भेट घेईन, म्हणून त्याने त्याला सांगून पाठविले आणि इकडे ज्या मंडळींनी काही काम केले नव्हते त्यांच्यावर मनसबींची खैरात केली. आता हा चीनकिलीजखानच घ्या. या इसमापेक्षा त्याच्या घोड्यानेच लढाईत जास्त काम-गिरी बजाविली असे म्हटले पाहिजे. कारण तो खरोखरच बेरडांचा गोळा लागून लढाईत कामी आला. खुद्द चीनकिलीजखानाने, ज्या वेळी जिवाची बाजी लावून झुल्फिकारखान टेकडी काबीज करण्यासाठी लढत होता, त्या वेळी इकडची काडी तिकडे केली नाही. टेकडीच्या मागे तो त्याची गंमत पाहात स्वस्थ उभा राहिला. झुल्फिकारखानाच्या मदतीस जाण्याबद्दल बादशहाने त्याला सांगितले असता तो गेला नाही, उलट झुल्फिकारखानानेच आपणास काही मदत केली नाही असे गाऱ्हाणे बादशहापाशी त्याने गायिले आणि ते बादशहाने खरे मानले. त्याला या प्रसंगी बादशहाने दीड कोटी दाम बक्षीस दिले व एक हजाराची त्याच्या मनसब-दारीत वाढ दिली. तसाच काझी अकराम. धर्मशास्त्र पढावयाचे व बादशहाला दुवा देऊन स्वस्थ बसायचे एवढेच याचे काम. त्याने या लढाईत कुठे तलवार मारल्याचे त्यालाही माहीत नव्हते, व बादशहालाही माहीत नव्हते. पण बादशहा खूष झाले व त्याला त्यांनी हजारी मनसबदार बनवून टाकले. तसेच महंमद अमीनखान, हमीदुद्दीनखान, तरबियतखान यांच्या मनसबीत पाचपांचशेंची वाढ फर्माविण्यात आली. वस्तुतः या लोकांना, त्यांचा कसलाही मुलाहिजा न करता, बेरडांनी टेकडीवरून गचांड्या मारून हाकलून दिले होते. त्या त्या नाकर्त्या माणसांना बादशहाने शाबासकी दिली व बिचाऱ्या झुल्फिकारखानाची मात्र भेट घ्यायलाही नकार दिला. अखेर भेट घेतली तेव्हा त्याचे कौतुक करणे तर दूरच राहिले. उलट खत्रूडपणाने ‘बेरड सुरक्षितपणे जाऊ कसे शकले’ असा त्याला ठपका दिला. राव दलपत हा झुल्फिकारखानाचा उजवा हात होता, पण त्याला दिलेली बढती ही इतकी क्षुल्लक होती की, त्याला ती पतकरायचीही लाज वाटली. तो बादशहापाशी अभिनंदनाचा मुजरा करण्याससुद्धा गेला नाही. हा सर्व

प्रकार वर्णन करून भीमसेन मोठ्या उद्वेगाने शेरा मारतो की, "बादशहाच्या मर्जीप्रमाणे न वागणाऱ्यावर बादशहाची जास्त कृपा होते असे दिसते."

पण औरंगजेब वाटला तितका विक्षिप्त नव्हता. आपले सरदार कसे आहेत हे तो चांगले ओळखून होता. बादशहालाही खूष करायचे आणि बादशहाच्या शत्रूंनाही खूष करायचे, असले दोन डगरींवर हात ठेवणारे झुल्फिकारखानाचे उभयान्वयी राजकारण आज तो कित्येक वर्षे पाहात होता. त्याच्या असल्या राजकारणामुळेच राजाराम जिंजीतून सुखरूप निसटला. झुल्फिकारखान हा त्यातल्या त्यात काम करणारा माणूस होता इतकेच. पण या संधिसाधु व दुटप्पी राजकारणाच्या बाबतीत झुल्फिकारखान, रुहुल्लाखान, फिराजजंग, हमीदुद्दीनखान हे मोगल सरदार सगळे एका माळेचे मणी होते. त्यांच्या बेइमान व दुटप्पी राजकारणामुळे तर दक्षिणेतले युद्ध संपता संपत नव्हते व उत्तरेत आपण नसल्यामुळे बेबंदशाही माजली आहे हे दिसत असूनही, बिचाऱ्या बादशहाचे पाऊल दक्षिणेतून निघता निघत नव्हते. इरादतखान म्हणतो, त्याप्रमाणे कधी कधी आपल्या विश्वासू अधिकाऱ्यांना तो कळवळून म्हणे सुद्धा की, "माझ्या लबाड सेनापतींनी हा खेळ खेळण्यास मला भाग पाडले आहे. त्यांना सेनाधिपत्य आणि मानसन्मान ही हवी आहेत ना!"

त्याने झुल्फिकारखानाला दिलेला ठपका बरोबर होता. किल्ला आला पण बेरड पळाला. बीळ ताब्यात यावे पण नाग जिवंत निसटावा तसे झाले. हा पिडनायक पुढे चांगला वीस वर्षे जिवंत होता. त्याने वाकिणखेडा परत जिंकून घेतला. औरंगजेबाने उभारलेली मशीद त्याने जमीनदोस्त केली. औरंगजेबाने पाडलेले गोपालस्वामीचे मंदिर त्याने परत उभे केले. मिळून औरंगजेबाच्या सगळ्या खटाटोपावर, पालथ्या घड्यावर पाणी पडावे तसे पडले. मनुची म्हणतो की, वाकिणखेड्याच्या वेढ्यात मोगलांचे सात हजार सैनिक आणि बारा नामांकित सेनानी ठार झाले. ते जर खरे असेल, तर तो अधिकच दु:खाची गोष्ट म्हटली पाहिजे. आणि या नुकसानीला आणि औरंगजेबाच्या कामावर बोळा फिरवायला पिडनायकापेक्षाही त्याला सुखरूप निसटू देणारा झुल्फिकारखानाचा स्वार्थसाधुपणा जास्त जबाबदार धरला पाहिजे.

पण हे पुढे झाले. आज तर सर्वत्र आबादीआबाद होते. वाकिणखेडा सर झाला होता. आपल्या नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे किल्ल्याला औरंगजेबाने पावन करून घतले व 'रहमानबक्ष खेडा' असे नवीन नाव त्याला ठेवले. पिऱ्या नाईकाचे गोपालस्वामीचे मंदिर त्याने पाडले आणि त्याच्याच दगडविटा वापरून एक झक्कपैकी मशीद तेथे उठवून दिली. पावसाळाही जवळ आला होता. म्हणून फौजेला विश्रांति देण्यासाठी तेथून सहा मैलांवर असलेल्या कृष्णाकाठच्या देवापूर या रमणीय खेड्यात त्याने मुक्काम ठोकला.

पुढे काय हा प्रश्न होता. औरंगजेबाने ठरविल्याप्रमाणे महाराष्ट्र जिंकला होता. कर्नाटकातले विजापूर आणि गोवळकोंडा जिंकले होते. आणखी दक्षिणेला जाऊन वाकिणखेडा काबीज केला होता. तामिळनाडूकडचा जिंजी, वेलोर भाग पूर्वीच त्याच्या सरदारांनी साम्राज्याला जोडला होता. आता त्याने म्हैसूरवर स्वारी करण्याचे ठरविले. वस्तुतः म्हैसूरच्या राजाने त्याचे काही वाकडे केले नव्हते. उलट १६९९ त म्हैसूरच्या चिक्क देवरायाने त्याच्याकडे आपला वकील पाठविला होता आणि औरंगजेबानेही त्याला 'जगतराज' ही पदवी दिली होती. पण म्हैसूरवर आक्रमण करण्याचे औरंगजेबाचे खरे कारण अगदी वेगळे होते. त्या राज्याची जवळ जवळ अगणित संपत्ति पाहून त्याच्या तोंडाला पाणी सुटले होते. ते राज्य इतके समृद्ध होते की खर्चवेच वजा जाता वर्षाला निव्वळ अकरा कोटि रुपये त्या राजाला फायदा उरत असे. 'भार्या रूपवती शत्रुः' असे म्हटले आहे. वसुंधरा ही राजाची भार्याच समजली जाते. ती नावाप्रमाणेच वसुंधरा म्हणजे समृद्ध असली तर भूपतीला बाधक झाल्याशिवाय राहात नाही. आकाराने छोटे पण संपत्तीने मोठे असलेले ते म्हैसूरचे राज्य गिळंकृत करायला औरंगजेबाला सबबींची वाण मुळीच नव्हती. त्या बाबतीत तो खरोखरच प्रत्युत्पन्नमति होता. सुदैवाने त्याच्याशी मैत्री करून त्याची गैरसोय करू पाहणारा चिक्क देवराय मेला असल्यामुळे औरंगजेबाचा मार्ग सोपा झाला होता. आता म्हैसूरच्या गादीवर आलेला कण्ठीराय हा त्याचा मुलगा नव्हता, पुतण्या होता; आणि तो बहिरा होता. निमित्तालाच टेकलेल्या औरंगजेबाला एवढे कारण पुरेसे होते. पुतण्या म्हणजे मुलगा होऊ शकत नाही, व त्यामुळे कण्ठीराय हा गादीचा कायदेशीर वारस म्हणून आपण ओळखत नाही असा पुकारा करून त्याने तंजावर, त्रिचनापल्ली इत्यादि आपल्या मांडलिकांना म्हैसूरवरील आपल्या मोहिमेत संपूर्ण सहकार्य करण्याची ताकीद दिली. इतकेच नव्हे, तर पावसाळा संपण्याच्या सुमारास म्हैसूरकडच्या नद्यांना पाणी किती असते, याचा शोध घेण्यासाठी त्याने माणसेसुद्धा रवाना केली.

म्हैसूरच्या राज्यावर स्वारी करणे म्हणजे तोंडच्या गप्पा नव्हेत हे औरंगजेब खूप जाणून होता. त्या राजाची संपत्ति पाहून लोभाने जिभल्या चाटणारा औरंगजेब हा काही पहिलाच इसम नव्हता. गोवळकोंड्याच्या अब्दुल्ला कुतुबशहाच्या रसनेच्या ग्रंथीसुद्धा अशाच पाझरू लागल्या होत्या आणि त्यानेही म्हैसूरचा अद्‌भुत खजिना ताब्यात घेण्यासाठी स्वारी करण्याचा उपद्‌व्याप करून पाहिला होता. पण त्यात त्याची फजिती झाली होती. धनाच्या हंड्यावर नाग असावा त्याप्रमाणे म्हैसूरच्या राजापाशी एक लाख बाके बर्कंदाज आणि दहा हजार घोडदळ जय्यत तयार होते. खेरीज शंभर बुलंद किल्ले होते आणि महाराष्ट्राप्रमाणे तो प्रांत घनदाट जंगलांनी नुसता गजबजलेला होता. या लोकांची शत्रूला शासन करण्याची

पद्धतही मोठी भयंकर होती. कुतुबशहाच्या सैनिकांची त्यांनी मुंडकी छाटली नाहीत, तर नाके छाटली आणि जन्माचे विद्रूप करून त्यांना जिवंत सोडून दिले. असल्या शिक्षेपेक्षा मरण परवडले. आणि नाके छाटण्याच्या कलेत हे लोक इतके पटाईत असत की, डोंगरदऱ्यांतून घोडा उडवीत शत्रू चाललेला दिसावयाचा अवकाश, की मागून येऊन टुणकन् उडी मारून ते घोड्याच्या पाठीवर बसत आणि हातातल्या अर्धचंद्राकृति फरशीच्या पात्याने पुढे बसलेल्या स्वाराचे नाक डोळ्याचे पाते लवते न लवते इतक्यात बुडख्यापासून साफ छाटून टाकत. त्यामुळे त्यांच्या देशात पाऊल घालायचे म्हणजे परक्या माणसाच्या अंगाला कापरेच भरे. पण औरंगजेबाचे सगळे आयुष्य लढाया खेळण्यात व लढाया खेळविण्यात गेले होते. आजीबाईच्या भुताखेतांच्या भाकडकथा सारख्या असल्या बाष्कळ गोष्टींनी डरणारा माणूस तो नव्हता. त्याच्या बेतात काही एक बदल झाला नाही.

खरेच, वयाला अठ्ठयाऐंशी वर्षे होऊन गेली तरी औरंगजेबात काही एक बदल झालेला नव्हता. त्याचे सुरूच्या झाडासारखे शरीर आता वाकले असले तरी पूर्वीप्रमाणे सडपातळ आणि तरतरीत राहिले होते. उन्हात, पावसात, हत्तीवर, घोड्यावर, मेण्यात, पालखीत स्वारी करूनही ते पूर्वीप्रमाणेच काटक आणि टणक राहिले होते. वयाच्या अठ्ठयाऐंशीव्याही वर्षी त्याचे बत्तीसपैकी तीस दात अजून मौजूद होते. त्याची दृष्टि घारीसारखी तीक्ष्ण होती. अजूनही लोकांचे अर्ज हातात घेऊन चष्मा लावल्याशिवाय तो वाची आणि स्वतःच्या हाताने त्याच्यावर शेरे लिही. त्याचे अक्षर अजूनही वळणदार आणि ठसठशीत होते; कापरे किंवा किरटे नव्हते. अजूनही त्याच्या हाताला कंप सुटला नव्हता. त्याची स्मरणशक्ति उत्तम होती. एकदा पाहिलेला चेहरा, एकदा ऐकलेला शब्द, एकदा वाचलेले अक्षर तो कधीही विसरत नसे. फक्त फार वर्षांपूर्वी तो तापाने फणफणला असता कलिंगडे खाण्याचे कुपथ्य त्याने केले. त्यामुळे काही दिवस जिभेवरून वारे जाऊन त्याची वाचाच बसली होती; तो दोष पूर्णपणे कधीच दुरुस्त झाला नाही; त्यामुळे बोलताना त्याची जीभ थोडी जड असे आणि त्याचे शब्द थोडे तोतरे आणि बोबडे येत. तसेच खवासपूरला माण नदीला रात्री पूर आला असता अंधारात गडबडीने चालत असता त्याचा पाय घसरून गुडघा लचकला होता; त्याचा हकीम मूर्ख निघाला, त्याने गुडघा दुरुस्त करण्याऐवजी आणखी मोडून ठेवला. त्यामुळे तो चालताना नेहमी लंगडत असे. एवढ्या दोन गोष्टी सोडल्या तर बाकी सर्व बाबतीत औरंगजेब 'अभी तो मैं जवान हूँ' असा अगदी नवजवान होता. पण लोकांच्या लक्षात आपला पांगळेपणा येऊ नये म्हणून तो काय करी, की दरबारात येण्यापूर्वी सिंहासनापुढे पडदा सोडून ठेवण्याचा हुकुम करी आणि आपण आसनस्थ झाला म्हणजे पडदा दूर करायला सांगे. इतकी स्वारी बेरकी.

त्याच्या शरीराप्रमाणे त्याचे मनही मोठे टणक होते. आयुष्यात औरंगजेब मनापासून किती वेळा ढळढळा रडला याचे संशोधन करणाऱ्याच्या पदरी घोर निराशा येईल असे वाटते. गेल्या पंचवीस वर्षांत दुष्काळ पडला, पूर आले, रोगांच्या साथी आल्या, लढाया झाल्या, लोक किड्यामुंग्यांसारखे पटापट मेले, पण पठ्ठयाच्या डोळ्याला पाण्याचे टिपूससुद्धा आले नाही. एखाद्या फाजील हळव्या कामगाराने अशा हकीकती त्याला गहिवरून सांगितल्या तर तो फक्त हसे. फारच झाले तर म्हणे की, 'असा संहार होतो तेव्हाच तैमूरलंगासारखी कीर्ति मिळते, समजले ?'

त्याचा सगळा जन्म लढाईत गेला होता. पण लढाईचा त्याला काही कंटाळा आलेला नव्हता. मनूचीने त्याचे चांगले वर्णन केले आहे. औरंगजेब मोहिमेवर चालला म्हणजे त्याच्या हालचाली मोठ्या पाहण्यासारख्या असत. पालखीत बसलेला असला म्हणजे तो म्यानातून तलवार काढी, ती डावी उजवीकडे फिरवी, कापडाच्या तुकड्याने ती साफसूफ करी, आणि परत म्यानात ठेवून देई. आपल्या धनुष्यबाणाशीही तो असाच खेळ करी. आणि हा उद्योग चालू असता स्वारी स्वतःशीच हसत असे. 'पडिले वळण इंद्रिया सकळा' याचा यापेक्षा उत्तम नमुना शोधून तरी सापडला असता काय ? म्हातारपणामुळे त्याच्या शरीराचे धनुष्य झालेले होते आणि त्याची शुभ्र दाढी छातीवर अशी रुळलेली असे की वाटावे जणु त्याच्या घशातूनच ती बाहेर आली आहे. कामदार येऊन त्याला काही सांगू लागले म्हणजे तो अगदी हळुहळू आपली मान वर करी व सरळ बसे. मग असे एकदाच सणसणीत उत्तर देई की पुन्हा प्रश्न विचारायचे कामच पडू नये. असल्या स्थितीतही सैन्यातली बारीक सारीक गोष्ट काही त्याच्या नजरेतून सुटत नसे.

आरोग्य राखणे ही कला आहे आणि औरंगजेबाला ती पूर्णपणे साध्य झाली होती यात शंका नाही. त्याची जीभ ही केवळ त्याची बटीक होती. आणि रमजानचा उपास तर तो फार कडकपणे पाळी. त्या दिवसांत तो रात्री सहापासून नऊ तासापर्यंत कुराण वाचीत बसे. एकदा चार महिने आकाशात धूमकेतु दिसत होता तेव्हा तर तो थोडीशी ज्वारीची भाकरी आणि पाणी यांच्यावर राहिला व वाघाचे कातडे आंथरून जमिनीवर झोपला. त्याने त्या वेळी शरीराला इतके कष्ट दिले की तो अगदी मरायला टेकला. जो जेवणाच्या बाबतीत इतका विरक्त तो दारूला शिवत नसेल हे काय सांगायला पाहिजे ? त्याच्या आवडीची फळे इतकी साधी होती की त्यांचे नाव ऐकले तर आपल्याला हसूच कोसळेल. त्याला करवंदे फार आवडत असत. मराठ्यांच्या देशात राहून औरंगजेब पक्का मराठा बनला होता आणि त्यांच्याप्रमाणेच त्यांच्या डोंगरचा हा मेवा तो मिटक्या मारीत खात असे. फार पूर्वी त्याच्या जीवनात स्वप्नाप्रमाणे आलेली व स्वप्नाप्रमाणेच गेलेली झैनाबादी सोडली तर औरंगजेबाच्या आयुष्यात स्त्रीला स्थानच नव्हते असे म्हटले

तरी चालेल. या बाबतीत त्याचे चारित्र्य अगदी धुतल्या तांदळासारखे, कित्ता घेण्यासारखे होते. त्याचे कपडे तर इतके साधे असत की मनूची म्हणतो त्याप्रमाणे त्याच्या अंगावरच्या काव्याची किंमत दहा रुपड्यांइतकी सुद्धा नसेल. फुरसत असली म्हणजे तो धर्मशास्त्र वाची, किंवा कुराणाच्या प्रती करी, किंवा पैगंबराने प्रत्येकाला निर्वाहासाठी सांगितला आहे त्यांपैकी टोप्या विणण्याचा धंदा करी. राज्याचा पैसा स्वतः खाण्यासाठी आहे असे तो मानीत नसे. सारांश, मोजके खाणे, मोजके बोलणे, मोजके झोपणे अशा नेमस्त शिस्तीमुळे औरंगजेब त्याच्या काळातला शंभरी गाठलेला शतकवीर व्हायला कोणतीच हरकत नव्हती. त्याला स्वतःला तसेच वाटे व इतरांनीही तसेच समजावे अशी त्याची अपेक्षा असे.

हे मात्र जरा गैरसोयीचे होते. त्याची मुले आता नुसतीच मोठी झाली नव्हती तर तीही मुलांचे बाप होऊन म्हातारी होऊ लागली होती. त्यांच्या दाढ्या पिकू लागल्या होत्या. थोरला मुलगा मुअज्जम हा चौसष्ट वर्षांचा होता, धाकटा आजम त्रेपन्न वर्षांचा होता. सर्वांत धाकटा कामबख्श हा एकूणचाळीस वर्षांचा होता. या मुलांना जर वाटले की आपले बाबा आता म्हातारे झाले, त्यांनी राज्याचा भार आपणावर सोपवावा व स्वतः देवाचे नाव घेत सुखाने स्वस्थ काळ कंठावा, तर त्यात नवल काहीच नव्हते. पण आपण म्हातारे झालो आहोत हेच बाबांना कबूल नव्हते, हीच तर खरी अडचण होती. एकदा मुअज्जम औरंगजेबासमोर बसला असता मनात काही उदास विचार येऊन त्याने गफलतीने आपल्या अंबाडीप्रमाणे पांढऱ्या झालेल्या दाढीवरून हात फिरविला. औरंगजेब पक्का मनकवडा, त्याने मुलाच्या मनात काय चालले आहे ते बरोबर ताडले व त्याचे मायाळूपणाने सांत्वन केले, ‘मुला इतक्यातच तू स्वतःला त्रास करून घेऊ नकोस. तुला राज्य मिळायला अजून फार फार अवकाश आहे बरे.’ आपल्या वस्ताद बापाकडून अशा कानपिचक्या मिळाल्यावर मुअज्जमला इतकी लाज वाटली की, मान खाली घालून तो तेथून चालता झाला. औरंगजेबाचा सर्वांत धाकटा मुलगा कामबख्श हा त्याचा विशेष लाडका होता. ते त्याचे शेंडेफळच होते, त्या कामबख्शाला मुलगा झाला, म्हणून, शिरस्त्याप्रमाणे बादशहाने त्याचे नाव ठेवावे अशी त्याने औरंगजेबाला विनंती केली. औरंगजेबाने त्याच्या विनंतीला मोठे इरसाल उत्तर दिले– “या बाळाचे नाव तू ठेव. या बाळाला जे बाळ होईल की नाही, त्याचे नाव मी ठेवीन बरे.” औरंगजेबाच्या असल्या मासलेवाईक उत्तरांनी त्याच्या मुलांनी वरकरणी कितीही संतोष दाखविला, तरी आतून ते जळफळत असत. तो शतायु काय, चिरायु झाला असता तरी त्यांची काही हरकत नव्हती. पण मरेपर्यंत मीच बादशहा राहणार या हट्टाने तो जी जागा अडवून बसला होता, त्यामुळे ते दुःखी होते. औरंगजेबाला हे सर्व समजे आणि त्यामुळे त्याला आतून अगदी गुदगुल्या होत. एकदा तर भर दरबारात तो म्हणाला, ‘खरे बोलायचे म्हणजे वाणी आणि

दृष्टि या दोन गोष्टी राजे लोकांपाशी असल्या म्हणजे बस्स आहे. परमेश्वराने माझ्या या दोन गोष्टी तर शाबूद ठेवल्या आहेतच, पण आणखी कृपा दाखवून, या शहाऐंशीव्या वर्षीसुद्धा बत्तीसांपैकी तीस दात अजून जसेच्या तसे भक्कम ठेवलेले आहेत. खरोखर, हे सगळे पाहता आजपासून मी स्वतःला दुसरा तैमूरलंग कां म्हणवून घेऊ नये, हे मला कळत नाही.'

पण कितीही जपले तरी ते शेवटी माणसाचे शरीर आहे. क्षणाक्षणाला झिजत जाते ते शरीर–'शीर्यते क्षणंक्षणं इति शरीरम्' अशीच मुळी त्याची व्याख्या केली आहे. पूर्णातून पूर्ण वजा केले तरी पूर्णच शिल्लक राहते असला चेतन आत्म्याचा 'पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते' असा हिशेब त्या जड शरीराला कसा लागू पडेल ! बाहेरून बाभळीचे झाड कितीही ताठ उभे असले तरी कणाकणाने, क्षणाक्षणाने ते पोखरले जातच असते. औरंगजेबाच्या बाबतीत असेच झाले. देवापूर मुक्कामी तो सप्टेंबर महिन्यात सांधेदुखीने आणि तापाने सपाटून आजारी पडला पण त्याची इच्छाशक्ति जबर आणि आपण आजारी पडलो आहोत हे दाखविण्याची त्याला सोयच नव्हती. त्यामुळे पहिले चार पाच दिवस त्याने शरीर तापाने फणफणले असताही, न्याय देण्याचे आणि दरबार भरविण्याचे वगैरे काम नेहमीप्रमाणे रेटून तसेच चालविले. पण चाबकाच्या जोरावर दामटत नेलेल्या घोड्याने थकून अंग टाकावे व भुईवर लोळण घ्यावी त्याप्रमाणे अखेर तो अगदी अंथरुणाला खिळला, अशक्तता इतकी कमालीची आली की मधून मधून त्याची शुद्ध हरपू लागली. एकदा तर तीनचार तास त्याचीं दातखीळच पार बसली होती आणि एक अक्षर ·काही त्याला बोलवेना. एवढे झाल्यावर मात्र त्याच्या आजाराची बातमी जगजाहीर झाली. बादशहा मेला म्हणून छावणीत एकच बोंब उठली आणि हाहाकार उडाला. आता नुकते कुठे मोहिमेच्या तापत्रयातून त्याचे सैन्य मोकळे होऊन आराम पावत होते तोंच बादशहाने आजारी पडून त्यांच्या रंगाचा बेरंग केला. तो बरा असलेला सैन्याच्या दृष्टीने बरे असे की आजारी असलेला बरे असे, या कोड्याचे उत्तर त्यांच्यातल्या शहाण्यांतल्या शहाण्या माणसाला तरी देता आले असते कीं नाही, याची वानवाच होती. त्याचे व त्याच्या सैन्याचे ग्रहच काही विचित्र होते. तो बरा असला म्हणजें आपल्या मागे पावसापाण्यातून सैन्याला हडेलहप्पीपणाने मोहिमेवर फरफटत चालवी आणि आजारी असला म्हणजे त्याच्या मरायच्या भीतीने ते घाबरे होऊन जात. आताही तसेच झाले. जर का बादशहा खरोखरच मेलेला असेल, तर काफरांनी भरलेल्या या भयंकर प्रदेशातून आपणांपैकी एकजण जिवंत परत जाऊ शकणार नाही या धास्तीने लोकांच्या तोंडचे पाणी पळाले.

अशी स्थिति दहाबारा दिवस होती. त्या अवधीत जीवनमरणाच्या सीमारेषेवर बादशहा व त्याच्या बरोबर आशानिराशेच्या सीमारेषेवर त्याचे सैनिक हेलकावे

खात होते. अखेर बादशहा सावरला. सादिकखानाच्या औषधाने त्याला गुण आला आणि त्याच्याबरोबर त्याच्या सैनिकांच्याही जिवात जीव आला. पण बादशहा बरा झाला असला तरी त्याला कमालीची अशक्तता आली होती; आणि आजाराने शरीर चिपाड झाले असले म्हणजे मनही विषण्ण होते हा नेहमीचा अनुभव आहे. अशा विषण्ण मनःस्थितीत बादशहाने अगदी क्षीण आवाजात एकदा एक कविता म्हटली—

बहश्ताद व नव्वद चूं दर रसींदी । बसा सख्ती के अज दौरां कशीदी
व अज आंजा व सद मंजिल रसानी । बुबद मर्गे व सूरत जिंदगानी

"आयुष्यात तुम्ही ऐंशी किंवा नव्वद वर्षांच्या घरात पोचेपर्यंत तुम्ही काळाचे तीव्र तडाखे अनुभविले असतील. त्यानंतर तुम्ही शंभराच्या घरात आलात की मृत्यूच जीवनाचा आकार धारण करून येईल." त्याचा खास सेवक अमीरखान त्या वेळी जवळच होता. त्याच्या कानावर बादशहाचे हे शब्द पडल्यावर तो अदबीने पुढे होऊन बोलला. "हजरत सलामत, कवि शेखगंजा यांनी या ओळी लिहिल्या खऱ्या, पण या ओळींचा नीट अर्थ समजावा म्हणून त्यांनी या दोन ओळी म्हटल्या आहेत—

पस आं बेहत्तरके खुदरा शाद दारी । दरां शादी खुदारा याद दारी

आणि म्हणून तू संतुष्ट राहावेस आणि त्या संतोषात परमेश्वराची आठवण ठेवावी हेच योग्य होय." यावर बादशहा म्हणाला "त्या ओळी पुन्हा म्हण बरे." अमीरखानाने त्या म्हटल्या बादशहाने त्या पुन्हा पुन्हा त्याच्याकडून म्हणवून घेतल्या. तेवढ्यावर त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्याने त्या कागदावर लिहून मागितल्या. तो कागद बराच वेळ बादशहा वाचीत बसला. दुसऱ्या दिवशी प्रथम तो न्यायालयात आला आणि अमीरखानाला म्हणाला. "तुझ्या ओळींनी मला आरोग्य लाभले आणि माझी गेलेली शक्ति परत आली." त्याचे म्हणणे खरे होते. अमीरखान हा त्याचा नोकर होता. त्याची खुशामत करण्याचे बादशहाला कारणच नव्हते. तो जे बोलला ते चांगल्या वाङमयासंबंधीचे सनातन सत्यच बोलला. वाङमय हे मनाचे आजार बरे करणारे औषधच मानले आहे. "जे, जे मनु बोलला ते ते औषधच होते– यत्किञ्च मनुरब्रवीत् तद्वै भेषजम् ।' हा केवळ अर्थवाद नव्हे, ती वस्तुस्थिति आहे. जे मनूबद्दल, तेच कवि शेखगंजाबद्दल, तेच सर्व विचारवंतांबद्दल.

ज्या धन्वंतऱ्याने आपल्या उपचारांनी बादशहाला या प्रसंगी मृत्यूच्या दाढेतून ओढून काढले त्या सादिकखानाची बादशहाने सुवर्णतुला करविली व त्याच्या वजनाइतक्या भारंभार सोन्याच्या अश्रफ्या त्याला बक्षीस दिल्या. मनूचीच्या म्हणण्याप्रमाणे त्याची रौप्यतुला केली व त्याच्या वजनाइतके रुपये त्याला बक्षीस

दिले. ते साडेसहा हजार भरले तेव्हा आणखी पाचशे रुपये बादशहाने जास्त घातले व त्याला एकूण सात हजार रुपये बहाल केले. त्रेचाळीस वर्षांपूर्वी तो असाच आजारी पडला असता या सादिकखानाचा बाप मीर महमद महदी याने त्याला बरे केले होते. त्याला त्याबद्दल औरंगजेबाने हजारी मनसबदार केले व हकीमुल्मूल्क ही पदवी दिली. या प्रसंगी सादिकखानाने बापासारखीच करामत दाखविली म्हणून बापाचाच किताब त्याला बहाल करण्यात आला. 'हकीमुल्मुल्क' म्हणजे ' भिषग्सम्राट्.'

सप्टेंबर संपून आता ऑक्टोबर लागला होता. म्हैसूरवर स्वारी करण्याचे वेड औरंगजेबाच्या डोक्यात अजूनही शिल्लक होते. पण त्याच्या आजारामुळे परिस्थिति आता पार बदलली होती. तो मेल्याची बातमी उत्तरेत पोचून एकच हलकल्लोळ उडाला होता. शहाजादा आजम गुजरातवर सुभेदार होता. त्याने एकदम राजधानी ताब्यात घेण्यासाठी आग्र्यावर चाल केली. पण शहाजादा अकबरचा पक्ष घेऊन त्याला राठोड वीर दुर्गादास आडवा आला. वस्तुतः दुर्गादासच्या बोलण्यात आता काही जीव नव्हता. कारण, ज्याची बाजू दुर्गादासने पूर्वी घेतली होती व ज्याच्यामुळे औरंगजेबाला दक्षिणेत यावे लागून एवढे थोरले महाभारत झाले होते त्या अकबराची इराणमध्ये केव्हाच माती होऊन गेली होती. पण मेला तरी एकदा ज्याला आपला म्हटले त्याला सोडायचे नाही हा रजपुती बाणा काही दुर्गादासजी सोडायला तयार नव्हते. आझमचा असा प्रकार चालला असता औरंगजेबाच्या मृत्यूच्या बातमीने पठाणांनी उचल खाऊन काबूलला मुअजमची फौज कापून काढली. अशा बातम्यांनी औरंगजेबही मोठ्या पेचात पडला आणि वजीरांनीही डोळ्यांत पाणी आणून आणि कोपरापासून हात जोडून मोठ्या अजीजीने आता उत्तरेला चलण्याची कृपा करावी अशी विनवणी केली. तेव्हा मोठ्या नाखुषीनें बहादुरगडमार्गे अहमदनगरवरून उत्तरेकडे जाण्याचा विचार करून औरंगजेबाने फौजेला कूच करण्याचा हुकूम दिला.

क्षणात म्हैसूरला जातो, क्षणात बहादुरगडला जातो, क्षणात उत्तरेला जातो असा त्याचा गोंधळ उडालेला पाहून फौजेतले लोक त्याला हसू लागले आणि त्याची टर उडवू लागले. तेव्हा औरंगजेब जास्तच संतापला आणि त्याने दवंडी पिटवली की जो कोणी आपल्या कृत्याबद्दल चकार शब्द काढील त्याची जीभ दुसऱ्या दिवशी सकाळी मुळापासून उपटली जाईल. तेव्हा मात्र लोकांच्या चुरु चुरु चालणाऱ्या जिभा साफ बंद झाल्या. कारण त्यांना पक्के माहीत होते की आपला धनी बोलल्याप्रमाणे करील, कधी चुकणार नाही. एवढी मोठी फौज, पण तोंडे शिवून टाकल्याप्रमाणे चिडीचाप चालत होती. रणवाद्येसुद्धा बंद होती. जणू ते सारे कुणाला पोचवायलाच निघाले होते.

पण बादशहाचा दरारा असला तर त्याच्या लोकांना. मराठ्यांना त्याचे काय होय ? त्यांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे बादशहाची स्वारी देवापुराहून निघाल्याचे कळल्याबरोबर ते लांडग्यांप्रमाणे बादशहाच्या फौजेवर तुटून पडले. खुद्द बादशहाच्या खास तंबूपाशी त्यांनी एक हजार सैनिकांची कत्तल उडविली आणि एका बड्या अधिकाऱ्याला कैद करून नेले. हा अधिकारी म्हणजे बहुधा सियादतखान असावा. बादशहापुढे अर्जी ठेवण्याचे काम त्याच्याकडे होते. तो जेव्हा खंडणी भरून मराठ्यांच्या कैदेतून सुटून आला, तेव्हा बंदुकांच्या आणि बाणांच्या माऱ्याने त्याचे दोन्ही डोळे जाया होऊन तो ठार आंधळा बनला होता. संभाजीला जेव्हा औरंगजेबाने पकडले तेव्हा, "संभाच्या डोळ्यांत सळई फिरवून त्याला नवी दृष्टि द्यावी" असा त्याने हुकूम दिला होता. बादशहाच्या सळईने संभाजीला नवी दृष्टि कितपत आली हे कळण्यास मार्ग नाही; पण मराठ्यांच्या बंदुकांच्या आणि बाणांच्या माऱ्याने सियादतखानाला मात्र मराठ्यांकडे पाहण्याची नवी दृष्टि आली असण्याची दाट शक्यता आहे.

या प्रसंगी मारामारी करीत मराठे खुद्द बादशहाच्या तंबूपाशी पोचले होते. त्यांनी मनात आणले असते, तर त्यांनी बादशहाला सहज ठार मारले असते, पण त्यांनी त्याच्या अंगाला हातही लावला नाही. ती त्यांची दया नव्हती. तर तो त्यांचा दुष्टपणा होता. ते म्हणत, " बादशहाला ठार मारून आमचा काहीच फायदा नाही. तो जिवंत असल्यानेच आमचा धंदा उत्तम चालतो." बादशहा दक्षिणेत असल्यामुळे साम्राज्यातल्या सर्व ठिकाणाहून त्याच्याकडे रसदेचे आणि खजिन्यांचे प्रचंड काफिले येत असत आणि ते मधल्यामध्ये लुटून मराठे गबर होत असत. बादशहाला मारून टाकले असते तर त्यांचा हा धंदा साफ बसला असता. औरंगजेब म्हणजे मराठ्यांच्या दृष्टीने सोन्याची अंडी देणारी कोंबडी होती. त्या सोन्याची फाजील हाव धरून कोंबडीला फटक्यात मारून टाकायचे, व मग सोन्याचे अंडेही नाही व कोंबडीही नाही म्हणून ठणाणा करीत बसायचे, असला मूर्खपणा करण्याइतके मराठे दुधखुळे नव्हते. मराठ्यांनी असा विचार करावा हे त्यांच्या कावेबाजपणाला साजेसेच होते. पण नवलाची गोष्ट अशी की बादशहाचे अन्न खाणारे त्याच्या पदरचे लोकही हेच बेशरमपणाने बोलत– "आमच्या या अन्नदात्या बादशहाला खुदा असेच उदड आयुष्य देवो. म्हणजे युद्ध चालू राहून आम्हास ददात पडणार नाही" नशीब त्या अन्नदात्याचे, दुसरे काय ?

२३ ऑक्टोबर १७०५ रोजी देवापुराहून निघालेले हे बादशहाचे सैन्य सुमारे दीड महिन्याने म्हणजे ६ डिसेंबरला बहादुरगडला पोचले. रमजाननिमित्त तेथे चाळीस दिवसांचा मुक्काम करण्याचा औरंगजेबाने हुकूम केला. वाकिणखेड्याला असतानाच त्याला मराठ्यांनी सिंहगड परत घेतल्याचे कळले होते. वाकिणखेडा सर झाला म्हणून आनंद मानावा की सिंहगड गमावला म्हणून दुःख

मानावे हे न कळून, एका डोळ्यात हसू तर दुसऱ्या डोळ्यात आसू अशी त्याची मोठी केविलवाणी अवस्था झाली होती. त्याच वेळी त्याने तरबियतखान बहादुर व हमीदुद्दीनखान बहादुर या दोघांना सिंहगड परत घेण्यासाठी पाठविले होते. सिंहगडला फक्त प्रदक्षिणा घालून काही काम न करता ती बहादुर मंडळी परत आली व बहादुरगडला बादशहाला भेटली. ते तसेच हात हलवीत परत येणार हे बादशहा ओळखूनच होता. त्याने नेहमीप्रमाणे अखेरचा उपाय म्हणून झुल्फिकारखानाला सिंहगडावर रवाना केले. किल्ले घेतले तरी मराठे मोडत नव्हते हे तर आजपर्यंतच्या अनुभवावरून उघडच झाले होते. तेव्हा शाहूला पुढे करून मराठ्यांबरोबर काही राजकारण साधावे असा बादशहाने विचार केला आणि त्या दृष्टीने झुल्फिकारखानाबरोबर शाहूलाही जाण्याचा हुकूम केला. १४ जानेवारी १७०६ रोजी अहमदनगरला जाण्यासाठी त्याने बहादूरगडाहून कूच केले.

बहादूरगडाहून उत्तरेला अहमदनगर फक्त पन्नास मैलांवर आहे. पण या पन्नास मैलांच्या प्रवासात मराठ्यांनी औरंगजेबाला इतके छळले की कधी यांच्या तावडीतून आपण अहमदनगरला धडपणी पोचतो असे त्याला होऊन गेले. भीमसेन म्हणतो– "या सहा दिवसांच्या प्रवासात मराठ्यांनी बादशाही सैन्यावर धाडसी आक्रमणे केली. त्यांचा मोड करा म्हणून बादशहाने हमीदुद्दीनखान बहादूर यास आज्ञा केली. पण तो अननुभवी होता. त्याने आपले अधिकारी आणि सरदार यांना मराठ्यांशी लढण्यासाठी म्हणून पाठविले. मराठ्यांनी मोगलांचे हे सैन्य किती कुचकामी आहे हे पाहिले, व ते मोगलांवर तुटून पडले. त्यांनी अनेक मोगलांना मारले आणि कित्येकांना धरून नेले. त्यांनी अनेक घोडी पण धरून नेली. मराठ्यांची दुसरी तुकडी मोगलांच्या बाजारबुणग्यांवर व सामानसुमानावर हल्ले करीत होती, त्याच वेळी बादशहा आपल्या सिंहासनवजा उघड्या पालखीतून जात असताना त्यांना दिसला. बादशहाबद्दल आदराची भावना म्हणून मराठे लांबून त्याला पाहात राहिले." आणि भीमसेन अगतिकपणाने पुढे म्हणतो– "मराठे असे वागले हे बादशहाचे भाग्यच म्हटले पाहिजे."

अशा प्रकारे मराठ्यांचे तडाखे खात खात कसेबसे एकदाचे हे बादशहाचे लष्कर २० जानेवारी १७०६ रोजी अहमदनगरच्या वेशीत शिरले. याच नगरच्या वेशीतून तवीस वर्षांपूर्वी तेच लष्कर दक्षिण दिग्विजयाच्या आणि काफरांना भरडून काढण्याच्या ईर्षेने बादशहाच्या जयजयकाराच्या आरोळ्या ठोकीत, झेंडे फडकवीत आणि नगारे वाजवीत समुद्राच्या प्रमत्त लाटांप्रमाणे गर्जत बाहेर पडले होते. आज तेवीस वर्षांनंतर शेतकऱ्याने कणसे झोडपावीत त्याप्रमाणे मराठ्यांनी बेदम झोडपून काढलेले तेच लष्कर चिपाड आणि कंगाल होऊन त्याच वेशीतून खाली मान घालून रखडत रखडत कष्टाने आत परतत होते त्या दोन दृश्यां-

मधला फरक हृदय पिळवटून टाकणारा होता. तो औरंगजेबाला जाणवल्याशिवाय कसा राहील? एखादे तरत्या राजवाड्याप्रमाणे असलेले देखणे आणि भव्य जहाज पृथ्वी पादाक्रांत करण्यासाठी वाजत गाजत मोठ्या समारंभाने बंदरातून दर्यात शिरावे आणि कालांतराने वाऱ्यावादळाच्या थपडा खाऊन चिरफळ्या झालेल्या त्याच जहाजाचे कलेवर त्या बंदरास येऊन लागावे तशी औरंगजेबाच्या त्या विजयी सैन्याची दुर्दशा झाली होती. त्याचे सैन्य मोडले होते, त्याचे साम्राज्य मोडले होते, त्याचे शरीर मोडले होते, आता त्याचे मनही साफ मोडून गेले. अहमदनगरात त्याचे पाऊल पडले त्या क्षणी अंतःकरणाच्या अगदी आतल्या गाभाऱ्यातून उत्स्फूर्तपणे त्याच्या तोंडून उद्गार निघाले, "अहमदनगर हा माझ्या प्रवासाचा शेवटचा मुक्काम होय."

त्याच शब्दांचा पुनरुच्चार त्याने औरंगाबादचा सुभेदार मन्सूरखान याच्या अर्जाला उत्तर देताना केला. यावरून ते शब्द म्हणजे त्याच्या मनात उसळलेल्या उद्वेगाची क्षणिक ऊर्मि नव्हती, तर आपल्या जीवितयात्रेचा पल्ला यापुढे जाऊच शकणार नाही असे त्याच्या मनानेच घेतले होते याबद्दल संशय राहत नाही. मन्सूरखानाला वाटले की अहमदनगरनंतर बादशहाचा मुक्काम औरंगाबादला होईल. म्हणून सरकार स्वारी दाखल होण्यापूर्वीच औरंगाबादची डागडुजी करून ठेवणे बरे. त्या कामास खर्चाची मंजुरी मिळण्यासाठी त्याने बादशहाला अर्ज केला. त्याला उत्तर देताना औरंगजेबाने लिहिले–"(कविता)–थडग्यामध्ये त्याला कवटाळण्यासाठी पृथ्वीने आपले बाहु पसरले आहेत; आणि हा मूर्ख माणूस स्वतःच्या घराला रंगसफेती करीत बसला आहे! त्याची बेपर्वाई, त्याचा लोभ, आणि त्याची आसक्ति यामुळे त्याची मांस आणि हाडे वेगवेगळी व्हायला वेळ लागणार नाही! माझ्या भावना चांगल्या जाणणाऱ्या या सेवकाचे मला मोठे नवल वाटते. अहमदनगरमध्ये आल्या दिवशीच मी हुकूम दिला होता की, अहमदनगरचा उल्लेख यापुढे माझा 'अखेरचा मुक्काम' म्हणून करीत जावा हे याला चांगले माहीत आहे. आणि तरीही हा असली विनंती मला करतो आहे. मी स्वतः जेव्हा अहमदनगरला माझा 'अखेरचा मुक्काम' असे म्हटले आहे, तेव्हा माझी औरंगाबादला जाण्याची कसली बरे शक्यता आहे? आजपर्यंतच्या माझ्या इतक्या प्रदीर्घ आयुष्यात माझ्या शब्दात कधी बदल झालेला नाही. ईश्वराची इच्छा असेल तर मी परधामाला जाण्याच्या दिवसापर्यंत माझ्या उच्चारात व आचारात फरक पडणार नाही."

त्याचे म्हणणे खरे होते. तो फार फार थकला होता. सूर्य मावळू लागला होता. अंधार पडू लागला होता. काफिला अखेरच्या मुक्कामावर आला होता.

'Finish, good lady; the bright day is done
And we are for the dark.'

(आवर, सुभगे,
सोनेरी दिवस संपला
आणि आपल्यापुढे आहे अंधार.)

कारण राज्य चालविण्याच्या कारभारात व्यग्र असलेला औरंगजेब जितका बहिर्मुख तितकाच अन्तर्मुख होता. दिवसच्या दिवस व रात्रीच्या रात्रीं तो धर्मचिंतनात आणि आत्मचिंतनात घालवीत असे. अशा वेळी विशेषतः आयुष्याच्या या अखेरच्या दिवसांत सुरवातीपासूनचे दिवस त्याला आठवत असतील हे मनुष्यस्वभावाला धरूनच आहे. कारण, जीवन हे वर्तुळ आहे. जसजसा माणूस वर्तुळाच्या एका टोकाकडे येऊ लागतो तसतसे त्याला पहिले टोक पुन्हा दिसू लागते. म्हणूनच म्हातारपणी बाळपणाच्या आठवणी जास्त तीव्रतेने होतात असे म्हणतात. औरंगजेब अशा प्रकारे आपल्या आयुष्याचे आपणच जेव्हा कधी या दिवसांत सिंहावलोकन करीत असेल तेव्हा नव्वद वर्षांच्या प्रदीर्घ जीवनातल्या सुखाच्या आणि दुःखाच्या, यशाच्या आणि अपयशाच्या, प्रेमाच्या आणि वियोगाच्या घटनांनी गजबजलेला केवढा भव्य, रंगीबेरंगी आणि चित्रविचित्र चित्रपट त्याच्या मिटलेल्या डोळ्यांपुढे उलगडला जात असेल बरे!

तापी तीरावरची हिराबाईच्या सहवासात रंगलेली संध्याकाळ .... दौलताबादच्या जंगलातील नीलगायींच्या शिकारी ........ दिवसा पडलेल्या चांदण्याचा आभास निर्माण करणारे वेरूळच्या लेण्यांतले स्वप्नासारखे अद्‌भुत शिल्प .... दिल्लीचे तख्त मिळविण्यासाठी बुऱ्हाणपुराहून उत्तरेकडे घाईघाईने केलेले कूच .... शाही बागेत रात्रीच्या वेळी नजर केलेले तबकातले दाराचे रक्तबंबाळ मस्तक.... गारुड्याने धरलेल्या नागाप्रमाणे फुसफुसणारा जेरबंद दारुडा मुराद ... आराकानच्या जंगलात जंगली माघ लोकांनी तुकडे केलेले शुजाचे प्रेत ... ताजमहालाकडे टक लावून अखेरच्या घटका मोजीत पडलेला आग्र्याच्या किल्ल्यातला बंदिवान् शहाजहान...लखलखणाऱ्या रत्नांनी खचलेल्या मयूर सिंहासनावरचा राज्याभिषेकाचा सोहळा– सोन्याच्या कलाबतूने शृंगारलेले दिवान इ खासचे संगमरवरी चाळीस स्तंभ .... दरबारात उधळलेल्या सोन्याचांदीच्या नाण्यांचे ढिगारे .... तख्तावर विराजमान झालेला सडपातळ, बांधेसूद, भेदक डोळ्यांचा शहेनशहा ....संतापाने लालबुंद झालेला दक्षिणच्या राजाचा गोरापान चेहरा .... "तूने देखा, तेरे बापने देखा, तेरे बादशहाने देखा!" .... अजमीरची सकाळ ... रणभूमीवरून अकबराचे पलायन ....बुऱ्हाणपुर .... शाह अब्दुल लतीफच्या दर्ग्यापाशी यशासाठी केलेली प्रार्थना .... संभाजीवरील संतापाने आपटलेला कीमॉश.... वाजत गाजत गेलेला व मोहिमेवरून हात हालवीत कोकणातून परत आलेला अपेशी शहाआलम .... उन्हात चालत येणारा सिकंदर आदिलशहा .... रुहुल्लाखानाबरोबर येणारा कुतुबशहा .... दरबाराच्या दाराशी उभा असलेला जखडबंद

संभाजी .... गालिच्यावर मस्तक टेकून ईश्वराचे आभार मानताना डोळ्यातून ओघळलेली आसवे .... वडूच्या बाजारातील संध्याकाळ .... आंधळ्या संभाजीचा शिरच्छेद ... श्रावणधारांची वरसात .... शाही तंबूवर संताजी घोरपड्याची झडप .... तुंगभद्रेच्या तीरावरून राजाराम पळाल्याचे ऐकून जिवाचा झालेला तडफडाट .... संताजीचे ख्वाजाबाबा तुराणीने नजर केलेले मस्तक ... बेगमपूर-कचाची उदास नौबत .... पंधरा दिवसांत पाच मैल लांबीचा उभारलेला मातीचा तट .... सातारा – सुरुंगाने उडालेल्या किल्ल्याच्या भिंतीखाली चुराडा झालेले हजारो मोगल .... सात दिवस जळत असलेले लाकडी मोर्चे ... राजारामाच्या मृत्यूच्या आनंदवार्तेने छावणीत वाजलेली शहाजणे .... पन्हाळ्यावरचे वादळ.... कागदाच्या कपट्यांप्रमाणे आकाशात उडालेले तंबू ... खवासपूर .... अंधार ... छावणीतला कल्लोळ .... मराठ्यांच्या छाप्याच्या धास्तीने घाईघाईने चालत येत असताना मुरगळून लंगडा झालेला पाय.... विशाळगड....डोळ्यांना अंधारी आणणाऱ्या बाणांच्या वर्षावाप्रमाणे कोकणातल्या पावसाच्या कोसळणाऱ्या धारा .... दुथडी भरून वाहणारे ओढे .... हत्तीवरून मेण्यात बसताना हत्तीवरची अंबारी मेण्यावर घसरून मेण्याचा झालेला चक्काचूर .... छावणीतला सरंजाम रात्री बेरात्री लुटणाऱ्या मराठ्यांची निर्दय लांडगेतोड .... हातावर तुरी देऊन पळून गेलेल्या बेरडांनी जाताना आग लावल्यामुळे धडधडा जळणारा वाकिणखेड्याचा रिकामा किल्ला .... बहादुरगड .... शाही तंबूपाशी पडलेली मराठ्यांनी कत्तल केलेल्या हजार मोगलांची प्रेते .... बंदुकीच्या धुराने व बाणांच्या माऱ्याने ठार आंधळा झालेला सियादतखान अहमदनगरची शिशिरातली काळवंडलेली कातर संध्याकाळ .... अखेरचा मुक्काम !

केवढा लांबलचक चित्रपट म्हणायचा तो ! जितका लांबलचक तितकाच कंटाळवाणा ! जणु अपार वाळवंटातली कधी न संपणारी वाट ! जितकी भकास तितकीच उदास !

तो चित्रपट असा काही विलक्षण होता, की त्यात एकाच वेळी औरंगजेब कर्ताही होता व साक्षीही होता, नटही होता व प्रेक्षकही होता. या म्हातारपणातल्या विषण्ण संध्याकाळी बालपणातले व तारुण्यातले ते दिवस इतके दूर गेल्यासारखे वाटत की, हे सारे आपणच केले, व हे सारे जीवन आपण जगलो यावर विश्वास बसणे कठीण होई. ते सारे गेलेले जीवन एक स्वप्न वाटे, आणि भ्रम वाटे. सत्ता, सिंहासन, संपत्ति, संग्राम, सन्मान, प्रेम– एकापेक्षा एक भुलवणाऱ्या भुतांच्या दिवट्या, जीवनाच्या वाटेवर दिशाभूल करून अखेर दुःखाच्या खाईत लोटणारी सारी मृगजळे, सारे भास, फसवणूक, निव्वळ फसवणूक ! त्यांच्यामागे लागून सोन्यासारखे आयुष्य कवडीच्या मोलाने वाया गेले ... तो म्हणतो तसेच 'Life so valuable, has gone away for nothing!'

टी. एस्. इलियटने व्यक्त केले आहेत तसे, या शेवटच्या दिवसांत आपल्या जीवनाच्या फलश्रुतीचा विचार करताना, ओसाड वाड्यात तिन्ही सांजेच्या प्रहरी पाकोळ्या भिरभिराव्यात त्याप्रमाणे पराकाष्ठेचे खिन्न विचार औरंगजेबाच्या मनात घिरट्या घालीत असतील यात शंका नाही.

Man's life is a cheat and a disappointment.
All things are unreal;
Unreal or disappointing,
All things become less real. man passes
From unreality to unreality.
This man is obstinate, blind, intent
On self-distruction.
Passing from deception to deception
From grandeur to grandeur to final illusion
Lost in the wonder of his own greatness,
The enemy of society, enemy of himself.

( जीवन ही एक वंचना आहे आणि एक निराशा आहे.
साऱ्या गोष्टी खोट्या आहेत
खोट्या किंवा निराश करणाऱ्या.
हळुहळू साऱ्या गोष्टी मिथ्या भासू लागतात,
माणूस आभासाकडून आभासाकडे जात राहतो.
वैभवाकडून वैभवाकडे आणि अखेर अखेरच्या भ्रमाकडे.
हा माणूस हट्टी आहे, आंधळा आहे,
स्वतःच्या विनाशास सिद्ध झालेला आहे;
स्वतःच्याच मोठेपणाच्या चमत्काराात स्वतःस हरवून बसलेला आहे,
हा स्वतःचा शत्रु आहे आणि समाजाचाही शत्रु आहे).

□ □

# (१९)

संभाजीला पकडण्याचा पराक्रम केल्याबद्दल औरंगजेबाने मुकर्रबखानाला 'फत्तेजंग' अशी भव्य पदवी दिली होती. पण ती पदवी झुल्फिकारखानाला दिली असती तरी चालले असते. कारण झुल्फिकारखानाच्या हाताला यश खरोखरच इतके होते की तो खराच फत्तेजंग होता. याही वेळी तरबियतखान आणि हमीदुद्दीनखान कोंडाण्याला फक्त प्रदक्षिणा घालून नकारघंटा वाजवीत औरंगजेबाकडे परत बहादुरगडला आले. तेव्हा झुल्फिकारखानाला त्याने कोंडाण्यावर रवाना केले आणि त्याच्या अपेक्षेप्रमाणे खानाने कोंडाणा फत्ते केला. साकी मुस्तैदखान म्हणतो की, त्याने किल्ल्यातील लोकांची शस्त्रे व मालमत्ताही काढून घेऊन त्यांना किल्ल्याबाहेर घालवून दिले. भीमसेनही म्हणतो की, खानाने किल्ल्यातील लोकांवर कठीण प्रसंग आणला. किल्ल्यात रसदेची टंचाई झाली. त्यामुळे किल्ल्यातील लोकांनी तहाचे बोलणे सुरू केले. हे खरे असेलही. पण किल्ला हाती येण्यासाठी झुल्फिकारखानाने आणखी एक अमोघ उपाय योजला. त्याच्यापुढे मराठ्यांचा इलाज चालला नाही. त्याने किल्लेदाराला भक्कम रक्कम दिली. तीन वर्षांपूर्वी कोंडाणा घेताना तरबियतखानाने किल्लेदाराला पन्नास हजार रुपये भरले होते. मोगलांनी किल्ला नीट सांभाळला नाही. त्या गलथानपणाचे प्रायश्चित्त म्हणून कीं काय, झुल्फिकारखानाने या वेळी पुन्हा एकदा भूर्दंड भरला. कसे का असेना, सामाने असो की दामाने असो की दंडाने असो, झुल्फिकारखानाने अखेर सिंहगड परत सर केला व औरंगजेबाच्या तळमळणाऱ्या आत्म्याला संतुष्ट केले. कारण, सिंहगड मराठ्यांनी घेतल्याचे ऐकून त्याला मोठेच दुःख झाले होते.

बहादुरगडाहून निघताना जे दुसरे काम औरंगजेबाने झुल्फिकारखानाला सांगितले होते, ते म्हणजे शाहूच्या मार्फत मराठ्यांच्यामध्ये दुफळी पाडणे. औरंगजेब हा तसा कपटविद्येचा उस्तादच होता. मोहिमा काढून किल्ले घेऊन आणि संभाजीसारखे लोक मारून मराठे मोडत नाहीत असे त्याने पाहिले. तेव्हा शाहूच्या मार्फत संभाजीचा हा शिवाजी आणि ताराबाईचा तो शिवाजी असे मराठ्यांत दोन छत्रपति करून दुही माजवावी व त्यांना आतून कर्करोगाप्रमाणे पोखरावे असा या वेळी त्याचा बेत होता. त्याचा हा विचार नवाच होता असे नव्हे, पण शाहूला आपल्या नजरेआड होऊ देण्याचा त्याला धीर होत नसे. कारण मराठ्यांनी छापा घालून त्याला जर का पळवून नेले तर आपल्या हातातला डाव उधळला हे तो पक्के ओळखून होता. त्यामुळे स्वारीत असो की छावणीत असो, वाकिणखेड्याला असो की बेगमपूरला असो की खेळण्याच्या पावसात असो, गाड्याबरोबर

नळयाला यात्रा या न्यायाने जेथे बादशहाची स्वारी जाई तेथे शाहूला जावेच लागे. नेहमी त्याचा तंबू बादशहाच्या तंबूशेजारी गुलालबारमध्ये ठोकलेला असे. त्याच्या बाबतीत संशय दांडगा म्हणा, की प्रेम दांडगं म्हणा, की दोन्ही सारखीच दांडगी म्हणा, नवसाने झालेले मूल एखादा हळवा बाप ज्याप्रमाणे डोळयाआड होऊ देत नाही, तशी औरंगजेबाची अवस्था होती. त्या मानाने या वेळी झुल्फिकारखानाबरोबर शाहूला सिंहगडावर पाठविण्यात औरंगजेबाने मोठेच धाडस दाखविले असे म्हटले पाहिजे. "शाहूचा तंबू झुल्फिकारखानाच्या तळापाशी लावण्याचा हुकूम झाला. त्याला खास खिलतीची वस्त्रे आणि दोन मूल्यवान उदराज (अलंकार) देण्यात आले." शाहूच्या मार्फतीने मुख्य मुख्य मराठे सरदारांना शरण येण्याबद्दल पत्रे लिहिण्यात आली. पण त्या सरदारांनी ती पत्रे मुळीच मनावर घेतली नाहीत. कारण शाहू हा परतंत्र आहे, आणि पत्रे जरी त्याची असली, तरी बोलविता धनी वेगळाच आहे हे ओळखण्याइतके मराठेही चाणाक्ष होते. त्यामुळ झुल्फिकारखानाची शिष्टाई मुळीच यशस्वी झाली नाही.

मनूचीने तर लिहिले आहे की ही पत्रे खुद्द औरंगजेबाने मराठे सरदारांना लिहिली होती. त्या सर्वांनी शरण यावे आणि आपण नुकत्याच मुक्त केलेल्या त्यांच्या कायदेशीर राजाची चाकरी पतकरावी, असे औरंगजेबाने त्यांना आवाहन केले व ते जर असे करतील तर त्यांचे चालविण्यासाठी दक्षिणच्या सहा सुभ्यांच्या सरदेशमुखीचे उत्पन्न देण्याचेही त्याने कबूल केले. औरंगजेबाच्या या पत्राला मराठ्यांनी उत्तर दिले की, त्यांचा छत्रपति आधीचा आहेच. त्याचे नाव शिवाजी. तो राजारामाचा मुलगा. त्यालाच ते कायदेशीर छत्रपति म्हणून ओळखतात, त्याचे हुकूम पाळण्यास ते बांधलेले आहेत. कोणत्याही परिस्थितीत मात्र बादशहाने मोकळया केलेल्या कैदयाची दखल घेण्यास ते बिलकुल तयार नाहोत. आणि बादशहाने जे सरदेशमुखीचे अभिवचन दिले होते त्या बाबतीत त्यांनी उत्तर दिले की कसूर माफ असावी. पण सदर रक्कम तलवारीच्या जोरावर वसूल करण्याचा त्यांचा इरादा असल्यामुळे त्या बाबतीत बादशहा सलामतना तकलीफ देणे त्यांना मंजूर नाही. मराठ्यांकडून असले उत्तर आल्यानंतर वाटाघाटीचा फुगा फुटला व बादशहाची कपटविद्या निष्फळ झाली हे सांगणे नकोच. पुन्हा मराठ्यांशी झुंजणे प्राप्त झाले.

खरे म्हणजे औरंगजेबच नव्हे तर त्याचे सैन्यही आता लढून लढून थकले होते आणि म्हातारे झाले होते. अहमदनगरला एवढा पाच लाख लोकांची छावणी पडली होती. पण तिच्यात आता काही जीव राहिलेला नव्हता. सव्वीस वर्षांपूर्वी अजमीरहून औरंगजेब दक्षिणेत निघाला तेव्हा त्याची ही छावणी हत्ती, उंट, घोडे, तोफखाना, खजिना, जडजवाहीर, तंबू-राहुट्या यांनी नुसती गजबजलेली होती. तीस मैल तिचा विस्तार, आणि जेथे ती वसे तेथे दिल्ली शहर वसतीला येई. आज

त्याच छावणीची अवस्था पाहवत नव्हती. मनूची म्हणतो– "त्याच्या छावणी-इतकी घाणेरडी जागा पृथ्वीवर नसेल. दररोज असंख्य माणसे व जनावरे मरून एकच घाण सुटलेली असते. जनावरांप्रमाणेच मेलेल्या माणसांना दोरी बांधून ओढीत नेतात आणि अंगावर असेल नसेल ते सर्व बुचाडून जवळच कोठे खड्डा असेल त्यात टाकून देतात. कोल्हयाकुत्र्यांची मात्र चैन असते. किती वेळा तरी मला बादशहाच्या छावणीजवळ नाक धरता धरता पुरेवाट झाली आणि कितीकदा मला उलटया झाल्या. माशा तर इतक्या असतात की काही खाण्याची म्हणून सोय नाही. प्रवासी लोकांस पहिला मोठा धाक मराठयांचा, पण मराठयांच्या हातून सुटावे, तो बादशहाचे जकात लुबाडणारे अधिकारी काय कमी आहेत ! कोणाजवळ काही द्रव्य आहे, असा सुगावा लागला म्हणजे पुरे, खुशाल ते सर्वस्व हरण करून प्रवाशांना मारून पुरून टाकतात. अशी ह्या साधु बादशहाची राज्य-व्यवस्था आहे." पणात असताना दऱ्या गाजवणारे व नरडी फोडणारे जंगलचे जनावर घायाळ व म्हातारे होऊन अखेरचे आचके देत असावे, त्याची वज्रा-सारखी नखे व दात पडलेले असावेत, व आपले लचके तोडणाऱ्यांना वारण्यासाठी त्याने थरथरणारा पंजा केविलवाणेपणें हलवावा, तशी औरंगजेबाच्या त्या छावणीची दशा झाली होती. ती आखेरचे आचके देत होती. त्यांत जर का मराठयांच्या टोळया तिच्यावर तुटून पडल्या, तर मेंढरांच्या कळपावर लांडग्याची झडप पडावी तशी त्यांची अवस्था होई.

बहादूरगडाहून औरंगजेब नगरला आला तो मुळी मराठयांची गारपीट खातच. पण नगरलाही त्याला मराठयांनी श्वास घेण्याची उसंत दिली नाही. त्याला येऊन महिना पंधरवडा होतो न होतो तोंच मराठयांनी परत त्याच्या छावणीवर चाल केली. या वेळी धनाजी जाधव, नेमाजी शिंदे, रंभाजी निंबाळकर, संताजी मराठा, रामा व दमाजी थोरात असे नामांकित सेनानी एक होऊन चालून आले होते. यातल्या एकेकाच्या नावानेसुद्धा मोगलांची गाळण उडाली असती. मग हे सर्व एकत्र असल्यावर बोलायलाच नको. 'एकैकमप्यनर्थाय किमु तत्र चतुष्टयम् ।' भीमसेन म्हणतो, " खानजमान फतेहजंग याचा मुलगा खाने आलम हा सहा हजारी मनसबदार होता. त्याच्यापाशी कसलेले सैन्य होते. त्याने मराठयांचा मोड केला. नाहीतर छावणीतल्या बादशाही अमीरांच्याने त्या कडव्या लोकांचा काय प्रतिकार झाला असता हे कोणालाही कळून येईल."

साकी मुस्तैदखानाने अशाच आणखी एका मराठयांच्या हल्ल्याची विलक्षण हकीकत दिली आहे. तो म्हणतो– "मराठे बादशाही लष्करापासून दोन कोसां-वर आले. बादशहाने आज्ञा केली की खाने आलम, आणि मुख्य बक्षी सद्रुद्दीन महंमदखान सफवी आणि इतर सरदार यांनी जाऊन मराठयांचा मोड करावा. लढाईच्या ऐन धामधुमीत त्यांनी सांगून पाठविले की, मराठयांचे सैन्य फार

आहे, यावर बादशहाने हमीदुद्दीनखान बहादुर व मतलबखान यांस पाठविले. पीडेपासून त्यांचे रक्षण व्हावे म्हणून बादशहाने त्यांना ताईत दिले." औरंगजेबाच्या काळातच 'जिंदा पीर' म्हणजे चमत्कार करणारा साधु पुरुष म्हणून त्याचा बोलबाला झाला होता. पण आपल्या या मंत्रविद्येचा प्रयोग लढाईत करण्याची वेळ बहुधा ही त्याच्यावर प्रथमच आली असावी. सर्व उपाय हरले म्हणजे मनुष्य अदृष्टाचा आश्रय घेतो ही गोष्ट प्रसिद्ध आहे. तलवार बोथट झाली तेव्हा ताईतापलीकडे आधार न राहणे साहजिक होते. याच वेळी केव्हा तरी मराठ्यांनी कैद करून नेलेला औरंगजेबापुढे अर्जी ठेवण्याच्या कामावरचा दारोगा सियादतखान खंडणी भरून सुटून बादशाही छावणीत परत आला. मराठ्यांच्या बाणांच्या व बंदुकांच्या माऱ्याने त्याचे दोन्ही डोळे कामातून गेले होते. आपल्या 'दर्शना'साठी आलेल्या त्या 'आंधळ्या' सेवकाचे समाधान औरंगजेबाने कोणत्या शब्दांनी केले असेल बरे? मराठ्यांच्या पुंडपणाच्या बातम्या कानावर आल्या म्हणजे, आपल्या असहायतेची केविलवाणी जाणीव होऊन, कालिदासाच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे मंत्राने बद्ध केलेल्या नागाप्रमाणे आतल्या आत तो जळफळत असे. फक्त "त्यात काय मोठेसे – चोर दरोडेखोर तर सगळीकडेच असतात" असे बोलून कोठून तरी वेळ मारून नेई पण त्याला दुःख फार होई ही गोष्ट खरी होती. अखेर तर त्याने "यापुढे मराठ्यांचा उल्लेख 'चोर' म्हणून करण्यात यावा" असा खरोखर हुकूमच काढला. जणू काय आजपर्यंत मराठ्यांना तो साधूच समजत होता आणि मराठ्यांची टोळधाड छावणीवर कोसळली म्हणजे 'साधुसंत येती घरा। तोची दिवाळी दसरा' असे वाटून तो आनंदाने बेहोष होत होता ! बादशहाच्या या हुकुमाने मराठ्यांचे काहीच वाकडे झाले नाही, पण निदान कागदोपत्री तरी बादशहाच्या मनातली मळमळ मोकळी झाली, ते एक प्रकारचे वाङ्मयीन विवेचनच होते; तेवढे समाधान मात्र त्याला लाभले; आणि तेवढेच समाधान लाभणे शक्य होते.

किताब आणि तो पुन्हा बादशहाकडून मिळाला तर पराक्रम गाजविण्यास स्फुरण येते ही गोष्ट प्रसिद्धच आहे. मराठ्यांना बादशहाने दिलेला किताब फारच आवडलेला दिसला. कारण पुढच्याच महिन्यात त्यांनी पराक्रम करून तो सार्थ करून दाखविला व बादशहाच्या डोळ्यांत अंधेरी आणली. औरंगाबादेहून बादशहाच्या छावणीसाठी खजिना, घोडे, उंट इत्यादि प्रचंड सामग्री येत होती. अहमदनगरपासून बारा कोसांवर पांदा या मुक्कामी मराठ्यांनी त्यांच्यावर हल्ला करून संपत्ति पूर्णपणे लुटली. घोडे, उंट, खजिना सर्व मालमत्ता मराठ्यांच्या हाती पडली. शाहराह म्हणजे राजमार्ग, मराठ्यांनी ते नाव बदलून राहजर म्हणजे सुवर्णाचा मार्ग असे नाव ठेविले. कारण राजमार्गावरून जाणारी संपत्ति आयती त्यांच्या हाती लागत असे. बादशाही छावणीकडे येत असलेली मालमत्ता

व विशेषत: खजिना मराठ्यांनी मधल्यामधे पळवून नेला म्हणजे बादशहाचा व छावणीचा काय तळतळाट होत असेल याची कल्पना करणे सोपे नाही. आधी औरंगजेबाच्या छावणीत अलीकडच्या काही वर्षांत पगाराची नेहमी बोंब असे. मनूची म्हणतो की मोठा मासा लहान माशाला खातो या म्हणीचे प्रत्यंतर औरंगजेबाच्या छावणीइतके दुसरीकडे कोठेच येणे शक्य नव्हते. सैन्यातले वरिष्ठ अंमलदार खालच्या लोकांना आधी कधीही वेळेवर पगार देत नसत. पगार मिळे तो एका रकमेने मिळत नसे. तो तुकड्यातुकड्याने मिळे, 'थेंबे थेंबे तळे साचे' ही म्हण पुस्तकातच फार शोभून दिसते. पण मोगल शिपायांच्या बाबतीत पगारच मुळी थेंबाथेंबाने होत असल्यामुळे पुढचा थेंब येण्याआधीच मागच्या थेंबाची वाट लागलेली असे; त्यामुळे पगाराचे तळे कधी साचतच नसे. बारा महिन्यांच्या पगारापैकी जेमतेम दहा महिन्यांचा पगार मिळे व उरलेल्या दोन महिन्यांच्या पगाराबद्दल हातावर काहीतरी जिन्नस ठेवून बोळवण केली जाई. कित्येकदा एक नाही, दोन नाही, तीन तीन वर्षे पगार थकलेला असे. अशा वेळी म्हाताऱ्या बादशहावर दातओठ खात, अवाच्या सवा दराने छावणीतल्या सावकाराकडून कर्ज काढण्यासाठी, त्यांचे उंबरठे झिजविण्यापलीकडे शिपायांना पर्याय उरत नसे. यामुळे औरंगजेबाच्या छावणीतले शिपाई पैशाच्या बाजूने नेहमीच डबघाईला आलेले आणि रंजीस आलेले असत. अशा स्थितीत जर का येऊ घातलेल्या खजिन्यावर मराठ्यांनी धाड घातली असे कळले तर छावणीत काय हलकल्लोळ उडत असेल बरे ! पैशाच्या विवंचनेने भले भले तालेवार लोक अगदी रकमेला येत आणि कर्जासाठी सावकाराच्या पायी पडता पडता त्यांच्या कपाळाचे कातडे छिनण्याची वेळ येई. आता येसूबाईचेच उदाहरण घ्या. ही कालच्या छत्रपतीची बायको. आजच्या छत्रपतीची चुलती व उद्याच्या छत्रपतीची आई. वाकिण-खेड्याला जाताना औरंगजेबाने तिला अहमदनगरला ठेविले होते. धामधुमीमुळे तिला पाच महिने तनखा मिळाला नाही. चिंचवडचे देव हे साधु होते व साव-कारही होते. त्यांच्याकडे येसूबाईचे देणेघेणे होते. कर्ज द्यावे म्हणून त्यांना तिने मोठे अजीजीने पत्र लिहिले. ते वाचले म्हणजे येसूबाईचीच नव्हे तर औरंग-जेबाची परिस्थिति या अखेरच्या काळात किती खालावला होती यावर विदारक प्रकाश पडतो—"राजश्री श्रीदेव स्वामींचे सेवेसी, आज्ञाधारक मातुश्री येसूबाई-साहेब दोन्ही करकमल जोडून वैशाख शु. । ७ मुकाम अमदानगरी दुर्गात यथा-स्थित असे. विशेष आमचे वर्तमान तर स्वामींपाशी सत्यच लेखन केले पाहिजे, चिरंजीव दाजी तो पृथ्वीपती समागमे गेले. आम्हास सार्वभौमाची आज्ञा झाली की अहमदनगरास जावे. आज्ञेप्रमाणे आम्हास येथे घेऊन आले. येथे आलियावरी आजी पाच मास जाले परंतु खर्चाची बहुत तंगचाई जाली. काय निमित्य तरी सार्वभौम दूर गेले. आमचा तनखा जो दिल्हा तो तेथे ताम्रांनी व हरिभक्तांनी व

काही काळाने करून प्रतिकूलता जाली त्यामुळे द्रव्य येणे राहिले. येथे अमदानगरी पाचसात सहस्र साहुकाराचे ब्रह्मस्व झाले. आता कोणी देत नाही. मागत्याच पैक्यास तगादे लाविले आहेत. त्याच्यामुळे बहुत कष्टी होतो. तो दुःखसागर स्वामीस काय म्हणून ल्याहावा! मग जरूर जाणोन स्वामींच्या सेवेसी रायाजी जाधव पाठविला असे. तरी महाराज कै. स्वामी गेल्या तागाईत आपणावरी हा कसाला प्राप्त जाला. इंगळास वोळंबे लागले, बरे होणार भविष्य, त्यास काय यत्न आहे? आता एक स्वामी व्यतिरिक्त आणीक कोणाचा भरंवसा या समयांत नाही. एक स्वामीच क्लेशपरिहार करितील, इतरांच्याने काही होणे नाही, तरी सारांश गोष्टी की, ब्रह्मस्वापासून मुक्त केलियाने बहुत कीर्ति स्वामींची आहे आणि पाऊसपाणी झालियावरी स्वामी ज्यापासून देवितील त्यास प्रविष्ट करू. परंतु हा समय आम्हांवरी कठीण पडला आहे. आपले कोणी येथे प्रतिपालक नाही. ऐसा प्रसंग प्राप्त जाला आहे. त्याचे निवारण करणार स्वामी आहेत. माझी उपेक्षा केली न पाहिजे."

प्रत्यक्ष बादशाही छावणीत मराठ्यांचा असा धुमाकूळ चालत असला तर दूर असलेल्या प्रदेशाची दुर्दशा काय असेल ते केवळ कल्पनेनेच जाणले पाहिजे. माळव्याचा समृद्ध इलाखा तर नेमाजी शिंद्याने ओरबाडून काढलाच होता, पण गुजराथही मराठ्यांच्या फेऱ्यातून वाचली नव्हती. ज्याप्रमाणे वाकिणखेडा जिंकल्याची आणि सिंहगड गमावल्याची बातमी औरंगजेबाला एकाच वेळी ऐकावी लागली त्याचप्रमाणे या वेळी झुल्फिकारखानाने सिंहगड सर केल्याची बातमी ऐकून औरंगजेबाला आनंदाच्या उकळ्या फुटतात न फुटतात तोच त्याच वेळीं बाबा पियारीच्या घाटावर नर्मदाकाठी गुजराथेंत धनाजी जाधवाने नजरअलीखान, अब्दुल्हादीखान, सफदरखान बाबी वगैरे मंडळींची गच्छंन्ति केलेली ऐकून डौलात चाललेला माणूस निसरड्या जागेवरून घसरून पडावा तसा औरंगजेब दिलगीर झाला. त्याने गुजरातवर बेदरबख्ताला तातडीने रवाना केले. पण तो कितीही तातडीने निघाला तरी जुलै महिन्यात अहमदाबादला पोचला. तोपर्यंत चार महिने होऊन गेले होते. आणि मराठ्यांनी गुजरातेतले सगळे सोनेनाणे धुऊन नेले होते. उत्तरेत होत होती त्याप्रमाणे दक्षिणेतही पिडनायकाने हिंदुराव घोरपड्याला मिळून पूर्वीसारखीच धामधूम माजविली होती. त्याने उत्तर व दक्षिण कर्नाटकची गुरुकिल्ली असलेल्या पेनुकोंड्याचा किल्लाच काबीज केला. तो घेण्यासाठी दाऊदखान पन्नीला पाठवावे लागले. त्याने तो घेतला हे खरे पण सगळे काम पहिल्यापासून करीत बसावे लागत होते. कारण हेच की वाकिणखेडा घेतला पण पिडनाइक सोडला; बेरडांचा बीमोड काही केला नाही. वरवर पालवी खुडायची पण मूळ मात्र तसेच ठेवायचे असल्या वागण्याचे हे परिणाम होते. बेरडांनी गूलबर्ग्याजवळचा अलुरचा किल्ला घेतला. तरबियतखानाला त्यासाठी मुद्दाम पाठवावे

लागले. तेव्हा कोठे तो किल्ला परत मिळाला. तीच गोष्ट वसंतगडाची. औरंगजेबाने हा किल्ला १६९९ साली घेतला व त्याचे नाव 'किली द फतेह' म्हणजे यशाची किल्ली असे ठेवले होते. तो किल्ला याचवेळी म्हणजे १७०६ साली मराठ्यांनी परत घेतला. औरंगजेबाने यशाची ती किल्ली जी आपल्या कनवटीला मोठ्या तरतुदीनें लावून ठेविली होती ती मराठ्यांनी काढून घेतली. किल्लाही गेला व किल्लीही गेली. मोगलांचे रणपांडित्य चुकारपणामुळे म्हणा की स्वार्थामुळे म्हणा, केवळ आलेली वेळ संपादून नेणारे पल्लवग्राही झाले होते. ते मूलग्राही कधीच नव्हते. त्यामुळे पाण्यावर काठ्या आपटाव्यात त्याप्रमाणे सगळे श्रम फुकट गेले.

तो खवीस धनाजी जाधव अजून जिवंतच होता. बिचारा बादशहा काळजीनें खंगला आणि मरायला टेकला. पण त्या दुष्ट धनाजीला काही दया येत नव्हती. त्याच्या उच्छादाला खळ नव्हता. फेब्रुवारीत त्यानें बादशहाच्या छावणीवर चाल केली. नंतर मार्च महिन्यात थेट गुजराथवर धडक मारली आणि आता एप्रिलपासून अहमदनगरपासून जवळच असलेल्या औरंगाबाद भागात त्याने धुमाकूळ मांडला. बादशहाने नेहमीप्रमाणे त्याच्यावर झुल्फिकारखानाला पाठविले व औरंगाबादला लागूनच वऱ्हाडचा इलाखा होता त्यावर फौजबंद असलेल्या फिरोजजंगालाही धनाजीला पायबंद घालण्याबद्दल कळविले. फिरोजजंगाने नेहमीप्रमाणे बादशहाचे सांगणे कानानिराळे टाकले, पण झुल्फिकारखानाने मात्र निर्धारानें धनाजीचा पाठलाग सुरू केला. त्याच्याजवळ सैन्य थोडे होते पण त्यानें त्याची फिकीर केली नाही. धनाजीची पाठ म्हणून त्याने सोडली नाही. मराठे औरंगाबाद सोडून गोदावरीच्या काठावर पोचले आहेत असे त्याला कळले, तोही गोदाकाठी आला. तेथे त्याला कळले की ते धर्मपुरीचा घाट ओलांडून परळीवैजनाथच्या बाजूने गेले तोही त्यांच्या मागोमाग गेला. मराठे औसा, तुळजापूर, परांडा या गावावरून पुढे गेले व त्यांनी भीमा पार केली. तोही भीमापार झाला. मराठे कृष्णापार झाले, झुल्फिकारखानही कृष्णाकाठी आला पण पावसाळा आला म्हणून त्याने मिरजेपासून बारा कोसांवर मुक्काम केला. त्या मुक्कामात त्याला धान्याची फार टंचाई झाली. आधी धावपळीत चाऱ्याच्या टंचाईमुळे त्याचे बरेच घोडे व सामानाची जनावरे दगावली होतीच व विशेष म्हणजे नगरपासून मिरज काही दूर नव्हते. पण झुल्फिकारखानाला रसद पाठविणे औरंगजेबाला शक्य झाले नाही. तेच औरंगजेबाला त्याच्या बापाने म्हणजे शहाजहानने कंदाहारच्या मोहिमेवर पाठविले होते तेव्हा सैन्याचा दोन वर्षांचा पगार त्याने आगाऊ दिला होता. आणि दोन वर्षे सैन्याला पुरेल इतका रसदेचा साठा सैन्याबरोबर दिला होता. असो, पावसाळा संपल्यानंतर धनाजी विजापूर प्रांतात शिरला. त्याच्या मागोमाग कृष्णा ओलांडून झुल्फिकारखानही आला. धनाजी कर्नाटकात सोंडूरकडे गेला तेव्हा तुंगभद्रा

ओलांडून झुल्फिकारखानही त्याच्या मागे आला. अखेर धनाजी जेव्हा श्रीरंगपट्टण बिदनुरकडे निघून गेला तेव्हा झुल्फिकारखान परत फिरला. नेहमीप्रमाणे झुल्फिकारखानाची ही पायपीट एप्रिल ते फेब्रुवारी झाली व धनाजीच्या मागोमाग त्यानेही ताडताड उड्डाणे करीत गोदा, भीमा, कृष्णा, घटप्रभा, तुंगभद्रा इतक्या नद्या पार केल्या. औरंगजेबानंतर महाराष्ट्राचा कानाकोपरा हिंडलेला मोगलांकडे झुल्फिकारखान हा एकच पुरुष बहुधा असावा.

पण झुल्फिकारखान काय किंवा फिरोजजंग काय किंवा दाऊदखान पन्नी काय किंवा खुद्द औरंगजेब काय, या सर्वांचे कर्तृत्व व पराक्रम सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर धो धो कोसळणाऱ्या व नंतर खळखळ वाहून जाणाऱ्या पावसाप्रमाणे व्यर्थ ठरले. कारण गेली सव्वीस वर्षे हेच चालले होते. त्याला अन्तच नव्हता. पेनेलोपच्या विणकामाप्रमाणे बादशहाची मराठ्यांवरच्या मोहिमेची कथा होऊन बसली होती. सकाळी विणायचे, संध्याकाळी मोडायचे, दुसऱ्या दिवशी सकाळी परत विणायचे, आणि संध्याकाळी परत मोडायचे अशा तिच्या प्रवृत्तीमुळे विणकामाची घडी कधी बसलीच नाही. तसेच बादशहाचे झाले. त्याचे आयुष्य संपत आले पण त्याची मराठ्यांवरची मोहीम संपण्याचे लक्षण काही दिसेना. 'म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकावतो' असे म्हणतात ते खरे आहे. या मोहिमेत बादशहाची माणसे मेली, खजिना गेला, यापेक्षाही त्याची इभ्रत पार रसातळाला गेली हे त्याचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले. मराठे तर सोकावलेच पण त्यांचे उदाहरण पाहून आजपर्यंत दबून राहिलेले ठिकठिकाणचे जमीनदार डोके वर काढू लागले. आग्र्याकडे जाटांनी बंडाचा झेंडा उभारला. सिंध प्रांतात जमीनदारांनी बंडाळी सुरू केली. राजपुतान्यात जोधपूरचे जे युद्ध औरंगजेबाने चालू केले होते, ते अजून चालूच राहिले होते. अजितसिंग व दुर्गादास कधी त्याच्या मनसबी पतकरीत होते, कधी त्याच्याविरुद्ध बंड करीत होते. पण या सर्वांपेक्षा विशेष म्हणजे बुंदेलखंडात छत्रसाल बुंदेल्याने भलत्याच कटकटी चालू केल्या होत्या. तो काफर शिवाजी त्याला गुरु भेटला होता, त्यात सर्व काही आले. बादशहाने जेवढे म्हणून सरदार त्याच्यावर रवाना केले, त्या सर्वांना अपयश पतकरून परत यावे लागले. ज्या वेळी बादशहा सातारला वेढा घालून बसला होता, त्या वेळी छत्रसाल पुराघाटच्या लढाईत शेर अफकनखानाचा मुडदा पाडीत होता. नेमाजी शिंद्याला तर त्याने मुद्दाम आमंत्रण देऊनच माळव्यात बोलाविले. इतकेच नव्हे तर सहीसही मराठ्यांचा कित्ता उचलून सगळ्या बुंदेलखंडावर त्याने चौथाईचा अंमल बसविला. त्याला आवर कसा घालायचा हा बादशहापुढे मोठाच प्रश्न होता. अखेर फिरोजजंगाचा सल्ला त्याने मानला व छत्रसालाला चार हजारांच्या मनसबीचे अवदान चारून कसेबसे गप्प बसविले. पण हे म्हणजे, मरीआईला दहीभाताचा नैवेद्य दाखविण्यासारखे होते. तो केव्हा बिथरेल आणि परत धामधूम सुरू करील याचा

काहीच नेम नव्हता. मनूची म्हणतो की, 'औरंगजेब अहमदनगरला निघाला तेव्हा आसपासचा सगळा प्रदेश उजाड आणि ओसाड होऊन गेला होता. शेतामध्ये झाडे नव्हती कीं पिके नव्हती. पहावे तिकडे माणसांच्या आणि जनावरांच्या हाडांचे ढीग अस्ताव्यस्त पसरलेले होते. हिरवी पालवी कोठे औषधालाही सापडत नव्हती. चार चार दिवस प्रवास करावा तरी कोठे शेकोटी दिसू नये कीं दिवा दिसू नये अशी दुर्दशा झाली होती. औरंगजेबाच्या कारकिर्दीची फलश्रुति ही अशी होती. त्याने राज्याची सूत्रे हातांत घेतली तेव्हा बुलंद असलेली मोगल साम्राज्याची इमारत आता थरथर कंप पावू लागली होती. तिला तडे गेले होते, आणि वाऱ्याच्या झुळकेनेही केव्हा ती कोसळेल याचा नेम राहिला नव्हता. आपल्या पन्नास वर्षांच्या राजकीय कर्तृत्वाची ही परिणति पाहून 'हे काय फल मम तपाला' असे औरंगजेबाला वाटे व त्याचे मन पराकाष्ठेच्या उद्वेगाने भरून जाई.

दलदलीच्या चिखलात म्हणजे 'रांजणा'त फसलेला दुर्दैवी जीव जों जों त्यातून वर येऊ पहातो तो तों तो त्यात अधिक रुततच जातो. कोळयाच्या जाळयात अडकलेला किडा जों जों त्यातून सुटण्याची धडपड करतो तितका त्यात तो अधिकच गुरफटत जातो. मराठयांचे कोडे सोडविण्याचा औरंगजेब जो जो अट्टाहास करीत होता, तितका तो त्यात जास्त जास्त गुंततच चालला होता. इतकेच नव्हे तर 'वाढतां वाढतां वाढे भेदिले शून्यमंडळा' अशा प्रकारे अनावर होत चाललेल्या त्या मराठयांच्या समस्येला अनाकलनीय आणि भीतीने थरकाप उडविणाऱ्या अक्राळविक्राळ व जीवघेण्या गूढाचे स्वरूप येऊ पहात होते. फिरोजजंगाला १७०६ साली औरंगजेबने पत्र लिहिले आहे. तो त्याचा महत्त्वाचा असा अखेरचाच राजकीय दस्तऐवज म्हणावा लागेल. ते पत्र वाचले म्हणजे, 'तिळा उघड' या मंत्राचे ऐन वेळी विस्मरण झाल्यामुळे गुहेच्या बंद दरवाजावर केविलवाण्या धडका देणाऱ्या अली बाबाच्या गोष्टीतल्या हताश कासिमाप्रमाणे औरंगजेबही मराठयांच्या गूढाचा हा बंद दरवाजा जिवाच्या आकांताने ठोठावत आहे असा भास झाल्याशिवाय राहत नाही.

खान फिरोजजंग याला औरंगजेबाने लिहिलेले पत्र पुढीलप्रमाणे आहे—

"बादशहाच्या पुढील आज्ञा त्याच्या आज्ञेप्रमाणे मी (इनायतुल्लाखान, औरंगजेबाचा चिटणीस) आपल्याला कळवीत आहे की—

"दख्खनच्या सुभेदारांकडून नरकवासी शिवा (जी) व त्याचा मुलगा याचे व इतर बंडखोर यांचे पारिपत्य झाले नाही. पंचवीस वर्षांपूर्वी आम्ही सैन्यासहित अजमीरहून निघालो आणि दक्षिणेत तळ दिला. परमेश्वराच्या मार्गानेच चालण्याची आमची नियत होती.

या पंचवीस वर्षांच्या काळात परमेश्वराच्या कृपेने विजापूर, हैद्राबाद ही ताब्यात

आली. मुसलमानांचे किल्ले काफरांच्या (मराठ्यांच्या) ताब्यात गेले होते. त्यांपैकी बहुतेक किल्ले जिंकून घेण्यात आले. शत्रूंना पुन्हा पुन्हा शिक्षा मिळाली.

शिवा (जी) व त्याचे मुलगे जिवंत असेपर्यंत त्यांच्यापाशी बारा हजारांहून अधिक स्वार असल्याचे ऐकिवात नव्हते आणि आता आम्हाला पुन्हा पुन्हा कळविण्यात येते की, हलकट गनिमाची तीस तीस चाळीस चाळीस हजार स्वारांची सैन्ये सर्वत्र पसरली आहेत. ही सैन्ये माळवा व गुजरात या प्रांतात जात आहेत. आमच्यासमोर येणारी बातमीपत्रे पाहता या प्रतिस्पर्ध्यांचे (मराठ्यांचे) सैन्य दोन लाख स्वारांपर्यंत जावे. हे प्रकरण म्हणजे एक गूढ आहे. तुम्हांला (हिम्दलमुल्क–खान फिरोजजंग, वऱ्हाड व नांदेड या सुभ्यांचा सुभेदार) अनेक गोष्टींची माहिती आहे. या किड्यामुंग्यांचा (मराठ्यांचा) निःपात व्हावा, मुसलमानांच्या संपत्तीवर व अब्रूवर ते घाला घालीत आहेत हे आक्रमण संपुष्टात यावे याबद्दल तुम्हाला ज्या योजना योग्य वाटतात, त्या सुचवीत चला.'[१]

पण बाहेर उन्हाळा असला, तरी निदान घरात तरी सावली असावी. पण बिचाऱ्या औरंगजेबाच्या बाबतीत प्रपंचाचाही उन्हाळाच झालेला होता. औरंगजेब हा चांगला कुटुंबवत्सल मनुष्य होता. त्याला चार बायका होत्या व मुलेबाळेहो पुष्कळ झाली. पण त्याच्या लग्नाच्या बायका म्हणजे 'प्रजायै गृहमेधिनाम्' या वचनाप्रमाणे मुलांना जन्म देऊनच केवळ कृतार्थ झाल्या होत्या. औरंगजेबाच्या अंतःकरणात जे काही प्रेम होते ते काही त्याच्या लग्नाच्या बायकांच्या वाट्याला आले नाही. ते त्याने सगळे दासींसाठी राखून ठेवले. ही गोष्ट चमत्कारिक वाटली तरी खरी आहे. ही एकेकीची ललाटरेषा असते इतकेच. प्रथम हिराबाई औरंगजेबाची जीव की प्राण होती आणि नंतर तिची जागा उदेपुरीने घेतली. उदेपुरीचे कुलशील काय विचारावे? गुलामांच्या उघड्या बाजारात औरंगजेबाचा मोठा भाऊ दारा याने विकत घेतलेली ती बांदी होती. दाराचा निकाल लावल्यानंतर औरंगजेबाने तिला आपल्याकडे घेतली. पण तिचे 'खानदान' त्याला कधी कधी फार खटके. तिचा मुलगा कामबख्श याने जिंजीला असताना मराठ्यांशी कारस्थान केल्याचे कळल्यावर औरंगजेब रागावून म्हणाला, "बोलून चालून नाचीचे कार्टे! अगदी बादशहाने जरी त्याला जन्म दिला तरी ते काय कधी बरे निपजायचे आहे!" पण कुलांतला जन्म जरी दैवायत्त असला तरी पराक्रम माणसाचा आहे आणि त्या बाबतीत उदेपुरी ही खरोखरच महापराक्रमी होती. उदेपुरी ही सौन्दर्याची आणि विभ्रमाची केवळ ओतीव पुतळा होती आणि ज्या वेळी ती औरंगजेबाकडे आली त्या वेळी तर तिच्या तारुण्याचा वसतऋतु बहरात आलेला होता त्यामुळे आपल्या लावण्याच्या आगळ्या नव्हाळीने तिने औरंगजेबाला वेड लावले यात नवल नाही. औरंगजेबासारखा जन्मजात अरसिक नवरा तिने वर्षानुवर्ष आपल्या मुठीत ठेवला यावरूनच तिच्या सौन्दर्याची व चातुर्याची कल्पना

करावी. पण सौन्दर्यप्रमाणे तिचे पाककौशल्यही नावाजण्यासारखे होते. जनानखान्यातल्या बेगमा वेळोवेळी बादशहाला मेजवान्या देत पण उदेपुरीच्या सरस पक्वान्नाची सर कोणाच्याच पदार्थाला येत नसे. स्वयंपाक करण्याच्या बाबतीत तिचा हात कोणीच धरू शकत नसे. 'नवऱ्याच्या हृदयात जाण्याचा मार्ग त्याच्या पोटातून जातो' हे 'वशीकरण तंत्र उदेपुरीने चांगलेच आत्मसात् केले होते. या सर्व गोष्टींमुळे औरंगजेबाची ती साक्षात् अपर आत्मा बनून राहिली होती. पण काळ मोठा निर्दय आहे. एके काळी तिलोत्तमेला लाजविणारी ती त्रिभुवन सुंदरी आता औरंगजेबासारखीच जख्ख म्हातारी झाली होती. तिचा मुलगा कामबख्शच मुळी एकूणचाळीस वर्षांचा होता. तिच्या यौवनाची छाया केव्हाच मावळली होती. त्या चतुर वयात सोबत केलेली सुरेची सुरई मात्र सखीप्रमाणे तिची साथ अजूनही सोडत नव्हती. पहावे तेव्हा ती दारूने तर्र होऊन पडलेली असावयाची. ते पाहिले म्हणजे सोवळ्या औरंगजेबाला कसेसेच होई. पण करतो काय ? इलाज काहीच नव्हता. कारण तिच्यावर त्याचे प्रेमही तसेच होते. कोरड्या तुळया लीलेने पोखरणारा भुंगा कोवळ्या कमलकलिकेत सापडला म्हणजे तेथे प्राणांनी उत्तीर्ण होईल पण ते कमलदल चिरू धजणार नाही, असा जो प्रेमाचा महिमा कवींनी आळविला आहे तो औरंगजेबाच्या बाबतीत उत्तम पाहायला मिळतो. उदेपुरीप्रमाणे त्याची मुलगी झीनतुन्निसा हीही त्याचे विश्रामस्थान होती. ती बिनलग्नाची राहिली, व दक्षिणच्या स्वारीत आईच्या मायेने तिने बापाची काळजी वाहिली. शाहूचा प्रतिपाळही त्याच्या या मुसलमान मावशीनेच पराकाष्ठेच्या वात्सल्याने केला हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. ती उदेपुरी व ही झीनतुन्निसा या दोघी म्हणजे राजकारणाच्या तलखीने हैराण झालेल्या औरंगजेबाच्या जीवनात पसरलेल्या जाईजुईच्या गारवेलीच होत्या, असे म्हटले तरी चालेल.

पण इतकेच. यापलीकडे संसारसुख औरंगजेबाच्या कपाळी काही नव्हते. त्याला पाच मुले होती. पण एकाही मुलामध्ये त्याची बुद्धिमत्ता, त्याचे चातुर्य, त्याचा संयम, त्याची विद्वत्ता, त्याचा उद्योग यांचा वारसा उतरला नव्हता. यापैकी सर्वांत मोठा मुलगा सुलतान महंमद हा चाळिशीच्या आत पूर्वीच मरण पावला होता. त्याच्याहून धाकटा आणि आता सर्वांत मोठा असलेला मुअजम ऊर्फ शहाआलम हा होता. त्याला औरंगजेबाने अफगाणिस्थानच्या स्वारीवर पाठविले आणि दोन वेळा दक्षिणची सुभेदारीही दिली. पण त्याने कोठेच पराक्रम दाखविला नाही. संभाजीवर केलेल्या कोकणच्या स्वारीत तर त्याची फजितीच झाली. मुअजमला मुले झाली व त्याच्या मुलांनाही मुले झाली. पण आजोबा होऊनही मुअजमला बापाकडून आपल्या भेकडपणाबद्दल टोमणे खावे लागत. त्याच्यापेक्षा धाकटा आजम हा बराच पराक्रमी होता. विजापूरच्या वेढ्यात त्याने चांगली

कामगिरी केली. पण खाणे थोडे आणि मचम्च फार या म्हणीप्रमाणे त्याच्या कर्तुकीपेक्षा त्याची बढाईच फार होती. बापाच्या ठिकाणी असलेले विकारांवरचे नियंत्रण त्याच्या गावीही नव्हते. रागाला आला म्हणजे तो एखाद्या हिरवट टाळक्याच्या बिथरलेल्या पैलवानाप्रमाणे अस्तन्या सरसावू लागे व वेडेवाकडे बोलू लागे. मग समोर खुद्द बादशहाची स्वारी असली तरी त्याच्या खिजगणतीत नसे. त्याच्याहून धाकटा अकबर ह्यालाही पुढे आणण्याचा बापाने फार प्रयत्न केला, पण मुअजमप्रमाणेच त्याच्याही बाबतीत भरवशाच्या म्हशीला टोणगा झाला. त्याला माळव्याची व अलाहाबादेची सुभेदारी दिली, पण जाईल तेथे भांडण करण्यापलीकडे अकबराने काही कर्तृत्व दाखविले नाही. चौथा मुलगा कामबख्श आजपर्यंत त्याचा पराक्रम रणांगणापेक्षा वाटाघाटीने व पैसे चारून मराठ्यांचे किल्ले घेण्यापलीकडे फारसा दिसून आला नव्हता. बापाप्रमाणे त्याला कुराण तोंडपाठ होते एवढी गोष्ट मात्र त्याच्या जमेला धरली पाहिजे. बापाचे प्रेम मुलापेक्षा त्यांना झालेल्या मुलांवर म्हणजे नातवांवर जास्त असते या जगरहाटीला औरंगजेबही अपवाद नव्हता. मुअजमचा मुलगा अजीमुश्शान व आझमचा मुलगा बेदारबख्त हे दोघेही पराक्रमी होते; आणि औरंगजेब त्यांच्यावर बेहद्द खूष होता. बाकी मुलांच्या बाबतीत तो सामान्यतः दिलगीरच होता. या मुलांचे शिरस्त्याप्रमाणे एकमेकांशी कितीही वाकडे असले तरी एका बाबतीत मात्र त्यांची गट्टी होती. ती सारी पोरे पट्टीची दारूबाज होती. त्या कुटुंबात धर्मकर्म, उपासतापास, व्रतवैकल्ये यांचा मक्ता औरंगजेबाकडे आला होता आणि नाचगाणे, इष्कबाजी, मौजमजा यांचे कंत्राट मुलांकडे आले होते. कथा अशी आहे की पेशवे नेहमी मोहीमशीर असल्यामुळे सुतक पाळण्यासाठी त्यांनी एका सोवळ्या ब्राह्मणाची कायमची नेमणूक करून टाकली होती. पेशव्यांच्या कुटुंबात कोणी दगावले म्हणजे त्याचे सुतक धरणे व सगळ नेमधर्म यथासांग पाळणे एवढेच त्याचे काम असे. त्या सोवळ्या ब्राह्मणाची सुतकी कळा बिचाऱ्या औरंगजेबाला त्याच्या कुटुंबात प्राप्त झाली होती. त्याची बायको उदेपुरी हिच्यापासून तो तहत त्याचा मुलगा कामबख्शापर्यंत एकजात सारी मंडळी अट्टल दारूबाज होती आणि तो मात्र ठणठणीत कोरडा राहिला होता. त्यामुळे त्याचे त्यांच्यामध्ये आगमन झाले म्हणजे तो व बाकीचेही कावरेबावरे होत. मेजवानी रंगात आलेली असावी आणि धाडकन् कपाटातून प्रेताचा सांगाडा टेबलावर आदळावा तसे काहीसे होई. साध्या राहणीचे आणि उच्च विचारसरणीचे आध्यात्मिक ऐश्वर्य चिरंजीवांनी आपल्या वंदनीय तीर्थरूपांसाठी राखून ठेवले होते आणि स्वतःसाठी मात्र उच्च राहणी व साधी विचारसरणी स्वीकारली होती. औरंगजेबाच्या कुटुंबातला श्रमविभाग हा असा होता. त्यामुळे भरल्या संसारातही बिचारा एकाकीच होता

....२४

औरंगजेबाने मरण्यापूर्वी आपल्या मुलांना उपदेश लिहून ठेविला त्यात तो म्हणतो– "आपल्या मुलांवर तुम्ही कधीही विश्वास ठेवू नका आणि जिवंत असेपर्यंत त्यांच्याशी सलगीने कधीही वागू नका; कारण जर शहाजहानने दाराला इतक्या सलगीने वागविले नसते तर त्याची अशी दुर्दशा झाली नसती. नेहमी हे वचन डोळ्यांपुढे ठेवा की राजाचा शब्द वांझोटा असतो– शहाजहानच्याच नव्हे तर त्याच्याही अनुभवाचे सारसर्वस्व या उद्‌गारात तो सांगत होता. एक आझम सोडला तर त्याचा एक मुलगा असा नव्हता की, ज्याने त्याच्याशी बेइमानी केली नव्हती व ज्याला बंदीखाना दाखवावा लागला नव्हता. त्याचा सर्वांत मोठा मुलगा सुलतान महंमद हा औरंगजेबाचा राज्यपदप्राप्तीसाठी झगडा चालू असता, त्याचा दावेदार भाऊ शुजा याला जाऊन मिळाला. पुढे त्याला पश्चात्ताप होऊन तो बापाकडे परत आला, पण औरंगजेबाने त्याला बारा वर्षे ग्वाल्हेरच्या तुरुंगात कैदेत ठेवून दिले; त्याची तब्येत समजावी म्हणून वर्ष सहा महिन्यांनी चितारी त्याचे चित्र काढून आणण्यास तेथे पाठविले जात. त्या चित्रावरून बापास मुलाचे कुशल कळे. दुसरा मुलगा मुअजम याने असेच गोवळकोंड्याचा वेढा चालू असता कुतुबशहाशी संधान बांधले. त्याबद्दल औरंगजेबाने त्याला आठ वर्षे कैदेत ठेवले. त्या मुदतीत त्याला मिष्टान्ने खाऊ दिली नाहीत की हजामत करू दिली नाही की, चांगले कपडे वापरू दिले नाहीत की नखेसुद्धा काढू दिली नाहीत. तिसरा शहाजादा अकबर. त्याने तर बाप जिवंत असतानाच बंडाचा झेंडा उभारला आणि स्वतःला अभिषेक करून घेतला. तो दक्षिणेत संभाजीकडे पळून आला म्हणून तर औरंगजेबाला त्याच्या मागोमाग दक्षिणेत उतरावे लागले व सव्वीस वर्षे तेथेच अडकून पडावे लागले. अकबर पुढे पळून इराणात गेला आणि तेथे बसून बाप लवकर मरावा म्हणून देवाला प्रार्थना करण्यापलीकडे त्याला दुसरा उद्योग राहिला नाही. औरंगजेबाला हे कळल्यावर तो तिरस्काराने हसला व म्हणाला, "पाहू बच्चमजी, कोण आधी मरतो, तू की मी !" आणि त्याने एक प्रसिद्ध श्लोक म्हटला– "त्या कुंभाराचे शब्द मी विसरू शकत नाही. त्याने मातीचा एक अतिशय नाजूक पेला तयार केला व त्याला म्हटले, दैवाने फेकलेला दगड तुझा की माझा प्रथम चुराडा उडवील हे मला कळत नाही." अखेर अकबर मेला तेव्हा औरंगजेबाने सुटकेचा निःश्वास सोडला व म्हटले, "हिंदुस्थानच्या शांततेला असलेला सर्वांत मोठा धोका एकदाचा नाहीसा झाला." बाप आणि मुलगा यांच्या नात्याची इतकी विटंबना असलेले असे दुसरे कोणते उदाहरण शोधून तरी सापडेल काय ? अकबराबरोबर त्याची बहीण झेबुन्निसा हिचीही वाट लागली. या मुलीवर खरे म्हणजे औरंगजेबाचा फार जीव होता. ती होतीही तशीच चुणचुणीत. लहान वयातच ती अरबी व फारशी भाषांची पंडिता झाली व एकदा तर तिने औरंगजेबाला सगळे कुराण

तोंडपाठ म्हणून दाखविले. तेव्हा धर्मनिष्ठ बापाला अस्मान ठेंगणे झाले व त्याने तिला तीस हजार मोहरा बक्षीस दिल्या. पण जेव्हा का तिने बापाविरुद्ध अकबराचा पक्ष घेऊन त्याच्या बंडखोरीला पाठिंबा दिला, व तिने त्याला लिहिलेली पत्रे औरंगजेबाच्या हाती लागली, तेव्हा तिची बिलकुल गय न करता औरंगजेबाने तिचे चार लाखांचे पेन्शन बंद केले व तिला सालिमगडचा तुरुंग दाखविला. तेथे एकांतवासात एकवीस वर्षे कुजून कुजून ती अखेर मेली तेव्हा औरंगजेबाला रडू कोसळले. आपल्या बापाच्या शत्रूशी हातमिळवणी करण्याच्या बाबतीत कामबख्शही आपल्या भावाच्या मागे नव्हता. झुल्फिकारखान जिंजीला हैराण झाला, तेव्हा त्याच्या मदतीसाठी म्हणून कामबख्शाला औरंगजेबाने पाठविले. तर त्या पठ्ठ्याने थेट राजारामाकडे पळून जाण्याचा घाट घातला. आता तो लाडका मुलगा व उदेपुरीची रदबदली त्यामुळे थोडक्यावर प्रकरण निभावले तरी पुढे त्याला सहा महिने बंदिशाळेचा अभ्यासक्रम पुरा करावाच लागला. एकंदर विचार केला म्हणजे मुलांच्या बाबतीत औरंगजेबाचे काही चुकले असे वाटत नाही. त्याला दोष देण्यास मन धजत नाही. त्याने मुलांना प्रेम दिले, संगोपन केले, शिक्षण दिले, सुभेदाऱ्या दिल्या, संधी दिल्या, पण एकही मुलगा काही त्याच्या मनासारखा निपजला नाही. त्यात त्याचा काही अपराध होता असे वाटत नाही.. तो सगळा त्याच्या नशिबाचा खेळ होता. मुलांच्या बाबतीत औरंगजेब परम दुर्दैवी होता हीच गोष्ट खरी.

औरंगजेबाचे दुर्दैव इतके घोर होते की अखेरच्या दिवसांत माणसाला आपली मुलेबाळे जवळ असावी असे वाटते, पण औरंगजेबाची अशी फार फार इच्छा होती की एकही मुलगा आपल्या आजारात जवळ असू नये. कारण, आपल्या आजारी बापाची वाट आपण जशी लावली तशीच आपली वाट आपली मुले लावतील अशी त्याला सदैव धास्ती होती. अशा स्थितीत आझम, जो गुजराथच्या सुभ्यावर होता, त्याने औरंगजेबाच्या आजाराची वार्ता ऐकून अतिशय चिंता व्यक्त केली व भेटीस येण्याची परवानगी विचारली. त्याबरोबर गुजराथचे हवामान आपणास मानवत नाही असेही त्याने लिहून कळविले. आझमचे पत्र वाचून औरंगजेबाच्या मनात पन्नास वर्षांपूर्वीच्या आठवणींचा चित्रपट जागा झाला. त्या वेळी शहाजहान अर्धांगवायूने आग्र्याला आजारी पडला होता. त्या बातमीचा फायदा घेऊन वरवर आजारी बापाचा समाचार घेण्यासाठी पण मनातून राजमुकुट काबीज करण्यासाठी, औरंगजेबासकट शहाजहानच्या मुलांनी आग्र्यावर चाल केली होती. कालचक्राचा एक फेरा पुरा झाला. आता औरंगजेब आजारी पडला आणि त्याची मुले समाचाराला येतो म्हणू लागली. आझमच्या मनातला उद्देश ताडायला औरंगजेबाला वेळ लागला नाही. जात्याच तो चाणाक्ष आणि स्वतः तो पूर्वी याच मार्गाने गेला होता. चोराच्या खुणा चोरालाच चांगल्या कळतात.

त्याने आझमला समजेल असे उत्तर पाठविले– "आमचे वडील शहाजहान बादशहा यांची प्रकृति बिघडली होती. त्या वेळी आम्हीही अशाच मजकुराचे पत्र पाठविले होते. त्यांनी आम्हांला उत्तर दिले की, कोठल्याही स्थळाचे हवापाणी अनुकूल असू शकते पण स्वार्थाची हवा मात्र वाईट."

पण आझम हा मतिमंद म्हणून त्याला बापाच्या पत्रातला टोमणा कळला नाही म्हणा, की तो कोडगा म्हणून, कळूनही त्याने तो मनावर घेतला नाही म्हणा, त्याने गुजरातेतून आपणास भेटीला येण्याची परवानगी द्यावी म्हणून गयावया करण्याचा धडाका चालूच ठेवला. शेवटी, कंटाळून औरंगजेबाने त्याला एकदाची परवानगी दिली. त्याप्रमाणे २५ मार्च १७०६ रोजी अहमदनगरला बापलेकांची भेट झाली. भेटीच्या वेळी औरंगजेब आझमला म्हणाला, "मुला, आता मी म्हातारा झालेलो आहे. काफरांबरोबरचे हे युद्ध माझ्याकडून शेवटास जाईल असे आता काही दिसत नाही. तर आता तू ही जबाबदारी आपल्या खांद्यावर घे. मला आता विश्रांति हवी आहे. माझ्यानंतर तूच या दक्षिणच्या सुभ्याचा मालक होणार आहेस." बापाचे बोलणे ऐकून या प्रश्नाचा विचार करण्यासाठी आझमने एक महिन्याची मुदत मागून घेतली.

महिना संपला, तेव्हा आझम काय उत्तर देतो हे ऐकण्यासाठी औरंगजेबाने कान टवकारले. आझम म्हणाला, "खाविंद, आपण जातीने सव्वीस वर्षे मेहेनत केली व पाण्यासारखा पैसा ओतला, तरी आपल्या मनाप्रमाणे काफरांचा बंदोबस्त आपण करू शकला नाही. मग मी तर मामुली शहाजादा, मी तो कसा करू शकेन ? माझी ताकद ती काय व संपत्ति ती कितीशी ? असल्या मोठ्या कामात स्वतःला गुंतवून घ्यावयाला मी उत्सुक नाही. माझी एवढीच इच्छा आहे की आपल्या पायापाशी राहावे आणि इतर सरदारांप्रमाणे आपली सेवा करावी. माझ्याऐवजी आपण शहाजादा शहा आलम याची या कामगिरीवर नेमणूक करणे बरे. तो माझ्यापेक्षा पैशानेही मातबर आहे व त्याला चार मुलांचे पाठबळही आहे." बादशहाने आपल्या गळ्यात अडकविलेले जबाबदारीचे लोढणे काढायचे व शिताफीने ते आपल्या दावेदाराच्या म्हणजे मुअजम शहा आलमच्या गळ्यात अडकवावयाचे असली ही आझमची एका दगडात दोन पक्षी मारण्याची नामी शक्कल होती. मुलाचे हे चिमखडे बोल ऐकून बिचारा औरंगजेब अगदी गप्प बसला. बोलणार काय ?

गेल्या काही वर्षांत औरंगजेबाची छावणी म्हणजे शुद्ध बजबजपुरी झाली होती. पाच लाख लोकांनी गजबजलेल्या त्या छावणीत कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही अशी अवस्था हमेशा असे. एकदा असे झाले की औरंगजेबाच्या सैन्यात समशेरखान नामें पठाणांचा नाईक होता. त्याचा पुतण्या अकबराकडे पळून

गल्याचे बादशहाला कळल्यावरून त्याला परत बोलावून घ्यावे असा त्याने खानाला हुकूम केला. समशेरखान बोलून चालून रांगडा पठाण. त्याने दरबारी वळणावळणाच्या भाषेचा घोळ न घालता ताडकन् बादशहाला परखड जबाब दिला की "बादशहा सलामत, आपला मुलगा ज्याप्रमाणे आपल्या ताब्यात नाही त्याप्रमाणे माझाही पुतण्या माझ्या ऐकण्यात नाही." एवढे बोलून तो तडक तंबूकडे चालता झाला. पठाणाच्या बोलण्याने बादशहाच्या डोक्याला मुंग्या आल्या पण त्या वेळी तो काही बोलला नाही. पठाण तंबूपाशी पोचतो तो बादशहाचा निरोप आला की, तेवढी कमरेची तलवार बादशहाने मागितली आहे. त्याने साफ उत्तर केले की, आपला प्राण गेल्याशिवाय आपली तलवार बादशहाला मिळणे नाही. तेव्हा त्या बंडखोर समशेरखानाचे पारिपत्य करण्यासाठी बादशहाने स्वतःचा खास बारा हजार स्वारांचा रिसाला पाठविला. पठाणानेही आपली जमियत गोळा केली व हल्ल्यावर हल्ले चढविले. अखेर बारा हजारांपैकी सातशे बावन्न स्वार जव्हा मारले गेले तेव्हा कोठे त्या पठाणाचे डोके बादशहाच्या हाती लागले. असल्या या अंधेरनगरीत आझम महाशयांचे आगमन म्हणजे 'दुष्काळात तेरावा महिना' या म्हणीप्रमाणे नव्या आपत्तीला आमंत्रण होते. औरंगजेबाला हे समजत नव्हते असे कसे म्हणावे? पण आपल्या डोक्याइतक्या उंच झालेल्या आणि दाढी पिकू लागलेल्या त्रेपन्न वर्षांच्या मुलाला औरंगजेब, भला तो किती का करडा बाप असेना, आवरून आवरून किती आवरणार?

छावणीत आल्यावर आजारी बापाची वास्तपुस्त करण्याचे मामुली शिष्टाचार उरकल्याबरोबर आझमने आपल्या नेहमीच्या उद्योगाला म्हणजे बसल्या बसल्या नसती खेकटी निर्माण करण्याला धूमधडाक्याने सुरवात केली. जात्या तो महाघमेंडखोर होता आणि भांडकुदळ तर नंबर एकचा. त्याची आई ही इराणच्या सफवी राजकुळातून आलेली होती आणि या आपल्या उत्तम जातकुळीबद्दल आझम भलत्याच प्रौढीने आणि फुशारकीने बोले. जणू तिच्या पोटी जन्म घेण्यात त्यानेच काही पराक्रम केला होता! 'सांगे वडिलांची कीर्ति' असल्या कोटीतले मूर्ख सगळीकडेच सापडतात. आझम त्यातलाच होता. आणि त्याच्या जोडीला, 'आपली आपण करी स्तुति। तो एक मूर्ख' हेही मूर्खलक्षण त्याच्या ठिकाणी केवळ अपरंपार भरलेले होते. त्यामुळे आपला मोठा भाऊ मुअज्जम याच्याबद्दल तर तो तुच्छतेने बोलेच. पण धाकटा भाऊ कामबख्श याच्याबद्दल बोलताना तर त्याच्या जिभेला अगदी हाड उरत नसे. त्याच्या तोंडाळ रसवंतीचे सारे भेसूर वैभव त्या वेळी प्रकट होई. 'नाचगाणे करणाऱ्या रखेलीचा मुलगा' म्हणून तो त्याची टर उडवी, आणि बरेच बोलू नये ते बोले.

आसदखान, झुल्फिकारखान, महंमदखान सफवी, फिरोजजंग इत्यादि इराणी सरदारांचा जो प्रबल गट दरबारात होता त्याचा पाठिंबा आझम इराणी आईचा

मुलगा म्हणून साहजिकच आझमला होता. त्यामुळे आझम भलताच खूष होता. पण त्या बिचाऱ्याच्या हे लक्षात आले नाही की, त्यांचा पाठिंबा आझमला नव्हता तर खरोखरी स्वतःलाच होता; त्यांनी सोय आझमची पाहिली नाही तर स्वतःची पाहिली. त्याच्या गुणवैभवावर ते लुब्ध नव्हते; आधी कोणी लुब्ध होण्याइतके गुणवैभव आझमपाशी मुळातच नव्हते. आणि जरी असते तरी त्याची त्यांनी पर्वा केली नसती. मुद्द्याची गोष्ट अशी होती की मुअजमला औरंगजेबाने कैद केले. त्यात फिरोअजंग, आसदखान, झुल्फिकारखान वगैरे मंडळींनी महत्त्वाच्या हालचाली केल्या होत्या. आणि कामबख्शाच्या बाबतीत म्हणावयाचे म्हणजे जिंजीला असताना खुद्द त्यालाच आसदखान व झुल्फिकारखान या बापलेकांनी कैदेत डांबून ठेवले होते. इतकेच नव्हे तर रागाच्या सपाट्यात 'अरे नाचणारणीच्या कारट्या' अशी इरसाल शिवी हासडून आसदखान महाशयांनी कामबख्शाच्या महामहिम मातोश्रींच्या जातकुळीचा उद्धार केला होता. त्यामुळे जर का मुअजम किंवा कामबख्श यांपैकी कोणीही बादशहा झाला तर तो आपले कंबरडे मोडल्याशिवाय राहणार नाही अशी या बिलंदरांची बालंबाल खात्री होती. त्या मानाने आझमच्या बाबतीत काही वांधा नव्हता म्हणून या निवडणुकीत आपली मते त्यांनी आझमला दिली व त्याचे पारडे जड केले. भोळा बिचारा आझम! तो हे सर्व आपणावरील प्रेमामुळे आपल्या सरदारांनी केले असेच समजत होता. आपल्या पाठिराख्यांची राजकारणे किती खोल आहेत हे समजायला त्याला दुसरा जन्म घ्यावा लागला असता. दुसऱ्या उद्देशाने किंवा अगदी सहज केलेल्या कृतीसुद्धा मुद्दाम आपल्यासाठीच केल्या असे समजण्याचा भरमिष्टपणा प्रेमाप्रमाणे राजकारणातही जुनाच आहे. कालिदासाचे वचन दोन्हीकडे सारखेच खरे आहे की, 'सर्वं तत्किल मत्परायणमहो कामी स्वतां पश्यति ।' (ते ते खरोखर सारे माझ्यासाठीच होते—काय आश्चर्य आहे की कामी मनुष्य स्वतःलाच सगळीकडे पाहतो!)

मुअज्जम दूर काबुलात होता. त्यामुळे त्याच्या बाबतीत आझम निर्धास्त होता. पण त्याने नगरला बसल्या बसल्या एक निराळेच शुक्लकाष्ठ त्याच्या मागे लावून दिले. मुअजमचा मुलगा अजीमुश्शान हा पाटण्याला सुभेदार होता. पोरगा चांगला होतकरू व कर्तबगार होता व औरंगजेबाची त्याच्यावर मर्जीही फार होती. आझमने बादशहाकडे कागाळी केली की सुभेदारी करीत असता अजीमुश्शानने सरकारी पैसा सपाटून खाल्ला आहे; इतकेच करून आझम थांबला नाही. त्याने बादशहाच्या मागे 'या तक्रारीची चौकशी करण्यासाठी अजीमुश्शानला हुजुरात बोलावून घ्यावे' म्हणून टुमणे लावले. प्रथम प्रथम हा दारूच्या तारेत काहीतरी भकत असेल असे समजून औरंगजेबाने त्याच्याकडे दुर्लक्षच केले. पण आझम चांगला शुद्धीवर होता. त्याने बादशहाची पाठ सोडली नाही. चिकटपणाच्या बाबतीत तो बापसे बेटा सवाई शोभेल असाच होता. अखेर त्याच्या पाठलागाने जेरीला येऊन

बादशहाने जव्हा अजीमुश्शानला छावणीत हजर होण्याबद्दल पत्र लिहिले तेव्हाच आझमने बापावर दया केली व आपल्या त्रासातून त्याला मुक्त केले. आता राहता राहिला कामबख्श. पण तो स्वतः होऊन भांडायला पुढे उभाच राहीना. त्यामुळे आझमची मोठीच पंचाईत होऊन बसली. आझमने त्याला चिडविण्याचा फार प्रयत्न केला. त्याने केलेली मानखंडना कामबख्शाच्या कानावर जातच होती. पण 'क्षमा शस्त्र जया नराचिया हाती । दुष्ट तयाप्रति काय करी' हे जे व्रत कामबख्शाने पक्के धरून ठेविले होते ते तो काही केल्या सोडीचना. बिचाऱ्या आझमने आता झुंजावे तरी कोणाशी! झोंबी खेळण्यासाठी आखाड्यात जर दुसरा मल्लच उतरेना तर आझमचे एकट्यानेच इरेसरीने दंड थोपटणे आणि शड्डू ठोकणे यामुळे लोकांत मात्र त्याचे हसू होऊ लागले. अखेर वेळ सापडेल तेव्हा कामबख्शाची कुरापत काढायचीच अशा इराद्याने अनुकूल संधीची वाट पहात आझम टपून बसला.

औरंगजेबाला या सर्व गोष्टी समजत तेव्हा त्याला पराकाष्ठेच्या वेदना होत. त्याच्या आयुष्याचे माप आता भरत आले होते व त्याच्या आयुष्याचे थोडेच दिवस यापुढे शिल्लक राहिले होते. पण तेवढेही सुखाने जावेत असे वाटण्याइतके औदार्य कृपण मताच्या आझमजवळ राहिले नव्हते. याच सुमारास औरंगजेब सडकून आजारी पडला. पाच दिवस दरबार बंद झाला. छावणीत हलकल्लोळ उठला की, बादशहा मेला. सैन्यात बंडाळी माजली. औरंगजेबाला हे समजले. तो महावस्ताद माणूस. त्याचा सगळा जन्मच मुळी असले पेच उलगडण्यात गेला होता. तो काय या प्रसंगाला उणा पडू पाहातो? त्याने लहान सिंहासनावरून आपणास दरबारात नेण्यास नोकरांना फर्माविले. पडू नये म्हणून मागेपुढे तक्क्या लोड गाद्यागिरद्या लावून तो आसनस्थ झाला. मागे टेकू देण्यासाठी माणसे उभी केली. आणि आपण जिवंत आहोत व दरबार चालवीत आहोत हे जाहीर करण्यासाठी नगारे-नौबती बडविण्याचा हुकूम केला. मग नेहमीप्रमाणे वजिराला मामुली हुकूम देऊन झाल्यानंतर औरंगजेबाने डोळ्यांना रुमाल लावला व तो ओक्साबोक्शी रडू लागला. खाविंदांचे भरल्या दरबारातले हे अश्रुविमोचन पाहून सारी सभा चित्रासारखी तटस्थ झाली. दरबार चांगला काबूत आला असे पाहून औरंगजेबाने डोळ्यावरचा रुमाल बाजूला केला. अजूनही त्याच्या गालावर आसवे ओघळतच होती. रडत रडतच तो म्हणाला, "मी दररोज देवापाशी प्रार्थना करतो की त्याने या जगातून मला आपणापाशी न्यावे, पण माझ्या प्रार्थनेला देव उत्तर देत नाही त्यामुळें मी रडतो आहे. कालच रात्री पैगंबराने मला दर्शन दिले व सांगितले की, मरणाचा तू आग्रह धरता कामा नयेस, कारण तू आणखी तीस वर्षे जगले पाहिजेस असा परमेश्वराचा हुकूम आहे. ईश्वराची इच्छा तर अशी आहे. त्यामुळे माझी प्रार्थना निष्फल ठरली आहे. याला काय

करावे ?" मनूची म्हणतो की 'हे सर्व ढोंग होते. पुढे आपण आजारी पडलो तर आजच्यासारखी गडबड उडू नये म्हणून ही सगळी तरतूद औरंगजेबाने करून ठेवली. सोंगाची हुबेहूब संपादणी औरंगजेबाइतकी फारच थोड्यांना साधत असेल." मनूचीचे म्हणणे खरे आहे. औरंगजेबाची सारी हयात नाटक करण्यात गेली. तो या वेळी तरी नाटक केल्याशिवाय कसा राहणार ?

औरंगजेबाच्या या नाटकाने बाकी कोणाची कितीही फसवणूक झालेली असो, त्याची स्वतःची मात्र मुळीच फसवणूक झालेली नव्हती. आपणाला गिळण्यासाठी कृतांताने आपले मुख पसरले आहे याबद्दल त्याला कसलाही भ्रम राहिला नव्हता. त्याला चिंता फक्त कामबख्शाची होती. कारण आझम तर बोलून चालून टग्याच होता पण त्याच्याशी कलागत लागली तर गरीब बिचारा कामबख्श जिवानिशी जाईल अशी धास्ती बादशहाला पडली. त्यातून अलीकडे तर आझमचे छावणीतले बुभुःकार आणि वल्गना इतक्या वाढल्या होत्या की, तो खरोखरीच कामबख्शाच्या जिवाला अपाय करील असे भय बादशहाला वाटू लागले होते. म्हणून त्याने सुलतान हुसेन ऊर्फ मीरमलंग म्हणून चांगला मर्दाना माणूस निवडून काढला व त्याला कामबख्शाचा बख्शी करून कामबख्शाच्या रक्षणाचे काम त्याच्यावर सोपविले. त्याप्रमाणे कामबख्श दरबारात राहो की घरी असो, मीरमलंग रात्रंदिवस सावलीप्रमाणे त्याची राखण करू लागला.

कामबख्शाचा काटा काढण्याची संधि अशा प्रकारे हुकली हे पाहून आझम फार चरफडला. त्याने बादशहाकडे याबद्दल तक्रार केली. पण बादशहाने त्याला उत्तरच दिले नाही. तेव्हा त्याने आपली बहीण झीनतुन्निसा हिला पत्र लिहिले की, "हसनखान हा आपली पायरी सोडून वागू लागला आहे. त्याचा निकाल लावणे काही अवघड नाही. पण बादशहाबद्दलच्या आदरामुळे काही करता येत नाही." पण आझमची अपेक्षा होती त्याप्रमाणे त्याचे पत्र बादशहाच्या हाती पडले. या वेळी मात्र बादशहाने उत्तर दिले व ते आझमच्या डोळ्यांत चांगले झणझणीत अंजन पडेल असे दिले. त्याने पत्रावर स्वतःच्या अक्षरात लिहिले की, "हसनखानाचा पराक्रम तुम्हाला माहीत आहे, म्हणून तर तुम्ही लोक इतके घाबरला आहात. मी कामबख्शाला दुसरीकडे पाठवून देतो." बादशहाच्या या उपरोधिक उत्तराने आझमच्या अंगाचा नुसता तिळपापड झाला. असे घालून पाडून लिहिण्यापेक्षा बादशहाने सरळ सरळ त्याच्या दोन थोबाडीत दिल्या असत्या तरी ते परवडले असते. पण करतो काय ! व्याधींनी आणि वार्धक्याने बादशहाचे नाक भुईला लागले असले तरी तो अजूनही पूर्वीसारखाच परमउग्र दंड हातात वागवणारा बादशहा होता, त्याच्यापुढे जास्त बोलण्याची आझमची प्राज्ञा नव्हती.

आता उपाय काही दुसरा राहिला नव्हता. आपण मेलो तर आपल्या माघारी आझम व कामबख्श या दोन मस्त एडक्यांची टक्कर लागेल आणि त्यांच्या धड-

कांनी छावणीचा चुराडा उडेल असे भविष्य त्याला स्पष्ट दिसू लागले. आपले डोळे मिटण्यापूर्वीच कामबख्शाला आपल्या हाताने आपण निरोप द्यावा व त्याची कायमची व्यवस्था लावून दयावी म्हणून विजापूरच्या सुभेदारीवर त्याची त्याने नेमणूक केली व त्याला रवाना केले. आपल्या लाडक्या मुलाला अखेरचा निरोप देताना ही भेट शेवटचीच असे मनात येऊन औरंगजेबाला भडभडून आले आणि त्याच्या डोळयांला धारा लागल्या. आपल्या मुक्कामापासून त्याला निरोप देताना त्याने नौबती वाजविण्याची आज्ञा केली. आता औरंगजेब अगदी एकाकी राहिला. जरुरीपेक्षा जास्त दीर्घायुष्य त्याला लाभले होते. आणि त्या दीर्घायुष्याचा अटळ शाप तो आता भोगत होता. त्याच्या बरोबरीचे, त्याच्यापेक्षा लहान असलेले असे त्याचे सहकारी व सखेसोबती त्याच्यापुढे परत न येण्याच्या वाटेने एकामागोमाग एक केव्हाच निघून गेले होते आणि तो एकटा मात्र काळाच्या अफाट आणि वैराण माळावर जथ्यातून मागे राहिलेल्या वाटसरूसारखा कावरा बावरा होऊन रेंगाळत होता. दिलेरखान गेला, रणमस्तखान गेला, मुकर्रबखान गेला, बहरामंदखान बख्शी गेला. मोठा रुहुल्लाखान गेला व धाकटाही गेला. त्याला आधार फक्त त्याच्यासारख्याच म्हाताऱ्या आसदखानाचा होता. पण तोही त्याच्यापेक्षा फक्त बारा वर्षांनी लहान होता. त्याचे भाऊबहीण तर पूर्वीच गेले होते. फक्त बहीण गौहरआरा बेगम जिवंत होती तीही याच सुमारास दिल्लीत मरण पावली. तिच्या मरणाने औरंगजेब अगदी कळवळून पुनः पुन्हा म्हणाला की, "शहाजहान बादशहाच्या मुलांपैकी आम्ही दोघेच फक्त उरलो होतो" तीही गेली आणि तो अगदी एकटा उरला. हेचसे काय, पण त्याची मुलगी मेहरुन्निसा व तिचा नवर इज्जतबेग, त्याची लाडकी सून जहानझेब बानू, त्याचा नातू अकबराचा मुलगा बुलंद बख्तर हे सारेजण त्याच्या डोळयांदेखत एकापाठोपाठ एक गेले. तो एकटा रडायला शिल्लक राहिला. निसर्गाचा क्रम विपरीत झाला. ज्यांनी मागून जायचे ते आधी जाऊ लागले व ज्यांनी आधी जायचे ते जाता जाईनात. त्या अमर्याद व थरकाप उडविणाऱ्या एकाकीपणाची जाणीव औरंगजेबाला खायला येऊ लागली.

कामबख्शाला विजापूरला रवाना केल्यानंतर आझमलाही औरंगजेबाने छावणीत राहू दिले नाही. त्यालाही चार दिवसांनंतर माळव्याच्या सुभेदारीवर जाण्याचा त्याने हुकूम केला. आझम जायला नाखूषच होता. पण औरंगजेबाने त्याला तसेच दामटून माळव्याकडे कूच करायला लावले. याप्रमाणे एका मुलाला दक्षिणेला आणि दुसऱ्या मुलाला उत्तरेला रवाना केल्यावर औरंगजेबाला थोडी स्वस्थता लाभली आणि तो निश्चितपणे मरायला मोकळा झाला.

खरोखर तो निश्चित नव्हता. दोन मुलांना दोन दिशांना पाठवून त्याने केवळ ऐलथडीच्या, म्हणजे मरणापूर्वीच्या चिंता दूर करण्यात यश मिळविले होते. पण

त्या थोड्या कमी झाल्याबरोबर पैलथडीच्या चिंता त्याला छळू लागल्या. मेल्यानंतर आपले काय होणार हा सनातन प्रश्न औरंगजेबापुढे उभा राहिला, आणि त्याचे उत्तर तो शोधू लागला तेव्हा भीतीने व विषादाने त्याचे मन भरून गेले. प्रपंचाच्या दृष्टीने पाहिले तर त्याच्या राजकीय जीवनाची शोकांतिका झालेली त्याला ढळढळीतपणे दिसतच होती व त्याच्या कौटुंबिक जीवनाची वाताहत तो पहातच होता. पण आजपर्यंत परमार्थाचे साधन तरी त्याने कायावाचामने करून केले होते. त्याचे सबंध जीवन हे ईश्वराला अर्पण केले होते. धर्मपालनासाठी तो चंदनाप्रमाणे झिजलेला होता व सत्क्रिया आचरून त्याने घडीने घडी सार्थकी लावली होती. त्या दृष्टीने खरे पाहता त्याचे जीवन सुफल आणि संपूर्ण झाले होते. पण अखेरच्या घटकेला औरंगजेबाला तसे वाटेना. त्याला वाटू लागले की, आपण राज्यही धड केले नाही व देवाचीही सेवा नीट केली नाही, आपल्या हातून घोर पापे झाली. त्याबद्दल परमेश्वर आपणास काय शासन करील या धास्तीने त्याचा जीव व्याकूळ झाला. आपण धड प्रपंच केला नाही, धड परमार्थ साधला नाही, उत्तम जन्माला येऊन आपण वाया गेलो या विषादाची खंती त्याच्या जिवाला खाऊ लागली. "काहीच वेचिले नाही शेवटीं हात झाडिले!"

या काळात त्याने कामबख्श व आझम यांना पत्रे लिहिली. औरंगजेब राजकारणी पुरुष खरा; व आजपर्यंतची त्याची पत्रे मनातले विचार दाखविण्यापेक्षा लपविण्यासाठीच लिहिलेली असत हेही खरे. पण ही पत्रे तशातली नव्हेत. या घटकेला अथांग कालसागराच्या काठावर औरंगजेब उभा होता आणि त्याचे जीवन त्या महोदधीत कायमचे विलीन होण्यास फक्त काही क्षणांचा अवकाश होता. मृत्यूची घनदाट सावली पडली असताना औरंगजेबाने लिहिलेली ही पत्रे वाचली म्हणजे त्याच्या अंतःकरणात उसळत असलेल्या वडवानळाची चांगली कल्पना येते. पत्रे जरी आझमला किंवा कामबख्शाला उद्देशून लिहिलेली असली तरी वस्तुतः औरंगजेबाचे हे प्रकट चिंतनच आहे. औरंगजेबाने स्वतःच स्वतःच्या जीवनावर केलेले हे भाष्य खरोखर इतके गंभीर, इतके करुण, इतके उदास व इतके हृदयाला भिडणारे आहे की ते वाचताना मनात कालवाकालव झाल्याशिवाय राहत नाही. आझमला लिहिलेल्या पत्रात औरंगजेब म्हणतो—

"म्हातारपण तर येऊन ठेपले आहे आणि कमजोरी जोर करू लागली आहे. माझ्या गात्रांत काही त्राण राहिले नाही. जन्माला येताना मी एकटा आलो आणि जातानाही एकटाच जाणार. मी कोण आहे व मी काय करीत होतो हे मला कळत नाही. धर्मपालनात घालविलेले दिवस वजा केले, तर इतर दिवसांबद्दल खेद आणि खंत यापेक्षा काहीही शिल्लक राहिलेले नाही. मी साम्राज्याचे कसलेही शासन केले नाही व शेतकऱ्यांचे काडीचेही कल्याण केले नाही.

''जीवन किती मोलाचे आहे पण ते अगदी फुकट गेले. परमेश्वर माझ्या घरात आहे. पण माझी अंधारलेली दृष्टि त्याची दीप्ति पाहू शकत नाही. आयुष्य टिकत नाही; गेलेल्या दिवसांचा कसलाही ठसा मागे उरत नाही आणि भविष्याची तर आशा उरलेली नाही.

''माझा ताप ओसरलेला आहे. आता फक्त चामडे आणि फोलपटे शिल्लक उरली आहेत. कामबख्श विजापूरला गेलेला आहे, पण तो माझ्याजवळच आहे आणि तू तर त्याच्याहीपेक्षा जवळ आहेस, शहाआलम मात्र सर्वांत दूर आहे. अजीम ईश्वराच्या इच्छेने बंगाल्यातून हिंदुस्थानात आलेला आहे.

''सर्व शिपाई माझ्याप्रमाणेच असहाय झालेले आहेत; ते गोंधळलेले आहेत आणि बावरलेले आहेत, कारण माझ्याप्रमाणेच त्यांनी परमेश्वराला सोडलेले आहे आणि पाऱ्याप्रमाणे ते थरथर कापत आहेत. सदा सर्वदा परमेश्वर आपल्या संनिध आहे असे त्यांना वाटत नाही. जगात येताना माझ्याबरोबर मी काहीही आणले नाही आणि जाताना मात्र माझ्या पापाची फळे मी बरोबर नेत आहे. मला काय शिक्षा होईल, हे मला कळत नाही. ईश्वराच्या कृपेची व दयेची मी बळकट आशा धरून असलो तरी माझ्या कर्मांचा विचार केला म्हणजे मला काळजी वाटल्याशिवाय राहत नाही. जेथे मी माझ्या स्वतःपासून विभक्त होत आहे तेथे दुसरा कोण माझ्याबरोबर रहाणार आहे बरे ?

''(कविता) वारा कसाही वाहो,

''माझे तारू मी समुद्रावर हाकारले आहे !

''परमेश्वर त्याच्या सेवकांचे रक्षण करील हें जरी खरे असले, तरी जगाच्या दृष्टीने पाहता, ईश्वराचे जीव आणि मुसलमान यांचा निष्कारण संहार होता कामा नये याची काळजी घेणे हे माझ्या मुलांचे कर्तव्य आहे.

''बेदारबख्तला माझे अखेरचे आशीर्वाद कळव. जाण्याच्या वेळी त्याला मी भेटू शकत नाही. भेटीची इच्छा तशीच राहिलेली आहे. तुला हे सहज समजू शकेलच की बेगम दुःखाने व्याकूळ झालेली आहे, पण शेवटी सर्व ईश्वराच्या अधीन आहे. दूरदृष्टीच्या अभावाला निराशेशिवाय दुसरे कोणतेही फल येऊ शकत नाही''

कामबख्शाला लिहिलेल्या पत्रात हाच गेलेल्या आयुष्याबद्दलचा खेद आणि येणाऱ्या भविष्याबद्दल चिंता व्यक्त झाली आहे–

ज्या वेळी मी सत्तेवर होतो तेव्हा ईश्वराच्या इच्छेपुढे मान वाकवावी असा मी लोकांना उपदेश केला व शक्यतेच्या कोटीपलीकडे कष्ट केले. पण परमेश्वराची इच्छा निराळी होती. त्यामुळे कोणी माझे ऐकले नाही. आता मी मरायला टेकलो असताना त्याचा काही उपयोग होणार नाही. मी केलेल्या सर्व शिक्षांची आणि पापांची फळ माझ्याबरोबर मी घेऊन जाईन. येताना मी एकटा

आलो आणि जाताना मात्र हा प्रचंड तांडा माझ्याबरोबर घेऊन जात आहे हे केवढे आश्चर्य आहे ! जेथे जेथे मी नजर टाकतो तेथे तेथे एका ईश्वरावाचून या तांड्याला वाटाड्या मला दिसत नाही. सैन्य आणि बाजारबुणग्यांच्या चिंतेमळे मला अखेरपर्यंत यातना होत आहेत. ईश्वर जरी त्याच्या सेवकांचे रक्षण करील तरी ते रक्षण करणे हे माझ्या मुलांचे आणि मुसलमानांचे कर्तव्य आहे. जेव्हा मी समर्थ होतो तेव्हाही मी त्यांचे मुळीच रक्षण करू शकलो नाही आणि आता तर मी स्वतःचेही रक्षण करण्यास असमर्थ आहे. माझ्या हातापायांची हालचाल थांबली आहे, जो श्वास जातो, तो परत येण्याची आशा नाही. अशा अवस्थेत प्रार्थना करण्यापलीकडे मी दुसरे काय करू शकणार आहे? तुझी आई उदेपुरी हिने आजारात माझी शुश्रूषा केली. त्याही जगात माझ्याबरोबर येण्याची तिची इच्छा आहे. तुला व तुझ्या मुलांना मी परमेश्वराच्या स्वाधीन करीत आहे. भीतीने मला कापरे भरले आहे. मी तुझा निरोप घेतो. व्यवहारातले लोक फसवितात. त्यांच्या इमानावर विसंबून कोणतेही काम करू नकोस. काम नेहमी दीर्घ सूचनेने व इशारतीने केले पाहिजे. दारा शुकोहने बरोबर व्यवस्था केली नाही त्यामुळे त्याचे ईप्सित त्याला साध्य करता आले नाही. त्याने आपल्या चाकरांचे तनखे पूर्वीपेक्षा वाढविले, पण त्याच्या गरजेच्या वेळी त्यांच्याकडून कमीत कमी काम त्याच्या पदरी पडले. म्हणून तो दुःखी झाला. अंथरुण पाहून तू पाय पसरत जा.

"मला जे तुला सांगायचे होते ते सांगितले आणि आता मी तुझा निरोप घेतो. शेतकरी व लोक यांचा निष्कारण संहार होणार नाही व मुसलमान मारले जाणार नाहीत याची काळजी घे; नाहीतर (परलोकात) मला शिक्षा भोगण्याची वेळ येईल."

ही दोन पत्रे लिहून औरंगजेबाने पृथ्वीवरच्या आपल्या सर्व व्यवहारांची निरवानिरव केली. ओहोटी आली म्हणजे समुद्र ज्याप्रमाणे आपले भरतीचे पाणी आवरून घेतो किंवा घरी जाण्याची वेळ झाली म्हणजे संध्याकाळी कोळी जसे आपले जाळे पाण्यातून ओढून घेतो, त्याप्रमाणे आपले सर्व व्यापार त्याने आपणापाशी ओढून घेतले व तो निजधामाच्या प्रवासास तयार झाला. आता फार अवकाश नव्हता. औरंगजेबाला भयंकर ज्वर येऊ लागला आणि त्याने त्याचा उरलासुरला जीवनरस अगदी पिळून काढला, पण त्याची इच्छाशक्ति फार दांडगी. चालवत नव्हते व बसवत नव्हते तरी तीन दिवसपर्यंत तो न्यायकचेरीत येत राहिला व सामुदायिक नमाजात भाग घेत राहिला. त्या काळात त्याच्या तोंडून एका कवितेचे चरण नेहमी बाहेर पडत.

"बयक लहजा बयक साअत बयक दम दिगरगूं मी शवद अहवाले आलम"
(एका क्षणात, एका दमात, निमिषमात्रात जगाची उलथापालथ होते.)

पण अखेर तो अथरुणाला खिळला. आपण मरणार ही खात्री होताच त्याने वजीर आसदखानाला जवळ बोलाविले व आपल्या समक्ष खजिना खोलवून फौजेचा चढलेला पगार चुकता करायला फर्माविले. हे काम ताबडतोब जर झाले नाही, तर आपण आपल्या कर्तव्यास चुकलो म्हणून मरेपर्यंत तर त्याचे मन त्याला खात राहीलच, पण परलोकीही त्याला या कर्मलोपाबद्दल जाब द्यावा लागेल असे तो म्हणाला. त्या वेळेला मुअजम शहाआलमचे काही हितचिंतक त्याच्या बिछान्यापाशी होते. आपल्यानंतर त्याला औरंगजेबाने आपला वारस म्हणून जाहीर करावे म्हणून त्यांनी त्याला फार गळ घातली. पण तो म्हणाला, "त्याला तर मी अगोदरच हिंदुस्थानचे राज्य दिले आहे. तो तेथे बादशहाच आहे. पण त्याने तेथे राज्य करावयाचे का आणखी कुठे दुसरीकडे करायचे हे सर्व परमेश्वराच्या हाती आहे." तो पुढे म्हणाला, "मी आता सुखाने मरणार. कारण मुसलमानी धर्माच्या शत्रूचा नायनाट करण्याच्या कामी मी कोणतीही कसूर केली नाही येवढे तरी लोक माझ्याबद्दल खात्रीने बोलतील."

गुरुवारी दुपारी हमीदुद्दीनखानाने अर्ज केला की "बादशहावरून एक हत्ती ओवाळून टाकावा. हत्तीची किंमत चार हजार रुपयें होते, ती काजी मुल्ला हैदर याजकडे गरीब गुरीबांना वाटण्यासाठी म्हणून देण्यात यावी." औरंगजेबाने अर्ज मान्य केला. अर्जावर सही करताना तो अत्यंत अशक्त झाला होता. तशाही स्थितीत त्याने अर्जावर लिहिले की, "या खाकसाराला (क्षुद्र, मातीसमान) लवकर पहिल्या टप्प्यावर पोचविण्यात यावे." जाण्याची वेळ अगदी जवळ आली. कालपक्षाच्या पंखाचा फडत्कार अगदी कानाजवळ ऐकू येऊ लागला.

गुरुवारची रात्र कशीबशी गेली. दुसऱ्या दिवशी शुक्रवार होता. २० फेब्रुवारी १७०७. माघ महिन्यातील अमावास्येचा दिवस.

त्या दिवशी औरंगजेब सकाळची प्रार्थना पढण्यास बाहेर आला आणि नंतर आपल्या निजण्याच्या खोलीत गेला. तो सारखा परमेश्वराचे नामस्मरण करीत होता. त्याला कमालीची अशक्तता आली होती. मधून मधून शुद्ध हरपत होती. श्वास जड होत होता. तरी शरीराला मर्जीला येईल त्याप्रमाणे वाकविणाऱ्या त्याच्या दुर्दम्य इच्छाशक्तीची हुकमत अजूनही इतकी जबर होती की, तशाही अवस्थेत स्मरणीवरून त्याची बोटे झराझर फिरत होती व तोंडातून शब्द उमटत होते – "लाइलाह इल्लिलाह, लाइलाह इल्लिलाह– एका परमेश्वरावाचून दुसरे दैवत नाही." पण अखेर शरीराने हार खाल्ली. तोंडातून शब्द उमटेनासे झाले. बोटे फिरेनाशी झाली. स्मरणी हातातून गळून पडली, औरंगजेबाने अखेरचा निःश्वास सोडला त्या वेळी सकाळचे आठ वाजले होते.

शुक्रवार हा इस्लाम धर्मात फार पवित्र दिवस मानलेला आहे. आपणाला शुक्रवारी मरण यावे असे औरंगजेब नेहमी म्हणे. आपल्या आयुष्याच्या अंतिम क्षणा-

पर्यंत ज्याच्या सेवेत औरंगजेबाने कसलीही कसूर केली नव्हती, त्या परमेश्वराने आपल्या परमभक्ताची ती शेवटची इच्छा पूर्ण केली.

औरंगजेबाच्या मृत्यूबद्दल लिहिताना भीमसेनानं म्हटले आहे की, "त्या काळात पृथ्वीवर ही एक मोठी क्रांतीच झाली." बिचारा भीमसेन इतिहासकारही नव्हता व तत्त्ववेत्ताही नव्हता. तो आपल्या जीवनाची साधी कथा लिहिणारा बाळबोध गृहस्थ होता. पण आपल्या कल्पनेपेक्षाही जापल्या शब्दात किती खोल अर्थ भरला आहे हे जर त्याच्या ध्यानात आले असते तर तो खचितच विस्मय पावला असता. त्याचे म्हणणे अक्षरशः खरे होते. व्यक्ति म्हणून काय किंवा बादशहा म्हणून काय औरंगजेबाचा मृत्यु हा सामान्य पुरुषाचा मृत्यु नव्हता. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेल्या विराट प्रदेशातल्या कारभाराच्या सगळ्या तणावा पन्नास वर्षेपर्यंत, या पाच फूट पाच इंच उंचीच्या ठेंगण्या माणसाने आपल्या हातात बळकट पकडून ठेवल्या होत्या. एवढ्या प्रचंड मुलुखात त्याचा शब्द हा कायदा होता आणि त्याच्या हुकुमाशिवाय एक पान हालत नव्हते. येवढे त्याचे एकापेक्षा एक मातबर सेनापति आणि तालेवार मुले, पण त्याला उलटून बोलण्याची कुणाची प्राज्ञा नव्हती. सारे त्याच्यापुढे चळचळा कापत असत. अशा या अफाट जिद्दीच्या आणि करड्या शत्रूला मराठ्यांनी हारीला आणले ही त्यांची खरी करामत होय. पण मराठ्यांनी पंचवीस वर्षांत औरंगजेबाला जितके हैराण केले, तितकेच त्यानेही त्यांना हैराण केले. या दीर्घकाळात त्यानेही त्यांना सुखाने शेतीभाती करू दिली नाही की निवांतपणे झोपू दिले नाही. बारा महिने तेरा काळ लढाईच्या उद्योगात त्यांना व्यग्र करून ठेवले. हटेलपणाने शेवटपर्यंत तोही लढत राहिला. त्यानेही माघार घेतली नाही. केवळ हरला म्हणून औरंगजेबाची वास्तविक योग्यता कमी होत नाही. मराठ्यांनी वाघाशी कुस्ती केली व त्याला घोळून घोळून मारला म्हणुन ते स्तुतीस पात्र आहेत हे खरेच आहे. पण त्यांनी मारला तो वाघ होता व मरण्यापूर्वी वाघानेही त्यांना रक्तबंबाळ केले होते हेही लक्षात ठेवले पाहिजे. नाहीतर मांजर मारणाऱ्याचे पोवाड कोण गातो ?

एखादा विराट् वटवृक्ष कोसळावा तसा औरंगजेब कोसळला. त्याच्याबरोबर सहा शतके उभी असलेली मोगल राजवटीची चिरेबंदी इमारतही भुईवर कोसळली. नदीच्या पात्रात प्रचंड दरड कोसळावी आणि तिचा प्रवाह पार दुसऱ्या दिशेने वाहू लागावा त्याप्रमाणे औरंगजेबाच्या मृत्यूने इतिहासाच्या प्रवाहात खांडवा पडला व तो अगदी निराळ्या मार्गाने वाहू लागला. त्या दृष्टीने पाहता, औरंगजेबाचा मृत्यु ही इतिहासातील क्रांति खरोखरच होती असे म्हटले पाहिजे.

निसर्ग आणि मानव यांचा परस्परांशी संबंध काय आहे हे आजपर्यंत न उकललेले असे कोडे राहिलेले आहे. पण कधी कधी मानवी जीवनातील घटनांचे असे काही चमत्कारिक पडसाद निसर्गात उमटतात की मन आश्चर्याने थक्क होते.

ज्या क्षणी औरंगजेब मृत्यु पावला, त्याचक्षणी सोसाटयाचा झंझावात सुटला. त्याचा वेग इतका भयंकर होता की, मजबूद ठोकलेले तंबू आकाशात कागदाच्या कपटयासारखे गिरक्या घेत उडाले. धुळीचे लोट इतके उसळले की दिवसा अंधारून आले आणि माणसाला माणूस दिसेना. मोठमोठी झाडे, काटक्या मोडाव्यात, तशी काडकाड मोडून पडली. लढायांवर लढाया मारून दाढयामिश्या पिकलेले ते मर्द लोक, पण त्या वादळाच्या तांडवाने भयभीत होऊन जत्रेत चुकलेल्या पोरासारखे सैरावैरा धावू लागले. दिवसभर प्रलय माजवून अखेर संध्याकाळी ते वादळ शांत झाले.

ज्या औरंगजेबाचे सर्व जीवन वादळी होते, त्याचा मृत्युही वादळी असावा, हे योग्यच होय.

□ □

आझम हा बोलूनचालून औरंगजेबाचाच मुलगा. बापाचा धूर्तपणा त्याच्यातही उतरल्याशिवाय कसा राहील? औरंगजेब मागेच लागला आणि छावणीत रेंगाळण्यालाही काही सबब सापडेना म्हणून केवळ नाईलाजाने नाक मुठीत धरून तो उत्तरेला माळव्याच्या सुभेदारीवर निघाला खरा. पण बाप किती थोडया दिवसांचा सोबती आहे हे त्याला उघड दिसत होते. म्हणून निघाल्यापासून एक दिवस मजल मारायची व एक दिवस मुक्काम करायचा असा त्याने क्रम ठेविला. त्यामुळे औरंगजेब मृत्यु पावला, त्या वेळी तो नगरच्या बादशाही छावणीपासून फक्त चौतीस मैलांवर गोदावरीच्या काठावर होता. त्याला त्याच दिवशी संध्याकाळी ती बातमी कळली. त्याने तातडीने कूच केले व दुसऱ्याच दिवशी तो छावणीत दाखल झाला.

बादशहाचे शव शय्यागृहात ठेविले होते. छावणीत आल्याबरोबर आझमने पित्याच्या मृतदेहाचे दर्शन घेतले त्या वेळी त्याने जो शोक केला त्याचे वर्णन करणे अशक्य आहे. पण आपले दुःख आवरून मोठ्या धीराने त्याने पुढील व्यवस्था केली. बहीण झीनतुन्निसा व सावत्र मातोश्री उदेपुरी यांचे त्यानें सांत्वन केले. बादशहाचे शव खांद्यावर वाहून त्याने न्यायकचेरीत आणले. मरणानंतर आपल्या शरीराचे दफन रोझा खुल्दाबाद येथे करावे अशी इच्छा औरंगजेबाने व्यक्त केली होती. त्याच्या इच्छेला अनुसरून आझमने, सर्व इतमामानिशी औरंगजेबाचे प्रेत पालखीतून खुल्दाबादला रवाना करून दिले. सरदारखानाचा मुलगा हमीदुद्दीनखान याच्यावर औरंगजेबाची मर्जी होती. तो औरंगजेबाच्या शवाबरोबर पायी निघाला. त्याच्या पायात जोडे नव्हते की डोक्याला वस्त्र नव्हते. बापाचे उत्तरकार्य अशा प्रकारे यथासांग संपादन केल्यानंतर, यापुढे आपण हिंदुस्थानच्या बादशाहतीचा निर्वेध उपभोग घेण्यास मोकळे झालो म्हणून आझमने कृतार्थतेचा निःश्वास सोडला तर ते साहजिकच होय.

वस्तुतः त्याचा थोरला भाऊ मुअजम आणि धाकटा भाऊ कामबक्श हे राहु-केतूसारखे त्याच्या मार्गात आडवे पडले असताना आपला राज्यपदाच्या प्राप्तीचा मार्ग निष्कंटक झाला असे आझमने आताच समजणे हे फाजील उतावळेपणाचे लक्षण होते. पण तडफ आणि उतावळेपणा व संथपणा आणि चेंगटपणा यांच्यातली सीमारेषा ठरविणे फार कठीण गोष्ट आहे. स्वतः आझमचा आपल्या शौर्यावर नितांत विश्वास होता. त्याची मुले, वालीजाह व विशेषतः बेदारबख्त ही इतकी तडफदार व शूर होती, की कधी कधी खुद्द बापालाच आपल्या मुलांचा

हेवा वाटे. औरंगजेबाच्या तालमीत तयार झालेले व एकापेक्षा एक मातब्बर असलेले आसदखान, झुल्फिकारखान, फिरोजजंग, चिनकिलीजखान, महंमदखान सफवी, तरबियतखान, मतलबखान, खुदाबंदाखान, रामसिंग हाडा, राव दलपत बुंदेला, खाने आलम, मुनव्वरखान असे कसलेले सरदार रांगामागे रांगा धरून त्याच्यामागे एका फळीत उभे होते. अशा स्थितीत यश ज्याच्या कधी चुकूनही आजपर्यंत भेटीला आले नव्हते असा मुअजम आणि बोलूनचालून नाचगाणी करणाऱ्या रखेलीच्या पोटी जन्माला आलेला कामबख्श या दोघांनाही आपण बोल बोल म्हणता धुळीला मिळवू असे जर आझमला वाटले तर त्याची काही चूक नव्हती. त्याप्रमाणे औरंगजेबाच्या मृत्यूनंतर अवघ्या तीन आठवड्यांत तो तख्तनशीन झाला आणि त्याने आपल्या नावाची नाणी पाडली. त्यानंतर त्याने नगर सोडले आणि आग्र्याची राजधानी ताब्यात घेण्यासाठी औरंगाबाद मार्गे झपाट्याने उत्तरेकडे कूच केले. जाताना गतीला अडथळा नको म्हणून त्याने सगळा हलका आणि भारी तोफखाना नगर आणि औरंगाबाद येथें टाकून दिला. त्याचे मतच होते की, "तोफांचे युद्ध म्हणजे पोरांचा खेळ आहे. तलवारीशिवाय दुसरे शस्त्र उपयोगात आणू नये."

कथा अशी आहे की ओंकारेश्वराला असलेल्या गौरी–सोमनाथाच्या पिंडीत पूर्वजन्म आणि पुढील जन्म यांचे दर्शन घडविण्याची अद्‌भुत शक्ति वास करीत होती. एकदा औरंगजेबाने या पिंडीत पाहिले तेव्हा त्याला आपले भविष्य अगदी अप्रिय असल्याचे दिसून आले. तेव्हा संतापून जाऊन त्याने मंदिराला आग लावण्याची आज्ञा केली. त्या आगीत ती पिंड तडकली आणि तेव्हापासून जन्मदर्शन घडविण्याची पिंडीची शक्ति लुप्त झाली. आझमवर जर हा प्रसंग आला असता तर त्याने आपल्या बापाचाच कित्ता गिरविला असता यात शंका नाही. कारण त्याचे पुढच्या जन्मीचे तर राहोच, पण या जन्मीचे जरी भविष्य त्याला दिसले असते तर तो दुःखाने व क्रोधाने बेभान झाला असता. त्याला दिसले असते की अजून फक्त साडेतीन महिन्यांच्या अवधीतच जाजौच्या लढाईत मुअजमकडून त्याचा सपशेल पाडाव होणार होता; ज्यांच्यावर त्याची एवढी मदार होती ते आसदखान, झुल्फिकारखान, चिनकिलीजखान, महंमदखान सफवी हे मुअजमकडे जाणार होते. उरलेले सारे शूर सरदार एकामागोमाग एक धारातीर्थी पतन पावणार होते. त्याची मुले वालीजाह व बेदारबख्त मारली जाणार होती, व त्याचा स्वतःचा शिरच्छेद होऊन त्याचे कापलेले मुंडके मुअजमला नजर करण्यात येणार होते. ज्या औरंगजेबाला खुल्दाबादच्या मातीत सोडून आज तो इतक्या उसन्या घाईने राज्यलक्ष्मीचा उपभोग घेण्यासाठी उत्तरेला निघाला होता, त्याच औरंगजेबाच्या शेजारीच थोड्याच दिवसांत कायमची विश्रांति घेण्यासाठी तो परत

येणार होता. पण आपली ही दारुण भवितव्यता आझमला आज कशी समजणार? नियति आज तरी त्याच्यावर प्रसन्न होती. परीकथेतल्या राजकुमारीप्रमाणे तिने आपल्या मुखमंडलावर अवगुंठन घेतले होते. त्यामुळे तिचा चेहरा दिसणे त्याला शक्य नव्हते. या दृष्टीने विचार करता नियती ही जितकी निर्घृण तितकीच सदय आहे असे म्हणावेसे वाटते.

"मी कोण आहे आणि मी काय करीत आहे हे मला कळत नाही" असे आझमला लिहिलेल्या अखेरच्या पत्रात औरंगजेब म्हणतो. तो स्वत: स्वत:ला शेवटपर्यंत एक कोडे होता, इतकेच नव्हे तर त्याच्या काळच्या लोकांनाही त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे गूढ कधीच नीटसे उलगडले नाही. त्याच्या जीवनाप्रमाणे त्याच्या मरणानंतरही तो एक बुद्धि कुंठित करणारे कोडेच होऊन राहिला आहे. वैभवशाली मोगल बादशहांपैकी औरंगजेब हा एकच एक बादशहा असा आहे की, ज्याची कबर दक्षिणेतल्या एका कमालीच्या सामान्य खेड्यात आहे आणि जी कमालीची साधी आहे. दौलताबादेहून वेरूळकडे जाण्याच्या वाटेवर खुल्दाबाद आहे. अर्धे गाव ओलांडले की रस्त्याशेजारीच उजव्या बाजूला एक फरसबंद अशी चढणीची वाट आहे. चढण चढून एका प्रशस्त आवारात आले की उजव्या बाजूला एक मशीद आणि डाव्या बाजूला थोडेसे पुढे आतल्या आवारात जाण्याचे दार आहे. त्या दारातून आत गेले की एका मोकळ्या जागेत औरंगजेबाची कबर आहे. ती कबर इतकी साधी आहे की ती शहेनशहा औरंगजेबाची कबर आहे हे कळल्यावर आश्चर्यास पारावार राहात नाही.

औरंगजेबाचा पूर्वज बाबर, ज्याने मोगलांची राजवट स्थापन केली, त्याची कबर काबूल प्रांतात आहे. बाबरने हिंदुस्थानचे राज्य काबीज केले खरे, पण त्याला काही आपले राज्य मुळीच आवडले नाही. "येथल्या लोकांना सौंदर्य नाही, रीतभात नाही, बुद्धि नाही, कला नाही, कौशल्य नाही, माणुसकी नाही; येथे फळे नाहीत, द्राक्षे नाहीत, कलिंगडे नाहीत; येथे घोडे नाहीत, दिवे नाहीत, मेणबत्त्या नाहीत; काही काही नाही." अशा प्रकारे सर्व बाबतीत नन्नाचा पाढा वाचून झाल्यावर बाबर म्हणतो, "एकच गोष्ट हिंदुस्थानबद्दल चांगली आहे आणि ती म्हणजे येथे सोन्याचांदीला तोटा नाही." असल्या या देशात मेल्यानंतर राहण्याची बाबरची बिलकुल इच्छा नव्हती. त्याचा जीव सृष्टिसौन्दर्याचा वरदहस्त लाभलेल्या आपल्या काबूलच्या मायभूमीकडे ओढ घेत होता. तेथेच एका झुळझूळ वाहणाऱ्या झऱ्याच्या काठी बाबरची कबर आहे. बाबरचा मुलगा हुमायून याने जिवंत असतानाच दिल्लीला आपल्या अखेरच्या विश्रांतीची जागा निवडून ठेवली होती. त्या जागेवर पुढे अकबराने आरसपानाची सुंदर कबर बांधली. अकबराचीही तीच गोष्ट होती. मनूची म्हणतो की, "अकबराला जरी आपल्या आत्म्याची पर्वा नव्हती तरी त्याने आपल्या शरीरासाठी वसतीची जागा

निवडण्याची बरी तरतूद जिवंतपणीच करून ठेविली." लाल दगडांनी बांधलेली अकबराची सिकंदरा येथील कबर म्हणजे सौन्दर्याची आणि भव्यतेची केवळ परिसीमा आहे. त्याचा मुलगा जहांगीर याने जन्मभर फुलांचा आणि बागांचा शोक केला. त्याचा मकबरा शाहदरा येथे रावी नदीच्या तीरावर नूरजहानच्या दिलखूश बागेत आहे. मकबरा फार भव्य आणि प्रेक्षणीय आहे आणि त्याच्यावरील रंगीत कौलांचा रंगविलास तर मन मोहून टाकणारा आहे. त्याचा मुलगा आणि औरंगजेबाचा बाप शहाजहान याचे विश्रांति स्थान म्हणजे ताजमहाल होय. त्याबद्दल बोलण्याचे कारणच नाही, कारण सगळे जगच त्याची स्तुति करून थकले आहे. तेथे मुमताजमहलच्या स्मृतीचा गोडवा आहे, पांढऱ्या शुभ्र संगमरवरी कलेचे सौन्दर्य आहे, आणि तीन कोटी रुपये खर्च करून बांधलेल्या या इमारतीत ऐश्वर्य कळसास पोचले आहे. त्या मानाने बिचाऱ्या औरंगजेबाच्या वाटचाला काहीही आलेले नाही. तेथे ताजमहालसारखी संगमरवरी कला नाही, जहांगीरच्या मकबऱ्यासारखे रंगीत कौलांचे काव्य नाही, अकबराच्या कबरीसारखी भव्यता नाही, बाबराच्या कबरीसारखे झऱ्याचे गूढगुंजन नाही, बाग नाही, बगीचे नाहीत, काही नाही.

आपल्या पूर्वजांप्रमाणे जिवंतपणीच औरंगजेबाने आपल्या कबरीची जागा ठरवून ठेविली होती, व त्याच्या मनात असते, तर त्यालाही त्या कबरीवर डोळे दिपविणारी भव्य इमारत बांधून आपल्या पूर्वजांवर सहज मात करता आली असती. कारण, संपत्ति आणि ऐश्वर्य या बाबतीत औरंगजेब केवळ त्यांच्या तोडीस तोडच नव्हता, तर त्यांच्यापेक्षा कांकणभर सरसच होता. शहाजहान हा सर्वांत वैभवशाली मोगल बादशहा. त्याच्या राज्याचा वसूल सालाचा छत्तीस कोटि रुपये होता. औरंगजेबाच्या राज्याचा वसूल सालाला तेहतीस कोटि पन्नास लाख रुपये होता. या खेरीज शहाजहानला उपलब्ध नसलेली वसुलाची नवी बाब औरंगजेबाला उपलब्ध होती. ती म्हणजे मुस्लिमेतर प्रजेवर बसविलेला जिझिया कर होय. जिझियाचे उत्पन्न फार मोठे होते. एकट्या गुजराथ राज्यात वर्षाला पाच लाख रुपये जिझिया गोळा होई. तरी मुसलमान असल्यामुळे जिझियापासून मुक्त असलेल्या लोकांची संख्या गुजरातेत बरीच होती. जेथे हिंदु जास्त असतील तेथे यापेक्षा किती तरी जास्त उत्पन्न होई. त्याशिवाय परकी मालावरील जकातीचे उत्पन्न वर्षाला तीस लाख रुपये असे. परदेशांशी व्यापार करणाऱ्या बंदरांपासून होणारे जकातीचे उत्पन्न निराळेच येई. एकटे सुरत बंदरच औरंगजेबाला वर्षाला बारा लाख रुपये मिळवून देई. याशिवाय वंशपरंपरा आलेली व आग्र्याच्या किल्ल्यात साठवून ठेवलेली संपत्ति वेगळीच. हे सर्व पाहिले म्हणजे औरंगजेब हा धनसंपत्तीच्या बाबतीत केवळ कुबेर होता यात संशय राहत नाही. पन्हाळ्यावर औरंगजेब जात असताना त्याने प्रांतोप्रांतीच्या सुभेदारांना स्वार

पाठविण्याबद्दल हुकूम पाठविले होते. गुजरातचा सुभेदार शुजाअतखान याने अहमदाबादचे लोक येण्यास तयार नाहीत असे कळविले व दोन लाख रुपये पाठविले. त्याची खरडपट्टी काढताना औरंगजेबाने त्याच्या या रकमेची तुच्छतेने अवहेलना केली व गर्वाने लिहिले की– "स्वार पाठविता आले नाहीत म्हणून तुम्ही अल्प रक्कम पाठविली आहे. ही रक्कम म्हणजे सूर्याला धूळ दाखविणे किंवा समुद्रात पाण्याचा एक थेंब घालण्यासारखे आहे. आमचे हिंदुस्थानचे साम्राज्य म्हणजे अथांग समुद्र आहे. प्रत्येक वर्षी आणि प्रत्येक महिन्यात कोटयवधि रुपये दाखल होतात आणि खर्च होतात." औरंगजेबाची ही दर्पोक्ति अगदी यथार्थ होती. तरीही आपल्या मरणानंतर काय करावयाचे याबद्दल तपशीलवार सूचना आपल्या वारसांना देताना त्याने आपल्या मृत्युपत्रात लिहून ठेविले की– "टोप्या शिवून मी जमा केलेली रक्कम महालदार आया बेगकडे आहे. त्या रकमेपैकी चार रुपये दोन आणे त्याच्याकडून घ्यावेत आणि माझ्या कफनासाठी ते खर्च करावेत. कुराणाच्या प्रती करून माझ्या खाजगी खर्चासाठी मी तीनशे पाच रुपये जमा केलेले आहेत. ती रक्कम माझ्या मृत्यूच्या दिवशी फकिरांना वाटण्यात यावी. मला उघडया माथ्याने पुरण्यात यावे, कारण उघडया मस्तकाने परमेश्वराकडे नेण्यात आलेला प्रत्येक पापी मनुष्य त्याच्या दयेस पात्र होईल यात शंका नाही. माझी शवपेटी गाझीच्या जाडयाभरडया कापडाने आच्छादावी. कबरीवर छत किंवा घुमट उभारू नये किंवा गाणी म्हणू नयेत."

पैशाच्या बाबतीत औरंगजेब हा चोखंदळ व काटकसरी होता हे प्रसिद्धच आहे. पण या सूचनांमध्ये त्याचा केवळ काटकसरीपणा दिसत नाही. या सूचना त्याने लिहिल्या तेव्हा मराठयांशी चाललेल्या युद्धात आपणास अपयश येत असल्याचे त्याला उघड दिसू लागले होते आणि प्रपंच आणि परमार्थ या दोनही बाबतीत आपले जीवन सारखेच व्यर्थ गेले ही विफलता त्याला सायंकाळी पसरणाऱ्या अंधाराप्रमाणे घेरून टाकीत होती हेही खरे. पण त्या विषादाच्या उर्मीमधूनही या विचारांचा उगम झालेला नव्हता. ते विचार हे त्याच्या व्यक्तिमत्त्वाला फुटलेले अखेरचे अंकुर होते. अखेरचे असले तरी ते पूर्ण नैसर्गिक होते. त्याच्या आत्म्याची ती स्वाभाविक स्पंदने होती.

वैराग्य हेच औरंगजेबाचे वैभव होते. त्याचा पूर्वज बाबर हा अट्टल दारुडा होता. तसाच जहांगीर. दोन वेळा गाळलेल्या दारूचे वीस प्याले तो दिवसाला पीत असे. चौदा दिवसा आणि सहा रात्री. दारूच्या जोडीला चौदा रती अफू दिवसाला तो खात असे. असली दारूबाजी आणि अफीणबाजी औरंगजेबाने कधी केली नाही. त्याचा बाप शहाजहान याला गाण्याबजावण्याचा भलताच शोक होता व घाणेरडे व अश्लील तमाशे तर त्याला फार आवडत. औरंगजेबाला हे सव विषासारखे वर्ज्य होते. "वादये ऐकणे धर्मशास्त्रात निषिद्ध आहे म्हणून मी

संगीत ऐकणेच सोडून दिले" असे तो म्हणतो. सगळ्या जन्मात त्याने सोन्या-चांदीची भांडी कधी वापरली नाहीत. धर्मशास्त्रात निषिद्ध मानलेली रेशमी किंवा रंगीबेरंगी वस्त्रं कधी परिधान केली नाहीत. जहांगीर किंवा शहाजहान यांच्या विलासाप्रमाण त्यांचे वैराग्यही वैभवशालीच होते. जहांगीरच्या मंत्र जपण्याच्या माळेला आठ पदर होते. प्रत्येक पदरात मोत्याचे व हिरेमाणकांचे चारशे मणी होते. शहाजहानच्या मंत्र जपण्याच्या दोन माळा होत्या. त्यांची किंमत वीस लाख रुपये होती. औरंगजेबाच्या अंगावरच्या जाड्याभरड्या कापडाची किंमत दहा रुपयेसुद्धा नव्हती असे मनूची सांगतो. दर महिन्याच्या तेरा, चौदा व पंधरा तारखेस व दर आठवड्यास सोमवार, गुरुवार, शुक्रवार या दिवशी तो कडक उपास करी. खेरीज रमजान महिन्यातले त्याचे उपास निराळे असतच. महत्त्वाच्या सणांच्या रात्री तो धर्मचर्चेत घालवी. तो अखंड ईश्वराच्या नामस्मरणात निमग्न असे. ऐश्वर्य हात जोडून पुढे उभे असताही त्याने सबंध जीवन धर्मचिंतनात साधेपणाने व विरक्तपणाने घालविले. त्याच्या साध्या आणि विरक्त जीवनाचे सारे उदात्त सौंदर्य खुल्दाबादच्या त्याच्या कबरीत प्रतिबिंबित झालेले आहे.

औरंगजेबाचा गुरु सय्यद जैनुद्दीन हा सैय्यद बुऱ्हाणुद्दीनचा शिष्य होय. त्याच्या चांदीच्या पत्र्याने मढविलेल्या झडपांचा दरवाजा असलेल्या शोभिवंत मकबऱ्याजवळ औरंगजेबाची कबर आहे. त्या कबरीवर दगड नाही, छत नाही, घुमट नाही, कसलेही आच्छादन नाही. दिवसाचे ऊन आणि रात्रीचे चांदणे त्या कबरीवर कसलाही अडथळा न होता पडू शकते. जवळच बकुळीची झाडे आहेत. वारा सुटला म्हणजे त्या नाजूक फुलांची पखरण कबरीवर पडते आणि त्यांच्या गोड सुगंधाने परिसर दरवळून जातो. उघड्या आकाशाखाली धरित्रीच्या शय्येवर अखेरच्या निवाड्याच्या दिवसाची–कयामतची–वाट पहात औरंगजेब चिरकाल तेथे पडून राहिलेला आहे.

खुल्दाबाद हे गाव तसे लहान असले तरी इस्लामच्या धार्मिक इतिहासात त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. तेराव्या शतकात दिल्लीच्या शेख निजामुद्दीन अवलियाने आपला शिष्य जर्जरीजरबख्श याला सातशे शिष्य बरोबर देऊन दक्षिणत इस्लामच्या प्रचारासाठी पाठविले. त्याचा मठ येथे होता व त्याचे अवसानही येथेच झाले. जर्जरीजरबख्श याचा अर्थच मुळी द्रव्यदाता. अंथरुणाखाली हात घालावा आणि द्रव्य काढावे अशी त्याच्यावर ईश्वराची कृपा होती असे सांगतात. जर्जरीजरबख्शाच्या मृत्यूनंतर निजामुद्दीनने जर्जरीजरबख्शाचा मोठा भाऊ बुऱ्हाणुद्दीन ऊर्फ गरीबशाह याच्याबरोबर सातशे शिष्य देऊन धर्मप्रचारासाठी त्याला भावाच्या जागी पाठविले. हा बुऱ्हाणुद्दीन खानदेशच्या नासिरुद्दीन फारुकी या सुलतानाचा गुरु होय. त्याच्याबद्दलची पूज्यबुद्धि व्यक्त करण्यासाठी

त्या सुलतानाने आपल्या बुऱ्हाणपूर राजधानीला त्याचे नाव दिले. बुऱ्हाणुद्दीनच्या मृत्यूनंतर एक चांदीचे झाड त्याच्या कबरीपुढे उगवून वर आले. त्या चांदीचे तुकडे विकावयाचे व त्यातून दर्ग्याचा खर्च चालवायचा असा प्रघात होता. पुढे दर्ग्याला जहागीर मिळाली आणि ते चांदीचे झाड वाढायचे बंद झाले. पण अद्याप त्या झाडाचे चांदीचे जमिनीतून वर आलेले गोळे बुऱ्हाणुद्दीनच्या कबरीपुढे त्या ईश्वरी अनुग्रहाची साक्षा देत उभे आहेत. या सर्व मुस्लिम संतांच्या वास्तव्याने आणि समाधींनी खुल्दाबाद पावन झालेले आहे. 'खुल्दाबाद' या शब्दाचा अर्थच मुळी 'स्वर्गनगरी' होय.

म्हणूनच या भूलोकीच्या स्वर्गनगरीत अखेरचा विसावा घेण्यासाठी कितीतरी राजपुरुषांनी येथे माथा टेकला. त्यांत निझामशाहीचा विख्यातकीर्ति वजीर मलिकंबर आहे, औरंगजेबाने पदच्युत करून शेजारच्या दौलताबादच्या 'चिनी महाला'त बंदीत ठेवलेला गोवळकोंड्याचा अखेरचा रंगेल सुलतान अबुल हसन तानाशाह आहे, औरंगजेबाचा प्रसिद्ध सरदार व हैद्राबादच्या निजामशाहीचा संस्थापक चिनकिलीजखान व त्याचा मुलगा नासीरजंग आहे. दक्षिणेतल्या इस्लामच्या प्रचाराचे आदिपीठ असलेले हे खुल्दाबाद इस्लामच्या दृष्टीने पुण्यक्षेत्र आहे. त्यातच पुन्हा इस्लाम धर्माचे संस्थापक हजरत महंमद पैगंबर यांच्या दाढीचे काही केस व झगा या पवित्र वस्तु येथे असल्यामुळे त्याचा महिमा अनंतपटींनी वाढलेला आहे. धर्म हाच ज्याचा एकमेव जीवितहेतु होता, त्या औरंगजेबाने आपल्या चिरविश्रांतीसाठी या पुण्यक्षेत्राची व धर्मक्षेत्राची निवड करावी, ही गोष्ट किती स्वाभाविक म्हटली पाहिजे !

औरंगाबादेपासून सोळा मैलांवर आणि दौलताबादेपासून सहा मैलांवर खुल्दाबाद आहे. औरंगजेब दोन वेळा म्हणजे १६३६ ते १६४४ व १६५३ ते १६५८ पर्यंत म्हणजे एकंदर तेरा वर्षे दक्षिणचा सुभेदार होता. त्याच वेळी त्याने बागलाण काबीज केले, व गोवळकोंड्यावर व विजापूरवर स्वारी केली. त्याच्या मार्गांत आडवे येणे हेच ज्याचे ब्रीद होते, तो दारा याही वेळी आपल्या ब्रीदाला जागला आणि त्याने शहाजहानच्या कानाशी लागून युद्ध थांबविले. त्यामुळे औरंगजेबाचा नाइलाज झाला. नाहीतर जे काम त्याने पुढें तीस वर्षांनंतर स्वतः शहेनशहा झाल्यानंतर केले, ते त्याच वेळी केले असते व गोवळकोंडा आणि विजापूर येथील राज्ये साफ करून टाकली असती.

दक्षिणचा सुभेदार असताना खुल्दाबाद, दौलताबाद, औरंगाबाद हा सगळा मुलुख औरंगजेबाला केवळ पायाखालचा झाला होता. औरंगाबादला तर त्याचे मुख्य ठाणेच होते. इतकेच कशाला, मूळच्या खडकी नावाच्या खेड्याजवळ मलिकंबरने फत्तेनगर बांधले, तेथेच स्वतःसाठी व सैन्यासाठी इमारती बांधून औरंगजेबाने त्या शहराची पुनर्रचना केली व त्याला 'औरंगाबाद' असे आपले

नाव दिले. स्वतःला राहण्यासाठी त्याने जो महाल बांधला, त्या महालाचे अवशेष अद्याप 'आलमगिरी महल' म्हणून औरंगाबादेत दाखविण्यात येतात. औरंगाबादेतच सुभेदारी करीत असता त्याची बायको दिलरास बानू बेगम मरण पावली. तिची भव्य कबर 'बिबीका मकबरा' सहा लाख रुपये खर्चून तिचा मुलगा आझम याने औरंगजेबाच्या आज्ञेने दुरुस्त केली, ती मोगल शिल्पकलेचा नमुना म्हणून अजूनही विख्यात आहे. दक्षिणेतला तो ताजमहालच म्हणावयाचा.

औरंगाबादेतील इमारती पूर्ण होईपर्यंत औरंगजेबाचा मुक्काम दौलताबादलाच होता. दौलताबादच्या किल्ल्यात फकीर सुलतानाच्या दर्ग्याची चढण चढून गेल्या-नंतर बारादरी नावाची अष्टकोनाकृति आणि बारा कमानींची इमारत लागते. दौलताबादेस असताना व पुढे औरंगाबादेस सुभेदार म्हणून असतानाही औरंग-जेबाचे हे अत्यंत आवडते ठिकाण होते. उन्हाळ्यात तो कधी कधी येथे येऊन राहत असे. आजही तेथे चौकाच्या मध्यभागात एक दगडी ओटा आहे, ती जागा औरंगजेबाची गादी म्हणून पूर्वी वापरली जात असे असे सांगतात.

पण या राजकीय आणि वैयक्तिक संस्मरणापेक्षाही औरंगजेबाच्या प्रेम जीवना-तील मधुर आणि उदास स्मृति औरंगाबाद, व दौलताबाद यांच्या परिसराशी निगडित झालेल्या आहेत, हे या प्रदेशाचे स्थानमाहात्म्य आहे. दक्षिणच्या दुसऱ्या सुभेदारीवर येताना त्याने बुऱ्हाणपुराहून बरोबर हिराबाईला आणले, आणि तिच्या सहवासात त्याच्या जीवनातील काही काळ पराकाष्ठेच्या आनंदात गेला. वसंताचे वारे वाहू लागल्यावर एखाद्या नीरस आणि वठलेल्या वृक्षाला पालवी फुटावी, त्याप्रमाणे औरंगजेबाच्या करड्या आणि एकारलेल्या स्वभावाला मार्दवाचे व स्नेहाचे घुमारे फुटले. पण पाषाणात अमृताच्या सरितेची रेखा दिसावी न दिसावी तितक्यात ती कायमची लुप्त व्हावी, त्याप्रमाणे हिराबाई त्याच्या आयुष्यात स्वप्नसुंदरीप्रमाणे आली व त्याच्यावर प्रीतीचा शिडकावा करून पाहता पाहता अदृश्य झाली. त्या वेळी दुःखाने औरंगजेबाचे काळीज फुटायची वेळ आली. औरंगजेबाचा जिवलग मित्र आकिलखान मीर अस्करी तेव्हा म्हणाला—'इश्क चे आसा नमूद आह चे दुश्वार बूद । हिज्र चे दुश्वार बूद यार चे आसां गिरफ्त (प्रेम करणे किती सोपे वाटले. हाय ! ते किती कठीण ठरले. विरह होणे शक्य नाही असे वाटत होते. पण हाय, किती सुलभतेने प्रिया निघून गेली! )' त्या ओळी ऐकून औरंगजेबाच्या डोळ्यांना पाणी आले. त्या आकिलखानाने रचिलेल्या होत्या हे ऐकून त्याने त्या त्याच्याकडून पुन्हा पुन्हा म्हणवून घेतल्या. औरंगाबाद शहराच्या उत्तरेस दिल्ली दरवाजाच्या बाहेर मलिकंबरने बांधलेल्या अंबरी तलावाच्या काठी औरंगजेबाने हिराबाईची कबर बांधली, पण त्या स्मृति त्याच्या अंतःकरणातून कधीही नष्ट झाल्या नाहीत. अनेक वर्षांनंतर, स्वतः आजोबा झालेला हा हिराबाईचा प्रेमिक, आपला नातू बेदारबख्त याला लिहितो...

"सुभेदार म्हणून दौलताबाद आणि औरंगाबाद येथे राहत असताना मी स्वच्छंदपणे आणि सैतानाच्या प्रभावाखाली घोडयावरून मनसोक्त फिरत असे. नीलगाय आणि इतर वन्य पशूंची शिकार करण्याकरिता मी लांब मजला मारीत असे. असेच इतर रिकामटेकडे उद्योग मी करीत असे. दौलताबादच्या खोऱ्यातील कुतलक तलाव, चांभार टेकडी, जितवाडा या स्थळांकडे मी जात असे. कधी कधी बुऱ्हाणुद्दीन व जैनुद्दीन यांच्या कबरींचे मी दर्शन घेई. मी दौलताबादेच्या किल्ल्यावर जात असे. कधी कधी मी अद्‌भुत कलाकृतींनी भरलेल्या वेरूळच्या लेण्यांना परिवारासहित भेट देत असे, तर कधी एकटयाने जात असे"

औरंगजेबाच्या प्रेमजीवनाची स्मरणगाथा या दक्षिणच्या भूमीतच उमललेली होती. त्याच्या राजकीय जीवनाचा प्रभातकाल येथेच झालेला होता. जीवनाच्या सायंकाळी त्याच्या धर्मजीवनाला अनुकूल भूमि त्याला येथेच लाभलेली होती. म्हणून या सर्व दृष्टींनी विचार करिता दक्षिणेतील खुल्दाबादची त्याने निवड करणे स्वाभाविक वाटते.

पण औरंगजेबाच्या स्वभावाची गुंतागुंत उलगडणे इतके सोपे नाही. हिराबाईवर त्याचे नितांत प्रेम असले तरी त्या प्रेमाने त्याच्या अंतःकरणाचा केवळ एक कोपरा व्यापलेला होता हे लक्षात ठेवले पाहिजे. प्रेमासारख्या भावनेच्या आहारी जाऊन आपले सगळे जीवन त्यावर उधळून देणारा माणूस औरंगजेब नव्हे. रूपमतीसाठी वेडा होणारा तो बाझबहाद्दर नव्हता की, मला एक शेर मद्य व अर्धा शेर मांस रोज मिळाले म्हणजे पुरे. माझी पत्नी इतकी चतुर आणि राजकारणकुशल आहे की "मला कठीण पेचासारखे वाटणारे प्रश्न ती सहज सोडवते" असे म्हणुन साम्राज्याची सारी सूत्रे नूरजहानच्या हाती सोपविणारा तो जहांगीर नव्हता. तो औरंगजेब होता. प्रेमाच्या भरातसुद्धा असले बायकांचे बंड राजकारणात माजू देणे त्याला परवडणारे नव्हते. पुरुषाचे प्रेम हा त्याच्या जीवनाचा केवळ एक भाग आहे. Man's love, is of man's life, a thing apart असे म्हणतात. त्या वचनाचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे औरंगजेब होय आणि संतांच्या चरणांपाशी आपली कबर असावी आणि ती अगदी साधी असावी एवढाच त्याचा आग्रह असता, तर उत्तरेत धर्मक्षेत्रांना काही तोटा नव्हता. ज्या सय्यद जैनुद्दीनच्या मकबऱ्याशेजारी औरंगजेबाची कबर आहे, त्याचा परात्पर गुरु शेख निजामुद्दीन अवलिया याची कबर दिल्लीला आहे; आणि त्याच्याच दर्ग्यात औरंगजेबाची बहीण जहानआरा हिची कबर आहे. औरंगजेबाच्या कबरीप्रमाणे तिचीही कबर अगदी साधी आहे व कबरीवरचा लेख तर विरक्तीची उदात्त कविता आहे "तो चिरंतन आहे आणि स्वयंभू आहे. हिरव्या गवताशिवाय दुसऱ्या कशाचेही माझ्या कबरीवर आच्छादन असू नये; कारण गवत हेच पामरांचे। पुरेसे पांघरुण होय."

दक्षिणेचा सुभेदार होता म्हणून दक्षिणेबद्दल औरंगजेबाला विशेष ममत्व वाटत असेल असे म्हणावे तर तो गुजराथचाही सुभेदार होता. आणि सुभेदारी नेहमी बदलत असे. त्यातून ममत्वच वाटायचे तर त्याला गुजराथबद्दल वाटायला हवे होते; कारण गुजराथेतील दोहद येथे तर त्याचा जन्म झाला होता. तो स्वतः मरायला टेकला असताना, वयाच्या चौऱ्यांशीव्या वर्षी, गुजराथचा सुभेदार असलेला मुलगा आझम याला लिहिताना, त्याचे आपल्या जन्मभूमीबद्दलचे प्रेम उचंबळून आले. तो म्हणतो – "मुला, गुजरात प्रांतातील दोहदचे खेडे ही या पापी माणसाची जन्मभूमि आहे. तेथल्या रहिवाशांना दयाळूपण तू वागविणे योग्य आहे. तेथे बरीच वर्षे असलेला जो जुना फौजदार आहे. त्याला संतुष्ट ठेव आणि नोकरीत राख." आपल्या जन्मगावचा फौजदार आणि तेथील माणसे यांच्याबद्दल म्हातारपणी स्वतः मृत्युच्छायेच्या खिडीतून जात असताना औरंगजेबाच्या मनात एवढे प्रेम नांदत होते.

औरंगजेबाची तशीच जर इच्छा असती तर आपल्या जन्मभूमि असलेल्या दोहदच्या गुर्जरभूमीत किंवा आपल्या बहिणीप्रमाणे दिल्लीला शेख निजामुद्दीन अवलियाच्या दर्ग्यात आपली कबर बांधण्याची इच्छा त्याला व्यक्त करणे सहज शक्य होते. केवळ त्याला दक्षिणेत मरण आले म्हणून त्याची कबरही दक्षिणेतच व्हायला हवी होती अशातला भाग मुळीच नव्हता. त्याची स्वतःची आई मुमताजमहल दक्षिणेत बुऱ्हाणपूर येथे मरण पावली. पण सहा महिने तिचे शव बुऱ्हाणपूरच्या आहूखान्यात ठेवल्यानंतर उत्तरेस आग्र्याला ताजमहालमध्ये नेऊन पुरण्यात आले.पण मरणानंतरही दक्षिण देश सोडण्याची औरंगजेबाची मुळी इच्छाच नव्हती. आपला देह येथल्याच मातीत पडावा अशी त्याची मनीषा होती. म्हणून त्याने आपला अन्त्यविधि खुल्दाबाद येथे व्हावा असे निःसंदिग्ध शब्दांत लिहून ठेवले. असे कां ? औरंगजेबाच्या सुभेदारीचे राजकीय जीवन, त्याचे प्रेमजीवन, त्याचे धर्मजीवन याची कितीही चिकित्सा केली तरी त्याच्या या अखेरच्या इच्छेचा उलगडा होत नाही. मग या कोड्याचे उत्तर काय ?

औरंगजेबाच्या पराकाष्ठेच्या जिद्दी आणि हट्टी स्वभावात या समस्येचे उत्तर सापडू शकेल असे वाटते. दक्षिणेचे युद्ध हाती घेतल्यापासून दोन वेळा कसलाही कमीपणा न येता सन्मानाने उत्तरेस परत जाण्याची संधि त्याच्याकडे आपण होऊन चालत आली होती. पण दोन्ही वेळा त्याने पाठ फिरविली. पहिल्या प्रसंगी विजापूर व गोवळकोंडा येथील समृद्ध राज्ये जिंकल्यानंतर त्याचा वजीर आसदखान याने त्याला अर्ज केला की, "आता नंदनवनासारख्या असलेल्या उत्तरेस चलावे." तेव्हा औरंगजेबाने उत्तर दिले की, "शरीरात शेवटचा श्वास शिल्लक असेपर्यंत मला कष्ट आणि काम यांच्यापासून सुटका नाही. परत असली विनंती तू करणार नसशील व कष्ट करण्याची तुझी तयारी असेल तर यापुढे किल्ल्यावर

मोहीम काढण्याचा माझा इरादा आहे." त्यानंतर पुन्हा एकदा राजारामाच्या मृत्यूनंतर खुद्द ताराबाईने आपल्या मुलास सात हजारी मनसब व दक्षिणची देशमुखी दिल्यास मोगलांस सातारा, पन्हाळा वगैरे सात किल्ले देऊन औरंगजेबाशी तह करण्याचे बोलणे लावले होते. खरे म्हणजे औरंगजेबाच्या भाग्याला या वेळी उतरती कळा लागली होती. मराठ्यांचा जोर सर्वत्र वाढला होता. त्याचे सरदार कामे करीनात म्हणून म्हातारपणी किल्ले घेण्यासाठी दऱ्याखोऱ्यांतून त्याला वणवण हिंडावे लागत होते. पण त्याने माघार घेतली नाही, तडजोड केली नाही. "सर्वच किल्ले ताराबाईने देऊन टाकले तर मराठ्यांशी तडजोड होऊ शकेल." असे ताठर उत्तर त्याने दिले. 'सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पण्डितः' हा पंडितांचा तडजोडीचा राजमार्ग आहे. पण पंडितांचा तो मार्ग औरंगजेबाला मानवला नाही. मराठ्यांबरोबरचे युद्ध त्याने पुढे चालूच ठेवले. त्याने त्यांचे किल्ले घेतले, त्याने वाकिणखेडा जिंकून घेतला. या वेळी खरे म्हणजे निदान कागदोपत्री तरी त्याचा दक्षिण दिग्विजय पूर्ण झाला होता. मराठ्यांचे सर्व महत्त्वाचे किल्ले त्याने काबीज केले. विशाळगड, सातारा, जिंजी, रायगड या त्यांच्या सर्व जुन्या नव्या राजधान्या त्याने जिंकल्या होत्या. बेरडांचा वाकिणखेडा त्याने सर केला होता. पण तो काही उत्तरेला जायला तयार नव्हता. तो आणखी दक्षिणेकडे म्हैसूरवर जाऊ इच्छीत होता. पण त्याच्या प्रकृतीने दगा दिला म्हणून नाईलाज झाला. सगळीकडे तो मेल्याची अफवा उठली म्हणून वजीरांच्या विनवण्यांना मान देऊन नाईलाजाने तो उत्तरेकडे निघाला, पण नगरच्या सीमेवरच त्याला मृत्यूच्या पावलांचा चाहूल ऐकू आली व तो म्हणाला की, "अहमदनगर हा माझा अखेरचा मुक्काम आहे." तरीही तो मराठ्यांशी झगडतच होता. मराठ्यांनी सिंहगड जिंकून घेतला, त्याने झुल्फिकारखानाला पाठवून तो परत सर केला. मराठ्यांनी माळव्यांत धुमाकूळ घातला, त्याने त्यांच्यावर फिरोजजंगाला पाठविले; मराठ्यांनी गुजरातवर स्वारी केली, त्याने बेदारबख्ताची तिकडे रवानगी केली; धनाजी जाधव देशभर उच्छाद मांडीत फिरू लागला, त्याने त्यांच्यामागे झुल्फिकारखानाला पाठविले; मराठ्यांनी त्याच्या छावणीवर हल्ला केला; त्याने त्यांच्यावर खाने आलमला पाठविले,– इतकेच नव्हे तर त्यांच्या सैनिकांच्या गळ्यात मंतरलेले ताईत घालायला दिले. मराठे हटत नव्हते, पण औरंगजेबही हटत नव्हता. औरंगजेब अमर असता, तर हे युद्ध यावच्चंद्रदिवाकरौ कल्पान्तापर्यंत चालले असते यात शंका नाही. पण अखेर तो मेला. पण प्राण गेला तरी हाती घेतलेले काम सोडायचे नाही हा बाणा काही त्याने सोडला नाही. मेल्यानंतरही या दक्षिणच्या भूमीत त्याने कायमची वसती केली.

औरंगजेबाची कबर मुसलमानांना वंदनीय वाटावी हे स्वाभाविकच होय. पण नवलाची गोष्ट अशी की आझमच्या सैन्यातून मुक्त होऊन आपले राज्य घेण्या

साठी शाहू दक्षिणेत येत असता, तो मुद्दाम खुल्दाबादला गेला व त्याने औरंगजेबाच्या कबरीचे दर्शन घेतले. तो शाहू होता. "लेकरा, औरंगजेबाचा आपला दावा, तुजला दगा करावयाचा होता" असे संभाजीला सांगणाऱ्या शिवाजीमहाराजांचा तो नातू होता. ज्या संभाजीला औरंगजेबाने हालहाल करून ठार मारले त्या संभाजीचा तो प्रत्यक्ष मुलगा होता. तरी त्याने औरंगजेबाच्या कबरीला वंदन केले. त्याची आई येसूबाई मोगलांच्या कैदेत अद्याप होती. त्याचे महाराष्ट्रात अजून बस्तान बसायचे होते म्हणून 'देखल्या देवा दंडवत' अशा प्रकारचे दगडाखाली हात अडकला असल्यामुळे, शाहूने दाखविलेले हे राजकारण होते असे कोणी म्हटले, तर ते बरोबर नाही. कारण या प्रसंगानंतर सव्वीस वर्षांनी १७३४ साली शाहूने औरंगजेबाच्या दर्ग्याच्या शुश्रूषेसाठी सनद दिली, ती उपलब्ध आहे– "हजरत औरंगजेब पादशहा याचे दरगाहचे उदफूल दिवाबत्तीबद्दल पेशजीपासून इनाम गाव दिल्हे आहेत. त्याप्रमाणे करार आमल तुम्ही दरगाहचे खिजमतीचे फकीर शाहा वलद शेख मानुल्ला वगैरे यांसी रुजू होऊन सुदामतप्रमाणे देहाये मजकुरचा वसूल सुरलित देणे म्हणून. येविसी पत्रे चिटणिसी ता नगरहवेली पा कडेवलीत पैकी देह २ दरगाहाचे उरसास देह २. (१ मौजे कोडगाव व १ मौजे साडीक) १ दरगाहाचे खिजमतीचे फकीरास पेसजीपासून मेहकरे इनाम दिला आहे. त्याप्रमाणे करार म्हणून पत्र मुकादमास, फकीर असामी सात. माहे शाबान मार्गेस्वर नलसंवत्सरे सुहूर सन सबा सलासीन मया व अलफ तेरीख ४ रोजी शष्टी मंदवासर मु ।। शाहूनगर."

या वेळी शाहू महाराष्ट्रात केवळ स्थिरपदच झालेला नव्हता, तर महाराष्ट्रातला तो एकमेव समर्थ सत्ताधीश होता. त्याचा पराक्रमी पेशवा थोरला बाजीराव याच्या प्रौढप्रतापाने दिल्लीपासून श्रीरंगपट्टणापर्यंत अवघे भरतखंड थरथरत होते. त्याला सोडणारा आझम मेला होता. त्याच्याऐवजी बादशहा झालेला मुअजमही मेला होता. त्याची आई येसूबाई दिल्लीहून सुटून महाराष्ट्रात आली होती व मुलाचे ऐश्वर्य पाहून तिने सुखाने डोळे मिटले होते. अशा स्थितीत पूर्वीच मरून गेलेल्या औरंगजेबाचा धाक शाहूला आता बाळगण्याचे काहीच प्रयोजन नव्हते. तरीही त्याने औरंगजेबाच्या दर्ग्याच्या शुश्रूषेसाठी सनद दिली. याचा अर्थच असा आहे की, तो सर्वस्वी परतंत्र आणि असहाय असताना औरंगजेबाने दाखविलेल्या वात्सल्याची कदर करण्याइतकी कृतज्ञता शाहूच्या ठिकाणी होती. इतकेच नव्हे, तर शत्रूच्याही मुलाने, आपण मेल्यानंतरही, कदर करावी इतके अपरंपार वात्सल्य औरंगजेबाने शाहूला दाखविले होते असा याचा अर्थ होतो. कपट, कारस्थान, लढाया यांनी गजबजलेल्या आपल्या निष्प्रेम व एकाकी जीवनात औरंगजेबाने शाहूबद्दलच्या वात्सल्याचे इवलेसे रोप आपल्या दारी लावले. त्या रोपाचा वेल, त्याच्या मृत्यूनंतर, गगनावर गेला. शाहूने त्याच्या

समाधीसाठी दिलेली सनद हे त्या वेलाला आलेले सुगंधी फूल म्हटले पाहिजे.

अजमीर येथे असताना शिवाजीमहाराजांच्या मृत्यूची बातमी जेव्हा औरंगजेबाने ऐकली तेव्हा त्याला परम संतोष झाला व त्याने उद्गार काढले की, "शिवाजी हा फार मोठा सेनापति होऊन गेला. नवीन स्वतंत्र राज्य निर्माण करण्याचे सामर्थ्य त्याच्यातच होते. हिंदुस्थानातील जुन्या सत्ता मोडून टाकण्याचे माझे प्रयत्न सारखे चालले आहेत. सतत एकोणीस वर्षे माझे सैन्य त्याच्याशी लढा देत असूनही त्याचे राज्य वाढतच आहे." शिवाजीमहाराजांची स्तुति करीत असताना त्यातच त्यांच्या हयातीत महाराष्ट्रात जातीने पाऊल टाकण्याची औरंगजेबाला कां छाती झाली नाही याचेही त्याने स्पष्टीकरण दिले आहे. औरंगजेबाने चालविलेल्या सर्वतोमुख संहारावर मात करून हिंदवी स्वराज्य निर्माण करणाऱ्या शिवछत्रपतींच्या प्रतिभेचा व रणपांडित्याचा आवाकाच इतका जबरदस्त होता की औरंगजेब त्यांच्याशी सामना देण्यास धजू शकला नाही. त्यामुळेच महाराजांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्राचे हे नवजात राज्य सुखेनैव आपणांस गिळंकृत करता येईल या विचाराने तो आनंदित झाला. योगायोगाने त्याच वेळी त्याचा मुलगा अकबर याने त्याच्याविरुद्ध दुर्गादासाशी संगनमत करून बंडाचा झेंडा उभारला व महाराष्ट्रात संभाजीकडे आश्रयासाठी धाव घेतली. त्याबरोबर अग्नीला वाऱ्याची साथ मिळावी त्याप्रमाणे औरंगजेबाच्या मनातील संकल्पाला विजेचा वेग आला व अकबराच्या मागोमाग तो तातडीने महाराष्ट्रात उतरला.

महाराष्ट्राच्या इतिहासात गेल्या हजार वर्षांत उत्तरेकडून एवढे जबरदस्त आक्रमण महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यावर झालेले नव्हते. हजार वर्षांपूर्वी उत्तरापथाचा सम्राट् हर्षवर्धन याने दक्षिणापथाचा अधीश्वर असलेल्या महाराष्ट्राच्या पुलकेशीवर दिग्विजयाच्या ईर्षेने प्रेरित होऊन असेच आक्रमण केले होते. पण हर्ष काय किंवा पुलकेशी काय, अखेर ह्या भरतभूमीचे संतान होते. हर्ष बौद्ध असला आणि पुलकेशी वैदिक हिंदु असला, तरी ही भरतभूमीच त्यांची पुण्यभूमि आणि धर्मभूमि होती. पुलकेशीवर दिग्विजय करायचा म्हणजे त्याला नेस्तनाबूद करायचे, त्याची घरेदारे जाळावयाची रक्ताच्या नद्या वहावयाच्या, त्याचे अस्तित्व पृथ्वीवरून साफ पुसून टाकावयाचे ही हर्षाची कल्पनाच नव्हती. पुलकेशीकडून फक्त आपले मांडलिकत्व कबूल करून घ्यावयाचे एवढीच हर्षाच्या दिग्विजयाची मर्यादा होती. हर्ष हा हिंदुस्थानात जन्मलेला धर्मविजयी नृप होता. प्राचीन हिंदु नृपतींची हीच दिग्विजयाची परंपरा होती. 'श्रियं महेन्द्रनाथस्य जहार न तु मेदिनीम्' हर्षाशी तुलना करता औरंगजेबाच्या आक्रमणाची प्रवृत्ति आणि प्रकृति मूलतःच सर्वस्वी भिन्न होती. ते महाराष्ट्रावरील केवळ राजकीय आक्रमण नव्हते. महाराष्ट्राच्या हिंदवी स्वराज्याचा, त्याच्या महाराष्ट्रधर्माचा, त्याच्या संस्कृतीचा, त्याच्या हिंदुत्वाचा, त्याच्या अस्तित्वाचा, त्याच्या सर्वस्वाचा सर्वस्वी उच्छेद

करणारे ते अवसेच्या अंधकाराप्रमाणे सर्वंकष आक्रमण होते. 'नोर्ध्वमीक्षणगतिर्न चाप्यधो । नाभितो न पुरतो न पृष्ठतः । लोक एष तिमिरौघवेष्टितो । गर्भवास इव वर्तते निशि ।।'

खवासपूरला असताना माण नदीला मध्यरात्री मोठा पूर आला; त्या गडबडीत औरंगजेब घाईघाईने चालत असता घसरून पडला व पुढे एका पायाने कायमचा लंगडा झाला. त्याबद्दल लिहिताना खाफीखान म्हणतो – "नाहीतरी तो तैमूर-लंगाचा वंशजच होता." कोठे लढाई होऊन फार माणसे मेल्याची बातमी आली म्हणजे औरंगजेब जवळच्या माणसांस फुशारकीने म्हणे – "असा संहार होतो, तेव्हाच तैमूरलंगासारखी कीर्ति मिळते." एकदा तो म्हणाला, "खरे बोलायचे म्हणजे जीभ व डोळे शाबूद असले म्हणजे राजे लोकांना अगदी पुरेसे आहे. ईश्वराने तर त्याच्या जोडीला माझे बत्तीसपैकी तीस दातही अजून जसेच्या तसे ठेवले आहेत. हे सर्व पाहिले म्हणजे मी स्वतःला दुसरा तैमूरलंग कां म्हणवून घेऊ नये हे मला कळत नाही." कळत किंवा नकळत ज्या तैमूरलंगाचा आदर्श औरंगजेबाने आपल्या डोळयांपुढं ठेवला होता, तो काय प्रकारचा माणूस होता? तैमूरलंग हा रक्त-पिपासु होता. त्याने कत्तली केल्या, लूट केली, माणसांच्या डोक्यांचे मनोरे रचले. पण इतकेच केले नाही, त्याने एक समर्थ साम्राज्य निर्माण केले. त्याने हिंदुस्थान-वर जी स्वारी केली तिचा उद्देश आपल्या आत्मचरित्रात अत्यंत स्पष्ट शब्दांत त्याने लिहून ठेवलेला आहे – "हिंदुस्थानच्या काफर लोकांवर स्वारी करून त्यांस इस्लामी धर्मात आणावे, त्यांची मंदिरे व मूर्ति नाहीशा कराव्यात, आणि 'गाझी' हे सन्मान्य नाव मिळवावे अशी माझी फार इच्छा आहे." हर्षाप्रमाणे तैमूरही 'धर्मविजयी' नृपच होता. पण हर्षाच्या व तैमूरच्या 'धर्मविजयाच्या' कल्पनेत प्रकाश व अंधाराइतके अंतर होते.

तैमूरलंगाची ध्येये व धोरणे औरंगजेबाच्या रोमारोमांत भिनलेली होती. महा-राष्ट्रावरच्या मोहिमेत तैमूरलंगाच्याच शब्दाचाच त्याने पुनरुच्चार केला. वसंत-गडच्या मोहिमेत तो म्हणाला की, "ही मोहीम काढण्यात माझा हेतु केवळ जिहाद करणे हा आहे. या सेवेने परमेश्वर आणि पैगंबर हे संतुष्ट होवोत. उद्या मी स्वार होऊन किल्ल्यावर हल्ला करीन. आणि काफर वधाचा ध्वज उभा करीन." पन्हाळ-गडावर मोहीम करताना गुजरातचा सुभेदार शुजाअतखान याला लिहिलेल्या पत्रात तो हेच म्हणतो – "या वेळी मी जिहाद करीत आहे आणि दुष्ट काफरांचा नायनाट करण्याकरिता अखंड परिश्रम करीत आहे." वाकिणखेडा जिंकल्यानंतर त्याने तेथील गोपालस्वामींचे देवालय फोडले व त्याची मशीद केली. त्या मोहिमे-बद्दल त्याचा विश्वासु सेवक साकी मुस्तैदखान म्हणतो– "हा प्रदेश जिंकून घेण्यात बादशहाचा हेतु होता तो हा की, काफरांच्या या देशात इस्लामी आचारविचार यांचा प्रचार व्हावा आणि जनतेची (परमेश्वराच्या दासांची) स्थिति सुधारावी."

त्याचा हा उद्योग शेवटपर्यंत चाललाच होता. मराठ्यांचे गड आणि गावे घेऊनच तो थांबला नाही. त्याने त्यांची मूळची हिंदु नावे साफ बदलून टाकली व त्या ऐवजी मुसलमानी नावे दिली. परळीचा नौरसतारा, सातान्याचा अजीमतारा, पन्हाळ्याचा नबीशहादुर्ग, पावनगडचा बनीशाहदुर्ग, खेळण्याचा सखरलाना, सिंहगडचा बख्शिदाबख्श, पुरंदरचा आजमगड, तोरण्याचा फत्-उल्-घलीब, रायगडचा इस्लामगड, वसंतगडचा किली-द-फतेह, पुण्याचे मूहियाबाद, खेडचे मुकसदाबाद, वाकिणखेडचाचा रहमानबख्शखेडा करून टाकले.

औरंगजेब हा पराकाष्ठेचा उद्योगी मनुष्य होता. एका नावाऐवजी दुसरे नाव ठेवणे हा केवळ रिकामटेकडा उद्योग आहे असे त्याला वाटले असते, तर त्या कामात आपला बहुमोल वेळ त्याने मुळीच खर्च केला नसता. नावात काय आहे असे शहाणे लोक म्हणोत. पण यापेक्षा नावात काय नाही असेच विचारणे जास्त योग्य होईल. देशाचे नाव, गावाचे नाव, नदीचे नाव, माणसाचे नाव, देवाचे नाव यांत या संस्कृतीचे, धर्माचे व अस्मितेचे सारसर्वस्व भरलेले आहे. औरंगजेबाला हे माहीत होते आणि त्या तथाकथित शहाण्यांपेक्षा तो जास्त शहाणा होता. म्हणूनच वेळात वेळ काढून व बारीक तपशिलात शिरून त्याने नावे बदलण्याचा खटाटोप केला. या उद्देशाने की हिंदुत्वाचे नावसुद्धा या भूमीत शिल्लक राहू नये. औरंगजेबाच्या आक्रमणाच्या या स्वरूपाबद्दल मराठ्यांना कसलाही भ्रम नव्हता. सर्जेराव जेध्याला लिहिलेल्या पत्रात राजाराम म्हणतो – 'औरंगजेबाने महाराष्ट्र लोक आहेती त्यांस मुसलमान करावे ऐसे केले आहे. त्याप्रमाणे मुसलमान केले. राा नेतोजी व साबाजी घाटगे व जानोजीराजे व कित्येक ब्राह्मणही या प्रांतीचे बाटविले."

पण हजार वर्षांपूर्वी महाराष्ट्रावर आक्रमण करू पाहणाऱ्या हर्षवर्धनाला जो अनुभव आला तोच औरंगजेबाला आला. 'सुजलां सफलां सस्यश्यामलां' अशा सुपारी फोडायलाही दगड मिळणार नाही अशा या लोण्यासारख्या मऊ भरत-भूमीत आजपर्यंत फारसा कोठेही न अडलेला आणि टापा झाडीत चौखूर उधळ-लेला त्याचा दिग्विजयाचा घोडा अखेर या महाराष्ट्राच्या भूमीत ठेच लागल्या-प्रमाणे अडखळला; आणि थबकून जागच्या जागी उभा राहिला. त्याला हा राकट देश भेटला, कणखर देश भेटला, दगडांचा देश भेटला, हा अंजन-कांचन करवंदीचा काटेरी देश भेटला. या भूमीतील दगडासारख्या माणसांची तर गोष्ट दूरच राहिली, पण येथील दगडांनी घडविलेली देवळेसुद्धा त्याच्या हातून फुटता फुटेनात. ज्या औरंगजेबाने काशीविश्वेश्वराचे मंदिर लीलेने फोडले, ज्याने मथुरेचे केशवदेवाचे देवालय जमीनदोस्त केले, ज्याने सोमनाथाचा विध्वंस केला, त्याने महाराष्ट्रातल्या देवळापुढे हात टेकले. रुहुल्लाखानाला लिहिलेल्या पत्रात तो म्हणतो–"या प्रांतातील देवळे फार बळकट आहेत आणि निव्वळ लोखंड आणि

दगड यांनी बांधलेली आहेत. माझे कूच चालू असताना ही देवळे नजरेला येतात पण सरकारी बेलदाराजवळ त्यांना जमीनदोस्त करण्याइतके बळही नाही व वेळही नाही. तुम्ही कोणा धर्मनिष्ठ दारोग्याची यासाठी नेमणूक करावी म्हणजे तो सवडीने या देवळांची तपासणी करील व मुळापासून ती उखडून काढील." आणि मुघलखानाला दिलासा देता देता त्याने स्वत:चेच समाधान करून घेतले आहे की– "देऊळ जमीनदोस्त करणे केव्हाही शक्य आहे, कारण आपल्या जागेपासून ते काही पळून जाऊ शकत नाही." औरंगजेबाचे हे समाधान मात्र त्याच्यापासून कोणीही हिरावून घेऊ शकले नसते. कारण, ते तत्त्ववेत्त्याचे समाधान होते. काळ अनंत आहे व पृथ्वी विपुल आहे. 'कालोऽह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी!'

जशी देवळे तसाच देश, तशीच माणसे. तीही केवळ दगडांनी आणि लोखंडाने घडविली होती. हजार वर्षांपूर्वी पुलकेशीच्या नेतृत्वाखाली हर्षाला पाणी पाजणारे हेच लोक होते. त्यांच्याबद्दल ह्यू एन त्संग म्हणतो– "त्यांच्या रीतीभाती साध्या आणि प्रामाणिक आहेत. ते उंच, हट्टी आणि रगेल आहेत. त्यांच्या उपयोगी जो पडेल त्याच्याशी ते कृतज्ञ असतात. पण जो त्यांच्या वाटेस जातो, त्याचा ते सूड घेतल्याशिवाय राहात नाहीत. कोणी त्यांचा अपमान केला, तर प्राण पणाला लावून ते तो धवन टाकतील. त्यांच्या मदतीची कोणी याचना केली तर त्याचे साहाय्य करताना ते स्वत:ची पर्वा करणार नाहीत. आपल्या अपमानाचा सूड घेण्यापूर्वी ते शत्रूला खबर देतात व तलवार व भाला घेऊन लढाईला निघतात. लढाईत पळणाऱ्यांचा ते पाठलाग करतात, पण शरण आले-ल्याला ते ठार मारीत नाहीत. सध्या सम्राट हर्षवर्धनाने पूर्वेपासून पश्चिमे-पर्यंत सर्व प्रदेश आपल्या पराक्रमाने जिंकला आहे. दूरची राष्ट्रे त्याने जिंकली व जवळची धाकात ठेवली. परंतु फक्त या राज्यांतील लोक त्याला शरण गेलेले नाहीत. त्याने पाचही प्रांतांचे सैन्य गोळा केले, राज्यातील अत्यंत शूर सेनापतींना पाचारण केले, व मराठ्यांना शासन करण्यासाठी स्वत: त्यांच्यावर चाल केली. पण तरीही त्यांचा विरोध मोडून काढण्यात त्याला यश आलेले नाही. याबरून त्या लोकांच्या क्षात्रधर्माची व क्षात्रतेजाची आपणांस कल्पना यावी."

त्या ज्ञानी चिनी प्रवाशाने मराठ्यांच्या स्वभावाचे जे वर्णन केले आहे, त्याचीच प्रतीति हजार वर्षांनंतर औरंगजेबाला परत आली. या प्रदीर्घ काळात मराठ्यांच्या स्वभावात कसलाही फरक झाला नव्हता. याचा अर्थच असा की आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी तळहातावर शिर घेऊन लढण्याचे बाळकडू त्यांच्या रोमरोमांत भिनले होते. ती त्यांची नैसर्गिक प्रकृतीच होती. हर्ष हा शहाणा व दिलदार माणूस म्हणून त्याने तुटेपर्यंत न ताणता वेळेवर माघार घेतली, आणि 'समरसंशक्त सकलोत्तर पथेश्वर श्रीहर्षवर्धन पराजयोपलब्ध परमेश्वर परानामधेय सम्राट् पुलकेशी महाराज' म्हणजे, "समरांगणांत समर्थ असलेल्या, सगळ्या उत्तर

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, पुणे
पेठ, पुणे-३०



भारताचा अधीश्वर असलेल्या श्रीहर्षवर्धनाचा पराजय करून मिळविलेली परमेश्वर ही श्रेष्ठ पदवी धारण करणारा" अशी सम्राट् पुलकेशीची बिरुदावलि त्याला डाचत असली, तरी त्याच्या शौर्याचे मुक्तकंठाने कौतुक करून त्याच्याशी त्याने मित्रत्वाचा संधि केला. पण औरंगजेब जास्त जिद्दी आणि हट्टी. त्याने माघार घेतली नाही. तो मराठ्यांशी झगडत राहिला आणि अखेर महाराष्ट्रातच कामास आला. महाराष्ट्राच्या इतिहासात हजार वर्षांत दोन वेळा राष्ट्रजीवनाचे हे परम-मंगल आर्यसत्य सिद्ध झाले की, आपल्या चरणावर रुधिराचा अभिषेक करण्यास सिद्ध असलेल्या आपल्या अनन्य उपासकांवर स्वातंत्र्यलक्ष्मीचा सदैव वरदहस्त असतो; तिचे उपासक संख्येने कितीही थोडे असोत व त्यांचे राज्य कितीही लहान असो; जरी त्यांच्यावर चालून आलेला आक्रमक हा सैन्याने, संख्येने, सत्तेने, संपत्तीने, चौदा चौकड्यांचे राज्य करणाऱ्या रावणासारखा महाबली असला, तरी तिच्या प्रसादाने, ते त्याला अखेर गारद केल्याशिवाय राहत नाहीत.

सव्वीस वर्षांपूर्वी उत्तरेतून दक्षिणेवर जबरदस्त डोंगर लाट कोसळली. त्या लाटेच्या धडाक्यापुढे विजापूर आणि गोवळकोंडा येथील कदीम पादशाहती पोरांनी उभारलेल्या पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे धडाधड कोसळल्या. किल्ल्यांचे व डोंगरांचे बंधारे फोडून ती लाट रोरावत महाराष्ट्रात घुसली. तिने संभाजीचा बळी घेतला. तिने रायगडची राजधानी गिळंकृत केली. तिने राजमाता येसूबाई आणि युवराज शाहू यांचा घास घेतला. भुजंगाने बेडूक गिळावा त्याप्रमाणे मराठ्यांचे बुलंद किल्ले एकामागून एक त्या राक्षसी लाटेने गिळून टाकले आणि मराठ्यांना बेघर केले. असे वाटले की, महाराष्ट्रात मराठ्यांचे नांव शिल्लक राहत नाही आणि शिवाजी महाराजांचे हिंदवी स्वराज्य त्या महाप्रलयात 'समुद्रास्तृप्यन्तु' होऊन जाते....पण मराठे तरीही हटले नाहीत, हरले नाहीत, शरण गेले नाहीत. हर्षवर्धनाशी झुंजताना त्या वेळी पुलकेशी होता. पण या वेळी औरंगजेबाशी संग्राम सुरू होण्यापूर्वीच मराठ्यांचा पुलकेशी....शिवभूपति-दिवंगत झालेला होता. मराठ्यांपाशी होती ती केवळ त्या पुण्यश्लोकाची प्रेरक आणि संजीवक स्मृति. रामनामाने पूर्वी पाषाण तरले. त्याप्रमाणे या प्रसंगी शिवनामाने मराठे औरंगजेबाचे महासंकट तरून गेले.

सत्तावीस वर्षांपूर्वी चैत्री पौर्णिमेला रायगडावर शिवाजीमहाराजांचे निधन झाले. पण त्या वेळी नष्ट झाले ते त्यांचे शरीर, आत्मा नव्हे. त्यांच्या त्या मृण्मय देहाच्या पिंजऱ्यांतून मुक्त झालेले ते सर्वगामी आणि दुर्दम्य शिवचैतन्य सर्वत्र पसरले. ते मराठ्यांच्या श्वासात आणि निःश्वासात, दऱ्यात आणि खोऱ्यात, नद्यांत आणि सागरात, गडात आणि पर्वतात भरून उरले. संभाजीच्या उद्दाम हौतात्म्यात ते प्रकट झाले. येसूबाईच्या कोमल आणि उदात्त स्वार्थत्यागात तेच दिसून आले. रामचंद्रपंत अमात्याच्या स्वराज्यसाधक अष्टावधानी प्रतिभेच्या

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था पुणे
डॉ. व्ह द्रा. गोगाटे
१४३३ सदाशिव पेठ, पुणे-३०

व्यापारात तेच प्रतिबिंबित झाले. संताजी–धनाजींच्या शत्रूच्या रक्ताने रंगलेल्या खड्गाच्या उग्र धारेत तेच चैतन्य तळपले. खंडो बल्लाळाच्या अपूर्व स्वामिनिष्ठेत त्याचाच प्रत्यय आला. राजारामाच्या समर्पणशील कर्तव्यनिष्ठेत त्याचीच प्रतीति आली. दूरच्या प्रदेशात व बादशाही छावणीवर सारख्याच बेडरपणे झडप घालणाऱ्या ताराबाईच्या आक्रमक युद्धनीतीत त्याच शिवचैतन्याचा साक्षात्कार झाला. त्या अविनाशी चैतन्याशी झगडताना औरंगजेबाची बुद्धि कुंठित झाली, त्याच्या धनाला ओहोटी लागली, त्याची तलवार बोथट झाली, त्याचे सैन्य खिळखिळे झाले आणि अखेर तो स्वतःही संपला.

एक नाही, दोन नाही, सतत सव्वीस वर्षे त्याचे सैन्य दक्षिणेत राहिले होते. एकदा औरंगजेबाबरोबर उत्तरेतून निघाल्यानंतर परत काही त्यांच्या घरादारांची तोंडे त्यांच्या नजरेला पडली नाहीत. या प्रदीर्घ काळात त्यांच्यापैकी जे लहान होते, ते तरुण झाले, जे तरुण होते त्यांच्या दाढ्यामिशा पिकल्या व ते मरूनही गेले. बारा महिने तेरा काळ एक तंबूत तरी राहायचे नाहीतर औरंगजेबाच्या मागे उन्हातान्हात व पाण्यापावसात कोठल्यातरी किल्ल्याच्या मागे पायपीट करीत भटकायचे, लढाया करायच्या, स्वतः मरायचे व दुसऱ्याला मारायचे. द्वेष, त्वेष, चिंता, धास्ती यांनी प्रक्षुब्ध झालेल्या त्यांच्या मनाला काडीचीही स्वस्थता नव्हती. त्यांच्या भावनांचे धनुष्य सदैव ताणलेले होते. आषाढातल्या विजा कडाडत असलेल्या गुरगुरणाऱ्या आकाशाखाली जीव मुठीत धरून कष्टाने चालत असावे व कोणत्या क्षणी ती आकाशाची कुऱ्हाड अंगावर कोसळून आपली राख करील या धास्तीने ऊर सदैव धपापत असावा तशा प्रकारचे त्यांचे जीवन होते. औरंगजेबाच्या झेंड्याखाली पूर्वी दिग्विजयाला निघालेल्या त्या श्रीमंत सैन्याला आता देशोधडीला लागलेल्या कंगाल निर्वासितांची केविलवाणी कळा प्राप्त झाली होती. त्या भणंग व बकाल जीवनाचा त्या सैन्याला इतका वीट आला होता, आणि आपल्या घरांच्या गार सावलीत विसावण्यास ते इतके अधीर झाले होते की, औरंगजेबाचा मृत्यु झाल्याबरोबर आझमच्या नेतृत्वाखाली त्याने तडक उत्तरेची वाट धरली. त्याने नर्मदा ओलांडली व सरळ घराचा रस्ता धरला. एकदाही मागे वळून दक्षिणेकडे पाहिले नाही.

औरंगजेबाचे सैन्य आता माहेरी निघाले होते. त्या वाटेवरचे काटे त्याला टोचत नव्हते आणि त्या मार्गावरचे ऊन त्याला चांदण्यासारखे वाटत होते. ती आनंदयात्रा उत्तरेकडे चालली होती. ध्वज डौलाने डोलत होते. नगारे वाजत होते, नौबती दणदणत होत्या. घोडे खिकाळत होते. धुळीचे लोट उठत होते. माणसांचा एकच कोलाहल उसळत होता. ते सैन्य मागे वळून पाहत नव्हते, पाहण्याची त्याला इच्छाही नव्हती. सैन्य चालले पुढे....सैन्य चालले पुढे....

हळुहळू क्षितिजावरचे ते धुळीचे ढग विरळ होत गेले. नगाऱ्यांचे आणि नौबतींचे आवाज दूर दूर जात राहिले आणि नंतर मुळीच ऐकू येईनासे झाले. सैनिकांच्या, उंटांच्या, घोड्यांच्या त्या आकृत्या अंधुक होत गेल्या आणि नंतर अजिबात दिसे॰नाशा झाल्या. माणसाला घटकाभर डुलकी लागावी व स्वप्न पडावे आणि त्या स्वप्नात रथ दिसावेत, हत्ती दिसावेत, घोडे दिसावेत, सैनिक दिसावेत, पण जाग आल्यानंतर मात्र त्या स्वप्नसृष्टीतील मायानगरीचा मागमूसही उरू नये, त्या॰प्रमाणे क्षितिजाच्या रेषेवर ती सैनिकांची, उंटांची, घोड्यांची लांबच लांब रांग जाताना दिसली आणि पाहता पाहता दिसेनाशी झाली. सगळीकडे पुन्हा पूर्वी॰सारखेच सारे कसे शांत शांत होऊन गेले.

एकटा औरंगजेब मात्र आपले हट्ट, आपली जिद्द व आपली स्वप्ने यांना उराशी घट्ट कवटाळून मागे दक्षिणेत राहिला होता.

वर्षामागून वर्षे गेली. ऋतुचक्र फिरत राहिले, उन्हाळ्यात सूर्य तापला आणि त्याने औरंगजेबाच्या त्या उघड्या कबरीवर आगीचा वर्षाव केला. पावसाळ्यात आकाशात जमा झालेल्या सावळ्या मेघांनी त्या कबरीवर शीतल जलधारांचा अभिषेक केला. त्या कबरीवर विजा कडाडल्या आणि वादळे गरजून गेली. हिवाळ्यातल्या पहाटेचे स्निग्ध आणि प्रसन्न चांदणे त्या कबरीवर थेंबाथेंबांनी गळत राहिले.

पण यांपैकी कशानेही, औरंगजेबाला एकदा लागलेल्या त्या चिरनिद्रेचा भंग झाला नाही.

या दक्षिण देशच्या मराठी मातीतच त्याने आपले कायमचे घर केले होते.

समाप्त

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था
१११ सदाशिव पेठ, बडे घाला,
पुणे-४११ ०३०

# काळ प्रकाशने

लेखक : बाळशास्त्री हरदास रु.

* १ रामायणावरील व्याख्याने १०
* २ महाभारतावरील व्याख्याने
३ भगवान् श्रीकृष्ण २५
४ वेदांतील राष्ट्रदर्शन (भाग १ ला) २५
* ५ वेदांतील राष्ट्रदर्शन (भाग २ रा) २५
* ६ भारतीय स्वातंत्र्यसमर – १८५७ ते सुभाष
७–१० पुण्यश्लोक छत्रपति शिवाजी (भाग १ ते ४)
*११ धर्मवीर डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे यांचे चरित्र, भाग १ ४०
१२ आर्य चाणक्य विभूतिमत्त्व कार्य, व राजकीय तत्त्वज्ञान (भाग १ ला) ४०
१३ श्री. बाळशास्त्री हरदास यांचे निवडक निबंध १०
१४ गीत भारत व स्फुट काव्य १०

लेखिका–श्रीमती वीणा हरदास– ५

१५ कै. बाळशास्त्री हरदास यांचे चरित्र (भाग १ ला) ५
१६ कथा भागवत, (भागवतातील निवडक कथा) ३०
१७ धर्मवीर डॉ. बा. शि. मुंजे यांचे चरित्र, (भाग २ रा) ४०
१८ लोकनायक बापूजी अणे यांचे चरित्र (भाग १ ला) ४०

लेखक– प्रा. श. श्री. पुराणिक

१९ मराठ्यांचे स्वातंत्र्यसमर (पूर्वार्ध) छत्रपति संभाजी ३०
२० " (उतरार्ध) छत्रपति राजाराम व ताराबाई ५०

लेखक शं. रा. दाते

२१ हिंदुधर्माचे स्वरूप ५
२२ लोकमान्य टिळकांचे पुण्यस्मरण ५
२३ महाराष्ट्र हिंदुसभेच्या कार्याचा इतिहास २५
*२४ समाजवादाच्या विविध कल्पना व भारतीय जीवनपद्धति ३
२५ हिंदुराष्ट्रवाद–एक विचार (मराठी) ५
२६ हिंदुराष्ट्रवाद–एक विचार (हिंदी) ८
*२७ भारतीय स्वातंत्र्याचे रणझुंजार २०
२८ क्रांतदर्शी सावरकर ५
२९ क्रांतिकारक टिळक नि त्यांचा काळ – ले. अ. ज. करंदीकर २०
३० रणझुंजार डॉ. पां. स. खानखोजे : ले. गंगाधर हरि पटवर्धन २
३१ गुन्हा, शिक्षा व अपवाद – ले. गं. ह. पटवर्धन २

टीप – * असलेले ग्रंथ शिल्लक नाहीत